

# सह्याद्रीचे वारे

## यशवंतराव चव्हाण

# सह्याद्रीचे वारे

**यशवंतराव चव्हाण**

**मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण**
**यांच्या निवडक भाषणांचा संग्रह**

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**
**जन. जगन्नाथ भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१.**

**अध्यक्ष**
**शरद पवार**

**उपाध्यक्ष**
**हुसेन दलवाइ©**

**कार्याध्यक्ष**
**अरुण गुजराथी**

**सरचिटणीस**
**श. गं. काळे**

**खजिनदार**
**डॉ. रविंद्र बापट**

**विश्वस्त**
**मोहन धारिया**
**शिवाजीराव पाटील निलंगेकर**
**डॉ. निळकंठराव कल्याणी**
**प्रि. पी. बी. पाटील**
**राम प्रधान**
**गुलाम गौस**
**लक्ष्मण माने**
**वसंतराव कार्लेकर**
**ज्ञानेश्वर खैरे**

सौ. सुप्रिया सुळे
शासन प्रतिनिधी
शासन प्रतिनिधी

# सह्याद्रीचे वारे

लेखक
यशवंतराव चव्हाण

प्रकाशक / सर्वाधिकार
© यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई
जन. जगन्नाथ भोसले मार्ग,
मुंबई - ४०० ०२१

ई बुक प्रथमावृत्ती
२००६

ई बुक निर्मिती
संगणक प्रकाशन,मुंबई
५/६, शांती निवास , संत रामदास रोड,
मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१

विशेष आभार :
सौ.वेणूताई चव्हाण प्रतिष्ठान, कराड

## आरंभींचे दोन शब्द

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या निवडक भाषणांचा हा पहिला अधिकृत संग्रह आज प्रसिद्ध होत आहे. या संग्रहांत महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरच्या काळांतील त्यांच्या भाषणांचा मुख्यतः समावेश केलेला असला तरी द्विभाषिक मुंबई राज्याचे ते मुख्यमंत्री असतांना त्यांनी केलेल्या कांहीं भाषणांचाहि त्यांत अन्तर्भाव करण्यांत आला आहे.

मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर गेल्या पांच वर्षांच्या काळांत अनेक महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीं त्यांनी जे विचार प्रदर्शित केले ते वाचकांना एकत्रित वाचावयास मिळावेत या दृष्टीनेंच या संग्रहांतील भाषणांची निवड करण्यांत आली आहे.

पांच वर्षांचा काल हा राष्ट्राच्या, समाजाच्या किंवा व्यक्तीच्या जीवनातील फार मोठा कालखंड आहे असें नाहीं. परंतु इतिहासाची गति कालाच्या गतीनें नियंत्रित होत नसते. वर्षानुवर्षे संथपणानें चालणारा इतिहासाचा प्रवाह क्षणार्धात अशा कांही वेगानें उफाळून वाहूं लागतो कीं त्यामुळें व्यक्तींचे, समाजाचें आणि राष्ट्राचें जीवन आमूलाग्र बदलून जातें. गेल्या पांच वर्षांच्या काळांत महाराष्ट्राच्या जीवनांत असेच विलक्षण क्रांतिकारक बदल घडून आले आहेत. अनेक दृष्टींनीं महाराष्ट्राच्या इतिहासांतील हा अनन्यसाधारण असा काळ आहे. या ऐतिहासिक काळांत श्री. यशवंतरावांनीं प्रदर्शित केलेल्या महत्त्वाच्या विचारांचें प्रतिबिंब या संग्रहांत शक्य तों दिसावें असा प्रयत्न करण्यांत आला आहे.

एका अर्थाने हीं त्यांची प्रातिनिधिक भाषणें आहेत असें म्हणतां येईल. लोकशाही आणि राष्ट्रीय एकता यांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या उत्कर्षाचे विचार त्यांनीं या भाषणांतून मांडलेले आहेत. त्यांच्या मतें, महाराष्ट्राचें भावनात्मक ऐक्य व त्याचा आर्थिक विकास यांवरच महाराष्ट्राचें भवितव्य अवलंबून असून तें घडवून आणण्याचें महाराष्ट्र राज्य हें फार मोठें साधन आपणांस प्राप्त झाले आहे. आर्थिक विकास हा त्यांच्या विचारांचा मुख्य गाभा असून महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या अनेक दिशा त्यांनी या भाषणांतून दाखविल्या आहेत. तसेंच महाराष्ट्राच्या सध्यांच्या विशिष्ट परिस्थितींत त्यांच्या दृष्टीनें शिक्षणाला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान असून सहकार हा महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा त्यांनीं पाया मानला आहे. इतिहासाची त्यांना लाभलेली दृष्टि, प्रश्नाच्या अंतरंगांत शिरून त्याचें मूळ शोधणारी त्यांची तत्त्वचिंतक वृत्ति आणि लोकशाही, समाजवाद आणि मानवता या मूलभूत मूल्यांवर असलेला त्यांचा अढळ विश्वास यांचें दर्शन पदोपदीं या भाषणांतून वाचकांना होईल.

त्याचबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचेंहि दर्शन वाचकांना त्यांतून घडेल. त्यांच्या विचारांचे, भावनांचे व प्रेरणांचे स्वच्छ प्रतिबिंब या भाषणांत पडलेलें असून महाराष्ट्राच्या आणि अंतिम दृष्टीनें भारताच्या उत्कर्षाशीं हे विचार, या भावना व या प्रेरणा एकरूप झाल्या आहेत व हें तादात्म्य हीच त्यांच्या जीवनाची सर्वांत मोठी प्रेरणा आहे.

महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या संदर्भांतील त्यांचीं भाषणें 'नवे राज्य' या भागांत समाविष्ट करण्यांत आलीं आहेत. या भाषणांत नव्यानें अस्तित्वांत येणा-या महाराष्ट्र राज्यांतील विशिष्ट परिस्थिती,

त्याच्यापुढें असलेल्या महत्त्वाच्या समस्या आणि त्याची प्रेरकशक्ति यांवर भर देण्यांत आला आहे. नव्या महाराष्ट्राच्या आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाच्या दिशा दाखविणारीं त्यांनी जीं भाषणें केलीं आहेत, त्यांचा समावेश 'नवी क्षितिजें' या भागांत मुख्यत्वेंकरून करण्यांत आला आहे. साधन आणि साध्य यांमधील ही विभाजक रेषा पुसट असली तरी त्यामुळें नव्या महाराष्ट्राचें चित्र अधिक स्पष्टपणें वाचकांपुढें उभें राहण्यास मदत होईल.

मुंबई
२६ जानेवारी १९६२

दुस-या आवृत्तीची प्रस्तावना

महान व्यक्तींचे विचार काळ उलटला तरी अढळ राहतात व भावी पिढ्यांना स्फूर्ती देत असतात. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण ह्यांचे व्यक्तिमत्त्वही असेच महान् व सर्वस्पर्शी होते.

मुख्यमंत्रिपदाच्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत कै. यशवंतरावांनी महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी जे विचार प्रदर्शित केले त्यांचे मोल आजही कायम आहे. त्यांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचावेत म्हणून सह्याद्रीचे वारे या ग्रंथाची द्वितीयावृत्ती आम्ही काढीत आहोत. वाचक या उपक्रमाचे स्वागत करतील अशी आशा आहे.
महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन, मुंबई.

तिस-या आवृत्तीची प्रस्तावना

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार कै. यशवंतरावजी चव्हाण ह्यांच्या 'सह्याद्रीचे वारे' या भाषणसंग्रहाची तिसरी आवृत्ती स्वातंत्र्यदिनी प्रसिद्ध होत आहे. हा एक दूर्मिळ व अपूर्व असा योग आहे. या आवृत्तीच्या प्रकाशनाची जबाबदारी आणि अधिकार महाराष्ट्र शासनाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांचेकडे सोपविली असल्याने हे मौलिक कार्य करण्यास प्रतिष्ठानला अभिमान व आनंद वाटत आहे.

एखाद्या प्रसिद्ध कादंबरीस लाभावे अशा प्रकारचे यश आणि लोकप्रियता यशवंतरावजींच्या

'सह्याद्रीचे वारे' या भाषणसंग्रहास लाभली असून, त्यातील त्यांचे महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक राजकीय अशा अनेक प्रश्नांसंबंधी विचार समजून घेण्यास महाराष्ट्रीय जनता उत्सूक आहे याचे ही तिसरी आवृत्ती द्योतक आहे. मा. यशवंतरावजींचे विचार आणि मुद्दे महाराष्ट्राच्या आजच्या आणि उद्याच्या संदर्भातसुद्धा तंतोतंत लागू पडतात, यातून त्यांचे द्रष्टेपण स्पष्ट होते. चव्हाणसाहेबांनी महाराष्ट्राच्या भवितव्याचा अनेकविध बाजूनी फार दूरवरचा विचार केला होता. म्हणूनच सह्याद्रीचे वारे आजही तितकेच ताजे, टवटवीत आल्हादकारक आहेत.

पहिल्या दोन आवृत्तींत उल्लेख न केलेल्या एका मुद्याचा मी येथे मुद्दाम समावेश करीत आहे. आपल्या भाषणांचा संग्रह प्रसिद्ध करण्याचे मा. यशवंतरावजींनी निश्चित केल्यानंतर त्याच्या संपादनाचे काम त्यांनी त्यांचे निकटचे संबंधी श्री. हरी नारायण तथा दादा ठाकूर यांचेकडे सोपविले. अलिखित भाषणांचे संपादन बरेच जिकिरीचे व कष्टाचे असते, परंतु या भाषणसंग्रहाचे महत्त्व लक्षात घेऊन दादा ठाकूर यांनी अतिशय परिश्रम घेऊन मोठ्या आत्मीयतेने व निष्ठापूर्वक त्या संपादनाचे व प्रसिद्धीचे काम पार पाडले. सुमारे ६०-६२ ध्वनिलिखित (टेपरेकॉर्ड) भाषणांतून या संग्रहात समाविष्ट केलेल्या भाषणांची त्यांनी निवड करून ती संपादित केली. या सर्व कामाला दीड वर्षाचा कालावधी लागला. श्री. ठाकूर यांनी संपादन केलेला हा भाषणसंग्रह महाराष्ट्रात अतिशय गाजला व त्याला अमाप लोकप्रियता लाभली हे आपण जाणताच. मा. यशवंतरावजी त्यांना नेहमी म्हणत की हा भाषणसंग्रह संपादन करून प्रसिद्ध करण्यात तुम्ही जबरदस्त जादू केली आहे. ('जबरदस्त जादू' हे त्यांचेच शब्द आहेत.) परंतु मा. यशवंतरावजींचा आग्रह असतानाही या भाषणसंग्रहाचे संपादक म्हणून श्री. ठाकूर यांनी त्यावर आपले नाव घालू दिले नाही. चव्हाणसाहेबांना या गोष्टीची सतत जाणीव होती. याची कल्पना त्यांनी २२ एप्रिल १९८४ रोजी श्री. ठाकूर यांनी लिहिलेल्या पत्रावरून अधिक स्पष्ट होते, म्हणून ते पत्रच या प्रस्तावनेसोबत आम्ही प्रसिद्ध करीत आहोत.

कै. यशवंतरावजी चव्हाण यांचे विस्तृत आणि सखोल वाचन, मनन आणि चिंतन यांचे प्रतिबिंब त्यांच्या प्रत्येक भाषणातून, लिखाणातून स्पष्ट होते आणि म्हणूनच त्यांची साहित्यिक मूल्ये अधिक उंचीची वाटतात. याचा विचार करूनच अनेक विद्यापीठांनी हा भाषणसंग्रह क्रमिक पुस्तक म्हणून अभ्यासक्रमात स्वीकारला आहे. त्यांच्या या भाषणसंग्रहाचा विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयीन आणि त्यानंतरच्या जीवनयात्रेत दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरेल असा मला विश्वास वाटतो. सर्व विद्यार्थिवर्ग आणि महाराष्ट्राचे नागरिक या तिस-या आवृत्तीचे मनोमन स्वागत करतील याची मला खात्री वाटते. जयहिंद-जयमहाराष्ट्र.

शरद पवार,

अध्यक्ष,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

नवी दिल्ली,
स्वातंत्र्यदिन, १९९२

यशवंतराव चव्हाण
१, रेसकोर्स रोड,
नवी दिल्ली -११० ०११

दिनांक २२ एप्रिल १९८४
प्रिय दादा ठाकूर यांसी
स.न.वि.वि.

तुमचे तारीख ११ एप्रिलचे पत्र मिळाले. मी आता कदाचित मेच्या शेवटच्या आठवड्यात मुंबईस येण्याची शक्यता आहे. २६ मे रोजी मुंबईत माझा कार्यक्रम आहे. त्या वेळी आपण अरुन्धती वर्तक यांची चित्रे दाखविण्यास आणली तर मी मोठ्या आनंदाने पाहीन.

तुमचा बरेच दिवसांत समाचार समजला नव्हता. या पत्रामुळे तुमची भेट झाल्यासारखे वाटते. माझे नवीन पुस्तक कृष्णाकांठ प्रसिद्ध झाले आहे. त्याची एक प्रत स्वतंत्र पोस्टाने तुमच्याकडे पाठवीत आहे. माझी यापूर्वीची पुस्तके प्रसिद्ध करण्यात तुम्ही घेतलेले श्रम याची मला नेहमी आठवण होते.

तुमची प्रकृती उत्तम असेल असा विश्वास आहे.
कळावे,

आपला

यशवंतराव चव्हाण

श्री. ह. ना. ठाकूर
सीताराम भुवन,
१६० हिन्दू कॉलनी,
सर भालचंद्र रोड, दादर, मुंबई

अनुक्रमणिका

नवें राज्य

1 --------------- महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर 18
जाहीर सभा
सांगली, दि. 5 जानेवारी 1960

2. जनप्रेमाची शक्ति --------------------------------34
शेहेचाळिसावा वाढदिवस
सांगली, दि. 12 मार्च 1960

3 विविधतेंतील एकता --------------------------------44
आकाशवाणी
मुंबई, दि. 27 एप्रिल 1960

4 भाग्यवती शिवनेरी--------------------------------50
महाराष्ट्र राज्य निर्मिति
शिवनेरी, दि. 27 एप्रिल 1960

5 स्वप्नपूर्तीचा ऐतिहासिक क्षण--------------------56
महाराष्ट्र राज्याचा उद्घाटन समारंभ
राजभवन, मुंबई, दि. 1 मे 1960

6 सोनियाचा दिवस -----------------------------------58

महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाचा शपथविधि
सचिवालय, मुंबई, दि. 1 मे 1960

7 अविकसित देशांचा आर्थिक विकास --------------63
अर्थशास्त्रज्ञांच्या मेळाव्याचें उद्‌घाटन
पुणें, दि. 21 जानेवारी 1961

8 विधायक कर्तृत्वास आव्हान -----------------------68
'साधना' साप्ताहिकातर्फे भरविण्यांत आलेल्या परिसंवादाचें उद्‌घाटन
मुंबई, दि. 13 मे 1960

9 औद्‌योगिक विकासाच्या समस्या -----------------72
महाराष्ट्र व्यापार व औद्‌योगिक परिषदेचें उद्‌घाटन
मुंबई, दि. 17 जून 1960

10 कोंकण विकासाचा प्रश्न---------------------------79
कोंकण विकास परिषदेचें उद्‌घाटन
मुंबई, दि. 21 फेब्रुवारी 1959

11 तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या उंबरठयावर -----86
विदर्भ विकास परिषदेचें उद्‌घाटन
नागपूर, दि. 30 जून 1960

12 लोकशाहींतील नियोजन ----------------------------97
विधानसभा
मुंबई, दि. 25 ऑगस्ट 1960

13 औद्‌योगिक विकासाच्या नव्या दिशा ----------- 107
महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाची सभा
मुंबई, दि. 19 मे 1961

14 नियोजन, मनुष्यबळ व शेती ------------------ 113
काँग्रेस कार्यकर्त्यांचें शिबिर

महाबळेश्वर, दि. 7 ऑक्टोबर 1960

15 आमच्या शेतीचा मूलभूत प्रश्न------------------ 121
कृषि महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचा शिलान्यास
परभणी, दि. 15 फेब्रुवारी 1960

16 ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना ------------- 127
आकाशवाणी
मुंबई, दि. 15 ऑगस्ट 1958

17 नवपदवीधरांकडून अपेक्षा ------------------------ 130
मराठवाडा विद्यापीठाचा पदवीदान समारंभ
औरंगाबाद, दि. 15 ऑक्टोबर 1960

18 लोकशाही शक्तीचा प्रभावी आविष्कार -------- 135
अलिगड विद्यापीठाचा पदवीदान समारंभ
अलिगड, दि. 23 डिसेंबर 1959

19 राष्ट्ररचनेंतील समाजसेवेचें महत्त्व------------- 144
प्रोग्रेसिव्ह ग्रूप
मुंबई, दि. 11 ऑगस्ट 1960

20 सामाजिक समतेचें कार्य ------------------------- 149
सामाजिक परिषदेचें उद्घाटन
नाशिक, डिसेंबर 1957

21 जगन्नाथाचा रथ---------------------------------- 154
जाहीर सभा
नागपूर, दि. 9 नोव्हेंबर 1960

22 माझी जीवननिष्ठा--------------------------------- 163
सत्तेचाळीसावा वाढदिवस
नागपूर, दि. 30 मार्च 1961

23 लोकशाही राज्यकारभाराची कसोटी ------------- 173

विदर्भ विभागीय अधिकाऱ्यांची परिषद

नागपूर, दि. 13 डिसेंबर 1956

24 विकेंद्रीकरण - लोकशाही जीवनपध्दतीचा पाया 185

लोकशाही विकेंद्रीकरण चर्चा सत्राचें उद्घाटन

मुंबई, दि. 3 ऑक्टोबर 1960

25 नव्या जीवनाची साधनशक्ति ------------------ 190

लोकशाही विकेंद्रीकरण समितीचा अहवाल सादर करतांना

विधानसभा, मुंबई, दि. 7 एप्रिल 1961

26 सीमा प्रश्न ------------------------------------------ 195

विधानसभा व विधान परिषद

27 समाजवादाचा आमचा मार्ग---------------------- 209

विधानसभा व विधान परिषद

दि. 7 फेब्रुवारी 1961 व दि. 16 फेब्रुवारी 1961

28 लोकशाहींतील प्रशासन --------------------------- 213

नागपूर महाविद्यालयाच्या पोलिटिकल सायन्स आणि

पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन असोसिएशन्स

नागपूर, दि. 19 जानेवारी 1961

29 शिवछत्रपतींचे पुण्यस्मरण ----------------------- 220

शिवछत्रपतींच्या पुतळयाचें अनावरण

मुंबई, दि. 26 जानेवारी 1961

30 मला झालेलें लोकमान्यांचें दर्शन---------------- 224

टिळक पुण्यतिथि

पुणें, दि. 1 ऑगस्ट 1961

31 मानवतेचे पुजारी महाकवि रवींद्रनाथ टागोर - 237

टागोर जन्मशताब्दि महोत्सव
शिवाजी पार्क, दादर, दि. 8 मे 1961

32 डॉ. आंबेडकरांच्या विचारपरंपरेचा वारसा ------- 244
दीक्षा मैदान
नागपूर, दि. 30 ऑगस्ट 1961

33 साहित्यिकांची जबाबदारी------------------------ 251
विदर्भ साहित्य संमेलनाचें उद्घाटन
सावरगांव डुकरें, दि. 13 फेब्रुवारी 1960

34 साहित्य आणि संस्कृति------------------------- 257
महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाचे उद्घाटन
नागपूर, दि. 22 डिसेंबर 1960

35 राष्ट्रभाषा हिंदी----------------------------------- 262
मुंबई प्रांतिक राष्ट्रभाषा प्रचारसभेचा
बाविसावा पदवीदान समारंभ
मुंबई, दि. 19 मार्च 1961

36 माझा विरंगुळा ---------------------------------- 268
आकाशवाणी
पुणें, दि. 9 जून 1961

37 प्रगतीचें पहिलें पाऊल --------------------------- 272
महाराष्ट्र राज्याचा प्रथम वर्धापन दिन
मुंबई, दि. 1 मे 1961

38 राष्ट्रीय प्रगतीचे तीन आधारस्तंभ -------------- 277
आकाशवाणी
मुंबई, 15 ऑगस्ट 1961

..... आणि आज ह्या नव्या महाराष्ट्राचें जीवन एका नवीन तऱ्हेनें घडावें, त्यांत एक प्रकारची नवी आशा निर्माण व्हावी, त्यांत एक प्रकारचें नवें सामर्थ्य निर्माण व्हावें आणि हें महाराष्ट्र राज्य त्याचें साधन व्हावें अशी जनतेची अपेक्षा आहे.....

## महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर

आज या सभेमध्यें बोलत असतांना दीड-दोन वर्षांपूर्वी मी सांगलीस आलों होतों, त्याची मला आठवण येते. त्या वेळीं अशाच एका प्रसंगीं आपल्याशीं माझ्या मनांतले कांहीं विचार मीं व्यक्त केले होते. त्याच्याहि अगोदर कांही वर्षांपूर्वी माझ्या मनांतील भावना आणि विचार याच सांगलीमध्यें आपल्यापुढें मांडण्याचा मीं प्रयत्न केला होता. हें सर्व पाहतां माझ्या आयुष्यांतील कांहीं महत्त्वाच्या प्रसंगीं माझें म्हणणें मीं सांगलीच्या भूमीवरच मांडावें असा योगायोग दिसतो. आज आपण माझ्या हस्तें भारताचे नेते आणि पंतप्रधान पंडित जवाहरलालजी यांच्या पुतळ्याचें अनावरण केलें. तुम्हां सर्वांच्या वतीनें मी त्यांच्या पुतळ्याला अभिवादन करतों आणि असें वचन देऊं इच्छितों कीं, भारताचे नेते ज्या तत्त्वासाठीं, ज्या विचारासाठीं, ज्या ध्येयासाठीं स्वतःचें जीवन जगत आहेत त्या तत्त्वासाठीं, त्या विचारासाठी आणि त्या ध्येयासाठी आपण या भागांतले सर्व लोक कटिबद्ध आहोंत. पंडितजींच्या समोर गांधीजींची प्रतिमा आहे आणि गांधीजींच्या समोर पंडितजींची प्रतिमा आहे. गुरू-शिष्य एकमेकांसमोर, तुमच्या आमच्या सर्वांच्या समोर, साक्षी आहेत. त्यांना साक्षी ठेवून जें तत्त्व त्यांनी आपल्या जीवनात आम्हांला शिकविलें तें तत्त्व अखेरपर्यंत आम्ही आचरूं अशी शपथ आज आपण घेत आहोंत, हाच या पुतळ्याच्या अनावरण समारंभाचा खरा अर्थ आहे असें मी मानतों.

आज या औचित्यपूर्ण प्रसंगी मी माझे कांही महत्त्वाचे विचार आपल्यापुढें ठेवूं इच्छितो; ते विचार आतां लवकरच साकार होणा-या नवमहाराष्ट्रासंबंधीं आहेत. या नवमहाराष्ट्राचे प्रश्न जर आपणांस यशस्वी रीतीनें सोडवावयाचे असतील तर त्यांचे स्वरूप आपण नीट समजावून घेतलें पाहिजे. त्या दृष्टीनें महाराष्ट्रांतील बहुतेक विचारवंत आज या प्रश्नांची जी चर्चा करीत आहेत ती स्वागतार्हच आहे. कारण, विचारवंतांनी हें काम केलेंच पाहिजे. वेगवेगळ्या प्रश्नांचे पृथक्करण करून त्यांची उलटसुलट बाजू लोकांच्या पुढें त्यांनी मांडली पाहिजे आणि ते तशी मांडीतहि आहेत. आणि म्हणून यासंबंधींच्या चर्चेत आज जाहीरपणानें प्रवेश करण्याचें मी ठरविलें आहे. दुसरें असें की, कांहीं प्रश्नांसंबंधी माझी एक विशिष्ट दृष्टि आहे. तेव्हां महाराष्ट्राच्या प्रश्नांकडे मी कोणत्या

दृष्टीनें पाहतों हें महाराष्ट्राच्या जनतेपुढें विचारासाठीं मांडणें मी माझें कर्तव्य समजतों. लवकरच महाराष्ट्राच्या राजकारणाचीं पहिलीं पावलें टाकलीं जाणार आहेत. अशा वेळी कोणत्या दिशेनें माझे मन काम करीत आहे, कोणते प्रश्न आम्हांला आमच्यासमोर ठेवावयाचे आहेत आणि त्या प्रश्नांची उकल आम्हांला कोणत्या पद्धतीनें करावयास पाहिजे याचा आराखडा जर आम्हीं विचारपूर्वक आमच्यापुढें ठेवला नाहीं तर आंधळ्यासारखा प्रवास करण्याचा प्रसंग आमच्यावर येईल. परंतु आम्हांला आंधळ्यासारखा प्रवास करावयाचा नाहीं, डोळसपणानें करावयाचा आहे. निश्चित ठिकाणीं जाण्यासाठीं आम्हांला हा प्रवास करावयाचा आहे, आणि एका निश्चित गतीनें तो पुरा करावयाचा आहे. अशा प्रकारची उमेद आणि ईर्षा आम्हालां आमच्या मनांत निर्माण करावयाची आहे. आणि म्हणून लक्षांत घेण्यासारखे आज आमच्या समोर कोणते प्रश्न आहेत याचा आपण विचार करावयास पाहिजे. माझ्या मतें हे प्रश्न तीन प्रकारचे आहेत. कांहीं राजकीय प्रश्न आहेत, कांहीं सामाजिक प्रश्न आहेत आणि कांहीं आर्थिक प्रश्न आहेत.

आज महाराष्ट्रापुढें जे राजकीय प्रश्न आहेत त्यांतील भावनात्मक ऐक्याच्या प्रश्नाला माझ्या मतें आपण पहिलें स्थान द्यावयास पाहिजे. महाराष्ट्राच्या राजकीय जीवनामध्यें गेल्या दोन-तीन वर्षांत ज्यांनी प्रवेश केला आहे, पण अजूनही ज्यांच्या मनांत थोडासा संशय आहे, अशा विदर्भाला आणि मराठवाड्याला, भावनेनें आमच्याशीं एकरूप होतां येईल असें वातावरण आतां आपणांला महाराष्ट्रांत निर्माण करावयाचें आहे. इतिहासानें यांत कांही अडचणी निर्माण करून ठेवल्या असल्या तरी त्या आतां आपण बाजूला सारल्या पाहिजेत. पूर्वी हिंदुस्तानचा जो इतिहास घडला त्याला तुम्ही आणि मी जबाबदार नाहीं. कारण तो इतिहास तुम्हीं आणि मी, तुमच्या आणि माझ्या हातांनी घडविला नाहीं. ज्या मराठवाड्यांत आमची मूळ मराठी भाषा बोलली गेली, जिथें ती रांगली आणि चालती-बोलती झाली आणि म्हणून ज्या मराठवाड्यांचे वर्णन मराठी मायबोलीचें माहेर असें आम्ही करतो तो मराठवाडा मोंगलाईत जाऊन पडला. तेथें तो शें-दीडशें, दोनशें, तीनशें वर्षे राहिला; तेथील वातावरणांत, तेथील परंपरेंत, तेथील भावनांच्या आवरणांत त्याची वाढ झाली. त्याचप्रमाणें मध्यप्रदेशचें जें राज्य इंग्रजांनीं निर्माण केलें त्यांत व-हाडाचे कांहीं भाग कांही शतकापासून जाऊन पडले. ते तेथील वातावरणांत, तेथील परंपरेंत आणि तेथील पार्श्वभूमींत वाढले. आणि असे हे आपण सर्व, गेली दोन-तीन वर्षे एके ठिकाणीं नांदावयाचा प्रयत्न करीत आहोत.

परंतु विदर्भांतील कांहीं लोकांच्या मनांत एका स्वतंत्र राज्याची भावना होती. अशा वेळीं, समोर राजकीय संकट दिसत असतांनाहि माझ्या मंत्रिमंडळांत काम करणारे माझे साथी आणि बाहेर काम करणारे आमचे अनेक कार्यकर्ते यांनीं महाराष्ट्रात सामील होण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला.

मला या विदर्भांतील माझ्या मित्रांचें जाहीर अभिनंदन करावयास पाहिजे. डॉ. खेडेकरांसारख्या माझ्या सहका-यांना मला जाहीर धन्यवाद दिले पाहिजेत. त्याचप्रमाणें विदर्भाची मागणी करून अखेरपर्यंत ती मांडण्याचा ज्यांनीं प्रयत्न केला, परंतु शेवटीं झालेला निर्णय शिरसावंद्य मानून महाराष्ट्राच्या जीवनाशीं समरस होण्याचा ज्यांनी निर्धाराने निर्णय घेतला ते माझे नागपुरांतील साथी श्री. कन्नमवार आणि त्यांचे सहकारी यांनाहि मला जाहीर धन्यवाद दिले पाहिजेत. आतां तुमची व माझी, महाराष्ट्राचें राजकारण चालविणा-यांची जिम्मेदारी आहे कीं, त्यांना आपण आपुलकीनें, प्रेमानें जवळ घेतलें पाहिजे. मेहेरबानी म्हणून नव्हे तर तो त्यांचा हक्क आहे म्हणून; आम्ही त्यांना चांगले वागवणारे कुणी तरी दादा आहोंत अशा भावनेनें नव्हे, तर ते आणि आम्ही भाऊ-भाऊ आहोंत, एका महान् कार्याचे साथीदार आहोंत या भावनेनें. अशा प्रकारची भावना, अशा प्रकारचा विश्वास त्यांच्या मनांत निर्माण करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. हीच आज महत्त्वाची गोष्ट आहे. ती आपल्याला विसरून चालणार नाही.

तेव्हां जे आमचे कांहीं विरोधी मित्र छोट्या-छोट्या प्रश्नांचीं दुखणीं घेऊन त्यांचा महाराष्ट्रभर बाजार मांडण्याचा प्रयत्न करतांना दिसतात त्यांना मला सांगावयाचे आहे कीं, या छोट्या-छोट्या प्रश्नांच्या चिंध्या जमविण्यासाठीं आपण जेवढा वेळ खर्च करीत आहांत त्यापैकीं निम्मा वेळ तरी महाराष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीनें आज ज्या महत्त्वाच्या समस्या आहेत त्यांच्या विचारासाठीं द्या; विदर्भांतील या मंडळींना जवळ करण्याच्या दृष्टीनें विचार करण्यासाठी कांहीं वेळ द्या. आज विदर्भांतील या मंडळींच्या मनांत जे संशय असतील, जे रागलोभ असतील, किंवा जे पूर्वग्रह असतील ते सर्व संशय, ते सर्व रागलोभ, ते सर्व पूर्वग्रह रेशमाच्या हातानें, आईच्या आणि थोरल्या भावाच्या ममतेनें दूर करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीनें महाराष्ट्राच्या जीवनांतील ही पहिली महत्त्वाची राजकीय समस्या आहे. याकडे जो दुर्लक्ष करील तो महाराष्ट्राचें नुकसान करील असें मला आपल्याला सांगावयाचें आहे. गेल्या तीन वर्षांत विदर्भांतील अनेक मंडळींना भेटण्याची, त्यांचें कार्य पाहण्याची मला संधि मिळाली. त्यांचीं मनें सांभाळण्याचा मीं प्रयत्न केला; तसेंच त्यांनींहि मला चांगलें वागविलें. जणुं कांहीं मी त्यांच्यामध्यें पांचपंचवीस वर्षे राहिलों आहें इतक्या ममतेनें आणि प्रेमानें त्यांनीं मला वागविलें. परंतु त्यांनी मला चांगले वागविलें किंवा मीं त्यांना चांगलें वागविलें या वैयक्तिक नात्याचा हा प्रश्न नव्हे. प्रातिनिधिक नात्यानें आम्ही एकमेकांशी ज्या त-हेनें वागलो आहोंत तें वागणें आम्हांला पुढें वाढवावयाचें आहे. विदर्भ आणि मराठवाड्याला त्याच भावनेनें आमच्याशी एकरूप करण्याची ही जबाबदारी आहे. हळुवारपणानें आपणांस ही जबाबदारी यापुढें पार पाडावयाची आहे. नाहीं तर आपण आपले पडलों कोल्हापूर-साता-याकडे; नागपूर, चांदा, भंडारा दूर आहेत, त्यांच्या प्रश्नांचा विचार करण्याची आम्हांला काय जरुरी आहे, अशा विचारांत जर जनता आणि आपण कार्यकर्ते फसलों तर मग महाराष्ट्राच्या मागणीचा आम्हांला खरा अर्थच कळलेला नाहीं असें म्हणावे

लागेल. महाराष्ट्राची घोषणा करणें सोपें आहे, पण महाराष्ट्राची जिम्मेदारी हातांत आल्यानंतर त्यांतून निर्माण होणारे प्रश्न समजून घेऊन आपुलकीच्या नात्यानें ते सोडविण्याचा प्रयत्न करणें हें महत्त्वाचे काम आहे. माझ्या मतें महाराष्ट्राचें राजकारण हीच एक महत्त्वाची समस्या आहे.

महाराष्ट्रापुढें जे महत्त्वाचे सामाजिक प्रश्न आहेत, त्यांपैकीं जो पहिला मोठा प्रश्न आहे त्यासंबंधी मी आतां बोलणार आहें. तो प्रश्न मोठा नाजुक असला तरीसुद्धां त्यासंबंधीं उघड उघड चर्चा झाली पाहिजे आणि मींसुद्धां तिच्यामध्यें भाग घेतला पाहिजे. हा प्रश्न महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनासंबंधींचा आहे. या विषयावर महाराष्ट्रातील अनेक विचारवंतांनीं गेल्या दोनचार महिन्यांत लेख लिहिले असून मीं ते काळजीपूर्वक वाचले आहेत. त्यामध्यें महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाचें वर्णन "भंगलेलें मन" या शब्दांनी केलें आहे. तें खरें कीं खोटें या विषयांत न जातां तें तसें आहे असें आपण गृहीत धरूं. तेव्हां कोणत्या अर्थाने तें भंगलेलें मन आहे, हें पाहणें जरुरीचें आहे. महाराष्ट्राच्या मागणीचा पाठपुरावा करीत असतांना आमचा एक आवाज, एक मन होतें. त्यासारखें चित्र मीं महाराष्ट्राच्या जीवनामध्यें पूर्वी कधींहि पाहिले नव्हतें. मी त्यावेळी शिव्या खात होतों तरी मला आनंद वाटत होता. मी म्हणालों, ठीक आहे. अशी एक शक्ति उभी होत आहे ही चांगली गोष्ट आहे. कारण माझी त्या शक्तीवर एक निष्ठा आहे, विश्वास आहे. पण आश्चर्य पहा ! हें एक दिसणारें मन, एक दिसणारें चित्र, संयुक्त महाराष्ट्र येतो आहे म्हटल्याबरोबर ताबडतोब संशयानें आणि शंकेनें भरलें. म्हणजे भंगलेलें मन आहे यांत शंका नाहीं. महाराष्ट्राच्या जीवनांतील जे सामाजिक प्रश्न आहेत त्यांत सर्वांत महत्वाचा प्रश्न हा आहे कीं, हें जें भंगलेलें मन आहे तें आम्हांला सांधावयाचें आहे. ब्राह्मण ब्राह्मणांकरितां विचार करतो, मराठा मराठ्यांपुरता विचार करतो. महार महारांकरितां विचार करतो, माळी माळ्यांकरितां विचार करतो. हे मासले मीं केवळ नमुन्यादाखल सांगितले. जातीयवादाच्या या विषारी विचारापासून आपण महाराष्ट्राला मुक्त केलें पाहिजे, जातीयवादाचा हा विचारच समूळ नष्ट केला पाहिजे. तेव्हांच महाराष्ट्राचें सामाजिक मन एकजिनसी होईल. परंतु हें कार्य आपण एका दिवसांत, एका रात्रींत करूं शकणार नाहीं. त्यासाठीं विचारी माणसांनी विचारपूर्वक प्रयत्न केल्याशिवाय हें घडून येणार नाही.

परंतु आज काय घडत आहे ? या बाबतींत मी नागपूरच्या माझ्या एका मित्राचा उल्लेख करणार आहें. तो म्हणजे श्री. माडखोलकरांचा. ते एक मोठे विचारवंत व थोर साहित्यिक असून त्यांचे माझ्याशीं मैत्रीचे संबंध आहेत. त्यांनी असा प्रश्न उभा केला आहे कीं, महाराष्ट्राच्या निमित्तानें निर्माण होणारे राज्य हें मराठा राज्य आहे कीं मराठी राज्य आहे ? असले प्रश्न उभे करणें ही भंगलेलें मन सांधण्याची प्रक्रिया नाहीं. परंतु अशा त-हेचा प्रश्न उभा करून जातीय आणि संशयाचें वातावरण निर्माण करण्याचा कुणी प्रयत्न केला तर मला त्यांना जरूर सांगावयाचे आहे कीं, हें

मराठा राज्य मुळींच होणार नाहीं. जोपर्यंत माझ्या हातांत सत्तेचीं सूत्रें असतील तोपर्यंत निदान, मी हें राज्य एका जातीचें, मराठ्यांचे, किंवा आणखी एखाद्या जातीचें होऊं देणार नाहीं. तें तसें होत आहे असें वाटलें, तर महाराष्ट्राच्या कल्याणाकरितां, मराठा जातींत जन्माला आलो आहें म्हणून मला कदाचित् एका बाजूला हटावें लागलें तरी मी हटण्याचा प्रयत्न करीन, पण ही गोष्ट मी होऊं देणार नाहीं. आणि म्हणून साहित्यिकांना आणि विचारवंतांना मी विचारूं इच्छितो कीं, कशासाठी हा वाद आपण पुन्हा उभा करीत आहांत ? ते संशय, त्या शंका आणि त्या आशंका यांमुळें माझें मन भरून येतें. पुष्कळ वेळां मला बोलणें अवघड होतें. खरोखरच अशा त-हेचे संशयांत पाडणारे प्रश्न आपण कां निर्माण करीत आहांत ? मी नेहमीं सांगत आलों आहें कीं, 'मराठा' हा शब्द जातिवाचक नाहीं. आचार्य अत्र्यांनी आपल्या वर्तमानपत्राला 'मराठा' हें नांव दिलें तें काय तो शब्द जातिवाचक आहे म्हणून दिलें ? 'मराठा' शब्दामागें महाराष्ट्राच्या एकजिनसी जीवनाची भावना आहे. 'मराठा' शब्दाचा हाच अर्थ आम्हांला अभिप्रेत आहे आणि म्हणून मराठी राज्य हें कोणा एका जमातीचें राज्य मुळींच होतां कामा नये, या गोष्टींवर माझा जरूर विश्वास आहे. पण हा जातीयवादी विचार सर्व समाजामध्यें आहे. मी असें म्हणत नाहीं कीं, मराठा समाजांत जातीयवाद नाहीं, ब्राह्मण समाजांत नाहीं, माळी समाजांत नाहीं. सगळ्या समाजांत तो आहे. नाहीं कुठें ? परंतु आम्ही विचारपूर्वक पंचवीस-पंचवीस वर्षे, तीस-तीस वर्षे राष्ट्रीयवादी भावनेला वाहून घेतलेलीं माणसें आहोंत. त्यांच्या अंगीं उगीच कांहींतरी चिटकवून मनाला यातना देऊ नका, जसें मराठ्यांबद्दल इतरांनी बोलतां कामा नये तसें मराठ्यांनींहि इतरांबद्दल बोलतां कामा नये असें माझें मत आहे.

परंतु मराठा राज्य कीं मराठी राज्य हा जो प्रश्न उपस्थित करण्यांत आला आहे त्याच्याशी संबंधित असा एक दुसराहि प्रश्न आहे. तो प्रश्न आतां मी आपल्यासमोर मांडणार आहे. हा जो विचार येतो कीं, हें मराठा राज्य होईल कीं काय, त्याच्या पाठीमागें कांही कारणें आहेत. या कारणांचा आपण आपल्या मनाशी विचार केला पाहिजे. या कारणांपैकीं मुख्य कारण असें आहे की, बुद्धीची, ज्ञानाची सेवा करण्याचें काम ज्या समाजांनीं आजपर्यंत केलें, हिंदुस्तानच्या अलीकडच्या इतिहासांतहि ज्यांनी वैचारिक नेतृत्व केलें त्यांच्या मनांत अशी शंका निर्माण होत आहे कीं, गेल्या दहाबारा वर्षांपासून, निवडणुकीचें राजकारण आल्यापासून संख्याबळावर कांहीं माणसें पुढें जात असतांना आपल्या गुणांची उपेक्षा आणि अवहेलना होणार आहे कीं काय ? अशा प्रकारची जी भावना कांहीं समाजांच्या मनांत निर्माण झाली आहे, तिचा आपण विचार केला पाहिजे. मी पुन्हा एकदां त्यांना सांगतो कीं, त्यांच्या मनांत निर्माण झालेल्या भावनेचा खरा अर्थ मी समजून घेऊं इच्छितो. निव्वळ कर्तृत्ववान, बुद्धिमान अशीं जीं माणसें आहेत त्यांना असें वाटावयाला लागलें कीं, हिंदुस्तान स्वतंत्र झाला आणि महाराष्ट्रहि मोठा झाला, पण ज्या महाराष्ट्राच्या निर्मितीकरितां आपण प्रयत्न केले त्या महाराष्ट्राची निर्मिति झाल्यानंतर आमची

जागा पाठीमागच्या बाकांवर राहणार आहे कीं काय ? हा विचार त्यांच्या मनांत येणें स्वाभाविक आहे. आणि म्हणून मला आपल्याला सांगितलें पाहिजे कीं, हें 'भंगलेलें मन' जर आपल्याला एक करावयाचें असेल तर त्यासाठीं दोन गोष्टींची आवश्यकता आहे.

त्यांतली पहिली गोष्ट, पहिलें पथ्य असें आहे की, आपण संशयानें एकमेकांकडे पाहावयाचें नाहीं, संशय निर्माण करावयाचा नाहीं. संशयाचें वातावरण निर्माण झालें तर तें आपल्या हातानें आपण दूर केलें पाहिजे. आणि दुसरी जी गोष्ट आहे ती गुणांची पूजा, 'मेरिट'चें महत्त्व. निवडणुकांत, राज्यकारभारांत आणि अनेक सामाजिक महत्त्वाच्या कामांत गुणांना महत्त्व दिलें पाहिजे. गुणांची पूजा होणें अत्यंत जरूर आहे आणि याच भावनेचा पाठपुरावा आपणांकडून झाला पाहिजे. भंगलेलें मन सांधण्याचे माझ्या मतानें हेच दोन उपाय आहेत. ह्या दोन गोष्टी जर आपण स्वीकारल्या तर हें भंगलेलें मन जोडण्याच्या दृष्टीनें आम्हांला पुष्कळच प्रगति करतां येईल.

या भंगलेल्या मनाचा दुसरा एक परिणाम महाराष्ट्राच्या जीवनांवर झालेला आहे, तो म्हणजे नवबौद्धांचा प्रश्न होय. त्याला महार समाजाचा प्रश्न म्हणून आपण सामान्यतः म्हणतों. परंतु निव्वळ महार जातीचा तो प्रश्न आहे या दृष्टिकोनातून मी त्याकडे पाहात नाहीं. डॉक्टर आंबेडकरांनीं त्या समाजांत नवी जागृति निर्माण केली व अनेक बुद्धिमान, विचार करणा-या कर्तृत्ववान तरुणांचा एक नवा वर्ग त्यांनीं त्या समाजांतून निर्माण केला. एवढ्या मोठ्या संख्येनें तुमच्या आमच्या बरोबर जो समाज महाराष्ट्रांत वावरला आणि ज्याला आपण अस्पृश्य म्हणून बाजूला फेकून दिलें त्या समाजाचा स्वाभिमान आज जागृत झाला आहे. ह्या समाजांत जे कर्तृत्ववान आणि बुद्धिमान लोक आहेत त्यांना आपण आतां जवळ केलें पाहिजे, आपलेसें केलें पाहिजे. आम्हांला कुणाची सहानुभूति नको आहे, आमचा जो हक्क आहे तो आम्हांला मिळालाच पाहिजे आणि आम्ही तो मिळविणार आहोंत, या जिद्दीनें काम करण्याची कुवत त्यांच्यांत निर्माण झाली आहे. तिचें आम्हीं स्वागत केलें पाहिजे. नवीन महाराष्ट्र चांगल्या कर्तृत्ववान हातांनी घडवावयाचा असेल तर मनांत असलेले जुने राग व जुने द्वेष दूर केले पाहिजेत. त्यांचा तो रिपब्लिकन पक्ष असला तरी हरकत नाहीं. सामाजिक आणि बाकीच्या इतर क्षेत्रांत आम्हीं त्यांना जवळ केलें पाहिजे. तुमच्या शहरी जीवनांत ठीक आहे. पण महाराष्ट्र हा जास्तींत जास्त खेड्यांतच राहतो. आणि म्हणून खेड्यांत राहणारा जो बहुसंख्य हिंदू समाज आहे त्याच्या वागणुकीमध्यें, त्याच्या मनामध्यें, आपण या समाजासंबंधीं एक प्रकारची भागीदारीची भावना निर्माण केली पाहिजे, एक प्रकारची समरसता निर्माण केली पाहिजे आणि अशा रीतीनें खेड्यांत एकजिनसी समाजजीवन निर्माण करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. हे शब्द जे मी वापरीत आहें त्यांची प्रक्रिया मोठी अवघड आणि लांबलचक आहे याची मला जाणीव आहे. परंतु मी

नुसत्या शब्दानें खचून जाणारा माणूस नाहीं. ही एक गरज आहे आणि म्हणून गेल्या दोनतीन वर्षांचा माझा हा प्रयत्न आहे कीं, त्या समाजाचे जे प्रश्न आहेत ते प्रश्न, नवबौद्ध म्हणतात म्हणून नव्हे, तर माझें कर्तव्य आहे म्हणून मी ते हाताळले पाहिजेत. माझें स्वतःचे असें मत आहे कीं, डॉक्टर आंबेडकरांच्या हयातीमध्यें महार वतनाचा प्रश्न अधिक उदारपणें, अधिक समजूतदारपणानें जर आम्ही त्यांच्याशीं बोलूं शकलों असतों तर त्यांच्या अनुयायांमध्ये आणि आमच्यामध्यें आज जो एक प्रकारचा मानसिक तुटकपणा निर्माण झाला आहे तो कदाचित् निर्माण झाला नसता. आणि म्हणून यापुढें जाणत्या बुद्धीनें, भागीदारीच्या भावनेंनें, महाराष्ट्रांतील या लोकांचा प्रश्न आपण सोडविला पाहिजे. महाराष्ट्राच्या समाजजीवनांतील एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हणून आपण या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे.

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनांतील जी तिसरी महत्त्वाची गोष्ट आहे तिचें वर्णन 'महाराष्ट्राच्या जीवनांतील विविधतेची जाणीव' अशा शब्दांत आपणांस करतां येईल. The awareness of the varieties in the social life of Maharashtra असें नांव या जाणिवेला, तिच्यासंबंधानें प्रबंध लिहावयाचा प्रसंग आला तर मी देईन. परंतु तशी कांहीं आपत्ति माझ्यावर येणार नाहीं असें मी धरून चालतों. या विविधतेची उत्तम साक्ष म्हणजे महाराष्ट्रातील शेतक-यांचे जीवन. पण शेतकरी ज्या भागांत राहतो त्याच भागांतील शेतक-यांचे जीवन त्याला फार महत्त्वाचें वाटतें असें आपण पाहतों. कोल्हापूरच्या भागांतील शेतकरी त्या भागांतील उसाच्या शेतीचा, लिफ्ट इरिगेशनचा जो प्रश्न आहे तोच सर्व हिंदुस्थानातील शेतक-यांचा प्रश्न आहे असें समजतो. परंतु खरें तसें नाहीं. आपण महाराष्ट्राच्या चतुःसीमा लक्षांत घ्या. आपला हा महाराष्ट्र अपरंपार मोठा आहे. तो अस्तित्वांत आला म्हणजे तो केवढा मोठा आहे याची आपल्याला अधिक चांगली कल्पना येईल. आपल्या मागणीप्रमाणें - बेळगांव - कारवारपासून आपली मागणी आहे - तो दक्षिणेकडून जो वर जातो तो सातपुड्याच्या पहिल्या तीन पुड्या आपल्या काखेंत मारतो; आणि पश्चिमेला तो पश्चिम समुद्राला बरोबर घेऊन उंबरगांवच्या सीमेपर्यंत जाऊन पोहोचतों. आणि इकडे पूर्वेला तो औरंगाबाद - नांदेडच्या पुढें गोदावरीच्या कांठानें चांदाभंडा-याच्या बाजूला जातो. इतका मोठा आहे हा तुमचा आमचा महाराष्ट्र. तर कृपा करून महाराष्ट्र म्हणजे दोन सातारा आणि कोल्हापूर जिल्हे असा या भागांतील लोकांनी आपला समज करून घेऊं नये. त्याचप्रमाणें रत्नागिरी ठाण्याच्या लोकांनीं सह्याद्रीच्या पश्चिमेकडचा भाग म्हणजे महाराष्ट्र असें मानतां कामा नये. महाराष्ट्राचा शेतकरी म्हणजे तुमच्या आमच्या टापूंतील लोक किंवा तुमचे आमचे नातेवाईक नव्हेत. पंचगंगेच्या आणि कृष्णेच्या कांठाला काम करणारा जसा मराठा शेतकरी आहे, जैन शेतकरी आहे, तसाच ठाण्याच्या, कुलाब्याच्या बाजूला सुरेख शेती करणारा आगरी शेतकरी आहें आणि वसईच्या आवतींभोंवती सुंदर बागायत व भातशेती करणारा ख्रिश्चन शेतकरीहि आहे. रत्नागिरीच्या भागांत आपण गेलांत तर तेथें आपणांला कुणबी शेतक-याची बाग सांपडेल आणि वर खानदेशच्या बाजूला जाल तर

आरशासारखी स्वच्छ शेती करणारा लेवा पाटीदार शेतकरी आपल्याला भेटेल. तसेंच आपण अकोल्यास जा, अमरावतीस जा, नागपूरच्या बाजारांत जा आणि तेथून पुढें चांद्याच्या जंगलांत जा आणि पंचगंगा, वारणा, कृष्णा, गोदावरी, तापी, वैनगंगा ह्या सगळ्या नद्यांच्या कांठांनी फिरा. आणि मग वेगवेगळ्या त-हेचे प्रश्न असणारे, वेगवेगळ्या परंपरा असणारे, वेगवेगळ्या भावना असणारे, वेगवेगळ्या जमातींतून आलेले हे सर्व शेतकरी आहेत असें आपणांस आढळून येईल. आणि म्हणून यापुढें जेव्हां तुम्ही शेतक-यांच्या प्रश्नांचा विचार कराल तेव्हां सबंध महाराष्ट्रामध्यें पसरलेल्या शेतक-यांचें, काळ्या जमिनींतून नवीन संपत्ति काढणा-या, शेतींतून सोनें निर्माण करणा-या कष्टकरी शेतक-यांचें चित्र तुमच्या डोळ्यापुढें आले पाहिजे. हें बहुजनसमाजाचें चित्र आहे. बहुजनसमाज याचा अर्थ आपली एक जमात आणि आपले कांहीं पाव्हणेरावळे असा जर कोणी करीत असतील तर ती चुकीची कल्पना आहे हेंहि आपण लक्षांत घेतलें पाहिजे. ही जाणीव जर आमच्या विचारांच्या पाठीमागें नसेल तर आमचे निर्णय चुकीचे येतील. कारण कोठलाहि विचार हा क्रियाशील होण्यापूर्वी तो भावनेनें समजून घ्यावा लागतो आणि जर भावना अपुरी असेल किंवा चुकीची असेल तर तींतून येणारा निर्णय, तींतून येणारा विचार हा अपुरा आणि चुकीचा असण्याची शक्यता असते. आणि म्हणून या 'अवेअरनेस'ची अतिशय आवश्यकता आहे. ही गोष्ट मी आपणांपुढे फार आग्रहपूर्वक मांडीत आहें. तिचाहि आपण आपल्या मनाशीं विचार करावा. माझ्या मतानें महत्त्वाचे असणारे हे तीन सामाजिक प्रश्न आहेत. ब्राह्मण-ब्राह्मणेतर, मराठा-मराठेतर, अमका अमकेतर असा विचार करण्यापेक्षां सगळ्या लोकांची, एकजिनसी कार्यकर्त्यांची सेना आम्हांला उभी करावयाची आहे, ही भावना आमच्यांत असली पाहिजे आणि त्या दृष्टीनें प्रयत्न करण्याची आपण खटपट केली पाहिजे. ही एक महत्त्वाची गोष्ट मला आपणांला आग्रहपूर्वक सांगावयाची आहे.

तिसरा प्रश्न आर्थिक क्षेत्रांतला आहे. पण आर्थिक प्रश्नांची चर्चा इतकी झालेली आहे कीं, मी या बाबतींत कांहीं नवीन सांगणार आहें अशांतला भाग नाहीं. मी जुन्याच गोष्टींची कदाचित् पुनरावृत्ति करीन. पण त्याची आवश्यकता आहे म्हणून मी हें बोलत आहें. महाराष्ट्रांतील आर्थिक प्रश्न सर्वसाधारणपणें तीन प्रकारचे आहेत. पहिला प्रश्न शेतीचा आहे, दुसरा प्रश्न उद्योगधंद्यांचा आहे आणि तिसरा प्रश्न मध्यवर्गीयांच्या प्रश्नांतून निर्माण झालेला आहे. पण हे प्रश्न हिंदुस्तानांत आपणांला कोठेंहि पाहावयास मिळतील. मी आतांच आपल्यापुढें महाराष्ट्रापुरते मर्यादित असलेले जे विशिष्ट स्वरूपाचे सामाजिक आणि राजकीय प्रश्न मांडले ते सगळेच प्रश्न कांही इतरांच्या पुढें नाहींत. पण आर्थिक प्रश्नांची जी वर्गवारी मीं आतां आपल्यासमोर ठेवली आहे ती वर्गवारी कदाचित् हिंदुस्तानच्या कोणत्याहि प्रांतांत आपणांला पहावयास सांपडेल. परंतु महाराष्ट्रांत त्या वर्गवारीला जो कांही विशिष्ट अर्थ आहे तो आपण समजावून घेतला पाहिजे. महाराष्ट्रांतील शेतीचे, मघाशीं मीं सांगितलें की, वेगवेगळे प्रश्न आहेत. उदाहरणार्थ, कोंकणांतील शेतीचाच प्रश्न घ्या. मी

या राज्याची जबाबदारी घेईपर्यंत, मुख्यमंत्रिपदाची नव्हे तर त्याहिपूर्वी, मला नेहमीं असें वाटे कीं, सगळीकडचे शेतीचे प्रश्न सोडविले जातात मग या रत्नागिरीच्या शेतीचाच प्रश्न कां सोडविला जात नाहीं ? रत्नागिरीच्या शेतीचा प्रश्न सुटला पाहिजे. पण मी रत्नागिरीच्या शेतीच्या प्रश्नाचा जेव्हां जवळून अभ्यास केला, तेव्हां माझें असें मत झाले कीं, रत्नागिरीमध्यें शेतीचा प्रश्नच नाहीं. रत्नागिरीमध्यें प्रश्नच असला तर तो फळबागायतीचा आहे. आणि फळबागायत जेथें संभव आहे तेथें जाऊन कुठें तरी आपला गहूं, कापूस, ऊस अथवा भुईमूग काढण्याचा आपण प्रयत्न करूं लागलो तर त्या कोंकणच्या काळ्या कातळावर आपलें कपाळ फोडून घेण्यापेक्षां कांहीं कार्य आपणांकडून घडणार नाहीं. रत्नागिरीनें महाराष्ट्राला दोन अमोल गोष्टी दिल्या आहेत, एक म्हणजे उत्तम रसदार फळें आणि दुसरी श्रेष्ठ कर्तृत्वाची माणसें. रत्नागिरीचें हें आम्हांला देणें आहे असें आम्हीं मानलें पाहिजे. तेथून जरा वर आपण आलों म्हणजे सह्याद्रीच्या या टोंकाला लागून असणारा जो प्रदेश आहे त्यांतील शेतीचा खरा महत्त्वाचा जर कोणता प्रश्न असेल तर तो बागायती शेतीसंबंधींचा आहे असें आपणांस दिसून येईल. कारण जेथें बागायती शेती करण्यांत आली आहे, तेथें उंसाची कारखानदारी म्हणजेच साखरेची कारखानदारी निर्माण झालेली आपणांस आढळून येईल. परंतु याहिपेक्षां माझ्या मतानें महाराष्ट्राच्या शेतीचा जर कोणता महत्त्वाचा प्रश्न असेल तर तो महाराष्ट्रांतील मोठाच मोठा, लांबलचक असा जो दुष्काळी भाग आहे त्यासंबंधींचा आहे. पारनेरच्याहि आपण थोडें वर गेलों म्हणजे हा भाग सुरू होतो. येवलें-नांदगांवपासून त्याची सुरुवात होते आणि नंतर तो खालीं जतपर्यंत जातो. असा हा महाराष्ट्रांतील मोठाच मोठा दुष्काळी पट्टा आहे. तेथे पाऊस १०-१५ इंचांपेक्षा अधिक पडत नाहीं. म्हणून तेथें बागायती शेती होण्याची कधीं फारशी शक्यता नाहीं. तेथील लोक शेंकडों वर्षांपासून दुष्काळानें अगदी थकून गेलेले आहेत. या टापूंतल्या शेतक-यांची शेती आणि जीवन कसें समृद्ध करतां येईल हा माझ्या दृष्टीनें नंबर एकचा महत्त्वाचा प्रश्न आहे.

उद्योगधंद्यांचाहि प्रश्न महत्त्वाचा आहे. आमच्यामध्यें मुंबई शहर आहे आणि त्याची वाढ उद्योगधंद्यांमुळें झाली आहे यात शंका नाही. गेल्या दहा वर्षांमध्ये तर या शहराची अफाट वाढ झालेली आहे. पंधरा दिवसांपूर्वी अमेरिकेंतील एका बँकेचा प्रतिनिधि मला भेटावयास आला होता. तो म्हणाला, 'चार वर्षांपूर्वी मी या मुंबई शहरामध्ये आलों होतों आणि आज पुन्हा तुमचें हे मुंबई शहर पाहतांना मला तें माझ्या ओळखीचें वाटत नाहीं.' इतक्या झपाट्यानें या शहराची वाढ झालेली आहे. मुंबई शहरांत उद्योगधंद्यांची वाढ होणें स्वाभाविक आहे, कारण तें एक उत्तम बंदर आहे. परंतु लोकांच्या मनांत अशी शंका आहे कीं, राज्यांत बदल झाला तरी मुंबईचें नुकसान होईल. पण मी त्यांना सांगूं इच्छितों कीं, राज्यात बदल झाला तरी मुंबईचें कांहींहि नुकसान होणार नाहीं. आम्ही प्रेमानें, जिव्हाळ्यानें मुंबई शहरांतील मंडळींना, वागविणार आहोंत. गुजराथी, मारवाडी, पारशी, सिंधी, पंजाबी जे जे कोणी असतील ते ते सर्व आमचे भाऊ आहेत. आम्हीं

राष्ट्रीय भावनेनें हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केल्यामुळें मुंबईमध्यें कांही बदल होणार नाहीं. इतकेंच कीं कांहीं लोक आमच्यावर रागावून निघून जातील. जातील बिचारे, त्याला आपण तरी काय करणार ? त्यांना आपण प्रेमानें निरोप देऊं. जर असे कोणी गेलेच तर त्यांची जागा घेणारे आणखी कोणी येतील. कारण जे लोक मुंबईत व्यापाराकरितां किंवा उद्योगाकरितां आले ते केवळ मुंबई शहराच्या प्रेमामुळें आलेले नसून बंदराला व्यापार केला तर तो फायदेशीर होतो, कारखानदारी केली तर ती फायदेशीर होते म्हणून आले. त्यामुळें ते मुंबई सोडून जातील अशी शंका मला वाटत नाहीं. परंतु आम्ही कर्तव्यांत चुकतां कामा नये. प्रेमानें, बंधुभावानें हा प्रश्न सुटावा म्हणून आम्हीं टीका सहन केल्या, आरोप सहन केले. परंतु आम्ही या तत्त्वाला बळकट धरून राहिलों. आम्हीं आमचा संयुक्त महाराष्ट्र या निष्ठेंतून आणला आहे. तेव्हां मुंबई शहरांतील जे प्रश्न आहेत ते आम्हांला याच भावनेंने सोडवावे लागतील. मुंबई शहरामध्यें कारखानदारी करणारे मारवाडी, गुजराथी, पार्शी, पंजाबी, सिंधी हे सगळे आमचे भाऊ आहेत. या सगळ्या भावांनी आमच्या येथें राहावें, आपण सुखी व्हावें आणि मुंबईला समृद्ध करावें म्हणजे महाराष्ट्र आपोआप समृद्ध होईल. अशीच आमची त्यांना विनंती राहील आणि अशीच आमची वर्तणूकहि राहील.

पण केवळ औद्योगिक मुंबई शहर सुधारलें म्हणजे महाराष्ट्र सुधारला असें नाहीं. मला आठवतें कीं, हिंदुस्तानांतील कांहीं परिषदांत मुंबईचा मुख्यमंत्री म्हणून मी बसलों असतांना पुष्कळ वेळां मला एक विचित्र अनुभव आला आहे, आणि तो म्हणजे आम्हीं सगळ्या गोष्टी मागितल्या तरी चालतात, पण उद्योगधंद्यांच्या बाबतींत आम्ही कांही मागितलें म्हणजे बाकीच्यांच्या डोळ्यांवर येतें. ते विचारतात, मुंबईला आणि उद्योगधंदे ? त्यांची समजूत अशी कीं, मुंबई राज्यांत सर्वत्र मुंबई शहरासारखीच औद्योगिक परिस्थिति असली पाहिजे. परंतु येथें असे कितीतरी मागासलेले भाग आहेत कीं, जेथें अद्यापि कुठलेहि उद्योगधंदे गेलेले नाहींत. आपणांला या मागासलेल्या भागांचा आतां विकास करावयाचा आहे. त्याचप्रमाणें विदर्भाचे, मराठवाड्याचे जे कांही अविकसित भाग आहेत त्यांचाहि आपणांस विकास करावयाचा आहे. उदाहरणार्थ, नागपूरच्या बाजूला अनेक उद्योगधंदे वाढण्याची शक्यता आहे. कोळसा आणि लोखंड यांची विपुल संपत्ति तेथें आहे. कारखानदारीसंबंधींच्या आमच्या कांही चुकीच्या कल्पना आहेत, कापडाच्या गिरण्यांना आपण कारखानदारी म्हणतों. मी तर त्याला कारखानदारी म्हणत नाहीं. कापड तयार करणा-या कारखानादारीला, कंझ्युमर्स गुड्स तयार करणा-या कारखानदीराला, लोक म्हणतात म्हणून कारखानदारी म्हटलें पाहिजे इतकेंच. ज्याला खरी कारखानदारी म्हणतां येईल, अशी लोखंडाची कारखानदारी असूं शकते, कोळशाची असूं शकते, यंत्रनिर्मितीची असूं शकते, रासायनिक द्रव्यांच्या निर्मितीची असूं शकते. अशा प्रकारच्या कारखानदारीकरितां लागणारा मालमसाला, साधनसामुग्री, नागपूरच्या आवर्तीभोंवती, विदर्भाच्या भागांत आहे. आम्हांला तिकडे लक्ष दिलें पाहिजे, त्या

प्रश्नाला प्राधान्य दिलें पाहिजे. त्याचबरोबर आमच्या शेतीमध्यें जो माल तयार होतो, ज्या वस्तु तयार होतात त्या वस्तुचा पक्का माल तयार करण्यासाठीं आम्हांला कारखाने उभे करतां आले पाहिजेत. हें असली काम आहे. आजपर्यंत आमच्याकडे उंसाचे मळे होतें. या मळ्यांतील उंसाचे केव्हां तरी गु-हाळ करून पाव्हण्यारावळ्यांना किंवा इष्टमित्रांना बोलावून त्यांना रस पाजावयाचा व राहिलेला ऊंस कोठें तरी अडत्याच्या दुकानांत विकून टाकावयाचा म्हणजे संपलें शेतीचें काम, असें लोक मानीत असत. पण आपण आतां त्या उंसाचे मोठ्या प्रमाणावर साखरेचे कारखाने उभे करावयाला शिकलों आहोंत. तेंव्हा आमच्या शेतीमध्यें जो कांही माल तयार होतो त्याचा पक्का माल बनविण्यासाठीं आम्हांला कारखाने उभे करतां आले पाहिजेत. आतां पश्चिम महाराष्ट्रांत हिंदुस्तानांतील लोकांच्या नेतृत्वानें लोखंडी कारखान्यांची, इंजिनियरिंग वर्क्स ज्याला आपण म्हणतों त्यांची कारखानदारी सुरू झालेली आहे. इंजिनियरिंगच्या कारखानदारीची परंपरा आपल्या महाराष्ट्राची आहे. कोल्हापूरच्या भागांत कुशल कारागिरी करणारे लोक आहेत. कोठलीहि इंजिनियरिंगची परीक्षा पास न झालेली आमची ही मिस्त्री मंडळी उत्तम इंजिनें तयार करतात. ही जी कांहीं आमची अक्कल आहे, हें जें कांही आमचें कौशल्य आहे, त्याचा आम्हांला अभिमान वाटावयास पाहिजे. या लोकांच्या बुद्धीला, कर्तृत्वाला जर आम्हीं खतपाणी दिलें तर यांतून कांहींतरी नवीन निर्माण होण्याचा संभव आहे. म्हणूनच आपण या बाबतींत जोराचा प्रयत्न करावयास पाहिजे. महाराष्ट्राच्या सगळ्या भागांतून उद्योगधंद्यांची वाढ झाली पाहिजे. हा आज आमच्यासमोर दुसरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

तिसरा जो प्रश्न आहे तो मध्यमवर्गीयांच्या प्रश्नांतून निर्माण होणारा असून त्यांतहि शिक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यासंबंधानें विस्तृत बोलण्याचा हा प्रसंग नाहीं. कारण मी आपल्याशीं फार वेळ बोलत राहिलों आहें. आमच्या शिक्षणाची पद्धति कशी असावी हाहि आजचा महत्त्वाचा प्रश्न आहे. आजपर्यंत आम्हीं ज्या त-हेचें शिक्षण घेतलें तें शिक्षण चांगलें असेल, योग्यहि असेल, परंतु त्यामुळें आमच्यांत नोकरीपेशाची मनोवृत्ति निर्माण झाली आहे. आम्हांला असें सांगण्यांत येतें कीं, आमची बुद्धिच-आमचा पिंडच-नोकरीपेशाचा आहे. मला ही गोष्ट मंजूर नाहीं. आजपर्यंत आम्हीं नोक-या केल्या अशी कल्पना करूं या. परंतु नोक-या सुद्धां आम्हांला ब्रिटिश राजवटीतच कराव्या लागल्या. आम्ही महाराष्ट्रांतले लोक तोपर्यंत शेती करीत होतों, जमलें तर राज्य करीत होतो, नाहीं तर परस्परांशीं भांडत होतों. परंतु हें नोकरी करण्याचें तंत्र, हें पेन्शनीचें वेड आमच्या डोक्यांत ब्रिटिश राजवटीनें भरविलें. तेव्हां आमची बुद्धिच तशी आहे हें एक थोतांड आहे. आम्हीं आमच्या मनांतून तें काढून टाकलें पाहिजे. आमच्यामध्येंहि कांहीं उद्योगधंद्याचें कर्तृत्व निर्माण करतां येतें. तें तसें निर्माण करून, त्याची वाढ करून या क्षेत्रांतहि पुढें जाण्याचा आम्ही प्रयत्न करावयास पाहिजे. आम्हीं आमच्यामध्यें किर्लोस्करांसारख्या व्यक्ति निर्माण केल्या. आजहि आमच्या येथें मोठ्या पल्लेदार बुद्धीने विचार करणारे कारखानदार निर्माण होत आहेत, ते काय

आमच्यांत उद्योगधंद्याची दृष्टि नसण्याचें लक्षण आहे ? मी म्हणतों, ख-या अर्थांनें आमच्यामध्येंहि ही दृष्टि आहे. फक्त आम्हांला तांत्रिक शिक्षण, वेगवेगळ्या शास्त्रांचे शिक्षण घेतलें पाहिजे. अशा त-हेच्या शिक्षणाला आम्ही प्राधान्य दिलें पाहिजे. याशिवाय ज्याला आपण निव्वळ ह्युमॅनिटीजचें शिक्षण म्हणतों अशा त-हेच्या शिक्षणाचेंहि अर्थात् महत्त्व आहेच. तें मूलभूत शिक्षण आम्हांला मंजूर आहे. आणि या शिक्षणाच्या बाबतींत, शिक्षणाची सारीं दारें सताड उघडी करून तें खालच्या थरापर्यंत पोहोंचविण्याचें आमचें ध्येय असलें पाहिजे. मी तर असें म्हणेन कीं, या त-हेच्या शिक्षणाचे प्रकाशझोत अगदीं शेवटच्या थरापर्यंत जर आम्ही नेऊं शकलों, तर महाराष्ट्राची शक्ति इतकी जबरदस्त वाढेल कीं, त्याला कोणाच्याहि मेहेरबानीवर अवलंबून राहण्याचें कारण राहणार नाही. तो स्वतःचे रक्षण करील आणि राष्ट्राचेंहि रक्षण करील. हा एक महत्त्वाचा विचार मला या निमित्तानें आपल्यापुढे मांडावयाचा आहे.

राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रांत माझ्या दृष्टीनें महाराष्ट्रापुढें आज ज्या समस्या आहेत त्यांची चर्चा करून त्यांसंबंधी माझ्या मनांतील विचार आज आपल्यापुढें मांडण्याचा मीं प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणें त्यांतून निघणारीं, माझ्या बुद्धीला सुचतील अशीं उत्तरेंहि आपणांला मीं दिलीं आहेत. आणि आज मी प्रत्यक्ष तुमच्यापुढें बोलत असलों तरी तुमच्यामार्फत सबंध महाराष्ट्राशींच मी बोलत आहें, आणि म्हणून तुमच्यामार्फत महाराष्ट्रांतील सर्व जनतेला, जेथपर्यंत माझा आवाज पोहोंचू शकेल तेथपर्यंत, मी विनंतीपूर्वक सांगू इच्छितो कीं, या सगळ्या प्रश्नांची दखल घेऊन त्यांची उत्तरें देण्याचें काम आतां तुम्हांआम्हांला करावयाचें आहे. हें काम सोपें नाहीं. हें काम तुम्हीं एकट्या यशवंतराव चव्हाणांवर सोपविलें किंवा त्यांच्या मंत्रिमंडळांतील सहका-यांवर सोपविलें तरी आम्ही सुद्धा कुणी माणसेंच आहोंत; म्हणून आमच्या हातून त्यांत चुका होणारच नाहींत असे सांगू शकत नाहीं. मीं मागे आपल्याला सांगितलें होतें कीं आमच्या शक्तीला, आमच्या बुद्धीला जितकें झेपेल तितकें करण्याचा आम्ही प्रयत्न करीत राहू आणि त्याप्रमाणें आम्हीं तो प्रयत्न केलाहि आहे. आमच्या हातून चुका घडलेल्या नाहींत असा आमचा दावा नाहीं आणि पुढें त्या घडणार नाहींत अशी प्रतिज्ञाहि नांहीं. प्रतिज्ञा एका गोष्टीची आहे, ती म्हणजे आमच्या बुद्धीला पेलेल त्या हिंमतीनें आम्ही निर्णय घ्यावयाचा प्रयत्न करूं आणि प्रामाणिकपणें तो अंमलांत आणण्यासाठीं झटू. एका गोष्टीची मात्र आम्हांला जरुरी आहे. आपला आशीर्वाद आम्हांला पाहिजे, आपल्या प्रेमाचा आधार आम्हांला पाहिजे. आपल्या आशीर्वादाच्या बळावरच आम्ही ही जबाबदारी उचलतो आहोंत. म्हणून आपली शाबासकीची थाप जरी नसली तरी आपली रागाची नजर नसावी, एवढीच माझी आपल्याकडून अपेक्षा आहे.

गेल्या दोनचार महिन्यांत जबाबदारी घेऊन आम्हांला कांहीं निर्णय घ्यावे लागले. आम्हांला

महाराष्ट्रापुढील प्रश्नांची नुसतीच तात्त्विक चर्चा करावयाची असती तर किती तरी प्रश्न मीं तुमच्यापुढें मांडले असते, कारण मला ते जास्त माहीत आहेत. घोड्यावर बसणा-यालाच घोड्याची खोडी माहीत असते. त्याचप्रमाणें राज्यकारभाराचे प्रश्न आम्ही हाताळतों म्हणून त्यांत काय दोष आहेत तें आम्हांला जास्त माहीत आहे. परंतु आम्हांला निव्वळ तात्त्विक चर्चा करून दोष काढावयाचे नव्हते. तेथें बसल्यावर 'दे, घे' करून मला निर्णय घ्यावयाचे होते. आपल्या खेड्यांतील गोष्ट आहे, ती मी आपल्याला सांगतों. एका छोट्या वस्तादाची एका चांगल्या वस्तादाशीं गांठ पडली. सुरुवातीला छोट्या वस्तादाला जमून गेलें, पण पुढें जेव्हां अवघड प्रश्नांची चर्चा सुरू झाली तेव्हां छोट्या वस्तादानें सांगितलें कीं, या प्रश्नाचें उत्तर माझ्या वस्तादांना विचारल्याशिवाय मी देऊं शकत नाहीं. त्याप्रमाणें तर मला सांगतां येत नव्हतें. मी जर तुमच्यातर्फे निर्णय घ्यावयास बसलों आहें तर मला निर्णय हे घेतलेच पाहिजेत. कारण आम्हांला अनेक त-हेचे प्रश्न हातावेगळे करावयाचे होते. त्यांत आम्हीं मुंबईचा प्रश्न हा महत्त्वाचा आणि मानाचा मानला होता. तो नुसताच मानाचा प्रश्न नव्हता तर तो आमच्या हिताचाहि प्रश्न होता. मुंबई विदर्भ आणि मराठवाड्यासह आम्हांला एक मराठी राज्य लवकरांत लवकर निर्माण करावयाचें होतें. मला निर्णय घेते वेळीं असें म्हणतां आलें नसतें कीं, तुमचें आमचें दहा खेड्यांचे जमत नाहीं ना - मग पडूं द्या हा प्रश्न तसाच लोंबकळत. या प्रश्नाचा निकाल लागेपर्यंत आम्ही कांही करणार नाहीं. ही कांहीं तत्त्वनिष्ठेची भाषा नाहीं. नाहीं लागत निकाल तर पडूं द्या प्रश्न बाजूला, असें करून नाहीं भागत. तेथे कांही केलें पाहिजे, म्हटलें पाहिजे. संग्रामांत उभा राहिलों आहे. समोरच्या माणसाचा पवित्रा पडलेला आहे. तिथें पुस्तकांतील आकृत्या पाहून मीं पवित्रा घ्यावयाचा कीं काय ? तिथे धैर्यानें आणि विश्वासपूर्वक निर्णय घेतले पाहिजेत, बाबी निकालांत काढल्या पाहिजेत. अशा निर्णयात्मक स्वरूपाच्या व्यवहारी राजकारणाची, दैनंदिन जबाबदा-या पार पाडणा-या जिम्मेदारीच्या राजकारणाची आतां आवश्यकता आहे. हे सर्व प्रश्न मी हेतुपूर्वक आपल्यापुढें मांडीत आहें. हे सगळे प्रश्न आपण समजावून घेतले पाहिजेत. कारण महाराष्ट्र राज्य हें महाराष्ट्राच्या जनतेचें राज्य आहे. आणि तसें तें जनतेचें राज्य व्हावयाचें असेल तर जनतेनें राजासारखा राज्याचा विचार केला पाहिजे. हें काम एकदोन माणसांशीं करार करून होणारे नाहीं. माझ्या ठिकाणीं तुम्ही तिथें असतां तर तुम्हीं कोणता निर्णय घेतला असता, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. निव्वळ म्हणणें मांडणें सोपें आहे, प्रश्न निर्णयाचा आहे. परंतु कांही तात्त्विक फॉर्म्युले लावून राजकारणाचे प्रश्न सुटतील कां हें आपणच सांगा. फॉर्म्युल्यांनी जर राजकारणांचे प्रश्न सुटत असते तर एकच फॉर्म्युला दुसरीकडे लावला असता आणि दुसरीकडचा फॉर्म्युला तिसरीकडे गेला असता. परंतु फॉर्म्युल्यांनीं हे प्रश्न सुटत नाहीत. खरी अडचण अशी आहे कीं, जगांत फॉर्म्युले चालत नाहींत. जर फॉर्म्युल्यांनी प्रश्न सुटत असते तर संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न पांच वर्षांपूर्वीच सुटावयास पाहिजे होता. परंतु कांही गुंतागुंत होती. कांही परिस्थितीच्या अडचणी होत्या. मनांतल्या अनेक गोष्टींची उकल करावयाची होती. मनाशीं सारखा विचार करून यांतून मार्ग

काढावयाचा होता. अशा पूर्ण विचारानंतरच हा संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न आम्हीं राष्ट्रीय वृत्तीच्या पार्श्वभूमीवर सोडविला आहे; मित्रामित्राच्या, बंधूबंधूच्या वृत्तीनें सोडविला आहे. याच पार्श्वभूमीवर कांही देवाण-घेवाण करावी लागली. परंतु त्यांत महाराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें घाबरून जावें अशा प्रकारचे कांही होतें असें मला वाटत नाहीं. कारण मीं असें पाहिलें कीं, शेवटीं राष्ट्र आणि महाराष्ट्र यांच्या प्रवृत्ति कांहीं परस्परविरोधी नाहींत. आमची राष्ट्रनिष्ठा आणि आमची महाराष्ट्रनिष्ठा या एकमेकांच्या हातांत हात घालून चालणा-या असल्या पाहिजेत. म्हणून आपण अशी भावना निर्माण करतां कामा नये कीं, आमच्या महाराष्ट्राच्या विरोधी, आमच्याशीं वैर करणारीं कुणीतरी माणसें कोठेंतरी बसलेली आहेत. अशा भावनेनें आपल्याच मनानें आपल्याविरुद्ध एखादा शत्रु निर्माण करून आणि त्याच्याशीं आपल्याच मनांतली समशेर काढून लुटुपुटूची लढाई करीत बसण्यामध्यें कांहीं अर्थ राहिलेला नाहीं. आपणहि पराक्रम करूं शकतों, विजय मिळवूं शकतो, या भावनेची आज आपणांला आवश्यकता आहे. आमचे कोणी विरोधी आहेत, आमचें कोणी भलें होऊ देत नाहीं अशी भांडखोर, रडवी, निराशावादी, विफलतेची भावना निर्माण करणारी वृत्ति आपण राजकारणांतून मोडून काढली पाहिजे, तिला बाजूला टाकलें पाहिजे आणि विजिगीषु भावनेनें पुढें जावयाचा प्रयत्न केला पाहिजे. आम्हीहि कर्तृत्व करूं शकतो अशी भावना, असा आशावाद तरुणांमध्ये, कार्यकर्त्यांमध्यें आपण निर्माण केला पाहिजे, आणि अशा भावनेंतून कर्तृत्वाचा एक सुंदरसा बाग निर्माण केला पाहिजे. आमचा इथें पराभव झाला, तिथें पराभव झाला हें किती वेळ आपण सांगत बसणार आहोंत ?

कांहीं दिवसांपूर्वी मीं एका चांगल्या लेखकाचा लेख वाचला. त्यांत मला एक फारच महत्त्वाचा विचार सांगितलेला दिसला. तो विचार मला येथें सांगितल्याशिवाय राहवत नाहीं. आजच्या हिंदुस्तानच्या संदर्भात त्यानें आपल्या नियोजनाचीं दोन सर्वांत महत्त्वाची साधनें सांगितलीं आहेत. त्यांतलें पहिलें साधन म्हणजे मनुष्यबळ आणि दुसरें साधन म्हणजे वेळ. चाळीस कोटि लोकांचा हा देश कांहीं न करतां जर फुकट एक वर्ष बसून राहिला तर आमची फार मोठी शक्ति वायां गेली असें होईल. कारण त्या श्रमाच्या बळावर आम्ही कितीतरी पुढें गेलों असतों. आणि दुसरें म्हणजे जग त्या काळांत आमच्या कितीतरी पुढें निघून जाईल. म्हणून महाराष्ट्रांतील तीन कोटि जनतेच्या मनांत विफलतेची, विषादाची आणि पराभवाची भावना निर्माण करून महाराष्ट्रांत असंतोषाचें वातावरण पसरविण्याचा जे प्रयत्न करतील ते महाराष्ट्राचें फार मोठें नुकसान करतील. मला त्यांना सांगावयाचें आहे कीं, कृपा करून ह्या गोष्टी बंद करा. इंग्रजांविषयीं नेपोलियन एकदां म्हणाला होता कीं ह्या वेड्यांना आपला पराभव केव्हां झाला हेंच कळत नाहीं. नेपोलियनच्या शब्दांत थोडा फरक करून मी या वेळी सांगूं इच्छितों कीं आमच्या विरोधकांना आणि आमच्या कांही मित्रांना आमचा जय केव्हां झाला हेंच कळलें नाहीं. म्हणून मला त्यांना सांगावयाचें आहे कीं ही पराजयवादी वृत्ति लोकांच्या मनांत निर्माण करून आपण महाराष्ट्राची शक्ति वायां घालवूं

नका. आज खेड्यांतल्या शेतक-यांमध्ये, फॅक्टरीमधल्या मजुरांमध्ये, शहरांतल्या विद्यार्थ्यांमध्यें सगळीकडे नवी शक्ति निर्माण झाली आहे. तुमच्या आमच्या जीवनामध्यें आनंदाचा, सोहळ्याचा क्षण निर्माण झाला आहे. ही नवी शक्ति उभी करण्याचें तुम्हांआम्हांला इतिहासाचें आव्हान आहे. तें आम्ही स्वीकारणार कीं नाहीं यावर आमचे पुढील जीवितकार्य अवलंबून आहे. कोणाला कांही वाटो, मला तरी महाराष्ट्राच्या भवितव्याबद्दल दुर्दम्य आशा आहे, माझा तसा विश्वास आहे. एवढी कर्तृत्ववान परंपरा असणा-या, अनेक जाती आणि जमाती असणा-या, शिवाजीच्या परंपरेनें शोभायमान झालेल्या महाराष्ट्राचा इतिहास असा अडून बसणार नाहीं. तो पुढें पुढें जाणार आहे. तो महाराष्ट्राचें जीवन उज्ज्वल करील. एवढेंच नव्हे तर जी मानवी मूल्यें आम्हांला आमच्या परंपरेंतून मिळालेली आहेत त्यांच्या बळावर मानवी जीवनाची सेवा करण्यांतहि तो मागें हटणार नाहीं, असें एक स्वप्न महाराष्ट्राच्या भवितव्याबाबत मला दिसतें आहे. महाराष्ट्राच्या भवितव्याची ही मोठीच मोठी, लांबच लांब सफर आहे. त्या सफरींतील आम्ही प्रवासी आहोंत ही भावना नम्रतेनें आपलें प्रत्येक पाऊल टाकतांना आपण आपल्या मनाशीं ठेवली पाहिजे. माझ्या आवतीभोंवती बसणा-या माझ्या मित्रांकडे, माझ्यापेक्षां वडीलधा-या मंडळींकडे, माझ्यापेक्षा लहान असणा-या उगवत्या पिढीकडे मी याच भावनेनें पाहतो आहें. याच एका भावनेनें आपण वागलों तर मला वाटतें कीं, ही जी सफर तुम्हांआम्हांला पुरी करावयाची आहे ती पुरी करण्यांत आपण निश्चित यशस्वी होऊं. आज मी असा आपणांशी बोलत असतांना ती सफर मला माझ्या डोळ्यांसमोर दिसते आहे, विजेच्या प्रकाशनानें लखलखल्यासारखी दिसते आहे. ती लांबची सफर आहे, कष्टाची सफर आहे, उद्योगाची सफर आहे. पण ती पुरी केलीच पाहिजे. कारण त्यामध्यें जनतेचें कल्याण आहे.

## जनप्रेमाची शक्ति

काल संध्याकाळी येथें आल्यापासून मी अशा कांहीं वातावरणांत आहें कीं, एक प्रकारचें भारावलेलें, दबलेलें मन जसें असावें तशी माझ्या मनाची स्थिती झाली आहे. माझ्यावरील आपल्या प्रेमामुळें आपण माझ्यावर जो स्तुतीचा वर्षाव केला त्यामुळेंच कदाचित् माझी ही मनःस्थिति झाली असेल. परंतु मला वाटतें राजकारणामध्यें वादग्रस्त असणा-या माणसानें आणि त्यांतल्या त्यांत अधिकारावर असणा-या माणसानें आपल्यासंबंधी होणारी स्तुति बिनधोक चालू देण्यामध्यें बरेच धोके असतात. श्री. तुळशीदासजी आणि श्री. महाजनी यांनीं जें आतां येथें सांगितलें तें मला मान्य आहे. माझी अशी भावना आहे कीं, माझी नाव सरळ चालायची असल्यास शिव्या देणारीं माणसें आवतींभोंवती असलीं पाहिजेत. मग कांही फारशी धास्ती वाटत नाहीं. कारण त्यामुळें मनुष्य मग आत्मनिरीक्षण करतो. माझ्या आयुष्यांतील गेलीं तीनचार वर्षे फार महत्त्वाचीं अशीं

गेलीं. त्यावेळी अतिशय कांटेतोलपणानें मी पावलें टाकीत होतों, विचार करीत होतों आणि शिव्याहि खात होतों; पण डरत नव्हतों ही गोष्ट खरी आहे. परंतु आपल्या या स्तुतीमुळें एक प्रकारचा भ्रम निर्माण होण्याचा संभव आहे असें मी मानतो. मी शब्दांना फसणारा माणूस नाही. तुम्ही वापरलेले सगळेच शब्द आणि सगळींच विशेषणें खरीं आहेत असें मानून चालावयाचें झालें, तर त्यासाठी माणूस एकतर भोळा तरी असला पाहिजे किंवा अहंकारी तरी असला पाहिजे. तरच तो आपली ही सर्व स्तुति खरी मानील. माझा असा दावा आहे कीं मी दोन्ही नाहीं, एवढें तरी निदान माझ्यासंबंधानें मला बोलावयास हरकत नाही असें मला वाटते.

पण मला एकाच गोष्टीची चिंता आहे. अशा या प्रसंगीं खूप माणसें चांगलें बोलायला लागलीं म्हणजे अकारण, नाहीं तिथें असूया निर्माण होते. परंतु आज ज्या प्रवृत्तीचें, ज्या शक्तीचें आणि ज्या सत्तेचें मी प्रतिनिधित्व करीत आहें त्याला कसलीहि दृष्ट लागूं नये अशी माझी इच्छा आहे. आपल्यावरच्या सावल्या आणि आपल्यावर लागणारी दृष्ट यांची झळ नवीन होणा-या बाळाला लागूं नये अशी आईची चिंता असते. तशीच चिंता माझ्या मनाशीं आहे. कारण नवीन जन्माला येणा-या आपल्या या राज्याला अनेक संकटांच्या सावल्यांतून जावयाचें आहे. त्यांपैकी कांहीं सावल्या बाहेरच्या आहेत आणि कांहीं आंतल्या आहेत. परंतु या नवीन कामाचें प्रतिनिधित्व करणारी जीं आम्ही माणसें आहोंत त्यांच्या संबंधींच्या भावना, त्यांच्यावर येणारे आरोप यांची झळ त्या कामाला लागतां कामा नये. आज सकाळीं बोलतांना घाबरल्याबद्दलचा मीं जो उल्लेख केला तो या संदर्भात होता. व्यक्तिशः 'घाबरणें' हा शब्द मी माझ्या कोशांतून बरेच दिवसांपूर्वी पुसून टाकला आहे. परंतु माझ्यासंबंधींच्या आपल्या या आत्यंतिक प्रेमाच्या भावनेमुळें कांही ठिकाणीं अकारण मत्सर निर्माण होऊन त्याची झळ या राज्याला तर लागणार नाहीं ना, अशी भीति माझ्या मनाला चाटून गेली हें मात्र खरें !

आपण माझा शिवाजी महाराजांबरोबर आणि रानड्यांबरोबर उल्लेख केला. पण या सर्व खोट्या तुलना आहेत. या खोट्या तुलनेमध्यें तुम्ही फसूं नका आणि कृपा करून मला फसवूं नका असें माझें सांगणें आहे. एकच शिवाजी महाराज होऊन गेले आणि एकच टिळक होऊन गेले. महाराष्ट्राचा इतिहास ज्यांनीं घडवला ते शिवाजी महाराज आतां पुन्हा निर्माण होणार नाहींत. ब्रिटिशांच्या सत्तेखालीं दबलेल्या हिंदुस्तानला स्वराज्याचा जन्ममंत्र देणारे लोकमान्य टिळक एकदांच होऊन गेले. ते आतां पुन्हा होणार नाहींत. पुन्हा होणार नाहींत असें म्हणण्याचें कारण हिंदुस्तान पुन्हा परतंत्र होणार नाहीं हें आहे. शिवाजी महाराज व टिळक ह्या ज्यांच्यापुढें नतमस्तक व्हावें अशा महान् विभूति आहेत. आपण छोटीं माणसे आहोंत. मी कोणत्या मुशींत जन्माला आलों त्याची मला कल्पना आहे. १९३० सालानंतर जी मंडळी राजकारण करायला

लागली अशा असंख्य कार्यकर्त्यांचा मी प्रतिनिधि आहे. शेंदोनशें वर्षांच्या इतिहासाचीं बीजें टाकायचें काम रानड्यांना आणि टिळकांना करावें लागलें. हिंदुस्तानच्या युगायुगाच्या राजकारणाचा पाया घालण्याचें काम शिवाजी महाराजांना करावें लागलें. पण आम्ही मंडळी छोट्या छोट्या लढाया करणारी होतों. या सातारा जिल्ह्याच्या खेड्यापाड्यांत आणि शेतीशिवारामध्यें मोठ्या संख्येंने आम्ही सैनिक म्हणून वावरलों आणि वाढलों. त्याच सैनिकांपैकीं मी एक आहे. आणि म्हणून दादांनी मला जेव्हां सांगलीस बोलाविलें तेव्हां याच भावनेनें मी येथें आलों; मला नाहीं म्हणणे शक्यच नव्हतें. या दक्षिण साता-याच्या एका माळावरच्या गांवांत एका गरीब घरामध्यें माझा जन्म झाला हें मला विसरता येत नाहीं. अशीं अनेक गरीब घरें अजूनहि आहेत. त्यांची माझ्या मनाला मोठी खंत आहे. या असंख्य घराघरांतून पडलेली जीं असंख्य माणसें आहेत त्यांना प्रकाशांत आणलें पाहिजे. हें नवें काम आतां आम्हांला करावयाचें आहे, नव्या महाराष्ट्राला करावयाचें आहे. त्याचप्रमाणें आजपर्यंत झालेल्या अनेक विचारवंतांनीं जीं तत्त्वें सांगितलीं आहेत त्या तत्त्वांचे मणी माळेंत गुंफण्याचें कामहि आतां करावयाचें आहे आणि हें काम ज्या पिढीकडे आलें आहे त्या पिढीचा मी प्रतिनिधी आहें एवढाच माझा दावा आहे.

अक्काताई बाबर यांनी आज फार गोड भाषण केलें. माझ्यातर्फे मी लेखकांना एक विनंती करणार आहें, ती त्यांच्यापर्यंत अक्काताईंनी पोंचवावी अशी माझी अक्काताईंना विनंती आहे. नव्या महाराष्ट्रामध्यें मराठी भाषेचें काम आम्हांला करावयाचें आहे. जुने अमृतासारखे जे शब्द आहेत ते शब्द तर आम्हांला वापरायचे आहेतच, पण तुमच्या आमच्या जुन्या पिढीला माहीत नसणारे अमृतासारखे विचार अजून आपल्याला शोधून काढावयाचे आहेत. नवीन शास्त्रीय विचारांचा, शास्त्रीय ज्ञानाचा एक नवा इमला आपल्याला महाराष्ट्राच्या जीवनामध्यें उभारावयाचा आहे. आणि या सगळ्या विचारांचे पोषण करणारे, त्यांना तोलणारे शब्द आणि भाषा तुम्हांआम्हांला निर्माण करावयाची आहे. हे काम नुसतें भूतकाळाकडे पाहून होणार नाहीं. महाराष्ट्राचें राज्य आपण निर्माण केलें, तें भूतकाळाच्या परंपरांना धरून, शिरावर घेऊन चालावावयाचें आहे. पण त्याचबरोबर भविष्यकाळाकडे नजर ठेवून, बदलत्या दुनियेचीं पावलें ओळखून, त्यामध्यें महाराष्ट्राचें, मराठी भाषेचें व मराठी भाषेला आणि महाराष्ट्रीयांना बरोबर घेणा-या भारताचे स्थान नेमकें कोठें आहे ते शोधून काढून आपल्याला ही यात्रा करावयाची आहे. हा विचार पुढच्या लेखकांनाहि करावा लागणार आहे ही गोष्ट मी त्यांना जरूर सांगू इच्छितो. किती तरी जबरदस्त मोठ्या विचारांचे आणि योजनेचें हे काम आहे !

आपण इथें इतकीं भाषणें केली. त्यांतून अनेकांच्या अनेक अपेक्षा मीं पाहिल्या. पण मी आपणाला सांगतो कीं, हें काम एक माणूस करूं शकणार नाहीं. आमच्यासारखीं माणसें आपण मोठी माणसें

मानतां त्याचें कारण एकच आहे आणि तें हें कीं, योगायोगानें सामान्य माणसें मोठीं होतात व मोठमोठे प्रश्न हाताळण्याची त्यांना संधि मिळते. महाराष्ट्राच्या निर्मितीचा हा मोठा प्रश्न सुदैवानें कदाचित् जर आधीं सुटला असता तर पाठीमागच्या रांगेंत बसण्याची माझी नेहमींच तयारी होती व याच्या पुढेंहि राहील हें मी आपणांस सांगूं इच्छितों. पण मोठे प्रश्न निव्वळ एक मनुष्य सोडवूं शकणार नाही. त्याच्याकरितां शेकडों कार्यकर्ते आणि विचारवंत निर्माण व्हावे लागतात, तेव्हां कोणा एकाला त्याचा फायदा मिळतो असें मी मानतों. महाराष्ट्राच्या रचनेचा प्रश्न हा निव्वळ यशवंतराव चव्हाणांनी सोडविला आहे असें आपण कृपा करून समजूं नका. त्याच्या पाठीमागें महाराष्ट्रांतील तीन कोटि जनतेच्या वाढलेल्या भावना आहेत, त्याच्यासाठीं अनेक विचारवंत, इतर पक्षांतील कार्यकर्ते, या सर्वांच्या प्रतिष्ठा पणाला लागलेल्या आहेत. त्या सर्वांना एका पद्धतीनें एका कामामध्यें गुंतविण्याचें, एका माळेमध्यें गोवण्याचें काम मीं केलें; याच्यापेक्षा जास्त मी कांही केलें असें मी म्हणणार नाहीं. आणि म्हणून चुकीचें श्रेय मीं कधींच मागितलेलें नाहीं व मागणारहि नाहीं. कारण श्रेय मागून कोणी देत नाहीं. तो जगाचा प्रघातच आहे. परंतु जें श्रेय आहे तें कोणी नाकारूंहि शकत नाहीं. असें जरी असलें तरी मी आपणांला सांगूं इच्छितों कीं, कुठल्याहि समाजामधील कर्तृत्ववान मनुष्य हा समाजाला सोडून कर्तृत्व करूंच शकत नाहीं. नवनीत म्हणजे आपण ज्याला लोणी म्हणतों तें दुधांतून येतें. दूध नसेल तर लोणी नाहीं. समाजजीवन जेव्हां खळखळलेलें असतें, तेव्हां त्यामध्यें कांहीं तरी सांचत असते. नवनीत निर्मिणा-या दुधाप्रमाणें त्यांत एक शक्ति असते. नवनीताला स्वतंत्र अस्तित्व असतें ही खोटी गोष्ट आहे. तीच गोष्ट कुठल्याही कर्तृत्ववान दिसणा-या माणसाच्या जीवनासंबंधींहि खरी आहे असें माझें तत्त्व आहे.

परवां मला एक गृहस्थ भेटले. त्यांनी विचारलें की, तुम्हीं तुमचे गुण कुणाकडून घेतले तें सांगा. मीं म्हटलें तें सांगणें ही फार कठीण गोष्ट आहे. कुठल्याही सामाजिक प्रश्नाचें एकेरी उत्तर देणें यासारखा अडाणीपणा दुनियेमध्यें दुसरा असूं शकत नाहीं. एकेका माणसांचे जीवन म्हणजे एक 'सोशल कॉम्प्लेक्स' आहे असें जर मानलें, तर एका माणसाकडून मी हें सर्व शिकलों असें म्हणणें म्हणजे स्वतःची फसवणूक करून घेण्यासारखें आहे, आणि दुस-यांचीहि फसवणूक करणें आहे. माझ्यासारखा मनुष्य जो तीस वर्षे राजकारणाच्या धकाधकीमध्ये राहिला त्यानें मी सगळें गांधीजींच्याकडून शिकलों असें जर म्हटलें, तर ती गांधीजींची स्तुति होईल; पण तें खरें असणार नाहीं. कारण किती तरी लोकांच्याकडून मी शिकलों आहें. लोकांशी कसें वागावें, कसें बोलावें, त्यांच्या पाठीवर कसा हात फिरवावा हें कदाचित् मी वसंतराव दादांच्याकडूनहि शिकलों असेन. समाजांतील माणसांच्या दुःखाची तळमळ कशी जाणावी हें कदाचित् मी खेड्यांतील एखाद्या शेतक-याकडून शिकलों असेन. राजकारणांत मुद्देसूद विचार करावा, हें मी रॉयपासून शिकलों. त्यांचें ऋण मीं जाहीरपणें स्वीकारलेलें आहे. अनेक माणसांपासून याप्रमाणें अनेक गोष्टी मी शिकलों. अशीं किती तरी माणसें आहेत. सतत तीस वर्षांचें राजकीय जीवन ही कांही लहानसहान

गोष्ट नाहीं. या सगळ्या प्रयत्नांतून जात असतां मी जर मोठा झालों असेन तर मोठा मी नसून, ज्या कार्यकर्त्यांतून मी वाढलों, ज्यांच्याबरोबर मीं काम केलें ती पिढी मोठी आहे, त्या कार्यकर्त्यांचा संच मोठा आहे, असा माझा दावा आहे.

दक्षिण साता-यामध्यें आणि उत्तर साता-यामध्यें गांवोगांव पसरलेले माझे जे साथी आणि सहकारी आहेत, त्यांच्याशीं कधीं मी झगडलों, कधीं भांडलों, कधीं प्रेमानें वागलों, सगळें कांही केलें; पण त्यांनीं मला नेहमीं प्रेम दिलेलें आहे. त्यांच्या त्या प्रेमांतून माझी शक्ति वाढलेली आहे. आणि म्हणून मला परवां कुणीसें विचारलें कीं एक मोठें भाषण करण्यासाठीं दोन महिन्यापूर्वी तुम्हीं सांगली कां गांठलीत, तेव्हां मीं उत्तर दिलें कीं हा खरा सांगलीचा गुण आहे. जेथें कार्यकर्त्यांचा संच आणि मेळावा आहे अशी ही भूमि आहे. त्याच या भूमींत शिकलों, झगडलों, चर्चा केल्या आणि वाद केले. त्यांतून एक प्रवृत्ति, एक पिंड तयार झाला. आणि अशा ज्या पिढीतून व ज्या कार्यकर्त्यांच्या संचांतून मी निर्माण झालों आहें त्यांचे हे ऋण आहे. म्हणून हें नवनीत तयार झालेंच असेल तर तें त्या दुधातून निर्माण झालेलें आहे. त्यांच्यामध्यें मला परत विलीन झालें पाहिजे; त्यांचें ऋण मला परत केलें पाहिजे. आणि म्हणून दक्षिण साता-यांतील आणि उत्तर साता-यांतील या सर्व कार्यकर्त्यांना मी नम्र अभिवादन करतों. मला आपण बोलावलेंत, आणि माझ्या वाढदिवसाच्या निमित्तानें अनेक सद्भावना व्यक्त केल्यात. त्या सद्भावना घेऊन मी येथून परत जाणार आहें.

पण तुम्हीं सांगितली ती गोष्ट खरी आहे. माझें काम अजून संपलेले नाहीं. कठीण काम अजून पुढेंच आहे. तें महाराष्ट्राच्या रचनेपासून सुरू होणार आहे. पहिली गोष्ट सोपी होती असें मला आतां वाटतें. नवीन जें काम सुरू होणार आहे त्यासाठी मीं सांगितले त्याप्रमाणें अनेक विचारी माणसें माझ्या नजरेसमोर आहेत. काँग्रेसच्या बाहेरहि जीं चांगलीं माणसें आहेत त्यांचेंहि सहकार्य मिळवावयाचें आहे. कारण लोकशाहीच्या कारभारामध्यें असें एक महत्वाचें सूत्र आहे कीं नुसतें न्यायानें वागून भागत नाहीं, तर न्याय होत आहे अशी भावना निर्माण करावी लागते. लोकांना वाटलें पाहिजे कीं सर्व न्यायानें चाललें आहे आणि तसें झालें तरच चालतो लोकशाहीचा कारभार. म्हणून विरोधी पक्षांतहि जीं चांगलीं कर्तृत्ववान, हुशार, बुद्धिवान माणसें आहेत, त्यांनाहि हें पटवून देऊन पुढें चालावयाचें आहे. हें कठीण काम आतां सुरू होणार आहे. अर्थात् तें पार पाडण्याची जिम्मेदारी कांही माझी एकट्याची आहे असें मी मानीत नाहीं. परंतु निदान सल्लामसलत देण्याचें काम तरी मला करावे लागणार आहे.

मी आपल्याला या प्रसंगी सांगू इच्छितो की गेल्या मार्च महिन्यामध्यें, मनाच्या एका मोठ्या

कठीण परिस्थितींत मी होतो. मी माझें ऑपरेशन करून घेणार होतों. राजकीय दृष्ट्याहि जाणूनबुजून, पण विचारपूर्वक मी अशा परिस्थितींत शिरलों होतों की, तो माझा मलाच चक्रव्यूह वाटावयाला लागला होता. अशा त्या वेळी माझ्या मनांत विचार आला की माझ्यासाठी प्रार्थनेची जरुरी आहे. म्हणून मीं ठरवलें कीं माझ्या आईजवळ एक-दोन दिवस काढावेत. निवांत, मुंबईच्या दुनियेपासून अगदीं दूर. वर्तमानपत्रें, चर्चा, वाटाघाटी, राजकारण या सगळ्या दंगलीपासून अगदी दूर. पण तें मी शेवटीं करूं शकलो नाहीं. मित्र, स्नेही, इष्टमित्र यांनी गर्दी केली. आणि त्याला समारंभाचें रूप आलें. त्यावेळी झट्दिशीं माझ्या तोंडांतून ही वाक्यें बाहेर पडलीं, "मी चक्रव्यूहांत आहें असें मला वाटतें. चक्रव्यूहांत शिरण्याची अक्कल शिकलों आहे. पण बाहेर कसें पडावयाचे तें त्या आईलाच माहीत आहे, म्हणून मी आईकडे आलों आहें." आज कुणाचाहि भेद न करतां तो चक्रव्यूह संपलेला आहे असें दिसतें.

मी आज याच पार्श्वभूमीवर या नव्या राज्याची भूमिका आपणांला सांगतो. नवीन राज्य आलेलें आहे, असें म्हणायला आतां हरकत नाहीं. आपण भाषेसंबंधी नाहीं ना कांहीं तक्रार करणार ? कारण अजून ते कायद्यांने यावयाचें आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नांच्या वेळी कांहीं मर्यादा आम्ही आमच्या मनाशीं ठरवून ठेवल्या होत्या. मला असें वाटतें कीं ज्याला निव्वळ तत्त्वचिंतन करावयाचें असेल त्यानें  दैनंदिन राजकारणाच्या फंदांत पडूं नये. राजकारणामध्यें, लोकांना सल्ला देऊन त्यांचे मार्गदर्शक व्हावयाची आपली जबाबदारी आहे असें जो मनुष्य मानतो त्याला, कुठलाहि प्रश्न हातांत घेतां क्षणीं त्या प्रश्नाच्या तात्त्विक मर्यादा समजल्या पाहिजेत. आणि आपल्या शक्तिच्याहि मर्यादा समजल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या तात्त्विक आणि शक्तीच्या मर्यादा जोपर्यंत त्याला स्पष्ट होत नाहींत तोंपर्यंत तो राजकारणांत मार्गदर्शन करूं शकत नाहीं अशी माझी भावना आहे. आणि म्हणून संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न जेव्हां गोत्यांत जातों आहे असें मला दिसलें, तेव्हां मीं या मर्यादा सांगितल्या. पण कांही गोष्टी ऐतिहासिक अपघातासारख्या घडत असतात. आणि तसाच कांहीं तरी ऐतिहासिक अपघाताचा प्रसंग डोळ्यांपुढें दिसतां क्षणीं मला या प्रश्नाच्या आणि मार्गाच्या मर्यादा सुचल्या. त्यांतील पहिली मर्यादा मीं अशी सांगितली कीं, आम्हांला हा प्रश्न सोडवावयाचा असेल तर तो शेवटीं भारतनिष्ठेंतून सोडवावयाला पाहिजे. आणि ही गोष्ट मी आपणांला अशासाठीं सांगतो आहें कीं, आज संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न जरी सुटला असला तरी भारतनिष्ठेची जी आमची मूलभूत भावना आहे ती आम्हीं कायम ठेवली आहे. आज मुंबई शहरामध्यें अनेक वाद आहेत. बी. ई. एस्. टी. चा वाद आहे, आरेचा वाद आहे, आणखी लाख वाद आहेत; पण आज मुंबई शहरामध्यें मुंबईचा वाद शिल्लक राहिलेला नाहीं. मला सिंधी भेटतात, गुजराती भेटतात, मारवाडी भेटतात, मल्याळी भेटतात, सगळे भेटतात आणि सांगतात, "फार बरें झालें. तुमची मुंबई तुम्हांला मिळाली. आतां आम्हांला सांगा आम्ही काय केलें पाहिजे तुमच्यासाठी म्हणून." हे त्यांचे शब्द खरे धरून आपण चाललें पाहिजे. आज गुजरात

आणि महाराष्ट्र यांच्यामध्यें जशी कांही वांटणीच चालली आहे असें नाहीं, तर तीं नवीन दोन शेजारी राज्यें आज जन्मास येत आहेत. हा जो एक नवीन फरक झालेला आहे. तो फरक लक्षात घेऊन महाराष्ट्राला पुढची वाटचाल करावयाची आहे. म्हणून मी सांगतों की, या गोष्टीची मर्यादा आतां आपणांला समजली पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी आहे की, आपण जेव्हां आपले ईप्सित साध्य करण्याचे महत्त्वाचें काम अंगावर घेतों तेव्हां आवतींभोंवतीं आपण अकारण संशयाने पाहतां कामा नये. दिल्ली आमच्यावर अशा दृष्टीनें बघणार आहे, आणि गुजरातच्या मनामध्यें कदाचित् हें असेल, या आत्मविश्वासाच्या अभावाच्या दृष्टीनें आम्हीं आमच्या प्रश्नांकडे पाहतां कामा नये. आत्मविश्वासानें आपली शक्ति कोणती तें आपल्याला समजलें पाहिजे. आणि आपल्या शक्तीबरोबरच आपल्यामध्यें जे दोष आहेत त्यांचीहि मोजदाद आपण मनाशीं घेतली पाहिजे आणि या दोन्हींचा हिशेब मनाशीं बांधून मग आम्हीं आमचीं पावलें टाकली पाहिजेत.

माझा गेल्या तीस वर्षांचा जो अनुभव आहे त्यावरून मीं असें पाहिलें आहे कीं, कुठल्याहि राजकीय पक्षामध्यें थोडेच लोक असतात. बहुसंख्य जनता ही पक्षांच्या बाहेर असते, असें माझें स्वतःचे मत आहे. आणखी ती कांही अमक्याच एका पक्षाची बांधली गेलेली असते असेंहि नाहीं. आपला मार्ग युक्त आहे आणि चांगला आहे, हें या जनतेला पटविण्याची जबाबदारी त्या त्या पक्षावर असते. जो पक्ष हें करतो तो राजकारणांमध्ये यशस्वी होतो असा आतांपर्यंतचा अनुभव आहे. आणि हाच अनुभव याच्यापुढेंहि राहणार आहे असें मी मानतों. गेल्या तीन वर्षांतील माझ्या कामांतले हें माझें एक मार्गदर्शक सूत्र आहे. अमका पक्षवाला काय म्हणतो त्यापेक्षा या सगळ्या पक्षांच्या बाहेर म्हणून जी कांही जनता आहे, जो बहुजनसमाज आहे त्याचा काय अंदाज आहे तें पाहून शहाण्या पक्षानें आणि शहाण्या राज्यकर्त्यानें आपलें धोरण ठरवावें. माझ्या कामांतले तुम्हांला जर कांहीं ट्रेड सीक्रेट पाहिजे असेल तर तें हें आहे. तें मी तुम्हांला आज देऊन ठेवतो. कारण तें माझ्या मालकींचें नाही. हा बहुजनसमाज - आतांपर्यत ज्या अर्थानें बहुजनसमाज हा शब्द वापरला जातो त्या अर्थानें मी तो येथें वापरीत नाही - स्वंतत्र मनानें विचार करतो, तो कुठल्याहि पक्षाला बांधला गेलेला नसतो. आपल्या पक्षाच्या वर्तमानपत्रांत आलेलें मत तें आपलें मत असें मानणा-या लोकांना मी पक्षवाले लोक मानतों. विशाल सह्याद्रींत काय आलें आहे, केसरीनें काय म्हटलें आहे, न्यू एजमध्यें काय आलें आहे, साधनेमध्यें काय आलें आहे - उदाहरणादाखल मी हीं नांवें घेतों आहें - हें पाहणारे लोक पक्षवाले लोक आहेत. पण समोर आलेले प्रश्न आणि समोर आलेलीं माणसें यांची आपल्या दृष्टींने परीक्षा करून विचार करणारी अशीं जीं माणसें आहेत तीं, यांचें काय म्हणणें आहे, त्यांचें काय म्हणणें आहे हें सर्व तपासून पाहत

असतात. अशा प्रकारें तपासून पाहण्याची दृष्टि समाजामध्यें वाढत आहे. मी आपणांला सांगू इच्छितों कीं ही जी दृष्टि आहे तिचें महत्त्व समाजामध्यें वाढत राहणार आहे. आणि मी असें मानतों कीं, महाराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें जर सगळ्या पक्षांना विचार करावयाचा असेल तर त्यांनी ज्या या समाजाबद्दल मी हें बोलतों आहें त्याला काय आवडेल आणि त्याच्या काय गरजा आहेत हें पाहण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळें मला मदत केल्यासारखें होणार आहे. माझें स्वतःचें असें मत आहे कीं, हा समाज आज दबलेला समाज आहे, तो दलित समाज आहे, तो न बोलणारा समाज आहे. पण तो मुका समाज नाहीं; फक्त त्याला अजून बोलावयाचें धारिष्ट होत नाहीं. पण त्याच्या मनामध्यें एक चित्र निर्माण झालें आहे, एक स्वप्न रंगलेलें आहे. तें स्वप्न समजून घेण्याचा प्रयत्न करून, त्याला मूर्त स्वरूप देण्याचे काम तुम्हांआम्हांला आतां करावयाचें आहे.

हें कार्य पार पाडण्याचा यापुढें माझा प्रयत्न राहील. माझ्यामधील दोष त्यामध्यें येऊं न देण्याचा मी प्रयत्न करीन. पण माझे कांहीं दोष त्यांत आलेच तर मला सांगायला तुम्ही घाबरूं नका. जसें आपण मला चांगला म्हटलेंत तसें जरी आपण मला वाईट म्हटलेंत तरी त्याबद्दल मी खेद मानणार नाहीं किंवा त्याबद्दल मी आपणांला कधीं दोष देणार नाहीं. कारण मी नेहमीं सांगत असतों कीं, मुलाला मारण्याचा अधिकार सख्ख्या आईचाच असला पाहिजे. सावत्र आईचा नाहींच नाहीं, पण बापाचाहि असूं नये असें मी मानतों. कारण कधीं मारलाच पाठीवर एखादा धपाटा, तर दुस-याच क्षणीं ज्याला लागलें त्याच्यापेक्षां जिनें मारलें तिच्याच डोळ्यांतून पाणी येतें आणि ती आपल्या मुलाला पोटाशी धरतें. हा सख्ख्या आईचा धर्म आहे. तीच गोष्ट जनतेची आहे. माझा गेल्या चार-पांच वर्षांतला स्वतःचा अनुभव याचें उत्कृष्ट उदाहरण आहे. मीं माझ्या डोळ्यांनी पाहिलें कीं लोक खूप रागावले होते. पण मी लोकांच्यावर रागावलों नाहीं. कारण माझ्या मनांत शंकाच नव्हती. मला एवढेंच वाटत असे कीं आपल्याला जी गोष्ट बरोबर दिसते ती आपण लोकांना सांगितली पाहिजे. पण माझी अशी खात्री होती कीं, जर लोकांना पटलें तर तेच प्रेमानें जवळ करतील. परंतु इतक्या लवकर ही गोष्ट होईल असें मलाहि वाटलें नव्हतें. जे रागावलेले लोक होते तेच आज इतक्या प्रेमाने जवळ करतात. सख्ख्या आईसारखे हें नातें नाहीं तर मग दुसरें कोणतें आहे ?

परवां मला एक अनुभव आला. मी मराठवाड्यांत दौ-यावर गेलो होतो. मी दौ-यावर गेलों म्हणजे खूप लोक सभांना जमतात. अनेक ठिकाणी हारतुरे घालतात. हें तर अगदी प्रेमाचे लक्षण झालें आहे. या दौ-याच्या वेळी मराठवाड्याच्या एका तालुक्यांतून मी प्रवास करीत होतों. नाथांच्या पैठण तालुक्यांतून. एका छोट्या गांवाशेजारी पांचपंचवीस घरांची वाडी असेल, तेथें आपलीं दहापांच माणसें बसली होतीं. त्यामध्यें दोनचार मुलें आणि दोनचार म्हातारे होते. मला वाटलें, कां कोण

जाणे, आपण येथें थांबले पाहिजे. तेथें कोणी हार घेऊन उभें राहिलें नव्हते. किंवा तेथें कमानहि नव्हती. मीं म्हटलें आपल्याला अजून फारसा उशीर झालेला नाहीं; दहापांच मिनिटें थांबून चौकशी तर करूं या कीं मंडळी कां बसली आहेत ? त्याप्रमाणें आम्हीं गाडी थांबविली. इतक्यांत दोन म्हातारी माणसें पुढें आली आणि म्हणालीं, 'चव्हाणांची गाडी काय ?' मीं 'होय' म्हटलें, आणि आम्ही खालीं उतरलों. मला वाटलें कीं कांहीं तक्रारअर्ज वगैरे असेल तर तो आपण घ्यावा. मीं म्हटलें, 'हो मीच चव्हाण, कांहीं सांगावयाचें आहे का आपल्याला ?' तेव्हां त्यांतल्या एका म्हाता-यानें कांपत कांपत खिशांतून एक पिशवी बाहेर काढली. मला वाटलें पिशवींतून कांही अर्ज काढून देतोय. म्हणून मी हात पुढें करून उभा राहिलों. त्यांने काय काढलें असेल सांगा पाहूं ? त्यानें अर्ज नाहीं काढला. त्यानें फुलांचा हार नाहीं काढला; त्यानें एकेक रुपयांच्या दहा-पांच नोटांनी बांधलेला एक छोटासा हार बाहेर काढला. मी चकित झालों. मला वाटलें या मराठवाड्यामध्यें, या हैद्राबादच्या जुन्या राज्यामध्यें, अशा नोटा द्यावयाची कदाचित् पद्धत असेल. मी माझ्या मनाशीं जरा घाबरलो. मी त्याला म्हणालों, 'आजोबा, तुम्ही मला अर्ज द्याल असें मला वाटत होतें पण तुम्ही हें काय देतां ? मी या पैशाचें काय करूं ?' तर त्यानें मला उत्तर दिलें, 'बाबा, तुझ्यासारखा पुत्र व्हावा अशी इच्छा होती. तुला खाऊला हे पैसे आणले आहेत'. मी पितृवंचित आहे. माझे वडील माझ्या लहानपणींच वारले. पण या वयांतहि आपल्याला खाऊ द्यायला कोणी तरी आहे या भावनेनें माझें मन भरून आले. माझे अश्रु मी थांबवू शकलो नाहीं. मघांच मीं सांगितले त्याप्रमाणे मातेचें हें हृदय जनतेजवळ आहे असें मला वाटतें.

आणि म्हणून जनता रागावली होती ही गोष्ट जशी माझ्या लक्षांत आहे, तशाच जनतेच्या प्रेमाच्या अनेक आठवणीहि माझ्या मनांत आहेत. जनतेचें हे प्रेम आणि या प्रेमाची शक्ति ज्याच्याजवळ आहेत तोच समर्थ मनुष्य बनतो अशी माझी श्रद्धा आहे. माझा विचार बरोबर आहे ही भावना जर माझ्या मनाशीं असेल आणि शेवटीं ज्यांची चाकरी करावयाची आहे, सेवा करावयाची आहे, त्यांची जर ती भावना असेल, त्यांचें जर प्रेम असेल, तर परमेश्वराजवळ आणखी काय मागावयाचें ? मुख्यमंत्रिपद नाहीं मागावयाचें. माझी तशी आकांक्षा नाही. माझी आकांक्षा अशी आहे कीं, यापुढें संयुक्त महाराष्ट्राचें राज्य हें भारताची शक्ति वाढविणारी एक जबरदस्त शक्ति बनली पाहिजे. आणि ती शक्ति देण्याचें काम मंत्रिमंडळामध्यें नसणा-या माणसांनी केलें पाहिजे. त्यांतला जर मी एक होऊं शकलो तर त्यामुळें मला अधिक आनंद वाटेल. मी कांहीं अगदींच आपलें तोंडदेखलें बोलतों आहें असें आपण समजूं नका. ती माझ्या मनांतली एक इच्छा आहे. कारण मी असें मानतो कीं राज्ये जीं चालतात तीं, राज्यें चालविणा-या माणसांपेक्षां राज्यशक्तीच्या बाहेर जीं माणसें असतात त्यांच्या पुण्याईनें चालतात. तीं माणसें ज्या परंपरा आणि ज्या शक्ति निर्माण करतात त्यांच्या साहाय्यानें तीं चालतात. आणि म्हणून मी हे माझे विचार, हें माझें तत्त्व, कधीं सोडणार नाहीं. पण मला जें पाहिजे होतें ते मिळालें.

मराठवाड्याच्या अनोळख्या भूमीमध्यें मला खाऊला पैसे देणारा माझा पिता भेटला असें मला जें वाटलें त्यापेक्षां मला आणि काय मागावयाचें आहे ? माझें मन व्यक्तिशः तृप्त आहे; पण सामाजिक दृष्ट्या तें अतृप्त आहे, असंतुष्ट आहे. मघाशीं मीं ज्यांचा उल्लेख केला त्या घरांची, त्या दैन्याची, त्या अज्ञानाची, त्या गरिबीची आठवण झाली म्हणजे मन रागानें उठतें. हें सर्व बदलले पाहिजे, याचा आम्हांला विसर पडतां कामा नये.

सन्मित्रहो, आणखी काय सांगूं तुम्हांला मी ? माझ्या मनांतला जो भाव आहे तो सांगितला. तुमचें हें प्रेम असेंच राहूं द्या. त्याची मला वारंवार जरूर लागेल. दादांचे आभार मी कसे मानूं? त्याच्यासाठीं माझ्याजवळ शब्द नाहीत. दादा म्हणजे आमच्या दक्षिण साता-यांतल्या माझ्यासकट सगळ्या कार्यकर्त्यांचे एक शक्तीचें स्थान आहे. येथून मी मोठी शक्ति घेऊन आज परत चाललो आहें. विधानसभेमध्यें विभाजनाबाबत मला अनेक वर्णनें ऐकायचीं आहेत. आज त्यांत अनंत अडचणी आहेत. विभाजनाचें बिलहि अगदीं सर्वांगसुंदर, परिपूर्ण आहे असें माझें म्हणणें नाहीं. त्यांतहि कांहीं अपुरेपणा आहे. पण मीं सांगितलें त्याप्रमाणें मैत्रीकरितां, शेजारधर्म निर्माण करण्याकरितां नवीन राज्यांचा जन्म झालेला आहे. म्हणून त्यांत अनेक तडजोडी आहेत आणि त्या बुद्ध्या स्वीकारल्या आहेत. प्रत्येक गोष्टीला तत्त्व दाखवा असें म्हणणा-या माणसांना त्यांची तत्त्वनिष्ठा पाहून मी नमस्कार करतो. पण दुनियेमध्ये तत्त्वनिष्ठेनें किंवा नुसत्या तत्त्वाच्या फॉर्मुल्यानें प्रश्न सुटत असते तर पुस्तकें छापणा-या प्रकाशकांनी संयुक्त महाराष्ट्राचे प्रश्न यापूर्वीहि सोडवून टाकले असते. पण हा व्यवहाराचा प्रश्न आहे. जबरदस्त अशा अडचणींचा प्रश्न आहे. याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं यांत कुठलेंहि मार्गदर्शक तत्त्व नाहीं. माझ्या म्हणण्याचा आशय एवढाच कीं मार्गदर्शक तत्त्वाच्या मदतीनें हे प्रश्न सुटले पाहिजेत, पण त्यांत 'रिजिडिटी' कुठें राहूं शकत नाहीं. आणि म्हणून कुठें कुठें कांहीं देवाणघेवाण मला करावी लागली आहे. पण त्यामध्यें कांहीं गैर आहे असें मी मानीत नाहीं, तत्त्वतः आणि व्यवहारतः तर मुळींच नाहीं. तत्त्वाच्या बाबतींत शक्य तो माझी वृत्ति व्यवहाराची आहे. पण यासंबंधीं मी जास्त कांही बोलता कामा नये. कारण बिलाची चर्चा विधानसभेमध्यें होणार आहे. विधानसभा चालू असतांना, विधानसभेमध्यें चर्चिल्या जाणा-या कुठल्याहि प्रश्नाची चर्चा करायची नाहीं असा दंडक आहे. म्हणून त्या संबंधानें मी आतां कांही अधिक बोलत नाहीं.

मला येथून आपले सगळे आशीर्वाद घेऊन एका कठीण कामाकरितां जायचें आहे. आपल्या आशीर्वादांची मला फार गरज लागेल. दक्षिण साता-याच्या, उत्तर साता-याच्या, रत्नागिरीच्या, कोल्हापूरच्या, सोलापूरच्या, ठाण्याच्या, पुण्याच्या कितीतरी कार्यकर्त्यांनी मला येथें सद्भावना दिलेल्या आहेत. त्यांचा मी अतिशय आभारी आहे. कोणत्या शब्दांनी मी या मंडळीचे आभार मानूं तें समजत नाहीं. माझ्याजवळ शब्द नाहींत. मी साहित्यिक असतों तर बरें झालें असतें असें अशा

वेळी वाटायला लागते. आपण माझ्यावर हा जो प्रेमाचा वर्षाव केला, त्याबद्दल मी आपला अतिशय आभारी आहें. मी कुठेंहि असलों तरी तुमच्या या सद्भावना माझ्या पाठीशीं आहेत. मी परमेश्वराकडे एवढीच प्रार्थना करीत राहीन कीं, त्या सदिच्छा आणि त्या सद्भावना यांना पात्र बनण्याची शक्ति त्यानें मला द्यावी.

## विविधतेंतील एकता

महाराष्ट्रांत आज सर्वत्र शिवजयंती उत्साहानें साजरी होत आहे. ज्याला आपण अर्वाचीन महाराष्ट्र म्हणतों त्याची उभारणी करण्याचें श्रेय शिवाजी महाराजांकडेच जातें. शिवाजी महाराजांचें मोठेपण हें त्यांचा अतुल पराक्रम, त्यांची राजकारणपटुता, त्यांचें विशुद्ध चारित्र्य या थोर गुणांत जेवढें आहे तेवढेंच किंबहुना त्याहूनहि अधिकांशानें शासनकार्यांतील त्यांची विधायक दृष्टि व कर्तव्यपरायणता यांत आहे असें मला वाटतें. महाराष्ट्राच्या स्वराज्याची ते उभारणी करूं शकले ती मुख्यतः या गुणांमुळेंच. शिवाजी महाराजांचे अमात्य रामचंद्र नीळकंठ यांनीं 'आज्ञापत्रांत' महाराजांचें जें बहारदार वर्णन केलें आहे तें या दृष्टीनें पाहण्यासारखें आहे. "तस्करादि अन्यायी यांचें नांव राज्यांत नाहींसें केलें. देशदुर्गादि, सैन्यादि बंद नवेच निर्माण करून एकरूप अव्याहत शासन चालविलें. केवळ नूतन सृष्टीच निर्माण केली." या वर्णनावरून शिवाजी महाराजांच्या कार्यक्षम व लोकाभिमुख राज्यकारभाराची कल्पना येईल. शौर्य व धैर्य या गुणांना चारित्र्य व विधायक दृष्टि या गुणांची जोड मिळाल्यानेंच शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे भाग्यविधाते झाले.

यंदाच्या शिवजयंतीचें महत्त्व तर अधिकच आहे. कारण आजपासून आपण महाराष्ट्र राज्यस्थापनेचा उत्सव साजरा करीत आहोत. अशा रीतीनें पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या भागांचे प्रथमच एक सबंध राज्य निर्माण होते आहे. हें सर्व कसे घडत गेलें याचा इतिहास आपल्यापुढें अगदीं ताजा आहे. किंबहुना या घटना अद्याप इतिहासजमा झालेल्या नाहींत असेंच म्हणणे अधिक रास्त ठरेल. तेव्हां त्यांचा मी येथें पुनरुच्चार करीत नाहीं. भारतांतील इतर राज्यांप्रमाणें आपलें पण भाषिक राज्य असावें अशी मराठी लोकांची इच्छा होती व लोकशाहीच्या तत्त्वानुसार भारतीय संसदेनें मराठी जनतेच्या या इच्छेस मान देऊन महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेस अनुमति दिली आहे.

आणखी तीन दिवसांनी अस्तित्वांत येणारें आपलें हें महाराष्ट्र राज्य विविधतेनें नटलेलें आहे. ही विविधता निसर्गाच्या रचनेंत जशी आहे तशी माणसांत सुद्धा आहे. उत्तरेस सातपुडा आणि पश्चिमेस सह्याद्रि यांचीं उत्तुंग शिखरें व त्यांच्या उतरणीवरील घनदाट जंगलें यांनीं या भागांस भव्योदत्त सौंदर्य प्राप्त झालें आहे, तर वर्धा-वैनगंगेच्या खो-यात जागोजाग असलेली जलाशयें व पळसाच्या लाल फुलांनी डंवरलेलीं रानें मनाला प्रसन्नता आणतात. कोंकणचा किनारा अथांग पश्चिम सागराचें दर्शन घडवितो, तर गोदेच्या पाण्याने पुनीत व समृद्ध झालेली मराठवाड्याची भूमि महाराष्ट्राच्या तेजस्वी भूतकाळाची व संस्कृतीची आठवण करून देते. नागपूरच्या परिसरांत भारतांतच केवळ नव्हे तर सर्व आशियांत उत्तम म्हणून नांवाजलेली संत्री पिकतात, तर रत्नागिरीकडे भारतांत ज्याच्या तोडीचा दुसरा आंबा नाहीं तो हापूस आंबा अमाप पिकतो. विदर्भ-मराठवाड्याच्या काळ्याभोर जमिनींत कापूस भरघोस फुलतो, तर नगर-सोलापूर-कोल्हापूर भागांत पिकणारा रसदार ऊंस सर्वांचे तोंड गोड करतो. निरनिराळ्या भागांतील लोकांच्या बाबतींतहि ही विविधता आहे. कोंकणपट्टींतील माणसाचे अनुनासिक उच्चार ऐकून देशावरच्या माणसाला मौज वाटते, तर खानदेश-व-हाडचा माणूस एक विशिष्ट हेल काढून बोलूं लागला कीं सांगली कोल्हापूरकडील माणसांच्या चेह-यावर स्मिताची रेषा न झळकली तरच आश्चर्य. पण या विविधतेंतच महाराष्ट्रांतील जीवनाचें सौंदर्य सांठलेलें आहे. अशी विविधता नसेल तर जीवन नीरस व रंगहीन होईल.

पण या विविधतेंतहि एकता आहे व असली पाहिजे. विविधतेनें जीवनाला जसें सौंदर्य येतें तसें एकतेंत जीवनाचें सामर्थ्य प्रतीत होतें. विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र यांची भाषिक एकता तर आहेच, पण शिवाय लोकांच्या चालीरीती व परंपरा आणि सामाजिक संघटनेचें एकूण स्वरूप हेंहि कसें सारखें आहे याचीं वाटेल तेवढीं उदाहरणें देतां येतील. तसेंच महाराष्ट्राचा सांस्कृतिक व राजकीय इतिहासहि त्याची साक्ष देतो. प्राचीन काळीं विदर्भ व मराठवाडा हे महाराष्ट्राच्या केंद्रस्थानीं होते. शालिवाहन व चालुक्यांची राजधानी मराठवाड्यांतील पैठण येथें होती, तर वाकाटक या राजघराण्यानें महाराष्ट्राचा सर्व प्रदेश आपल्या छत्राखालीं आणला होता. वाकाटक हे विदर्भाचे राजे होते व त्यांची राजधानी चांद्याजवळ भांदक येथें होती. देवगिरीच्या यादवांच्या काळांत महाराष्ट्राची व मराठी भाषेची विशेष भरभराट झाली. मराठीचे आद्य व श्रेष्ठ कवि मुकुंदराज, ज्ञानेश्वर व नामदेव याच काळांत झाले. चक्रधर या महानुभावी पंथाच्या संस्थापकाचा एक शिष्य महींद्र व्यास यानें सुमारें ७०० वर्षांपूर्वी लिहिलेल्या लीलाचरित्रांत महाराष्ट्राचें जें वर्णन केलें आहे त्याचा येथें उल्लेख करण्याचा मोह मला आवरतां येत नाहीं.

साठी लक्ष देश महाराष्ट्र । तेथिचे शिहाणे सुभटू ।

वेदशास्त्र चातुर्यांची पेठू । भरैली तिये देशीं ॥

ऐसे ते महाराष्ट्रराये सुंदरू । वरी महाराष्ट्रभाषाचतुरु ।
तेहीं वसविलें गंगावीरू । क्षेत्र त्र्यंबकूवेऱ्हीं ॥
पश्चिमे त्र्यंबकूपूर्व सागरवेऱ्हीं । द्वादश योजनें उभय गंगातीरीं ।
ऐसें तें गंगातट महाराष्ट्रीं । वसिजे पुण्यातन ॥
देश म्हणजे खंडमंडळ । जैसें फलेठाणापासौनि दक्षिणेसि
म-हाटी भाषा जेतुलां ठाइं वर्ते तें एक मण्डल ।
तयासि उत्तरे बालेघाटाचा सेवट असे । ऐसें एक खंडमंडळ ।
मग उभय गंगातीर तेहि एक खंडमंडळ । आन तयापासौनि
मेधकरघाट तें एक मंडळ ।
तयापासौनि आवघे वराड तेंहि एक मंडळ ।
पर आघवीचि मिळौनि महाराष्ट्रचि बोलिजे ।

यापुढच्या काळांत राजकीय दृष्ट्या महाराष्ट्र जरी भंगला तरी संत कवींनीं महाराष्ट्राची सांस्कृतिक एकता सतत टिकवून ठेविली. संत कवींच्या कार्यांचें हें मर्म आपण ध्यानांत घेतले पाहिजे. ज्ञानेश्वरापासून तों तुकारामापर्यंत सुमारें चारशें वर्षे संतांनीं वारकरी सांप्रदायाच्या द्वारें सामाजिक समतेच्या तत्त्वांचा प्रसार करून सर्व मराठी जनतेचें ऐक्य साधलें. संतांची ही शिकवण महाराष्ट्र कधीहि विसरणार नाही.

नव्या महाराष्ट्र राज्यांत ही एकता आपण अधिक दृढ केली पाहिजे. आज आपण देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासाचीं मोठमोठीं कामें हातीं घेतलीं आहेत. महाराष्ट्रांत गेलीं चारपांच वर्षे राज्यपुनर्रचनेचा प्रश्न सतत तेवता राहिल्यानें जनतेचें मन विचलित राहिलें व त्यामुळें विकास कार्याकडे द्यावें तेवढें लक्ष तिनें दिलें नाहीं, ही वस्तुस्थिति आहे. परंतु या कार्याची आतां हेळसांड होऊं न देतां लोकांनी त्यावर आपलें जास्तींत जास्त लक्ष केंद्रित केलें पाहिजे. भाषिक राज्याची स्थापना हें साधन असून जनतेचा सर्वांगीण विकास हें साध्य आहे. या बाबतींत दुमत होण्याचें कारण नाहीं. एखाद्या प्रश्नासंबंधीं मतभेद असणें यांत वावगें कांहीं नाहीं, आणि मतभेद असेल म्हणचे चर्चा, वाद या गोष्टीहि आल्या. लोकांच्या जागरूकतेचें व कोणतीहि गोष्ट पारखून घेण्याच्या चोखंदळ वृत्तीचेंच तें द्योतक आहे असें मी समजतों. परंतु वादामधून तत्त्वबोध झाला पाहिजे. नाहींतर त्या वादाला कांहीं अर्थ उरणार नाहीं. मतभेद केवळ मतभेदांसाठींच असूं नयेत. तसे ते असले तर त्यांनी वैयक्तिक वा पक्षीय हेव्यादाव्यांचें स्वरूप येतें आणि त्यांने कार्यहानि होते. विकास कार्याच्या द्वारें लोककल्याण साधावयाचें या ध्येयासंबंधीं अर्थातच मतभेद असण्याचें

कारण नाहीं. मार्गासंबंधीं मतभेद होऊं शकतील हें मी मान्य करतों. पण असे मतभेद लोकशाहीच्या मार्गानेंच सोडविले पाहिजेत. या दृष्टीनें विभाग, जिल्हा, तालुका व गांव या पातळीवर निरनिराळ्या संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. जनतेच्या विकासाला प्राधान्य द्यावयाचें ही भूमिका एकदां मान्य झाल्यानंतर या मतभेदांतूनहि सहकार्याचें क्षेत्र वाढवितां येईल असा माझा विश्वास आहे.

ज्या नव्या महाराष्ट्र राज्याच्या स्वागताचा सोहळा आपण साजरा करीत आहोंत त्यासंबंधीं महाराष्ट्रांतील जनतेंत जास्तींत जास्त मतैक्य आहे याबद्दल मला तिळमात्र शंका नाहीं. कांहीं जण मात्र थोडासा विरोधी सूर काढीत आहेत. हा विरोधी सूर काढणा-या माझ्या मित्रांना माझी प्रेमाची विनंती आहे कीं, लोकशाहीचा कौल मान्य करून महाराष्ट्रांतील आम जनतेच्या हिताच्या दृष्टीनें त्यांनीं आपला विरोध आतां सोडून द्यावा व नवमहाराष्ट्राच्या उभारणीच्या कार्यात सहभागी व्हावें. तीन वर्षांपूर्वी सर्व मराठी प्रदेश एकत्र आल्यानंतर आपण परस्परांच्या कितीतरी जवळ आलों आहोंत. मुंबईचा माणूस आतां नागपूर-नांदेडचा विचार करूं लागला आहे, तर अमरावती-अकोल्याच्या माणसाला सांगली-कोल्हापूर हे आपल्यापैकींच आहेत असें वाटूं लागलें आहे. वाहतुकीचीं साधनें वेगाचीं झालीं कीं अंतर कमी होतें हें जसें सत्य आहे, त्याचप्रमाणें ममत्वाच्या भावनेनें अंतर कमी होतें हा अनुभव गेल्या तीन वर्षांपासून आपल्याला अधिकाधिक येत आहे. बराच काळ दूर राहिल्यामुळें सुरुवातीला थोडेसे संशयाचें वातावरण, थोडीशी दूरपणाची भावना राहणें हे मानवी स्वभावाला धरूनच आहे. पण समजूतदारपणानें व जाणीवपूर्वक हा संशयाचा आडपडदा दूर सारला पाहिजे. महाराष्ट्र आज एकसंध होत आहे त्याचें फार मोठें श्रेय विदर्भ व मराठवाड्यांतील नेते व विचारवंत यांनीं या दिशेनें केलेल्या प्रयत्नासं आहे यांत मुळीच शंका नाहीं. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर एकीकरणाचें हें कार्य संपलें अशी चूक कोणीं करूं नये. एक महत्त्वाचा टप्पा आपण गांठला. पण आपल्याला अजूनहि पुढें वाटचाल करावयाची आहे. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा यांना एकरूप करण्याची जबाबदारी केवळ शासनानेंच पार पाडावयाची आहे अशी अपेक्षा सर्वस्वी चुकीची ठरेल. साहित्य संस्था, शिक्षण संस्था, सांस्कृतिक व सामाजिक कार्य करणा-या संस्था यांनी शासनापेक्षांहि हें कार्य अधिक भरीवपणें करतां येईल असें माझें मत आहे. त्या दिशेनें होत असलेल्या प्रयत्नांची मला अर्थातच जाणीव आहे.

एकरूप महाराष्ट्र निर्माण करण्याचे प्रयत्न शासनाच्या द्वारें होत आहेत व त्यांत संपूर्ण यश येईपर्यंत ते चालू राहतील असें आश्वासन मी देतों. या बाबतींत एका गोष्टीचा उल्लेख मी येथें करूं इच्छितों. मुंबई राज्याचें गुजरात व महाराष्ट्र अशा दोन राज्यांत विभाजन करण्यासंबंधींच्या

विधेयकांत नागपूर कराराचा समावेश केलेला नाहीं म्हणून आमच्या कांहीं मित्रमंडळींचा राग झालेला आहे. कांहीं तांत्रिक घटनात्मक गोष्टींचा विचार करतां या कराराचा विधेयकांत समावेश करतां आला नसला तरी या करारामागची भूमिका मान्य करण्यांत आलेली आहे आणि त्या दृष्टीनें मुंबई विधानसभेंत विभाजनाच्या विधेयकावर झालेल्या चर्चेच्या वेळीं सरकारतर्फे तसें स्पष्ट निवेदन करण्यांत आले आहे. त्याकडे मी आमच्या मित्रांचे लक्ष वेधूं इच्छितों. नागपूर कराराचा समावेश या निवेदनांत केलेला आहे. नागपूर ही एका राज्याची राजधानी होती, ती आतां न राहिल्यामुळें विदर्भातील जनतेला राजधानीपासून होणारे लाभ अन्य प्रकारें मिळवून दिले पाहिजेत ही गोष्ट मान्यच आहे. सबंध महाराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें विदर्भांतील जनतेला हा जो त्याग करावा लागत आहे, ही जी तोशीस सहन करावी लागत आहे त्याची जाणीव सबंध महाराष्ट्रांतील जनतेनें जरूर ठेविली पाहिजे आणि म्हणूनच नागपूरला राजधानीचा दर्जा राहिला नसला तरी या शहराचें महत्त्व कायम राखून त्यापासून विदर्भातील जनतेला पूर्वी मिळत असलेले फायदे यापुढेही मिळत राहतील अशी तरतूद या निवेदनांत केली आहे. नव्या राज्यांत नागपूरला हायकोर्टाचें बेंच राहणार असून राज्य विधिमंडळाचें दरसाल निदान एक तरी अधिवेशन नागपूरला भरविण्यांत येईल आणि सरकारी कचे-या कांही काळ तेथें हलविण्यांत येतील. विदर्भ व मराठवाडा विकास कार्याच्या बाबतींत मागें आहेत हें लक्षांत घेऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे खास लक्ष पुरविण्यांत येईल. त्या दृष्टीनें या विभागांसाठी वेगळीं विकासमंडळें स्थापन करण्यांत येतील. तसेंच, राज्यकारभारांत विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाचा अवलंब केल्यानें या विभागांना हरेक बाबतींत केंद्राकडे डोळे लावून बसण्याची गरज राहणार नाहीं. नोकरभरती, तांत्रिक शिक्षणाच्या सोयी, शेती, उद्योगधंदे, पाटबंधारे, पिण्याच्या पाण्याच्या सोयी, खाणी वगैरे बाबतींत या विभागांकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येईल, असें या निवेदनाचें थोडक्यांत सार आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, या निवेदनांतील तरतुदी उपकारकर्त्यांच्या किंवा दात्याच्या भावनेनें नव्हे तर कर्तव्यबुद्धीनें व प्रामाणिकपणें पाळण्यांत येतील असें आश्वासन मी येथें देतों. तेव्हां संसदेच्या विधेयकांत नागपूर कराराचा अंतर्भाव केला नाहीं म्हणून ज्यांचा रोष झाला असेल त्या सर्वांना माझी अशी कळकळीची विनंती आहे कीं, त्यांनीं या निवेदनामागील प्रामाणिक भावना लक्षांत घेऊन आपला रोष दूर करावा व आपण ज्या नव्या महाराष्ट्र राज्याचा आनंदोत्सव आज साजरा करीत आहोंत त्याच्या उभारणीच्या कार्यास त्यांनीं हातभार लावावा.

अनेक अडचणींतून मार्ग काढीत आतां महाराष्ट्र राज्याची स्थापना होत आहे. बंधुभावानें आपण आज एकत्र आलों आहोंत व हा बंधुभाव आपल्याला वाढीस लावावयाचा आहे. "पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावि काळ" या कवि विनायकांच्या वचनाप्रमाणें महाराष्ट्राचें भवितव्य उज्ज्वल आहे अशी आपणां सर्वांची श्रद्धा आहे. नव्या भारतांत आपल्याला नव्या महाराष्ट्राची उभारणी

करावयाची आहे. बुद्धिमान्, प्रामाणिक व कष्टाळू महाराष्ट्र या कामांत मागें पडणार नाहीं याबद्दल माझ्या मनांत शंका नाही.

## भाग्यवती शिवनेरी

लोकहो, आज मी माझें परमभाग्य समजतों कीं, महाराष्ट्राच्या परमेश्वराला प्रणाम करण्यासाठीं येथे येण्याची मला संधि मिळाली. आजच्या या सुवर्णदिनीं आपणां सर्वांच्या तर्फे नव्या महाराष्ट्र राज्यास श्रीशिवप्रभूंचे शुभाशीर्वाद मागण्यासाठीं मी येथें आलों आहे. ज्या या पवित्र क्षेत्रीं शिवप्रभु अवतरले तेथें येऊन महाराष्ट्राच्या या पुण्यश्लोक दैवताला मुजरा करणें हें माझें प्रथम कर्तव्य आहे. आजच सकाळी मुंबईस मी प्रमुख अशा निरनिराळ्या धर्मगुरूंचा आशीर्वाद घेऊन येथें आलों. मघां मी या गडावर बालशिवाजी आणि मातोश्री जिजाबाईंच्या प्रतिमेचें उद्घाटन केलें आणि आतां श्रीशिवछत्रपतींना मुजरा करून मी नव्या महाराष्ट्र राज्याची घोषणा करीत आहें. हा अपूर्व सोहळा पाहण्यासाठीं तुम्ही निरनिराळ्या भागांतील माझे मराठी बांधव प्रचंड संख्येनें येथें एकत्र जमलां आहांत. या पवित्र आणि अपूर्व प्रसंगानें आज माझें मन अनेक विचारांनी आणि भावनांनीं भरून आले आहे.

युगायुगांतून येणारा आजचा हा दिवस आहे. तीनशे वर्षांपूर्वी तो एकदा आला, आणि या शिवनेरींत शिवाजी महाराजांचा जन्म झाला. केवळ एका व्यक्तीचा, एका बालकाचा तो जन्म नव्हता, तर त्या बालकाच्या रूपानें महाराष्ट्राचा नवा इतिहास जन्माला येत होता. शिवजन्माने आमचा हा इतिहास त्या वेळीं या गडावर सुरू झाला. त्याच या पवित्र ठिकाणीं, विसाव्या शतकांतील नव्या महाराष्ट्र राज्याच्या इतिहासास सुरुवात व्हावी हा अपूर्व योगायोग आहे. शिवाजी महाराज एकदांच जन्मले, तसाच विसाव्या शतकांतील हा महाराष्ट्र आतां जन्मास येत आहे. प्रतिभावंत लेखक आणि कवि यांच्या लेखण्या ज्या क्षणाचें वर्णन करण्यास पुढें सरसावतात तो हा क्षण आहे. महाराष्ट्राच्या जीवनांतला हा मोलाचा क्षण आहे. आज आपलें अनेक वर्षांचे स्वप्न साकार झालें आहे. महाराष्ट्र राज्याच्या रूपानें आज एक नवें कर्तृत्व जन्माला येत आहे. मानव मनांत कांही आशा बाळगतो, स्वप्नें पाहतो, त्यासाठीं रात्रंदिवस धडपड करून असीम त्याग करतो, खडतर तपश्चर्या करीत असतो. परमेश्वर असा एक क्षण निर्माण करतो कीं, त्यामुळें मानवाची ती आशा सफल होते. तो तृप्त होतो. अशा तृप्तीचा क्षण आज छत्रपतींच्या पुण्याईनें आपल्या जीवनांत निर्माण झाला आहे. त्याचा आनंद आपण या क्षणीं उपभोगूं या, आणि या आनंदामागोमाग येणा-या जबाबदा-या पार पाडण्यासाठीं आपण सिद्ध होऊं या. एक किल्ला जिंकला, आतां दुसरा किल्ला

जिंकण्यासाठी विकासाची घोडदौड सुरू करूं या. कारण या विकासांतूनच महाराष्ट्राचें भवितव्य आकारास येणार आहे.

भारताचें राज्य जें निर्माण झालें त्यामागें अनेकांच्या भावनांचा संगम झालेला आहे. स्वतंत्र्य भारताचें राज्य एक - दोन शतकांकरितां निर्माण झालेलें नाहीं. पूर्वीच्या काळीं राजे आले आणि गेले, पातशाहया आल्या आणि गेल्या, परकीय सत्ता आली आणि गेली, पण भारताचें राज्य तसेंच जाण्यासाठीं जन्माला आलेलें नाहीं. आज भारतांत चाळीस कोटि लोकांचे जें राज्य निर्माण झालेलें आहे, ते भारतीयांच्या मनांत स्वातंत्र्याचा अभिमान जोंपर्यंत जागृत आहे तोंपर्यंत टिकणार आहे आणि म्हणून मी म्हणतों कीं हें स्वतंत्र भारताचें राज्य यावच्चंद्रदिवाकरौ टिकणारें आहे. जसा भारत एकदांच आणि कायमचा निर्माण झाला तसा महाराष्ट्रहि एकदांच निर्माण होत आहे. आजपासून पुढें अनंत काळापर्यंत भारताशीं समरस होऊन सांगणार आहे की, आमच्या मराठी जीवनांत जें जें कांहीं चांगलें आहे, मंगल आहे, तें तें भारताच्या सुखसमृद्धीसाठीं, संरक्षणासाठीं सेवेसाठीं आम्ही देणार आहोंत. जी अपूर्णता, जे दोष असतील ते आम्ही आमच्यापाशीं ठेवणार आहोंत. आम्ही प्रथम भारतीय आणि नंतर महाराष्ट्रीय आहोंत.

असा हा नवमहाराष्ट्र आतां निर्माण होत आहे. पूर्वी देवगिरीच्या यादवांच्या काळी जो मुलूख मराठी होता तो आतां एकत्र येत आहे. महानुभावी महीन्द्र व्यासानें आपल्या कांहीं ओव्यांत महाराष्ट्राच्या ज्या सीमा वर्णन केल्या आहेत, त्या सीमा आजच्या या समारंभाच्या दिवसापासून आतां अस्तित्वांत येत आहेत. हा मुलूख पूर्वी एकत्र होता, परंतु अधूनमधून तो इतिहासांत तुटला, सुटला होता. पण आतां पुन्हा तो एकत्र येत असून पिढ्यान पिढ्या मनांत बाळगलेली आपली आकांक्षा आज पूर्ण होत आहे.

गेल्या चारपांच वर्षांत महाराष्ट्रांतील जनतेनें महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीं अनेक प्रकारांनी व मार्गांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मी त्या प्रयत्नांचे दोन कालखंड मानतों. प्रतापगडावर पंडित नेहरू यांच्या हस्तें शिवप्रभूंच्या पुतळ्याचें अनावरण होण्यापूर्वीचा एक आणि प्रतापगडापासून शिवनेरीपर्यंतचा दुसरा. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलालजी ज्या दिवशीं शिवछत्रपतींना प्रणाम करण्यासाठी प्रतापगडावर आले तेव्हांपासून माझ्या मतानें या निरगांठीनें बांधलेल्या प्रश्नाचे धागे उकलत गेले. एक एक गोष्ट घडत गेली आणि प्रकाश दिसूं लागला. शेवटीं साडेतीन कोटींचा महाराष्ट्र आज एकत्र येत आहे. आज नव्या कर्तृत्वाचें हें नवें दालन निर्माण होत आहे. बुद्धिवंत व कर्तबगार स्त्रीपुरुषांना आव्हान देणारें हें नवें क्षेत्र आहे. याची वाटचाल आतां सुरू करावयाची आहे.

या नवराज्याचा विचार करतांना शिवछत्रपतींच्या कारभारावर प्रकाश टाकणा-या नव्या नव्या शोधसाहित्याची मला आठवण येते. महाराजांच्या आज्ञापत्रांचा नुसता अभ्यास केला तरी उद्यांचा प्रवास आपणांला बिनधोक करतां येईल. महाराजांनीं त्या काळीं एका आज्ञापत्रांत सैनिकांना उद्देशून लिहिलें आहे, "सैनिकांनो, शेतांत झोंपाल तेव्हां दिवे बंद करून झोंपा. उंदीर वात नेईल, पेटत्या दिव्यानें शेत पेटेल. शेतक-यांची गंज पेटली तर ते म्हणतील, राज्य स्वकीयांचे कसलें, तुर्कीचेंच आहे." सैन्याचे अधिकारी शेतक-यांना छळतात, दुःख देतात, असें होतां कामा नये, ही महाराजांची चिंता होती. आज तशीच लोककल्याणाची चिंता आपणांला वाहवयाची आहे.

हें राज्य आज निर्माण होत आहे असें आपण म्हणतों. पण तसें पाहिलें तर आपण कांही नवीन असें उत्पन्न करीत नाहीं, तर मोठ्या परंपरेचा जो वारसा या महाराष्ट्रांत चालत आला आहे तोच आपण पुढें नेत आहोंत. या आपल्या महाराष्ट्राच्या जीवनाचा मी विचार करतो तेव्हां मला चार त-हेच्या परंपरा आठवतात. त्या निरनिराळ्या प्रवृत्ति आहेत. प्रथम मला आठवते ती आमच्या मराठी साधुसंतांची परंपरा. मुक्तेश्वर-ज्ञानेश्वरांपासून ते आज विनोबांपर्यंत संतांची परंपरा समतेचा, न्यायाचा व बंधुभावाचा संदेश देत असतांना मला दिसते आहे. विनोबांचे, गाडगे महाराजांचे बोल आपण ऐकले. संत तुकडोजी महाराज नागपूर भागांत तोच संदेश देण्याचें काम करीत आहेत. दुसरी प्रवृत्ति वीर, पराक्रमी, राजकारणी पुरुषांची आहे. तिचें प्रतीक छत्रपति शिवाजी महाराज आहेत. अन्यायाविरुद्ध दलितांचा कैवार घेऊन लढण्याची महाराष्ट्राची तिसरी परंपरा आणि प्रवृत्ति महात्मा फुल्यांनी आपणांला दिली आहे. आणि शेवटीं विद्वानांच्या बुद्धिमत्तेचा वापर देशासाठी करून त्या मार्गानें वाटेल तो त्याग हसतमुखानें सहन करण्याची राजकारणी प्रवृत्ति लोकमान्य टिळकांनीं या महाराष्ट्राला दिली आहे. आपला हा जो वारसा आहे त्याची आपणांला जाणीव ठेवावयाची आहे. जेव्हां मी या नव्या महाराष्ट्र राज्याच्या खजिन्याचा विचार करतों तेव्हां बदोबंस्तांत असलेल्या त्या तिजोरींत नाणें किती आहे याचा विचार माझ्या मनांत येत नाहीं. तर आमच्या खजिन्यांत जमेच्या बाजूला हा जो मोठा वारसा नोंदलेला आहे त्याचाच विचार माझ्या मनासमोर उभा राहतो. हा वारसा जतन करणें मोठें कठीण काम आहे. पैशाचा खजिना खर्चून टाकून मोकळा करता येतो. पण हा वारसा खर्च करतां येत नाहीं. तो बरोबर घेऊन आपणांला सदैव पुढें जावें लागतें, पुढच्या जबाबदारीची जाणीव ठेवून पुढें जावें लागते.

आज सकाळी मुंबईस धर्मगुरूंच्या प्रार्थनेचे आशीर्वाद घेऊन येथें येण्याकरितां मी निघालों तेव्हां शिवनेरींनें माझें मन भरून गेलें. महाराष्ट्राच्या तीन कोटि जनतेच्या मनांत आज शिवनेरी आहे.

तिची आठवण झाली नाहीं असें जागतें मराठी मन आज महाराष्ट्रांत सांपडणार नाहीं. त्या सर्वांना या नव्या महाराष्ट्र राज्याचा गाडा चालवावयाचा आहे. या आनंदोत्सवांत आपण धुंद असतांना कोणाच्या मनांत काय तक्रारी आहेत त्या मला माहीत आहेत. मंजूर आहेत त्या तक्रारी, पण त्याच त्या कुरकुरी करीत राहून भागणार नाहीं. नव महाराष्ट्राच्या निर्मितीकरितां आपण आतां प्रतिज्ञाबद्ध आहोंत. या आनंदोत्सवाची स्मृति म्हणून या राज्याची जी मुद्रा आम्हीं निश्चित केली आहे, तिच्यावर

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता

महाराष्ट्रस्य राज्यस्य मुद्रा भद्राय राजते

हीं शिवाजी महाराजांनीं निवडलेलीं वाक्यें आम्हीं घेतलीं आहेत. याचा अर्थच हा कीं ही राजसत्ता लोककल्याणाकरतां राबणार आहे. आपणांला आतां सामान्य जनतेच्या आशाआकांक्षा पूर्ण करावयाच्या आहेत. त्यांना शिक्षणाची भूक आहे. दोन वेळां त्यांना सुखानें, मानानें घास खावयाचे आहेत. आणि ही गरज पूर्ण करावयाची जिम्मेदारी आपण घेतली आहे. जनतेच्या या आशाआकांक्षांच्या पूर्तीचा क्षण आपणांला जवळ आणावयाचा आहे. हा प्रवास सोपा नाहीं. पण प्रवास चालू झाला आहे. दमल्यासारखें वाटलें आणि मैलाचा दगड पाहून उशी करून झोपलांत तर कायमचे झोपाल. तसें होतां कामा नये. या महाराष्ट्राला आतां महत्त्वाचीं कामें करावयाचीं आहेत.

महाराष्ट्रांत आज असलेल्या सामाजिक आणि राजकीय प्रवाहांचा परिणाम महाराष्ट्राच्या भवितव्यावर होणार आहे. आज महाराष्ट्रांत अनेक पक्षोपपक्ष आहेत. ते पक्ष राहिले पाहिजेत. ते पक्ष राहूं नयेत असें मी म्हणणार नाहीं. लोकशाहीचें राजकारण चालविण्यासाठीं अनेक पक्ष असावे लागतात. पण फार पक्ष असणें हें देखील हितावह नाहीं. मी तर असें म्हणेन कीं, पुढचीं अनेक वर्षे, निदान तिसरी पंचवार्षिक योजना पूर्ण होईपर्यंत तरी, पक्षोपपक्षांच्या राजकारणाचा गोंधळ येथें माजूं नये. प्रत्येक पक्षास स्वतःचें असें खास राजकारण असतें. परंतु येत्या कांहीं वर्षात तीन कोटींच्या महाराष्ट्रापुढें फक्त एकच राजकारण आहे आणि तें म्हणजे सर्वांगीण विकास साधण्याचें राजकारण. महाराष्ट्रनिर्मितीसाठीं शिवशक्ति निर्माण झाली आहे तर ती कायम टिकविली पाहिजे.

महाराष्ट्राच्या विकासासाठी सर्वांनींच पुढें सरसावलें पाहिजे. कोणीहि मागें राहतां उपयोगी नाहीं. विकासकार्याच्या मोहिमेवर निघालेले आपण सिंहगड चढून आलों आहोंत. या गडावरून पळून जाण्याचा कोणी प्रयत्न करीत असतील तर त्यांना सांगावेंसें वाटतें कीं, कोंडाण्यावर जसे सूर्याजीनें मागचे दोर कापले होते तसेच आता येथून पळून जाण्याचे दोर केव्हांच कापून, तोडून टाकण्यांत आले आहेत. आतां परिस्थितीचें आव्हान घेऊन पुढेच गेलें पाहिजे. लढूं किंवा मरूं या ईर्षेनेंच

आतां आपल्याला पुढें जावयाचे आहे. तोच मार्ग आतां आपल्यापुढें शिल्लक उरला आहे. आतां आपल्याला परत फिरतां येणार नाहीं. आपल्या कर्तृत्वाला, आपल्या शहाणपणाला हें आव्हान आहे. तें आपण स्वीकारलेंच पहिजे. आजपर्यंत आपण अनेक सबबी सांगून वेळ मारून नेत होतों. पूर्वी आपण म्हणत असूं कीं, परकीय सत्ता आहे, हात बांधलेले आहेत. नंतर म्हणूं लागलों कीं, सर्व मराठी भाषिक एकत्र नाहींत, गुजरातशीं हात जखडलेले आहेत, त्यामुळें आमची कुचंबणा होते. आतां तेहि हात मोकळे झाले आहेत. आतां महाराष्ट्राच्या कल्याणाचा सिंहगड तुम्हांला स्वतःच्या कर्तृत्वावर जिंकावयाचा आहे. संकटें असतील पण त्यांना समोर जाऊन झेलल्याशिवाय तीं संपत नाहींत. त्यांना पाठ दाखविली कीं तीं अधिकच पाठीशीं लागतात. म्हणून या संकटांवर आपण आतां मात केली पाहिजे.

महाराष्ट्रापुढें आज अनेक समस्या आहेत. पण माझा असा अनुभव आहे की, महाराष्ट्रातील माणसाला प्रश्नाची तीव्रता समजावून दिली तर तो उत्साहाने उठतो. पण कर्तव्याची जाणीव दिली नाही तर तो पुन्हा झोपतो. म्हणून त्याला आतां सांगितलें पाहिजे कीं, 'तू आतां राजा आहेस.' दुःखांत असलेल्या जनतेच्या जीवनावर सुखाची सावली निर्माण करणें हें राजाचें कार्य आतां प्रत्येक मराठी माणसानें केलें पाहिजे. एकेक माणूस, एकेक मूल, हें सावली देणारें झाड आहे असें मानून त्यास खतपाणी घातलें पाहिजे. येतीं पंधरावीस वर्षे पुरणारें असें हें काम आहे.

आज सकाळपासून माझ्या मनांत अनेक भावनांनीं गर्दी करून सोडली आहे. तुम्ही मला आपला कर्णधार नेमला आहे. त्या नात्याने मी बोलतों आहें; पण मनांत जबाबदारीनें वाकलों आहें. आजचे हे आनंदसोहळ्याचे चार दिवस निघून जातील आणि मी जेव्हां उद्यां विधानसभेंत बसेन, त्यावेळीं महाराष्ट्राच्या भवितव्यासंबंधींच्या कामाचा आपण अहवाल मागाल. लोकांना थोडें थांबा असें मला म्हणतां येणार नाहीं. ते म्हणतील, वर्षानुवर्षे थांबलों. आतां थांबायला वेळ नाहीं. हा कांहीं मी तुम्हांला उपदेश करतों असें समजूं नका, तर माझ्या जबाबदारीचे पडसाद जे मनांत उमटत आहेत ते शब्दांनीं मी तुमच्यासमोर उघडे करीत आहें. खूप मोठीं कामें करावयाचीं आहेत. तिसरी पंचवर्षिक योजना आतां आंखावयाची आहे. देशाची ही तिसरी योजना आहे. पण एका अर्थानें महाराष्ट्रात आपली योजना मांडावयाची ही पहिलीच संधि आहे. महाराष्ट्रांच्या कडेकपारींत पडणारा प्रत्येक पाण्याचा थेंब आपल्या शेतांतल्या पिकांना पोचवावयाचा आहे. उद्योगधंदे वाढवावयाचे आहेत. उद्योगधंदे, कारखाने द्या म्हणून कोणी देत नाहीं, तर जेथे दोन हातांचे श्रम उभे राहतात तेथें ते येतात. ते हात सर्व जनतेचे आहेत, सरकारचे नव्हेत. राज्य म्हणजे सरकार नव्हे. सरकारें येतील आणि जातील. मी पुन्हा एकदां तुम्हांला आठवण देतों कीं, महाराष्ट्र महाराष्ट्र म्हणून जें मी सारखें म्हणतों आहें त्याचा अर्थ तुम्ही लक्षांत घ्या. भारतीय संदर्भ दृष्टिआड करून मी

महाराष्ट्र म्हणत नाहीं. भारताबरोबर महाराष्ट्र आपणांला मोठा करावयाचा आहे. भारत जगेल तरच महाराष्ट्र जगणार आहे, वाढणार आहे. म्हणून या शिवनेरीच्या साक्षीनें आणि तुम्हां सर्वांच्या वतीनें मी पुन्हा एकदां सांगतों कीं, आमच्या महाराष्ट्रीय परंपरेंत जें जें पवित्र आणि उच्च असेल तें तें भारताच्या उत्थापनासाठीं आम्ही देणार आहोंत. जीं वैगुण्यें असतील तीं आम्ही आमच्यापाशीं ठेवूं.

माझ्यापुढील कामाचें मला तीन त-हेनें दर्शन घडत आहे. उद्यांच्या महाराष्ट्र राज्याचा कारभार उत्तम, चोख झाला पाहिजे आणि आपला लौकिक कायम राहिला पाहिजे. दुसरी गोष्ट, पंचवार्षिक योजनेचें बाळ पाळण्यांत पाय दाखवून नवमहाराष्ट्राची ग्वाही देणारें झालें पाहिजे; आणि तिसरी गोष्ट आपण तीन भाऊ अनेक शतकांनंतर प्रथम एकत्र येत आहोंत त्यांचें एकसंध मन तयार झालें पाहिजे. राजकीय, सामाजिक, साहित्यिक सर्वच क्षेत्रांत एकात्म भावनेचा प्रयत्न सर्वांनी करावयाचा आहे. त्याच बरोबर कांहीं काळ - दहापंधरा वर्षे तरी - मला या महाराष्ट्रांत औद्योगिक शांतता हवी आहे. संपाची भाषा आपण बंद केली पाहिजे. याचा अर्थ तुमच्यावर अन्याय, तुमच्या अडचणी तुम्ही मुकाट्यानें सहन कराव्यात असें मी म्हणत नाहीं. आपल्या हक्कांसाठी तुम्ही जरूर भांडा; यशवंतरावांशीं भांडा, महाराष्ट्र सरकारशीं भांडा. पण महाराष्ट्राचें राज्य रांगतें आहे तोंवर संपाची भाषा बोलूं नका. अन्यायाविरुद्ध वापरावयाचें संप हें एकमेव हत्यार आहे. तें वापरतांना महाराष्ट्राचा त्रिवार विचार करा.

मी आज येथें एक अपूर्व योगायोगानें उभा आहें. महाराष्ट्र राज्याचा उत्सव शिवछत्रपतींच्या जन्मदिवशीं सुरू होत आहे. शिवनेरीच्या माथ्यावर जिजामातोश्री बालशिवाजींना घेऊन उभ्या आहेत. महाराष्ट्राला तें अमोल देणें देणा-या मातेचें मला दर्शन घडलें आहे. त्यांतील मर्महि आपण लक्षांत घ्या. जिजामातोश्री शिवनेरीवर आल्या हें या स्थळाचें परमभाग्य. पण त्या आल्या त्या वेळीं त्यांच्या पाठीवर त्यांचेच वडील आणि भाऊ पाठलाग करत घोडदौडीनें येत होते हा इतिहास आपण विसरूं नका. नवमहाराष्ट्राच्या मागें त्याचे मामा नि आजोबा पाठलाग करीत येत आहेत असें होतां कामा नये. आज सह्याद्रीच्या सान्निध्यांत मराठी मन महाराष्ट्राच्या इतिहासानें भरून गेलें आहे. छत्रपतींना जन्म देणारी शिवनेरी, त्यांना पुनर्जन्म देणारा प्रतापगड आणि त्यांना राजसिंहासनावर बसविणारा दुर्गराज रायगड यांच्या स्मृतींनीं तें मन भरून गेलें आहे. या सर्व जुन्या स्मृतींची पवित्र आठवण करून मी परमेश्वराची प्रार्थना करतों, 'देवा, आम्हांला अशी दानत आणि शक्ति दे कीं, हें महाराष्ट्र राज्य जनतेचें राज्य होईल. तें राज्य लोककल्याणाकरितां झटेल आणि भारताच्या नकाशावरील ता-यांत एका नव्या तेजस्वी ता-याची भर टाकील.' मी तुम्हांला पुन्हा एकदां धन्यवाद देतो.

## स्वप्नपूर्तीचा ऐतिहासिक क्षण

आजच्या ह्या ऐतिहासिक क्षणीं पंडित जवाहरलालजींचे आभार मानण्यासाठीं मी उभा राहिलों आहें. अनंत काळपर्यंत चालणा-या महाराष्ट्र राज्याला पहिला आशीर्वाद देण्याकरतां भारताचा आजचा युगपुरुष येथें आला आणि त्यानें आम्हांला आशीर्वाद दिले. महाराष्ट्राच्या लाख लाख जनतेतर्फे मी जवाहरलालजींचे लाख लाख आभार मानतों. महाराष्ट्रांतील आम्हां माणसांचें त्यांच्यावर प्रेम आहे. त्यांच्यावर भक्ति आहे. आणि आम्ही आज त्यांना परत आश्वासन देऊं इच्छितों कीं, महाराष्ट्राचें हें जें राज्य निर्माण झालें आहे तें मराठी जनतेच्या कल्याणाचें काम तर करीलच, परंतु मराठी भाषिकांच्या जवळ जें देण्यासारखें आहे, त्यांच्या जीवनामध्यें जें चांगलें आहे, जें उदात्त आहे, त्याचा त्याग जर करावयाचा असेल तर तो आम्ही भारतासाठीं प्रथम करूं. कारण आमचा हा पहिल्यापासून विश्वास आहे कीं, भारत राहिला तर महाराष्ट्र राहील, भारत मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल. भारताचें आणि महाराष्ट्राचें हित जेव्हां एकरूप होतें तेव्हां भारतहि मोठा होतो आणि महाराष्ट्रहि मोठा होतो, हा इतिहास महाराष्ट्राच्या रक्तारक्तांतून भिनलेला आहे. आणि म्हणून मी गेल्या चार आठ दिवसांमध्ये प्रतीकाच्या रूपानें सांगत आलों आहें कीं, भारताचें प्रतीक हिमालय आहे तर महाराष्ट्राचें प्रतीक सह्याद्रि आहे. उंचउंच शिखरें असलेला बर्फाच्छादित हिमालय हें भारताचें प्रतीक आहे, तर दोनशें - दोनशें, तीनशें - तीनशें इंच पावसाचा मारा आपल्या डोक्यावर घेणारा काळ्या फत्तराचा सह्याद्रि आमचें प्रतीक आहे. आणि जर कधीं भारताच्या हिमालयावर संकट आलेंच तर आपल्या काळ्या फत्तराची छाती हिमालयाच्या रक्षणाकरतां महाराष्ट्राचा सह्याद्रि उभी करील असें मी आपणांला आश्वासन देऊ इच्छितो.

परिश्रम हा आजच्या काळाचा युगधर्म आहे आणि पंडितजी, आपण आग्रहपूर्वक आम्हांला परिश्रमाच्या घामानें महाराष्ट्र आणि राष्ट्र रचण्याचा आज संदेश दिला आहे. हा मोलाचा संदेश आम्ही आमच्या अंतःकरणावर कोरून ठेवूं आणि यापुढें प्रत्येक क्षणीं तुम्हीं दिलेले आशीर्वाद आणि तुम्हीं केलेलें मार्गदर्शन हे युगपुरुषाचे आशीर्वाद आणि युगपुरुषाचें मार्गदर्शन आहे ह्या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहण्याचा आम्ही प्रयत्न करूं.

आणि आतां आमच्या जुन्या परंपरांना अनुलक्षूनच दुरिताचें तिमिर जावो हें वरदान मी मागत आहें. ही आमची प्रार्थना ज्ञानेश्वरांनी आम्हांला शिकविलेली आहे. जें अमंगल असेल त्याचा अंधःकार दुनियेवरून नाहींसा होवो व सत्याचा विजय होवो, हें तत्त्वज्ञान आणि हे आशीर्वाद आम्हांला आमच्या संतांकडून मिळाले आहेत. समानतेचें तत्त्व त्यांनीं आम्हांला शिकविलें आहे

आणि अन्यायाचा प्रतिकार करावयालाहि त्यांनीं आम्हांला शिकवलें आहे. देशावर प्रेम करावें आणि स्वराज्य आपला मंत्र मानावा, हा संदेश आम्हांला आमच्या नेत्यांनीं दिलेला आहे. आणि या संदेशाच्या पार्श्वभूमीवर, महात्मा गांधींचे कर्तृत्व आणि महात्मा गांधींचें व्यक्तिमत्त्व यांतून आपणां सर्वांना मिळालेला दिव्य संदेश महाराष्ट्र कधींहि विसरणार नाहीं याची ग्वाही या परममंगल प्रसंगीं मी आपणांस देऊं इच्छितों.

महाराष्ट्र राज्यातर्फे, मराठी जनतेतर्फे आणि व्यक्तिशः माझ्यातर्फे मी राज्यपालजींचे आणि पंडितजींचे आभार मानतो. आणि हा नवोदित महाराष्ट्र असाच वाढत राहो, त्याचें तेज सतत वाढतें राहो आणि हें तेज भारताच्या आणि मानवाच्या कल्याणासाठीं खर्ची पडो अशी मी परमेश्वराकडे प्रार्थना करतों.

## सोनियाचा दिवस

आपल्या पंतप्रधानांच्या शुभहस्तें आज पहाटे नवराज्याचें उद्‌घाटन झालें व त्यानंतर आतां हा नुकताच समारंभ पार पडला. अशा रीतीनें एकभाषी महाराष्ट्र राज्य व त्याचें पहिलें सरकार अस्तित्वांत आलें.

सर्व मराठी बांधव एका राज्यांत यावेत अशी मराठी जनतेची फार दिवसांपासूनची इच्छा होती. कांहीं ऐतिहासिक घटनांमुळें मराठी लोक कित्येक शतकें निरनिराळ्या राज्यांत विभागले गेले होते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनें मराठी लोकांचें एकभाषी राज्याचें स्वप्न आज साकार होत आहे. ज्ञानेश्वरांनी एका वेगळ्या संदर्भांत म्हटल्याप्रमाणें हा खरोखरच "सोनियाचा दिवस" होय. अशा वेळीं मराठी लोकांच्या आनंदाला पारावार उरला नाहीं यांत कांहींच आश्चर्य नाहीं. गेल्या काहीं वर्षांत महाराष्ट्रांतील जनतेची जी विचलित अशी अवस्था झाली होती ती आतां संपून महाराष्ट्राला यापुढें स्थैर्याचे दिवस येतील अशी आशा करण्यास मुळींच हरकत नाहीं. त्यायोगें लोकांना आतां आपल्या विकासाच्या प्रश्नांकडे कटाक्षानें लक्ष देतां येईल व विकासकार्याच्या बाबतींत येणा-या निरनिराळ्या अडचणींना ते अधिक परिणामकारकपणें तोंड देऊं शकतील. त्याचबरोबर ज्या द्‌विभाषिक राज्याची आतांच समाप्ति झाली त्याच्या सुनियंत्रित राज्यकारभाराची परंपरा यापुढेंहि चालविण्याची दक्षता आपण घेतली पाहिजे व त्याची कीर्ति अबाधित राखली पाहिजे. तेव्हां या प्रसंगीं यापुढें आपल्याला कोणकोणतीं कामें करावयाचीं आहेत व त्यासाठीं आपण आपली मानसिक व इतर सर्व दृष्ट्या कशी तयारी करावयास हवी या गोष्टीची मनाशीं नीट उजळणी केली पाहिजे. आपण आज एका नव्या कालखंडांत प्रवेश करीत आहोंत व आपल्या

आशाआकांक्षांचीं पूर्तता करून घेण्याचा क्षण आतां आला अशी जनतेची भावना आहे. नव्या महाराष्ट्र राज्याच्या जन्मानें आपल्याला भरभराटीचे व सुखाचे दिवस येतील ही सामान्य जनतेची अपेक्षा योग्य अशीच आहे. हा जनतेच्या अपेक्षापूर्तीचा क्षण जवळ आणणें हा महाराष्ट्र राज्याचा मी मानबिंदु मानतों. त्याचबरोबर नव्या राज्यांत शासनाच्या द्वारें लोकांची अधिक कार्यक्षम रीतीनें सेवा घडेल अशा प्रकारें शासनयंत्रणेची पुनर्घटना व सुधारणा करण्यासहि आतांच चालना मिळाली पाहिजे.

आपल्यापुढें जे मूलभूत, आर्थिक व सामाजिक प्रश्न आहेत त्यांची योग्य ती उकल करावयाची असेल तर त्या प्रश्नांचा अखिल भारतीय संदर्भ आम्हांस विसरतां येत नाहीं, आणि म्हणून महाराष्ट्राचे नागरिक हे प्रथम भारताचे नागरिक आहेत व नंतर ते महाराष्ट्रीय आहेत याची जाणीव आम्ही सतत ठेवूं.

आतां महाराष्ट्र राज्यापुरतें बोलावयाचें म्हणजे महाराष्ट्रांतील लोकांनी त्यांचा धर्म, जात अगर पक्ष कोणता कां असेना, आपण सर्व एकच बांधव आहोंत असें मानलें पाहिजे. नवा महाराष्ट्रीय हा केवळ मराठी भाषा बोलणारा नव्हे, तर तो महाराष्ट्रात राहतो व आपल्या शक्तीनुसार त्याचें जीवन समृद्ध करतो असा प्रत्येक माणूस हा महाराष्ट्रीयच होय.

मी मघां म्हटल्याप्रमाणें आपली शासनयंत्रणा ही बदलत्या कालमानास सुसंवादी अशी असली पाहिजे. समाजवादी पद्धतीनें नियोजन करण्यास आज आपण बद्धपरिकर आहोंत. आपली शासनयंत्रणा ही अशा प्रकारच्या नियोजनास पूर्णपणे मिळतीजुळती अशीच असली पाहिजे, हें लक्षांत घेऊन सचिवालयसंघटनेची सुसंबद्ध अशा प्रकारें पुनर्रचना करण्यांत आली आहे. नव्या महाराष्ट्र राज्याचीं बारा खातीं असतील. या खात्यांचे अशा रीतीनें गट करण्यांत आले आहेत कीं, शक्य तों सर्व संबंधित बाबी एकाच खात्याकडे राहून निर्णय त्वरित घेतां येतील व खात्याखात्यांतील पत्रव्यवहार अवास्तव वाढणार नाहीं. ग्रामीण भागांतील सहकारी चळवळ आणि ग्रामपंचायतींचें कार्य हें परस्परांवर अवलंबून असल्याकारणानें त्यांचा एका वेगळ्या खात्यांत समावेश करण्यांत आला असून या खात्यास 'सहकार व ग्रामीण विकास खातें' असें नांव दिलें आहे. त्याचप्रमाणें सध्यांच्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कामाचें वर्गीकरण करून 'इमारती व दळणवळण' आणि 'पाटबंधारे व वीज' असे त्याचे जे दोन सुस्पष्ट वर्ग पडतात त्यांनुसार हीं दोन वेगळीं खातीं करण्यांत आलीं आहेत.

विदर्भ, मराठवाडा, कोंकण व दुष्काळी भाग यांच्या विकासाकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येईल व

महाराष्ट्र राज्याचें सरकार त्यांचे हितसंबंध डोळ्यांत तेल घालून जपेल असें जें आश्वासन मीं दिलें होतें त्याचा मी या ऐतिहासिक प्रसंगीं पुनरुच्चार करतों. त्याचप्रमाणे मुंबईच्या नागरिकांनाच केवळ नव्हे तर इतर सर्व संबंधितांना मी असें पुन्हा आश्वासन देतों कीं, या शहराचें बहुरंगी नव्या राज्याचें सरकार सतत प्रयत्न करील. तसेंच, नागपूर शहरांचे महत्त्व टिकविण्याचाच नव्हे तर तें वाढविण्याचा सरकारचा कटाक्ष राहील.

आपल्या पंचवार्षिक योजनेचा सर्व भर ग्रामीण भागांची सुधारणा करण्यावर देण्यांत आलेला आहे. ग्रामीण भागांत पुन्हा नवचैतन्य निर्माण करण्याच्या ध्येयास सरकार बांधलेलें आहे. या दृष्टीनें शेतीच्या उत्पादनपद्धतीचें आधुनिकीकरण करणें आणि ग्रामीण विभागांमध्यें विजेचा प्रसार करणें, छोट्या उद्योगधंद्यांच्या वाढीस जोराची चालना देणें या कार्यक्रमांना अग्रहक्क देण्यांत येईल. शेतीसंबंधित उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत सहकारी पद्धतीस प्राधान्य देण्याबाबत या शासनाचा आग्रह राहील.

शिक्षणाच्या बाबतींत, माध्यमिक शिक्षणांत व्यावसायिक बाजूवर विशेष भर देण्यांत येईल. हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या बाबतींत कोणत्याहि प्रकारें अडचणी येऊं नयेत म्हणून शिष्यवृत्त्या वगैरे मार्गांनी सर्व प्रकारें साहाय्य करण्यांत येईल. त्याचप्रमाणे विदर्भ व मराठवाडा या भागांत सध्यां ज्या शैक्षणिक सवलती चालू आहेत त्यांत कपात करावयाची नाहीं असें सरकारचें धोरण राहील.

राज्यकारभार इंग्रजीच्या ऐवजी आतां मराठींत चालविणें कसें इष्ट व निकडीचें आहे याची सरकारला पूर्ण जाणीव आहे. हा बदल कारभारांतील कार्यक्षमतेस बाधा न येऊं देतां करावयाचा आहे. या कार्यास चालना मिळावी म्हणून सरकार 'डायरेक्टोरेट ऑफ लँग्वेजेस' अशा नांवाचें एक खातें ताबडतोब सुरू करीत आहे. त्याचप्रमाणें मराठी साहित्य व इतर क्षेत्रांतील महत्त्वाचे संशोधनकार्य यांना उत्तेजन देण्याचाहि सरकारचा इरादा आहे.

लोक कोणत्या भागांत राहत आहेत, त्यांची भाषा कोणती आहे किंवा त्यांचा धर्म कोणता आहे अशा विचारास यत्किंचितहि थारा न देतां सर्व वर्गाच्या व सर्व जातींच्या लोकांना समान न्याय व समान संधि प्राप्त करून देणें असेंच सरकारचें नेहमीं धोरण राहील. केवळ ऐतिहासिक परंपरेमुळें म्हणा, अगर परिस्थितीमुळें म्हणा, सुसंस्कृत जीवन जगणें ज्यांना अशक्य झालेलें आहे अशा दलितवर्गाची स्थिति सुधारण्याचा सरकार सातत्यानें प्रयत्न करील. नवबौद्धांच्या सवलतींच्या प्रश्नाचा मी येथें खास उल्लेख करूं इच्छितो. धर्मांतरामुळें त्यांच्या कांहीं अडचणी वाढलेल्या आहेत याची मला जाणीव आहे. सामाजिक वा आर्थिक दृष्ट्या जे दुर्बल आहेत त्यांना साहाय्य

करण्याच्या आपल्या धोरणानुसार सरकार नवबौद्धांना सर्व बाबतींत हरिजनांच्या बरोबरीचे समजेल. अर्थात् जेथें असें करणें राज्यघटनेशीं विसंगत होईल त्या बाबी याला अपवाद असतील.
तसेंच गांधीवधानंतर झालेल्या दंगलींत ज्यांची हानि झाली त्यांना दिलेल्या कर्जापैकीं त्यांच्याकडे अद्याप येणें असलेली सर्व बाकी सूट देण्याचा निर्णय सरकारनें महाराष्ट्र राज्य उद्घाटनाच्या या प्रसंगीं घेतला आहे.

आपले राज्य हें उद्योगधंद्यांच्या बाबतींत भारतांत सर्वांच्या आघाडीवर आहे. यामुळें राज्यांतील उद्योगधंद्यांचा केवळ राज्याच्याच नव्हे तर सर्व देशाच्या अर्थव्यवस्थेवर भलाबुरा परिणाम होतो. उद्योगधंद्यांचा पाया बळकट असल्याखेरीज आपल्या पंचवार्षिक योजना पूर्णपणें यशस्वी होऊं शकणार नाहींत. तेव्हां अशा परिस्थितींत औद्योगीकरणाची गति ज्यामुळें रोखली जाईल व राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होईल असें कांहींहि न करणें हें प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य ठरतें. उत्पादन सारखें होत राहण्यासाठीं व त्यांत वाढ होण्यासाठी उद्योगधंद्यांचा कारभार सुरळित चालला पाहिजे. मालक व कामगार यांचे संबंध सलोख्याचे राहिले पाहिजेत. थोडक्यांत म्हणजे औद्योगिक आघाडीवर शांतता नांदली पाहिजे. उद्योगधंद्यांत जर सतत कलहाचें वातावरण राहील तर उत्पादन चालू ठेवणेंच मुष्कील होईल, मग वाढविण्याची गोष्ट तर सोडाच. तेव्हां मालक व कामगार या दोघांसहि न्याय्य होईल व सबंध समाजाचेंहि ज्यानें हित होईल अशी औद्योगिक संधि निदान पांच ते दहा वर्षे राहणें आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे. कारण अशा परिस्थितींतच उत्पादनाची वाढ निर्विघ्नपणें होत राहील. मालक व कामगार हे दोघेहि जेव्हां समाजाच्या बाबतींतील आपली जबाबदारी ओळखतील तेव्हांच हें साध्य करतां येईल. अशा प्रकारची औद्योगिक संधि घडवून आणण्यासाठीं मालक व कामगार यांच्या प्रतिनिधींची एक परिषद भरविण्याचा सरकारचा मानस आहे.

देशाच्या स्वातंत्र्यासाठीं ज्या थोर नेत्यांनीं अखंड सायास केले व आपले प्राण खर्ची घातले आणि अशा रीतीनें ज्या स्वराज्याचीं फळें, त्यांची स्मृति आज या महान् प्रसंगीं करून या नेत्यांना व विशेषतः राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आपण श्रद्धांजलि वाहू या. कार्यनिष्ठा व जनतेची सेवा हीं जीं उदात्त ध्येयें त्यांनीं आपल्यापुढें ठेविलीं तीं गांठण्याचा सतत प्रयत्न करूनच आपण त्यांच्या स्मृतीचा खरा आदर करूं.

महाराष्ट्राची ही भूमि अनेक संत, पराक्रमी वीर, त्यागी समाजसुधारक व विद्वान देशभक्त यांच्या वास्तव्यानें पुनीत झालेली आहे. संत ज्ञानेश्वर, छत्रपति शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व लोकमान्य टिळक हीं आमची प्रातिनिधिक प्रतीकें आहेत. त्यांनींच महाराष्ट्राच्या संस्कृतीची

जोपासना केली व तिचा वारसा आपल्या हातीं दिला. हा अमोल ठेवा आपल्या हृदयांत जपून ठेवणें व त्याचा विकास करणें हें प्रत्येक मराठी माणसाचें आद्य कर्तव्य ठरतें. आज आपलें मराठी भाषी राज्य स्थापन होत असतांना, आपल्या देशाची भरभराट करण्यास व त्याची कीर्ति दिगंत पसरविण्यास आपलें शक्तिसर्वस्व देऊं अशी आपल्यापैकीं प्रत्येकानें प्रतिज्ञा केली पाहिजे. महाराष्ट्राची व भारताची सेवा करण्याचें व्रत आज आपण घेऊं या व आपलें ध्येय गांठण्याकरीतां शक्ति व बुद्धि दे अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करूं या.

नवीं क्षितिजें

... महाराष्ट्राच्या भवितव्याची ही मोठीच मोठी, लांबच लांब सफर आहे... त्या सफरींतील आम्ही प्रवासी आहोंत... ही सफर तुम्हाआम्हांला पुरी करावयाची आहे... ती सफर आज मला माझ्या डोळ्यांसमोर दिसते आहे, विजेच्या प्रकाशानें लखलखल्यासारखी मला दिसते आहे... ती लांबची सफर आहे, कष्टाची सफर आहे, उद्योगाची सफर आहे... पण ती पुरी केलीच पाहिजे... कारण त्यांत जनतेचें कल्याण आहे...

## अविकसित देशांचा आर्थिक विकास

आज आपणांसारख्या नामवंत अर्थशास्त्रज्ञांच्या मेळाव्यापुढें भाषण करण्याची मला संधि मिळाली ही माझ्या दृष्टीनें अत्यंत आनंदाची आणि भाग्याची गोष्ट आहे. माझ्या भाषणास सुरुवात करण्यापूर्वी आपणां सर्वांचे महाराष्ट्र राज्यांत आणि इतिहासप्रसिद्ध अशा या पुणें शहरांत मी मोठ्या आनंदानें स्वागत करतों.

शास्त्रांतील प्रगति व दळणवळणांत झालेली वाढ यामुळें अंतरासंबंधींच्या आपल्या कल्पना आज भराभर बदलत असून जग जणुं काय संकोच पावत आहे असें वाटतें. अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनांतून पाहतां, देशाची आर्थिक व राष्ट्रीय एकात्मता घडून येण्यास यामुळें चांगलीच मदत झाली आहे. एवढेंच नव्हे, तर मानवजातीचें हित चिंतणा-या प्रत्येक माणसापुढें जगाच्या आर्थिक क्षेत्रांत एकात्मता निर्माण करण्याचें जें स्वप्न आहें तें साकार करण्यासहि त्यामुळें एका अर्थानें जोराची चालना मिळाली आहे.

आजच्या परिसंवादांत 'आर्थिक विकासाचे मार्ग' हा जो विषय चर्चेसाठीं ठेवण्यांत आला आहे

त्याचा आपल्या या ध्येयाशीं अगदीं निकटचा संबंध आहे. आपल्यापुढील या विषयांतच सूचित झाल्याप्रमाणें देशांतल्या देशांत आणि त्याचप्रमाणें जगांतील प्रगत व अविकसित राष्ट्रें यांच्यामध्यें समतोल आर्थिक विकास घडवून आणण्याचें अनेक आर्थिक मार्ग व पद्धति असून समतोल विकासाचें आपलें उद्दिष्ट साध्य करण्याकरितां आपल्याला त्यांचा अवलंब करतां येईल. या सर्व मार्गांचा व पद्धतींचा सखोल अभ्यास करून त्यांतून आपल्या उद्दिष्टाच्या दृष्टिनें कांहीं निश्‍चित स्वरूपाचे निष्कर्ष काढणें हें आपणांसारख्या तज्ज्ञांचे काम आहे. तथापि, आर्थिक क्षेत्रांत आज आमच्यासमोर असलेल्या प्रश्नांबाबत मी माझे कांही विचार आपल्या परवानगीनें आपल्यापुढें मांडतों.

आर्थिक विकासासंबंधी मी जेव्हां विचार करतों तेव्हां माझ्या मनांत पहिल्यानें आणि प्रामुख्यानें कोणता विचार येत असेल तर तो हा कीं, सबंध जगांतच उत्पन्नाच्या आणि सुखसोयींच्या प्रमाणांत फार मोठी विषमता आहे. ही विषमता त्या त्या देशांतील कांहीं वर्गांपुरतीच मर्यादित आहे असें नाहीं. जगांतील बहुसंख्य देश आज अविकसित असून समृद्ध व आर्थिक दृष्ट्या प्रगत असलेले देश मात्र आपल्याला कांहीं खास हक्क आहेत अशा समजुतीनें वागत असल्याचें आपणांस आढळून येतें. आज वस्तुस्थिति अशी आहे कीं, हे सधन देश अधिक सधन व अधिक प्रगत होत असून गरीब देशांचा विकास त्यांच्या वाढत्या लोकसंख्येंमुळें एक तर थांबला आहे किंवा तो अतिशय मंद गतीनें होत आहे. प्रगत आणि अविकसित देशांमध्यें ही जी विषमता आहे ती कमी करण्याच्या दृष्टीनें उपाय शोधून काढणें हीच आजची खरी गरज आहे.

आर्थिक विकासाच्या अंगोपांगांची चर्चा होणें आज आवश्यक आहे. विशेषतः आर्थिक आघाडीवर जलद प्रगति करण्याचा ज्या देशांनीं निर्धार केला आहे त्यांच्या बाबतींत तर अशा चर्चेची अधिकच आवश्यकता आहे. अर्थशास्त्रज्ञ या नात्यानें आपणांस याची जाणीव असल्याचें या परिसंवादांत चर्चेस येणा-या विषयांकडे पाहिलें कीं दिसून येतें. या संदर्भांत मला असें म्हणावेंसे वाटतें कीं, एखाद्या देशाची आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय पद्धति कोणती कां असेना, आर्थिक विकासांतील नियोजनाचें महत्त्व त्या देशाला कळलें नसेल तर त्याला आर्थिक क्षेत्रांत प्रगति करणें फार अवघड जाईल. वस्तुस्थितीचा विचार करतां असें म्हणणें चुकीचें होईल असें मला वाटत नाहीं. या दृष्टिकोनाची अविकसित राष्ट्रांना तर अधिकच जरुरी आहे. या बाबतींत भारत खरोखरच सुदैवी म्हटला पाहिजे. दोन पंचवार्षिक योजना यशस्वी रीतीनें पार पाडून तिस-या पंचवार्षिक योजनेच्या उंबरठ्यावर आतां तो उभा आहे. भारतासारख्या अविकसित देशाला आर्थिक नियोजनाचें हें कार्य प्रचंड स्वरूपाचें वाटत असलें तरी नियोजनाची आंखणी व अंमलबजावणी करण्याचें कार्य ज्यांनीं अंगावर घेतलें आहे त्यांच्या दृष्टीनें तो एक प्रकारचा रोमहर्षक असाच अनुभव आहे.

आपण ज्या प्रश्नांची येथें चर्चा करणार आहांत त्यांपैकीं कांहीं प्रश्न, विशेषतः शेती, मनुष्यबळ, नागरीकरण व औद्योगीकरण हे प्रश्न आमच्या देशाच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचे व जिव्हाळ्याचे आहेत. आमच्या योजनांची अंमलबाजवणी करीत असतांना आमच्यापुढें उभा असलेला मुख्य प्रश्न म्हणजे अन्नधान्याचें अपुरें उत्पादन व जमिनीवर पडणारा वाढता ताण हा आहे. शेतीची उत्पादनक्षमता व शेतमालाचें उत्पादन वाढविण्यासाठीं उपाययोजना करीत असतांना, जमीनविषयक सुधारणांच्या द्वारा, सामाजिक व आर्थिक समस्या सोडविण्याचेहि आम्हीं प्रयत्न केले आहेत. ग्रामीण विभागांतील बहुसंख्य जनतेच्या दृष्टीनें हे बदल अतिशय महत्त्वाचे व दूरगामी स्वरूपाचे आहेत. या राज्यापुरतें बोलावयाचे झालें तर जमीनधारणेवर आम्ही लवकरच मर्यादा घालणार आहोंत. भारताच्या इतर भागांतहि हें तत्त्व स्वीकारण्यांत येत आहे. तथापि, केवळ या उपाययोजनेमुळें अन्नधान्याचा प्रश्न सुटणार नाहीं, किंवा जमिनीबाबतच्या भुकेचाहि प्रश्न सुटणार नाहीं, असें खोल विचारांतीं माझें मत झालें आहे. कारण अशा प्रकारें उपलब्ध होणारी जमीन ग्रामीण भागांतील बेकार भूमिहीन लोकांचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें अगदींच अपुरी पडणार आहे. त्याचप्रमाणें ग्रामीण भागांतील लोकांनी शहरांकडे धाव घेण्यानेंहि जमिनीवरील ताण कमी होणार नाहीं. कारण त्यासाठीं ग्रामीण भागांतून शहरांत येणा-या लोकांना कामधंदा मिळून त्यांच्यासाठीं पुरेशा सुखसोयी प्रथम उपलब्ध झाल्या पाहिजेत. माझ्या मतें अशा परिस्थितींतून बाहेर पडण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे भारतांत कृषि-उद्योगांचा विकास करणें हा होय. इतकेंच नव्हे तर जेथें अशीच परिस्थिती आहे अशा इतर सर्व अविकसित देशांनाहि याच मार्गाचा अवलंब करावा लागेल. म्हणून आपल्यापुढें चर्चेसाठी येणारे जमीनसुधारणा, शहरांतील लोकसंख्येची वाढ आणि औद्योगीकरण हे प्रश्न आमच्या दृष्टिनें अतिशय जिव्हाळ्याचे आहेत. पहिल्या दोन पंचवार्षिक योजना पार पाडून आम्हीं आमच्या अगतिक झालेल्या अर्थव्यवस्थेत विकासाची प्रेरणा निर्माण केली आहे; आणि आतां तिस-या पंचवार्षिक योजनेच्या दाराशीं आम्ही आलों असून तिस-या योजनेचा काल हा प्रत्यक्ष 'उड्डाणा'चा काल आहे असें आम्ही मानतों.

भारतासारख्या अविकसित देशांत आर्थिक नियोजनाच्या बाबतींत शासनाकडून हस्तक्षेप होतो अशी जी टीका करण्यांत येते त्या टीकेचा मला येथें उल्लेख करावासा वाटतो. या टीकाकारांना मला अशी विनंती करावीशी वाटते कीं, त्यांनीं जगांतल्या अविकसित देशांची अर्थव्यवस्था कशी अगतिक झाली व त्यामुळें त्या देशांत कशी मेटाकुटीची परिस्थिति निर्माण झाली तें ध्यानांत घ्यावें. या देशांतील लोकांच्या गरजा भागणें मुष्किल होऊन बसल्यामुळें साहजिकपणेंच आपापल्या प्रदेशांची झटपट सुधारणा व्हावी अशी निकडीची मागणी आज ते करीत आहेत. उदाहरणार्थ, आज तांत्रिक प्रगतीच्या पोटीं जी प्रचंड शक्ति निर्माण झाली आहे तिचा पुरेपूर उपयोग करून

घ्यावयाचा झाल्यास उद्योगधंद्यांच्या योजना फार मोठ्या प्रमाणावर आंखाव्या लागतील व हें काम खाजगी भांडवलवाल्यांना जमण्यासारखें नाहीं. विशेषतः कांहीं विशिष्ट सामाजिक उद्दिष्टें साध्य करावयाचीं झाल्यास तर हें अधिकच खरें आहे. त्याचप्रमाणें ज्या देशांची अर्थव्यवस्था अगतिक किंवा मागासलेली आहे तेथें जलद विकास घडवून आणावयाचा असल्यास, निदान सुरुवातीस तरी, निरनिराळ्या उद्योगधंद्यांची समतोल अशी वाढ करण्याकडे विशेष लक्ष देणें आवश्यक असतें. अशा ठिकाणीं अनियंत्रित आर्थिक स्वातंत्र्याच्या तत्त्वावर आर्थिक विकास होऊं दिला तर उद्योगधंद्यांची विषम वाढ होईल व त्यामुळें आर्थिक प्रगतीचा मार्ग पुन्हा रोखला जाईल.

या संदर्भात दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती म्हणजे युरोपांत अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत झालेल्या औद्योगिक क्रांतीच्या मार्गानें जाणे अविकसित देशांना शक्य होणार नाहीं. त्या देशांत औद्योगिक क्रांतीमुळें उद्योगधंद्यांत जो प्रचंड नफा झाला, त्यावर नियंत्रण ठेवणारा कोणताहि सामाजिक कायदा त्या वेळीं अस्तित्वांत नसल्यामुळें उत्पन्नाच्या वांटणींत विषमता निर्माण झाली. तथापि हा नफा पुन्हा उद्योगधंद्यांत गुंतवून उत्पादन व त्याचबरोबर आपला नफा वाढवीत राहणें त्यांना शक्य झालें. याच्या उलट अविकसित देशांना आपले औद्योगिक आणि विकासविषयक कार्यक्रम अशा त-हेच्या वर्षानुवर्षे सांठलेल्या शिलकी भांडवलाच्या आधाराशिवाय सुरू करावयाचे आहेत, आणि त्याचबरोबर मागासलेली अर्थव्यवस्था व दारिद्य्र यांमधून एकदम कल्याणकारी राज्याची सुरुवात करावयाची आहे. याचाच अर्थ असा कीं, औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांना लोकांचें जीवनमान वाढविण्यास जो विलंब लागला तो टाळून अविकसित राष्ट्रांना एकदम आघाडी गाठावयाची आहे.

अविकसित देशांत भांडवलाचा संचय कसा करावयाचा हा असाच एक यक्षप्रश्न आहे. कांही वेळां असें सुचविलें जातें की, मनुष्यबळ ही अविकसित देशांची सर्वांत मोठी संपत्ति असून आर्थिक विकासाकरता लागणा-या भांडवलाऐवजीं या सुप्त संपत्तीचा पूर्णपणें जरी नाहीं तरी अंशतः उपयोग करतां येईल. असें केल्यास रोजगारी वाढून ग्राहकशक्तींत वाढ होईल, परंतु उत्पादनाची पातळी स्थिर राहिल्यामुळें अशा परिस्थितींत जनतेचें जीवनमान कसें वाढवावें ही अडचण शिल्लकच राहील.

जगांतील अविकसित देशांपुढे असलेल्या या सर्व अडचणींत आणखी एका अडचणींची भर पडली आहे. ती म्हणजे या देशांतील लोकांत सामाजिक दृष्टिकोन व जीवनप्रवृत्ति यांत फार मोठी तफावत पडल्यामुळें, देशाच्या आर्थिक प्रगतीच्या आणि सामाजिक व राजकीय ऐक्याच्या

मार्गातील ती एक धोंड ठरली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठीं कोणती उपाययोजना करावी हा प्रश्न या अविकसित देशांना गेलीं अनेक वर्षे भेडसावीत आहे. आतां हे देश लोकांच्या राहणीच्या मानांत कमींत कमी काळांत वाढ करण्याच्या विचारांनीं प्रेरित झाले असल्यामुळें, आर्थिक विकासाचें काम सर्वस्वीं खाजगी क्षेत्राच्या हातीं ते सोंपवूं शकत नाहींत.

मात्र याचा अर्थ असा नाहीं कीं, आर्थिक विकासाची गति वाढावी म्हणून अविकसित देशांत हुकूमशाही कारभार वा सांचेबंद राज्यव्यवस्था चालू करावी. मला जें कांही निक्षून सांगावयाचें आहे तें हें कीं, अविकसित देशांत मोठ्या प्रमाणांवर उद्योगधंदे वा औद्योगिक प्रकल्प सुरू करण्यांत किंवा त्याची वाढ करण्यांत शासनानेच पुढाकार घेण्याची आवश्यकता असते.
तुलनात्मक दृष्ट्या अविकसित असलेल्या देशांचा त्वरित आर्थिक विकास होणें हें प्रगत देशांच्याहि हिताचें आहे हें सांगण्याची गरज नाहीं. शिवाय एखाद्या भागाची अर्थव्यस्था अगतिक व मागासलेली असणें हें आर्थिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांच्या दृष्टीनेंहि धोकादायक असतें.

या परिसंवादांत निरनिराळ्या प्रश्नांसंबंधीं अर्थशास्त्राच्या तात्त्विक भूमिकेवरून चर्चा करतांना आपल्या सर्व आर्थिक व्यवहारांच्या बुडाशीं असलेली मानवी बाजू आपण नजरेआड होऊं देणार नाहीं, अशी मला खात्री आहे. या बाबतींत मार्गदर्शन करण्याचें काम जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांचें प्रतिनिधित्व करणा-या आपणांसारख्या तज्ज्ञांचें व मानवतावाद्यांचे आहे. शेवटीं अर्थशास्त्र हें एक सामाजिक शास्त्रच आहे. तेव्हां आपण कोणताहि मार्ग अनुसरला तरी समाजाचें हित हेंच या शास्त्राचें अंतिम साध्य असलें पाहिजे.

माझें भाषण संपविण्यापूर्वी आपणांसारख्या मान्यवर तज्ज्ञांच्या मेळाव्यांत उपस्थित राहण्याची आपण मला संधि दिलीत त्याबद्दल मी आपले आभार मानतों. या परिसंवादांत पुष्कळच उपयुक्त चर्चा होईल याबद्दल मला खात्री आहे. आपल्या कार्यक्रमपत्रिकेवरून आपणांसाठीं कांही सांस्कृतिक कार्यक्रम ठेवण्यांत आला असून पुण्याच्या आसपासच्या काही प्रेक्षणीय स्थळांनाहि आपण भेट देणार आहांत. परिषदेसाठीं मुद्दाम बाहेरून आलेल्या पाहुण्यांना या कार्यक्रमामुळें आमच्या देशाच्या सांस्कृतिक परंपरेचें ओझरतें दर्शन होईल अशी मला खात्री वाटते.

परिसंवादाचें उद्घाटन झाल्याचें मी जाहीर करतों व तो यशस्वी होवो अशी शुभेच्छा व्यक्त करतों.

## विधायक कर्तृत्वास आव्हान

नव्या महाराष्ट्र राज्यासमोर असलेल्या आर्थिक, सामजिक आणि इतर समस्यांची चर्चा करण्याकरतां हा परिसंवाद घडवून आणल्याबद्दल इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम व साधना साप्ताहिक यांचें मी अभिनंदन करतों.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठीं, मराठी भाषिक जनतेनें राजकीय क्षेत्रांत दीर्घकाळपर्यंत उराशीं बाळगलेली एक आकांक्षा फलद्रूप झाली आहे. मराठी भाषिक प्रदेशांत सर्वत्र जे उत्स्फूर्त उत्सवसमारंभ साजरे झाले त्यावरून समाजाच्या सर्व थरांतील लोकांनीं या राज्याचें किती उत्साहानें स्वागत केलें आहे तें दिसून आलें. महाराष्ट्रांत राहणा-या पण मराठी मातृभाषा नसलेल्या लोकांनींहि या नव्या राज्याचें तितक्याच उत्साहानें स्वागत केलें आहे. हे आनंदोत्सव व समारंभ-सोहळे आतां संपले असून महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेबरोबर आलेल्या महत्त्वाच्या समस्यांचा विचार आपल्याला आतां करावयास पाहिजे.

माझ्यापुरतें बोलावयाचें झालें तर मला असें सांगावेंसें वाटतें कीं, नव्या महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेमुळें मराठी भाषिक जनतेची एक दीर्घकालीन आकांक्षाच फलद्रूप झाली आहे एवढेंच नाहीं, तर महाराष्ट्र राज्यांतील लोकांच्या मुत्सद्देगिरीस व विधायक विचारास त्यामुळें एक महान संधि उपलब्ध झाली आहे; नव्हें - एक प्रकारें आव्हानच दिलें गेलें आहे.

खरोखर सर्व वर्गांच्या व सर्व थरांतील लोकांना हें एक आव्हानच आहे. शेतकरी व शेतमजूर, उद्योगपति व औद्योगिक कामगार, व्यावसायिक व बुद्धिजीवी वर्ग, व्यापारी व श्रमजीवी समाज या सर्वांनाच हें आव्हान आहे. वस्तुतः ज्यांना व्यावसायिक किंवा बुद्धिजीवी वर्ग म्हणून ओळखलें जातें त्यांच्यावर तर या बाबतींत विशेष जबाबदारी आहे. सार्वजनिक धोरणासंबंधींच्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांबाबत नेतृत्व करणें हा त्यांचा अधिकार आहे, तें त्यांचें कर्तव्यच आहे. समाजांतील इतर लोकांना शिक्षण व अनुभव यांचा जो फायदा मिळाला नाहीं तो त्यांना मिळाला आहे. तेव्हां बुद्धिजीवी वर्गानें पुढाकार घेऊन आज आपल्यासमोर जे महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांची सांगोपांग चर्चा केली पाहिजे, त्यासंबंधीं विशिष्ट दृष्टिकोन बनविले पाहिजेत आणि जनमत तयार केलें पाहिजे.

महाराष्ट्र राज्यामध्यें आम्ही जें काम करणार आहोंत त्याची दिशा अगदी स्पष्ट आहे. राष्ट्रीय ऐक्यास पोषक होईल अशा त-हेनेंच आपणांस महाराष्ट्र राज्यांतील सर्व वर्गांचा विकास व उन्नति

घडवून आणावयाची आहे. सामाजिक एकात्मतेच्या बाबतींत आपले कांही खास प्रश्न असून ते सोडविण्यासाठीं आपण योग्य ते उपाय शोधून काढले पाहिजेत. नव्या राज्यामधले कांही प्रदेश आर्थिक दृष्ट्या अविकसित व मागासलेले आहेत. स्वाभाविकपणेंच त्यांचा विकास ही महाराष्ट्र सरकारच्या दृष्टीनें खास विचाराची बाब आहे. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विभागांव्यतिरिक्त, राज्यांतील कांहीं वर्गहि मागासलेले आहेत. त्यांच्या प्रगतीसाठीं सुद्धां आपणांस विशेष प्रयत्न केले पाहिजेत. या मागासलेल्या वर्गात केवळ सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या लोकांचाच नव्हे तर आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या लोकांचाहि मी समावेश करतों. समान संधि ही सामाजिक न्यायाच्या कल्पनेंतील महत्त्वाची बाब आहे. आणि म्हणून बुद्धि असूनहि केवळ पैशाच्या अभावामुळें तिला वाव मिळत नाहीं असें होतां कामा नये. महाराष्ट्रात अशा प्रकारें सर्वांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळेल अशी परिस्थिति निर्माण करण्यासाठीं आपण झटलें पाहिजे.

सामाजिक एकात्मतेचा हा एक प्रश्न झाला. त्याशिवाय महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासाचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आपल्यापुढें आहे. मुंबई विभाग हा देशामध्यें उद्योगधंद्यांच्या बाबतींत आघाडीवर असल्यामुळें, भारतीय संघराज्यांतील औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाच्या राज्यांमध्यें महाराष्ट्र राज्याची गणना होते. साहजिकच नव्या नव्या औद्योगिक उपक्रमांना चालना देऊन लोकांना अधिकाधिक रोजगार उपलब्ध करून देणें हें या नव्या राज्याच्या धोरणांचें एक महत्त्वाचें अंग राहील. नवीन औद्योगिक उपक्रम सुरू करण्याच्या बाबतींत आपल्याला पुष्कळच गोष्टींची अनुकूलता असल्याकारणानें उद्योगधंद्यांची वाढ करण्याचा आणि तीसुद्धां द्रुतगतीनें करण्याचा आमचा निर्धार आहे. म्हणून चालू उद्योगधंद्यांच्या विकासासाठीं आणि नवीन उद्योगधंद्यांच्या स्थापनेसाठीं सर्व प्रकारच्या आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून देणें हें या राज्याचें महत्त्वाचें कार्य राहील. पाणीपुरवठा, दळणवळणाचीं साधनें इत्यादि सोयी त्वरित मिळूं शकतील अशा ठिकाणीं नवीन उद्योगधंद्यांसाठी औद्योगिक वसाहती व औद्योगिक विभाग स्थापन करण्याचा आमचा मानस आहे. विद्युत्शक्तीची वाढ करण्याच्या दृष्टीनें प्रयत्न होत आहेत. ऑक्टोबर १९६१ मध्यें कोयनेची वीज मिळण्यास प्रारंभ होईल असा अंदाज आहे. त्यानंतर ठराविक टप्प्यांनीं या योजनेंतून आणखी वीजपुरवठा होत राहील. त्यामुळें विजेच्या बाबतींत या भागांतल्या परिस्थितींत पुष्कळच सुधारणा होईल. उद्योगधंदे व त्यांतून निर्माण होणारा रोजगार यांची वाढ करीत असतांना सामाजिक न्यायाकडे आपणांस दुर्लक्ष करतां येणार नाहीं. विकास व सामाजिक न्याय या गोष्टी परस्परविरोधी नाहींत. उद्योगधंद्यांची वाढ व कामगारांना न्याय या दोन्ही गोष्टी बरोबरच साध्य होऊं शकतात, नव्हे साध्य झाल्या पाहिजेत. एका बाजूनें उद्योगपतींनीं ख-या अर्थानें आपल्या धंद्यांत भागीदार असलेल्या कामगारांचे न्याय्य हक्क मान्य केले पाहिजेत आणि दुस-या बाजूनें औद्योगिक कामगारांनीं शिस्तीचें महत्त्व ओळखलें पाहिजे, व उत्पादनक्षमता व वेतनाचें प्रमाण यांमधील अपरिहार्य असलेले संबंध ध्यानांत घेतले पाहिजेत. आपल्या राज्यांत

औद्योगिक संधि घडवून आणण्याची नितांत आवश्यकता असून त्यासंबंधी अलीकडे मी अनेकवार बोललों असल्याचें आपणां सर्वांना विदित आहेच. अशा प्रकारच्या संधीचा तपशील ठरविण्यासाठीं व त्याच्या अंमलबजावणीची व्यवस्था करण्यासाठीं पुष्कळच विचारविनिमय करावा लागेल. परंतु यामागील हेतु मात्र अगदीं स्पष्ट आहे व तो म्हणजे औद्योगिक वाढ व उत्पादनक्षमता यांचा सामाजिक न्यायाशीं मेळ घालणें हा होय. या कल्पनेला आकार व मूर्त स्वरूप देण्याच्या कामीं, आपल्या परिसंवादांत जी माहिती उपलब्ध होईल व जे विचार पुढें येतील त्यांचें बहुमोल साहाय्य होणार आहे.

उद्योगधंद्यांबरोबरच शेतीचा प्रश्नहि आपल्यासमोर प्रामुख्यानें आहे. कारण देशांतील इतर भागांप्रमाणें आपल्या राज्यांतहि शेतीचें क्षेत्र विस्तीर्ण असून लोकसंख्येच्या दोन तृतीयांश लोक शेतीवर अवलंबून आहेत. शेतीच्या क्षेत्रांतील अनेक प्रश्न आपणांस सोडवावयाचे आहेत. शक्य असेल तेथें पाटबंधारे बांधून व इतर ठिकाणीं जमिनींतील ओल टिकवून धरून, जमिनीस हमखास पाणीपुरवठा उपलब्ध करून देणें हा एक प्रश्न आहे. या दृष्टीनें आम्हीं पाटबंधा-यांच्या मोठमोठ्या योजना हातीं घेतल्या असून अशाच प्रकारच्या आणखी अनेक योजना हातीं घेण्याचा आमचा विचार आहे. बांधबंदिस्तीचीं व भूसंरक्षणाची अनेक कामें महाराष्ट्र राज्याच्या कांहीं विभागांत मोठ्या प्रमाणावर सुरू असून इतर विभागांतहि तीं सुरू व्हावयास पाहिजेत. याबरोबरच सुधारलेल्या जातींचें बी-बीयाणें पुरविणें, रासायनिक खतें, शेतीच्या सुधारलेल्या पद्धति इत्यादि बाबतींतील संशोधनाचे निष्कर्ष शेतक-यांपर्यंत पोंचविणें, यांसारख्या अनेक गोष्टी शेतीच्या उत्पादनवाढीच्या प्रश्नांशी निगडित आहेत. देशांतील इतर भागांप्रमाणेंच आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेंतहि शेतीला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे हें आपण जाणतांच.

शासनयंत्रणेबाबत जे अनेक प्रश्न आहेत त्यांच्यासंबंधीं येथें सविस्तर चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं. गेल्या कांहीं दिवसांत मीं अनेकदां सांगितलें आहे कीं, उत्तम व चोख अशी शासनयंत्रणा निर्माण करणें हें महाराष्ट्र राज्यापुढील एक महत्त्वाचें उद्दिष्ट आहे. या बाबतींत पूर्वीच्या मुंबई राज्यांतील कांहीं उत्तम परंपरांचा वारसा आपणांकडे आला आहे. त्या परंपरा तशाच पुढें चालू ठेवण्याचा व शक्य झाल्यास त्यांत भर घालण्याचा आमचा निर्धार आहे. शासनयंत्रणेंतील कार्यक्षमता व सचोटी अबाधित राखून स्थानिक कर्तृत्वाला व उपक्रमशीलतेला जास्तीत जास्त उत्तेजन देण्याचा सरकारचा विचार आहे. ग्रामपंचायती, सहकारी संस्था आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्था यांची वाढ करणें, सत्ता व अधिकार यांचें वाढत्या गतीनें विकेंद्रीकरण करणें या गोष्टींकडेहि सरकार सदैव लक्ष पुरवील. शासनाची कार्यक्षमता कायम ठेवून स्थानिक कर्तृत्व व

उपक्रमशीलता यांस चालना देण्याच्या दृष्टीनें योजना तयार करण्याच्या कामींहि आपल्या या परिसंवादाची बरीच मदत होईल अशी मी अपेक्षा करतों.

यापुढें आपणांला जे अनेक महत्त्वाचे प्रश्न सोडवावयाचे आहेत त्यांच्याकडे पक्षीय किंवा वर्गीय दृष्टीनें पाहण्याचें आपण शक्य तों सोडून द्यावयास हवें. विकास, सामाजिक एकात्मता आणि सामाजिक न्याय हीं सर्व राजकीय पक्षांना मान्य अशींच उद्दिष्टें आहेत. मतभेद असलेच तर ते लहानसहान तपशिलाच्या बाबींसंबधीं असूं शकतील, किंवा हीं उद्दिष्टें साध्य करण्याकरितां किती वेगानें पावलें टाकावींत यासंबंधीं सुद्धां असूं शकतील. परंतु हे मतभेद कांहीं गंभीर स्वरूपाचे म्हणतां येणार नाहींत. म्हणून सर्व राजकीय पक्षांनीं व निरनिराळ्या मतप्रणालींच्या पुरस्कर्त्यांना राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कार्यात सहकार्य देण्याचें आपसांत मान्य करावयास पाहिजे. निदान ज्या गोष्टी वादग्रस्त नाहींत त्यांच्या बाबतींत तरी हें घडून यावयास पाहिजे.

या परिसंवादाचें उद्घाटन करण्याचे आपण मला निमंत्रण दिलें त्याबद्दल मी आपला आभारी आहें. आपल्या चर्चेमधून बरेंच उपयुक्त मार्गदर्शन मिळेल असा मला विश्वास आहे. आतांपर्यंत कांहींशी एकांडी, अलिप्त व आत्मसंतुष्ट वृत्ति असलेल्या बुद्धिजीवी वर्गाला राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कामीं प्रवृत्त करण्याचें कार्य यासारख्या परिसंवादानें साधेल, अशी मला आशा आहे. अशा प्रकारें या वर्गाचें सहकार्य मिळाल्यास पुनर्रचनेच्या या कार्यास जोराची चालना मिळून त्याचा विकास होईल असा मी विश्वास प्रकट करतों व आपल्या परिसंवादास सुयश चिंतितों.

## औद्योगिक विकासाच्या समस्या

आपल्या या 'महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदें'त सहभागी होण्यांत मला विशेष आनंद होत आहे. कारण ज्या प्रश्नासंबंधीं आपण विचार करणार आहांत तो महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा प्रश्न मला व महाराष्ट्र सरकारला अतिशय जिव्हाळ्याचा वाटतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या तेरा वर्षांच्या काळांत प्रगतीच्या दिशेनें आपण बरीच वाटचाल केलेली असली तरीहि आणखी बराच मार्ग अद्यापि आपल्याला आक्रमावयाचा आहे. हा मार्ग अनेक बिकट समस्या, अडचणी आणि संकटें यांनीं भरलेला आहे हें, मला वाटतें, कोणीहि नाकारूं शकणार नाहीं.

विकासापासून होणा-या फायद्यांचा जेव्हां प्रश्न उपस्थित होतो त्यावेळीं प्रथम आपलें गांव, नंतर ज्या राज्यांत आपण राहतों तें राज्य, आणि शेवटीं आपला भारत देश, या सर्वांच्या गरजा आपल्या डोळ्यांपुढें उभ्या राहून पुष्कळ वेळां आपल्या विचारांचा गोंधळ उडतो. अशा वेळीं,

भारतरूपी कुटुंबाचे आपण एक घटक आहोंत ही गोष्ट आपण प्रथम लक्षांत ठेवली पाहिजे; आणि या भारतरूपी कुटुंबाचें जास्तींत जास्त कल्याण साधेल अशाच रीतीनें आपण आपले सर्व व्यवहार आंखले पाहिजेत. भारताचें दुःख तेंच आपलें दुःख आणि भारताचे सुख तेंच आपलें सुख, असें प्रत्येकानें मानलें पाहिजे.

तथापि, याचा अर्थ असा नव्हे की, आपण आपल्या निकटवर्ती विभागाचा विचारच करूं नयें किंवा स्थानिक साधनसामुग्रीचा उपयोग भरपूर प्रमाणांत करून घेण्याचा आपला हक्कच अजिबात सोडून द्यावा. राष्ट्रीय प्रगति याचा निःसंदिग्ध अर्थच असा आहे कीं, त्यांत शक्य तेवढ्या जास्त प्रमाणांत स्थानिक प्रदेशांची प्रगति समाविष्ट असली पाहिजे. कारण, अशा स्थानिक प्रदेशांच्या एकूण प्रगतीमुळेंच सबंध देशाची प्रगति साध्य करतां येते. स्थानिक विभागांचा विकास ही कल्पना राष्ट्रीय विकासाला विरोधी असतेच असें नाहीं. अशीं अनेक उदाहरणें आहेत कीं, जेथें स्थानिक साधनसामुग्रीचा सुव्यवस्थित उपयोग करून घेण्यांत आल्यामुळें राष्ट्राच्या विकासामध्यें मोलाची भर पडलेली आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, ही समस्या स्थानिक विकास कीं राष्ट्रीय विकास अशा स्वरूपाची नाहीं, तर देशाचा कोणताहि भाग इतर भागांच्या तुलनेनें फार मागें राहतां कामा नये अशा दृष्टीनें देशाचा एकसंध विकास घडवून आणणें हें या समस्येचें खरें स्वरूप आहे. ज्याप्रमाणें एखाद्या जहाजांच्या तांड्याची गति सर्वांत कमी वेग असणा-या जहाजानें नियंत्रित होते, अथवा सांखळीचा बळकटपणा हा जसा त्यांतील सर्वांत कमजोर अशा दुव्यावरच अवलंबून असतो, त्याप्रमाणें सबंध देशाच्या दृष्टीनें विचार केल्यास देशाचें सामर्थ्य हेंहि त्यांतील सर्वांत दुबळ्या घटकानेंच नियंत्रित होत असतें असें दिसून येईल. म्हणून, अविकसित विभागांचा व प्रदेशांचा आपण प्रथम विचार केला पाहिजे. ज्या विभागांत विकासाची आवश्यकता आहे, जे विभाग विकासक्षम आहेत, जे विभाग स्वतःच्या विकासासाठीं प्रयत्न करण्यास तयार आहेत, अशा विभागांचें भौगोलिक स्थान, त्यांची भाषा, त्यांची संस्कृति अथवा इतर बाबी ह्यांचा विचार न करता आपण त्यांचा विकास घडवून आणला पाहिजे. दुष्काळी व अविकसित विभागांकडे विशेष लक्ष पुरवून आणि या विभागांना अधिक प्रगत झालेल्या विभागांच्या बरोबर आणून संपूर्ण प्रदेशाचा समतोल विकास घडवून आणणें हें महाराष्ट्र राज्याचें धोरण आहे. मूळ समस्येची आपणांस जाणीव होऊं लागली आहे ह्याचें हें द्योतक आहे असें मी समजतों.

आपल्या राज्याच्या विकासांत उद्योगधंद्यांना जें महत्त्व आहे त्याचा खास प्रपंच करण्याची आवश्यकता नाहीं. आपल्या राज्याबाबत एक चमत्कारिक विरोधाभास दृष्टीस पडतो. तो असा कीं, या राज्याची राजधानी औद्योगिक दृष्ट्या अतिशय पुढारलेली असून राज्यांतलें फार मोठें क्षेत्र अद्यापि अविकसित अवस्थेंतच आहे. मुंबई शहराचा विकास करण्यास निरनिराळ्या जमातींचे व

गटांचे प्रयत्न कारणीभूत झाले आहेत या मताशीं मी संपूर्णपणें सहमत आहें. आजच्या मुंबईचें वैभव वाढविण्यांत या सर्वांनीं महत्त्वाची भूमिका बजाविली असून यापुढेंहि ते आपली भूमिका बजावीत राहतील अशी मला आशा आहे. मुंबई ही आज भारताचें सामर्थ्य व भूषण आहे आणि तिला हें स्वरूप प्राप्त करून देण्यांत या सर्वांचा वांटा आहे. पण त्याबरोबरच उद्योगधंदे चालविण्यासाठी लागणारी बुद्धि ही कोणा एका जमातीचीच मक्तेदारी असूं शकते अथवा एखाद्या जमातींत तिचा अभाव असतो असें समजण्याचें, मला वाटतें, कांहीं कारण नाहीं. विशिष्ट जमाती किंवा गट यांच्याजवळ कांहीं विशिष्ट प्रकारची बुद्धि असते हें श्री. देशमुख यांना मान्य नाहीं. त्यांच्या या मताशीं मी पूर्णपणें सहमत आहे. महाराष्ट्रांतील लोकांनीं त्या त्या काळांतील आवाहनास नेहमींच साथ दिली आहे असें आपणांस दिसून येतें. सोळाव्या आणि सतराव्या शतकांमध्यें त्यांनीं रणांगणावर पराक्रम गाजविले, ब्रिटिश राजवटींमध्यें वेगळेंच चित्र दिसलें; सरकारी नोकरींत त्यांच्या बुद्धीला चांगला वाव मिळतो असें त्यावेळी त्यांना वाटलें. आतां उद्योगधंद्यांची निकडीची गरज लक्षांत घेतां विज्ञान व तांत्रिक क्षेत्रांतील कौशल्य हस्तगत करून उद्योगधंद्यांसंबंधींची आपली जबाबदारी पार पाडण्यास महाराष्ट्रीय लोक तयार राहतील याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. इतर अनेक क्षेत्रांप्रमाणें उद्योगधंद्याच्या क्षेत्रांतहि कोणा एका विशिष्ट जमातीची मक्तेदारी असूं शकत नाहीं. आणि मला खात्री आहे कीं, अशा प्रकारची आत्यंतिक स्वरूपाची विचारसरणी अद्यापिहि कोठें शिल्लक असेल तर काळाच्या ओघांत ती मुळींच टिकून राहणार नाहीं.

तथापि, महाराष्ट्राचें पुरेशा प्रमाणांत औद्योगीकरण घडवून आणण्याचें काम पुष्कळच मोठें व बिकट आहे हें आपणांस मान्य करावें लागेल. औद्योगिक क्षेत्रांत कांहीं कारणांमुळें महाराष्ट्रीय लोक पूर्वी अग्रभागीं चमकूं शकले नाहींत याचा मीं उल्लेख केलेलाच आहे. तसेंच, व्यापारांतहि ते आघाडीवर नव्हते. उद्योगधंद्यांना लागणारा अनुभव व तंत्र आपणांस अवगत होतें. सर्वसाधारणपणें व्यापाराबरोबरच मोठे उद्योगधंदे येत असतात. आतां व्यापाराच्या मागें उद्योगधंद्यांत प्रवेश करण्याऐवजीं, महाराष्ट्रीय लोकांना सरळच त्या क्षेत्रांत प्रवेश करावा लागेल. त्यामुळें नव्या तंत्रांची व नव्या पद्धतींची गरज भासेल. थोडक्यांत म्हणजे, यासाठीं सर्वंकष आणि पराकाष्ठेचे असे प्रयत्न करावे लागतील.

लोकहिताच्या दृष्टीनें अशा प्रकारचे प्रयत्न करण्यांत यावेत यासाठीं मी फार उत्सुक असून असे प्रयत्न यशस्वी रीतीनें निश्चित करतां येतील असा मला विश्वास वाटतो. त्यासाठी सरकार सर्व प्रकारची मदत देईल. विजेचा व पाण्याचा पुरवठा वाढवून, आणि रस्ते व इतर सर्व सोयींनीं सुसज्ज अशा औद्योगिक वसाहतींचे जाळें तयार करून, सरकार आपल्या परीनें हें कार्य सध्या

पार पाडीत आहे. त्यामुळें उद्योगधंद्यांची उभारणी व वाढ करणें सुलभ होईल. उद्योगधंद्यांच्या विकासामध्यें सर्वांत मोठी अडचण म्हणजे भांडवलाची, विशेषतः खेळत्या भांडवलांची आहे, याची सरकारला जाणीव आहे. तथापि, या बाबतींतहि चालू व नव्यानें निघणा-या उद्योगधंद्यांना बँकांकडून सुलभ रीतीनें मदत मिळावी म्हणून महत्त्वाचीं पावलें टाकण्यांत आलीं आहेत. स्टेट बँकेनें जॉइंट स्टॉक बँक व सहकारी बँका यांच्या सहकार्यानें लहान उद्योगधंद्यांसाठीं संघटित केलेली कर्जपुरवठ्याची योजना हें या बाबतींतले एक उदाहरण सांगतां येईल.

तथापि उद्योगधंदे सुरू करण्यास आकर्षक वाटेल असें वातावरण किंवा समाधानकारक परिस्थिति निर्माण होण्यासाठीं अद्यापि पुष्कळच मजल मारावयास पाहिजे याची सरकारला जाणीव आहे. या बाबतींतलें आपलें कर्तव्य चांगल्या रीतीनें पार पाडतां यावें म्हणून उद्योगपतींपुढें असलेल्या समस्या, त्यांच्या गरजा वगैरेसंबंधींची तपशीलवार आणि खात्रीलायक माहिती सरकारजवळ असली पाहिजे. यासाठीं सरकार आणि कारखानदार यांच्यामध्यें विचारविनिमय सतत चालू राहिला पाहिजे. त्यामुळें कारखानदारांच्या गरजांची सरकारला चांगली कल्पना येऊन त्यांचा विचारहि करतां येईल. महाराष्ट्राच्या भूमीवर उद्योगाचें भव्य मंदिर उभारण्यासाठीं, ज्या बाबींत कारखानदारांना सरकारकडून मार्गदर्शन, मदत आणि उत्तेजन हवें असेल अशा बाबींकडे या परिषदेंत लक्ष वेधण्यांत येईल अशी मला आशा आहे. कारण, उद्योगधंद्यांच्या गरजा कोणत्या आहेत हें नीट समजल्यानंतर कारखानदारांना साह्यभूत होईल अशा प्रकारची योजना तयार करणें शक्य होईल. एखादा नवीन उद्योगधंदा सुरू करतांना अथवा जुन्या उद्योगधंद्याचा विस्तार करतांना जे निरनिराळे प्रश्न निर्माण होतात त्यांचें स्वरूप स्पष्ट होण्यास अशा प्रकारच्या योजनेंमुळें मदत होईल.

उद्योगधंद्यांत सरळ प्रवेश करण्याच्या उपक्रमांत आणि विशेषतः शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या उद्योगांत, सहकारी संघटनेलां फार महत्त्व आहे. उद्योगधंद्यांची सहकारी तत्त्वावर कशी परिणामकारक संघटना होऊं शकते हें या राज्याने दाखवून दिलें आहे. या बाबतींत या राज्यानें इतरांना अल्पशा प्रमाणांत कां होईना पण मार्गदर्शन केलें आहे व तें तसें आजहि करीत आहे, असें मीं म्हटलें तर तें वावगे ठरणार नाहीं. सहकारी तत्त्वावर चालू असलेल्या या प्रक्रिया करण्याच्या धंद्यांना आर्थिक बाजूपेक्षां एक वेगळी अशी महत्त्वाची सामाजिक बाजूहि आहे आणि त्याचबद्दल मी आता बोलणार आहें.

सहकारी चळवळ ही मूलतः जनतेच्या प्रयत्नांवर आधारलेली असली तरी सरकारहि तिचें फार काळजीपूर्वक संगोपन करीत आहे. याचीं अनेक कारणें आहेत. त्यांपैकीं पहिलें कारण असें कीं,

शेतक-याला उद्योगधंद्यांत पैसे गुंतविण्यास लावण्याचा जवळजवळ हाच एक मार्ग आहे. दुसरें म्हणजे, ग्रामीण भागांतील स्थानिक साधनसामुग्रीचा उपयोग करण्याच्या निमित्तानें बाहेरून येणा-या भांडवलामुळें त्या भागांत जे प्रश्न निर्माण होतात ते त्यामुळें टाळता येतात. शिवाय, त्यानें ग्रामीण व शहरी मूल्यांत असलेलें अंतर नष्ट होऊन शहरांतील व खेड्यांतील लोक एका पातळींत येतात. उदाहरणार्थ, एखाद्या सभेंत मोठमोठे उद्योगपति, कॉर्पोरेशन्सचे प्रतिनिधि, सरकारी अधिकारी, तंत्रज्ञ व इंजिनिअर यांच्या बरोबरीनें शेतक-यांचे प्रतिनिधीहि जेव्हां डायरेक्टर म्हणून खांद्यास खांदा लावून बसतात तेव्हां ग्रामीण व शहरी हा भेद साहजिकच नष्ट होतो. याशिवाय आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा प्रकारें वाढलेलें उत्पन्न सहकारी संघटनेमुळें शक्य तितक्या जास्त क्षेत्रांत वांटलें जातें  व त्यामुळें ख-या अर्थानें समाजवादी समाजरचनेचा उद्देश साध्य होतो.

भांडवल उभारणीच्या बाबतींत सहकारी क्षेत्रांत किती कार्य होऊं शकतें हें या राज्यांत निघालेल्या सहकारी कारखान्यांवरून दिसून येईल. या राज्यामध्यें आतांपर्यंत तेरा सहकारी साखर कारखाने स्थापन झाले असून साखरेच्या उत्पादनास त्यांनीं सुरुवातहि केली आहे. तिस-या पंचवार्षिक योजनेच्या काळांत अशा प्रकारचे आणखी बारा कारखाने उभारण्यांत यावयाचे आहेत. आपल्याला नवल वाटेल, पण सबंध भारतांत पहिला सहकारी साखर कारखाना उभारण्याच्या कामीं अहमदनगरच्या एका गरीब शेतक-याचेच प्रयत्न कारणीभूत झाले आहेत. इतरांशीं सहकार्य करून हा कारखाना उभारण्याच्या कामीं त्यानें अतिशय परिश्रम घेतले. अशाच प्रकारचे उपक्रम आतां भात, तेलबिया, सरकी आणि इतर क्षेत्रांतहि होऊं पाहत आहेत. सहकारी तत्त्वाचे समाजावर होणारे परिणाम लक्षांत न घेतांहि, निव्वळ औद्योगिक अर्थकारणाच्या दृष्टिकोनांतून जरी या प्रयत्नाकडे पाहिलें, तरीहि सहकारी क्षेत्रांतल्या या संघटनेनें शेतीविषयक उद्योगधंद्यांना कच्च्या मालाचा नियमित पुरवठा करण्याच्या कामीं उत्तम कार्य करून दाखविलें आहे, हें स्पष्ट होतें. हा कच्चा माल या धंद्यांचा पायाच असून त्याचा सतत पुरवठा होत राहतो याचें कारण हा कच्चा माल उत्पादन करणारेच वरील औद्योगिक उपक्रमांचे मालक असतात. दुस-या शब्दांत सांगावयाचें म्हणजे सहकाराचा अवलंब करणारा शेतकरी हा या शेतीविषयक उद्योगधंद्यांतला उत्पादकहि असल्यामुळे औद्योगीकरणाच्या प्रक्रियेंत साहजिकच कार्यक्षमता व गति निर्माण होते. परिणामी खेड्यापाड्यांतून अशा प्रकारचे उद्योगधंदे निघण्यास आतां सुरुवात झाली आहे आणि अर्थातच ही स्वागतार्ह अशीच गोष्ट आहे.

सहकार हें सरकारचें एक लाडावलेलें मूल असून सहकारालाच सरकार उठसूठ पुढें करीत असतें असा एक आरोप केला जातो. पण त्यांत कांही तथ्य नाहीं. प्रत्येक पातळीवर औद्योगीकरणास

चालना देण्याचा सरकारचा जो निर्धार आहे, त्याचेच केवळ द्योतक असे हे वरील प्रकारचे प्रयत्न आहेत. इतर क्षेत्रांतहि प्रगति करण्याच्या बाबतींत सरकार तितकेंच आस्थापूर्वक प्रयत्न करीत आहे व त्यासाठीं पुढेंहि शक्य ते सर्व प्रयत्न करील, असें मी या प्रसंगीं आश्वासन देऊं इच्छितों.

औद्योगीकरणाच्या या संदर्भांत आणखी एका महत्त्वाच्या प्रश्नाचा मी उल्लेख करूं इच्छितों. शहरांतील वाढत्या कामगारवर्गाला काम पुरविण्याचा एक मोठाच प्रश्न आज आपणांसमोर उभा आहे. ग्रामीण भागांतील लोकसंख्येंत दर वर्षीं दीड टक्क्यानें वाढ होते, तर नागरी विभागांतील लोकसंख्येत त्याच काळांत चार टक्क्यांनीं भर पडते असा अंदाज करण्यांत आला आहे. याचाच अर्थ असा कीं, दर वर्षी एक लक्ष साठ हजार याप्रमाणें तिस-या योजनेच्या काळांत शहरी कामगारांच्या संख्येंत साठ लाखांनीं भर पडेल. सध्यांच्या बेकारीच्या प्रश्नाला हात लावावयाचा नाहीं असें म्हटलें तरी कामगारांच्या एवढ्या वाढत्या संख्येला रोजगार पुरविण्याचा हा प्रश्न कांहीं लहान नाहीं. पंचवार्षिक योजनेच्या विकास कार्यक्रमामुळें बिगरशेतकी धंद्यांतील ब-याच कामगारांना कामधंदा मिळेल अशी अपेक्षा असली तरी या नवीन शहरी कामगारांना रोजगार पुरविण्याची जबाबदारी खाजगी क्षेत्रांतील कारखाने व त्यांतून उत्पन्न होणारे दुय्यम उद्योगधंदे यांनाच स्वीकारावी लागणार आहे.

आजचें युग हें तंत्रविद्येचें व स्वयंचलित यंत्रांचे युग आहे. तेव्हां अकुशल आणि अशिक्षित कामगारांपेक्षां सुशिक्षित कामगारांचीच जरुरी अधिक भासणार आहे. म्हणून आवश्यक त्या तांत्रिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करण्याचा या सरकारनें आपल्या परीनें कसोशीनें प्रयत्न केला असून त्यासाठीं तिस-या पंचवार्षिक योजनेंतहि मोठ्या प्रमाणांत तरतूद करण्यांत आली आहे. तथापि, औद्योगीकरणाच्या बाबतींत सरकार करीत असलेल्या प्रयत्नांनासुद्धा मर्यादा असल्याकारणानें या बाबतींतली मुख्य जबाबदारी खाजगी क्षेत्रावरच पडते.

औद्योगीकरणासंबंधींच्या समस्यांचा विचार करतांना समाजावर त्याचे काय परिणाम होतात याचाहि विचार करणें आवश्यक आहे. कारण आर्थिक व सामाजिक समस्यांची उकल एकमेकांवर अवलंबून असून त्यांचा एकमेकांवर निश्चितच परिणाम होतो, मग तो परिणाम प्रत्यक्ष असो अथवा अप्रत्यक्ष असो. अनेक सामाजिक समस्यांचा आर्थिक बाबींतून उगम होतो हें जितके खरें, तितकेंच अनेक आर्थिक समस्यांना सामाजिक परिस्थिति कारणीभूत होत असते हेंहि खरें आहे. सबंध मानवी समाजाचें कल्याण हें आपलें अंतिम ध्येय असून आर्थिक विकास हें तें ध्येय साध्य करण्याचें एक साधन आहे. त्यामुळें सामाजिक समस्यांच्या संदर्भांत आर्थिक समस्यांची पाहणी करणें आवश्यक ठरतें.

ह्या विषयांसंबंधीं बोलतांना मी एका गोष्टीकडे आपलें लक्ष वेधूं इच्छितों. कापडधंद्यांतील कांही गिरण्या आज बंद पडल्या असून अनेक कामगार व त्यांच्या कुटुंबीय मंडळींवर त्यामुळें मोठें संकट ओढवलें आहे. या गिरण्या गैरव्यवस्थेमुळे बंद पडल्या कीं भांडवलाच्या अभावी बंद पडल्या, अथवा त्यांची यंत्रसामुग्री निरुपयोगी झाल्यामुळे बंद पडल्या, यासंबंधींच्या कारणमीमांसेंत आजच्या ह्या प्रसंगी शिरण्याची जरुरी नाहीं. परंतु एवढें मात्र खरें कीं, मोठमोठ्या गिरण्या व कारखाने जर बंद पडूं लागले आणि अनेक लोक त्यामुळें रस्त्यावर उघडे पडूं लागले तर त्याचे सामाजिक परिणाम फार तीव्र व दूरगामी होतात. तेव्हां यापुढें अशी परिस्थिति निर्माण होऊं नये म्हणून कांही तरी मार्ग शोधून काढणें आवश्यक आहे. अगदीं डबघाईस आलेल्या गिरण्या अमाप पैसा खर्च करून चालू ठेवणें योग्य होईलसें दिसत नाहीं. नवीन गिरण्या काढणें हाच यावर उपाय असल्याचें आढळून येईल. परंतु अशा गिरण्यांची उभारणी भक्कम पायावर झाली पाहिजे व त्या व्यवस्थितपणें चालविल्या पाहिजेत. तसेंच, त्यांनी काळाच्या गरजा भागविल्या पाहिजेत. खाजगी क्षेत्रांतील उद्योगपतींनीं या गोष्टींचा गंभीरपणे विचार करून त्यासंबंधीं एखादी योजना करावी असें मला वाटतें. या विशिष्ट प्रश्नांचा संबंध राज्य सरकारपेक्षां केंद्र सरकारशींच अधिक येत असला तरी त्यामुळें आपण त्यांचा विचार करूं नये असें मात्र नाही.

आतां मी आपल्या राज्याशीं खास संबंधित असलेल्या आणखी एका गोष्टीकडे या प्रसंगीं आपलें लक्ष वेधूं इच्छितों. भारतांत होणा-या कापसाच्या उत्पादनापैकीं पंचवीस टक्के कापूस या राज्यांत पिकतो म्हणून येथील कापसाचें पीक सबंध देशाच्या आणि विशेषतः या राज्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें ठरतें. तथापि, अलिकडे कापसाचें उत्पादन घटलें आहे आणि म्हणून आपण त्यासंबंधीं विचार करणें आवश्यक आहे. आपल्या देशाच्या व राज्याच्या आर्थिक व्यवस्थेंत या पिकाला असलेलें मोठें महत्त्व लक्षांत घेऊन कापसाचें एकरीं उत्पादन कसें वाढेल या प्रश्नाचा आपण विचार करणें हिताचें ठरेल.

औद्योगिक विकासासंबंधींच्या मास्टर प्लॅनबद्दल मला फार विस्तारानें बोलण्याची आवश्यकता नाहीं. कारण तो आतां सर्वांना परिचित आहे असें मी समजतो. मीं मागें सांगितलेंच आहे कीं, हा मास्टर प्लॅन म्हणजे या प्रश्नाच्या बाबतींतील अंतिम शब्द नव्हे. अधिकाधिक औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी सरकार दक्ष असल्यासंबंधींचें तें एक प्रतीक आहे. औद्योगिक क्षेत्रांतील सर्व विभागांना कच्च्या मालाचा सतत पुरवठा होत राहून औद्योगीकरणाची गति ज्या योगें कायम राहील अशा प्रकारची दमदार योजना अंतिम स्वरूपांत तयार करण्याच्या दृष्टीनें आपण सूचना व कल्पना मांडाव्यात अशी आमची अपेक्षा आहे.

मीं आपला बराच वेळ घेतला आहे. आतां कांही औपचारिक रीत्या बोलून मी आपला अधिक वेळ घेऊं इच्छीत नाहीं. तुम्ही जो विचारविनिमय कराल तो तुमच्या दृष्टीने आणि या राज्याच्या दृष्टीनें यशस्वी होवो अशी सदिच्छा व्यक्त करून महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदेचें मी मोठ्या आनंदाने उद्घाटन करतों.

## कोंकणच्या विकासाचा प्रश्न

आजच्या या अतिशय महत्त्वाच्या प्रसंगीं, कोंकण विभागाच्या प्रतिनिधींनी मला बोलाविण्याइतका माझ्यावर विश्वास दाखविला त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. आणि बोलाविल्यानंतर कामाची सुरुवातहि फारच चांगली केली आहे. शासनाच्या प्रतिनिधीकडून थैली घेण्याकरितां त्याला बोलावतात, पण आपण थैली देऊन सुरुवात केली आहे याबद्दल मी आपणांस मनःपूर्वक धन्यवाद देतों.

योजनेच्या क्षेत्रांतला एक विधायक प्रयत्न, आणि अत्यंत महत्त्वाचा प्रयत्न म्हणून आजच्या या परिषदेचें महत्त्व माझ्या दृष्टीनें फार आहे. आणि ह्या प्रसंगी बॅ. नाथ पै यांच्यासारख्या नव्या कोंकणाचा प्रतिनिधी आज मार्गदर्शन करण्याकरतां येथें आला आहे ही सुद्धां माझ्या दृष्टीनें अतिशय स्वागतार्ह अशी घटना आहे.

कोंकण विकासाचा प्रश्न हा जसा एक महत्त्वाचा प्रश्न आहे तसाच तो कांहींसा दुखावलेला प्रश्न आहे याची मला जाणीव आहे. आणि म्हणून या विकासाच्या प्रश्नाकडे जास्तींत जास्त विधायक दृष्टीनें आणि वास्तवतेच्या भूमिकेवरून पाहण्याचा आपण प्रयत्न करावयास पाहिजे. आपण मंडळी या परिषदेमध्यें आपल्या सर्व प्रश्नांचा विचार याच भूमिकेवरून कराल व त्याच्या पाठीमागें ही विधायक दृष्टि ठेवाल अशी मला आशा आहे आणि तसा माझा विश्वासहि आहे.

कोंकणचा प्रश्न पाठीमागें कां पडला या प्रश्नाची मीमांसा कदाचित् अभ्यासकाला योग्य वाटण्याचा संभव आहे. इतिहासकाराच्या दृष्टीनेंहि कदाचित् तो महत्त्वाचा विषय ठरण्याचा संभव आहे. परंतु आज आणि उद्यां यांच्याशीं ज्यांचा संबंध आहे अशा मंडळींना मी एवढीच नम्र विनंति करीन कीं, या मीमांसेमध्यें जाण्यापेक्षा कोकण विकासाचा प्रश्न व्यवहार्यतेच्या भूमिकेवर निश्चितपणानें आणि वेगानें कसा सोडवितां येईल, याचा विचार करण्याची दृष्टि आपण आपल्यासमोर ठेवावी.

आजकाल हिंदुस्तानच्या विकास योजनांचा विचार करतांना, अनेक वेळां वास्तवता व विधायक वृत्ति या दोन भूमिकांचा विचार करण्याचा प्रसंग येतो. योजनांचा विचार करणा-या सर्वच मंडळींना सर्व ठिकाणीं, मला वाटतें, या दृष्टीनें विचार करावा लागत असेल. मी कांही या विषयांतला तज्ज्ञ नाहीं, म्हणून या गोष्टीसंबंधीं मी येथें कांहीं बोलूं इच्छीत नाहीं. परंतु आज या देशामध्यें योजनांचा विचार करणारी जी मंडळी आहेत, त्यांचा विचार अधिकाधिक वस्तुस्थितिनिष्ठ असा होऊं लागलेला आहे यांत शंका नाहीं.

पहिल्या आणि दुस-या पंचवार्षिक योजनांनीं आपली सफर जरी पुरी करीत आणली असली, तरी योजनेचा विचार आणि आचार ही गोष्ट आपल्या देशामध्यें नवीन अशीच आहे. तरी सुद्धां ही सफर करीत असतांना त्यांतल्या कांही ठाम गोष्टींचा विचार देशाकडून निश्चितपणें स्वीकारला जातो आहे. या बाबतींत येणारा अनुभव व त्यांतून निर्माण होणा-या कांहीं नवीन गोष्टी आपणांस स्वीकाराव्या लागत आहेत आणि शिकाव्याहि लागत आहेत.

विकासाचा विचार करतांना ज्या क्षेत्रांमध्यें, ज्या भागामध्यें, ज्या प्रदेशामध्यें विकास करावयाचा आहे, त्यांच्या दृष्टीनें विकासाचा विचार व्हावयास पाहिजेच. परंतु त्याचबरोबर ज्या गोष्टींचा आपणांस विकास करावयाचा आहे तो कोणत्या हेतूनें करावयाचा आहे, याचाहि विचार योजनेच्या विचारांमध्ये व्हावयास पाहिजे.

हा जो दुसरा विचार आहे तो गेल्या पांचदहा वर्षांमध्यें प्रामुख्यानें डोळयापुढें येऊं शकला नाहीं, आजपर्यंत आला नाहीं, ही गोष्ट खरी आहे. आणि म्हणून योजनेच्या विचारामध्यें प्रादेशिक विकासाचेंच अंग असतें असा समज निर्माण झाला. त्यामुळें मी असें पाहत आहें की, योजनांचा विचार करणा-या माणसांच्या मनामध्येंहि या विचारालाच हल्लीं जास्त प्राधान्य येऊं लागलें आहे.

कोणत्याही राज्यामध्यें उत्पादनाची जी वाढ होते, जे उद्योगधंदें निघतात त्यांचा विचार करून त्या राज्याच्या विकासाची प्रगति सरासरीच्या पद्धतीनें दाखविण्याचा एक मार्ग आहे. परंतु हा वाढलेला विकास त्या राज्यांतील सर्व प्रदेशांत किती पोहोंचला ह्याहि विचाराला सध्यां प्राधान्य मिळत आहे. एवढेंच नव्हे तर प्रदेशांमध्यें विकासाचा हा विचार पोहोंचल्यानंतर समाजाच्या निरनिराळ्या थरांत हा वाढलेला विकास कोठवर जाऊन पोहोंचला, हाहि विचार आतां महत्त्वाचा होऊं लागला आहे. आणि म्हणूनच कोंकणच्या विकासाचा प्रश्न कांहींसा दुखावलेला प्रश्न आहे असें जें मीं म्हटलें, त्याच्या पाठीमागें कांहीं अंशीं हें कारण आहे. या प्रश्नाची ऐतिहासिक मीमांसा

थोडीफार करतां येईल, पण मी त्या मीमांसेंत जाणार नाही. आपणहि गेलां नाहींत तरी चालेल असें मला वाटतें.

माझ्या दृष्टीनें, ज्या प्रदेशाचा विकास करावयाचा असतो त्या प्रदेशांतल्या कांहीं बाबींचा विचार करणें आवश्यक असतें. त्याशिवाय त्या प्रदेशाच्या विकासाचा आपणांस विचार करतां येणार नाहीं. निसर्गानें त्या प्रदेशाला दिलेलें मनुष्यबळ आणि इतर साधनसामुग्री या दोन्हींचा विकासाच्या प्रश्नांत प्रामुख्यानें विचार करावयास पाहिजे. या दृष्टीनें कोंकणच्या विकासाचा विचार करतां कोंकण ही एक भाग्यवान भूमि आहे असें मला वाटतें. कांहीं बाबतींत निसर्गानें त्याच्यावर अन्याय केला आहे असें आपणांस सकृद्दर्शनीं वाटतें. पण ज्या बाबतींत हा अन्याय झाला आहे असें आपल्याला वाटतें, त्याच बाबी कोंकणच्या फायद्याचीं आणि शोभेची स्थानें ठरलीं आहेत असा आतांपर्यंतचा अनुभव आहे.

कोंकणचें पहिलें महत्त्वाचें साधन म्हणजे कोंकणचीं माणसें असें मी मानतों. कोंकणामध्यें कर्तबगार, बुद्धिमान असें मनुष्यबळ आहे, पण त्याला आपल्या बुद्धिमत्तेचें व कर्तृत्वाचें पाणी दाखविण्याकरितां कोंकणची सरहद्द ओलांडावी लागते ही गोष्ट कांहींशी खरी आहे. परंतु विकासाच्या कुठल्याहि योजनेमध्यें माणूस हा अतिशय महत्त्वाचा भाग आपण मानला पाहिजे. कारण विकास हा जरी विकासाचीं साधनें निर्माण करण्यामुळें मुख्यतः होत असला तरी त्या साधनांचा वापर करणारा जो मनुष्य आहे त्याचा विकास हीच योजनेंतील शेवटीं फार महत्त्वाची गोष्ट असते. विकास योजनेंत त्याला मिळणारें शिक्षण ही एक मोठी मानवी प्रक्रिया असून तिला फार महत्त्व आहे. या दृष्टीनें अलीकडेच ऐकलेली एक मजेदार गोष्ट आपणांस मला सांगावीशी वाटते. ही गोष्ट भूदान कार्यकर्त्यांनीं मला सांगितली असून तिच्यांत शिकण्यासारखें बरेंच आहे. हे कार्यकर्ते शेतीच्या उत्पादनाचीं व सहकारी शेतीचीं तत्त्वें समजावून देण्याकरितां एका मागासलेल्या भागांत गेले होते. तेथें गेल्यानंतर एकदोन दिवसांच्या श्रमांनी त्यांनीं एक छोटीशी सभा घेतली. डोंगरपठाराला ही सभा बसली होती. सभेला सुरुवात होतांच सहकारी शेतीचीं तत्त्वें आणि शेतीच्या उत्पादनाचीं महत्त्वाचीं मूल्यें त्यांनीं सभेंतल्या लोकांपुढे सांगावयाला सुरुवात केली. सकाळची वेळ होती. इतक्यांत त्या कोवळ्या उन्हामध्यें त्या डोंगरपठारावरून दोनचार ससे पळत असतांना सभेंतील लोकांनी पाहिले. आणि त्याबरोबर सहकारी तत्त्वांचा आणि शेतीच्या उत्पादनाच्या विचार सोडून देऊन ते सगळे लोक त्या सशांच्या पाठीमागें पळत सुटले. कारण त्यांनीं असा विचार केला कीं, हें घेतलेलें सहकारी तत्त्व आणि यांतून वाढणारें शेतीचें उत्पादन हें पुढच्या वर्षी किंवा त्याच्या पुढच्या वर्षी केव्हांतरी पदरात पडणार आहे. आज संध्याकाळची मेजवानी ह्या सशांच्यावरच होणार आहे. लहानशीच गोष्ट आहे. परंतु तींत पुष्कळसें तथ्य आहे. कारण शेवटीं

आम्ही ज्यांच्यामार्फत काम करणार आहोंत त्यांना त्या कामामध्यें कसा रस निर्माण होईल हा प्रश्न योजनेच्या बाबतींत फार महत्त्वाचा असा प्रश्न आहे. परंतु या प्रश्नाचा विचार कोंकणच्या लोकांच्या दृष्टीपुढें दिसत नाहीं. कोंकणचा माणूस ही कोंकणची खरी संपत्ति असून त्याच्याकडे, मीं आतांच जी गोष्ट सांगितली तिच्यांतील तत्त्व लक्षांत घेऊन, आपण आतां आपली दृष्टि वळविली पाहिजे.

कोंकणच्या कांठीं हेलावणारा महासागर आणि त्याचा किनारा ही तुमची दुसरी मोठी संपत्ति आहे. तुमच्या पूर्वेस उभा असलेला सह्याद्रि हा त्याच्या पठारावरच्या लोकांच्या संपत्तीचें साधन होऊन बसला आहे. परंतु त्यांनें आणून दिलेला भरपूर पाऊस हा निदान रत्नागिरीच्या बाबतींत तरी कधीं कधीं कांही लोकांना शापासारखा वाटतो. कारण त्यामुळें जमीन वाहून जाते व पाठीमागें फक्त कातळ शिल्लक राहतात, खडकाळ जमीन शिल्लक राहते. त्यामुळें रत्नागिरीमध्यें शेतीचा व्यवसाय हा फक्त नाममात्र व्यवसाय राहिलेला आहे.

ही जी कोंकणची साधनसंपत्ति आहे आणि या ज्या अडचणी आहेत त्या ध्यानांत घेऊन कोंकणच्या विकासाचा आपण विचार केला पाहिजे. ह्या परिषदेनंतर आपण निव्वळ योजनांची अनेक पानांची एक यादीच तयार केली तर आपण आपलें काम संपूर्णपणें केलें असें मी म्हणणार नाहीं. अर्थात् योजनेच्या कामामध्यें योजनांची यादी हा एक महत्त्वाचा भाग आहे. कारण त्याशिवाय माणसाला आपण काय केलें पाहिजे तें समजत नाहीं. परंतु विकासाची जीं महत्त्वाचीं साधनें असतात त्यांची वाढ करण्याच्या दृष्टीनें आपण काय केलें पाहिजे हा महत्त्वाचा विचार योजना करणा-या माणसांच्या पुढें असतो. आणि त्या दृष्टीनें आपण आपल्यापुढें, 'वर्किंग पेपर्स' असा ज्याचा आपण उल्लेख केला, असे कांहीं पेपर्स मांडले पाहिजेत. आपल्याजवळ जीं साधनें आहेत त्या साधनांपैकीं कोणत्या महत्त्वाच्या साधनांचा उपयोग आपल्या कोंकणच्या विकासासाठीं होणें शक्य आहे याचा आपण विचार केला पाहिजे.

कोंकणचे तीन वेगवेगळे भाग आहेत. रत्नागिरी हा एक वेगळा भाग मानला पाहिजे. कुलाबा-ठाण्याचा वेगळा भाग मानला पाहिजे. रत्नागिरीमध्यें, निव्वळ राजकीय किंवा ऐतिहासिक कारणांमुळें नव्हे, तर सामाजिक परिस्थितीच्या कारणांमुळें, दक्षिण रत्नागिरी आणि उत्तर रत्नागिरी असे भाग पडतात. ही गोष्ट, कांहीं भाग पाडण्याच्या दृष्टीनें नव्हे, तर परिषदेपुढें असणा-या कार्याचा अंदाज घेण्यासाठीं, मी आपल्या नजरेसमोर आणूं इच्छितों. या दृष्टीनें कोंकणचे जे विशिष्ट प्रश्न आहेत त्यांतून मार्ग काढण्यासाठीं, कोंकणचा समुद्रकिनारा, तिथें पडणारा पाऊस, तेथें असणारी मनुष्यसंपत्ति, तेथील जमिनीचा एकंदर कस आणि तेथील

परिस्थिति यांचा विचार करून कोंकणच्या विकासाचे कार्यक्रम शेवटीं निश्चित करतां येतील. आम्ही मनामध्यें नुसत्या विकासाच्या योजना आणि मनोराज्यें मांडल्यानें विकासाच्या योजना निश्चित करतां येणार नाहींत.

माझ्या मतानें कोंकणच्या विकासाच्या दृष्टीनें तीन-चार गोष्टी महत्त्वाच्या आहेत. पुराच्या निमित्तानें मी जेव्हां कोंकणामध्यें गेलों तेव्हां तेथील पुरांचा प्रश्न माझ्या मनांत अधिक निकडीनें आला, मला तो तांतडीचा प्रश्न वाटला. मी कोंकणामध्यें अनेक वेळां गेलों आहें. शिवाय मी अशा गांवचा आहें कीं, जें गांव कोंकणची पावसाळ्याची उतारपेठ आहे. पावसाळ्यांमध्यें क-हाडहून चिपळूण, खेड, दापोलीकडे जाणा-या माणसांचे तांडेच्या तांडे मीं माझ्या लहानपणीं पाहिले आहेत. उन्हाळ्यामध्यें तिथला आंबा खाण्याकरितां आणि दौरे करण्याकरितां मीं कोंकणामध्यें पुष्कळच फे-या मारल्या आहेत. परंतु पावसाळ्यांत पुरानें वेढलेलें, पीक वाहून गेलेलें कोंकण मीं अगदीं अलीकडे म्हणजे फक्त गेल्या वर्षीच पाहिलें. आणि त्यावेळीं माझ्या लक्षांत आलें कीं, सगळीं कर्तबगार माणसें आणि बिनकर्तबगार माणसेंसुद्धां, कर्तबगारीसाठीं जिल्हा सोडून बाहेर गेलेलीं आहेत. त्यामुळें रत्नागिरीच्या आर्थिक जीवनामध्यें एक प्रकारची अगतिकता ज्याला म्हणतात अशा प्रकारची स्थिति निर्माण झाली आहे.

तेव्हां रत्नागिरीचा विकास करावयाचा असेल, तेथील आर्थिक जीवन संपन्न करावयाचें असेल, तर, ज्याप्रमाणें कांहीं जिवंत पाण्याचे झरे असल्याशिवाय नदी वाहूं शकत नाहीं त्याचप्रमाणें, येथें जिव्हाळ्याच्या ज्या कांही शक्ति असतील त्या मोकळ्या केल्या पाहिजेत. तसें करणें म्हणजेच माझ्या मतें आजच्या कोंकणच्या विकासाचा पाया घालणें आहे. सगळ्या गोष्टींची, दहा-पंधरा-वीस वर्षांत होणा-या कामांची एक यादी पुढें मांडून जर आपण आपलें समाधान करून घेणार असाल, तर आपण तें समाधान घेऊं शकतां. पण माझ्या दृष्टीनें आज ज्या मूलभूत प्रश्नाचा विचार करावयास पाहिजे तो हा आहे कीं, कोंकणचा विकास करण्याच्या दृष्टीनें जी साधनसंपत्ति कोंकणामध्यें आहे तिची शक्ति मोकळी व्हावी म्हणून जे महत्त्वाचे तीन-चार प्रश्न असतील त्यांच्या बाबतींत आपण काय केलें पाहिजे, त्याकरितां आपण कोणती योजना आंखली पाहिजे, याचा आपण विचार केला पाहिजे. आपण ह्या दृष्टीनें या मुख्य प्रश्नांचा विचार कराल अशी मला आशा आहे.

माझ्या मतें कोंकणच्या विकासाच्या दृष्टीनें ज्या दोनचार महत्त्वाच्या गोष्टी आहेत, त्यांचा उल्लेख करून मी माझें उद्‌घाटनाचें भाषण संपविणार आहें. प्रत्येक भागाच्या दृष्टीनें अशा कांहीं योजना असतात कीं, त्या योजना शेवटीं त्या भागांतल्या लोकांच्या भावनांच्या प्रतीकात्मक अशा

झालेल्या असतात. म्हणून सर्वसाधारणपणें विकासयोजनांचा उल्लेख करण्याचा जरी माझा विचार नसला तरी दोनतीन महत्त्वाच्या गोष्टींसंबंधांने मला बोललें पाहिजे. त्यांतील पहिली महत्त्वाची गोष्ट कोंकणच्या रेल्वेसंबंधीं आहे, दुसरी कोंकणांतील जलवाहतुकीसंबंधीं आहे आणि तिसरी कोंकणांतील रस्त्यांसंबंधीं आहे. कोंकणच्या रेल्वेचा उल्लेख, निव्वळ सरकारची बाजू आपल्यापुढें मांडावी अशा दृष्टीनें मीं केलेला नाहीं. कारण कोंकणच्या विकासाकरितां जर कोणती महत्त्वाची गोष्ट आज होण्याची आवश्यकता असेल तर ती कोंकणच्या रेल्वेची आहे. रेल्वे वाहतूक आणि रस्त्यांची वाहतूक या बाबतींत कोंकणच्या दृष्टीनें जी एक प्रकारची बंदिस्त परिस्थिती निर्माण झाली आहे तिला वाट मोकळी करून मिळाल्यास कोंकणांत जी एक मूळ शक्ति आहे तिचा विकास व्हावयाला मार्ग सांपडेल, हा महत्त्वाचा मूळ विचार मला मान्य झाला आहे. आणि म्हणून कोंकणच्या रेल्वेबाबत जेव्हां जेव्हां संधि आली तेव्हां तेव्हां शासनामार्फत आणि व्यक्तिशःहि मी सतत प्रयत्न करीत आलों आहें.

कोंकणच्या बंदरांचाहि प्रश्न असाच महत्त्वाचा आहे. पुराच्या वेळीं जेव्हां मी कोंकणांत गेलों होतों त्यावेळीं खाड्या भरून गेलेल्या मीं पाहिल्या. आणि खाड्या भरल्या याचें कारण बंदरें भरलीं आहेत हें आहे. आज खाड्यांतून चिखल काढणें कितपत व्यवहार्य किंवा शक्य आहे याची मला शंका आहे. परंतु बंदरें चिखलापासून मुक्त झालीं पाहिजेत यासंबंधीं कुणाहि विचारी माणसाला शंका असण्याचें कारण नाहीं. म्हणून या कामासाठी योग्य मार्गाने आम्हीं प्रयत्नाला सुरुवात केली आहे.

तीच गोष्ट रस्त्यांची आहे. विकासाचा हाहि एक महत्त्वाचा मार्ग आहे. दिवा-दासगांव रेल्वे झाल्यानें रत्नागिरीचा प्रश्न संपूर्णपणें सुटेल असें मी मानत नाहीं. खरी गोष्ट अशी आहे कीं, रत्नागिरी जिल्हयाचा भूगोल माझ्यापेक्षां तुम्हांला जास्त माहीत आहे. येथील हीं खोरीं त्या त्या खो-यामध्यें असलेल्या प्रत्येक गांवाशीं जोंपर्यंत महत्त्वाच्या रस्त्यांनी जोडलीं जात नाहींत, तोपर्यंत रत्नागिरीचें खरें मन मोकळें होणार नाहीं असें मला वाटतें. आणि म्हणून छोट्या छोट्या रस्त्यांच्या देणगीची, ज्याला नेटवर्क ऑफ रोड्स म्हणतात तिची, रत्नागिरीला फार आवश्यकता आहे. अर्थात् त्यासाठीं बरींच वर्षे प्रयत्न करावा लागेल.

आणि समुद्रकिना-यावरचा हा मच्छीमारीचा धंदा, तोहि विचार करण्यासारखा आहे. छोट्या छोट्या ठिकाणी यासारख्या इतर अनेक उद्योगधंद्यांची वाढ करतां येणें शक्य आहे. मोठ्या उद्योगधंद्यांचा विचार श्री. वर्दे यांनीं येथें मांडला. पुष्कळ धंद्यांचीं त्यांनीं नांवे सांगितलीं. ते

यांतले तज्ज्ञ आहेत. ते त्यांचा विचार करतील. परंतु छोट्या छोट्या शहरांत उद्योगधंद्यांना लागणारीं साधनें पुरविण्याची गोष्ट महत्त्वाची आहे असें मी मानतों.

आणि दुस-या एका गोष्टीचा मी आतां येथें उल्लेख करतों. उल्लेख म्हणण्यापेक्षां आपण त्याला घोषणा म्हटलें तरी माझी त्याला कांहीं हरकत नाहीं. रत्नागिरीच्या माझ्या मागच्या दौ-यानंतर सद्यःपरिस्थितीचा विचार करून जाहीरपणें एक गोष्ट मी बोललों होतों. ती अशी कीं, देशावरच्या जिल्ह्यांनीं कांहीं काळ आपली प्रगति थांबवून कोंकणचे महत्त्वाचे प्रश्न सोडवण्याकरितां त्याग करावयाची तयारी दाखविली पाहिजे. माझी ही एक भावना होती आणि त्या दृष्टीनें मी कांहीं प्रयत्न करीत होतों. असा प्रयत्न करीत असतांना आम्ही या निर्णयाला आलों आहोंत कीं, द्वितीय पंचवार्षिक योजनेंत अंतर्भूत केलेल्या योजनांवर खर्च होणा-या पैशांपैकीं त्या योजनेच्या काळांत जो पैसा शिल्लक राहील त्यांतील एक कोटी रुपये रत्नागिरी, ठाणें आणि कुलाबा या जिल्ह्यांतील रस्त्यांसाठीं, बंदरांसाठीं आणि मच्छीमारीच्या धंद्यांसंबंधींच्या कामासाठीं द्यावेत व योजनेच्या राहिलेल्या दोन वर्षांच्या काळामध्यें या तीन महत्त्वाच्या कामांसाठींहि एक कोटी रुपयांची रक्कम खर्च करावी. अशा प्रकारचा निर्णय सरकारनें नुकताच घेतलेला आहे.

मी ही फक्त कामाची सुरुवात आहे असें मानतों. याच दिशेंने जर आम्ही प्रयत्न करीत गेलों तर तुम्हीं जो विधायक प्रयत्न सुरू केलेला आहे तो ख-या अर्थांने यशस्वी होईल, आणि कोंकण विकास परिषदेच्या मार्गदर्शनाचा पाठपुरावा या राज्याचे दुसरे विभागहि करतील अशी मी आशा करतों. कारण कोंकणचा विकास व्हावा हें जसें माझ्या मनांत आहे, त्याचप्रमाणें या राज्यांतील प्रत्येक विभागाचा विकास व्हावा अशी आपली अपेक्षा असली पाहिजे. प्रादेशिक विकासाच्या पाठीमागची हीच कल्पना आहे. नुसता देश मोठा होऊन भागत नाहीं, तर वेगवेगळ्या ठिकाणीं, वेगवेगळ्या घरांत राहणारा माणूस विकसित झाला पाहिजे. विकासाच्या पाठीमागची आमची ही भूमिका आहे. आणि याच विचाराच्या भूमिकेवरून आम्ही हा प्रयत्न करीत आहोंत. मला माझ्या मर्यादेंत शक्य होईल तें सहकार्य माझ्याकडून आपणांला मिळेल असें मी आपणांला आश्वासन देतों आणि आपण हा सुरू केलेला प्रयत्न ख-या अर्थानें होवो अशी प्रार्थना करून या परिषदेचें उद्घाटन झालें असें मी औपचारिक रीत्या जाहीर करतों.

## तिस-या पंचवार्षिक योजनेच्या उंबरठ्यावर

विदर्भाच्या विभागीय विकास परिषदेच्या सभेस हजर राहण्याचा आजचा माझा हा पहिलाच प्रसंग आहे. आज या सभेला या विभागाचे विधान परिषदेंतील, विधान सभेंतील आणि लोकसभेंतील सर्व

प्रतिनिधि हजर असतांना मला येथें उपस्थित राहण्याची ही संधि मिळाली त्याबद्दल व्यक्तिशः मला फार आनंद वाटतो. नवराज्याच्या निर्मितीनंतर विकासाच्या बाबतींत जे कांहीं तात्त्विक व शासकीय प्रश्न आपल्यापुढें उभे राहिले आहेत त्यासंबंधींचे माझे विचार मी आपल्यापुढें मांडूं शकलों तर ते उपयुक्त होतील असें वाटल्यावरून या सभेचें आमंत्रण मीं मोठ्या आनंदानें स्वीकारलें. दुसरी गोष्ट अशी कीं, नवमहाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रांतील ह्या प्रमुख शहरांत मी प्रथमच येत आहें. त्या दृष्टीनेंहि तुमच्या आणि माझ्या भेटीला मी अधिक महत्त्व देतों.

गेल्या तीन-साडेतीन वर्षांच्या काळांत विकासविषयक कार्यांत जी प्रगति झाली त्या प्रगतीचा संपूर्ण आढावा घेणारा महत्त्वाचा अहवाल डॉ. शेख यांनीं आतांच आपल्यापुढें ठेवला आहे. त्यांतील कांहीं गोष्टी आपल्याला परिचित असतील, तर कांहीं कदाचित् नवीनहि असतील. परंतु अशा सभेच्या वेळी कार्याचा संकलित आढावा घेणें आवश्यक असल्याकारणानें महत्त्वाच्या कार्यक्रमाची रूपरेषा अहवालाच्या रूपानें आपल्यापुढें ठेवण्यांत त्यांनी औचित्य दाखविलें आहे यांत शंका नाहीं. या अहवालांत मला आणखी भर घालतां येणार नाहीं असें नाहीं, पण केवळ अहवालामध्येंच आपला सर्व वेळ घालवावा असें मला वाटत नाहीं.

गेल्या वर्षी दुस-या पंचवार्षिक योजनेच्या प्रगतीचा आम्ही विचार करीत होतों तेव्हां, त्यावेळच्या मुंबई राज्याच्या निरनिराळ्या विभागांमध्यें विविध योजनांवर व्हावयाच्या खर्चाचे इष्टांक तरी पुरे व्हावे या दृष्टीनें, खर्चाची फेरवांटणी-रिॲलोकेशन-करून कांहीं नवीन कार्यक्रम हातीं घ्यावा असें आम्हीं ठरविलें. त्यादृष्टीनें आम्हीं ज्या योजना आंखल्या, त्यांमध्यें किती तरी नवीन गोष्टी समाविष्ट करण्यांत आल्या. अर्थात् अशा गोष्टी समाविष्ट करतांना त्या त्या विभागाच्या गरजा व तेथील शासकीय तयारी या बाबीहि लक्षांत घेण्यांत आल्या होत्या.

विदर्भ विभागांतहि याप्रमाणें कांही नवीन प्रकल्प हाती घेण्यांत आले आणि खर्चाच्या प्रमाणाच्या दृष्टीनें त्याचे इष्ट ते परिणामहि दिसून आले. यांतील कांहीं गोष्टींचा येथें उल्लेख करणें अयोग्य होणार नाहीं. पूर्वी ज्या गोष्टी विदर्भाच्या योजनेमध्यें नव्हत्या, परंतु ज्या असणें आवश्यक होतें त्यांपैकीं पाटबंधारे, रस्ते वगैरेसाठीं केलेल्या पांच कोटि रुपयांच्या जादा तरतुदीचा मी प्रथम उल्लेख करूं इच्छितों. याशिवाय खर्चाचे इष्टांक साध्य करण्याच्या कामीं ज्या योजना साहाय्यभूत ठरल्या त्यांचाहि निर्देश केला पाहिजे. ग्रामपंचायतींना खर्चाच्या २५ टक्के मदत करण्याचें धोरण या दृष्टीनें नमूद करण्यासारखें आहे. ह्या एका गोष्टींसाठी ४० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली. ही गोष्ट नव्यानेंच करण्यांत आली असून पूर्वीच्या मध्यप्रदेश राज्यांत अशी तरतूद नव्हती. मध्यंतरी प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत अनवस्था निर्माण झाली होती. विशेषतः विदर्भामध्यें हा

प्रश्न लवकर सोडविला पाहिजे असें मला तीव्रतेनें वाटत होतें. यांतून मार्ग काढण्याचा मी प्रयत्न करीत होतों. पण कांहीं शासकीय अडचणींमुळें हा प्रश्न सोडविण्यास थोडा विलंब लागला. त्यामुळे प्राथमिक शिक्षकांना, विशेषतः विदर्भांतील शिक्षकांना, त्रास झाला याची मला जाणीव आहे. राज्यपुनर्रचनेच्या कामामुळेंहि या विलंबांत थोडी भर पडली हें खरें असलें, तरी नवमहाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर तांतडीचा प्रश्न या दृष्टीनें हा प्रश्न हातीं घेण्यांत आला हें हि मी आपल्याला सांगूं इच्छितों. आपल्याला माहीतच आहे कीं, प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत सरासरी ९० टक्के खर्चाची जबाबदारी जनपदांनीं घेतली आहे. आणि आतां प्राथमिक शिक्षणावर जवळजवळ ३६ लाख रुपये अधिक खर्च होणार आहेत. भूसंरक्षणाची योजना ही सुद्धां अशीच एक नवीन योजना आहे. पूर्वी मुंबई राज्यामध्यें आम्हीं हा कार्यक्रम अंमलांत आणला होता. त्याचा चांगला परिणाम दिसून आल्यामुळें विदर्भांतहि तो कार्यक्रम अंमलांत आणण्याचा प्रयत्न करण्यांत आला आणि त्यासाठीं जवळजवळ ६० लाख रुपये खर्च झाले, हें आपणांस माहीतच आहे. तसेंच या विभागांतील नवीन विहिरी खोदण्याच्या कामावर ४० लाख रुपये खर्च झाले. त्याचप्रमाणें ग्रामीण विभागांस वीजपुरवठा करण्यासारखे जे कार्यक्रम विदर्भाच्या पहिल्या योजनेमध्यें समाविष्ट केले होते, पण ज्यावर झालेला खर्च अपुरा झालेला आहे असें वाटलें, असे कार्यक्रम आम्हीं हातीं घेतले व त्यांवर जवळजवळ ९० लाख रुपये खर्च करण्यांत आले. हा इतका पैसा खर्च केला याचा अर्थ, पूर्वी विदर्भांत जो खर्च होत होता त्यापेक्षां आम्हीं जास्त रक्कम खर्च केली असा नाहीं, तर खर्चाचे इष्टांक साध्य व्हावे म्हणून खर्चाची निरनिराळ्या विभागांत याप्रमाणें फेरवांटणी करण्यांत आली. या सर्व नव्या योजनांचा आढावा घेण्याच्या दृष्टीनें आम्हीं जेव्हां अधिका-यांची एक बैठक घेतली तेव्हां खर्चाचें प्रमाण कमी करण्याची जरुरी असल्याचें दिसून आलें. याचा अर्थ असा कीं, खर्चाचें इष्टांक पुरे होतील कीं नाहीं याबद्दल आतां आपणांस चिंता वाटण्याचें कारण नाहीं. या राज्याचे दुस-या पंचवार्षिक योजनेंतील खर्चाचे इष्टांक आतां पूर्ण होतील याबद्दल शंका नाहीं. अर्थात् त्यासाठीं जेथें वाट सुटल्याचें दिसून आलें तेथें बाजूची वाट धरावी लागली किंवा जेथें वाट लांबची वाटली तेथें जवळच्या वाटेसाठीं शोध करण्यांत आला.

मुंबई राज्याच्या अमदानींत कांहीं घटक एकत्र आले आणि नंतर कांहीं अलग झाले. या राज्यपुनर्रचनेमुळें आपल्या विकासाच्या कार्यक्रमाला थोडीशी खीळ बसली ही गोष्ट मान्य केलीच पाहिजे. ज्या गतीनें, निश्चयानें व चिकाटीनें विकास कार्यक्रम हातीं घ्यावयास हवा होता त्यांतहि कमतरता भासली. सरकारी नोकर, कार्यकर्ते आणि मंत्रिमंडळ या सर्वांच्याच मनांत जी एक प्रकारची अस्वस्थता होती त्याचा परिणाम विकास कार्याच्या प्रगतीवर होणें अगदी स्वाभाविक होतें. आतां मात्र मी असें सांगूं इच्छितों आणि माझी अशी धारणा आहे कीं, पुनर्रचनेचा हा खेळ आतां संपला आहे. तेव्हां आपण आतां तिसरी पंचवार्षिक योजना तरी निर्धास्तपणें पार पाडूं शकूं असें वाटतें. तिच्या अंमलबजावणीसाठीं जरूर असलेली परिस्थिति आतां निर्माण झाली आहे.

या दृष्टीनें १९६० हें वर्ष अनेक अर्थांनी महत्त्वाचें आहे. एक तर हें दुस-या पंचवार्षिक योजनेंचे अखेरचें वर्ष आहे. ह्यामुळें आजपर्यंत झालेल्या प्रगतीचें सिंहावलोकन करण्याची संधि आपणांस या वर्षी मिळणार आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे तिस-या पंचवार्षिक योजनेची तयारीहि याच वर्षात करावयाची असल्यानें त्या दृष्टीनेंहि या वर्षाला मी फार महत्त्व देतों. कारण तिस-या पंचवार्षिक योजनेचा काळ हा राष्ट्राच्या प्रगतीच्या उड्डाणाच्या तयारींतला फार महत्त्वाचा कालखंड आहे. मीं उड्डाण हा शब्द हेतुपूर्वक वापरला आहे. कारण या काळांत आपणांस आपल्या अर्थव्यवस्थेंत स्वयंप्रेरित शक्ति निर्माण करावयाची आहे. पाहिजे तर यालाच आपण आपला आर्थिक विकास म्हणूं. या दृष्टीनें भारताच्या इतिहासांत तिस-या योजनेचा हा कालखंड अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे. आपल्याजवळ जीं साधनें, जें सामर्थ्य असेल आणि त्याचप्रमाणें आपल्या ज्या मर्यादा व दोष असतील त्या सर्वांचा आपण आपल्या मनाशीं आढावा घेऊन कामाच्या तयारीला लागलें पाहिजे.

या दृष्टीनें, येथें बसलेल्या विभागीय विकास परिषदेच्या सर्व सभासदांना मी सांगूं इच्छितो कीं, आपण गेल्या तीनचार वर्षांमध्यें काय करूं शकलों किंवा काय करूं शकलों नाहीं याची मोजणी करण्याची आवश्यकता असेल तर ती आपण जरूर करा. त्यांतून दिसलेल्या दोषांची पाहणी करण्याची गरज असेल तर तीहि आपण करा. कारण विकास कार्याचा विचार करण्यासाठीं म्हणून आपण जेव्हां एकत्र बसतों. तेव्हां केवळ उत्पन्नाच्या आणि खर्चाच्या आंकड्यांचाच आपण विचार करीत नाहीं तर कांही सामाजिक उद्दिष्टें नजरेपुढें ठेवून आपण या सर्व गोष्टींचा विचार करीत असतों.

ह्या सामाजिक उद्दिष्टांच्या पूर्तीसाठीं परिणामकारक अशी शासकीय यंत्रणा असणें आवश्यक आहे. विकास योजनांवर केवळ अमूक इतका खर्च झालाच पाहिजे असें ठरविल्यानें तो होत नाहीं. या संबंधांत कांही दिवसांपूर्वी एका परिषदेंत मीं जो माझा अनुभव सांगितला तोच आपणांसहि सांगतों. सुरुवातीस कांही दिवस, पाटबंधा-यांच्या कामांतील मंद प्रगतीमुळें मी अतिशय अस्वस्थ झालों होतों. राज्यांतील शेतीचा प्रश्न पाटबंधा-यांच्या कामांवर अवलंबून आहे असें मला वाटत असल्यामुळें सबंध योजनेच्या खर्चापैकीं ४०-४५ टक्के रक्कम या कामासाठीं मुक्रर करण्यांत आली. परंतु १९५६ च्या अखेरीस आणि १९५७ च्या सुरुवातीस ही रक्कम खर्च झालीच नाहीं तर काय करावयाचें अशी एक चिंता मला सतावूं लागली. अधिका-यांना बोलावून मीं त्यांना अधिक नेटानें प्रयत्न करावयास सांगितलें. दर पंधरा दिवसांनी प्रगतीचे अहवाल मला पाठविलेच पाहिजेत, अशी त्यांना समज दिली. चीफ इंजीनिअर्स, सुपरिटेंडिंग इंजीनिअर्स, सेक्रेटरी या सर्वांच्या सभा घेतल्या. त्यावेळीं मला असें वाटे कीं, मीं अशी घाई केली तर कांहीं गोष्टी घडून येतील. मीं चार महिने

असे प्रयत्न केले आणि पांचव्या महिन्यांत निराश झालों. यांत, तेथें काम करणा-या अधिका-यांची कांही दिरंगाई होती असें नाहीं. मंजूर झालेली रक्कम खर्च व्हावी अशी माझ्याप्रमाणेंच त्यांचीहि इच्छा होती. मग गाडें अडत होतें कुठें ? अधिक विचार करतां हा खर्च ज्या प्रकल्पांवर व्हावयाचा होता त्यांची प्राथमिक पाहणी, शास्त्रीय तपासणी किंवा खर्चाची मिळवणी या बाबतींत कांहींहि विचार झालेला नव्हता असें आढळून आलें. मग लक्षांत आलें कीं, एखादी योजना हातीं घेतली म्हणजे त्या योजनेची रूपरेषा तयार करण्यासाठीं दुस-या एका स्वतंत्र यंत्रणेची जरुरी असते. ही यंत्रणा तयार न करता पाच वर्षे प्रत्येक क्षणाक्षणाला जरी आम्ही चिंता करीत बसलों तरी शेवटीं आमच्या पदरांत निराशेशिवाय दुसरें कांहींहि पडणार नाहीं. विकासाच्या क्षेत्रांत ज्याप्रमाणें झालेल्या कार्याची पाहणी व अजमावणी करण्यासाठीं स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता असते त्याचप्रमाणें योजनांची तयारी करून उद्दिष्टांचा तपशील ठरविण्याकरितांहि स्वतंत्र यंत्रणेची तितकीच किंबहुना त्याहून अधिक गरज असते. आणि म्हणून पूर्वीच्या मुंबई राज्यांत सेंट्रल डिझाइन्स ऑर्गनायझेशन या नांवाची नवीन यंत्रणा उभारण्यांत आली. ही यंत्रणा कार्यान्वित होऊन सहा महिने झाल्याबरोबरही कोणतीहि चिंता न राहतां कामाची व खर्चाची प्रगति झाली असें माझ्या अनुभवास आलें.

तेव्हां हें सर्व सांगण्याचा हेतु हा कीं, आपण जेव्हां कांहीं नव्या जबाबदा-या अंगावर घेऊन सामाजिक उद्दिष्टें साध्य करण्याच्या दृष्टीनें योजना तयार करतों, तेव्हां त्या योजनांची शासकीय दृष्टीनें तपासणी करण्यासाठी विशिष्ट गरज असते. या दृष्टीनें अलीकडे, विशेषतः नवमहाराष्ट्राच्या निर्मितीनंतर, जे अनेक विचार व्यक्त झाले आहेत ते केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर सबंध भारतालाहि उपयुक्त ठरतील. या संदर्भात विशेषतः श्री. चिंतामणराव देशमुख यांनीं जी सूचना केली आहे ती मला फार महत्त्वाची वाटते. श्री. देशमुखांची सूचना अशी कीं, तिस-या पंचवार्षिक योजनेची जबाबदारी व ती उद्दिष्टें पार पाडण्याची शक्ति आपल्या यंत्रणेमध्यें कितपत आहे याची तपासणीं आतांपासून आपण केली पाहिजे आणि त्याप्रमाणें तींत आवश्यक ते बदल केले पाहिजेत. या दृष्टीनें मी स्वतः प्रयत्न करीत आहें.

हेंच मी मघाशीं पाटबंधा-यांच्या संबंधांत सांगितलें. आपल्या राज्यांतील निरनिराळ्या विभागांच्या परिषदांनीं आणि त्या त्या विभागांतील अधिका-यांनीं हातीं घेतलेलीं एखादी योजना मागें पडल्यास, ती तशी मागे कां पडली हे शोधून काढलें पाहिजे. ती त्यांची जबाबदारी आहे. आपल्या विभागांतील हातीं घेतलेल्या कामांत दिसून आलेली अपूर्णता विकास परिषदेच्या सभेंत व्यक्त केली कीं, आपली जबाबदारी संपली असें आपण मानतां कामा नये. यांत समाधान असलें तरी तें तात्पुरतें आहे. परंतु एवढ्यानें काम पुरें होणार नसून गेल्या पांच वर्षात विकासविषयक ज्या

जबाबदा-या आपण अंगावर घेतल्या त्या कां पार पडल्या नाहींत याचा आपण विचार केला पाहिजे. त्याचबरोबर हा अधिकारी चांगला नाहीं, तो अधिकारी बरा नाहीं, हा लोकांचे ऐकत नाहीं, तो आमचें ऐकत नाहीं, अशा प्रकारची उधळ टीका करणेंहि योग्य नाहीं. ही वरवरची टीका झाली. जोंपर्यंत आपण एकमेकांवर विश्वास ठेवीत नाहीं किंवा परस्परांशी सहकार्य करीत नाहीं तोंपर्यंत देशाच्या भवितव्याबद्दल न बोललेलेंच बरें. एखादा सरकारी अधिकारी अत्यंत कर्तबगार असूनहि, त्याच्यामध्यें बिनसरकारी माणसांप्रमाणें दोष असूं शकतील. अखेरीस अधिकारी हाहि माणूसच आहे. तेव्हां त्याच्याहि स्वभावामध्यें दोष असणें स्वाभाविक आहे, हें लक्षांत घेऊन परस्परांनीं परस्परांवर विश्वास टाकला पाहिजे.

ही अशी वेळ आहे कीं, आपण आतां आपल्या कार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला पाहिजे. विकास कामाच्या बाबतींत आपली प्रगति कां झाली नाहीं ? विहिरींच्या बाबतींत आम्ही अपेक्षेप्रमाणें प्रगति कां करू शकलों नाहीं ? शिक्षणाच्या बाबतींत प्रगति झाली असेल तर ती कां झाली आणि झाली ती इतकीच कां झाली ? या प्रश्नांची उत्तरें आपण शोधलीं पाहिजेत. आपण प्रगति कां करू शकलों नाहीं हें तपासतांना आपण केलेली प्रगति कां करूं शकलों हेंहि तपासलें पाहिजें. अशी तपासणी केवळ विभागाच्या दृष्टिनेंच नव्हे तर सबंध राज्याच्या दृष्टिनेंहि उपयुक्त ठरणार आहे. अर्थात् तपासणी करणें किंवा आढावा घेणें हें वाटतें तितकें सोपें काम नसून तें एक मोठें शास्त्र आहे. कांहीं अधिका-यांना तपासणीचे अधिकार हवे असतात. पण काय तपासलें म्हणजे चूक सांपडेल, काय विचारलें म्हणजे परिस्थितीची बरोबर कल्पना येईल, हें तपासणी करणा-याला समजलें पाहिजे. केवळ तपासणीचे अधिकार मिळाल्यानें ह्या गोष्टी जशा समजत नाहींत, तसेंच वरवर पाहणी करूनहि त्या कळत नाहींत. त्या समजण्यासाठीं कामाच्या अंतर्गत पद्धतीची माहिती करून घेण्याचा अधिका-यांनी परिपाठ ठेवला पाहिजे. योजनांच्या बाबतींतहि हें लागू असल्याकारणानें त्याकरितां एक पद्धत निश्चित करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोंत.

मला एक गोष्ट स्पष्ट करावयाची आहे ती ही कीं, या वर्षाचे आणखी कांही महिने आपल्याला प्राथमिक तयारींत घालविणें आवश्यक आहे. दुस-या पंचवार्षिक योजनेचा जो भाग आपण पार पाडला आहे त्याची पाहणी करणें आणि जे पुरा करूं शकलों नाहीं त्याचीं कारणें शोधून काढणें हा या प्राथमिक तयारीचा पहिला भाग आहे, आणि तिस-या पंचवार्षिक योजनेच्या पूर्वतयारीचा विचार करणें हा दुसरा भाग आहे. विकास कार्याच्या बाबतींत कमिशनर डॉ. शेख यांना अतिशय आस्था आहे. हें काम वेगानें पुरें झालें पाहिजे यासाठीं त्यांचे प्रयत्नहि असतील. विदर्भाला त्यांच्यासारखा विकासाच्या कामांत लक्ष घालणारा अधिकारी मिळाला आहे. तेव्हां त्यांच्या मार्गदर्शनाखालीं विदर्भाच्या विकास योजना जलद गतीनें पु-या होतील अशी मी आशा करतों. त्या तशा झाल्या

नाहींत तर डॉ. शेख यांना दोष न देतां विकासाच्या यंत्रणेंतच कांहीं दोष आहे असें मी समजेन. म्हणूनच मीं जें मघाशी सांगितले तेंच पुन्हा एकदां सांगतो कीं, हें दुस-या पंचवार्षिक योजनेचें शेवटचें वर्ष फार महत्त्वाचें आहे.

तिस-या पंचवार्षिक योजनेच्या दृष्टीनेंहि कांहीं महत्त्वाच्या गोष्टी मला सांगितल्या पाहिजेत. अर्थात् आपल्या तिस-या योजनेचें स्वरूप भारताच्या तिस-या योजनेच्या स्वरूपावर अवलंबून राहील हें खरें आहे. भारताच्या तिस-या योजनेकडे आपण पाहिलें तर आपल्याला असें दिसून येईल कीं, ह्या योजनेमध्यें बेसिक इंडस्ट्रीजवर म्हणजे मूलभूत उद्योगधंद्यांवर अधिक भर देण्यांत येत आहे. त्यांवर एकंदर योजनेच्या किती टक्के खर्च केला जाणार आहे वगैरे तपशिलांत मी शिरत नाहीं. कारण, त्यांत अनेक गुंतागुंतीचे प्रश्न आहेत. परंतु एक गोष्ट मात्र खरी कीं, ज्याला उद्योगप्रधान योजना किंवा इंडस्ट्रियल प्लॅन म्हणतात अशा योजनेची भारताला आवश्यकता आहे. पण त्याचबरोबर हेंहि खरें आहे कीं, भारताची औद्योगिक योजना शेतीकडे दुर्लक्ष करून पुढें जाऊं शकत नाहीं. किंबहुना शेती हा एक अत्यंत महत्त्वाचा उद्योगधंदा किंवा व्यवसाय आहे हें गृहीत धरूनच आपण आपली औद्योगिक योजना आंखली पाहिजे.

मूलभूत उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें ह्या विभागासाठीं आपण काहीं खास गोष्टी मागितल्या पाहिजेत असें मला वाटतें. कारण हे जे मूलभूत उद्योगधंदे आहेत त्यांपैकीं कांहीं उद्योगधंद्यांवर महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था साकार होणार आहे. अशा उद्योगधंद्यांना महाराष्ट्राच्या इतर भागांत जितका वाव आहे त्यापेक्षां अधिक वाव विदर्भांत आहे. विशेषतः पोलाद किंवा लोखंड यासारख्या धंद्याला येथें अधिक वाव आहे. कारण या धंद्याला लागणारी कोळशासारखी खनिज साधनसामुग्री नागपूरच्या आसपास विपुल प्रमाणांत सांपडते. म्हणून अशा प्रकारचे मूलभूत उद्योगधंदे विदर्भांत उभारावे असा आग्रह धरण्याची महाराष्ट्र सरकारची इच्छा आहे. परंतु त्याचा पाठपुरावा करणें, त्यासाठीं तयारी करणें, हें काम आपल्याला करावयाचें आहे. विशेषतः कच्च्या लोखंडाचा कारखाना चांद्याच्या जवळपास काढण्याचा महाराष्ट्र सरकारचा मानस आहे. अर्थात् आपण आग्रहानें ही मागणी केली पाहिजे. या भागास एखादा कारखाना द्यावा किंवा काय यासंबंधीं भारत सरकार विचार करीत असल्याचें कळतें. आम्ही या विचाराचें स्वागत करीत आहोंत आणि त्याचबरोबर हा विचार प्रत्यक्ष्यांत यावा म्हणून प्रयत्नहि करीत आहोत. हा कारखाना आपल्या पदरांत पडेल अशी आम्हांला आशा आहे. पण त्याचबरोबर हा कारखाना आपण कशासाठीं मागत आहोंत याचीहि आपल्याला स्पष्ट कल्पना असली पाहिजे. अर्थात् त्यांत या विभागाचा विकास व्हावा हा उद्देश तर आहेच. पण त्यापेक्षांहि अधिक महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, सबंध देशाच्या प्रगतीच्या कार्यांत नव्या महाराष्ट्राला सहभागी होण्याची उत्सुकता आहे, घाई आहे. आम्हांला ही तळमळ आहे

म्हणूनच आम्ही या कारखान्याची मागणी करीत आहोंत. विकास परिषदेनें सुद्धां ही भावना ध्यानांत ठेविली पाहिजे असें मला वाटतें म्हणून मीं या गोष्टीचा आपल्यापुढें उल्लेख केला.

आपण जेव्हां मोठ्या उद्योगधंद्यांसंबंधी बोलतों तेव्हां आपलें छोट्या उद्योगधंद्यांकडे दुर्लक्ष होतें, असें मला वाटतें. माझ्या मतें छोट्या उद्योगधंद्यांचे महत्त्व आपल्या या भागामध्यें विशेष आहे. मघाशीं मीं सांगितलें कीं, शेतीचा धंदा हा एक प्रमुख व महत्त्वाचा धंदा आहे. परंतु ज्यांना दुसरें कांहींच करतां येत नाहीं, समजत नाहीं, अशांचा हा धंदा आहे, तो अडाणी लोकांचा सामान्य लोकांचा धंदा आहे असें समजलें जातें हें मोठें दुर्दैव आहे. या समजुतीमुळेंच आम्हीं आमची आर्थिक आत्महत्या करून घेतली आहे. तेव्हां या बाबतींत आपला दृष्टिकोन काय आहे हें महत्त्वाचें आहे. आपण विदर्भाच्या शेतीचा विचार करूं. एक गोष्ट खरी कीं, विदर्भांतील शेती ही इतर भागांतील शेतीच्या मानानें कांहीं बाबतींत बरी आहे. या भागांतील जमीन काळी कपाशीची जमीन आहे. परंतु जमीन सुपीक आहे असें नुसतें म्हटल्यानें भागत नाहीं. या जमिनींत कांही व्यापारी पिकें निघतात. मी विदर्भांतील शेतक-यांशीं या बाबतींत बोललों तेव्हां त्यांच्या बोलण्यावरून असें दिसून आलें कीं, तीन वर्षांपैकीं एक वर्ष चांगलें, दुसरें सामान्य बरें आणि तिसरे वाईट असतें, आणि चौथें कसे येईल हें सांगता येणें कठीण असतें. अशी ही येथील शेतीची परिस्थिति आहे. त्यांत आणखी आम्हीं ज्या व्यापारी पिकाचें म्हणजे कपाशीचें उत्पादन करतों त्यामध्यें सट्टेबाजी फार आहे. या सट्टेबाजीवरच या पिकाची किंमत अवलंबून असते. कपाशीच्या बाबतींतील ही सट्टेबाजी एकट्या भारतीयाचेंच नव्हे, तर सा-या दुनियेचें दुर्भाग्य आहे. अशा अनिश्चित प्रकारच्या जागतिक बाजारामध्यें आम्ही आमचा माल नेतों आणि अस्थिर परिस्थितीमुळें आमच्या हातीं काय लागतें, तर ही अनिश्चित शेतीची अर्थव्यवस्था ! या परिस्थितींतला हा असा मूलभूत दोष आहे.

विदर्भामध्यें काय किंवा उरलेल्या महाराष्ट्रामध्ये काय, कांहीं जमीन जरूर चांगली आहे. कृष्णाकांठची जमीन, किंवा नाशिकजवळची काळी कपाशीची जमीन, किंवा मराठवाड्यांत परभणी-नांदेडकडील जमीन, ही सर्व जमीन सुंदर आहे. पण केवळ चांगली काळी जमीन आहे म्हणून शेतीबाबतचे सर्व प्रश्न सुटलेले नाहींत, सुटणारहि नाहींत. याचें कारण काय ? पंजाबप्रमाणें आपल्या जमिनीला भरपूर पाणी मिळत नाहीं हें त्याचें कारण आहे. पंजाबला पाण्याचा जो भरपूर पुरवठा आहे त्याचें कारण पंजाबच्या वाट्याला वर्षांतून चारसहा महिने दुथडी भरून वाहणा-या नद्या आल्या आहेत हें आहे. परंतु आमच्या येथील गरीब शेतीला मदत करणा-या नद्यांची स्थिति तशी नाहीं. विदर्भाला काय किंवा महाराष्ट्राच्या इतर भागांना काय, भूगोलानें नद्यांचे कांही फायदे दिलेले असले तरी त्याबरोबरच त्यानें कांही तोटेहि दिलेले आहेत. आमच्या बहुतेक

नद्या एक तर पूर्ववाहिनीं आहेत किंवा दक्षिणवाहिनी तरी आहेत. या दोन्ही प्रकारच्या नद्यांचें वर्णन दोन सिस्टिममध्यें करण्यांत येतें. एक गोदावरी सिस्टिम आणि दुसरी कृष्णा सिस्टिम. विदर्भात आणि नाशिकजवळ निघणा-या बहुतेक सर्व नद्या गोदावरीला मिळतात आणि ही गोदावरी आम्ही सिरोंचाजवळ आंध्राच्या ताब्यांत देतों. तीच गोष्ट कृष्णा सिस्टिममधील नद्यांची, दक्षिण साता-याच्या सरहद्दीवर भरलेल्या सर्व नद्या आम्ही कृष्णेसह कर्नाटकच्या हवालीं करतो. म्हणजे सगळ्या नद्यांची शेपटेंच फक्त आमच्या ताब्यांत आहेत. उत्पादनाच्या दृष्टीनें महत्त्वाचे असलेले त्यांचे भाग दुस-यांच्या ताब्यांत आहेत. याचा परिणाम साहजिकच महाराष्ट्रांतील शेतीवर होतो. या दृष्टीनें पाहिले तर पश्चिम महाराष्ट्राची परिस्थिति कांहींशी बरी आहे. पण विदर्भाच्या बाबतींत ती अवघड आहे. आपल्या वांट्याला येणा-या पाण्याचा थेंबन् थेंब जरी आपण वापरला तरी पंधरा ते वीस टक्के एवढीच जमीन आपण पाटाच्या पाण्याखालीं आणूं शकतो. याचाच अर्थ असा कीं, सबंध महाराष्ट्रांतील आणि विशेषतः विदर्भांतील शेतीचा प्रश्न हा कोरडवाहू शेतीचा प्रश्न आहे. तेव्हां कोरडवाहू शेतीवर आधारलेली अर्थव्यवस्था कशी प्रगत करावयाची हा तुमच्याआमच्यापुढील महत्त्वाचा प्रश्न आहे. जनतेला नवीन जीवनानें सजविलें पाहिजे, जनतेपुढें नवे आदर्श निर्माण केले पाहिजेत असें आपण आग्रहाने सांगतो. पण केवळ शब्दांच्या फुलो-यानें हें होत नाही. नाटकांतील राजाच्या आज्ञा जेवढ्या परिणामकारक ठरतात तितकेच परिणामकारक शब्दांचे हे फुलोरेहि ठरतील. तेव्हां यांतून मार्ग काढण्यासाठी स्वयंप्रेरित, स्वयंचलित अशा शक्ति आपण निर्माण केल्या पाहिजेत. कोरडवाहू शेतीचा प्रश्न सोडवायचा असेल तर आपल्याला फार मोठ्या प्रमाणावर छोट्या छोट्या विहिरी काढाव्या लागतील, त्या दृष्टीनें आपण आतां विचार केला पाहिजे.

शेतीसंबंधी एवढें सांगितल्यावर, आतां उद्योगधंद्यांच्या प्रश्नाकडे वळूं. अशी एक सर्वसाधारण समजूत आहे कीं, धनपतींच्या भांडवलाच्या मदतीनें आणि त्यांच्या मेहेरबानीनेंच मोठमोठाले कारखाने निघूं शकतात. पण ही समजूत खरी नाहीं, जेथें जेथें आवश्यक असा कच्चा माल मिळतो तेथें तेथें भारत सरकार कारखाने काढतें हें आपल्याला माहीतच आहे. हीच गोष्ट अर्थात् उद्योगपतींच्या बाबतींहि खरी आहे. परंतु उद्योगपतींनीं उद्योगधंदे सुरू करावेत म्हणजे आपलें कल्याण होईल अशा प्रकारची आशा ठेवून त्यावर अवलंबून राहणारा समाज प्रगत होऊं शकत नाहीं. त्यासाठीं स्वतःच्या प्रयत्नांनीं स्वतःची शक्ति उपयोगांत आणून आम्हीं धडपड केली पाहिजे. गांवोगांवीं आणि शहरोशहरीं असे प्रयत्न झाले पाहिजेत. ह्या दृष्टीनें पंजाबचें उदाहरण मी उत्कृष्ट म्हणून सांगूं इच्छितो. आपल्याला माहीतच आहे कीं, मुंबई शहर हें भारतांतील एक फार मोठें भरभराटलेलें शहर आहे. या शहराचा तसा लौकिक आहे. आणि म्हणूनच आम्हीं या शहरासाठी आग्रह धरला होता. तें आतां महाराष्ट्राला मिळालें आहे. त्याचा प्रश्न नाहीं. प्रश्न आहे तो असा कीं, मुंबई शहरासह महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न पंजाबपेक्षां कमी आहे. हें असें कां? याचें

कारण अगदीं उघड आहे. पाण्यांत सतत न्हाणारी शेती आणि कुणावरहि अवलंबून न राहतां स्वतःचे दोन हात व मनगटें यांचा वापर करणारा पंजाबी माणूस यामुळेंच पंजाबची आज एवढी भरभराट झाली आहे. पंजाबमधील कांही शहरें मीं पाहिलीं आहेत. तेथें प्रत्येक घरांत रेडियो आहे. पंजाबी माणूस तसा षोकीन आहे. हे लोक चांगलें खातील, चांगले कपडे वापरतील. पण त्याचबरोबर त्यांच्या घरांत एखादा उद्योगहि चालू असलेला तुम्हांला दिसेल. त्यांचें एक एक घर म्हणजे एक एक छोटासा कारखाना आहे. त्यांचें एक एक दुकान म्हणजे मालाच्या विक्रिवर केवळ कमिशन मिळविण्याची जागा नव्हे. तेथें तुम्हांला एखादा 'लेथ' दिसेल, लहानसा कारखाना दिसेल, त्यांत दहापांच माणसें सारखीं काम करतांना दिसतील. मुंबईतील मोठमोठ्या कारखान्यांत लागणा-या छोटया वस्तू पंजाबमधील छोटे कारखानदार पुरवीत असतात असें मला आढळून आले. मुंबईमध्यें चढाओढीनें काम करणा-या या कारखान्यांना सुद्धां पंजाबमधल्या छोट्या कारखान्यांत तयार होणारा माल घ्यावयाला परवडतो ही गोष्ट महत्त्वाची आहे.

तेव्हां प्रश्न आहे तो माणसाच्या कर्तृत्वाचा. हें कर्तृत्व जागृत करून, वाढवून आपण कामाला लावलें पाहिजे. कोरडवाहू शेती हें आपल्या दृष्टीनें एक मोठें ओझें झालें आहे. त्याला अशा कर्तृत्वाची जोड मिळाली पाहिजे. तुमचीआमची सगळी शक्ति एकवटून, असेल तें सर्व सामर्थ्य एकत्र करून या नव्या राज्याची प्रगति करण्यासाठीं आपण सारखें झटलें पाहिजे. हीच आपल्या दृष्टीनें मूलभूत महत्त्वाची बाब आहे.

मनामध्यें एखादी गोष्ट व्हावी असें वाटणें आणि प्रत्यक्ष ती घडण्याची शक्यता असणें यामध्यें फार फरक आहे. मोठमोठ्या रकमांची वांटणी करण्याचा जेव्हां प्रश्न उपस्थित होतो तेव्हां निरनिराळ्या भागांतील गोष्टींचा अग्रहक्क आणि हा खर्च करण्यासाठीं उपलब्ध असलेली यंत्रणा यासंबंधींचा विचार आपणांस प्रथम करावा लागतो. त्यामुळें आपल्या मनांत असलेल्या गोष्टी प्रत्येक वेळी घडून येतीलच असें नाहीं. मीं मघाशीं सांगितलें त्याप्रमाणें समाजांतील कर्तृत्व जागें करून आपण एक कर्तृत्ववान समाज निर्माण केला पाहिजे. त्यासाठीं आवश्यक त्या सोयी उपलब्ध करणें, सवलती देणें हें शासनाचें काम असून शासन ते करीत आहे. सरकारनें औद्योगिक वसाहतींची योजना तयार केली आहे. पण औद्योगिक वसाहती संपूर्ण तयार होण्यास वेळ लागतो. लोकांनींच पहिल्याने पुढें आलें पाहिजे. या बाबतींत शासनाला काय करतां येईल याचा मी विचार करीन. नवीन उद्योगधंदें सुरू करण्याच्या दृष्टीनें कोणालाहि प्रयत्न करण्यास प्रत्यवाय नाहीं. उद्योगधंद्यांच्या वाढीस अनुकूल अशी परिस्थिति आज हिंदुस्तानांत निर्माण झालेली आहे, त्याचा आपण फायदा घेतला पाहिजे. थोडीशी जमीन आणि वीज यांच्या साहाय्यानें हें करतां येण्यासारखें आहे. म्युनिसिपालिट्या, बँका यांना हें काम करतां येईल. लोकांची अशी कल्पना आहे कीं,

औद्योगिक वसाहत ही केवळ सरकारनेंच स्थापन केली पाहिजे. ही कल्पना चुकीची आहे. शासनाचें जें सहकार्य लागेल तें देण्यास शासन तयार आहे.

या दृष्टीनें प्रयत्न करण्याची सरकारची इच्छा आहे. या बाबतींतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षणाची वाढ ही होय. शिक्षणाची वाढ करणें हें महाराष्ट्र राज्याचें मी एक ध्येय मानतों. विदर्भांत शिक्षणाच्या ज्या सवलती आहेत त्या तर आम्ही कायम ठेवणारच आहोंत पण त्याशिवाय ह्या सवलती जितक्या वाढवितां येतील तितक्या वाढविणार आहोंत. येत्या बारा ते पंधरा वर्षांच्या काळामध्यें शिक्षणाचा हा प्रचंड प्रवाह महाराष्ट्रांतील प्रत्येक शहरांत व प्रत्येक खेड्यांत पोहोंचला पाहिजे आणि त्यांतून खेड्यांतील नवीन पिढी सुशिक्षित झाली पाहिजे. शिक्षणद्वारा होणारी ही क्रांति झालीच पाहिजे. असें एकहि घर राहतां कामा नये कीं, जेथें उच्च शिक्षणाची संधि पोहोंचलेली नाहीं. ही शैक्षणिक क्रांति समाजामध्यें अशी जबरदस्त शक्ति निर्माण करील कीं, ती शक्ति आपल्याला गप्प बसूं देणार नाहीं. अडाणीपणाबरोबर भित्रेपणाहि येतो. परंतु ज्यावेळीं साठसत्तर टक्के समाज सुशिक्षित असतो, त्यावेळी तो कुणापुढेंहि नमतें घेत नाहीं. खरें-खोटें, योग्य-अयोग्य, हिताचें-गैरहिताचें हें सर्व तो आपल्या शिक्षणाच्या तराजूवर तोलून बघतो. घराघरामध्यें असे तराजू लागल्यावर जें घडेल तें चांगलेंच असेल. अशी परिस्थिति निर्माण करण्याच्या आणि त्याचबरोबर समाजाला उन्नत करण्याच्या प्रतिज्ञेला महाराष्ट्र राज्य बांधलेले आहे. अशी जबरदस्त सामाजिक शक्ति निर्माण झाली म्हणजे ती या समाजाला, राज्याला व राष्ट्राला प्रगतीच्या दिशेनें पुढें रेटल्याशिवाय राहणार नाहीं अशी माझी धारणा आहे. या सामाजिक शक्तीबरोबरच ज्या प्रमाणांत वाढ करतां येईल त्या प्रमाणांत सहकारी संस्थांचीहि वाढ केली पाहिजे.

आज आपण तिस-या पंचवार्षिक योजनेच्या उंबरठ्यावर उभे आहोंत. नव्या प्रयत्नांच्या उंबरठ्यावर उभे आहोंत. आपलें नवें राज्यहि आज नव्या प्रवेशद्वाराशीं उभें आहे. आपल्या सर्व साधनांचा, आपल्या सर्व सामर्थ्यांचा आणि आपल्या मर्यादांचाहि अंदाज घेऊन आपल्याला आतां पुढें जावयाचें आहे. अशा वेळीं सिंहावलोकन करणें आणि पूर्ण झालेल्या कार्याची मोजणी करणें याची फार आवश्यकता आहे. आणि त्या हेतूनेंच मी आज येथें आलों आहे.

मी माझ्या कल्पनेप्रमाणे आपल्यापुढें हा विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आपण विदर्भाच्या वेगवेगळ्या भागांतले विचारवंत आणि कर्तबगार कार्यकर्ते आहांत. आपण हातीं घेतलेलें कार्य ही एक राष्ट्रीय समस्या आहे व ती राष्ट्रीय दृष्ट्या सोडविणें हें आपणां सर्वांचे कर्तव्य आहे ही भावना सदैव मनांत बाळगून आपण आपल्या कार्यास लागूं या.

आपण या भावनेनें कार्य केलें तरच महाराष्ट्र मोठा होईल. आणि महाराष्ट्र मोठा होईल तो केवळ स्वतःसाठी नव्हें तर राष्ट्राला मोठें करण्यासाठीं. तो राष्ट्राचा सदैव एकनिष्ठ सेवकच राहील. महाराष्ट्र ही भावना कधीहि विसरणार नाहीं, दुस-यांनाहि तो कधीं तो विसरूं देणार नाही. आमचे सगळे प्रयत्न या महान् देशाच्या उत्थानासाठीं आहेत ही भावना आपण जागृत केली पाहिजे. महाराष्ट्राचे उपासक या दृष्टीनें आपण या सर्व प्रश्नांकडे पाहिलें पाहिजे आणि सेवकाच्या भावनेनेंच आपण या महान् कार्याला हात घातला पाहिजे. मी हें सर्व अशासाठीं सांगतों आहें कीं, या महान् कार्यातील आपलें स्थान आपल्या सदैव लक्षांत राहावें, त्याची आपणांस सदैव जाणीव असावी.

मला आशा आहे कीं, हे जे विचार मीं आपल्यापुढें मांडले त्यांचा आपण विचार कराल. कदाचित् आपण तो तसा केलाहि असेल, कारण आपण सर्वजण विचारवंत कार्यकर्ते आहांत. मीं आपल्याला कांहीं नवीन सांगितलें अशांतला भाग नाहीं. मीं फक्त माझे विचार माझ्या पद्धतीनें आपल्यासमोर मांडले. त्यांचा विचार करून आपण विकासाच्या कामाला लागा एवढीच विनंती आहे.

विदर्भातील ही विकास परिषद महाराष्ट्र राज्यांत विकासाला साहाय्यभूत होणारी एक महान् संस्था ठरावी अशी प्रार्थना करून मी माझें भाषण संपवितो.

## लोकशाहींतील नियोजन

नियोजनासंबंधींचा आमचा दृष्टिकोन मी आज आपल्यासमोर मांडूं इच्छितों. आमची नियोजनासंबंधींची भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. योजनेच्या निर्मात्यांनीं संमिश्र अर्थव्यवस्था पायाभूत मानून या योजनेची उभारणी केलेली आहे. या अर्थरचनेंत सरकारी क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र या दोहोंचीहि वाढ होत असली तरी सरकारी क्षेत्राची वाढ जास्त जोमदारपणें होत आहे. या संमिश्र अर्थव्यवस्थेमुळें, जिच्या गर्भांत समाजवादी क्षेत्राची निश्चितपणें वाढ होत आहे अशी एक अर्थरचना तयार होत आहे. भांडवलशाही अर्थरचनेपेक्षां अगदीं वेगळ्या प्रकारची अशी ही अर्थरचना या देशांत वाढीला लागली आहे. पोलाद, लोखंड, वीज, जळण यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या मूलभूत उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत ही समाजवादी अर्थरचना वाढीला लागली असून, तिची मुळें त्या धंद्यांत पक्की होत आहेत. या अर्थरचनेची झालेली वाढ आणि तिचे समाजावरील परिणाम अद्यापि समाधानकारक नाहींत हें म्हणणें कांही अंशानें खरें असेल, परंतु मला त्याबद्दल वाद घालावयाचा नाहीं. मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, लोककल्याणकारी राज्य निर्माण करणें आणि

समाजाच्या सर्व थरांमधील सर्व प्रकारची विषमता नष्ट करणें हें जें आमचें अंतिम ध्येय आहे त्याच्याकडे जाण्याचा एक निश्चित असा मार्ग या अर्थरचनेमुळें तयार होत आहे. आणि त्या मार्गावरील आमच्या वाटचालींत होत असलेली प्रगति हीच या योजनेच्या यशस्वितेची खरी कसोटी आहे.

आमचें राष्ट्रीय उत्पन्न वाढलें आहे ही गोष्ट खरी, परंतु वाढलेल्या उत्पन्नाचें काय होत आहे हें पाहिलें पाहिजे. आपले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं लोकसभेंत हा प्रश्न उपस्थित केला असून या प्रश्नासंबंधानें त्यांच्या सूचनेप्रमाणें एक चौकशी समितीहि नेमली जाणार आहे. मी तर याहि पुढें जाऊन असें म्हणेन कीं, राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी योग्य प्रमाणांत होत आहे किंवा नाहीं यावर देखरेख ठेवण्याकरितां योजनेच्या कार्याच्या अंतर्गत एक कायमची यंत्रणाच निर्माण करण्यांत आली पाहिजे. त्याशिवाय आमची योजना समाजवादाच्या उद्दिष्टाकडे जाऊं शकणार नाहीं.

आपल्या देशांत चाललेल्या योजनेच्या गुणावगुणांचे मूल्यमापन करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. आमची भूमिका ज्यांना मान्य नाहीं तेहि या योजनेचें मूल्यमापन आपल्या दृष्टिकोनांतून करूं शकतात, तसें करण्याचें त्यांना स्वातंत्र्य आहे. परंतु सोविएट रशियाच्या पंचवार्षिक योजना कशा चालल्या होत्या? सोविएट रशियामध्यें या योजना चालू असतांना स्टॅलिनला कोणीहि विरोध करूं शकत नव्हता. ज्या साधनांनीं स्टॅलिननें आपल्या योजना कार्यान्वित केल्या तशीं साधनें आपल्याजवळ नाहींत. एक नवीन मार्ग आंखून आम्ही आमची आर्थिक रचना उभी करीत आहोंत. त्या बाबतींत मतभेद होणें संभवनीय आहे. पण आपल्याला एका मर्यादित क्षेत्रामध्यें विचार करावयाचा आहे. एका विशिष्ट त-हेनें एका सबंध आर्थिक रचनेचें रूप बदलून टाकावयाचें आहे. राष्ट्रीय उत्पन्न आणि कल्याणकारी राज्य यांचा संबंध जोडून या नियोजनाच्या बाबतींत टीका केली जाते. मजुरांची काय स्थिति आहे, ते अन्न किती खातात, त्यांना किती कपडा लागतो, त्यांच्या राहण्याची परिस्थिती कशी आहे याची चौकशी करा, असें पुष्कळ वेळां म्हटलें जातें. तसें पाहिलें तर आमच्या मजुरांची परिस्थिति बरी आहे. सोविएट रशियामधील शेतक-यांना व मजुरांना कसें काय वागवितात, आपल्याला काय माहीत? परंतु सोविएट रशियाच्या पंचवार्षिक योजना आणि आपल्या पंचवार्षिक योजना यांची तुलना करणें योग्य होणार नाहीं, तशी तुलना होऊं शकत नाहीं. मी अपेक्षा करतों कीं, आपल्या योजनांकडे निराळ्या दृष्टिकोनांतून पाहिलें जाईल. आपण एका संमिश्र काळामध्यें काम करीत आहोंत. अशा काळामध्यें उद्योगधंद्यांची जी वाढ होते, औद्योगिक क्षेत्राचा जो विकास होतो, ती वाढ आणि तो विकास समाजवादी स्वरूपाचा म्हणजे

समाजाच्या हितासाठीं होतो किंवा नाहीं हें आपणांस पाहावें लागतें. महत्त्वाचा प्रश्न आपल्यापुढें असा आहे कीं, आपल्या नियोजनाचे परिणाम काय होणार आहेत?

आमच्याजवळ जीं साधनें उपलब्ध आहेत तीं घेऊन आम्हांला नव्यानें एक आर्थिक शक्ति उभी केली पाहिजे. खाजगी क्षेत्रामध्यें विकासाच्या ज्या शक्ति आहेत त्यांचाहि उपयोग आम्हीं केला पाहिजे. संमिश्र आर्थिक रचना करीत असतांना आमच्याजवळ जीं जीं साधनें असतील तीं सर्व साधनें वापरून तिच्या पाठीमागें सामर्थ्य उभें करावें लागतें. केवळ सरकारी क्षेत्र समर्थ झालें कीं समाज पुढें जाणार आहे काय हा प्रश्न आहे. भोंवतालची जी परिस्थिती असते तिचाहि विचार करावा लागतो. यासंबंधींची माहिती आपल्या ह्या तिस-या पंचवार्षिक योजनेच्या पुस्तकांत जें टिपण दिलेलें आहे त्यामध्यें सांपडेल. सरकारी क्षेत्राची आणि खाजगी क्षेत्राची वाढ कशी झाली याची माहिती त्यांत दिलेली आहे. पहिल्या योजनेंत सरकारी क्षेत्रांसाठीं १९६० कोटि रुपये व दुस-या योजनेमध्यें ४६०० कोटि रुपये मंजूर झाले होते, तर तिस-या योजनेंत सरकारी क्षेत्रासाठीं ७२५० कोटि रुपये मंजूर करण्यांत येणार आहेत. खाजगी क्षेत्रासाठीं पहिल्या योजनेंत १८०० कोटि रुपये व दुस-या योजनेंत ३१०० कोटि रुपये मंजूर झाले होते, आणि आतां तिस-या योजनेंत खाजगी क्षेत्रासाठीं ४००० कोटि रुपये मंजूर होणार आहेत. याचा अर्थ असा की, खाजगी क्षेत्रापेक्षां सरकारी क्षेत्राची वाढ वेगानें होत आहे. समाजवादी मूल्यांवर माझा विश्वास आहे. म्हणून मला आश्वासन द्यावयास हरकत वाटत नाहीं कीं, या योजनेच्या विकासाची जी गति दिसत आहे ती पर्यायानें आपल्याला समाजवादाकडे घेऊन जाणारी आहे. याबद्दल मला शंका वाटत नाहीं.

येथें एक असा मुद्दा उपस्थित करण्यांत आला कीं, योजनेमधून निर्माण होणारा फायदा समाजाच्या खालच्या थरांपर्यंत पोहोंचत नाहीं. कांहीं अंशीं या विधानाचा स्वीकार केला पाहिजे. कारण गोष्ट अशी आहे कीं, हा सगळा विकास समाजाच्या सगळ्या थरांशी नेऊन पोहोंचविणा-या ज्या शक्ति हव्यात त्या आपल्यापाशीं अजूनहि नाहींत. मला वाटतें, योजनेची आणखी प्रगति झाल्यावर विकासाची प्रगति सर्व समाजाच्या थरांपर्यंत पोहोंचते कीं नाहीं हें दिसून येईल.

शेतीच्या क्षेत्रासंबंधीं असें सांगण्यांत आलें कीं, आम्ही आमचें धोरण सोडून देतों, आमच्या धोरणाविषयीं मनांत शंका येते. सहकारी शेतीबाबत नागपूरला कॉंग्रेसनें जें तत्त्व स्वीकारलें आहे आणि ज्या योजनेचा स्वीकार केलेला आहे, त्यावर या सरकारचा विश्वास आहे, विश्वास आहे, विश्वास आहे असें मी त्रिवार सांगूं इच्छितों. येत्या नोव्हेंबरच्या अधिवेशनामध्यें सीलिंगचें बिल येईल. नागपूरच्या ठरावामध्यें जें तत्त्व मान्य केलें आहे त्याच्या पाठीमागें हाच उद्देश आहे.

सीलिंगच्या पाठीमागें जें आमचें उद्दिष्ट आहे त्यासंबंधीं वाद घालण्यांत कांहीं फायदा नाहीं. सीलिंग आल्यानंतर त्याचे काय परिणाम होतील ते दिसून येतील.

सहकारी शेतीबाबत मी सांगू इच्छितों कीं, आमच्या सन्मान्य दोस्तांचें त्यासाठीं सहकार्य मिळालें पाहिजे. सहकारी तत्त्व हें असें आहे कीं, तें प्रत्येकाच्या मनोवृत्तीवर अवलंबून आहे. सहकार द्यावयाचा कसा? सर्वसामान्यपणें सहमत असणा-या माणसांच्या मनांची त्यासाठीं तयारी करावी लागते. शेतीची जास्तीत जास्त जी शक्ति आहे आणि वापर न केल्यामुळें जी आज फुकट जात आहे ती शक्ति आपण फुकट घालवूं नये. शेतीच्या विकासाकरितां आपले मनुष्यबळ जरी वापरलें गेलें, तरीसुद्धां शेतीची निश्चित अशी सुधारणा होईल, उत्पादन वाढेल, आणि त्यामुळें या देशाची आर्थिक शक्ति वाढेल व तीहि मोठ्या जोमानें वाढेल, हें चित्र मलाहि मंजूर आहे. पण आपणांला एकूण लोकांना घेऊन जावयाचें आहे, त्यांच्या मनाची तयारी करावयाची आहे. त्यांचें मनःपूर्वक सहकार्य मिळवावयाचें आहे. ही गोष्ट आपणांला कदापि विसरून चालणार नाहीं.

उत्पादनवाढीच्या दृष्टीनें कष्टकरी जनतेसाठी जी गोष्ट कल्याणकारी असेल, आणि लोकशाही विचारांच्या कल्पनेला जर ती बाधक नसेल, तर ती मान्य करावयास मला तरी कोणतीच हरकत दिसत नाहीं. मला आर्थिक प्रगति जितकी महत्त्वाची वाटते तितकीच किंबहुना त्याहिपेक्षां जास्त लोकशाहीची मूल्ये महत्त्वाची वाटतात. या दोन्ही गोष्टींची विसंगति करून चालणार नाहीं आणि तसें करतां देखील येणार नाहीं.

आज जगामध्यें आपण असें पाहतों कीं, भांडवलशाही राष्ट्रांनी देखील आपली यथोचित आर्थिक प्रगति करून घेतलेली आहे आणि त्याचबरोबर कम्युनिस्ट राष्ट्रांनी देखील आपला आर्थिक विकास साधला आहे. परंतु या दोन्ही गटांतील राष्ट्रांच्या दृष्टिकोनांत लोकशाही पद्धतीचीं मूल्ये नव्हतीं. भांडवलशाही पद्धतीनें ज्या देशांचा विकास झाला त्या देशांना लोककल्याणाची एवढी चिंता नव्हती आणि कम्युनिस्ट पद्धतीनें ज्या राष्ट्रांनीं आपला आर्थिक विकास करून घेतला त्यांनीं देखील लोकशाहीचा हा मार्ग अंगिकारलेला नव्हता. परंतु भारत आज ज्या लोकशाहीच्या दृष्टिकोनांतून कल्याणकारी राज्याकडे जात आहे, ती दृष्टि फारच महत्त्वाची आहे. त्यांत ब-याच अडचणी निर्माण होणें स्वाभाविक आहे. पण हा एक अद्भुत असा प्रयोग आहे. अशा प्रकारचा प्रयोग आज जगांत कोणत्याहि देशांत झालेला नाहीं. सांगण्याचा मुद्दा असा कीं, भांडवलशाही राष्ट्रें आणि कम्युनिस्ट राष्ट्रें यांच्यासमोर नियोजनाच्या द्वारा आर्थिक विकास करतांना निर्माण झाली नाहीं अशी एक वेगळीच समस्या भारतासमोर आज निर्माण झाली आहे. तिचा विचार करूनच आपलें नियोजन यशस्वी झालें कीं अयशस्वी झालें याचा आपणांला विचार केला पाहिजे. आज भारताची

परिस्थिति भांडवलशाही व साम्यवादी राष्ट्रांपेक्षां अगदीं भिन्न अशी आहे. आपणांला येथें लोककल्याणाची दृष्टि ठेवावयाची आहे आणि अशी दृष्टि ठेवूनच पुढें जावयाचें आहे. मी येथें असेंहि म्हणूं शकेन कीं, आज एका अपघातानें हिंदुस्तानवर ही जबाबदारी येऊन पडलेली आहे. मी 'अपघातानें' हा शब्द या ठिकाणीं मुद्दाम वापरीत आहें. नियोजनाच्या मदतीनें आर्थिक विकासाची जबाबदारी या देशानें घेतलेली आहे. ती जबाबदारी लोकशाही मूल्यांची जपणूक करून पार पाडण्याचा प्रयत्न आपण करीत आहोंत. आपण आज एका फार मोठ्या कठीण परिस्थितीमधून जात आहोंत. कोणतीहि गोष्ट पुस्तकें वाचून आणि त्यांतील तत्त्वज्ञान सांगून होत नसते. तत्त्वांत आणि व्यवहारांत फार मोठें अंतर असतें. कोणत्याहि बाबीसंबंधानें तत्त्वज्ञान सांगणें ही एक गोष्ट आहे आणि तेंच तत्त्व अंमलांत आणणें ही निराळी गोष्ट आहे. तत्त्वज्ञानावर जास्त अवलंबून न राहतां व्यावहारिक दृष्ट्या जी गोष्ट योग्य दिसते तीच गोष्ट आपणांला आपल्या या देशाकरितां करावयाची आहे. आपणांला असेंच नियोजन करावयाचें आहे कीं, जें व्यवहारांत बसूं शकतें. आणि हाच प्रश्न फार महत्त्वाचा आहे. आम्हांला आकाशांत भरा-या मारावयाच्या नाहींत. आम्हांला जमिनीवर चालावयाचें आहे आणि येथें टिकावयाचें आहे. आणि त्याचबरोबर जमिनीवरून 'टेक ऑफ'- उड्डाण कसें करतां येईल, इकडे आमची दृष्टि सतत राहिली पाहिजे. येथें असेंहि सांगण्यांत आलें कीं आमची ही योजना विमानांत बसणारांसाठी आहे. मला याबद्दल कांहीं बोलावयाचें नाहीं. विमानांतून जावयाचें असेल तर सगळेच जण मिळून जाऊं. फायदा हा सामान्य जनतेला व्हावयाला पाहिजे. आमच्या योजनेचा उद्देशहि तसाच आहे. सामान्य जनतेला या योजनेचा फायदा होणार नसेल तर त्या 'टेक ऑफ'ला कांहींच अर्थ नाहीं. जनतेसाठीं जें कांहीं होत आहे तें शेवटीं रिऍलिटीकडेच-वास्तवतेकडेच आलें पाहिजे.

सरकारी क्षेत्राला जर या राज्यांत उत्पादनाच्या दृष्टीनें साधनें मिळूं शकतील तर तीं आवश्यक आहेत. येथें असें विचारण्यांत आलें कीं, कापड गिरण्यांच्या बाबतींत आम्ही तसें कां करीत नाहीं ? मलाहि वाटतें करावें. परंतु आम्हांला जें कांहीं करावयाचें असेल तें करण्यापूर्वी सर्व दृष्टींनीं ती गोष्ट आपणांला कोठपर्यंत फायदेशीर होईल हें पाहिलें पाहिजे. अगोदर सरकारी क्षेत्राकरितां कापड गिरण्यांचें क्षेत्र उपयुक्त आहे कीं नाहीं हें आपणांला पाहिलें पाहिजे. ही गोष्ट उपयुक्त असेल तर ती आम्ही हिंदुस्तान सरकारपुढें मांडूं इच्छितों. सरकारी क्षेत्राच्या बाबतींत निव्वळ केंद्र सरकारकडेच त्याचे सर्वाधिकार असूं नयेत. सरकारी क्षेत्राच्या बाबतींत राज्य सरकारांना देखील त्यांच्या परिस्थिती प्रमाणें त्या त्या क्षेत्रांत वाढ करण्याची संधि दिली पाहिजे. इतकें म्हणून सुद्धां सर्व गोष्टी सुरळीतपणें होतील असें थोडेंच आहे ? आपल्या मनामध्यें पुष्कळ असतें. आपण कांहीं आकाशांत राहत नाहीं. जमिनीवर राहतों. म्हणून जें कांहीं आपणांला करावयाचें आहे, त्याच्या साधनांचा देखील विचार करावा लागेल. समोरच्या माझ्या मित्रांनी माझ्या या म्हणण्याला तत्त्वतः मान्यता दिलेली आहे. त्यांनीं शिक्षणाला फार प्राधान्य दिलें गेलें पाहिजे असें म्हटलें

आहे. तें मला मान्य आहे. नियोजनाची जी मूळ कल्पना होती ती मीं आपणांस सांगितली. शेवटीं सरकारी क्षेत्रामध्यें जाण्याची आवश्यकता पडली तर या राज्याला युक्त क्षेत्र कोणतें तें आपोआप दिसेल. हिंदुस्तान सरकारनें आम्हांला संमति दिलेली आहे. आमच्याजवळ जीं साधनें आहेत त्यांचा अगोदर आम्हांला विचार करावयाला पाहिजे. मी आपणांला माझ्यातर्फे आणि तसेंच या शासनातर्फे असें सांगूं इच्छितों कीं, या गोष्टींचा आम्ही सावधपणें विचार करूं. या तिस-या पंचवार्षिक योजनेमध्यें कोठें सरकारी क्षेत्राचा फायदा होईल, तिकडे आमची जागृत दृष्टि राहील, असें मी निक्षून सांगूं इच्छितों. साधनांच्या उपलब्धतेकरितां जरूर पडली तर अभ्यास मंडळें देखील नेमूं.

येथें अभ्यासमंडळांचें नांव निघाल्यामुळें मला एक खुलासा करावासा वाटतो. वर्तमानपत्रांत जे वृत्तांत आले आहेत त्यांत सामान्यपणें असें दाखविण्यांत आलें आहे कीं, या महाराष्ट्र राज्याची योजना ७९० कोटि रुपयांची होणार असा आम्हीं नेमलेल्या अभ्यासमंडळाचा उद्देश होता. परंतु प्रत्यक्ष रूपांत कशाची शक्यता आहे आणि काय आवश्यक आहे या तत्त्वावर हा आराखडा आधारलेला आहे. तो तयार करतांना आर्थिक दृष्टिकोनांतून फारसा विचार केलेला नाहीं. समाजवादाकडे जाण्याचा नियोजन हा एक मार्ग आहे. त्या दृष्टीनें आपल्या पहिल्या दोन योजना आंखल्या गेल्या आणि त्याचप्रमाणें ही तिसरी म्हणा किंवा पुढें येणारी चौथी योजना म्हणा, आंखली जाणार आहे. ह्या राज्याची तिसरी योजना आर्थिक दृष्ट्या किती मोठी असावी याचा विचार करून योजना सादर करा असें नियोजन मंडळानें सांगितलेलें नव्हतें, अशा प्रकारचें बंधन नियोजन घातलेलें नव्हतें. आर्थिक दृष्ट्या काय शक्य आहे याचा विचार मागाहून करतां येईल असेंच नियोजन मंडळानें म्हटलेलें होतें. आर्थिक दृष्ट्या किती मोठी योजना मंजूर करावयाची तें नियोजन मंडळ ठरविणार आहे. आर्थिक दृष्ट्या अमुक एवढ्या आकाराची योजना असली पाहिजे अशा प्रकारचें बंधन आम्हीं अभ्यास मंडळावरहि घातलेलें नव्हतें. अशा प्रकारची अट घालणें इष्ट नव्हतें आणि तशी ती घालण्यांत आलीहि नव्हती. आपल्या गरजा भागविण्यासाठीं कमींत कमी कशाची जरुरी आहे आणि प्रत्यक्ष रूपांत काय शक्य आहे याचा विचार करून योजना सादर करा असें अभ्यासमंडळाला सांगण्यांत आलेलें होतें. याचा अर्थ आम्ही या योजनेंसाठीं ७९० कोटि रुपयांची मागणी करणार आहोंत असा नाहीं. आपल्या देशाच्या व राज्याच्या आर्थिक मर्यादेंत बसेल एवढीच योजना सादर करावयास पाहिजे. या प्रश्नावर आम्ही भांडूं शकत नाहीं, भांडूं इच्छीत नाहीं. दुस-या राज्याला कमी दिलें किंवा जास्त दिलें अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित करून आम्हांला भांडावयाचें नाहीं. सगळ्या गोष्टींचा फायदा कोणाला मिळतो याकरितां भांडलें पाहिजे.

योजनेसाठीं लागणारा पैसा कोठून मिळवणार हा देखील एक प्रश्न आहे. हा प्रश्न सोडविण्याच्या ज्या पद्धति आहेत त्या पद्धतींना अनुसरून हा प्रश्न सोडविला जाईल. कर्जरूपानें आणि करांच्या

रूपानें आपण रक्कम जमविली पाहिजे हें आपल्याला माहीत आहेच. आपल्या देशाच्या संविधानांत जे मार्ग सांगितलेले आहेत त्या मार्गांचा अवलंब करून उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. अर्थात् या गोष्टीचा विचार जेव्हां वेळ येईल तेव्हां करतां येईल. हा प्रश्न सोडविणें कठीण पडेल असें मला वाटत नाहीं. राज्यावर जी जबाबदारी या बाबतींत टाकली जाईल ती पार पाडली जाईल. या जबाबदारीमुळें आमच्या राज्यावर अन्याय्य ओझें पडेल असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं असें मला वाटतें. या गोष्टीचा विचार नियोजन मंडळानेंच प्रामुख्यानें करावयाचा आहे. नदी पार करून पलीकडे जावयाचें एवढें एकदां मनाशीं पक्के केल्यानंतर ती कशा प्रकारच्या पुलावरून पार करावयाची यावर जास्त भर देण्याचें कांहीं कारण नाहीं, आपल्या राज्याची तिसरी पंचवार्षिक योजना ७९० कोटि रुपयांची राहील अशा प्रकारचा उल्लेख वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्याचें मीं पाहिलें म्हणून हा सर्व खुलासा केला आहे. ज्या वेळीं ही योजना नियोजन मंडळाकडे पाठविली जाईल त्या वेळीं ही योजना ७९० कोटींची म्हणून पाठवली जाणार नाहीं, तर आमच्या किमान गरजा भागविण्याच्या दृष्टीनें तयार केलेली योजना म्हणून ती त्यांच्याकडे पाठविली जाईल. तेव्हां या बाबतींत कोणताहि गैरसमज होणार नाहीं अशी मला आशा आहे.

भूसंरक्षणासाठीं काय करण्यांत आलें आहे हा एक मुद्दा आहे. भूसंरक्षणासाठीं दुस-या पंचवार्षिक योजनेंत पहिल्यांदा २ कोटि ८० लाख रुपयांची तरतूद केलेली होती. ती नंतर वाढवून ६ कोटि ४ लाख रुपयांपर्यंत नेली. त्याचप्रमाणें छोट्या पाटबंधा-यांसाठीं पहिल्यांदा ४ कोटि ६३ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आलेली होती, परंतु प्रत्यक्ष खर्च जवळ जवळ १० कोटि रुपयांवर झाला. या तिस-या पंचवार्षिक योजनेंत १६ कोटि रुपये खर्च करण्याची आमची इच्छा आहे. शेती विकासासाठीं शेतकी क्षेत्रांत खर्च होणा-या एकूण रकमेच्या २५ टक्के एवढी ही रक्कम आहे. शेतकीच्या क्षेत्रांत एकूण ६२ कोटि रुपये खर्च होणार आहेत. पाटबंधा-यांच्या मोठ्या योजनांवर २५ कोटि ६४ लाख रुपये खर्च होणार आहेत. म्हणजे हें प्रमाण ६२ टक्के पडतें. ज्या ठिकाणीं कोरडवाहू जमीन असून पाटबंधारे होण्याची शक्यता मुळींच नाहीं परंतु कोरडवाहू शेती होण्याचीच शक्यता आहे, अशा ठिकाणी भूसंरक्षणाचा प्रश्न प्रामुख्यानें घेण्याचा सरकारचा विचार आहे. जेथें पाटबंधारे होऊं शकणार नाहींत तेथें दुस-या मार्गानें जमिनीचा विकास केला पाहिजे. पाटबंधारे होण्याची शक्यता असेल त्या ठिकाणीं पुन्हा भूसंरक्षणाच्या योजना हातीं घेण्याची आवश्यकता आहे असें वाटत नाहीं. ज्या ठिकाणीं पाटबंधारे होण्याची शक्यता नाहीं त्या पश्चिम महाराष्ट्रांत ही योजना घेण्याचा सरकारचा विचार आहे. कर्जत तें जतपर्यंतचा जो ४० लाख एकरांचा पट्टा आहे त्या पट्ट्यांत शक्य तितक्या लवकर भूसंरक्षणाची योजना पुरी करण्याचा सरकारचा विचार आहे. या पट्ट्यांत वर्षांतून दहा-बारा इंच पाऊस आणि तोहि पंचांगांतील ग्रहांनी दगा दिला नाहीं तर पडतो. मात्र चांगला पाऊस पडला तर चांगलें पीक निर्माण होतें. या कर्जत-जत पट्ट्यांत सर्व लोक भूसंरक्षणाच्या कामास लागलेले आहेत असें चित्र पाहण्याची आमची इच्छा आहे. अशी परिस्थिति

निर्माण करतां आली तर ती तिस-या पंचवार्षिक योजनेंत निर्माण करण्याची आणि हा मागासलेला भाग अधिक विकसित, अधिक गतिमान असा झाल्याचें पाहण्याची आमची इच्छा आहे.

हे अविकसित भाग इतर भागांच्या बरोबरीस येण्यासाठीं दहा वर्षांची कालमर्यादा असावी असें सांगण्यांत आलें. या बाबतींत अशी हटवादी भूमिका घेऊन चालणार नाहीं. दहा वर्षांच्या कालावधीतच या प्रदेशांचा विकास झाला पाहिजे अशा प्रकारची भूमिका घेतां येणार नाहीं. अर्थात् सर्वसाधारण कालमर्यादा म्हणून दहा वर्षांची मर्यादा सांगितली असेल तर ती बरोबर आहे. परंतु त्याचबरोबर, बाकीच्या भागांची भरपूर प्रगति झालेली आहे असें आपल्याला म्हणतां येणार नाहीं. पूर्वीच्या विदर्भ विभागाकडे मध्य प्रदेशाकडून दुर्लक्ष झाल्यानें तो अविकसित राहिला आणि हैद्राबाद सरकारच्या राजवटींत मराठवाडा विभागाकडे दुर्लक्ष झालें ह्या गोष्टी ख-या आहेत असें गृहीत धरले तरी महाराष्ट्राचा बाकीचा जो उरलेला भाग आहे तो अतिशय प्रगतिमान असा भाग आहे असें समजण्याचें कांहीं कारण नाहीं. तेव्हां आम्हांला सर्व विभागांची प्रगति करावयाची आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे.

विदर्भांत मनुष्यबळ जास्त आहे, तेव्हां त्याबाबत विचार झाला पाहिजे असें सांगण्यांत आलें. मनुष्यबळ जास्त असण्याचा मान मी फक्त विदर्भालाच देऊं इच्छित नाहीं हें मला प्रथम सांगितलें पाहिजे. कामाला लावतां येईल असें मनुष्यबळ सा-या भारतांत आहे आणि तसें तें आमच्या राज्यांतहि सर्व ठिकाणीं विपुल प्रमाणांत आहे. हा जो मनुष्यबळाचा अद्यापि उपयोगांत न आणलेला सांठा-बॅकलॉग आहे त्यावरच आपली सर्व साधनसामुग्री व शक्ति केंद्रित करण्याचा प्रयत्न केला, तर आपल्या राज्यांत जे अविकसित भाग आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष होण्याची भीति आहे. म्हणून या भागांना विकसित भागांबरोबर आणण्यासाठीं सर्वसाधारणपणें एक कालखंड ठरवून द्यावा असें जें सांगण्यांत आलें त्याप्रमाणें कालखंड ठरवून त्या भागांचा विकास झाला पाहिजे या मताचा मीहि आहें. त्याप्रमाणें कालखंड समोर ठेवून विकास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व त्याकरितां व्यवहार्य योजना आंखल्या पाहिजेत. परंतु त्यासाठीं त्या भागांत पूर्वी रस्त्यांचें मायलेज-रस्त्यांची एकंदर लांबी किती होती आणि दहा वर्षांनंतर ती किती झाली या दृष्टिकोनांतून मी पाहण्यास तयार नाहीं, किंबहुना या दृष्टिकोनांतून कोणींहि पाहूं नये. त्या भागाचा मूलतः आर्थिक विकास किती झाला हें पाहिले पाहिजे. त्या भागांत तांत्रिक शिक्षण किती वाढलें, त्या भागाचें औद्योगीकरण किती झालें ह्यावर त्या भागाचा विकास अवलंबून आहे.

सामाजिक सुखसोयींकडे दुर्लक्ष होतां कामा नये ही गोष्ट मी मान्य करतों, आणि त्यांतल्या त्यांत शिक्षणाकडे तर मुळींच दुर्लक्ष होतां कामा नये. मी 'च'च्या भाषेंत बोलणार नाहीं, परंतु शिक्षणाची

बाब इतकी महत्त्वाची आहे कीं त्यासंबंधी 'च'च्या भाषेंत मला बोलावें लागत आहे. आपल्याला नवीन पिढी निर्माण करावयाची आहे. म्हणून मी सांगूं इच्छितों कीं, शिक्षणाच्या बाबीकडे मुळींच दुर्लक्ष होणार नाहीं. मी ही गोष्ट मुद्दाम आग्रहपूर्वक सांगतों आहें.

दारूबंदीच्या प्रश्नासंबंधांने कांहीं विचार व्यक्त करण्यांत आले. दारूबंदीच्या प्रश्नाला कांही सामाजिक बाजू आहेत, कांहीं  आर्थिक बाजू आहेत. दारूबंदी जेव्हां अस्तित्वांत नव्हती तेव्हां मुंबईतील कामगारांचें जीवन किती भयानक होतें याचा प्रत्यक्ष अनुभव मींहि घेतलेला आहे. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी मला जेव्हां जेव्हां मुंबईत राहण्याचा प्रसंग येत असे तेव्हां तेव्हां दुसरीकडे राहण्याची सोय नसल्यामुळें मी कामगारांकडेच राहत असें. त्यामुळें मला त्यांच्या जीवनाचें जवळून निरीक्षण करण्याची संधि बरेच दिवस मिळाली आणि त्यांच्या अडचणी माझ्यासमोर साकार झाल्या. संध्याकाळ झाल्यानंतर कामगार वस्तींत काय भीषण प्रकार होत असत याची कल्पना त्या जीवनाचें ज्यांनीं जवळून निरीक्षण केलें आहे, त्या जीवनाचा ज्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे, त्यांनाच येऊं शकेल, दुस-यांना नाहीं. आज परिस्थिति अशी आहे कीं, सर्व कामगारांनीं आपापल्या कुटुंबियांना मुंबईत आणलें आहे, त्यांचीं मुलें शाळेंत जात आहेत. परंतु पंचवीस-तीस वर्षांपूर्वी काय स्थिती होती ? कामगारांच्या कमाईत बहुतांश हिस्सा दारू पिण्यांत खर्च होत असे. आज स्थिति अगदी वेगळी आहे. दारूबंदीमुळें कामगार वर्गाची परिस्थिति निश्चितपणें सुधारली आहे. त्यांच्यामध्यें सुबत्ता आली आहे असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. ज्यांना दारू पिऊन मरावयाचेंच असेल त्यांना मरूं द्यावें, असें जे म्हणतात त्यांना दारू पिण्यामुळें मनुष्याचें जीवन कसें यातनामय बनतें याचा अनुभव नसावा. चार खोल्यांच्या ऐषआरामी फ्लॅटमध्यें राहून पोटभर जेवण झाल्यानंतर आरामांत बसून पाठीमागें कांहीं काळजी नसतांना दारू पिणा-यासंबंधानें मी सांगत नाहीं. अनंत अडचणींनीं व्यापलेलें ज्यांचें जीवन आहे असे लोक दारूच्या नशेंत आपल्या काळज्या बुडवूं पाहतात, कामगार दारू पिऊन घरीं येऊन आपल्या मुलांच्या देखत बायकोला मारपीट करूं लागला म्हणजे त्या मुलांच्या मनावर काय परिणाम होत असेल याची कल्पनाच केलेली बरी. अशा प्रसंगांमुळें त्यांच्या संस्कारक्षम मनावर जे दुष्परिणाम होतील ते, शाळेंत त्यांना कितीहि चांगलें शिक्षण देण्यांत आलें तरी दूर होणार नाहींत, त्या शिक्षणाचा त्यांच्या मनावर कांहींहि परिणाम होणार नाहीं. दारूबंदीमुळें असे प्रकार आतां बंद झाले आहेत हें आपणांस मान्य केलेंच पाहिजे. चोरून दारू गाळण्याचे प्रकार मुंबईत वाढले आहेत, नाहीं असें नाहीं. परंतु त्यांना आळा घालण्याकरितां काय केलें पाहिजे याचा विचार सर्वांनीं केला पाहिजे. दारूबंदीचें धोरण रद्द ठरविणें हा त्यावरील उपाय नाहीं.

आपण निरनिराळ्या राजकीय पक्षांमध्यें वाढलों असलो तरी देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामांतून आपली राजकीय क्षेत्रामध्यें वाढ झालेली आहे. जनतेचें जीवन सुखी, समृद्ध आणि संपन्न व्हावें, त्या

जीवनामध्यें नव्या शक्तींची वाढ व्हावी हा दृष्टिकोन, हीं जीं राजकीय क्षेत्रामध्यें काम करणारी माणसें आहेत त्यांचा असणारच. त्यांना मी आग्रहानें सांगूं इच्छितो कीं, आम्ही लोक कल्याणाच्या यात्रेचा मार्ग पत्करला आहे. या यात्रेमध्यें कोणीहि मागें राहूं नये. कदाचित् आपल्या उद्दिष्टांकडे जाण्याच्या मार्गांत फरक असूं शकेल. कांहींचे मार्ग अलग असतील, विचार निराळे असतील. त्या विचारांशी त्यांनी प्रामाणिक राहावें. मात्र लोककल्याणाच्या या यात्रेंत त्यांची आणि आमची, त्यांच्या विचारांची आणि आमच्या विचारांची, कोठें तरी एकत्र गांठ पडल्याशिवाय राहणार नाहीं.

## औद्योगिक विकासाच्या नव्या दिशा

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासांत आस्थेनें लक्ष घालणा-या तुम्हां मंडळींना भेटण्यास मला फार आनंद होत आहे. यंदा अशी संधि मला पुन्हा दिल्याबद्दल मी तुमच्या संस्थेचे आभार मानतों.

महाराष्ट्र राज्यनिर्मितीकडे केवळ एक साध्य म्हणून मी पाहात नसून, महाराष्ट्रांतील लोकांचे विधायक विचार व त्यांचें कर्तृत्व यांची सांगड घालून विकासाच्या कार्यास चालना देण्याचें महाराष्ट्र राज्य हें एक साधन आहे असेंच मी नेहमीं मानीत आलों आहें. या कार्यांत तुमच्यासारख्या संघटनांना महत्त्वाची भूमिका बजावतां येण्यासारखी आहे. राज्याचा औद्योगिक विकास भक्कम पायावर व जलद गतीनें घडवून आणण्याच्या कामीं सरकारशी सहकार्य करून, तुम्ही ही भूमिका योग्य प्रकारें बजावीत आहांत, याबद्दल मला आनंद वाटतो. तुमच्या अध्यक्षांनीं तिस-या पंचवार्षिक योजनेसंबंधीं सविस्तर उल्लेख केला. तथापि राज्याच्या तिस-या पंचवार्षिक योजनेला शेवटचा हात देण्याचें काम अद्यापि चालू असल्यामुळें तिच्या स्वरूपासंबंधीं सर्वसाधारण विचारच मला आपल्यापुढें मांडले पाहिजेत. आपल्या राज्याची व त्याचप्रमाणें भारताची तिसरी पंचवार्षिक योजना चालू महिन्याच्या अखेरीस अंतिम स्वरूपांत तयार होईल, अशी अपेक्षा आहे. आपल्या देशाचा आर्थिक विकास आपणांस द्रुतगतीनें आणि भक्कम पायावर घडवून आणावयाचा असल्याकारणानें तिस-या पंचवार्षिक योजनेंत लोकांच्या कर्तृत्वाला अधिक संधि व अधिक वाव मिळेल याबद्दल मला शंका नाहीं.

अगोदरच्या योजनांत हातीं घेण्यांत आलेल्या कांहीं मोठ्या प्रकल्पांचें फळ आपल्याला तिस-या योजनेच्या काळांत मिळेल. पोलादाचा धंदा, वीज आणि वाहतूक यांचा आपण जो विकास करूं शकलों त्यामुळें औद्योगिकरणाचा वेग वाढविण्याची गुरुकिल्ली आपल्या हातीं आली आहे. आपण

जी साधनसामुग्री निर्माण केली आहे तिचा पूर्ण व काटकसरीनें उपयोग करून घेणें आणि त्याचबरोबर उत्पादनाची जी ताकद आज आपल्या अंगीं आली आहे ती रिकामी पडून वायां जाऊं नये म्हणून खबरदारी घेणें, या गोष्टींना फार महत्त्व आहे. यासाठीं कामांतील कसब व तंत्र ज्यांच्याजवळ आहे अशा माणसांचा आपणांस योग्य प्रकारें उपयोग करून घेतां आला पाहिजे. त्याचप्रमाणें लोकांमध्यें आपण कामाची निकड व जबाबदारी यांची जाणीव निर्माण केली पाहिजे. उत्पादनाचा खर्च कमी करण्याकरितां देशी मालाचा व साधनांचा उपयोग करून परदेशी चलनांत आपण बचत केली पाहिजे. त्यासाठीं नव्या नव्या युक्त्याप्रयुक्त्या आपण शोधून काढल्या पहिजेत. सरकारनें औद्योगिक विकासाचा जो 'मास्टर प्लॅन' तयार केला आहे त्यांत कोणत्या भागांत कोणत्या उद्योगधंद्यांचा विकास होऊं शकेल यासंबंधीं सविस्तर दिग्दर्शन करण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें या कामीं उद्योगपतींना त्वरित मदत मिळावी म्हणून सरकारच्या उद्योग विभागामार्फतहि व्यवस्था करण्यांत आली आहे.

मुंबई शहरांतील उद्योगधंद्यांच्या भवितव्यासंबंधीं तुम्हांला जी चिंता वाटत आहे व जी तुमच्या अध्यक्ष्यांनीं आतांच बोलून दाखविली ती मी समजूं शकतों. सबंध राज्याचा समतोल विकास करण्याचें सरकारनें जें धोरण जाहीर केलें आहे त्याचा अर्थ मुंबई शहराकडे दुर्लक्ष होईल असा मुळींच नाहीं. याबद्दल तुम्हीं निश्चित राहावें. बृहन्मुंबईतील उद्योगधंद्यांच्या वाढीस भौगोलिक कारणांमुळें मर्यादा पडतात ही गोष्ट सर्वमान्य आहे. आणि म्हणून जमीन, पाणी, वीज आणि कच्चा माल या गोष्टी येथें उपलब्ध होऊं शकतील असे नवे विभाग नवीन उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठीं शोधून काढल्याखेरीज, आपल्या औद्योगिक विकासाचें पाऊल फारसें पुढें पडणार नाहीं. तिस-या पंचवार्षिक योजनेची आंखणी करतांना बृहन्मुंबईतील उद्योगधंद्यांची शक्य तेवढी वाढ व्हावी म्हणून जरूर ती खबरदारी आम्हीं घेतली आहे असें मी आपणांला आश्वासन देतों. खरें म्हणजे ठाण्याच्या खाडीवर पूल बांधून आणि दलदलीच्या भागांचें औद्योगिक भागांत रूपांतर करून मुंबई शहराचें औद्योगिक क्षेत्र सध्यांच्या हद्दींच्या बरेंच पुढें नेण्याचा आमचा विचार आहे. अर्थात् मुंबई महानगरपालिकेचें अधिकारक्षेत्र वाढविण्याची मात्र यांत कल्पना नाहीं. मीं अनेक वेळां सांगितलें आहे कीं, मुंबई शहर सोडल्यास महाराष्ट्र राज्य हें औद्योगिकदृष्ट्या पुढारलेलें आहे असें म्हणतां यावयाचें नाही, आणि हें नाकारण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं. शिवाय गेल्या दहा वर्षांत देशांतील इतर राज्यांच्या मानानें आपली प्रगति अगदींच यथातथा झाली असल्यामुळें परिस्थिति अधिकच बिकट झालेली आहे. म्हणून जे भाग अद्यापि मागासलेले म्हणून ओळखले जातात त्या भागांत उद्योगधंदे काढून औद्योगीकरणाचें क्षेत्र वाढविणें अगत्याचें ठरतें. आणि म्हणून महाराष्ट्र राज्याच्या तिस-या पंचवार्षिक योजनेंत ग्रामीण भागांत सुरू करण्यांत यावयाच्या उद्योगधंद्यांची पूर्वतयारी करण्यावर विशेष भर देण्यांत येणार आहे.

या पार्श्वभूमीवर, ग्रामीण भागांत उद्योगधंद्यांची उभारणी करण्याच्या दृष्टीनें ज्या औद्योगिक वसाहती स्थापन करावयाच्या आहेत त्यांना मी फार महत्त्व देतों. या औद्योगिक वसाहतींत, रस्ते, वीज, पाणीपुरवठा वगैरे सोयी उपलब्ध होणार असून त्यामुळें तेथें छोटे छोटे उद्योगधंदे सुरू करण्यास चांगलाच वाव मिळणार आहे. या सोयींचा जास्तींत जास्त फायदा घेऊन विजेवर चालणा-या छोट्या छोट्या उद्योगधंद्यांची सुरुवात व वाढ करण्याच्या दृष्टीनें प्रत्येक भागासाठीं निश्चित स्वरूपाची योजना तयार करण्यांत आली पाहिजे. शहरी भागांत आज जे मोठे व मध्यम स्वरूपाचे उद्योगधंदे केंद्रित झाले आहेत, त्यांना ग्रामीण भागांतील हे छोटे उद्योगधंदे पूरक ठरतील. मोठ्या व मध्यम स्वरूपाच्या उद्योगधंद्यांतील उत्पादन विभागांचें विकेंद्रीकरण करून ग्रामीण भागांत निघणा-या छोट्या उद्योगधंद्यांकडे हें काम सोपविण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला पाहिजे. यामुळें ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्थेची शहरी भागांतील धाव घेण्याची लोकांत आज जी प्रवृत्ति दिसून येते तिलाहि आळा बसेल.

कृषि-औद्योगिक समाजव्यवस्थेचा पाया घालण्याचें उद्दिष्टहि राज्याच्या तिस-या पंचवार्षिक योजनेंत स्वीकारण्यांत आलें आहे. ग्रामीण भागात उद्योगधंदे काढून ग्रामीण जीवनाशीं ते एकजीव करावयाचे आणि शेती व ग्रामीण उद्योगधंदे यांची सांगड घालावयाची हाच याचा अर्थ आहे. ग्रामीण भागांत याप्रमाणें शेतमालावर प्रक्रिया करणारें उद्योगधंदें निघाल्यास शहर भागांतील उद्योगधंद्यांकडे कच्च्या मालाची वाहतूक करण्यांत होणारे परिश्रम वांचतील. शिवाय ग्रामीण भागांतील या उद्योगधंद्यांमुळें शेतकरीवर्गास रोजगारीचें एक साधन उपलब्ध होईल आणि त्यामुळें त्यांच्या उत्पन्नांत वाढ होऊन त्यांच्या राहणीचा दर्जाहि सुधारेल.

ग्रामीण भागांत आधुनिक स्वरूपाचे उद्योगधंदे सुरू करण्याच्या दृष्टीनें शेतीच्या क्षेत्रांत सहकारी तत्त्वावर आधारलेले प्रोसेसिंगचे - म्हणजे शेतमालावर प्रक्रिया करण्याचे उद्योगधंदे काढणें अतिशय फायद्याचें ठरेल. आपल्या राज्यांत स्थापन झालेल्या सहकारी साखर कारखान्यांमुळें आपल्याला जो बहुमोल अनुभव मिळाला आहे तो या बाबतींत मार्गदर्शक ठरेल यांत शंका नाहीं. या अनुभवाच्या आधारें शेतमालावर प्राथमिकच नव्हे तर त्यानंतरच्याहि अवस्थेंत प्रक्रिया करण्याचे उद्योगधंदे ग्रामीण भागांत सहकारी पद्धतीनें सुरू करतां येतील. तथापि जेथें ग्रामीण भागांतील उत्पादकांच्या सहकारी संस्थांना तांत्रिक अडचणींमुळें म्हणा अगर अवाढव्य भांडवली खर्चामुळें म्हणा, अशा प्रकारचे उद्योगधंदे सुरू करणें शक्य नसेल तेथें 'संयुक्त औद्योगिक क्षेत्र' निर्माण करण्याचा आमचा विचार आहे. सरकार आणि खाजगी कारखानदार यांनीं आपल्या संयुक्त प्रयत्नांनी ग्रामीण भागांत मोठ्या स्वरूपाचे उद्योगधंदे सुरू करावयाचे अशी ही कल्पना आहे.

राज्याच्या तिस-या पंचवार्षिक योजनेंत, सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांसाठीं करण्यांत आलेल्या तरतुदींव्यतिरिक्त, संयुक्त क्षेत्रांतील उद्योगधंद्यांच्या बाबतींतहि पुरेशी तरतूद करण्यांत आली आहे. या योजनेचा खाजगी कारखानदार योग्य तो फायदा घेतील असा मला विश्वास वाटतो.

ग्रामीण भागांत उद्योगधंद्यांची वाढ खंड पडूं न देतां चालू ठेवावयाची म्हणजे ग्रामीण भागांतील लोकांनींच त्या बाबतींत पुढाकार घ्यावयास पाहिजे. त्यासाठीं व या लोकांच्या उपक्रमशीलतेस पुरेसा वाव मिळावा म्हणून खास प्रयत्न करावयास पाहिजेत आणि जरूर ती यंत्रणाहि उभी करावयास पाहिजे.

अगोदरच्या पंचवार्षिक योजनांत जे भाग विकासाच्या बाबतींत मागें पडले आहेत त्यांना इतर भागांबरोबर आणणें जरूर आहे. राज्याच्या सर्व विभागांत समतोल विकास घडवून आणण्यासाठीं सरकार प्रादेशिक विकास मंडळें स्थापन करणार असून त्यासाठीं आवश्यक असा कायदाहि करण्यांत येईल. निरनिराळ्या कारणांमुळे राज्याचे हे भाग जे अविकसित राहिले आहेत त्यांना, विकासाच्या मार्गावर पुढें गेलेल्या इतर भागांबरोबर आणण्यासाठी तिस-या पंचवार्षिक योजनेंत कांहीं खास तरतुदी करण्याचा प्रयत्न करण्यांत येईल. विदर्भांत रस्ते कमी आहेत, तर मराठवाड्यांत व कोंकणांत रस्ते व वीज यांची कमतरता आहे. त्यामुळें या भागांत कांहीं विशिष्ट प्रश्न निर्माण झाले असून त्यांची उकल करण्याच्या दृष्टीनें तिस-या योजनेच्या काळांत या भागांतील दळणवळणाच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. भारत सरकारच्या तिस-या पंचवार्षिक योजनेंत दिवा-पनवेल-उरण रेल्वेची जी तरतूद करण्यांत आली आहे त्यामुळेंहि कोंकण विभागांत विकासाचें नवें क्षेत्र निर्माण होईल. तिस-या योजनेंत विद्युत-वाहनाचा जो कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. त्यामुळें सोलापूर, अहमदनगर, नाशिक, धुळें व जळगांव हे जिल्हे, विदर्भांतील पश्चिमेकडले जिल्हे आणि कोंकण व मराठवाडा या भागास वीज मिळूं लागेल आणि या भागांची विजेच्या बाबतींत आजपर्यंत जी उपासमार झाली ती नाहींशी होईल. या भागांखेरीज आणखी ५०० मोठ्या व छोट्या गांवांना या कार्यक्रमानुसार वीजपुरवठा करण्यांत येणार आहे. तेव्हां विकासाच्या बाबतींत हे भाग जे मागें पडले आहेत त्यांची तिस-या योजनेमुळें कांही प्रमाणांत तरी प्रगति होईल अशी अपेक्षा आहे.

तिस-या पंचवार्षिक योजनेचें प्रमुख उद्दिष्ट स्वयंचलित विकसनाच्या दिशेनें भरीव प्रगति करणें हे आहे. याचा अर्थ असा कीं, उत्पन्नाचें प्रमाण सारखें वाढत राहण्यासाठीं बचतीचें व पैसा गुंतविण्याचें प्रमाण पुष्कळच वाढलें पाहिजे. हें उद्दिष्ट साध्य करण्याकरितां, तुमच्या या कौन्सिलनें उत्पादनाचा कार्यक्रम अशा रीतीनें आंखावा कीं, ज्यायोगें आपल्या गरजेपेक्षां अधिक

मालाचें उत्पादन होऊन एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलच्या मदतीनें परदेशी बाजारपेठा आपण काबीज करूं शकूं. तसें झाल्यास आपल्या परदेशी चलनांत वाढ होईल आणि त्यांतून, ज्या उद्योगधंद्यासाठी परदेशांतून आपल्याला यंत्रसामुग्री मागवावी लागते त्यांना आपल्याला मदत करतां येईल. उत्पादनाचा खर्च शक्य तोंवर वाढू न देतां आपल्या पक्क्या मालाचा दर्जा आपण सुधारला पाहिजे. तसेंच आपल्या उत्पादनकार्यांत कोणत्याहि प्रकारें खंड पडणार नाही याचीहि खबरदारी घेतली पाहिजे. यापूर्वी उद्योगधंद्यांत जें भांडवल आपण गुंतविलें आहे आणि तिस-या पंचवार्षिक योजनेच्या काळांत आपण जें गुंतविणार आहोंत, तें सर्व योग्य कारणीं लावून जेवढें म्हणून उत्पादन आपल्याला वाढवितां येणें शक्य आहे तेवढें तें वाढविण्याचा आपण नेटानें प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणें उद्योगधंद्यांतील नफा पुन्हा उद्योगधंद्यांच्या वाढीसाठींच वापरला गेला पाहिजे. या गोष्टी जर आपण करूं शकलों नाहीं, तर ज्या स्वयंचलित विकसनाचा मीं आतांच निर्देश केला तें लांबवणीवर पडण्याची भीति आहे. तुमच्या संस्थेच्या सभासदांना या दिशेनें प्रगति करण्याची जी तीव्र उत्कंठा आहे त्यामुळें आपला उत्पादनाचा कार्यक्रम पार पाडण्याच्या बाबतींत ते यत्किंचितहि कसूर करणार नाहींत याबद्दल मला पूर्ण खात्री आहे.

योजनाबद्ध विकासाच्या दृष्टीनें आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरेसा रोजगार निर्माण करणें ही होय. लोकसंख्येची वाढ झपाट्यानें होत असल्यामुळें कामगारांच्या संख्येंत दरसाल सारखी भर पडत असते. त्यामुळें रोजगाराच्या या प्रश्नाचें स्वरूप अधिकाधिक गंभीर होत आहे. नियोजन मंडळानें या बाबतींत जी पाहणी केली आहे त्यावरून असें दिसून येतें कीं, अगोदरच्या पंचवार्षिक योजनांच्या काळांत रोजगाराच्या या प्रश्नाबाबत महाराष्ट्र राज्याची फार कुचंबणा झाली. तेव्हां, प्रत्येक माणसास योग्य व पूर्ण वेळ रोजगार मिळेल अशी परिस्थिति निर्माण होण्यास अद्याप बराच कालावधि जावा लागेल. तथापि, मध्यंतरींच्या संक्रमणकाळांत आधुनिक उद्योगधंद्याची वाढ करण्याचा कार्यक्रम नेटानें व कसोशीनें अंमलांत आणला पाहिजे व त्याबरोबर शेतीचाहि विकास झपाट्यानें केला पाहिजे. त्याचप्रमाणें उत्पादन किंवा उत्पादनाचा खर्च यांवर परिणाम होऊं न देतां जास्तींत जास्त मजुरांना ज्यामुळें काम मिळेल अशा प्रकारच्या उत्पादनपद्धतींचा आपण अवलंब केला पाहिजे. अर्थात् उत्पादनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत जी तांत्रिक प्रगति होत असते तिचा आपण फायदा घेऊंच नये असें मला सुचवावयाचें नाहीं. तथापि सध्यांच्या परिस्थितींत रोजगार वाढविण्याचें आपलें उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीनें या बाबतींत तोल सांभाळणें किती आवश्यक आहे याची तुम्हांला कल्पना आहेच. विजेवर चालणारे छोटे उद्योगधंदें सुरू करण्याकरितां ग्रामीण विद्युत्करणाच्या कार्यक्रमाचा पूर्ण उपयोग करून घेतला पाहिजे याचा उल्लेख मीं अगोदर केलाच आहे. उत्पादनाच्या नव्या नव्या पद्धतींचा व तंत्राचा अवलंब करून आणि अगदीं अद्ययावत् ज्ञान व कसब संपादन करून, उपलब्ध स्थानिक साधनसामुग्रीचा उद्योगधंद्यांसाठी उपयोग करून घेण्याचे नवे मार्ग जर आपण शोधून काढले, तर

उद्योगधंद्यांच्या क्षेत्राचा आपण विस्तार करूं शकूं आणि बेकारीचें प्रमाणहि पुष्कळच कमी करूं शकूं, याबद्दल मला शंका नाहीं.

मोठ्या प्रमाणावर आर्थिक नियोजन करीत असतांना, औद्योगिक उत्पादनांतील सर्वांत महत्त्वाचा जो मानवी घटक आपल्याला केव्हांहि दुर्लक्ष करतां येणार नाहीं. मानवी घटक म्हणजे अर्थातच कामगार. आपल्या या प्रयत्नांत जर आपल्याला यश मिळवावयाचें असेल तर कामगारांना योग्य तो न्याय आपण दिलाच पाहिजे. उद्योगधंद्यांच्या कारभारांत कामगारांना भागीदार करून घ्यावें या कल्पनेनें आतां मूळ धरलें असून उत्पादनक्षमता वाढविण्याची नवी प्रेरणा तिनें कामगारांमध्यें निर्माण केली आहे. आपले ध्येय तरी काय हेंच आहे. म्हणून औद्योगिक संबंध आपण निकोप ठेवले पाहिजेत, आणि उत्पादनांतील नुकसान टाळण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला पाहिजे. या गोष्टींची आज फार आवश्यकता आहे.

आर्थिक विकासाच्या बाबतींत सध्यां जें नवीन वातावरण निर्माण होत आहे तें लक्षांत घेऊन तुमचें कौन्सिल पंचवार्षिक योजनेचीं मुख्य उद्दिष्टें सतत आपल्या नजरेपुढें ठेवील, आणि राष्ट्रीय पुनर्रचनेचें या योजनेंत अंगिकारलेलें ध्येय साध्य करण्याच्या कामीं सरकारशीं हार्दिक सहकार्य करील अशी आशा मी व्यक्त करतों, आणि या प्रसंगीं मला आमंत्रण दिल्याबद्दल मी तुमचे पुन्हा एकवार आभार मानतों.

## नियोजन, मनुष्यबळ व शेती

गेल्या दोन-तीन दिवसांमध्यें नियोजनावर आपण अनेक चर्चा ऐकल्या परंतु नियोजन हा विषयच इतका नित्य नवा आहे कीं, त्याच्यासंबंधींची चर्चा कधी कंटाळवाणी वाटत नाहीं. आकाशाकडे माणसानें पाहिल्यानंतर ज्याच्या त्याच्या नजरेप्रमाणें त्याला तें दिसतें. जसें आकाश विशाल आहे तसाच नियोजनाचा हा प्रश्नहि विशाल आहे. असंख्य दृष्टिकोन आणि असंख्य प्रश्न यांतून असंख्य माणसांच्या जीवनास पूर्णतया स्पर्श करणारा हा विषय असल्यामुळें त्याच्यासंबंधीं कधीं कंटाळा येत नाहीं. पण नियोजनाचा निश्चित अर्थ आपण आपल्या मनाशीं समजावून घेतला पाहिजे. विशेषतः महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर जी परिस्थिति महाराष्ट्रात आहे तिच्या पार्श्वभूमीवर आणि देशांतील नियोजनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या जनतेचें नियोजनाच्या बाबतींत आजचें कर्तव्य काय आहे हें आपण पाहिलें पहिजें.

मी तपशिलाच्या प्रश्नात फारसा जाऊ इच्छित नाहीं. या प्रश्नाची शास्त्रीय चर्चा करण्यापेक्षां त्याच्या पाठीमागें जीं दोन मूलभूत तत्त्वें आहेत त्यांचा आपण विचार केला पहिजे. मी अगदीं सामान्य माणसाच्या दृष्टीनें नियोजनाकडे पाहण्याचा प्रयत्न करीत असतो. आमच्या देशामध्यें जीं साधनें आहेत त्या साधनांचा जास्तींत जास्त विकास करून आमच्या जीवनाला समृद्ध बनविण्याचा नियोजन हा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे या प्रयत्नामधून निर्माण होणारी जी संपत्ति आहे, जी शक्ति आहे, जें सामर्थ्य आहे, त्याचा फायदा सर्वसामान्य माणसांस मिळेल याचीहि काळजी नियोजनामध्यें घेतली पाहिजे. नियोजनाच्या बाबतीतला हा सुद्धा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे.

नियोजनाच्या दृष्टीनें महाराष्ट्राजवळ कोणतीं साधनें आहेत ? जमीन, पाणी, जमिनीखालचे खनिज पदार्थ जे कांहीं असतील ते, आणि मनुष्यशक्ति. मला पहिल्याप्रथम एक गोष्ट सांगावयाची आहे आणि ती ही कीं, आमचीं जीं साधनें आहेत त्या साधनांचा जास्तींत जास्त प्रमाणांत वापर करणें हाच आपल्या दृष्टीनें खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. परंतु नियोजनाच्या संदर्भात आपलें मनुष्यबळ व आपली शेती हींच आज आपलीं मुख्य साधनें असल्याकारणानें त्यांच्या प्रश्नांसंबंधानेंच मुख्यतः मी आज बोलणार आहें. आमचें मनुष्यबळ कसें आहे, आमचीं पाण्याचीं साधनें काय आहेत, आमचीं जमिनींची साधनें काय आहेत हें आपण प्रथम पाहिलें पाहिजे. आतांपर्यंत आपण महाराष्ट्राचें जें चित्र पाहिलें तें जुन्या इतिहासांतल्या सिंहगडावरच्या, प्रतापगडावरच्या आणि शिवनेरीवरच्या महाराष्ट्राचें. पण आतांच्या महाराष्ट्राचें जें चित्र आहे तें आपण जरा पाहा. तें चित्र अगदीं वेगळें आहे. आतांचा हा महाराष्ट्र खेड्यापाड्यांत पसरलेला आहे, जमीनजुमल्यांत वसतो आहे, जोंधळा, शाळू, कापूस, ऊंस हीं पिकें तो पिकवितो आहे. आणि त्याला मिळणारें पाणीहि पाहा. हें चित्र पाहिल्यानंतर बुद्धिला थोडीशी कां होईना, एक प्रकारची जागृति येईल. आपल्याजवळ कांहीं तरी अपरंपार आहे असें समजूं नका. जें आहे तें मर्यादित आहे. पाणी मर्यादित आहे, जमिनीची शक्ति मर्यादित आहे आणि या मर्यादित शक्तीचाहि उपयोग केलेला नाहीं अशी ही परिस्थिति आहे. ही परिस्थिति बदलण्यासाठीं आपणांला पांच, दहा, पंधरा वर्षें प्रयत्न करावयाचा आहे.

माझ्या मतें अतिशय चांगली साधनसंपत्ति महाराष्ट्रांत जर कुठची असेल तर ती महाराष्ट्राचें मनुष्यबळ ही आहे. परंतु येथील माणसें कांही उद्योग करीत नाहींत, परिश्रम करीत नाहींत, असा एक दृष्टिकोन मांडण्यांत येतो. मला हें मान्य नाहीं. अर्थात् जगांत कांहीं आळशी माणसें असतीलहि. त्यांच्यासंबंधीं वकीलपत्र घेऊन मी बोलत नाही. पण खेड्यापाड्यांमध्यें पावसांत

शेतीमध्यें काम करणारा माणूस केवळ आळशीपणामुळें घरीं राहिला आहे हें म्हणणें योग्य दिसत नाही. तो बारा महिन्यांतले तीन महिने काम करतो व बाकीचे महिने तो काम करीत नाहीं याचें कारण त्याला उपयोगी पडेल असें काम मिळवण्यासारखी परिस्थिती नाहीं. श्रमाची प्रतिष्ठा वाढली पाहिजे, असें कांही पुढारी "आराम हराम है" ह्या पंडितजींच्या भाषेंत किंवा विनोबाजींच्या श्रमदानाच्या भाषेंत सांगत असतात त्याला वेगळाच अर्थ आहे. तें पण एक सत्य आहे. परंतु माणसें हातपाय पसरून आपलीं खेड्यांमध्यें बसली आहेत, तोंडापर्यंत गंगा येऊनहि तीं आपलें तोंड उघडत नाहींत अशी कांहीं परिस्थिति नाहीं. आपल्या समाजाचें आपण असें चित्र रंगविणार असलां तर तें मला मंजूर नाहीं.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, इतरांकडे जशीं माणसें आहेत तशींच आपल्याकडेहि आहेत हें जरी खरें असलें तरी आम्हांला अभिमान वाटावा असें आमच्याकडील मनुष्यबळ आहे असें मला वाटतें. आणि हें आपण समजून घेतलें पाहिजे. छोटा शेतकरी, खेड्यापाड्यांतून काम करणारा शेतावरचा मजूर, गिरणींतून काम करणारा कामगार, स्वतःचे हात व स्वतःची छोटी अक्कल वापरणारा छोटा तंत्रज्ञ, हुशार पंडित, लक्ष्मणशास्त्री जोशी ज्यांचे प्रतिनिधि आहेत ते बुद्धिमान विचारवंत, छोटेमोठे इंजिनिअर, डॉक्टर हीं वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणारीं सगळीं माणसें पाहिल्यानंतर मला असें वाटतें कीं, आमच्याजवळ जबरदस्त मनुष्यबळ आहे. आपलीं हीं साधनें पाहून आपण आपल्या नियोजनाचा विचार केला पाहिजे.

या दृष्टीनें शिक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. मघाशीं श्री. बाळासाहेब देसाई यांनीं शिक्षणासंबंधींचा जो दृष्टिकोन सांगितला तो मला मंजूर आहे. त्याच्या पाठीमागचा विचार मला सांगावयाचा आहे. तो विचार असा आहे कीं, आपण शिक्षणाकडे जें पाहतों तें केवळ गरिबाच्या मुलाला शिक्षण मिळालें पाहिजे आणि श्रीमंताच्या मुलाला तें मिळालें नाहीं तरी चालेल अशा दृष्टीनें नाहीं. आमच्यामध्यें जें चांगलें आहे त्याला जास्तींत जास्त वाव मिळाला पाहिजे, अशा दृष्टीनें आपण शिक्षणाकडे पाहिलें पाहिजे. मी आपणांला सांगूं इच्छितों कीं, शिक्षणाकडे निव्वळ सामाजिक गरजेच्या दृष्टीनें मी पाहत नाहीं. माझ्या मतें शिक्षण हें आर्थिक विकासाचें एक मूलभूत साधन आहे. आमच्यामध्ये शक्ति निर्माण करण्याकरितां आमच्याजवळ मनुष्यबळाशिवाय दुसरें कांही साधन नसल्यामुळें आम्हांला या साधनाचा विकास करण्यासाठीं त्याला शिक्षणाची जोड द्यावयाची आहे. खेड्यांत बिजली नेऊन पोहोंचविल्याशिवाय ज्याप्रमाणें शेतीचा विकास होणार नाहीं, त्याचप्रमाणें आमचा नापीक पडलेला मनुष्यबळाचा हा जो मोठा थोरला साधनसंपत्तीचा भाग आहे. त्यांत शिक्षणाची बिजली नेल्याशिवाय नवसामर्थ्य निर्माण होणार नाहीं. शिक्षणाकडे पाहण्याचा माझा स्वतःचा हा असा दृष्टिकोन आहे. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगति करण्याचा

कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, शेतीचें औद्योगीकरण करण्याचा कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, तितकाच शिक्षणाचा हा कार्यक्रम महाराष्ट्रांत महत्त्वाचा आहे.

मग हें शिक्षण कोणत्या प्रकारचें असावें हा विचार ओघानेंच येतो. हें शिक्षण म्हणजे निव्वळ आपल्या शाळा उघडल्या आहेत आणि मुलें शाळेंत जात आहेत, परंतु मुलें शाळेंत काय करतात हें आपल्याला माहीत नाहीं, अशी परिस्थिति नव्हे. तर या देशांतील किंवा या राज्यांतील समाजोपयोगी साधनांचा वापर करण्याइतकी शक्ति मुलामध्यें येईल अशा त-हेनें मुलगा शिक्षण घेतो कीं नाहीं हें पाहण्याचें काम आतां तुम्हांआम्हांला केलें पाहिजे. मी या प्रश्नाला फक्त येथें स्पर्श करतों आणि तो सोडून देतों. परंतु शिक्षणाचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या आतांच्या संदर्भात अत्यंत क्रांतिकारक प्रश्न आहे असें मी म्हणतों. हा विचार माझ्या मनांत अलीकडे फार तीव्रतेनें येतो याचें कारण इतर साधनांचा वापर करण्याची आपली अपेक्षा कांहीं मर्यादेपर्यंतच आहे हें आपण समजलें पाहिजे.

आतां आपण शेतीच्या प्रश्नांकडे वळूं या. महाराष्ट्रांतील जमीन आपणां सर्वांना माहीत आहे. तिचें वर्णन मीं केलें पाहिजे असें नाहीं. सह्याद्रीच्या पलीकडची जमीन म्हणजे कोंकणांतला कातळ, तो आपल्या परिचयाचा आहे. नद्यांच्या कांठचा सुपीक भाग सोडला व पलीकडे गेलों म्हणजे कमी पावसाचा भाग सुरू होतो. मराठवाड्यांतील गोदावरीच्या कांठचा भाग चांगला आहे आणि विदर्भामध्यें काळी जमीन पुष्कळ व चांगली आहे. परंतु तेथें पाटबंधा-यांची शक्यता अतिशय कमी आहे. जिथें पाणी आहे तिथें तें वापरण्याची शक्यता कमी आहे आणि जिथें पाणी कमी आहे तिथें त्याची गरज जास्ती आहे; एवढेंच नव्हे तर तिथें पाणी मिळेल कीं नाहीं अशी शंका निर्माण झाली आहे. ही जमिनीची व पाण्याची मर्यादा आपणांला मुळांतच समजली पाहिजे.

याच पार्श्वभूमीवर आपण आपल्या शेतीच्या प्रश्नांचा विचार केला पाहिजे. शेतीचे अनेक प्रश्न आहेत. प्रथम आपण शेतीच्या मालकीचा प्रश्न घेऊं. कुळकायदा फार चांगल्या प्रकारें हाताळणारें राज्य असा हिंदुस्तानमध्यें गेल्या दहा-बारा वर्षांचा आपला लौकिक आहे. कुळकायद्याचा आपल्याला चांगला अनुभव आहे. त्याच अनुभवासंबंधीं परत एकदां विचार करण्याची पाळी आली आहे. आज आपण जमिनीच्या कमाल मर्यादेच्या प्रश्नाचा विचार करीत आहोंत. कमाल मर्यादेचें हें तत्त्व स्वीकारलें पाहिजे याबद्दल मला शंका नाहीं. तें कोणत्या पद्धतीनें स्वीकारावें, कसें स्वीकारावें, याबद्दल मी आज माझें मत देत नाहीं. उद्या आपले महसूल मंत्री श्री. वसंतराव नाईक त्यासंबंधीं जो दृष्टिकोन आपल्यासमोर मांडतील तो आपणांला स्वीकारावा लागेल. राष्ट्रानें स्वीकारलेलें असें तें धोरण असल्यामुळें त्याच्या पाठोपाठ आपणांला गेलें पाहिजे. आतां त्यामध्यें

काय असावें, कोणती पद्धत असावी वगैरे प्रश्न आपण सोडून देऊं. पण एक गोष्ट मात्र निश्चित कीं, शेती कसणारा माणूस हा शेतमालक असला पाहिजे आणि त्याच्या शेतीच्या प्रयत्नाला सर्व्हिस को ऑपरेटिव्हज्ची म्हणजे सेवा सहकारी प्रयत्नांची जोड देऊन त्या प्रयत्नांची परिणति शेवटीं आम्हांला सहकारी शेतींत केली पाहिजे. शेतीच्या विकासाचें हें चित्र आपण आपल्या डोळ्यासमोर निश्चित बनविलें पाहिजे. त्या विकासाचा क्रम काय असावा, त्याची गति किती असावी, ती कशी वाढवावी, केव्हां वाढवावी वगैरे प्रश्न त्यांतून उद्भवणार आहेतच. पण हें जें चित्र आहे तें आपल्याला नेहमीं मनांत ठेवावें लागेल. यासंबंधानें कसलीहि शंका बाळगण्याचें कारण नाहीं. म्हणून शेती कसणारा हा शेतीचा मालक असला पाहिजे या दृष्टीनें, आपण जिल्ह्यांत परत जाल तेव्हां हा आपला एक मूलभूत कार्यक्रम असल्यामुळें तेथील परिस्थितीची आपण पाहणी करा. आपण ज्या जिल्ह्यांतील शेतक-यांची सेवा करण्याची घोषणा करीत आहांत तेथील शेतक-यांचा हा मूलभूत प्रश्न आहे. त्यासंबंधानें काय प्रगति झाली, काय गत झाली याचा आपण विचार केला पाहिजे. या प्रश्नाबाबत फार घबराट झाली म्हणून किंवा बागायतदारांनीं फार टीका केली म्हणून घाबरण्याचें कांहीं कारण आहे असें नव्हे. कोणी तरी तिडिकीनें, पोटतिडिकीनें जरा आपलें म्हणणें मांडलें पाहिजे. रागाचा हा प्रश्न थोड्याशा निराळ्या अर्थानें मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहें. याचा अर्थ तशी कांहीं भयानक परिस्थिति निर्माण झाली आहे, असाहि कृपा करून आपण करूं नका. जागृतपणें आम्हांला या प्रश्नाचा पाठपुरावा केला पाहिजे, म्हणून ही गोष्ट मी आपल्यापुढें आग्रहानें मांडतों. असा हा जमिनीच्या मालकीचा प्रश्न झाला.

त्यानंतर जमिनीच्या विकासाचा प्रश्न येतो. आपल्या देशांतील शेतीच्या प्रश्नांशीं निगडित असणारा अतिशय महत्त्वाचा असा हा प्रश्न आहे. गेली शेकडों वर्षे, कदाचित हजारों वर्षे शेतजमिनीच्या विकासाचा हा प्रश्न तसाच राहिलेला आहे. आम्हीं आजपर्यंत ज्याकडे फार दुर्लक्ष केलें असा हा प्रश्न आहे. आजहि आपल्या देशांत कोट्यवधि एकर जमीन - आज मला निश्चित आंकडा माहीत नाहीं - तशीच विकास न होता राहिली आहे. विशाल मुंबई राज्य होतें त्यावेळीं हिशेब करून मीं पाहिलें कीं, जिचें बंडिंग करावें लागेल, जिच्याबाबत भूसंरक्षणाची उपाययोजना करावी लागेल अशी चार कोटि एकर जमीन मुंबई राज्यांत होती. वसंतराव नाइकांनीं आतांच सांगितल्याप्रमाणें आजहि साडेतीन कोटि एकर जमीन महाराष्ट्रांत अशी आहे कीं, जी गळक्या भांड्यासारखी आहे. मथुरेची गवळण पाणी भरून डोक्यावर हंडा घेऊन निघाली आणि घरीं येऊन पाहते तों आपल्या डोक्यावरच्या हंड्यामध्यें पाणी नाहीं. तसेंच आपल्या शेतीचें झालें आहे. दरवर्षी मृग नक्षत्रापासून हस्त नक्षत्रापर्यंत भरलेल्या नक्षत्रांच्या बाजारामध्यें आपल्या डोक्यावर भांडें घेऊन जाते बिचारी आमची शेती. पण त्यांत शेवटीं कांही शिल्लक राहत नाहीं. आमच्या महाराष्ट्राच्या शेतीचा हा मथुरेचा बाजार झालेला आहे. आणि आज एक वर्ष नाहीं, दोन वर्षे नाहीं, तर गेलीं कित्येक शतकें हें असेंच चाललें आहे.

शेतीशीं निगडीत असलेला भूमिहीनांचा प्रश्नहि आपल्या महाराष्ट्रांत एक मोठाच प्रश्न होऊन बसला आहे. आपण ज्या शक्तिमान नवसमाजाची उभारणी करूं इच्छितों त्या समाजाचा, शेतांत कष्ट करणारा, राबणारा शेतकरी समाज हा जणुं कणाच आहे. या शेतकरी समाजामध्यें भूमिहीनांचाहि समावेश होतो. आणि म्हणून आमच्याजवळ जी जमीन असेल तिच्या टक्क्या-दोन टक्क्यांपर्यंत जी मिळेल ती जमीन आपण भूमिहीनांकरितां दिली पाहिजे. आणि त्याचबरोबर ह्या भूमिहीनांकरितां छोट्या छोट्या उद्योगधंद्यांचा नवीन कार्यक्रम तयार केला पाहिजे आणि त्याला प्राधान्य दिलें पाहिजे. कारण ह्या सगळ्या योजनांमध्यें भूमिहीनांकडे दुर्लक्ष झालें अशी जी टीका सर्वत्र ऐकूं येते ती रास्त टीका आहे यांत शंका नाहीं. परंतु अगोदरच जो शेतकरी उपाशी आहे त्याच्याच घरामध्यें घुसून हा प्रश्न सुटणार नाहीं. २० टक्के जमीन ५० तें ६० टक्के शेतक-यांच्या जवळ आहे. राहिलेली ८० टक्के जमीन कांहीं थोड्या लोकांच्या हातांत आहे. म्हणजे जास्त जमीन थोड्या लोकांच्या हातांत, आणि थोडी जमीन जास्त लोकांच्या हातांत आहे. हा जो हिशेब आहे तो ऐकला म्हणजे माणसाला फसल्यासारखें वाटतें. पण यामध्यें फारसा जीव आहे असें नाहीं. याचें कारण महाराष्ट्रामध्यें सरंजामी पद्धती नाहीं हें आहे. त्यामुळें एक मर्यादित स्वरूपाची कमाल मर्यादाच आपणांस स्वीकारावी लागेल. परंतु या मार्गानें फार जमीन वांटावयास मिळणार आहे अशांतला भाग नाहीं. मला येथें सांगितलें पाहिजे कीं, जमिनीची फेरवांटणी हा महाराष्ट्राच्या शेतीच्या पुनर्रचनेमध्यें मेजर प्रोग्राम - मोठा कार्यक्रम होऊं शकत नाहीं. ही गोष्ट जितक्या लवकर आम्ही स्वीकारूं तितके अधिक बरें. कारण त्यानंतर त्याच्या पुढचा कार्यक्रम आपणांला सुचवावा लागेल.

परंतु भूमिहीनांचा प्रश्न मी माझ्या समजुतीप्रमाणें, माझ्या शक्तीप्रमाणें सोडविण्याचा प्रयत्न करीत आहें. सरकारजवळ जंगल खात्याची आणि महसूल खात्याची जी जमीन आहे ती भूमिहीन लोकांना देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोंत. एवढेंच नव्हे तर गेल्या सहा महिन्यांत फारच चांगला व मोठ्या प्रमाणांत हा प्रयत्न करण्यांत आलेला आहे, याबद्दल महसूल खात्याच्या मंत्र्यांना आणि परंपरागत आळस सोडून देऊन जलद गतीनें काम चालू केल्याबद्दल महसूल खात्याला खरोखरच धन्यवाद द्यावयास पाहिजेत.

महाराष्ट्रांतील शेतीच्या बाबतींत आणखी एक महत्त्वाचा जो प्रश्न आहे. तो शेतीच्या आधुनिकीकरणाचा आहे. शेतीची जमीन वाढविण्यानेंच धान्योत्पादनाचा प्रश्न सुटेल असें म्हणणें बरोबर नाहीं. आधुनिकीकरणाच्या बाबतींत इतर देशांच्या मानानें आपण फार मागें आहोंत हें कबूल केलें पाहिजे. आपण आपली फार स्तुति करीत असतों. आमचें राज्य फार पुढारलेलें,

प्रगतिपर आहे असें आपण म्हणत असतों. परंतु आम्हांला कोणाचीहि फसवणूक करण्याची इच्छा नाहीं. मागासलेलें राज्य असेंच महाराष्ट्र राज्याचें वर्णन केलें पाहिजे. मुंबई शहर सोडलें तर महाराष्ट्रांत आहे काय ? ओसाड मैदानें, दुष्काळी भाग आणि आम्हीं अभिमान बाळगावा असे जुने किल्ले. महाराष्ट्रांत नद्या पुष्कळ आहेत, पण त्या छोट्या छोट्या आहेत. आणि आमच्या जमिनीची भूक तर मोठी आहे. म्हणून पावसाळ्यांत जें पाणी मिळेल तें चार महिने साठवून ठेवावें आणि पुढच्या आठ महिन्यांत तें वापरावें असा महाराष्ट्राचा गरिबीचा संसार आहे. म्हणून महाराष्ट्रात पाटबंधा-यांच्या सोयी उपलब्ध करून देणें फार महत्त्वाचें आहे. परंतु त्यांतहि इथें धरण करूं नका, तिथें धरण करू नका, अशा प्रकारचे अडथळे निर्माण करण्यांत येत असल्याचें दिसून येतें. मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, शेतीच्या उत्पादनाकरितां जास्तींत जास्त आधुनिक साहित्य उपलब्ध करून देणें हा आजचा महत्त्वाचा प्रश्न आहे. म्हणून ज्यायोगें लोकांचे मन विचलित होईल, लोकांच्या मनांत संशय निर्माण होईल अशा गोष्टी आपण सोडून दिल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या कोणत्याहि घोषणा करणें चुकीचें होईल असें मला नम्रपणें सुचवावयाचें आहे.

आपली भरभराट ही शेतीवरच अवलंबून आहे. त्याच्याहि पुढें जाऊन मी असें म्हणेन कीं आपलें औद्योगीकरणहि आपल्या शेतीच्या भरभराटीवर अवलंबून आहे. आपल्या देशाच्या आर्थिक यंत्रणेंत शेतीला मध्यवर्ती स्थान आहे. शेतीच्या सुधारलेल्या पद्धतींचा अवलंब करून जोमदार लागवड करणें ही शेतमालाचें उत्पादन वाढविण्याची गुरुकिल्ली आहे. आपल्या शेतक-यांची सध्यांची जी आर्थिक परिस्थिति आहे ती लक्षांत घेतां आपल्या शेतक-यांना एकत्र काम करूनच स्वतःसाठीं अधिक धान्योत्पादन करणें सोपें जाईल. सहकारी शेती म्हणजे सामुदायिक शेती नव्हे. शेतक-यांना आंधळेपणानें मोठा धोका पत्करावा लागणार आहे असेंहि त्यांत कांही नाहीं. सेवा सहकारी सोसायट्या स्थापून याबाबतची सुरुवात करावयाची आहे. आणि त्यांचें काम सुरू झालें म्हणजे जमीनमालकांची संयुक्त मालकी असलेली व त्यांच्या संयुक्त व्यवस्थेखालीं काम करणारी स्वयंस्फूर्त सहकारी शेती संस्था स्थापन करण्यास आवश्यक ती भूमिका तयार होईल.

शेतीच्या संदर्भात आणखी एका प्रश्नाचा मी उल्लेख करूं इच्छितों. तो म्हणजे कृषि-उद्योगांचा प्रश्न होय. शेतीच्या धंद्याला महाराष्ट्रांत आम्हांला उद्योगांची जोड द्यावयाची आहे, आम्हांला कृषि-उद्योग निर्माण करावयाचे आहेत. यांत आम्ही कांहीं नवीन गोष्ट करणार आहोंत असा दावा मी करीत नाहीं, तसा आमचा आग्रहहि नाहीं. कारण हे शब्द माझे नाहींत. जे शब्द राजकीय आणि आर्थिक संदर्भात वापरले जातात तेच मीं वापरले आहेत. पण त्यांना मी आतां आमच्या कारभारामध्ये निश्चित अर्थ देऊं इच्छितों. यासंबंधी मी माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करीत

आहे. या कृषि-उद्योग शब्दाचा आशय काळाच्या ओघाबरोबर वाढत जाईल, बदलतहि जाईल. पण आपण महाराष्ट्रांतील खेड्यांकडे पाहिलें तर आपल्याला असें दिसेल कीं आज खेड्यांमधील सगळा समाज शेतीच्या मूलभूत उद्योगावर आधारलेला आहे. यांतूनच भूमिहीनांच्या प्रश्नासारख्या अनेक सामाजिक कटकटी आणि तणाव निर्माण झाले असून या सर्व गोष्टी दूर करावयाच्या असतील तर शेती न करणारा जो वर्ग आहे त्याला शहरामध्यें घेऊन आलें पाहिजे. अशा दृष्टीनें आज चालू असलेलें नागरीकरण आपण पाहत आहोंत.

परंतु खेड्यांमध्यें निव्वळ शेतीवर आधारलेला जो समाज आहे त्याच्यासाठीं कृषि-उद्योग काढण्याचा प्रयत्न झाला तर खेडें हें खेडें राहणार नाही. खेडें आणि शहर, खेडें आणि नगर यामधील अंतर कृत्रिम आहे आणि तें दूर झालें पाहिजे. तें करण्याचा मार्ग म्हणजे उत्पादनाचें नवीन तंत्र आणि नवीन विज्ञान निर्माण करणारीं साधनें शेतक-यापर्यंत गेलीं पाहिजेत, शेतीमध्यें त्यांचा वापर करण्यास सुरुवात झाली पाहिजे, शेती हा उद्योग आहे आणि म्हणून त्यांत त्यांचा उपयोग झालाच पाहिजे. आणि त्याचप्रमाणें त्यांच्या मदतीनें दुसरे धंदे काढतां आले पाहिजेत. शेतीच्या कामांत आपण नांगर वापरतों. मी असें म्हणेन कीं शेतीच्या उपयोगाकरितां लागणारा हा नांगर नागपूर, मुंबई किंवा इतर ठिकाणीं निर्माण न होतां खेड्यांतच निर्माण झाला पाहिजे. यांत कांहीं अपुरेपण असेल तर तो नाहींसा करून पूर्णता आणणें आवश्यक आहे.

शेतीमधून निर्माण होणा-या ज्या गोष्टी आहेत त्यांच्यावर औद्योगिक प्रक्रिया करणें म्हणजे कृषि-औद्योगिक समाज नव्हे. त्याच्या पाठीमागें खेड्यांत वीज गेली पाहिजे ही कल्पना आहे. आर्थिक जीवनामध्यें विजेची शक्ति नसेल तर खेड्यांतील शेतक-यांचें जीवन आपण बदलूं शकणार नाहीं. हें म्हणणें माझें नाहीं, तें एका महापुरुषाचें आहे. लेनिननें हें चित्र सुरुवातीलाच जगापुढें ठेवलें होतें. त्याबद्दल आपण त्याचें ऋणी राहिलें पाहिजे. जें चांगलें आहे तें आपण जरूर घेतलें पाहिजे. अनुभवाच्या बाबतींत आपण एकमेकांची उसनवारी करण्यांत कांहींच कमीपणा नाहीं. तेव्हां मला हेंच सांगावयाचें आहे कीं कृषि-उद्योग प्रधान अर्थरचना या शब्दप्रयोगाच्या पाठीमागची विचारसरणी ही अशी आहे. ही कल्पना केवळ महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नाहीं. जुन्या पद्धतीनें शेती करणा-या सर्व समाजानें स्वीकारण्यासारखी ही गोष्ट आहे. या कल्पनेला मूर्त स्वरूप येण्यास किती वर्षे लागतील हें सांगतां येणार नाहीं. परंतु ज्या वेगानें औद्योगीकरण वाढत जाईल त्या वेगावर कृषि-औद्योगिक समाज निर्माण होणें अवलंबून राहील. आमचा हेतु, आमची विचारसरणी ही अशी आहे. यासाठीं वेगळा शब्दप्रयोग उपयोगी पडणार असेल तर तो आम्ही जरूर घेऊं. शेवटीं मी हें स्पष्ट करूं इच्छितों कीं पुढील निवडणुकीच्या दृष्टीनें आम्हीं ही कल्पना मांडलेली नाहीं. जनता आतां जागृत असल्यामुळें कोणत्या पक्षाच्या लोकांना निवडून द्यावयाचें आणि

कोणत्या नाहीं हें पारखूनच ती आपलें काम करील. परंतु मतें मिळविण्यासाठीं ही गोष्ट आम्हीं मांडलेली नाहीं. अर्थात् सरकार जें कांहीं करीत आहे त्याचा सरकार पक्षाला निवडणुकीमध्यें उपयोग झाला तर मला आनंदच होईल. हें धोरण स्वीकारल्यामुळें सरकारला निवडणुकीमध्यें मदत होत असेल तर ती आनंदाची गोष्ट आहे असें मी म्हणेन. परंतु त्याचबरोबर विरोधी पक्षाला मी असें म्हणेन कीं तुम्हींहि त्यांत आनंद मानला पाहिजे. निदान ज्यांचा समाजवादी विचारसरणीवर विश्वास आहे त्यांना तरी आनंद वाटला पाहिजे.

शेतीसंबंधी अत्यंत महत्त्वाचे असे जे आपले प्रश्न आहेत तें मीं आपणांसमोर अगदी थोडक्यांत मांडले आहेत. आपण त्यांतून कसा मार्ग काढतों यावर महाराष्ट्राची भरभराट आणि उत्कर्ष अवलंबून आहे. आपल्या आर्थिक विकासाचें सूत्रच त्यांत गोवलेलें असल्यामुळें आपण या सर्व प्रश्नांचा साकल्यानें विचार करावा अशी विनंती करून मी आपली रजा घेतों.

## आमच्या शेतीचा मूलभूत प्रश्न

या समारंभासाठीं आठवण ठेवून आपण मला इतक्या दूर बोलावलें त्याबद्दल मी आपला अतिशय आभारी आहें. तीन वर्षांपूर्वी परभणीला आलों असतांना, या कृषि महाविद्यालयाला मीं धावती भेट दिली होती. यानंतर आपल्या महाविद्यालयानें पुष्कळ प्रगति केली आहे. म्हणून या कृषि महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीच्या समारंभाचें निमंत्रण जेव्हां आपण मला दिलें तेव्हा तें स्वीकारण्याचा मला मोह झाला. कारण या निमित्तानें परभणीला येण्याची एक संधि लाभेल आणि या विभागांतील मतप्रवाहांचाहि थोडासा संपर्क साधेल असें मला वाटलें; आणि म्हणून मीं आपलें निमंत्रण स्वीकारलें आणि आज येथें आपल्यामध्यें आलों.

मला एका गोष्टीचा आनंद आहे कीं मराठवाड्याच्या विकासाच्या कामाला गति मिळावी अशी तुमची, माझी, सर्वांची इच्छा आहे. त्याच्यासाठीं प्राथमिक स्वरूपाच्या ज्या कामांची गरज आहे अशा कामांपैकी हें एक काम आहे. विकास ही कांहीं एकाच क्षेत्रापुरती मर्यादित गोष्ट नसून ती सर्वंकष अशी गोष्ट आहे. एका क्षेत्रामध्यें प्रगति झाली म्हणजे विकास होतो असें नाहीं. सर्वच क्षेत्रांमध्यें संतुलित प्रगति म्हणजे विकास अशी विकासाची मी व्याख्या करतो. आणि म्हणून कांही प्राथमिक संस्थांची, कांही मूलभूत शैक्षणिक प्रयत्नांची विकासासाठीं आवश्यकता असते. या दृष्टीनें पाहिलें तर मराठवाड्याच्या विकासामध्यें कृषि-प्रशिक्षणाची, शेतीविषयक अधिक प्रगत अशा ज्ञानाची आवश्यकता होती आणि आहे. त्यासाठींच हें कृषि महाविद्यालय आतां सुरू झालें

आहे. या कृषि महाविद्यालयाला शोभेल, असें एक मोठें थोरलें घर आपण देतों आहोंत. कृषि महाविद्यालयाची एक निराळी वसाहत स्थापन होणार असून जमिनीची किंमत धरून जवळजवळ साठ लाखांचा खर्च, या महाविद्यालयासाठीं आपण करतों आहोंत. लाखांचा प्रश्न मी गौण मानतों. परंतु हें जें काम होत आहे तें अतिशय महत्त्वाचें असें काम आहे. तेव्हां मला आशा आहे कीं या महाविद्यालयामध्यें शिकणारे विद्यार्थी मराठवाड्याच्या नव्या रचनेंत कांहीं नव्या परंपरांची भर घालतील.

मीं सांगितलें कीं मराठवाड्यांत होणारें अशा प्रकारचें हें पहिलेंच महाविद्यालय असून त्याच्यावर कांही जबाबदा-या आहेत. अर्थात् या महाविद्यालयामध्यें मराठवाड्यांतूनच सगळे विद्यार्थी येतील असें मी धरून चालत नाहीं. त्यामध्यें बाहेरचेहि कांहीं विद्यार्थी येतील आणि बाहेरच्याहि महाविद्यालयांमध्यें मराठवाड्यांतील कांहीं विद्यार्थी जातील असें मी मानतों. मराठवाड्यांतील प्रत्येक गोष्ट मराठवाड्याचकरितां आणि मराठवाड्याच्या बाहेरची गोष्ट मराठवाड्याच्या बाहेरच्याच लोकांकरितां असा हिशेब आपण ठेवतां कामा नये. थोडीशी देवाणघेवाण असलेली बरी. परंतु मराठवाड्यांतील ह्या कृषि महाविद्यालयाचा फायदा मराठवाड्यांतील विद्यार्थी जास्त घेतील यांत कांहीं शंका नाहीं. आणि म्हणून त्यांच्यावर ही जिम्मेदारी आहे कीं त्यांनी येथें कांहीं नव्या परंपरा सुरू केल्या पाहिजेत.

श्री. मोहिते ह्यांनी आतां सांगितलें कीं मी शेतीच्या महात्त्वासंबंधीं येथें बोलेन. परंतु कृषि-पंडितांच्या पुढें कृषीचें महत्त्व मी कोण सांगणार ? खरें म्हणजे कृषीचें महत्त्व तुमच्यापासून मीं समजावून घेतलें पाहिजे. मी शेतकरी परंपरेचा आहें. मी आतां शेतकरी राहिलों नसलों तरी मला शेतकरी परंपरेचा अभिमान आहे. शेतकरी परंपरा राहिली पाहिजे. माझा मूळ पिंड शेतक-याचा आहे हें मी कांहीं नाकारीत नाहीं. पण मी आज शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून नसल्यामुळे कायदेशीर रीत्या मला शेतकरी म्हणवून घेतां येणार नाहीं याची मला जाणीव आहे. तेव्हां शेतीसंबंधींची माहिती आपल्याकडूनच मीं घेतली पाहिजे.

शासनाच्या कामामध्यें राहिल्यानंतर एक गोष्ट मला पटली आणि ती म्हणजे शेतीचा प्रश्न हा या देशांतील मूलभूत असा प्रश्न आहे. आणि तो केवळ हिंदुस्तानलाच नव्हे तर जगांतील सर्व पुढारलेल्या देशांनाहि आज भेडसावतो आहे. रशियासंबंधींची मी अगदी अलीकडची माहिती वाचीत होतों. एका बाजूला ॲटॉमिक सायन्सची, न्युक्लिअर सायन्सची प्रगति करणारा रशिया शेतीच्या उत्पादनाच्या आघाडीवर मार खात आहे असें कांहीं लोकांचे म्हणणें आहे. प्रगतीच्या खूप जाहिराती लावलेल्या चीनला वर्षा-दोन वर्षांमध्यें आपल्या सगळ्या प्रगतीच्या आंकड्यांत फेरबदल करावा

लागला आणि आम्हीं पूर्वी म्हटल्याप्रमाणें आमचें उत्पादन वाढलेलें नाहीं असें त्याला जाहीर करावें लागलें. सांगायचा हेतु असा कीं इतर क्षेत्रांतील उत्पादन आणि शेतीमधील उत्पादन यांमध्यें मूलभूत फरक आहे. औद्योगिक क्षेत्रांतील उत्पादन हें केंद्रीभूत स्वरूपाचें उत्पादन असतें. आणि शेतीचा धंदा हा मूलतःच विकेंद्रित स्वरूपाचा असल्यामुळे त्याच्या उत्पादनाच्या आघाडीवर महाभयंकर लढाई अगदीं सतत चालू ठेवावी लागते. अगदीं कठीण असा हा शेतीचा प्रश्न आहे.

हा प्रश्न स्पष्ट करण्यासाठीं मी नेहमी सांगत असतों कीं शेतीचा प्रश्न हा रावणासारखा आहे. रामाच्या आणि रावणाच्या कथेंतील रावण हा दहा तोंडांचा होता असें आपण ऐकतों, तर आमच्या शेतीचा प्रश्न हा शंभर तोंडांचा प्रश्न आहे. जेथें पाहावें तेथें त्याला तोंड आहे. आणि त्याच्या प्रत्येक तोंडाशीं घास द्यावा लागतो इतका महत्त्वाचा हा प्रश्न आहे. शेतीची रचना कशी असावी, शेतीची धारणा कशी असावी, शेतीमध्यें ज्या अवजारांचा उपयोग करावयाचा त्यांचें स्वरूप काय असावें, शेतीला कामासाठीं जें जनावर वापरावयाचें त्याचें रूप काय असावें, शेतीला लागणारें भांडवल कोणत्या पद्धतीनें घ्यावें, शेतीचा उपयोग कोणत्या कामासाठीं करावा, शेतीवर आधारलेला धंद्यांचा उपयोग कसा करावा, त्याची बाजारपेठ कशी हस्तगत करावी असे शेतीसंबंधींचे हजारों प्रश्न आहेत. आणि यांपैकीं प्रत्येक प्रश्न वादग्रस्त स्वरूपाचा आहे.

जगांत एखाद्या राष्ट्रानें कितीहि प्रगति करण्याचा प्रयत्न केला तरी शेवटीं त्याचे पाय जमिनीवर असतात. चंद्रावर जाण्याचा प्रयत्न करावयाचा असला तरीहि त्याच्यासाठीं जमिनीवर जर पाय नसतील तर चंद्राकडे जाण्याचा विचार करणें सुचणारच नाहीं. चंद्रावर जाणारें रॉकेट कसें तयार करावें याचा विचार शास्त्रज्ञाच्या डोक्यांत चालावयाचा असेल तर त्याच्या पोटामध्यें प्रथम ज्वारीचा कण गेला पाहिजे. त्याशिवाय तें काम त्याला जमणार नाहीं. त्यामुळें कितीहि मोठे प्रयत्न करावयाचें एखाद्या देशानें ठरविलें तरी जमिनींतून निर्माण होणा-या उत्पादनावरच शेवटीं माणूस अवलंबून असतो, असा सध्यांचा अनुभव आहे. आणि म्हणून हिंदुस्तानच्या जीवनांतील ट्रॅजेडी किंवा हिंदुस्तानच्या जीवनांतील कारुण्य यांत आहे कीं शेती ही एवढी मोठी महत्त्वाची गोष्ट असतांना शेतीचा आणि शिक्षणाचा आम्ही अजिबात संबंध तोडून टाकलेला आहे. असें करून चालणार नाहीं. आपल्या दृष्टीनें महत्त्वाची अशी जी एक शास्त्रीय दृष्टि आहे ती शेतीच्या प्रश्नापासून आम्ही अलग मानतों. शेतक-याच्या घरांतील मुलगा शिकून शहाणा झाला तर तो सांगतो कीं मी मॅट्रिक झालों, मला कोठें तरी नोकरीला गेलें पाहिजे. शिकल्यानंतर शेतींत राहणें म्हणजे आपण कांहीं तरी चूक करीत आहोंत अशी आपली समजूत आहे. शेतींत राहावयाचें असेल तर न शिकतांच राहिलें पाहिजे, अडाणी म्हणूनच राहिलें पाहिजे अशी एक चुकीची समजूत आमच्या मनांत पक्की झाली आहे. आणि ही अत्यंत घातुक गोष्ट आहे असें मी मानतों.

मी हल्लींच्या शिक्षणाचा म्हणजे ज्याला ह्युमॅनिटीजचें शिक्षण म्हणतात त्याचा पुरस्कार करणारा आहें. पण मी ज्या देवाचा भुंज आहें त्याच देवाची स्तुति करणारा नाहीं. शेतीच्या शिक्षणाचीहि आवश्यकता आहे. शेतकरी आणि शेतीशीं संबंध असणारा मनुष्य हा शहाणा असल्याशिवाय शेती शहाणी होणार नाहीं यावर माझा विश्वास आहे. आज शेतकरी शहाणा करायचा आहे याचा अर्थ आधुनिक पद्धतीनें शेती करणे हा जर असेल तर शेतीचें म्हणून जें कांहीं शास्त्र आहे त्याचा अभ्यास व्हावयास पाहिजे. परंतु तें शास्त्र स्थिर असें शास्त्र नाहीं, तें वाढणारें शास्त्र आहे. १९४० सालचा शेती तज्ज्ञ आज अडाणी ठरण्याची शक्यता आहे, आणि आजचा शेती तज्ज्ञ हा १९७० सालीं कमी शहाणा ठरण्याची शक्यता आहे, आणि हिंदुस्तानांतील उद्याचा शेतीचा पी. एच. डी. १९८० सालीं तितकाच शहाणा ठरेल असें मानायला मी तयार नाहीं. जगांतील ज्ञान वाढतें आहे, त्या वाढत्या ज्ञानाचा परिणाम शेतीच्याहि ज्ञानावर आणि विज्ञानावर होत आहे. आणि म्हणून आज हिंदुस्तानांत सर्वच क्षेत्रांमध्यें सगळ्यांत जास्त कशाची जरुरी असेल तर ती ह्या शास्त्रीय ज्ञानाची आहे असें मी मानतों. शेतीच्या क्षेत्रांत तर ती विशेषच आहे. त्याचें कारण आजपर्यंत परंपरेनें आम्ही मानलें कीं शेती ही कांहीं शिकण्यासारखी गोष्ट नाहीं. दोन बैल घ्यायचे, गाडी-घोडा घ्यायचा आणि घरामध्यें जें बी-बीयाणे असेल तें जमिनींत नेऊन टाकायचें. परमेश्वरानें टाकलें पावसाचें पाणी तर उगवलें, नाहीं तर नशीब आपलें असें समजून गप्प बसायचें. असा हा शेतीचा व्यवसाय आम्हीं केला आहे. त्यामुळें आम्ही मुळांतच इतरांपेक्षां मागासलेले आहोंत. शिवाय, निव्वळ शेतीवर जें राष्ट्र अवलंबून राहतें तें मुळांतच अडाणी राहतें, मागासलेलें राहतें, हें सत्य नाकारण्यांत कांहीं फारसा अर्थ नाहीं. आर्थिक दृष्ट्या - मी सांस्कृतिक दृष्ट्या नाहीं म्हणत - मागासलेल्या शेतीचा देश हा अतिशय मागासलेला राहतो हें स्वीकृत तत्त्व आहे, स्वीकृत सत्य आहे.

आपल्या देशांत आपल्याला शेतीच्या दृष्टीनें जास्त प्रयत्न करावयाचा आहे. याचें कारण आपली शेती मागासलेली आहे. तींत सुधारणा घडवून आणण्यासाठीं शेतीचें शिक्षण वाढविलें पाहिजे. त्याचप्रमाणें शेतीच्या शास्त्रीय शिक्षणाचा दृष्टिकोन लोकांमध्यें वाढविला पाहिजे. यासाठी येथें शिकणारे शेतीचे सगळे स्नातक निव्वळ शेतकी खात्याचे अधिकारी होऊन जाणार असले आणि जावयाच्या शर्यतीमध्यें त्या निमित्तानें पुढें सरकणार असले, तर मी असें म्हणेन कीं ती दुसरी शोकपर्यवसायी गोष्ट होईल. येथें शिकलेला मनुष्य शेतकरीहि होऊं शकला पाहिजे, तसें त्यानें झालें पाहिजे. शेतीचें फक्त दुस-यांनाच व्याख्यान देणारे स्नातक जर या कृषि महाविद्यालयांतून निर्माण होणार असतील तर चळवळ करून हीं कृषि महाविद्यालयें बंद करावीं लागतील असें मला वाटायला लागलें आहे. येथें शेतीचे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्याला प्रत्यक्ष शेतीच्या कामामध्यें आपल्या शिक्षणाचा उपयोग करणें शक्य झालें नाहीं, त्यांत तो यशस्वी झाला नाहीं तर ती

चुकीची गोष्ट ठरेल. कारण शेतीसंबंधींचा शास्त्रीय दृष्टिकोन अगदीं झोपडींतल्या शेतक-यांपर्यंत नेऊन पोचविणें हा या देशांतील कृषीचें ज्ञान वाढविण्याचा खरा उद्देश आहे, एक ॲग्रिकल्चरल सर्व्हिस निर्माण करण्याचा नाहीं.

या देशांत जास्तींत जास्त लोकांना शेतीचेंच काम करावयाचें आहे. दोन एकरांत शेतीचें काम करणारा शेतकरी आपल्या कामामध्यें पराभूत झाला तर तो देशाचा पराभव होत आहे असा त्याचा अर्थ आहे. दोन पंचवार्षिक योजनांमध्ये खूप प्रयत्न करून सुद्धां शेतीच्या आघाडीवर आज आपला पराभव होत आहे असा आपल्याला अनुभव येत आहे. इकडे पुष्कळशा संशोधनशाळा काढल्या, नवीन कारखानदारी काढण्याचा प्रयत्न केला, परदेशांतून हुंडणावळ मिळविण्याचा प्रयत्न केला, राजकीय क्षेत्रामध्यें पंचशीलची पुष्कळ प्रगति झाली, सगळें कांहीं घडलें. परंतु परभणीच्या खेड्यांतील लहानशा शेतक-याला आपल्या शेतीमध्यें दहा मणाचें बारा मण धान्य काढतां आलें नाहीं, तर त्या प्रमाणांत हिंदुस्तानचा पराभव होत आहे असें मला वाटतें, आणि म्हणून शेतीसंबंधींचा नवा दृष्टिकोन, शास्त्रीय दृष्टिकोन हा स्नातकांपर्यंत असा मर्यादित राहतां कामा नये. त्याचा विचार असा पाझरत पाझरत किंवा न पाझरतां अगदीं सरळ कालव्यासारखा वाहत वाहत शेवटच्या शेतक-यापर्यंत जाऊन पोंचला पाहिजे. आज देशामध्यें याची आवश्यकता असून हें जेव्हां घडेल तेव्हांच शेतीचा प्रश्न सुटणार आहे. कारण मीं आपणांला सांगितलें त्याप्रमाणें शेती हें विकेंद्रित स्वरूपाच्या उत्पादनाचें क्षेत्र आहे. पांचपंधरा कापड-गिरण्या काम करूं लागल्या कीं सगळ्या चाळीस कोटि लोकांना कापड मिळतें. पण पांचपंचवीस ठिकाणींच शेतीचें चांगलें उत्पन्न काढण्याचा प्रयोग केला तर त्यामुळें एकंदर शेतीचें उत्पादन वाढण्याचा कांहीं संभव नाहीं. दहापांच कृषि-पंडित निघाले तर त्यांचा वैयक्तिक मोठेपणा वाढेल, पण त्यांची शेती करण्याची पद्धत हजारों शेतक-यांपर्यंत पाझरत गेली नाहीं तर त्यांच्या ज्ञानाचा कांहीं उपयोग नाहीं. असा हा शेतीचा अगदीं बिकट प्रश्न आहे. त्याकरितां शेतीचें हें ज्ञान पावसाच्या पाण्यासारखें गेलें पाहिजे असें मला वाटतें. वाहणारी नदी ज्या गांवच्या कांठानें जाईल त्यालाच फक्त पाणी देते. पण पावसाचें पाणी हें सगळीकडे जातें. कुठें कमी, तर कुठें जास्त. असें पावसाच्या पाण्यासारखें शेतीचें ज्ञान सगळीकडें पसरलें पाहिजें, वाढलें पाहिजे, आणि हीं महाविद्यालयें त्याचीं केंद्रें झालीं पाहिजेत. या महाविद्यालयामध्यें शिकणा-या विद्यार्थ्यांना उद्देशून मी हें बोलत आहें. आमच्या देशामध्यें शेतीच्या क्षेत्रामध्यें एक प्रकारच्या शास्त्रीय दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. हा दृष्टीकोन आधीं मुळांतच येथें नव्हता. त्याची आवश्यकता आहे ही भावनाहि नव्हती. तेथें आम्हांला ही भावना आतां निर्माण करावयाची आहे, आणि हें ज्ञान आम्हांला पसरावयाचें आहे. याकरितांच मला असें वाटतें कीं शेतीचें शिक्षण हें फार मूलभूत असें महत्त्वाचें कार्य आहे.

मात्र त्याबरोबरच मी इतर शिक्षणाला कमी महत्त्व देतों असें नाहीं. कारण जें तत्त्वाचें असेल तें मला बोललें पाहिजे. मी आज दुपारीं वकीलवर्गाच्या परिषदेस गेलो होतों. मी तेथें त्यांना सांगितलें की वकीलवर्गाची देशाला जरूर आहे, आणि कायद्याचें ज्ञान हें विज्ञानाच्या ज्ञानाइतकें महत्त्वाचें आहे. कारण शेतकरी हा चांगला होऊनहि त्याला कायद्याचें ज्ञान नसेल तर तो फसतो असा आपला अनुभव आहे. मी सांगू इच्छितो कीं मी स्वतः वकील आहे आणि मला वकील असल्याचा अभिमान आहे. कारण कायद्याचें ज्ञान हें प्राणवायूसारखें आहे. एखाद्याला सगळ्या गोष्टींचे ज्ञान असूनही जर कायद्याचें ज्ञान नसेल तर तो अपुरा ठरतो. इंजिनिअर, डॉक्टर वगैरे सगळ्यांना त्यांच्या त्यांच्या धंद्याला आवश्यक असें कायद्याचें ज्ञान असावें लागतें. लोकशाही हेंच मुळीं कायद्याचें राज्य आहे. तेव्हां कायद्याचें ज्ञान ही आज आवश्यक अशी गोष्ट आहे. आपण या कॉलेजचे विद्यार्थी आहांत आणि ज्ञानाच्या क्षेत्रांतील पाईक आहांत म्हणून आपणांस एक गोष्ट सांगितली पाहिजे. आज हिंदुस्तानमध्यें विशेषतः जे स्वतःला इंटलेकच्युअल्स - म्हणजे विचार करणारे मानतात किंवा नवीन शिक्षण घेणारे मानतात, त्यांच्या मनामध्यें एक प्रकारचा संतुलित दृष्टिकोन निर्माण करण्याची फार आवश्यकता आहे असें मी मानतों. आणि हाच खरा शास्त्रीय दृष्टिकोन शेवटीं उपयोगी पडेल. शेतीचा शहाणा हा फक्त शेतीचाच शहाणा झाला आणि इतर क्षेत्रांत अडाणी राहिला, तर तो शेतीचेंहि कल्याण करणार नाहीं आणि दुसरें कुठलेंहि कल्याण करणार नाहीं, करूं शकणार नाहीं. आणि म्हणून तुम्ही शेतीचे स्नातक म्हणून जेव्हां या महाविद्यालयांतून बाहेर पडाल तेव्हां या सर्व गोष्टींचा आपल्या मनावर योग्य तो संस्कार घेऊनच बाहेर पडलें पाहिजे. तरच तुम्ही परिपूर्ण नागरिक होऊं शकाल.

या विद्यालयाचें काम ज्यांनीं आपल्या अंगावर घेतलें आहे त्यांना मी धन्यवाद देतों. कृषि महाविद्यालयाचें हें जें काम येथें सुरू झालें आहे त्याचा अर्थ मी माझ्या मनाशीं असा करतों कीं मराठवाड्यामध्यें कृषीचें शास्त्रीय ज्ञान वाढीला लागणार आहे. परभणीचें हें महाविद्यालय म्हणजे कृषीचें ज्ञान पसरविण्यासाठीं मराठवाड्यामध्यें एक पाणपोई तयार झाली असें मानलें पाहिजे. त्याचा उपयोग करून घेण्यासाठी मराठवाड्यांतील सर्व क्षेत्रांतील विद्यार्थी येथें येवोत आणि हें शेतीचें ज्ञान घेऊन परत शेतीच्या सेवेसाठीं ते जावोत अशी इच्छा व्यक्त करून हें विद्यालय नांवारूपाला येऊन आपली कीर्ति ह्या मराठवाड्यामध्यें, मुंबई राज्यामध्ये आणि हिंदुस्तानमध्येंहि पसरवो अशी प्रार्थना करून मी आपली रजा घेतों.

## ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना

ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना मीं आज आपणांपुढें सांगावी अशी अपेक्षा आहे. परंतु ग्रामीण शिक्षणासंबंधींची माझी कल्पना सांगण्यापूर्वी, शिक्षण म्हणजे काय याची थोडीफार कल्पना आपण समजावून घेऊं या. पुस्तक वाचून येणारें ज्ञान तें शिक्षण असें समजण्याची एक मोठी प्रथा आहे. आणि ती कांही अंशीं बरोबरहि आहे. परंतु खरें शिक्षण म्हणजे काय याचा अर्थ आपण सगळ्यांनीं आपल्या मनाशीं समजावून घेतला पाहिजे. मीं माझ्या उपयोगासाठीं शिक्षणाची एक सरळ आणि साधी व्याख्या करून ठेवली आहे. शिक्षित व्यक्तीला स्वतःच्या भोवतीं घडणा-या गोष्टी आणि जगामध्यें घडणा-या इतर गोष्टी यांची ज्यामुळें कांहीं संगति लावतां येते, त्यांचा योग्य अर्थ समजावून घेतां येतो, आणि त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो, आपल्या व्यक्तिमत्त्वावर काय घडतो हें समजावून घेतां येतें आणि समजावून देतां येतें, त्याला मी शिक्षण मानत आलों आहें. ही एक महत्त्वाची गोष्ट ग्रामीण शिक्षणाची कल्पना सांगण्यापूर्वी मला स्पष्ट केली पाहिजे. आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट मला आपल्या नजरेला आणावयाला पाहिजे ती अशी कीं जेव्हां ग्रामीण शिक्षण असा शब्द आम्ही उच्चारतों तेव्हां ग्रामीण आणि नागरी शिक्षण, खेड्यांतल्या लोकांच्यासाठीं शिक्षण आणि शहरांतल्या लोकांच्यासाठीं शिक्षण असे शिक्षणाचे दोन वेगवेगळे प्रकार असावेत असा विचार साहजिकच मनाशीं येतो. तेव्हां या बाबतींत वस्तुस्थिति काय आहे याची अगदी स्पष्ट कल्पना आपल्याला असली पाहिजे.

माझें असें स्पष्ट आणि स्वच्छ मत आहे कीं शिक्षणाचे असे दोन मूलभूत वेगवेगळे प्रकार असूंच शकणार नाहींत. आजच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितींत खेड्यांतला माणूस आणि शहरांतला माणूस यांच्यामध्यें एक प्रकारचें जें कृत्रिम अंतर वाढत चाललें आहे तें वाढतें अंतर कमी करून त्यांच्यामध्यें एक प्रकारचा तोल निर्माण करणें, जवळचा संबंध निर्माण करणें, जिव्हाळा निर्माण करणें हा माझ्या दृष्टीनें आपल्या देशांतील आजचा अत्यंत महत्त्वाचा आणि प्रमुख असा प्रश्न आहे. आणि म्हणून ग्रामीण शिक्षण हा कांहीं वेगळा प्रकार आहे अशा समजुतीनें जर आम्ही ग्रामीण शिक्षणाकडे पाहत असलों, तर ती एक आपली मोठी चूक होईल असें मला सांगावेसें वाटतें. आज ज्या त-हेचें शिक्षण आपल्या आवतीभोंवतीं दिलें जातें त्याचा ग्रामीण जीवनावर काय परिणाम होतो ? नमुन्यासाठीं खेडेगावांतला एक मुलगा बाहेरगांवीं शिक्षणासाठीं गेला आहे अशी आपण कल्पना करूं या. त्या शिक्षणाचा त्याच्यावर काय परिणाम घडला, आणि तो ज्या खेड्यांतून आला त्या खेड्यासाठीं त्याचा काय उपयोग झाला याचा आपण विचार केला तर मात्र मनामध्यें एक प्रकारची खिन्नता आल्याशिवाय राहत नाहीं. खेडूत बाप आणि आई यांनीं कष्ट सहन करून शिक्षणासाठीं बाहेर पाठविलेला मुलगा पदवी घेऊन जेव्हां शहाणा होतो तेव्हां तें त्याचें शहाणपण खेड्यामध्यें राहून शेती करणा-या किंवा दुसरा कांहीं उद्योग करणा-या त्याच्या मातापित्यांचें आर्थिक जीवन सुधारण्यास उपयोगी पडत नाहीं. तो शहरामध्यें एखादी सोईची, सुखाची नोकरी मिळावी या भावनेनें खटपट करीत असतो. पुष्कळ

वेळां तो यशस्वीहि होतो आणि मग एका अर्थानें, आपले आईबाप आणि ज्या भूमींत, ज्या गांवांत तो वाढला तो गांव व ती भूमि, या सर्वांनाच तो मुकतो. अशा प्रकारचीं कित्येक उदाहरणें मला माहीत आहेत, आपणांसहि माहीत असतील. माझ्या मतानें खरोखरी हें मोठें करुण असें चित्र आहे.

शिक्षणाच्या वाढीबरोबर अशा त-हेचे प्रश्न जर घरोघरीं निर्माण होणार असतील तर मात्र या शिक्षणासंबंधानें तुम्हां-आम्हांला विचार केला पाहिजे. आणि म्हणून गांवांतून शिक्षण घेऊन तयार झालेला तरुण हा गांवांतील शेतीच्या विकासाच्या, ग्रामीण जीवनाच्या विकासाच्या उपयोगी पडण्याइतका सकस नागरिक बनावा या दृष्टीनें जें शिक्षण द्यावयाचें, त्यालाच जर ग्रामीण शिक्षण आपण म्हणणार असलों तर या त-हेच्या ग्रामीण शिक्षणाचा विचार करण्याची आज जरुरी आहे यांत शंका नाहीं.

आज तुमच्या-आमच्या पुढचा, देशाच्या पुढचा महत्त्वाचा प्रश्न म्हणून ज्याला आपण मानतों आणि ज्याचा उल्लेख मीं थोड्याच वेळापूर्वी केला, तो प्रश्न म्हणजे ग्रामीण जीवन आणि नागरी जीवन, खेड्यांतील जीवन आणि शहरांतील जीवन, यांच्यामधलें जें वाढतें अंतर आहे तें कमी करणें हा आहे. तें कमी करण्याचा मार्ग एकच आहे आणि तो म्हणजे गांवांची सध्यां जी आर्थिक रचना आहे ती अशा रीतीनें बदलली पाहिजे कीं त्यामुळें, शेतीसारख्या गांवांतील प्रमुख धंद्याची आणि शेतीशीं संलग्न असलेल्या गांवांतील छोट्या छोट्या धंद्यांची गतिमानता आणि त्यांच्यांतला जिवंतपणा आज जो कमी झाला आहे व त्यामुळें त्यांच्यांत जो एक प्रकारचा निकसपणा आला आहे तो सर्व जाऊन हे धंदे सकस कसे होतील, जे लोक हे धंदे करतात त्यांच्या जीवनांत समृद्धि आणण्यासाठीं ते उपयोगी कसे पडतील या दृष्टीनें आपणांस आज प्रयत्न करावयाचे आहेत. हें सर्व घडवून आणण्याचें काम आपल्या देशानें आज महत्त्वाचें मानलें आहे.

शेतीसंबंधीं जें नवीन नवीन संशोधन आज होत आहे त्याचा उपयोग आपली शेती करूं शकेल अशा दृष्टीनें शिक्षण देण्याचा प्रयत्न आपणांला करतां येईल. जुन्याच पद्धतीनें अनेक शतकें आपण शेती करीत आलों. त्यामुळें शेतीचा हा धंदा पाठीमागें पडला. आज शेतीचा संबंध नव्या शोधांशीं, शेती करण्याच्या नव्या नव्या पद्धतींशीं जर जोडावयाचा असेल तर हें नवें शास्त्र शेतीच्या धंद्याशीं नेऊन भिडविण्याचें काम आपणांस केलें पहिजे. या कामामध्यें आम्हांला शिक्षणाचा उपयोग करून घेतां येईल. या त-हेचें शिक्षण हें ग्रामीण शिक्षणाचा एक प्रकारचा परिपाकच होय असें आपण मानलें पाहिजे. प्रश्न कोणत्या गोष्टीला ग्रामीण शिक्षण म्हणावे याचा नाही. ग्रामीण शिक्षणाचे हेतु आम्ही काय मानतो, ग्रामीण जीवनाचें स्वरूप आम्ही स्वतःच्या मनाशीं काय

ठरवितों यावर ग्रामीण शिक्षण म्हणजे काय हें ख-या अर्थानें शेवटी ठरणार आहे. ग्रामीण जीवनाचें स्वरूप काय असावें, त्याचा नागरी जीवनाशीं संबंध काय असावा या प्रश्नाचें आम्ही आपल्या मनाशीं जर निश्चित उत्तर देऊं शकलों, तर ग्रामीण शिक्षणाचा प्रश्न हळूहळू यशस्वी रीतीनें आपण सोडवूं शकूं असें मला वाटतें. खेड्यांतील ज्या कोट्यवधि जनतेचें जीवन मंगलमय करावें असा हेतु मनाशीं ठेवून आपलें राष्ट्र पुढें पुढें जाण्याचा प्रयत्न करीत आहे, त्या जनतेचें कल्याण करण्याचें एक साधन ह्या दृष्टीनें ग्रामीण शिक्षणाच्या प्रश्नाकडे पाहण्याचा आपण प्रयत्न करूं या, एवढीच या प्रसंगी मी आपल्याला विनंती करीन.

## नवपदवीधरांकडून अपेक्षा

मराठवाडा विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाचें अभिभाषण देण्याचा हा योग म्हणजे माझ्या जीवनांतील एक आनंदाचा क्षण व गौरवपूर्ण संधि आहे असें मी मानतों. हें विद्यापीठ आपल्या राज्यांत नवीनच उदयास आलें असलें तरी दक्षिणेंतील काशी म्हणून नांवाजलेलें व विद्यापीठ म्हणून शेंकडों वर्षे मान्यता पावलेलें प्रतिष्ठान क्षेत्र याच मराठवाड्यांत आहे याची आठवण झाली कीं मराठवाड्यांतील विद्यादानाच्या महान् परंपरेचा धावता चित्रपट माझ्या नजरेसमोर येऊन जातो. या सर्व काळांत विद्याक्षेत्रांचीं स्थानें बदललेलीं आहेत. एवढेंच नव्हे तर विद्येच्या क्षेत्रामध्येंच विचाराच्या व विस्ताराच्या दृष्टीनें मौलिक परिवर्तन झालें आहे.

या सर्व परिवर्तनाचा मागोवा घेणें एका अर्थानें उद्‌बोधक आहे. तपशिलांत न शिरतां स्थूलमानानें या परिवर्तनाचें स्वरूप समजून घेतलें तर आजच्या विद्यापीठाच्या कार्याचें व कर्तव्याचें स्वरूप कांहीसें स्पष्ट होईल. ज्ञानाच्या कल्पनेचा मौलिक विचार अनेक वर्षांपासून या भागांत झाला आहे. त्यांतील कांहीं तत्त्वें आजहि मार्गदर्शक ठरूं शकतील. कारण मानवी प्रवृत्ति व दृष्टिकोन हे निरनिराळ्या काळांत बदलत असले तरी मानवी मूल्यें हीं चिरंतन टिकणारीं आहेत. मानवी जीवनास आधारभूत असलेली हीं मूल्यें सर्व काळांत आणि सर्व देशांत उपयुक्त ठरलीं आहेत. अखंडपणें वाहत असलेल्या कालप्रवाहांत निश्चल अशा दीपस्तंभाप्रमाणें मानव जातीला सतत प्रकाश देत राहिलेलीं ही सत्यें प्राचीन काळांतील ज्या संतांनीं, महात्म्यांनी व द्रष्ट्यांनीं शोधून काढलीं व प्रसारित केलीं त्यांच्याविषयीं आपण सदैव कृतज्ञच राहिलें पाहिजे. या मूल्यांचा व सत्यांचा आपल्या जीवनांत अंगिकार करून त्यांचें लोण भावी पिढ्यांपर्यंत पोहोंचविणें हें आपले कर्तव्य आहे. मराठवाड्याच्या ह्या पवित्र भूमींत प्राचीन काळीं विद्यादानाचीं हीं जीं तीर्थक्षेत्रें होतीं त्यांचें महत्त्व हें असें आहे. आधुनिक काळांतील शाळा, विद्यालयें व महाविद्यालयें यांच्याहून

यापूर्वीच्या विद्यापीठांचे स्वरूप पुष्कळसें भिन्न होतें हे जरी खरें असलें, तरी ज्ञानदानाचें अमोघ असें कार्य त्यांनीं केलेले आहे यांत संदेह नाहीं. एका आंग्ल कवीनें म्हटलें आहे कीं, कारागृह हें कांहीं त्याच्या दगडी भिंतींनीं बनलेलें नसतें. हीच गोष्ट एका अर्थानें विद्यालयें अथवा विद्यापीठें यांच्या बाबतींतहि खरी आहे. तेव्हां प्राचीन काळांतील विद्यादानाची ही स्थानें एक प्रकारचीं विद्यापीठेंच होतीं. अर्थात् त्यांचीं उद्दिष्टें व कार्यपद्धति हीं त्या काळांतील परिस्थितीस अनुरूप अशीच होतीं.

त्या काळांत संतमहात्म्यांनी ज्ञानाचा प्रसार समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत पोहोंचेल अशा रीतीनें केला. ज्ञानदानांत कोणत्याहि प्रकारचा आप-पर अथवा उच्च-नीच असा भाव असतां कामा नये अशी त्यांची धारणा होती. ज्ञानाचा प्रसार सर्वत्र होऊन मानवी जीवन नवचैतन्यानें उजळून निघावें या निष्ठेनें व ध्येयानें ते प्रेरित झाले होते. त्या काळीं अध्यात्म, ईश्वरोपासना, विश्वाचें अनादि व अनंत असें स्वरूप, निसर्गाचें असीम सौंदर्य व भव्यता, नीतिशास्त्र हे ज्ञानाचे विषय होते, हें स्वाभाविकच आहे. तथापि आतां केवळ काळ बदलला असून जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांत परिवर्तन घडलें आहे व घडत आहे. अर्थात् याबद्दल खेद वा खंत बाळगण्याचें कारण नाहीं. काळ हा स्थिर नसून आपण काळाच्या प्रवाहाबरोबर राहिलें पाहिजे. अनेक युगांपूर्वी पायीं रखडणारा माणूस बैलगाडींतून प्रवास करूं लागला आणि आज तो विजेनें धावणा-या रेल्वेगाड्यांतून व हवेंत उडणा-या विमानांतून प्रवास करतो. अशीं हीं प्रगतीचीं पावले पुढें पुढें पडत आहेत. विज्ञानाची ही प्रगति आज एवढ्या झपाट्यानें होत आहे कीं, कोणी सांगावें, मानवाला नजीकच्या भविष्यांत केवळ या पृथ्वीतलाचाच नव्हे, तर अब्जावधि योजनें दूर असलेल्या ग्रहता-यांचा कारभार हाकावा लागेल. विज्ञानाच्या क्षेत्रांत या प्रकारें क्रांतिकारक परिवर्तन घडत असतांना विश्वविद्यालयांतून होणा-या विद्यादानाचें स्वरूप आहे तसेंच राहावें अशी अर्थातच कोणी अपेक्षा करणार नाहीं. निसर्गाचीं रहस्यें शोधून काढून त्यांचा आपल्या जीवनांत उपयोग करून घेणें, सुधारणेचा एक टप्पा गाठला कीं दुसरा टप्पा गाठण्यांसाठीं प्रयत्न करीत राहणें, आणि अशा रीतीनें सतत प्रगति करणें ही माणसाची उपजत प्रवृत्ति आहे. या प्रवृत्तीमुळेच आज प्रत्येक क्षेत्रांत त्यानें आघाडी मारली आहे. विद्यापीठें हीं या प्रवृत्तींना चालना देणारीं ज्ञानसत्रें असल्याकारणानें बदलत्या काळाबरोबर त्यांच्या स्वरूपांत बदल होणें अपरिहार्यच नव्हे, तर आवश्यकहि आहे. या दृष्टिनें विद्यापीठ हें ज्या भागांत बसलें असेल त्या भागांतील परिस्थितीपासून तें तुटक वा अलग राहूं शकणार नाहीं. तसें तें राहिलें तर त्याची उपयुक्तता अथवा परिणामकारकता संपुष्टांत येईल. तेव्हां विद्यापीठें हीं त्यांच्या भोवतालच्या प्रदेशाशीं व परिस्थितींशी पूर्णपणें तादात्म्य पावलीं पाहिजेत.

विद्यापीठीय शिक्षणकार्याचें हें जें विशेष अंग आहे त्याचा तुम्हीं काळजीपूर्वक विचार करावा अशी माझी तुम्हांस विनंती आहे. ज्या प्रदेशांत व ज्या काळांत आपण राहत आहोंत त्याच्या संदर्भांत वस्तुस्थितीचा व घटनांचा अभ्यास करणें हें तुमचें आद्य कर्तव्य ठरतें. प्रत्येक देशाला किंबहुना देशांतील प्रत्येक भागाला त्याचे असे कांहीं विशिष्ट प्रश्न व गरजा असतात. नव्या रक्ताच्या तुम्हां तरुणांनीं या प्रश्नांचा सखोल अभ्यास करून ते सोडविण्याचा सातत्यानें प्रयत्न केला पाहिजे व अशा प्रकारें तुम्हीं तुमच्या प्रदेशांतील लोककल्याणाच्या कार्याचा एक अविभाज्य व जिवंत घटक बनलें पहिजे. पूर्वीच्या काळीं लोक विद्वान व व्यासंगी पुरुषांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करीत असत. आज विद्यापीठांतून शिक्षण घेतलेल्या तरुण स्त्री-पुरुषांकडून अशा मार्गदर्शनाची अपेक्षा आहे. कारण एका अर्थानें आजचीं विद्यापीठें हीं प्राचीन काळांतील संत, सत्पुरुष व द्रष्टे यांचें ज्ञानप्रसाराचें कार्य पुढें चालवीत आहेत. अर्थात् ज्ञानदानाची पूर्वीची पद्धत व आजची पद्धत यांत पुष्कळच फरक झालेला आहे. त्याचप्रमाणें सुखसमृद्धीच्या कल्पनाहि आज बदललेल्या आहेत. थोडक्यांत म्हणजे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्वीपेक्षा आज आमूलाग्र बदलला आहे. तथापि, अखिल मनुष्यमात्राचें जास्तींत जास्त कल्याण साधण्याचें मानवाचें अंतिम ध्येय हें बदललें नाहीं अथवा बदलणारहि नाहीं.

मराठवाडा विद्यापीठ हें नव्यानें स्थापन झालें असलें तरी त्याची आज झपाट्यानें प्रगति होत आहे. या विद्यापीठांत शिक्षण घेण्याची संधी ज्या विद्यार्थ्यांना लाभली आहे त्यांना माझी अशी विनंती आहे की, त्यांनीं आपल्या भोवतीं घडत असलेल्या घटनांचा बारकाईनें अभ्यास करावा. एवढेच नव्हे तर त्या घटनांना योग्य प्रकारें वळण लागेल अशा प्रकारें त्यांनीं प्रयत्न करावेत. या प्रदेशाचे भावी नागरिक या नात्यानें त्याच्या उन्नत्तीसाठीं व उत्कर्षासाठीं प्रयत्न करणें हें त्यांचें कर्तव्यच ठरतें. आपण ज्या समाजांत वावरतो त्याचे गुणदोष काय आहेत याचा शोध घेऊन गुणांचा विकास व दोषांचें निराकरण करणें, आपल्या प्रदेशाचे जे निकडीचे प्रश्न असतील त्यांचा अभ्यास करणें आणि जनहिताच्या दृष्टीनें हे प्रश्न सोडविण्यास साहाय्य करणें हीच सुशिक्षित तरुणांकडून आज अपेक्षा आहे. तुमच्या वाडवडिलांना ज्या संधि मिळूं शकल्या नाहींत त्या तुमच्याकडे चालून येत असतांना तुम्हीं दवडल्यात आणि ऐन मोक्याच्या वेळीं आपलें कर्तव्य बजावण्यास तुम्ही चुकलांत असें तुम्हां तरुणांच्या बाबतींत भावी पिढ्यांना म्हणण्याचा प्रसंग येऊं नये. अगदी अलीकडच्या काळांत अत्यंत बिकट व दुर्धर अशा आपत्तींतून सहीसलामत बाहेर पडलेले मराठवाड्याचे तरुण आपल्याला असें दूषण लावून घेणार नाहींत असा माझा विश्वास आहे. तुमच्या या विद्यापीठानें सत्कार्याची दिशा तुम्हांला दाखवून दिली व तें पार पाडण्याची पात्रता व सामर्थ्य तुमच्या ठिकाणीं निर्माण केलें. आतां त्याचा उपयोग करून घेण्याचें काम तुमचें आहे. यापुढें ज्या निरनिराळ्या संधि तुम्हांला लाभतील त्यांचा कुशलतेनें उपयोग करून घेऊन तुम्हीं आपलें व त्याबरोबर आपल्या देशाचें हित साधलें पाहिजे.

मला आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. विद्यापीठांतील विद्यार्थ्यांनी स्थानिक भागाच्या अडचणी व प्रश्न यांची दखल घेऊन ते सोडविण्याच्या कामीं साहाय्य केलें पाहिजे, याचा अर्थ संकुचित प्रादेशिक भावनांना उत्तेजन मिळावें असा मात्र नाहीं. कोणत्याहि प्रदेशाचे हितसंबंध हे सबंध देशाच्या हितसंबंधाचा एक अविभाज्य भाग असतात आणि म्हणून नेहमीं सर्व देशाच्या दृष्टींतूनच विचार केला पाहिजे. मराठवाड्याचा प्रदेश हा महाराष्ट्र राज्याचा एक घटक आहे आणि महाराष्ट्र राज्य हा भारताचा एक घटक आहे, याचें विस्मरण तुम्हीं कधींहि होऊं देतां कामा नये. भारताच्या या एकतेंतच आपलें सामर्थ्य सामावलेलें आहे. ही एकता भंग पावली तर आपली अधोगति झाल्याशिवाय राहणार नाहीं. हें सत्य सदैव नजरेसमोर ठेवून तें आचरणांत आणण्याचा आपण आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. त्यांतच आपणां सर्वांचें व आपल्या देशाचें हित आहे.

महाराष्ट्रात राज्य स्थापनेनंतर आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक या सर्व क्षेत्रांत आज नवें चैतन्य निर्माण झालें असून या नव्या राज्याच्या साधनसामुग्रीचा विकास करण्याचा आज गंभीरपणें विचार होत आहे व त्या दृष्टीनें लोक कार्यप्रवृत्त झाले आहेत.. मराठी भाषेचा विकास हा महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा एक स्वाभाविक परिपाक होय. शिक्षणाचें माध्यम व राज्यभाषेचा दर्जा तिला आतां प्राप्त होत आहे. कै. माधव ज्युलियनांनीं आपल्या एका कवनांत आशा व्यक्त केल्याप्रमाणें आपल्या या मायबोलीला आज दिव्य सुखाचे दिवस लाभत आहेत. मराठीचें माहेरघर असलेल्या मराठवाड्यांत मराठी भाषेच्या विकासास विशेष चालना मिळेल अशी मी आशा करतों.

अर्थात् मराठीच्या अभ्यासाबरोबर राष्ट्रभाषा म्हणून हिंदी, सर्व भाषांची मायभाषा व आपल्या प्राचीन संस्कृतीची भाषा म्हणून संस्कृत व आंतरराष्ट्रीय व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजी या भाषांचाहि अभ्यास करणें आपल्याला आवश्यक आहे. इतिहासानें इंग्रजी भाषेशीं आपला जो घनिष्ठ संबंध आला, त्यामुळें इंग्रजी भाषा आपल्याला परकी राहिलेली नसून तिनें आपलें फार मोठें हितच साधलें आहे. कारण ज्ञानाची अपार भांडारें इंग्रजीनें आपल्याला खुलीं केलीं आहेत व त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय व्यवहारहि सुलभ केला आहे.

भाषेचा विकास हा केवळ त्या भाषेंतील ललित साहित्याच्या संदर्भातच होतो ही समजूत चुकीची आहे. निरनिराळ्या वैज्ञानिक शास्त्रांचा अविष्कार जेव्हां भाषा करूं लागेल तेव्हांच तिचा खरा विकास झाला असे म्हणतां येईल. तेव्हां साहित्यिकांबरोबर शास्त्रज्ञ, इतिहासकार, तत्त्ववेत्ते हे सर्वजण मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासास चालना देतील असा मला विश्वास वाटतो. या दृष्टीनें तुमच्या विद्यापीठाच्या ज्या पदवीधरांनीं निरनिराळ्या कलांत व शास्त्रांत पारंगतता मिळविली

असेल त्या सर्वांनी मराठीच्या विकासास हातभार लावावा, अशी मी त्यांना या निमित्तानें विनंती करतों.

आपला शिक्षणक्रम पुरा करून तुम्ही आज जीवनाच्या क्षेत्रांत पदार्पण करीत आहांत. जीवनांतील कठोर वास्तवतेनें तुम्ही विचलित होऊं नका. आपलें काम परिश्रमपूर्वक व प्रामाणिकपणें करीत राहिल्यास जीवनाच्या आनंदाचा लाभ तुम्ही मिळवूं शकाल. विद्‌यापीठाचा उंबरठा ओलांडून आपल्या जीवनाची यात्रा आज तुम्ही सुरू करीत असतांना माझ्या आशीवार्दाची छोटीशी शिदोरी तुमच्या पदरी बांधण्याची परवानगी मला द्‌या. तुमच्या जीवनांत तुम्हांला सुख, समाधान व सुयश लाभो, अशी मी परमेश्वराजवळ प्रार्थना करतों.

## लोकशाही शक्तीचा प्रभावी अविष्कार

ह्या दीक्षान्त समारंभप्रसंगीं अभिभाषण करण्यास पाचारण करून माझा हा सन्मान केल्याबद्दल, मी तुमच्या विद्‌यापीठाचे उपकुलगुरू आणि कार्यकारी मंडळाचे सभासद यांचे मनःपूर्वक आभार मानतों. दीक्षान्त समारंभांत उपदेशपर भाषण करणें हें खरोखरी माझ्यासारख्याचें काम नाहीं. मंत्री या नात्यानें, उपदेश करण्यापेक्षां उपदेश ऐकण्याचीच मला अधिक संवय होती. आणि मुख्य मंत्री या नात्यानें तर उपदेश ऐकण्याचें हे काम मला किती तरी अधिक मोठ्‌या प्रमाणावर करावें लागतें. लोकशाहीच्या ह्या जमान्यांत स्वपक्षाच्या आणि त्याचबरोबर विरोधी पक्षांच्या वृत्तपत्रांतून आणि व्यासपीठावरून अनाहूत उपदेशाचा अखंड प्रवाह वाहत असतो. इतकें कशाला सल्लागार, सल्लागार समित्या व सल्लागार मंडळें यांचा जो प्रचंड गराडा मंत्र्यांच्या भोवतीं पडलेला असतो तोच फक्त तुम्हीं लक्षांत घेतला तरीहि या समारंभासाठीं आपण ही जी निवड केलेली आहे ती करण्यांत आपली चूक झाली कीं काय अशी शंका तुमच्या मनांत आल्यावाचून राहणार नाहीं. दुसरें असें कीं उपदेश कोणींहि केलेला असो, तो शंभर टक्के स्वीकारणें नेहमींच शक्य नसतें आणि पुष्कळ वेळां शहाणपणाचेंहि नसतें, हें आपल्याला अनुभवानें माहीत होतें. तेव्हां अशा या समारंभांत उपदेशपर भाषण करण्याची सर्वसाधारणपणें जी प्रथा असते ती मीं पाळली नाहीं तर तें तुम्ही समजूं शकाल अशी मी आशा करतो.

उपदेश करण्याचें मी टाळतों याला याहूनहि अधिक महत्त्वाचें आणखी एक कारण आहे. आपल्या देशांतील परिस्थिति आज झपाट्‌याने बदलत आहे आणि या बदलणा-या परिस्थितींतले कित्येक बदल तर इतक्या मूलग्राही व दूरगामी स्वरूपाचे आहेत कीं पुढील पंधरा-वीस वर्षांत कोणती परिस्थिति उद्भवेल आणि त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठीं आपल्याला केवढें बौद्धिक व नैतिक

बळ वापरावें लागेल याचें भविष्य मांडणारा माणूस खरोखरच फार धाडसी म्हटला पाहिजे. कोणींसें म्हटलें आहे कीं विसाव्या शतकांत पहिल्या महायुद्धानंतर सामाजिक परिवर्तनास जी प्रचंड गती मिळाली तशी मानवी इतिहासांतील दुस-या कोणत्याहि कालखंडांत मिळालेली नाहीं. आणि याचें भरपूर प्रत्यंतर आपल्याला आपल्या अनुभवावरून प्रत्यही येतच असतें. तेव्हां, मित्रहो, तुम्हांला कोणत्या प्रश्नांना तोंड द्यावें लागेल, कोणत्या अडचणींशीं मुकाबला करावा लागेल, कोणती परिस्थिति हाताळावी लागेल याचा कानमंत्र मी तुम्हांला देऊं शकणार नाहीं. त्यासाठीं तुमच्या या महान् विद्यापीठाकडून तुम्ही जें शिकलां त्यावरच तुम्हांला सतत विसंबून राहावें लागेल. आणि ज्या उज्ज्वल ध्येयवादाचा पाठपुरावा करून अलिगड विद्यापीठानें पूर्वी देशांतील बौद्धिक चळवळीच्या क्षेत्रांत श्रेष्ठ असें स्थान मिळविलें तो ध्येयवाद जर तुम्हीं संपूर्णपणें आणि योग्य रीतीनें आत्मसात् केला असेल तर तुम्हांला चिंता करण्याचें कांहींच कारण नाहीं.

मी असें म्हणतों याला कारण आहे. माझ्या मतें तुमच्या विद्यापीठाच्या या ध्येयवादामागची प्रेरणा मूलतः समाजसुधारणेचीच होती आणि शिक्षणानेंच सर्व सामाजिक व आर्थिक दोषांचें निर्मूलन होईल अशा प्रकारची शिक्षणासंबंधीं ठाम निष्ठा या ध्येयवादांत होती. तेव्हां, साहजिकपणेंच या ध्येयवादानें सर्व प्रकारच्या अंधश्रद्धा व दुराग्रह यांच्याशीं मुकाबला करण्याचा प्रयत्न केला आणि बुद्धिप्रामाण्य, समंजसपणा व सहिष्णुता या आपल्या नवजात लोकशाहीच्या दृष्टीनें आज अत्यंत आवश्यक असलेल्या मूल्यांचा पाठपुरावा केला. या विद्यापीठाचे थोर व वंदनीय संस्थापक सर सय्यद अहमद खान यांना त्यांच्या या वैचारिक भूमिकेमुळें स्वधर्मीयांची अप्रियता, विद्वेष व कटुता सहन करावीं लागलीं. परंतु ज्या धैर्यानें त्यांनी या परिस्थितीला तोंड दिलें व तिचा मुकाबला केला तें धैर्य, त्यांच्या ठिकाणीं असलेली अढळ निष्ठा व श्रेष्ठ दर्जाचे नैतिक सामर्थ्य यांतूनच निर्माण होऊं शकलें. मुसलमान समाजाला शेवटीं त्यांच्या शिकवणुकीचें महत्त्व पटलें, हा त्या पायाशुद्ध शिकवणुकीचा मोठाच गौरव समजला पाहिजे. आणि म्हणून त्या थोर पुरुषाच्या पवित्र स्मृतीचा आपणांस मान राखावयाचा असेल तर त्याची ही शिकवण आपण कधींहि नजरेआड होऊं देतां कामा नये.

इंग्लंडमधील आपल्या वास्तव्यांत तेथील शिक्षणपद्धतीचें अवलोकन करून सर अहमद यांनीं भारतीयासंबंधीं असे उद्गार काढले होते कीं, "जोपर्यंत भारतांत शिक्षणाचें लोण इथल्याप्रमाणें सबंध जनतेपर्यंत पोहोंचत नाहीं तोपर्यंत कोणत्याहि भारतीयास सुसंस्कृत व मानाचें जीवन जगणें अशक्यच आहे." त्यांचें हें उदात्त स्वप्न सत्यसृष्टींत आणण्याचे आज जे सर्वत्र प्रयत्न चालू आहेत ते पाहण्याचें फार मोठें सद्भाग्य आपणांस लाभलें आहे.

शिक्षणाचा सर्व पातळीवर झपाट्यानें होत असलेला प्रसार ही स्वातंत्र्योत्तर काळांतील शिक्षणक्षेत्रामधली एक अर्थपूर्ण घटना आहे. पूर्वी कधींहि झाला नाहीं इतक्या वेगानें गेल्या दहा वर्षांत शिक्षणाचा प्रसार झाला आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या पातळीवर शिक्षणपद्धतींची पुनर्रचना करण्याचे प्रयत्नहि चालू आहेत. आपल्याकडे प्राथमिक शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें झाला असून तुमच्या या विद्यापीठाचे अलिकडील काळांतील एक थोर उपकुलगुरु डॉ. झाकीर हुसेन यांच्या नांवाशीं निगडीत असलेली मूलोद्योग शिक्षणाची योजनाहि आपण अंमलांत आणली आहे. जीवनांतील प्रत्यक्ष परिस्थितीशीं व विशेषतः ग्रामीण जीवनांतील परिस्थितींशी शिक्षणाचा अगदीं निकटचा संबंध आणणें हा मूलोद्योग शिक्षणाच्या या प्रयोगामागील हेतु आहे असें मला वाटतें. प्राथमिक शिक्षणाप्रमाणेंच माध्यमिक शिक्षणाचाहि आपल्याकडे पुष्कळच प्रसार झाला आहे. विद्यापीठीय शिक्षण घेणें ज्यांना परवडत नाहीं अशा बहुसंख्य विद्यार्थ्यांसाठीं माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमांत विविधता आणून एक उपयुक्त असा पूर्ण स्वरूपाचा शिक्षणक्रम तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत. अलिकडे महाविद्यालयें आणि विद्यापीठें यांत दाखल होणा-यांची संख्याहि प्रचंड प्रमाणांत वाढली आहे. विद्यार्थ्यांच्या संख्येंत अशी ही वाढ कां होत आहे या प्रश्नाच्या कारणमीमांसेंत जाण्याची कांहीं आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं. त्यापेक्षां विविध पातळीवर शिक्षणाचा आज जो प्रसार होत आहे त्याची निरनिराळ्या क्षेत्रांत कोणती प्रतिक्रिया होते या प्रश्नाकडे मी वळतों व त्यासंबंधीचे माझे विचार मी आपल्यापुढें थोडक्यांत मांडतों.

वयाच्या चौदा वर्षांपर्यंत सर्वांना मोफत पण सक्तीचें प्राथमिक शिक्षण दिलें जावें असें शासनाच्या धोरणाचें एक मार्गदर्शक तत्त्व आपल्या घटनेंत आहे. आणि म्हणून प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हें त्या दिशेनें टाकलेलें पाऊल होय असेंच सर्वत्र म्हटलें जातें. शिक्षणप्रसार ही प्रौढ मतदानपद्धति लोकशाही राज्यकारभाराचा पाया आहे. म्हणून, आपल्या नवजात लोकशाहीची मुळें खोलवर रुजविण्याच्या दृष्टीनें प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारास साहजिकच राजकीय महत्त्व आहे. त्याचप्रमाणें आपल्या प्रचंड मनुष्यबळाची कार्यक्षमता वाढविण्यासहि त्याची पुष्कळच मदत होऊं शकेल. तसें झाल्यास आर्थिक क्षेत्रांतहि त्याचे इष्ट असे परिणाम घडून येतील. शिवाय शिक्षणाच्या या प्रसारांत संस्कृतीच्या प्रसाराचीं बीजें सांठलेलीं असून त्यामुळें मानवी मूल्यें व ध्येयें आम जनतेच्या आवाक्यांत आणणें शक्य होणार आहे. मूलोद्योग शिक्षणाबाबतचे मतभेद बाजूला ठेवले, तरी घटनेच्या या मार्गदर्शक तत्त्वाची शक्य तितकी त्वरित अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीनें, निरनिराळ्या शासनांनीं प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठीं जीं पावलें टाकलीं आहेत त्यांना आज सर्वांचाच पाठिंबा आहे याबद्दल वाद नाहीं. परंतु सरकारी तिजोरीची परिस्थिति लक्षांत घेतां, प्राथमिक शिक्षणावर हा जो भार दिला जातो त्यामुळें इतर पातळीवरील शिक्षणाची

कांहींशी हेळसांड होत आहे अशी तक्रार कधीं कधीं ऐकूं येते ही गोष्ट खरी आहे. तथापि एकंदरीनें पाहतां अशी तक्रार करणा-यांनींहि या धोरणाच्या इष्टतेबद्दल आक्षेप घेतलेला नाहीं.

माध्यमिक शिक्षणाचा प्रसार व त्याच्या स्वरूपांत विविधता आणण्याच्या दृष्टीनें केलेली उपाययोजना यांच्या बाबतींतहि अशाच प्रकारची अनुकूल प्रतिक्रिया आढळते. परंतु महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाचा प्रश्न आला कीं मतभेदांना सुरुवात होते. गेल्या दहा वर्षांत विद्यापीठांतील विद्यार्थ्यांच्या संख्येत जी विलक्षण वाढ झाली तिच्या इष्टतेबद्दल अनेकांनी शंका व्यक्त केली आहे. या वाढीचा परिणाम शिक्षणसंस्थांतून बेसुमार गर्दी होण्यांत झाला असून त्यामुळें अनेक शैक्षणिक दोष उत्पन्न झाले आहेत असें सांगण्यांत येतें. आमच्या महाविद्यालयांत व विद्यापीठांत दाखल होणा-या विद्यार्थ्यांपैकीं अनेकांत उच्च शिक्षण घेण्याची कुवतच नसल्यामुळें त्यांना आपला शिक्षणक्रम अर्धवटच सोडावा लागतो. त्यामुळें आपली पुष्कळशी सामाजिक शक्ति आज वाया जात असते. विद्यार्थ्यांच्या या वाढत्या संख्येमुळें इमारती, प्रयोगशाळा, वाचनालयें यांच्यावरहि फार ताण पडत असल्यामुळें कोणाचीच पुरेशी सोय होऊं शकत नाहीं. विद्यार्थ्यांना त्यांच्या संख्येच्या मानानें सांघिक जीवनाच्या ज्या संधि मिळावयास पाहिजेत त्या पण दिवसेंदिवस कमी होत आहेत, आणि शिक्षक-विद्यार्थी संबंधहि दुरावत चालले आहेत. शिक्षणाचा दर्जा अशा रीतीनें खालावत आहे, आणि पदव्या मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना निरनिराळया सोयी उपलब्ध करून देऊन विद्यार्थ्यांमध्यें केवळ पदव्यांचा हव्यास निर्माण करण्याकडे महाविद्यालयांचा व विद्यापीठांचा कल वाढत असल्याचें दिसत आहे. महाविद्यालयांत पाळीपाळीनें वर्ग चालविणें, संध्याकाळचीं व रात्रीचीं महाविद्यालयें सुरू करणें, बहिःशाल पदव्या देणें, पत्रव्यवहाराच्या द्वारा अभ्यासक्रमाच्या योजना सुरू करणें, या सर्वांमधून हीच प्रवृत्ति व्यक्त होते. या सर्व गोष्टींमुळे विद्यापीठांकडून अपेक्षित असलेलें ज्ञानदानाचें खरें कार्य होत नसून तीं केवळ पदव्यांचा पुरवठा करणा-या पेढ्या बनत आहेत, असें आज कित्येकांना वाटूं लागलें आहे. संख्या आणि विस्तार यांच्या वेदीवर गुणांचा बळी दिला जात आहे.

केवळ पदव्यांच्याच मागें धाव घेण्याच्या विद्यार्थ्यांमधील या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठीं काय उपाययोजना करावी यासंबंधी अनेक वेळां चर्चा होते. आणि कांहीं वेळां विद्यापीठांतील प्रवेश मर्यादित करण्याच्या दृष्टीनें किंवा केवळ पदवी मिळविण्याच्या उद्देशानेंच विद्यापीठांत येणा-या विद्यार्थ्यांना त्यांच्या निश्चयापासून परावृत्त करण्याच्या दृष्टीनें कांही उपायहि योजले जातात. विद्यापीठांतील प्रवेशावर या ना त्या स्वरूपांत निर्बंध घालणें हा वरील उपायांपैकी पहिल्या प्रकारचा उपाय असून विद्यापीठांच्या पदव्या व कनिष्ठ नोक-या यांचा संबंध तोडणें हा दुस-या प्रकारचा उपाय आहे. विद्यार्थ्यांचा विद्यापीठांकडे वाहणारा प्रचंड ओघ थांबविण्यास हे उपाय कितपत यशस्वी होतील याबद्दल शंकाच आहे. तसेंच याच उद्देशानें माध्यमिक शिक्षणांत आणलेली

विविधता प्रत्यक्षांत कितपत उपयोगी पडेल हें सांगणे कठीण आहे. या प्रयत्नांना यश येण्याची एकंदरीनें शक्यता कमीच दिसते. माध्यमिक शिक्षणाचा झपाट्यानें होत असलेला प्रसार हें त्याचें एक महत्त्वाचें कारण असून त्यामुळें विद्यापीठांतील विद्यार्थ्यांची गर्दी कांही काल तरी अशीच वाढत जाणार आहे. म्हणून विद्यापीठांतील शिक्षणानें ज्यांचा फायदा होऊं शकेल परंतु केवळ गरिबीमुळेंच जे उच्च शिक्षणाचा लाभ घेऊं शकत नाहींत अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठांतून प्रवेश मिळविण्यासाठीं आवश्यक त्या सुधारणा होणें इष्ट आहे. निरनिराळ्या शिष्यवृत्त्या ठेवून मर्यादित प्रमाणांत आज ही गरज भागविली जात आहे. परंतु आवश्यक ती पात्रता किंवा कुवत नसतांनाहि जे महाविद्यालयांत किंवा विद्यापीठांत प्रवेश मिळवूं इच्छितात त्यांना तेथें सहज प्रवेश मिळत असल्यामुळें तेथील विद्यार्थ्यांच्या संख्येंत जी बेसुमार वाढ झाली आहे त्याचाच आज आपणांस विचार करावयास पाहिजे.

विद्यापीठांतून सध्या जी बेसुमार गर्दी झाली आहे. त्यासंबंधींचा प्रचलित दृष्टिकोन मी आपणांसमोर थोडक्यांत मांडला आहे. विद्यापीठांत अशी गर्दी होणें इष्ट आहे असें अर्थातच या मताच्या पुरस्कर्त्यांना वाटत नाहीं. उलट ती एक प्रकारची अनिष्ट गोष्ट असून त्यामुळें शिक्षणाचा दर्जा खालावतो असें त्यांचें म्हणणें आहे. आणि म्हणून ही गर्दी कमी करण्याचें शक्य ते प्रयत्नहि होत आहेत. तथापि हा जो दृष्टिकोन आहे तो कितपत बरोबर आहे यासंबंधी माझ्या ज्या कांहीं शंका आहेत त्या मी आतां आपल्यापुढें मांडतों.

सुरुवातीलाच मला हें सांगितलें पाहिजे कीं विद्यापीठीय शिक्षणाचा लाभ सर्वांनाच मिळतो अशी परिस्थिति जगांतील कोणत्याहि देशांत नाहीं. आपल्या तरुण पिढीला शिक्षण देणें ज्यांना सहज परवडण्यासारखें आहे अशा सधन देशांत सुद्धां, विद्यापीठांतून शिक्षण घेणा-या मुलांमुलींची संख्या, त्या वयाच्या मुलांमुलींच्या एकूण संख्येच्या मानानें अगदी अल्प असते. तेव्हां, विद्यापीठांत प्रवेश मिळवूं इच्छिणा-या सर्वच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा असें सुचविण्याचा माझा मुळींच उद्देश नाहीं. परंतु त्याचबरोबर हेंहि विसरतां कामा नये कीं, आपल्याकडे विद्यापीठांतून शिक्षण घेणा-या तरुण मुलांमुलींचें प्रमाण आज इतकें अल्प आहे कीं, उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या संख्येवर निर्बंध घालणें किंवा विद्यापीठांतून होणारी गर्दी ही एक अनिष्ट गोष्ट आहे असें मानणें योग्यहि नाहीं व न्याय्यहि नाहीं. विद्यापीठांतून शिक्षण घेऊन पदवीधर होणा-या तुम्हां विद्यार्थ्यांची संख्या, तुमच्या वयाच्या तरुणांच्या एकंदर संख्येच्या अवघी एक टक्का आहे, ही वस्तुस्थिति आपणांला विसरून चालणार नाहीं. आपल्या सध्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळें या बाबतींतल्या आपल्या कार्याला ब-याच मर्यादा पडतात ही गोष्ट खरी आहे. तरीसुद्धां शिकण्याच्या तळमळीनें उच्च शिक्षण घेऊं इच्छिणा-या विद्यार्थ्यांची संख्या आज जी सारखी वाढत आहे ती लक्षांत घेतां

त्यासाठीं पुरेसा पैसा उपलब्ध करून देणें शक्य व्हावयास पाहिजे. विद्यापीठांतून किंवा महाविद्यालयांतून दिसणारी विद्यार्थ्यांची ही प्रचंड गर्दी म्हणजे समाजाचा जो एक मोठा भाग शतकानुशतकें पददलित राहिला व ज्याला ज्ञानापासून वंचित ठेवण्यांत आलें त्यानें आपल्या अस्मितेसाठीं चालविलेलेल्या धडपडीचें कांहीं प्रमाणांत तरी ती द्योतक आहे. समाजांत उच्च स्थान प्राप्त करून घेण्याचे एक साधन म्हणूनहि शिक्षणाकडे त्यांतील कांहीं लोक पाहत असतील. परंतु जातिभेदानें पछाडलेल्या आणि श्रेष्ठकनिष्ठतेच्या कल्पनांवर आधारलेल्या समाजांत ही वृत्ति स्वाभाविक व निकोप वृत्ति म्हणूनच समजली गेली पाहिजे. ज्यांच्या अनेक पिढ्यांना शिक्षणाचीं द्वारें बंद होतीं अशा तरुण मुलांमुलींना आपली परिस्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें उच्च शिक्षण घ्यावेंसें वाटलें तर त्यांत आक्षेपार्ह असें कांहींच नाहीं. एवढेंच नव्हे तर दूरदृष्टीनें पाहिल्यास ज्ञानाच्या या प्रसारामुळें शिक्षणाच्या दर्जांत सर्व बाजूंनीं सुधारणा होणें अगदीं शक्य होणार आहे. कारण जेवढे अधिक विद्यार्थी विद्यापीठांत जातील, तेवढा लायक विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठीं अधिक वाव मिळणार आहे. म्हणून शिक्षणाचा दर्जा सांभाळण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे त्यांनीं त्याच कार्यावर आपलें लक्ष केंद्रित केल्यास कालांतरानें शिक्षणाचा दर्जा सुधारणें फारसें अवघड जाईल असें मला वाटत नाहीं.

आज उच्च शिक्षणाचा जो प्रसार होत आहे त्यामागें, माझ्या मतें, देशांतील लोकशाहीच्या प्रसाराची प्रभावी शक्ति आहे. उच्च शिक्षणाचा लाभ जोंपर्यंत फक्त मूठभर लोकांनाच मिळत होता तोंपर्यंत समाजजीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत पुढे येणा-यांची संख्या अगदीं अल्प असे. अशा परिस्थितींत या मूठभर लोकांची बौद्धिक वाढ खुंटल्यास सर्व समाजाचीच अधोगति होण्याचा धोका निर्माण होतो. म्हणून निरक्षरता व अज्ञान यांत रुतून बसलेल्या लोकांच्या बुद्धीचा विकास घडवून आणून आणि त्यांच्या अंगच्या सुप्त गुणांचा पुरेपूर विकास होण्यासाठीं त्यांना अधिकाधिक संधि उपलब्ध करून देऊन गुणवत्तेवर आधारलेलें नेतृत्व आपण निर्माण करूं शकूं. तसें झाल्यास सामाजिक दर्जा, जात, कूळ यांसारख्या गोष्टी हळूहळू मागें पडत जातील, आणि परिणामीं आपलें सामाजिक जीवन अधिक निकोप व निर्मळ होईल यांत वाद नाहीं.

विद्यापीठांतील गर्दीमुळें अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत हें नाकारण्याचा माझा मुळींच उद्देश नाहीं. आपल्या शिक्षणाचा दर्जा जो खालावला आहे त्याला सुद्धां कांही अंशीं तरी ही गर्दीच कारणीभूत असूं शकेल. परंतु मीं आतांच वर्णन केलेल्या पार्श्वभूमीवरून हे प्रश्न नीट लक्षांत घेतल्यास त्यांचें स्वरूप तुम्हांला अगदीं वेगळें दिसेल व हे तात्पुरत्या स्वरूपाचे प्रश्न आहेत ही गोष्ट समजून येईल. सबंध शिक्षणपद्धतीच धोक्यांत येऊं नये म्हणून या गर्दीच्या प्रश्नाबाबत योग्य ते उपाय शोधून काढले पाहिजेत हें जरी मान्य केलें तरी खुद्द विद्यापीठांनीं किंवा अन्य

प्रकारें विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर बंधन घालणें हा त्यावरील उपाय नाहीं. उलट विद्यापीठे व महाविद्यालयें यांच्या कार्यपद्धतींत सुधारणा घडवून आणणें, चांगले शिक्षक तयार करणें व त्यांचा दृष्टिकोन सुधारणें हाच त्यावरील खरा उपाय असून त्यामुळें आपल्या तरुण पिढींत विधायक व सर्जनशील प्रवृत्ति अधिकाधिक प्रमाणावर वाढीस लागतील. आतां ही गोष्ट खरी आहे कीं हे प्रश्न सोडविण्यासाठीं आर्थिक मदत देण्याची जबाबदारी, अंशतः कां होईना, शासनांना उचलावी लागते. परंतु या बाबतींतील परिस्थिति कोणत्याहि दृष्टीनें निराशाजनक नाहीं. आपल्या आर्थिक विकासाची वाढती गति लक्षांत घेतां अधिक चांगल्या सुखसोयी पुरविण्याची आपली ताकद दिवसेंदिवस वाढणार आहे. आज विद्यापीठांतील गर्दीवर होणारी टीका ही ब-याच अंशीं, उपलब्ध साधनसामुग्री आणि शिक्षणाच्या वरच्या पातळीवरील त्यासंबंधींची गरज यांचा बरोबर मेळ घातला न गेल्यामुळेंच होत आहे. म्हणून केवळ तात्पुरत्या स्वरूपाचे हे दोष नाहींसे करण्यासाठीं विद्यापीठांतील प्रवेशावर निर्बंध लादण्याचे दीर्घकालीन धोरण अवलंबिणें योग्य होईल असें मला वाटत नाहीं.

विद्यापीठांतून वाढत्या प्रमाणावर होणा-या गर्दीचा हा जो प्रश्न आहे त्याची छाननी करणें कदाचित् उद्बोधक ठरेल. वैद्यकीय, तांत्रिक अथवा स्थापत्य विषयक शिक्षण देणा-या संस्थांत गर्दीचा प्रश्न फारसा गंभीर होण्याची शक्यता नाही. कारण या शिक्षणासाठीं लागणारी जागा व साधनें कांहीं विशिष्ट दर्जाचीं असावींच लागतात. शिवाय या शिक्षणाचें स्वरूपच असें आहे कीं, त्यासाठीं विद्यार्थ्यांकरितां वसतिगृहाची बरीच मोठी सोय करावी लागते. तसेंच या शिक्षणक्रमांत विद्यार्थी व शिक्षक यांचे अगदीं निकटचे संबंध येत असतात. परंतु साहित्य, कला व समाजशास्त्रें ह्या विषयांकडे जेव्हा आपण वळतों तेव्हां मात्र आपल्याला वेगळेंच चित्र दिसतें. याच शास्त्रांच्या बाबतींत सर्वांत जास्त गर्दी झालेली आपणांस पाहावयास मिळते. विज्ञान आणि कायदा या शास्त्रांतील शिक्षणासाठींहि अशीच कांहींशी गर्दी होत असल्याचें आपणांला दिसेल. विद्यापीठांतील गर्दीसंबंधीं ज्या अनेक प्रश्नांची चर्चा आपण पुष्कळ वेळां ऐकतों ते प्रश्न बहुतांशीं वरील शंकांच्या बाबतींतच आढळून येतात. विद्यार्थ्यांच्या गर्दीला येथेंच जमावाचें स्वरूप प्राप्त होतें आणि आपला मतलब साधण्यासाठीं कांहीं बाहेरची मंडळी या परिस्थितीचा, सहज फायदा उठवूं शकतात. याच विद्यार्थ्यांमध्यें आपणांला पुष्कळ वेळां बेफिकिरीची व आक्रमक प्रवृत्ति दिसून येते, आणि या प्रवृत्तींतूनच कधीं कधीं बेशिस्त आणि गैरवर्तनाचें प्रकार घडत असतात. विद्यार्थ्यांतील बेशिस्तीवर आज तुमच्यापुढें प्रवचन देण्याचा माझा उद्देश नाहीं. विद्यार्थ्यांतील बेशिस्तींतून निर्माण होणारे प्रश्न प्रायः विद्यापीठांनीच सोडविले पाहिजेत. परंतु विद्यापीठांतील ही परिस्थिति, देशाच्या आणि उच्च शिक्षणाच्या भवितव्याबद्दल काळजी वाहणा-या सर्वांनाच एक अतिशय चिंतेचा विषय होऊन बसली आहे, एवढेंच मी येथें सांगूं इच्छितों.

तुमच्या विद्यापीठाचें स्वरूप धार्मिक असूनहि त्याचीं द्वारें भौतिक ज्ञान आणि विज्ञान यासाठीं खुलीं करण्यांत आलीं असल्यामुळें आपल्या विद्यापीठीय जीवनांत निर्माण झालेली ही अस्थिरता दूर करण्याच्या दृष्टीनें तुमचें विद्यापीठ अधिक प्रभावी रीतीनें प्रयोग करूं शकेल असें मला वाटतें. तरुण स्त्री-पुरुषांत आज जी एक प्रकारची बेबंद वृत्ति वाढत आहे तिला तुमचें विद्यापीठ आळा घालूं शकेल आणि त्याचबरोबर अहंमन्यता, वृथाभिमान व असहिष्णुता या दोषांनाहि त्याला पायबंद घालतां येईल. तुमच्या या विद्यापीठाचें स्वरूप असें आहे कीं कोणत्याहि प्रकारच्या अलगपणाच्या भावनेला येथें वाव नाहीं व पुढेंहि तो राहतां कामा नये. ज्या थोर परंपरेचे तुम्ही प्रतिनिधि आहांत त्या परंपरेंतील लोकशाही प्रवृत्तींची जोपासना आणि विकास केल्यानें आपल्या देशांतील लोकशाहीपुढील प्रश्न सोडविण्यासाठींहि या प्रवृत्तींचा तुम्हांला उपयोग करून घेतां येईल आणि त्यायोगें ही परंपरा तुम्ही अधिक संपन्न करूं शकाल. सध्यांच्या जगांत विज्ञान आणि तंत्रशास्त्र यांना साहजिकच फार महत्त्व आहे.

तथापि सनातन अशा ज्ञानाचा व विद्येचा लाभ तुमचें हें विद्यापीठ नेहमींच देऊं शकेल. महत्त्वाची गोष्ट ही कीं तुमच्या विद्यापीठांतील विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित आहे; आणि ती तुमच्या फायद्याचीच आहे. कारण त्यायोगें लोकाशाहींतील नागरिकास आवश्यक असणारे गुण विद्यार्थ्यांच्या अंगीं बाणावेत, आणि स्वातंत्र्य व समता यांवर आधारलेला जो समाज निर्माण करण्याचा आज आपण प्रयत्न करीत आहोंत त्याचे ते जबाबदार घटक बनावेत म्हणून शैक्षणिक क्षेत्रांत तुम्हांला प्रयोग करणें केव्हांहि अधिक सुलभ जाईल.

तुमच्या या थोर विद्यापीठानें आपल्या स्थापनेपासूनच राष्ट्रीय जीवनांत मोठी कामगिरी बजावली आहे. अलिगड कोणाला आवडो अगर न आवडो, परंतु विद्यादानाच्या या महान् स्थानाकडे कोणालाहि दुर्लक्ष करतां येणार नाहीं. म्हणून या व्यासपाठीवरून भाषण करण्याची तुम्हीं मोठ्या उदारपणें मला ही संधि दिलीत तिचा फायदा घेऊन या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना मी असें आवाहन करूं इच्छितों कीं, ज्यायोगें हें विद्यापीठ भारताच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीच्या कार्यांत अग्रेसर राहील अशा प्रकारची नवी कामगिरी त्यांनीं आपल्या या महान् संस्थेकरवीं पार पाडावी. तुम्हांला कदाचित माहीत असेल की तुमच्या विद्यापीठाची स्थापना झाली त्या वेळीं राजकारणी व्यक्तीमध्येंच नव्हे तर शिक्षणतज्ज्ञांमध्येंहि सरकारी नोक-यांची जातीच्या प्रमाणांत वांटणी व्हावी हें मत प्रभावी होतें. प्रमाणानुसार वांटणी या तत्त्वाचा कांहीं उपयोग नाहीं असें मी म्हणत नाहीं. कदाचित् त्या काळीं त्याचा उपयोग झालाहि असेल. परंतु व्यक्तिशः मला विशिष्ट जातींच्या किंवा गटांच्या प्रगतीसाठीं आणि विकासासाठीं अशा प्रकारचा आधार घेतला जावा

याबद्दल कधींच बरें वाटलें नाहीं. या विद्यापीठाचे विशेषतः जे मुसलमान विद्यार्थी आहेत त्यांनीं याच भावनेनें त्यांच्यापुढील महान् कार्याला प्रारंभ करावा अशी मी त्यांना विनंती करतों. आजच्या या अणुयुगांत अशा प्रकारच्या 'प्रमाणानुसार वांटणी' या तत्त्वाला कांहीं अर्थच राहिलेला नाहीं. खरें म्हणजे, बहुसंख्य लोकांच्या दृष्टीने त्याला कधींच कांहीं अर्थ नव्हता. केवळ नोक-या आणि जागा देऊन आम जनतेचेच काय पण एखाद्या गटाचे सुद्धां प्रश्न सुटण्यास थोडीसुद्धां मदत होणार नाहीं. या देशांत, इतर समाजांप्रमाणें मुसलमान समाजांतहि ९० टक्के लोक शेतकरी व कामगार आहेत. भारताच्या प्रगतीचा विचार ह्या दृष्टिकोनांतून झाला पाहिजे. ह्या प्रगतीच्या संदर्भात जातीय विचारांना मुळींच वाव राहूं शकणार नाहीं. आतांपर्यंत मुसलमान शेतकरी आणि हिंदू शेतकरी, मुसलमान कामगार आणि हिंदू कामगार अशा प्रकारची मागणी अद्यापि कोणीं केली नाहीं, ही सुदैवाचीच गोष्ट म्हटली पाहिजे. वातावरणाची अनुकूलता ही अर्थात् महत्त्वाची असते ही गोष्ट खरी आहे. आणि हें वातावरण निर्माण व्हावें म्हणून आपल्या आवडत्या पंतप्रधानांच्या प्रभावी नेतृत्वाखाली सर्व नागरिकांना समान संधि देणा-या समाजव्यवस्थेचा भक्कम पाया घातला गेला आहे, या माझ्या म्हणण्याशीं तुम्ही सहमत व्हाल याची मला खात्री आहे.

मॉन्ट्रीयल येथील मॅग्गील येथील विद्यापीठांतील इस्लामी संस्कृतीच्या अध्ययन शाखेचे प्रमुख प्रा. विलफ्रेड कॅन्टवेल स्मिथ यांनीं मुसलमानांच्या संबंधीं खालीलप्रमाणें उद्गार काढले आहेत : "भारतांतील मुसलमानांचें भवितव्य हे जगांतील इतर मुसलमानांच्या किंबहुना सर्वच जनसमूहांच्या भवितव्याप्रमाणें, त्यांच्या आत्मिक बलावर, श्रद्धेवर व सर्जनशीलतेवर आणि अन्य बांधवांबरोबरच्या त्यांच्या संबंधांवर अवलंबून आहे." परिस्थितीशीं त्यांनी जुळवून घेतलें तर कोणतीहि गोष्ट त्यांना असाध्य नाहीं. वास्तविक पाहतां त्यांची भूमिका पुढाकाराची राहणार असून ही भूमिका ते योग्य प्रकारें पार पाडूं शकले तर ते आपल्या देशाची यथोचित सेवा करतील, एवढेंच नव्हे तर झपाट्याने बदलत असलेल्या सध्यांच्या जगांत इस्लामच्या धर्माचीहि त्यांच्याकडून सेवा घडेल.

हें एक मोठेंच आव्हान आहे यांत शंका नाहीं. आणि या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांपुढें त्याचें महत्त्व कथन करण्यांत आपणां सर्वांचें कल्याण व्हावें व सर्वांची प्रगति व्हावी हाच माझा हेतु आहे. आपल्या विद्यापीठाचा निरोप घेऊन जीवनाच्या विशाल क्षेत्रांत आज पाऊल टाकणा-या तुम्हां पदवीधरांना माझी एवढीच विनंती आहे कीं, तुम्हीं आपल्या विचारानें, आचारानें आणि उक्तीनें आपल्या विद्यापीठाच्या उच्च परंपरांना आपण पात्र आहोंत असें दाखवून द्यावें. सुधारणा व समंजसपणा, बुद्धिनिष्ठा व सहिष्णुता आणि सर्वांत महत्त्वाचें म्हणजे मानवतेवरील श्रद्धा ह्याच या विद्यापीठाच्या परंपरा आहेत. आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळीं आपल्या मुसलमान बंधूंनी

आपल्यापासून अलग होण्याचें जरी पत्करलें तरी मुसलमानांच्या विद्येचें आसन आमच्यामध्येंच राहिलें आहे, ही इतिहासांतील खरोखर एक अविस्मरणीय घटना आहे. इस्लाममध्यें जें जें म्हणून चांगले आहे तें तें तुमच्याकडून विकसित व्हावें, आपल्या लोकशाही संस्कृतीच्या संवर्धनास त्याचें मोठ्या प्रमाणांत साहाय्य व्हावें, आणि त्याचा लाभ आपणां सर्वांना व पुढील पिढ्यांना मिळावा हीच माझी प्रार्थना.

## राष्ट्ररचनेंतील समाजसेवेचें महत्त्व

आज येथें उपस्थित असलेल्या आपल्यासारख्या श्रोत्यांसमोर भाषण करणें यांत माझा गौरव होत असून मला ही संधि प्राप्त करून दिल्याबद्दल मी प्रोग्रेसिव्ह ग्रुपचे आभार मानतों. आज मी आपणांसमोर 'समाजसेवेचे राष्ट्ररचनेच्या कार्यांतील स्थान' या विषयावर बोलणार आहें. वास्तविक हा विषय असा आहे कीं, या बाबतींत बोलण्यापेक्षां कृतीचीच जास्त आवश्यकता आहे. परंतु आपण आज ज्या महान प्रगतीच्या कार्यांत गुंतलों आहोंत त्यांत समाजसेवेला फार महत्त्वाची भूमिका पार पाडावयाची आहे, ही वस्तुस्थिति लक्षांत घेऊनच आजच्या भाषणासाठीं या विषयाची मीं मुद्दाम निवड केली.

आपल्या देशांत समाजसेवेला अमर्याद वाव आहे. ही गोष्ट अर्थात् आपणांस भूषणावह वाटावी अशी नाहीं. कारण याचा अर्थ असा आहे कीं, आपल्या समाजांतील बहुसंख्य लोकांना जीवनांतील सुखसोयी अद्याप उपलब्धच झालेल्या नाहींत किंवा जेथें त्या उपलब्ध असतील तिथें त्यांचें प्रमाण अत्यल्प आहे. ज्या समाजात आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सर्व लोक समान पातळीवर असतात आणि ज्याला आपण समाजसेवा म्हणतों तिच्या मदतीशिवाय जीवनांतील सर्व उपलब्ध सुखसोयींचा जिथें सारख्या प्रमाणांत उपभोग घेतां येतो अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेस आदर्श समाजव्यवस्था म्हणतां येईल. असे आदर्श समाज अर्थात् फारच थोडे असूं शकतील. परंतु दीर्घकाळ मागासलेल्या व अविकसित स्थितींत असलेल्या, आणि जुन्या धार्मिक रूढीचें व परंपरेचें ओझें सतत वाहणा-या आपल्या या देशांत अलीकडच्या काळापर्यंत योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचा मागमूसहि नव्हता. त्यामुळें येथें तीव्र आर्थिक व सामाजिक विषमता निर्माण होणे अगदीं अपरिहार्य आहे. ही विषमता दूर करण्याचें काम लहानसहान नसून त्यासाठीं शासनाकडून, समाजसंस्थांकडून व सामाजिक कार्यकर्त्यांकडून भरीव आणि सुसूत्र असे प्रयत्न व्हावयास पाहिजेत.

या ठिकाणी असा एक प्रश्न उपस्थित होतो कीं सामाजिक संस्था व समाजसेवक यांच्याकडून अपेक्षित असलेलें समाजसेवेचें हें कार्य, सर्व प्रकारची साधनसामुग्री आणि सत्ता हातीं असणा-या सरकारनेंच आपल्या शिरावर कां घेऊ नये ? ज्या मूलभूत तत्त्वप्रणालीनुसार समाजव्यवस्था निर्माण करण्याचें आपलें ध्येय आहे त्या तत्त्वप्रणालीशींच हा प्रश्न निगडित आहे. समाजवादी समाजव्यवस्था निर्माण करण्याचें आपलें ध्येय आपण बुद्धिपुरःसर व पूर्ण विचारांतींच स्वीकारलें आहे. कांहीं टीकाकार म्हणतात त्याप्रमाणें निर्भेळ समाजवादाचें स्वरूप सोयिस्करपणें बदलण्याचा किंवा त्याची गति मंद करण्याचा हा प्रयत्न नाहीं. सरकारनें सेवेचीं आणि सुधारणेंचीं सर्वच कामें आपल्या हातीं घेतलीं तर तें हुकूमशाहीचेंच राज्य बनेल. हुकूमशाहींत समाजांत खरे म्हणा किंवा काल्पनिक म्हणा जे अन्याय व गैरव्यवस्था असेल ती दूर करण्याचे आणि आपल्याला पाहिजे तशी रचना करण्याचे सरकारला कर्तुमकर्तुम् अधिकार असतात. अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेंत स्वतंत्रपणें समाजकल्याणाचें कार्य करणारी संस्था अस्तित्वांत राहूं शकत नाहीं. परंतु आपण यापेक्षां निराळ्या अशा लोकशाही मार्गाचा स्वीकार केला आहे. त्यामुळें आपल्या समाजांत लोकसेवेचें काम करणा-या व्यक्तींना व संस्थांना समाजसुधारणेचें व अन्यायनिवारणाचें कार्य नेहमींच पुढाकार घेऊन करतां येईल व त्यासाठीं त्यांना भरपूर वावहि मिळेल. अशा रीतीनें समता व सामाजिक न्याय यांवर आधारलेली नवीन समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या कामीं त्यांना हातभार लावतां येईल. सरकारला अर्थातच या कार्यापासून अलिप्त राहतां येणार नाहीं किंवा त्यासंबंधीं अनास्थाहि दाखवितां येणार नाहीं. समाजसेवा करणा-या संस्थांच्या पाठीशी राहून सरकार त्यांना सर्व प्रकारचें सक्रिय साहाय्य करील. खरें म्हणजे आपल्या देशामध्यें याच पद्धतीनें समाजसेवेचें कार्य व्हावें यासाठीं आमचा प्रयत्न आहे.

सुदैवानें या देशाला समाजसेवेची प्रदीर्घ परंपरा आहे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरचा व विसाव्या शतकाच्या सुरुवातीचा असा जो पन्नास वर्षांचा काळ आहे त्या काळांत सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं या देशांत एक महान् चळवळ झाली. महाराष्ट्रामध्यें ज्योतिबा फुले, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, आगरकर, गोखले यांच्यासारख्या अनेक समाजसुधारकांनीं प्रस्थापित हितसंबंधाच्या प्रखर विरोधास तोंड देऊन व प्रसंगी त्यांचें वैमनस्यहि पत्करून आपल्या ध्येयसिद्धीसाठीं सतत कार्य केलें. या समाजसुधारकांनीं केलेल्या कार्यांचे या ठिकाणीं मूल्यमापन करण्याचा माझा इरादा नाहीं. परंतु समाजाच्या भौतिक, नैतिक व वैचारिक प्रगतीवर या सुधारकांचा फार मोठा प्रभाव पडला आहे. एवढेंच मीं येथें सांगितलें तरी तें पुरेसें आहे. तथापि, समाजसुधारणा व समाजसेवा यांमध्ये फरक असून हा फरक आपणांस कदाचित् सूक्ष्म अगर तात्त्विक स्वरूपाचा वाटेल. जीवनाच्या एकंदर पद्धतीलाच एक नवीन वैचारिक आशय देऊन तिच्यांत बदल घडवून आणणें हें समाजसुधारणेचें उद्दिष्ट असतें, तर समाजसेवा ही जीवनाच्या कांहीं व्यवहार्य अंगांपुरतीच मर्यादित असून, व्यक्तिगत किंवा व्यक्तिसमूहाचे दुःख

किंवा त्यांच्या अडचणी दूर करण्याचा हेतु तिच्या मुळाशीं असतो. सामाजिक सुधारणा घडवून आणणें हें जनमताचें नेतृत्व करण्या-या नेत्यांचे कार्य असतें तर समाजसेवा करण्यासाठीं योग्य प्रकारें शिक्षण घेतलेल्या माणसांची जरुरी असते. यामध्यें व्यवसायिक समाजसेवकांचाहि समावेश करतां येईल. या दोहोंमधील विभाजक रेषा अर्थात् अतिसूक्ष्म असते हें खरें आहे. कारण महात्मा फुले हे महान समाजसुधारकहि होते व त्याचबरोबर ते निष्ठावंत समाजसेवकहि होते व तथापि, हा फरक आपण स्पष्टपणें लक्षांत घ्यावयास पाहिजे. कारण समाजसेवेची जी पद्धत आपल्याला निर्माण करावयाची आहे ती त्यामुळें आपणांस नीटपणें समजूं शकेल व तिच्यामध्यें समाजसेवकांचें स्थान कोणतें आहे हेंहि आपल्या लक्षांत येईल.

मीं आतांच सांगितल्याप्रमाणें आपले प्रश्न अनेकविध असून ते सोडविण्याच्या कामीं समाजसेवक यथाशक्ति हातभार लांवू शकतील. या प्रश्नांचे स्थूल मानानें मी दोन प्रकार करतों. पहिल्या प्रकारांत, हालअपेष्टा व सामाजिक अन्याय यांची झळ ज्यांना लागली आहे अशाना मदत देण्यासंबंधींचे प्रश्न येतात, तर दुस-या प्रकारांत विकास कार्याशीं संबंधित असलेल्या प्रश्नांचा समावेश होतो. पहिल्या प्रकारांत मुख्यतः शारीरिक दृष्ट्या अपंग असलेले, भिकारी, बालगुन्हेगार, वेश्या, स्त्रियांचा अनैतिक व्यापार करणारे व अमली पदार्थांचें सेवन करणारे व्यसनी लोक यांच्या प्रश्नांचा आणि त्याचप्रमाणें हरिजन, गिरिजन व माजी गुन्हेगार यांसारख्या समाजांतील प्रश्नांचा समावेश होतो, तर दुस-या प्रकारात बालक व युवक कल्याण, ग्रामीण पुनर्रचना, समाजविकास, कुटुंबनियोजन, वगैरे प्रश्नांचा अन्तर्भाव होतो.

समाजकल्याणाचें ध्येय स्वीकारल्यानंतर मीं आत्तांच ज्यांचा उल्लेख केला त्या समाजसेवेच्या निरनिराळ्या क्षेत्रात सरकार जोमानें कार्य करीत आहे. पूर्वी शिक्षण व सार्वजनिक आरोग्य या दोन क्षेत्रांपुरतेंच सरकारचे कल्याणकारी कार्य, बहुतांशीं मर्यादित होतें. पण आतां इतर अनेक क्षेत्रांत हें कार्य सुरू करण्यांत आलेलें आहे. १९५३ सालीं स्थापन झालेलें मध्यवर्ती समाजकल्याण मंडळ आणि त्यानंतर राज्यांमध्यें स्थापन झालेल्या त्याच्या शाखा हा कल्याणकारी ध्येयाच्या मार्गावरील एक महत्त्वाचा असा टप्पा आहे. खाजगी सामाजिक संस्थांना आर्थिक आणि इतर प्रकारचें साहाय्य देऊन आणि त्याचबरोबर विविध प्रकारच्या समाजसेवेंत गुंतलेल्या संस्थांच्या कार्यांत एकसूत्रीपणा आणून समाजकल्याण मंडळानें गुंतलेल्या संस्थांच्या कार्यात एक प्रकारचा पद्धतशीरपणा आणला आहे. याशिवाय निरनिराळीं सरकारी खाती सुद्धां, थोड्याफार प्रमाणात समाजकल्याणविषयक कार्य करीत असतात.

आज अनेक खाजगी संस्था स्वयंस्फूर्तीनें अतिशय उपयुक्त असें सामाजिक कार्य करीत आहेत.

यांपैकीं कांही संस्थांनी आघाडीवर राहून जें कार्य केलें आहे, त्याबद्दल आपल्या राज्यानें खरोखर अभिमान बाळगावा इतकें तें महत्त्वाचें आहे. स्त्रियांच्या, विशेषतः विधवा व मागासलेल्या वर्गांतील स्त्रियांच्या कल्याणाकरतां कार्य करीत असलेली हिंगणें स्त्री-शिक्षण संस्था, ग्रामीण शिक्षणक्षेत्रांत कार्य करीत असलेली रयत शिक्षण संस्था, सामाजिक प्रश्नांचे शास्त्रीय रीत्या संशोधन करण्यांत गुंतलेली टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस यांचा त्या त्या क्षेत्रांत प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. याशिवाय जनतेच्या सामाजिक परिस्थितींत सुधारणा घडवून आणण्याचें बहुमोल असें कार्य आज इतर अनेक संस्था करीत आहेत.

तथापि, निरनिराळ्या क्षेत्रांत सरकारी व बिनसरकारी संस्थांकडून होत असलेलें कार्य जमेस धरून सुद्धां, कल्याणकारी राज्यांचे आपलें उद्दिष्ट गाठण्यासाठीं आपणांस अद्यापि बरीच मजल मारावयाची आहे. या दोन्ही प्रकारच्या संस्थांमध्यें योग्य प्रकारचें सहकार्य व सुसूत्रता आणण्याची आज अतिशय गरज आहे. कार्य निपुणतेच्या दृष्टीनें समाजसेवेच्या कार्याचे आपण निरनिराळे भाग करतों. तथापि सामाजिक प्रश्नांना असें स्वतंत्र अस्तित्व असूं शकत नाहीं. एकाच सामाजिक परिस्थितीमधून ते निर्माण झालेले असल्यामुळें ते एकमेकांवर अवलंबून असतात. तेव्हां ते सोडविण्याच्या आपल्या प्रयत्नांमध्यें एकसूत्रता असावयास पाहिजे आणि ही एकसूत्रता केवळ माहितीची देवाणघेवाण करण्यापुरतीच मर्यादित न राहतां त्याची व्याप्ति पुष्कळच वाढली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या सामाजिक प्रश्नांचे विशाल व गुंतागुंतीचें स्वरूप लक्षांत घेतां, अशा प्रकारचें समाजसेवेचें कार्य हातीं घेण्याकरितां अधिकाधिक संघटना व संस्था पुढें यावयास पाहिजेत. त्या तशा येतील अशी आपण आशा करूं या.

सामाजिक कार्य शास्त्रोक्त पद्धतीनें केलें तर तें अधिक परिणामकारक होते. आणि त्याकरितां आवश्यक ती सर्व माहिती व त्यासंबंधींची आंकडेवारी आपल्याजवळ असावी लागते. आंकडेवारी गोळा करणें हें एक मोठें किचकट काम असून तें अत्यंत काळजीपूर्वक व बारकाईनें करावें लागतें. विद्यापीठें, महाविद्यालयें व इतर शैक्षणिक संस्था हें कार्य हातीं घेऊं शकतील. क्रीडामंडळें, गायन समाज, कलाकेंद्रें वगैरेसारख्या सामाजिक संघटनांना अल्पबचत मोहिमेंत भाग घेतां येईल, तर महिला मंडळांना कुटुंबनियोजनाचें कार्य उत्कृष्ट रीतीनें करतां येईल. आजहि अनेक संघटना या सर्व क्षेत्रांत उत्तम प्रकारचें कार्य करीत आहेत. परंतु यापेक्षांहि अधिक संस्थांनीं पुढें येऊन या महान् राष्ट्रीय कार्याला आपला हातभार लावला पाहिजे.

कांही लोकांनीं अशी एक समजूत करून घेतलेली दिसते कीं, देशांत अमलांत येत असलेल्या विकासविषयक कार्यक्रमाची जबाबदारी सर्वस्वीं सरकारचीच आहे. परंतु ही समजूत आपल्या नियोजनाच्या उद्दिष्टाशीं सर्वस्वीं विसंगत आहे. अधिक व्यापक दृष्टिकोनांतून पाहिल्यास आपणांस

असें दिसून येईल कीं, सरकार अधिकारावर येतें आणि जातें तर विकासकार्य ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. हें विकासकार्य म्हणजे नवी समाजरचना निर्माण करण्याचे प्रयत्न होत आणि म्हणून त्यांत पक्षीय किंवा जातीय विचारांना थारा असतां कामा नये. लोकशाहीमधल्या नियोजनाच्या या महान् आणि एका अर्थानें अद्‌वितीय अशा प्रयोगांत, सरकारी कार्याइतकेंच, किंबहुना त्याहिपेक्षां अधिक महत्त्वाचें स्थान सामाजिक कार्याला असतें. या बाबतींत जर आपण अयशस्वी झालों तर लोकशाही पद्धतीच्या नियोजनाचा आपला दावाच खोटा ठरेल. लोकशाही पद्धतीच्या नियोजनांत कार्यपद्धतीच्या दृष्टीनें कांहीं उणीवा असूं शकतील. परंतु मानव हा या नियोजनाचा केंद्रबिंदु असल्यानें या उणीवांची एका अर्थाने भरपाई होते. यालाच आपल्या नियोजनाची मानवी अथवा नैतिक बाजू असें म्हणतां येईल. हा मानवी दृष्टिकोन जर आपल्या नजरेआड झाला तर योजनेचें मूळ उद्दिष्टच नष्ट होईल. हा धोका टाळण्यासाठी नियोजनांतील समाजकार्यावर आपणांस जास्तींत जास्त भर द्‌यावयास पाहिजे आणि त्याचबरोबर, नियोजनांत या कार्याला भरपूर वाव मिळतो आहे किंवा नाहीं हेंहि आपण पाहिलें पाहिजे. अशा प्रकारची शाश्वती आपण देऊं शकलों तर ज्या नव्या समाजव्यवस्थेचें स्वप्न आपण अनेक दिवस आपल्या उराशीं बाळगलें आहे, तिची उभारणी आपण भक्कम पायावर करूं शकूं. मला खात्री आहे कीं, पुरोगामी कल्पना व ध्येयें यांचा पुरस्कार करणारी प्रोग्रेसिव्ह ग्रुप ही आपली संस्था या राष्ट्रीय प्रयत्नांस आपला नैतिक पाठिंबा व सक्रिय साहाय्य देईल.

माझें भाषण संपविण्यापूर्वी, सर्वांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या अशा या विषयावर माझे विचार व्यक्त करण्याची आपण मला संधि दिलीत त्याबद्दल ग्रुपचे मी पुन्हा एकदां आभार मानतों.

## सामाजिक समतेचें कार्य

महाराष्ट्र सामाजिक परिषदेचें उद्घाटन करण्याचें भाग्य आज मला लाभत आहे, याबद्दल मला विशेष आनंद होत आहे. या परिषदेस येतांना माझ्यासारख्या राजकारणी माणसाला या सामाजिक परिषदेचें उद्‌घाटन करण्याचा कितपत अधिकार पोहोंचतो याचा मी माझ्या मनाशीं विचार करीत होतों. आपल्या आशीवार्दानें मी राज्याचा मुख्यमंत्री आहें म्हणूनच केवळ आपण मला बोलावलें असेल असें मला वाटत नाहीं. लोकशाही राज्यामध्यें लोकांची सर्वांगीण सुधारणा करणें हा राज्यकारभाराचा मुख्य उद्देश असल्यामुळें राज्याकडून समाजसुधारणेचें काम प्रभावी रीतीनें व्हावें ही अपेक्षा साहजिकच आहे आणि त्या उद्देशानेंच आपण मला या परिषदेच्या उद्‌घाटनासाठीं पाचारण केलें असावें. त्यामुळेंच कदाचित् या परिषदेस येतांना मला संकोच वाटला नसावा. परंतु मला असा संकोच न वाटण्याचें आणखीहि एक कारण आहे. आपण सर्वजण जाणतांच कीं या

देशाच्या व जगाच्याहि सुदैवानें या देशांतील थोर थोर नेत्यांनी राजकारणाला नवें मूल्य प्राप्त करून दिलें आहे. राजकारण म्हणजे केवळ सत्तेच्या क्षेत्रांत कांहीं कारभार करणें वा निवडणुका लढविणें नसून समाजपरिवर्तनाचें तें साधन आहे हा सिद्धांत या देशांतील महान् नेत्यांनी देशापुढें मांडला. महाराष्ट्राचे थोर समाजसेवक गोपाळरावजी गोखले यांनीं राजकारणाला आत्मिक अधिष्ठान देण्याचा संदेश प्रथमच भारताला दिला. तो संदेश आपल्या दिव्य व्यक्तिमत्त्वानें गांधीजींनीं प्रत्यक्ष अंमलांत आणून दाखविला. टिळक, गांधी यांच्यासारखे राष्ट्रीय नेते स्वतःच कर्मयोगी असल्यामुळें त्यांच्या नेतृत्वाखालीं राजकारणाला उच्च नैतिक अधिष्ठान मिळालें. गांधीयुगांत तर राजकारण व समाजकारण यांमधील लक्ष्मणरेषाच पुसली गेली. सामाजिक सुधारणावादाला सामाजिक समतेच्या दृष्टीनें ज्या गोष्टी अपेक्षित होत्या त्यांचा समावेश राजकारणांत झाला. इतकेंच नव्हे तर राजकीय कार्यक्रमामध्येंहि त्या बाबींना महत्त्वपूर्ण असें स्थान मिळालें. सर्वधर्मसमभाव, सामाजिक समता, हरिजनसेवा इत्यादी महत्त्वपूर्ण समाजिक सुधारणा आमच्या राजकीय परंपरेंचा अविभाज्य भाग बनल्या. या महान् परंपरेचे कांहीं संस्कार माझ्याहि मनावर झाले व त्या परंपरेचा एक नम्र पाईक म्हणून यथाशक्ति समाजसुधारणेचें काम करण्याची मला संधि मिळाली. आणि म्हणूनच या सामाजिक परिषदेचें उद्‌घाटन करतांना मला कुठलाहि परकेपणा वाटत नाही.

आधीं राजकीय सुधारणा कीं आधीं सामाजिक सुधारणा, हा प्रसिद्ध व उद्‌बोधक वाद टिळक आणि आगरकर यांसारख्या महापुरुषांमध्यें झाला. या वादसंवादांतूनच महाराष्ट्र सामाजिक दृष्ट्या अधिक पुरोगामी बनला यांत शंका नाहीं. न्या. रानडे यांच्या नेमस्त पण पुरोगामी सुधारणावादानें महाराष्ट्राचें लक्ष समाजसुधारणेकडे प्रामुख्यानें वळलें. आगरकरांनीं सामाजिक सुधारणावादांतून महाराष्ट्राला सामाजिक क्रांतिवादाची दीक्षा देण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांच्या प्रयत्नांनीं सामाजिक क्रांतिवादाची ही ज्योत बहुजनसमाजाच्या झोपड्यांना उजाळा देऊं लागली. महर्षि कर्वे यांनीं समाजाच्या उपेक्षित अशा भगिनीवर्गांत या क्रांतिवादाच्या आधारें नवी आशा निर्माण केली. हरिजन बांधवांना विठाई माउलीनें बोलवावें म्हणून साने गुरुजींनीं आपले प्राण पणास लावले. विनोबाजींच्या भूदान, ग्रामदान आंदोलनामुळें तर सर्वांगीण क्रांतिवादाचें मंगल दर्शन आपल्याला होत आहे. समाजसुधारणेच्या मूलभूत कल्पनेचे, महाराष्ट्राच्या सामाजिक मनाला आवाहन करणारे व त्याच्या समाजजीवनांत नवचैतन्य निर्माण करणारे हे सर्व अविष्कार आहेत. यांतून झालेली प्रगति आपण आपल्या मनश्चक्षूंसमोर आणली तर पुरोगामी विचारांनीं केवढी मोठी झेप मारली आहे याबद्दल सानंद विस्मय वाटतो. आणि दारिद्र्य, अज्ञान, जातिभेद, रूढी व मागासपण इत्यादि अनेक दोषांनी पोखरलेल्या समाजांत समाजसुधारणेसंबंधीं पराकोटीची अनास्था असतांनासुद्धां, ज्या महाभागांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितींत छळ व कष्ट सोसून थोर विचारांचे वायुमंडळ सर्वत्र निर्माण केलें त्या महाभागांना कृतज्ञतापूर्वक धन्यवाद द्यावेसे वाटतात.

आजच्या या स्वातंत्र्याच्या काळांत राजकीय कीं सामाजिक हा प्रश्न आतां फारसा राहिलेला नाहीं. सामाजिक क्रांति हेंच आतां आपल्या सर्व सार्वजनिक जीवनाचें एकमेव उद्दिष्ट बनलें आहे. सुदैवानें या देशाचे राजकीय क्रांतीचे प्रयत्नहि केवळ परका इंग्रज जावा आणि स्वकीयांचें राज्य यावें या स्वरूपाचे नव्हते. तर या राजकीय क्रांतीवांचून सामाजिक प्रश्न सुटूं शकणार नाहींत अशी त्या प्रयत्नांमागील विचारांची दिशा होती. त्यामुळें समाजकल्याण हें साध्य व स्वराज्य हें साधन अशीच आमच्या राजकारणाची बैठक राहिली. आतां स्वराज्य मिळाल्यानें प्रत्येक कार्यकर्त्याला, मग तो राजकीय क्षेत्रांतील असो वा समाजिक क्षेत्रांतील असो, सामाजिक सुधारणेच्या व उन्नतीच्या दृष्टीनेंच काम करावें लागत आहे, असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. सामाजिक सुधारणांबद्दल कदाचित् कार्यकर्त्यांत मतभेद असतील, कदाचित त्या सुधारणा किती वेगानें व कोणत्या पद्धतीनें अंमलांत आणाव्यात याबद्दलहि मतभेद असतील. परंतु स्वराज्यप्राप्ती नंतरची कुठल्याहि क्षेत्रांतील वैचारिक वा सार्वजनिक हालचाल समाजकारणाच्या भूमिकेवरून चालू आहे व चालू असली पाहिजे याबद्दल दुमत होणार नाही. नवसमाजनिर्मिती हें आतां भारताचें एकमेव उद्दिष्ट असून लोकशाही स्वराज्य हें त्याचें साधन आहे. बहुतेक सर्व पक्षांतील वा पक्षातीत विचारवंतहि हा सिद्धांत मान्य करूं लागले आहेत. सारांश, राजकारण हें स्वराज्यप्राप्तीनंतर समाजकारण बनलें आहे. अशा या काळांत सामाजिक परिषदांसारख्या परिषदा कोणती कामगिरी बजावूं शकतील याबद्दलचे माझे विचार मी आपणांसमोर मांडूं इच्छितों.

मीं आतांच म्हटल्याप्रमाणें राजकारण जर समाजकारण बनलें असेल तर मग स्वतंत्र सामाजिक परिषदांची आवश्यकताच काय, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. परंतु राजकारण हें जरी आज समाजकारण बनलें असलें तरी सर्व समाजकारण म्हणजे राजकारण नव्हे हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. राजकारण हा समाजकारणाचा एक भाग आहे. परंतु केवळ राजकारणाच्या आधारें समाजकारण यशस्वी होऊं शकणार नाहीं हें आम्हांला गांधीजींनी शिकविलें. समाजहितावर दृष्टि ठेवून ज्या सुधारणा आपण घडवून आणूं इच्छितों त्या सुधारणा जनतेच्या हृदयावर बिंबल्याशिवाय केवळ सत्तेच्या जोरावर आपल्याला अंमलांत आणतां येणार नाहींत. लोकाचाराला न मानवणारी सामाजिक सुधारणा समाजाच्या गळीं उतरविणें किती कठीण काम आहें हें आपण जाणतांच. म्हणून कुठल्याहि खस्ता खाऊन आणि कष्ट सोसून सामाजिक सुधारणा अंमलांत आणण्यासाठी जनतेंत निर्धारानें आणि सातत्यानें कार्य करणारे समाजसुधारक आपणांस हवे आहेत आणि अशा कार्याची आवश्यकता व महत्त्व सर्वांना पटवून देण्यासाठीं सामाजिक परिषदेची आवश्यकता आहे असें मला वाटतें. शिवाय ज्या समाजहितैषी लोकांना समाजहिताची कळकळ आहे त्यांच्यामध्यें सुद्धां समाजसुधारणेबद्दल एकमत असेलच असें नाहीं. हिंदुकोड बिलाच्या वेळीं या गोष्टीचें प्रत्यंतर आपणांस आलेंच आहे. तेव्हां सुधारणेची आस्था असलेल्या मंडळींना एकत्र

जमून विचारविनिमय करतां यावा आणि आपापला दृष्टिकोन अधिक पुरोगामी बनवून संघटित रित्या सामाजिक सुधारणेच्या कार्यास धार आणण्याचा त्यांना खास प्रयत्न करतां यावा यासाठींहि परिषदेसारख्या संघटनेची आवश्यकता असून या कामीं आपल्या या परिषदेचा बराच उपयोग होऊं शकेल असा मला विश्वास वाटतो. शिवाय सामाजिक सुधारणेसाठीं जी हवा आपणांस पैदा करावयाची आहे त्यासाठीं सुद्धां सामाजिक परिषदेसारख्या संस्थेचें कार्य अधिक उपयुक्त होईल असें मला वाटतें.

सामाजिक समता ही सामाजिक सुधारणा ठरविण्याची मुख्य कसोटी आहे हें आपण जाणतांच. सामाजिक विषमतेनें जर्जर झालेल्या आपल्या समाजाला सामाजिक समतेची दीक्षा देणें हा सामाजिक परिषदेच्या कार्याचा प्रमुख उद्देश आहे याबद्दल मला समाधान वाटतें. परंपरागत रूढीनें चालत आलेला व माणसामाणसांना संघटितपणें एकमेकांविरुद्ध वागण्यास शिकविणारा जातिवाद हा भारताला शाप ठरला आहे. स्वराज्यप्राप्तीनंतर भारतीय नागरिक स्वतंत्र झाला असला, तरी ख-या अर्थाने तो अजून भारतीय बनावयाचा आहे. भारत हें राष्ट्र बनलें असलें तरी प्रत्येक भारतवासी जातपात विसरून ख-या अर्थानें जेव्हां भारतीय बनेल तेव्हांच राष्ट्र पदवीला आमचा देश पात्र होणार आहे. कांहीं लोकांना, पूर्वी जातिधर्म हाच आमचा धर्म असें वाटत होतें. परंतु ऋग्वेदकाळीं जातिसंस्था अस्तित्वांत नव्हती ही गोष्ट संशोधनानें आतां शाबीत झाली आहे. त्यानंतर त्या त्या परिस्थितींत गुणकर्मविभाग म्हणून वर्ण आले. आपल्या कार्यानें वर्ण बदलहि येत असत ही गोष्ट विश्वमित्राच्या उदाहरणावरून दिसून येते. पुढें तर गुणकर्माचीहि कल्पना गेली व जन्मावरून दर्जा ठरविण्याचा हास्यास्पद प्रकार सुरू झाला. हा मुलगा अमुक खोलींत जन्मला म्हणून उच्च, तर दुसरा अमुक खोलींत जन्मला म्हणून कनिष्ठ, असा भेदभाव आपल्या मुलांमुलांतच एखादें कुटुंब करूं लागलें म्हणजे तें कुटुंब रसातळाला जाणारच. अशाच प्रकारची जातिभेदानें आमच्या राष्ट्रकुटुंबाची हानि केली आहे. सुदैवानें भूतदया, समाजसुधारकांचे कार्य, पुरोगामी राजकारण वगैरे गोष्टींमुळें जातिभेदावर आधारलेल्या आमच्या समाजाची अधोगति थोडीफार थोपविली गेली. आतां तर सामाजिक समतेवर आधारलेली राज्यघटना भारतानें मंजूर केली आहे. त्यामुळें जातिभेदाच्या भिंती ढासळण्याच्या मार्गावर आहेत असेंच कोणीहि अनुमान काढील. परंतु लोकशाही समतेवर आधारलेली घटना असूनहि आणि त्याप्रमाणें समाजाला पुढें नेण्याचे प्रयत्न चालू असूनहि या काळांत जातिभेदाचे भेसूर परिणाम कांहीं प्रांतांत आजहि आपणांस पाहावयास मिळत आहेत. त्यामुळें जातिभेदनिर्मूलनाचें कार्य हें आज ऐतिहासिक निकडीचें कार्य झालें आहे. परंतु जातीय संघर्षाला कधीं कधीं जें आवाहन करण्यांत येतें त्यामुळें राजकीय सुधारणेच्या कार्याला वाहून घेतलेले लोकच अशा प्रसंगीं नवा विश्वास व सामाजिक एकतेची नवी जाणीव समाजाच्या गळीं अधिक चांगल्या प्रकारें उतरवूं शकतील असें मला वाटतें.

अस्पृश्यतानिवारणाचा मोठाच प्रश्न आपल्यासमोर आहे. त्यासाठीं सरकारनें अनेक कायदे केले आहेत. प्रत्येक गावांतील सार्वजनिक विहिरी व मंदिरें हरिजनांसाठीं कायद्यानें खुलीं झालीं आहेत. परंतु अद्यापिहि अशीं अनेक गांवें आहेत कीं जेथें हरिजनांना हे हक्क आज सुद्धां उपभोगतां येत नाहींत. याचें कारण हें आहे कीं कायदा हा अनुज्ञापक स्वरूपाचा असतो. जो कोणी हक्क धसाला लावील त्याच्या रक्षणासाठीं कायदा उभा आहे. नाहीं तर कायदा कांहींच करूं शकत नाहीं. सामाजिक सुधारणेच्या खास प्रयत्नांनीं आपण ही उणीव भरून काढली पाहिजे. आपले हक्क आपण बजावूं शकूं असा हरिजनांत विश्वास निर्माण करणारें वातावरण पैदा व्हावयास पाहिजे. हें महान् कार्यहि सामाजिक परिषदेच्या कार्यकर्त्यांकडून अधिक चांगल्या प्रकारें होऊं शकेल. भगिनीवर्गाच्या बाबतींतहि हा न्याय लागू करतां येईल.

आदिवासी लोकांची परिस्थिति तर फारच केविलवाणी आहे. पगार घेऊन सुद्धां आदिवासी भागांत काम करण्यास फार थोडे समाजसेवक धजावतात, हें पाहिलें म्हणजे सामाजिक सुधारणेचें कार्य कसें असिधाराव्रताप्रमाणें आहे याची साक्ष पटते. हे सर्व समाज आपल्याला आवाहन करीत आहेत आणि त्या आवाहनाला साथ देण्यासाठी आपण येथें जमलेलों आहोंत. या आवाहनानें आपल्या हृदयांतील तार छेडली आहे हें मी जाणतों. परंतु हें कार्यच एवढें महत्त्वाचें आणि बिकट आहे कीं सातत्यानें काम चालविण्यासाठीं अनेक कार्यकर्ते आपणांला शोधावे लागतील व या कार्यास सतत नियमानें जुंपून घ्यावें लागेल. भारत हा खेड्यांचा देश आहे व म्हणून ग्रामीण भागांतून सामाजिक सुधारणेचे पाट आपण कसे खेळवतों यावर सामाजिक क्षेत्रांतील आपल्या श्रमांचें साफल्य अवलंबून आहे. सामाजिक परिषद ही केवळ परिषद न राहतां त्यांतून खेड्यांपाड्यांतील अज्ञान, रूढि व दारिद्र्यग्रस्त जनतेच्या सुधारणेची गतिमान प्रक्रिया निर्माण व्हावी या उद्देशानें आपण येथें जमलों आहोंत. बुद्धिनिष्ठा व समाजनिष्ठा या दोहोंचा योग्य मेळ घालून सामाजिक सुधारणेचें कार्य आपणांस प्रभावीपणें करावयाचें आहे. आपण सामाजिक सुधारणेच्या कार्यांत रस घेणारे आहांत व त्या क्षेत्रांतील आपला अभ्यास व अनुभवहि माझ्यापेक्षां अधिक आहे हें मी जाणतों. समाजकल्याणाच्या श्रद्धेनें आणि समाजसुधारणेच्या विवेकाने आपण सर्वजण काम करूं लागलों तर सामाजिक परिषदेचें कार्य अधिक प्रभावी बनूं शकेल. त्यासाठीं सामाजिक परिषद कार्याची आंखणी करीलच. म्हणून परिषदेला उपस्थित असलेल्या सर्व कार्यकर्त्यांना मी एवढीच विनंती करीन, कीं परिषदेनें ठरविलेल्या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठीं आपण सातत्यपूर्वक प्रयत्न करावेंत. अशा प्रकारचे प्रयत्न आपणांकडून नेटानें व निष्ठापूर्वक होतील असा माझा विश्वास आहे. शेवटीं मला हा उद्‌घाटनाचा मान दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून या परिषदेचें उद्‌घाटन झालें असें मी जाहीर करतों.

## जगन्नाथाचा रथ

उद्यांपासून महाराष्ट्राच्या कायदेमंडळाचें अधिवेशन नागपूर येथें सुरू होत असून त्यासाठीं मी येथें आलों आहें. अधिवेशनास सुरुवात होण्यापूर्वी नागपूरच्या जनतेला भेटण्याची मला ही संधि मिळाली त्याबद्दल मला आज अतिशय आनंद होत आहे. कांहीं विशिष्ट कामें मनाशीं ठरवून मी येथें आलों असून त्या कार्याला आजच्या ह्या सभेपासूनच सुरुवात होत आहे असें मला वाटते.

नागपूर कराराप्रमाणें नागपूर येथें महाराष्ट्र कायदेमंडळाचें एक अधिवेशन व्हावें असें ठरलें होतें. त्या करारांत नागपूरच्या जनतेला दिलेलें वचन आज पूर्ण होत आहे. त्या वचनपूर्तीमुळे मला आज मोठें समाधान वाटत असून मला होत असलेला आनंद कसा व्यक्त करावा तें मला समजत नाहीं, त्याकरितां मजजवळ पुरेसे शब्द नाहींत.

उद्यांपासून नागपूरच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासांतील एका नवीन खंडास प्रारंभ होत आहे. जनतेच्या नेत्यांनी जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठीं नवीन पद्धत व मार्ग स्वीकारलेला असून महाराष्ट्र राज्याकडून जनतेच्या कल्याणाचा हा नवा उपक्रम सुरू होत आहे. अशा रीतीनें लोकशाहीचा आम्ही कटाक्षानें पुरस्कार करीत आहोंत याबद्दल मला आनंद होतो. विदर्भांतील विशेषतः नागपुरांतील - लोकांच्या भावना वेगळ्या आहेत हें मी नाकबूल करीत नाहीं. मी त्यांच्या भावना समजतों. माझ्याबद्दल त्यांच्या कदाचित् विरोधी भावना असतील, पण माझ्या मनांत त्यांच्यासंबंधीं विरोधाची यत्किंचितहि भावना नाहीं. माझ्याविषयीं कांहीं लोकांच्या मनांत द्‌वेषहि असेल, पण त्या लोकांविषयीं माझ्या मनांत तिळमात्र द्‌वेष नाहीं. हें जनतेचें राज्य आहे म्हणून या राज्यांत लोकांची विविध मतें असणें स्वाभाविक आहे. माझ्या मताशीं ते सर्वस्वी सहमत राहतील असें मी समजत नाहीं. मतभिन्नता असूं शकते, पण त्यांत द्‌वेषबुद्धि नसावी. कारण तशी द्‌वेषबुद्धि असली तर लोकशाही नांदूं शकणार नाहीं.

चौदा वर्षांपूर्वी या हिंदुस्तान देशांत एक महान क्रांतिकारी घटना घडून आली आणि त्या घटनेमुळें हिंदुस्तानांत जनतेचें राज्य स्थापन झालें. चौदा वर्षांपूर्वीं आम्हांला लोकशाहीचा हा जो वारसा मिळाला त्याच्या मुळाशीं हें भारतीय जनतेचें राज्य आहे हीच प्रेरणा आहे. हें जें महान मूल्य आहे त्याची आपण जोपासना केली पाहिजे, त्याचा आपण विकास केला पाहिजे. त्यासाठीं देशाच्या भवितव्याचा प्रश्न नजरेसमोर ठेवून त्याच्या समृद्धीसाठीं आवश्यक असलेल्या भावनांची आपणांस पूर्ति करतां आली पाहिजे. एकमेकांविषयीं प्रेमाचा, एकमेकांशी सहकार्याचा, मार्ग अवलंबून आपल्या रास्त आचरणानें लोकांत आपण विश्वास निर्माण केला पाहिजे. महाराष्ट्राचें राज्य हें जनतेचें राज्य आहे, तें जनतेचें कल्याणकारी राज्य आहे असा महाराष्ट्र राज्याचा दावा आहे. त्यासाठीं आम्ही प्रयत्नशील आहोंत.

महाराष्ट्र राज्याचा हा दावा आपल्यापैकीं प्रत्येकाचा असला पाहिजे. मराठवाडा, पुणें-सातारा, कोंकण आणि विदर्भ या सर्वांचा हा दावा असला पाहिजे. महाराष्ट्राचें हें राज्य मराठवाड्याचें आहे, कोंकणचें आहे, विदर्भाचें आहे, सर्व मराठी जनतेचें आहे. जोंवर हें राज्य जनतेच्या कल्याणासाठीं कार्य करीत आहे, तोंवर महाराष्ट्र राज्य कायम राहील. परंतु हें कार्य होणार नसेल, तर महाराष्ट्र राज्य राहूं शकणार नाहीं, ही मूळ प्रतिज्ञा लक्षांत घेऊनच मी बोलत आहें. आमच्यासमोर लोकशाहीचीं मूलभूत मूल्यें आहेत. ह्या मूल्यांचा विकास होण्यासाठीं, नव्या मार्गांचा अवलंब करून जनतेचें जीवन समृद्ध केलें पाहिजे, नवा समाज निर्माण केला पाहिजे. या तत्त्वाचा महाराष्ट्र राज्यानें स्वीकार केला असून त्या दिशेनें आमचें पद्धतशीर पाऊल पडत आहे, असें मी आपल्याला नम्रपणें सांगू इच्छितों. पण हें सर्व साधण्यासाठीं भावनात्मक ऐक्य निर्माण झालें पाहिजे. तें निर्माण करण्यासाठीं मी सतत प्रयत्न करीत राहीन. या प्रयत्नांत जर मला अपयश आलें तर तो माझा पराभव ठरेल, सर्व महाराष्ट्राचा पराभव ठरेल. परंतु माझें उद्दिष्ट साध्य करण्यांत मी हार जाणार नाहीं. ह्याकरितां कोणता मार्ग काढावा याचा विचार सतत माझ्यासमोर आहे. त्यासाठीं अनेक कार्यक्रम हातीं घेण्यांत आले असून यापुढें असेच आणखी कार्यक्रम हातीं घेण्यांत येतील. जनतेनें ह्या दृष्टीनेंच आमच्या ध्येयधोरणाचा आणि आम्ही अंमलांत आणीत असलेल्या कार्यक्रमांचा विचार केला पाहिजे. कार्यक्रमांसंबंधींच्या आमच्या कांही उणीवा असतील तर त्या जनतेनें आमच्या निदर्शनास आणून दिल्या पाहिजेत.

महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर संपूर्ण महाराष्ट्राकरितां व्यापक स्वरूपाची योजना आंखण्याचा आम्हीं प्रयत्न केला असून त्यासाठीं शक्य ती सर्व तरतूद करण्यांत आली आहे. महाराष्ट्राचे मराठवाडा, कोंकण, विदर्भ असे अनेक विभाग असून त्यांचे वेगवेगळे प्रश्न आहेत, त्यांच्या वेगवेगळ्या मागण्या आहेत. या सर्व प्रश्नांचा व मागण्यांचा अभ्यास करून या विभागांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनें संतुलित स्वरूपाचा कार्यक्रम तयार करण्याचा प्रयत्न आम्ही तिस-या पंचवार्षिक योजनेंत केला आहे. या विभागांचा विकास, त्यांच्या आकांक्षा व त्यांच्या मागण्या ह्या सर्वांचें प्रतिबिंब येत्या पंचवार्षिक योजनेंत पडावें, असा आमचा कटाक्ष असून त्याप्रमाणें पावलें टाकण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे.

नागपूर शहर ही एक महत्त्वाची बाब आहे. नागपूरची राजधानी गेली हें मला मान्य आहे. पण याचा आपण निराळ्या दृष्टीनें विचार केला पाहिजे. नागपूरचें महत्त्व वाढविण्याच्या दृष्टीनें मी कोणाच्याहि मागें राहिलों नाहीं. राजधानीचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा होता. नागपूर कराराप्रमाणें येथें कांहीं दिवस राजधानी असावी व विधानसभेची बैठक व्हावी असा लोकप्रतिनिधींनीं जो कौल दिला, त्याची अंमलबजावणी आज होत आहे. जनतेचे प्रश्न, त्यांच्या भावना, त्यांचा आकांक्षा

समजावून घेऊन त्या सर्वांना मूर्त स्वरूप देण्याचा आटोकाट प्रयत्न आम्ही करीत आहोंत व करीत राहूं. परंतु याकरितां आपली भावना आणि दृष्टि बदलली पाहिजे. लोक म्हणतात, नागपूरवर चव्हाणांचें राज्य आहे. पण आपण असें कां समजतां ? आपण असें कां नाहीं म्हणत कीं नागपूरवर कन्नमवारांचे राज्य आहे. वस्तुस्थिति अशीं आहे कीं हें राज्य व्यक्तीचे नाहीं. महाराष्ट्राच्या साडेतीन कोटि जनतेचें हें राज्य आहे. तें यशस्वी कसें होईल याचा व्यापक दृष्टिकोनांतून आपण सर्वांनी विचार केला पाहिजे. एकमेकांचे अनुभव एकमेकांच्या विकासाकरितां उपयोगी पडले पाहिजेत. आपल्या अनुभवाची देवाणघेवाण झाली पाहिजे. राज्य शेवटीं माझें किंवा एकदोन माणसांचे नसून तें आपल्या सर्वांचे आहे अशी आपुलकीची भावना वृद्धिंगत झाली पाहिजे.

राज्यपुनर्रचनेचा प्रश्न मीं मूलभूत असा कधींच मानला नाहीं. देशापुढें उपस्थित होणारे प्रश्न सोडविण्याचें आणि देशाचा विकास व समृद्धि घडवून आणण्याचें राज्य हें एक साधन आहे. जनहिताचे प्रश्न त्वरित सोडवितां यावे व राज्याचा विकास साधावा या दृष्टीनें राज्य व राज्ययंत्रणा प्रयत्न करीत असते. त्या दृष्टीनें राज्याचा एक प्रभावी साधन म्हणून आम्ही वापर करीत असून जनतेचे प्रश्न शक्य तो त्वरित सुटून हें राज्य आपल्या सर्वांचे कसें होईल याचा विचार माझ्या मनांत सतत सुरू आहे. विदर्भाचा, विशेषतः नागपूरच्या प्रश्नांचा, आम्ही उत्कटतेनें विचार करूं इच्छितों. नागपूर शहरांत अनेक प्रश्न आहेत. त्यांपैकीं नागपूर शहराचा विकास हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. पण शहारचा विकास म्हणजे रस्ते मोठे करणें नव्हे. नागपूर शहराचा विकास म्हणजे तेथील जनतेचा विकास होय. त्यासाठीं येथील लहान लहान धंद्यांचा विकास झाला पाहिजे. उदाहरणार्थ, येथील विणकरांच्या धंद्याचा विकास झाला पाहिजे; त्यांच्या योग्य मागण्यांची आम्हांला पूर्ति करतां आली पाहिजे; त्यांच्यांतील अज्ञान आम्हांला नाहींसें करतां आलें पाहिजे. यांतूनच या शहराचा विकास होणार आहे. लोककल्याणाच्या दृष्टीनें छोट्या छोट्या धंद्यांची आंखणी झाली पाहिजे आणि त्यांची वाढ झाली पाहिजे. त्याशिवाय त्यांचा विकास होणार नाहीं. मोठमोठ्या उद्योगधंद्यांसंबंधींची जनतेची जी मागणी आहे त्याची सरकारला जाणीव असून या धंद्यांच्या विकासासाठीं सरकार आपल्या आर्थिक मर्यादा लक्षांत घेऊन योग्य ते प्रयत्न करीलच. पण त्याकरितां अनुकूल वातावरण निर्माण व्हावयास पाहिजे. मोठा धंदां काढला कीं काम संपलें असें नाहीं. लोकांनीं एकत्र येऊन लहान लहान उद्योग सुरू करण्याच्या बाबतींत पुढाकार घेतला पाहिजे.

महाबळेश्वर येथें झालेल्या शिबिरांत अनेक मूलभूत मूल्यांचा विचार करण्यांत आला. नवा समाज नव्या प्रयत्नांनी निर्माण करावयाचा आहे, असा विचार प्रसृत करण्यांत आला. त्याकरितां विकासाचे विविध प्रश्न व ते सोडविण्याचे मार्ग ह्या मूल्यांच्या अनुरोधानें विचारांत घेण्यांत आले. महाराष्ट्राची सर्वांगीण उन्नति, सर्वांगीण विकास, हीच त्याच्या मागची मूलभूत प्रेरणा असून

महाराष्ट्र समृद्ध कसा होऊं शकेल ह्या प्रश्नाचा आतां आपण विचार केला पाहिजे. महाराष्ट्रांत उद्योगधंदे वाढले पाहिजेत, व्यापार वाढला पाहिजे ही गोष्ट खरी आहे. पण व्यापार म्हणजे काय ? व्यापारी कोणास म्हणावयाचें ? निव्वळ आयात-निर्यात करणें यालाच व्यापार म्हणतां येईल काय ? किंवा तो करणारा व्यापारी होईल काय ? परदेशांचा माल आयात करून कमिशनवर कांहीं लोक मोठे व्यापारी झाले, पण तो खरा व्यापार होईल काय ? हिंदुस्तानांतील फार मोठा व्यापारी वर्ग याच प्रकारचा आहे. पण ही दृष्टि आतां बदलली पाहिजे. आम्हीं जो मूलगामी विचार केला तो अशा

त-हेचा विधायक व अभिनव विचार आहे. दुस-या योजनेनंतर आपल्या देशांतच मालाचें उत्पादन करण्याचे प्रयत्न सुरू झाले. आमच्या देशांतील कच्चा माल उत्पादनाच्या कामीं येऊं लागला. त्यांतून गरजेच्या वस्तूंचें उत्पादन सुरू झालें. आमच्या देशांतील मालाचा उपयोग येथील उत्पादनांत झाल्याशिवाय व गरजेच्या वस्तूंचे येथें व्यापक प्रमाणावर उत्पादन झाल्याशिवाय आमचा देश संपन्न होणार नाहीं. व्यापारासंबंधींच्या कल्पना उपजाऊ व उत्पादक अशा असल्या पाहिजेत. मी मुंबईला व्यापार पाहतों. तो मला व्यापार दिसत नाहीं. जो देश परदेशांच्या आयातीवर विसंबून राहतो, तो दुबळा देश ठरतो. व्यापारी उत्पादक म्हणून राहिला पाहिजे. त्यानें उद्योगधंदे सुरू करून देश समृद्ध केला पाहिजे. ह्यावर आतां आपण आपली दृष्टि केंद्रित केली पाहिजे.

छोट्या छोट्या प्रश्नांत आपली शक्ति वाया जात आहे हें पाहिलें म्हणजे मनाला वेदना होतात. ही शक्ति आपल्यापुढील समस्या सोडविण्यासाठीं आपण उपयोगांत आणली पाहिजे. नव्या मूल्यांच्या प्रस्थापनेबरोबर ज्या नव्या आकांक्षा वृद्धिंगत होत असतात, त्यांचें प्रतिनिधित्व आम्हांला करतां आलें पाहिजे. या आकांक्षांची पूर्ति करण्याचें काम शासनाचें असून शासन तें बजावल्याशिवाय राहणार नाहीं. परंतु त्याच्या अगोदर माझें म्हणणें समजून घेण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. निव्वळ भाषेच्या वादांत मला आस्था नाहीं. जनतेची जी भाषा असेल तिचा विकास झाला पाहिजे. पण तिचा विकास होत असतांना, हिंदीचाहि विकास व समृद्धि झाली पाहिजे, अशी महाराष्ट्र राज्याची आकांक्षा आहे. महाराष्ट्राचा इतिहास हा भारताच्या इतिहासाचा एक पाठ आहे. महाराष्ट्राच्या कांहीं वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आणि भावना असल्या तरी महाराष्ट्र हा भारतीय कुटुंबाचा एक घटक आहे ही गोष्ट आपण नेहमी ध्यानांत ठेवली पाहिजे. हें नातें अविभाज्य असून सबंध राज्याचा प्रश्न हिंदुस्तानशीं जोडला गेला आहे ही आमची भूमिका आहे. तेव्हां केवळ महाराष्ट्राच्या दृष्टीनें राष्ट्रीय प्रश्नाचा विचार करणें बरोबर होणार नाहीं. महाराष्ट्र हा देशाचा एक भाग आहे आणि या देशांतील सगळे लोक बंधु आहेत या भावनेनें आपण आपल्या जबाबदा-या पार पाडल्या पाहिजेत.

छोट्या छोट्या राज्यांचा प्रश्न उचल घेत आहे. पण दुनियेचें चित्र पाहा. आज सर्व मानवजातीसमोर महान् संकट उभें आहे. लढाईचा प्रसंग उद्भवणार नसला तरी तशी परिस्थिति निर्माण झाली तर आपल्या नेत्याचे हात आपल्याला बळकट कसे करतां येतील ह्या दृष्टीनें आपण विचार केला पाहिजे. या देशाला महात्मा गांधींनी एक दृष्टि दिली आहे. आज पंडितजी आपल्याला तोच संदेश देत आहेत. त्यांनीं दिलेल्या प्रगल्भ दृष्टिकोनांतून भारताचा आपण विचार केला पाहिजे. मानवजातीसमोर आज जी संकटांची परंपरा उभी आहे, ती नाहींशी करण्याकरितां आपल्यापुढील समस्यांची उकल करून भारतानें पुढें पाऊल टाकलें पाहिजे. आजचें युग विज्ञानाचें आहे. परंतु विज्ञान हें एक साधन असून त्याचा उपयोग मानव जातीच्या हिताकरितां झाला पाहिजे. मानवजातीनें विज्ञानाचा विकास केला व त्यांतून मानवजातीचें नुकसान झालें तर त्या विज्ञानाचा कांहीं उपयोग नाहीं. कोणत्याहि साधनांतून जनतेचें कल्याण साध्य करतां आलें पहिजे.

आज आपली हीं जीं छोटीं छोटीं राज्यें झालीं आहेत त्यांच्याकडे आपण आपल्या विकासाचें एक साधन म्हणून पाहिलें पाहिजे. पण छोटीं छोटीं राज्यें होऊनहि पूर्वीचें हेवेदावे कायम राहणार असतील तर तें एक संकटच ठरेल. ह्या साधनांचा उपयोग लोककल्याणासाठीं होतो आहे किंवा नाहीं हें आपण पाहिलें पाहिजे. ह्या कसोटीवर महाराष्ट्र राज्य उतरत नसून महाराष्ट्र राज्यापासून विदर्भाचें नुकसान होत आहे अशी माझी खात्री करून दिली, तर मी स्वतःच हें महाराष्ट्र राज्य मोडून टाकीन. आम्ही सर्व भाऊ भाऊ एकत्र आलों. एकत्र आलेल्या भावांच्या जीवनांत वैर उत्पन्न व्हावें असें कुणाला वाटेल? आज सव्वीस जिल्ह्यांतील लोक एकत्र आले आहेत याचा आपल्याला आनंद वाटला पाहिजे. पण या एकत्र येण्यानें जर कुणाला आनंद न वाटतां दुःख वाटत असेल तर तें दुर्दैवच ठरेल.

विदर्भ असो, मराठवाडा असो, कोंकण असो किंवा इतर दुसरा कोणता विभाग असो, तेथील सर्व प्रश्नांकडे आईच्या अंतःकरणानें पाहिलें पाहिजे. त्यांचे जे भिन्न भिन्न प्रश्न असतील ते नीट समजावून घेतले पाहिजेत, आणि ते आईच्या ममतेनें सोडविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. मी ही परीक्षा जरूर देत आहें. सर्व मागासलेल्या लोकांच्या विकासाचा प्रश्न ह्याच माध्यमांतून सोडवितां आला पाहिजे. त्यांचेहि अनेक प्रश्न आहेत. शेतीचा प्रश्न, सहकाराचा प्रश्न, विणकरांचा प्रश्न आपुलकीनें सोडवितांना मी नापास होणार नाहीं असा माझा दावा आहे. हे प्रश्न सोडवीत असतांना माझी दृष्टि निरपेक्ष आहे. यामागील चढउताराच्या घटनांमुळें आपल्यापैकीं कांहींची मनें दुखावलीं, पण त्यामुळें राज्याची परीक्षा होत नाहीं. राज्याचे प्रश्न सोडविण्याच्या कांहीं कसोट्या असतात. त्या मूळ कसोट्या आपण लक्षांत घ्या व नंतर बोला, आपल्याकडून मी एवढीच अपेक्षा करतों.

माझ्या पूर्वीच्या मित्रांना आज विरुद्ध बाजूला पाहून मला दुःख होतें. त्यांनीं महाराष्ट्र राज्याचा हा

जगन्नाथाचा रथ पुढें नेण्यासाठीं मदत करावी. जगन्नाथाचा हा रथ पुढे नेण्यासाठीं रक्तामांसाची मानवी शक्ति पणास लावावी लागेल. जनतेच्या संघटित शक्तीवरच तो पुढें जाईल. ह्या प्रयत्नांत मी मागें पडणार नाहीं. परंतु माझी दृष्टि आपण समजावून घेतली पाहिजे. मी लोकशाहीचा पुरस्कर्ता आहें. लोकशाहीच्या आड येईल असें कांहींहि माझ्याकडून होणार नाहीं. माझ्या या विरोधी मित्रांनीं माझा मार्ग समजावून घ्यावा व आपलाहि मार्ग समजावून सांगावा. हाच लोकशाहीचा मार्ग आहे.

आज इकडे पूर्वेकडे आणि हिमालयाच्या उत्तरेकडे युद्धस्थिति निर्माण झाली आहे. चीनचें संकट समोर उभें आहे. त्याला तोंड देण्यासाठीं आपण आपली शक्ति एकवटली पाहिजे. त्यासाठीं समर्थ म्हणून आम्हांला जगतां आलें पाहिजे. आम्ही समर्थ झालों तर कुणीं कितीहि भीति दाखविली, तरी त्याला आम्ही भीक घालणार नाहीं. पण त्याकरितां शक्ति वाढविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. ती शक्ति शेतीचा, उद्योगधंद्यांचा आणि शिक्षणाचा विकास केल्यानेंच वाढणार आहे. ह्या सर्व प्रगति घडवून आणण्यासाठीं नवीन क्रांतिकारक दृष्टि ठेवून प्रयत्न झाले पाहिजेत. आपण म्हणतों आपल्याला देश बदलावयाचा आहे. पण देश बदलावयाचा म्हणजे त्यांतील विंध्य, सातपुडा, सह्याद्रि हे पर्वत बदलावयाचे आणि त्यांतील नद्या बदलावयाच्या असा त्याचा अर्थ नव्हे. देश बदलणें म्हणजे देशांतील माणसें बदलणें, त्यांच्या विचारांत बदल होणें. हें सर्व त्यांच्यांत नव्या शक्तीचा संचार झाल्यानेंच घडून येणार आहे. त्याकरितां नवीन वातावरण निर्माण करण्याची जरुरी आहे. आपण छोटेसेंच क्षेत्र जबाबदारीने अंगावर घेऊन त्यांतील प्रश्न आपसांत वाटून घ्या. त्याशिवाय हें वातावरण निर्माण होणार नाहीं.

नागपूर शहर व विदर्भांतील जनता स्वातंत्र्यसंग्रामांत नेहमींच आघाडीवर राहिली आहे. नागपूर काँग्रेसला इतिहास आहे. ह्या ठिकाणीं काँग्रेसच्या विचारांना ऐतिहासिक कलाटणी मिळालेली आहे. अशा या व्यापक परंपरेंत वाढलेल्या येथील काँग्रेस कार्यकर्त्यांत राष्ट्रव्यापी प्रेम, श्रद्धा, त्याग आणि एकजिनसीपणा हे गुण प्रकर्षानें वास करीत असतील याबद्दल मला खात्री आहे. मला जुना इतिहास आठवतो. गांधीजी आमच्या राष्ट्राचे सेनापति होते. आजहि प्रत्येक राष्ट्रांत सेनापति आहेत. परंतु गांधीजींचें सेनापत्य आणि आजच्या लष्करांतील सेनापतीचें सेनापत्य यांत फरक आहे. शत्रूंशी लढाई करतांना लष्कराचा सेनापति सैन्याच्या पुढें राहून हुकूम देत नाहीं. चाळीस, पन्नास, शंभर मैल मागें राहून शत्रूवर चालून जाण्याचा तो हुकूम देतो. गांधीजींचे सेनापत्य वेगळे होतें. १९३० सालीं मिठाचा सत्याग्रह झाला. त्या वेळी त्यांनीं कुणाला आदेश दिला नाहीं. तुम्ही या म्हणून त्यांनीं बिहारमध्यें राजेंद्रबाबूंना किंवा गुजरातमध्यें सरदार पटेलांना सत्याग्रह करण्याचा कधींच आदेश दिला नाहीं. मिठाचा प्रश्न घेऊन ते समोर एकटेच निघाले. पण हजारोंनीं त्यांच्या लढाईंत त्यांची सोबत केली व यशस्वी लढाई दिली. आज जनतेचे प्रश्न सोडविण्याकरितां अशाच

नेतृत्वाची गरज आहे. कोणतीहि समस्या सोडविण्याकरितां अशाच नेतृत्वाची गरज आहे. कोणतीहि समस्या सोडविण्यासाठीं कार्यकर्त्यांनीं अशीच उडी टाकली पाहिजे, तरच आजचे निकडीचे प्रश्न सोडवितां येतील. त्यासाठीं जनमत जागें केलें पाहिजे. जनतेचे प्रश्न समजावून घेऊनच आपणांस अशी जागृति निर्माण करतां येईल. आपण खेड्यांत जा, शेतक-यार्शी समरस व्हा आणि शेती सुधारण्याच्या कामीं त्याला मदत करा. पण एक गोष्ट मात्र लक्षांत घ्या, नुसत्या शेतीच्या सुधारणेनें देश समृद्ध व शक्तिशाली होणार नाहीं.

केवळ शेतीवर आधारलेला देश आर्थिक दृष्ट्या उन्नत होत नाहीं. आपणांला हिंदुस्तान शक्तिशाली करावयाचा आहे, समृद्ध करावयाचा आहे. त्याकरितां औद्योगिक शक्ति वाढली पाहिजे. खेड्यापाड्यांतून विजेचा वापर झाला पाहिजे. ही बिजली खेड्यांत गेल्याशिवाय उत्पादनाचें मान वाढणार नाहीं. शेतीसोबत लहान उद्योग वाढून खेड्यांची शक्ति विकसित झाली पाहिजे, खेड्यांतून ज्ञान विकसित झालें पाहिजे. मुंबई, मद्रास, कलकत्ता इत्यादि मोठमोठ्या शहरांत विजेचा झगमगाट दिसतो आणि खेडीं मात्र अंधारांत राहतात, ही परिस्थिति बदलली पाहिजे. हाच आजचा खरा प्रश्न आहे. हा महत्त्वाचा बदल घडवून आणण्यासाठीं पहिल्या दोन पंचवार्षिक योजना झाल्या असूनहि शेतक-यांना खराखुरा फायदा झाला नाहीं. हें खरें आहे कीं शेती सुधारली नाहीं तर कांहींच होणार नाहीं. त्याकरितां शेतक-यांना, त्यांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळालें पाहिजे. त्यांना अडाणी ठेवून त्यांचा विकास कसा होईल? नवा विचार, नवा माणूस निर्माण केल्याशिवाय कांहींच साधणार नाहीं. मीं हें जें नवें स्वप्न पाहतों, तें महाराष्ट्र राज्याचें स्वप्न आहे. खेड्यांतील माणूस हा स्वतःच्या श्रमाचा मालक झाला पाहिजे. आज आपल्याला खेड्यांतून काय दिसतें ? कशींबशीं घरें आहेत, पण त्यांत प्रकाश नाहीं, पाण्याची सोय नाहीं. छोट्या छोट्या घरांत सर्व वापर. ही त्यांची दैनावस्था ! इकडे शहरांत सायकलरिक्षा चालविणारा मजूर घामांत सारखा न्हाऊन निघतो, त्याला किती यातना होतात ! हें सारें पाहून मन शतशः दुःखी होते. आपल्या विणकरांचा प्रश्न घ्या. ते कसेबसे जिवंत दिसतात. त्यांचा पिढ्यान् पिढ्या चालत असलेला हा धंदा आहे. त्याला आपण नवीन शक्ति दिली पाहिजे. हेच खरे महत्त्वाचे प्रश्न आहेत. मोठमोठ्या उद्योगधंद्यांसंबंधीचीं चर्चा आपण ऐकतों. त्यांची वाढ झाली पाहिजे हें मलाहि मान्य आहे. पण मोठमोठ्या उद्योगधंद्यांसाठीं मोठ्या भांडवलाची गरज असते. अर्थात् त्या भांडवलावर आपणांस विसंबून भागणार नाहीं. छोट्या छोट्या उद्योगधंद्यांचा आपण विकास केला पाहिजे. त्यांना एकत्र आणून त्यांची वाढ करून आपण आपला विकास साधला पाहिजे. आपल्या ह्या मूलभूत समस्या आहेत. नव्या महाराष्ट्र राज्याचे हे मूलभूत प्रश्न आहेत. ह्या मूलभूत प्रश्नांना आपण हात घातला पाहिजे. मला माहीत आहे कीं हें काम वाटतें तितकें सहज किंवा सोपें नाहीं. तें फार अवघड असें काम आहे. पण तें पार पाडण्यांत खरा पुरुषार्थ आहे. हे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न महाराष्ट्र राज्य करीत आहे. हे प्रश्न सोडवीत असतांना त्याचे प्रयत्न कमी

पडत असतील तर महाराष्ट्राचा पराभव झाला असें तुम्ही आग्रहानें सांगितलें पाहिजे.

तुमच्या अडचणी काय आहेत, तुमच्या मागण्या काय आहेत त्या मला सांगा, त्याकरितां आपण माझ्याकडे या. आपलीं गा-हाणीं मीं काळजीपूर्वक कान देऊन ऐकलीं पाहिजेत. छोटे रागद्वेष, हेवेदावे यामुळें समाजाचें सारें जीवनच विस्कळित होईल. तो मार्ग माझा नव्हे. आपल्या विकासासाठीं राज्य जे प्रयत्न करीत आहे, त्याच्या मागें आपण उभे राहा. आपण अशी साथ दिलीत तरच आपल्याला प्रगतीच्या दिशेनें जातां येईल. हें कांहीं एकदोन माणसांचें काम नाहीं. मी एकटाहि हें काम करू शकणार नाहीं. याला व्यक्तींचे नेतृत्व कमी पडतें. आणि व्यक्तिमत्त्व हवें असेल तर त्याकरितां गांधीजी, नेहरू यांच्यासारखीं असामान्य माणसें लागतात.

मी जें नेतृत्व म्हणतों त्याचा अर्थ आपण नीट समजावून घ्या. नव्या नेतृत्वाकरिता निश्चित कार्यक्रम असावा लागतो, कार्याची दृष्टि असावी लागते. आणि त्याचबरोबर समाज समतेच्या तत्त्वावर चालण्याकरितां, कार्याला वाहून घेणा-या शीलवान शूर वीरांची आवश्यकता असते. महाराष्ट्र राज्याचीं जीं स्वप्नें आहेत, त्यांच्या पूर्तीसाठीं मी आपणां सर्वांना हांक देत आहें. महाबळेश्वर शिबिरानें जनहिताचा जो कार्यक्रम स्पष्ट केला आहे त्याच मार्गानें आपणांस जावयाचें आहे. कारण जी गोष्ट जनतेची असते तीच समृद्ध होते व तीच टिकते असा माझा आग्रह आहे आणि यांतच सर्वांचे हित आहे.

आपण सर्वांनी महाराष्ट्र राज्याच्या मागें उभें राहिलें पाहिजे, त्याच्यामागें आपली शक्ति उभी केली पाहिजे. राज्य ही कांहीं कोणाच्या उपभोगाची वस्तु नाहीं. जनतेचा कार्यक्रम अंमलांत आणण्याचें तें एक प्रभावी साधन आहे. त्या दृष्टीनें त्याचा आम्ही पूर्ण उपयोग करूंच. महाराष्ट्र राज्यापुढें त्याचे असे कांहीं विशिष्ट आदर्श आहेत. म्हणून आपल्या सेवेनें आणि आपल्या प्रेमानें आपण या नव्या राज्याचें सार्थक केलें पाहिजे. आज ही एकच भावना, हा एकच आदर्श घेऊन मी आपल्यासमोर आलों आहें. कांहीं मूलभूत मूल्यें मीं आज आपल्यासमोर मांडलीं आहेत. महाराष्ट्र राज्यासंबंधींचें माझें हें स्वप्न साकार करण्याकरितां आपण मला आपलें सहकार्य द्या, हीच नागपूरच्या जनतेला माझी हांक आहे.

## माझी जीवननिष्ठा

आपल्या या सत्काराबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. हा सत्कार करून आपण माझ्या संबंधानें ज्या सद्भावना व्यक्त केल्या, त्याबद्दल आपले आभार मानण्यासाठीं मी उभा राहिलों आहें. या सगळ्या समारंभाच्या पाठीमागची आपली जी भावना आहे ती मैत्रीची भावना आहे,

जिव्हाळ्याची भावना आहे. आपली ही भावना केवळ कांहीं एका व्यक्तीसंबंधींची भावना नाहीं असें मी समजतों. माझ्यासारखा कार्यकर्ता मीं स्वीकारलेल्या जबाबदा-या जेव्हां अंगावर घेतो, तेव्हां त्या जबाबदा-या आमच्या कांहीं प्रेरणा आहेत त्या दृष्टीनें, आणि सेवक म्हणून, त्या स्वीकारीत असतो. आणि म्हणून आज या निमित्तानें आपण माझ्यासंबंधीं ज्या सद्भावना व्यक्त केल्या त्या सद्भावना त्या प्रेरणांसंबंधींच्या सद्भावना आहेत असाच मी त्याचा अर्थ मानतों. व्यक्तिपूजेचा मी विरोधी होतों आणि म्हणून गेल्या वर्षी माझे बंधुवत् स्नेही श्री. वसंतराव पाटील यांनीं सांगली येथें माझा असाच सत्कार केला त्या वेळीं या वैयक्तिक सत्कारामध्यें यापुढें मी फसूं इच्छीत नाहीं असें मी म्हणालों. परंतु शेवटीं माझ्या नागपूरच्या मित्रांच्या प्रेमामध्यें परत फसलों. असें जरी असलें तरी यासंबंधींचें माझें पूर्वीचें जाहीर केलेलें मत मी बदललेलें नाहीं. पण माझ्या मताप्रमाणें सुद्धां, मी आतां प्रेमामुळें फसून चूक करतों आहें एवढाच त्याचा खरा अर्थ आहे.

आज येथें मुर्दाबाद म्हणणारीं जीं कांहीं माणसें आहेत त्यांना आपण गडबड न करतां परवानगी द्या. कारण, अगदीं न्यायाचा तराजू हातांत धरून आज मी माझें स्वतःचे वजन करून घेणार आहें. झिंदाबादचेंहि मी वजन करणार आहें आणि मुर्दाबादचेंहि वजन करणार आहें. शेवटी जें माझ्या पदरांत राहील तेवढेंच माझें म्हणून शिल्लक राहणार आहे. लोकांनीं कांहीं हार घातले म्हणून मी फार बिघडून गेलेलों नाहीं, किंवा कोणी मुर्दाबाद म्हटल्यानें बिघडून जाणार नाहीं. मुर्दाबाद म्हणणा-यांना माझे धन्यवाद आहेत. कारण मुर्दाबाद म्हणणाराहि माझी आठवण करतो असाच त्याचा खरा अर्थ आहे. या मुर्दाबादच्या घोषणेंतून मी फार वेळा गेलों आहें. आगींतून जाण्याची मला संवय आहे. मुर्दाबाद म्हणणारे जितके जास्त मुर्दाबाद म्हणतात तितका माझा जास्त विजय होतो, असा आतांपर्यंचा माझा अनुभव आहे. पण आज मला कुणासंबंधीं राग नाहीं. तुम्ही खूप माणसें प्रेमानें जमलांत. आतां चार गोष्टी मला तुम्हांला सांगितल्या पाहिजेत.

नागपूर महापालिकेनें या पटवर्धन मैदानावर जें बहुउद्देशीय क्रीडांगण सुरू करण्याचें ठरविलें आहे त्याबद्दल मला दोन शब्द सांगितले पाहिजेत. या मैदानावर हें जें क्रीडांगण होत आहे ती खरोखरी फार चांगली अशी गोष्ट आहे. नागपूर हें एक अत्यंत महत्त्वाचे शहर असून गेलीं दीडदोनशें वर्षे राजधानी म्हणून ते वावरत आलेलें आहे. म्हणून नागपूर शहराचा अभिमान असणा-या माणसांना मला आग्रहानें सांगावयाचें आहे कीं नागपूर शहराचें जें महत्त्व आहे तें वाढावें म्हणून गेलीं चार वर्षे आम्ही ख-या अर्थानें प्रयत्न करीत आहोंत. राजधानीच्या शहराचें जें एक स्वरूप असतें तें निव्वळ कांहीं तेथें गव्हर्नर राहतो आणि मंत्रिमंडळ राहतें आणि बंगल्यांवर खेटे घालणा-या लोकांची जरा जास्त सोय होते या गोष्टींमुळे त्या शहाराला प्राप्त होतें असें आपणांस म्हणतां येणार नाहीं. राजधानीचें खरें स्वरूप हें आहे कीं तेथल्या प्रत्येक माणसाला आपण कुठल्या तरी राजधानीमध्यें राहतों आहोंत असें वाटलें पाहिजे. जेथें विद्येचीं साधनें भरपूर आहेत, खेळांचीं

साधनें भरपूर आहेत, जीवनाचीं नित्यनैमित्तिक साधनें विपुल आहेत, उत्तम रस्ते आहेत, उत्तम बागा आहेत असें तें शहर असलें पाहिजे. तेव्हां हें नागपूर शहर, एक प्रकारची 'मॉडर्न सिटी' ज्याला म्हणता येईल असें एक आधुनिक शहर बनावें अशा त-हेचा प्रयत्न आम्ही करीत आहोंत. आणि मला अभिमानानें सांगावयाचें आहे कीं नागपूर आतां नुसती राजधानी नसून महाराष्ट्राची एक राजधानीहि तें आतां बनतें आहे. म्हणून नागपूर शहराच्या वाढींत आम्हांला अत्यंत जिव्हाळ्यानें पाहावयाचें आहे. आणि म्हणून इथें होणारें हें मैदान हिंदुस्तानांतील चांगल्या मैदानांपैकीं एक व्हावें अशी माझी इच्छा आहे. मला अतिशय आनंद वाटतो कीं माझ्या हस्तें या मैदानाचें उद्‌घाटन झालें. त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतों.

माझ्या सत्कारसंबंधानें मी काय बोलूं? आतांच माझे मित्र लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं माझ्या सत्काराबद्दल चार विचार मांडले. न्यायमूर्ति नियोगींसारख्या एका वयोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध पुरुषानें आशीर्वाद दिले. आबासाहेब खेडकर आणि कन्नमवारजी हे माझे बंधु व स्नेही आहेत, वडीलधारे माझे सहकारी आहेत. त्यांनीं म्हटलें तर आशीर्वाद, म्हटलें तर एक प्रकारची शुभेच्छा व्यक्त करून अभीष्टचिंतन केलें. आपल्यापैकीं अनेकांनीं पुष्पहार दिले, अनेकांनी लेख दिले. या सर्वांचे मी मनापासून आभार मानतों. मघाशीं कुणीं तरी मुर्दाबाद म्हटलें त्यांचेहि मी आभार मानतों. या सगळ्या प्रेमानें मी भारावून गेलों आहें. काय बोलावें तें कळत नाहीं, शब्द सुचत नाहींत. गेल्या दीड-दोन वर्षांमध्ये महाराष्ट्रातील जनतेनें अगदीं पावसासारखा माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केला आहे. मला जनतेचें असें हें प्रेम मिळालें हें मी माझें भाग्य समजतों. महाराष्ट्रांचा पहिला मुख्यमंत्री होण्याचें भाग्यहि मला मिळाले. ईश्वरानें मला हें सर्व दिलें, त्याबद्दल कृतज्ञतापूर्वक मी त्याचे आभार मानतों. पण या सगळ्यामध्यें, ज्यांच्यासाठीं आपण थोडीफार चाकरी करण्याचा प्रयत्न करतों त्या जनतेचें जें प्रेम आहे तीच माझी सर्वांत मोठी शक्ति आहे. ही शक्ति दुस-या कोठल्याहि गोष्टीनें मिळत नाहीं. या आपल्या प्रेमाच्या वर्षावानें माझें मन संपूर्ण तृप्त आहे. व्यक्ति म्हणून मला मागण्यासारखें कांहीं राहिलेलें नाहीं.

पण हे सर्व झाल्यानंतर मला एक विचार आपणांला सांगावयाचा आहे आणि तो विचार व्यक्तिपूजेचा नाहीं. कारण माझ्या जीवनाकडे थोड्याशा ति-हाईत दृष्टीनें पाहण्याचा जेव्हां मी प्रयत्न करतों तेव्हां माझ्या मनांत एक विचार चमकून जातो. तो विचार असा कीं एखाद्‌या कालखंडामध्यें अशी कांहीं जबरदस्त शक्ति निर्माण होते कीं त्या शक्तीमुळें कांहीं कांहीं माणसांना मोठेपण मिळून जातें. तशीच गोष्ट माझ्या बाबतींत घडली. हिंदुस्तानच्या इतिहासांत, हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा म्हणून एक नवा खंड निर्माण झाला. आमच्या देशांतील नेत्यांच्या कर्तृत्वानें आणि पुण्याईनें, टिळक-गांधींच्या युगांत या देशामध्यें अशी एक परिस्थिति निर्माण झाली, असें एक वातावरण निर्माण झालें कीं त्या वातावरणामध्यें जो जो पुढें गेला तो तो या

महाभागांच्या आशीर्वादानें आणि पुण्याईनें मोठा झाला. माझ्यासारखा एक मनुष्य; देश म्हणजे काय, सरकार म्हणजे काय तें कळत नव्हतें अशा वयांत, मनाच्या उमेदीनें मी राष्ट्रीय झेंडा राष्ट्रीय तिरंगा -खांद्यावर घेतला आणि खेड्यांतलें हें एक मूल या चळवळीमध्यें स्वांतत्र्याच्या या यात्रेमध्यें सामील झाले. आणि त्यांत सामील झाल्यामुळेंच मी आज या परिस्थितीला पोहोंचलों अशी माझी भावना आहे. कारण, ती चळवळ म्हणजे त्या युगाची प्रेरणा होती. एक प्रकारच्या जनस्वातंत्र्याची आणि एक प्रकारच्या जनकल्याणाची ती प्रेरणा होती. एक प्रकारच्या समतेची आणि एक प्रकारच्या लोकांच्या सामर्थ्याची ती प्रेरणा होती. त्या प्रेरणेशीं मी समरस झालों, एकरूप झालों. आणि आजहि त्या प्रेरणेंचेंच मी प्रतिनिधित्व करतों आहें. तेव्हां आम्हांला कशाचें स्वागत करायचें असेल, कशाचें अभीष्टचिंतन करायचें असेल तर तें या प्रेरणेचें केलें पाहिजे. ती प्रेरणा गांधीजी गेले पण थांबली नाहीं; ती वाढतच गेली. त्या प्रेरणेनें आमचीं मनें जागृत झालीं व त्या प्रेरणेंतूनच आम्हांला आमचें स्वातंत्र्य मिळालें. तेव्हां ही जी प्रेरणा आमच्या जीवनामध्यें निर्माण झाली आहे, त्या प्रेरणेंतून एक नवी शक्ति वाढीस लावून एका आर्थिक व सामाजिक समतेची आपणांस स्थापना करावयाची आहे. इतिहासानें आपणांवर टाकलेली ही जबाबदारी असून इतिहासाच्या सामर्थ्यांतून ती निर्माण झाली आहे. इतिहासाचें हें जें सामर्थ्य आहे तें समजावून घेऊन प्रामाणिकपणानें आणि बुद्धीच्या व भावनेच्या निष्ठेनें त्या सामर्थ्याशी आपण एकरूप झालें पाहिजे. हेंच काम आज आपल्या देशामध्यें चाललें आहे.

परंतु आज सबंध दुनियेमध्ये मनाचा थरकांप उडावा अशी परिस्थिति आहे. प्रामाणिकपणानें कष्ट करून शांततेनें विकास करूं इच्छिणा-या मानवतेला भीति वाटावी अशी ही परिस्थिति आहे. परंतु मानवता हें आज एक सामर्थ्य आहे, ती एक दृष्टि आहे. ही दृष्टि दुनियेमध्यें कशी यशस्वी होईल, कशी आरोग्यशाली बनेल, कशी सामर्थ्यशाली बनेल, ती कशी पुढें पुढें जात राहील याचा विचार आज आपण सर्वांनी करावयास पाहिजे. मग तुम्ही महाराष्ट्रांत असा किंवा गुजराथमध्यें असा; लाओसमध्यें असा किंवा अमेरिकेमध्यें असा; किंवा तिकडे रशियामध्यें कुठें असा. आज हा मानवजातीचा खरा प्रश्न आहे. तुमचा माझा कोणताहि पक्ष असूं द्या; तुमची माझी कोणतीहि भाषा असूं द्या; आज हा मूळ विचार मनामध्यें ठेवून त्या मूळ विचाराशीं आमचें वागणें, आमचे बोलणे व आमचें आचरण सुसंगत आहे कीं नाहीं याचा विचार करूनच आम्हांला आमचीं पावलें टाकलीं पाहिजेत. ही महत्त्वाची गोष्ट आमच्या देशामध्यें, आमच्या कामामध्यें आम्हांला पाहिली पाहिजे.

मी या प्रेरणेचा सेवक आहें. ही प्रेरणा पार पाडण्यासाठीं तुमचें माझें जे कार्यक्षेत्र आहे त्या कार्यक्षेत्रांत आपल्यावर कोणत्या जबाबदा-या येतात याचा आपण विचार करूं या. माझ्या कल्पनेप्रमाणें या प्रेरणेंतून येणारी आमच्या देशाची पहिली जबाबदारी आज ही आहे कीं आम्हांला

आमचा देश एक ठेवतां आला पाहिजे. फुटीर वृत्ति हें आज या देशावर येऊं पाहणारें महान संकट आहे, पहिलें महान संकट आहे. बाहेरची संकटें तर आहेतच. कुठें उत्तरेला कुणाच्या मनांत पाप आहे, तर कुठें शेजा-यापाजा-यांच्या मनांत पाप आहे. पण या पापांची मला भीति वाटत नाहीं. जोंपर्यंत आमच्या मनगटामध्यें आणि आमच्या मनामध्यें सामर्थ्य आहे, तोपर्यंत इतरांच्या पापांची मला भीति वाटत नाहीं. तुमचें माझें मन जर एकजिनसी झालें असेल, तुमच्या माझ्या मनामध्यें जर कांहीं सद्भावना असतील, तुमचें माझें मनगट जर एका सामर्थ्यानें बांधलें गेलें असेल तर मग आपल्याला कशाचीहि भीति नाहीं. पण आज छोट्या छोट्या घोषणांनीं छोट्या छोट्या आग्रहाला बळी पडून, मोठीं मोठीं माणसें चुकीच्या मार्गानें जातात कीं काय याची चिंता वाटावयास लागते. येथल्या स्थानिक परिस्थितीला उद्देशून मी हें बोलत नाहीं. येथील स्थानिक परिस्थिति हा एक त्यांतला अगदीं छोटा, दुर्लक्ष करण्यासारखा भाग आहे. थोडीशी गडबड आज नागपूर शहरामध्यें कांहीं लोकांनी करण्याचा प्रयत्न केला तर त्याबद्दल मी चिंता करीत नाहीं. परंतु आज आमच्या देशामध्यें निराळे प्रश्न निर्माण झाले आहेत. आज देशामध्यें वेगवेगळया त-हेचे वाद वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. भाषांचे आग्रह, प्रदेशांचे आग्रह, जमातीजमातींचे आग्रह, हिंदु-मुसलमानांत वाद वाढविण्याच्या त-हा, या सर्व प्रकारांनी जी एक परिस्थिति निर्माण होत आहे, तिच्यांतून हा देश एकजिनसी कसा राहील यासाठीं प्रयत्न करणें हें तुमचें आमचें पहिलें काम आहे. अलिकडेच मीं एका लेखकाचें पुस्तक वाचलें. त्यांत त्यानें सांगितलेली एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. ती गोष्ट अशी कीं, स्वांतत्र्यप्राप्तीनंतरची पहिलीं दहा-बारा वर्षे आम्ही आमच्या देशाची बांधणी करण्याच्या कामामध्यें होतों; त्यामध्यें आम्हांला थोडेंफार यश येत गेलें; पण आतां आमच्या देशांतील यापुढचीं दहा-पंधरा वर्षे हीं अत्यंत कठीण अशीं वर्षे आहेत. त्याचबरोबर कांहीं व्यक्तींच्या मनामध्येंहि महत्त्वाकांक्षा निर्माण झाल्या आहेत. त्यांना असें वाटतें कीं आपणांला जातीचें वजन वापरतां येईल, भाषेचें वजन वापरतां येईल, आणि सत्तेचं गाठोडें पाठीशीं मारतां येईल. या सगळ्यांतून ह्या देशाला आपण वांचविलें पाहिजे, आणि त्याला एकत्र ठेवून प्रगतीच्या दिशेकडे नेण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. असा हा कठीण काळ देशाच्या पुढें उभा आहे. आणि या कठीण काळामध्यें या देशाची जिम्मेदारी पाहण्याचें काम तुम्हां आम्हां सर्वांच्यावर आहे. तुमच्या आमच्या जिम्मेदा-या आतां तुम्हीं आम्हीं ओळखल्या पाहिजेत. हें सर्व पाहावयाचा प्रयत्न करणें हीच आपली पहिली जबाबदारी आहे.

आणि हें करीत असतांना आम्हांला आमच्या देशामध्यें लोकशाही दृढमूल करावयाची आहे. ही आमची दुसरी महत्त्वाची जबाबदारी आहे. मी हिंदुस्तानच्या आवतीभोवतीं पाहावयाचा प्रयत्न करतों, तेव्हां मला असा एकहि देश दिसत नाहीं कीं ज्यामध्यें सत्ता मुळींच गडगडलेली नाहीं. खालीं सिलोनपासून, ब्रह्मदेशापासून मजल मारीत मारीत तुम्ही ईजिप्तपर्यंत जा. प्रत्येक देशामध्यें गेल्या दहा-बारा वर्षांत दोन दोन क्रांत्या होऊन गेल्याचें तुम्हांला आढळून येईल. आठ

दिवस, पंधरा दिवस, महिना, दोन महिने असे पंतप्रधान राहिले आहेत. कांहीं तर वा-यावर उडालेल्या पतंगासारखे कुठल्या कुठें वाहत गेले आहेत. कॉमनवेल्थचा मी गेल्या बारा-पंधरा वर्षांचा इतिहास पाहिला. पण या सर्वांत एकच पंतप्रधान कायम आहे आणि तो म्हणजे हिंदुस्तानचे पंडित जवाहरलाल. हिंदुस्तानची नीति, हिंदुस्तानचा आवाज, हिंदुस्तानची भाषा यासाठीं स्थान निर्माण व्हावें म्हणून गेली पंधरा वर्षें त्यांनी सतत काम केलें आहे. आणि हें काम एकमुखानें आणि तें सुद्धां लोकशाहीच्या मुखानें चालविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. याचा तुम्हांला आम्हांला अभिमान वाटला पाहिजे; आणि हेंच काम आमच्या देशामध्यें कायम करण्याचा आम्हीं प्रयत्न केला पाहिजे. दुनियेमध्यें, निदान या आशिया खंडातल्या देशांमध्यें, लोकशाहीची ही जी हवा वाढते आहे ती तशीच वाढत राहावी म्हणून आम्हीं प्रयत्न केला पाहिजे. तसें करतांना सामान्य माणसाच्या हातून कदाचित् चुका होतील. पण त्या चुका सांभाळून घेऊन त्या चुकांतून नवी शक्ति निर्माण करण्याचें लोकशाहीचें जें सामर्थ्य आमच्या हातांत आलें आहे, त्या सामर्थ्यांची वाढ करण्याचा आम्हीं प्रयत्न केला पाहिजे. या लोकशाहीचें आणि तिच्याबरोबर येणा-या लोकशाही मूल्यांचें आम्हांला आमच्या देशामध्यें रक्षण करावयाचें आहे. पण लोकशाहींत जागृत झालेल्या माणसाला त्याचें सामाजिक स्थान आणि त्याचें आर्थिक उत्थान करण्याची संधि आम्हीं दिली नाहीं तर ती लोकशाही आपणांस सांभाळतां येणार नाहीं. म्हणून लोकशाहीच्या या विचाराची आणि त्याच्या हाताशीं हात धरून चालणा-या समाजवादाच्या विचाराची चिंता या देशामध्यें तुम्हीं-आम्हीं आज वाहिली पाहिजे. त्यामुळेंच या देशांतील जनतेचें अखेर कल्याण साधणार आहे.

आज आपण माझें हें जे अभीष्टचिंतन करीत आहांत त्याचा अर्थ देशाच्या एकतेच्या आणि देशांतील लोकशाही व समाजवादी विचारांच्या अभीष्टचिंतनाची जिम्मेदारी आपण स्वीकारीत आहांत असें मी मानतों. कारण त्या विचारांचा मी पुजारी आहें. हीच माझी भूमिका आतांच्या महाराष्ट्रांतील राजकारणासंबंधीची आहे, आणि देशांतील राजकारणासंबंधींचीहि आहे. आपल्या या सगळ्या आशीवार्दांची मला जी शक्ति मिळेल, मला जें सामर्थ्य मिळेल, ती सारी शक्ति आणि तें सारें सामर्थ्य या तीन शक्तींच्या पुजेसाठीं मी वापरीन. कारण या तिन्ही शक्तींची पूजा शेवटीं मानवतेच्या सेवेसाठीं करावयाची आहे अशी माझी विचारपरंपरा आहे. मी गांधीजींच्याकडून जें कांही शिकलों, महाराष्ट्रांतल्या संतांच्याकडून आणि शिवाजीपासून ते लोकमान्य टिळकांपर्यंत निर्माण झालेल्या अनेक परंपरांतून मी जें कांही शिकलों, मानवेंद्रनाथ रॉय यांच्यासारख्या बुद्धिमान विचारवंताच्या विचारांशी संबंध आल्यामुळें थोडेंफार शिकण्याचा मीं जो प्रयत्न केला आणि इतिहासाचा विद्यार्थी म्हणून इतिहासाचा मला जो अर्थ समजला, त्या सर्वांतून माझी ही निष्ठा मानवतेच्या कल्याणाची आहे. आणि म्हणून ती मी कधीं हलूं देणार नाहीं. तुम्ही आम्ही सगळे महाराष्ट्रांत जोंपर्यंत काम करीत आहोंत, तोंपर्यंत मला हें सर्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या ज्या सगळ्या प्रेरणा आहेत, ही जी सगळीं सामर्थ्यें व ध्येयें आहेत त्यांची पूजा

करण्याचें तत्त्व आम्हीं अंगिकारलें आहे. म्हणून महाराष्ट्रांत आपण अशी परिस्थिति निर्माण केली पाहिजे कीं त्यायोगें या तत्त्वांची आणि या प्रेरणांची एक जबरदस्त शक्ति आपण महाराष्ट्रामध्यें निर्माण करूं शकूं. ही गोष्ट जर आम्ही करूं शकलों तर आम्हांला हिंदुस्तानची सेवा बरोबर, चांगल्या त-हेनें करतां येईल. आणि हिंदुस्तानहि मानवतेच्या सेवेचें हें काम अधिक बलिष्ठ भावनेनें करूं शकेल. मी या तत्त्वाचा उपासक म्हणून हें काम करतों आहें. थोडेंफार यश सुदैवानें मिळालें असलें तरी या यशानें आपण भाळून जातां कामा नये. कारण, पुष्कळ वेळां अपयशहि पदरांत येतें. पण त्या अपयशाच्या वेळींहि आपण मन ढळूं देतां कामा नये. आपल्या आशीर्वादानें मला जी शक्ति मिळेल त्या शक्तीचा वापर मी जनसेवेसाठींच करीन, असें परत एकदां मी आपणांला माझ्यातर्फे वचन देतों.

या नागपूर शहराचें वातावरण बदलण्याच्या बाबतींत मला आज आपल्याशीं बोललें पाहिजे. कारण "मला त्याचें काय ?", "काय होईल तें बघत राहावें", या भावनेच्या बाहेर आपणांला एकदां केव्हां तरी आलें पाहिजे. आज येथें जी दंगलशाहीची वृत्ति दिसते तिच्यासंबंधीं मी आपणांला सांगूं इच्छितों कीं, ही वृत्ति वाढल्यानंतर अशी एक परिस्थिति निर्माण होते कीं, दंगलशाही नको म्हणणा-या माणसांना देखील ती आवरतां येत नाहीं. म्हणून ही वृत्ति थांबविली पाहिजे, कुणीं तरी ती थांबविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण येथें एक मोठें उच्च स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहांत, पण या त-हेच्या गोष्टी वाढल्यानें आपणांस तें निर्माण करतां येणार नाहीं. टिळक लढले, गांधीजी लढले आणि जवाहरलालजी आज झगडून राहिले आहेत ते सर्व यासाठींच का लढले आणि झगडले? आपले आग्रह असतील, आपली मतें असतील, तर ती मांडण्याचा आपण जरूर प्रयत्न करा. पण सार्वजनिक जीवनाची कांहीं पातळी राखण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. माझ्यावर टीका झाली म्हणून मी हें सांगत नाहीं. गोष्ट ही आहे कीं महत्त्वाच्या मूल्यांची आपण जपणूक करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण ज्यांना सांगावयाचें त्यांना सांगून मी कंटाळलों. त्यांना सांगण्याचा कांहीं उपयोग नाहीं. मी आतां अगदीं सामान्य माणसांना सांगणार आहें कीं या त-हेची वृत्ति जर आपण वाढूं दिलीत तर सभ्यपणानें तुमच्या मोहल्ल्यामध्यें राहणें, जगणें तुम्हांला अशक्य होणार आहे. आपण केव्हां तरी बाहेर येऊन या गोष्टीचा निषेध करण्याची प्रवृत्ति निर्माण केली पाहिजे. आपल्या मोहल्ल्यामध्यें आपणांला एखाद्या तत्त्वाची घोषणा करावयाची असेल तर आपण जरूर ती घोषणा करा. पण व्यक्तिगत निंदा आणि खोटा व घाणेरडा प्रचार यासारखे दंगलशाहीचे जे प्रकार येथें चालू आहेत त्यांनीं विदर्भ मिळणार नाहीं, ही गोष्ट मला साफ सांगितली पाहिजे. या त-हेच्या दबावांनी, या त-हेच्या भाषणांनीं या गोष्टी घडवितां येणार नाहींत. आपण जरूर लोकांचें मतपरिवर्तन करा, महाराष्ट्राचें मन वळवा, हिंदुस्तानचें मन वळवा आणि हिंदुस्तानच्या नकाशाचें आणखी पन्नास तुकडे आपणांला करावयाचे असतील तर ते करा. पण ज्या त-हेची दंगलशाही या नागपूर शहरामध्यें

चालू आहे ती चालूं देण्याकरितां महाराष्ट्राचे गृहमंत्रीपद मीं स्वीकारलें नाहीं, हें मला सांगितलें पाहिजे. केव्हां तरी या गोष्टीची दखल घ्यावीच लागेल. पण त्यामध्यें मला जनतेचें सहकार्य पाहिजे. केव्हां तरी लोक म्हणतील कीं हें सर्व एकदां बंद केलें पाहिजे. पण ज्यांना ज्यांना महत्त्वाच्या मूल्यांची आठवण आहे त्यांनीं असें म्हणतां कामा नये कीं, हे सर्व बाकीच्या लोकांनीं केलें आहे. अशा त-हेच्या मुत्सद्देगिरीनें राज्यकारभार चालवितां येणार नाहीं. असेल त्या त्या गोष्टीची जिम्मेदारी घेतली पाहिजे, जनतेचें पुढारीपण करावयाचें असेल तर जनतेच्या चुकांची जबाबदारी घेतली पाहिजे आणि चुकांतून तिला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण इथें जी निंदा चाललेली आहे, इथें जी सभ्यतेची कोणतीच मर्यादा पाळली जात नाहीं, हें सर्व पाहिल्यावर अशा त-हेच्या प्रकारांतून जर नवी राज्यें निर्माण होणार असतील तर हिंदुस्तान पांच मिनिटें देखील टिकणार नाहीं ही गोष्ट मला आपणांला सांगितली पाहिजे. अशा त-हेच्या गोष्टी फार काळ चालणार नाहींत, असें या गोष्टी करणा-यांना मला साफ सांगितले पाहिजे. कुणाच्या कानांत कांहींतरी बोलून व दूषित वातावरण निर्माण करून राजकारण करण्याचे दिवस आतां संपलेले आहेत. बोलायचें असेल तर मैदानांत येऊन बोललें पाहिजे. मी मैदानांत तुम्हांला सांगतों आहें कीं महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची जी जिम्मेदारी मीं घेतली आहे ती महाराष्ट्र राज्य फोडण्याकरितां नसून महाराष्ट्र राज्य चालविण्याकरितां आणि टिकविण्याकरितां घेतली आहे. जनतेचा प्रतिनिधि म्हणून आत्मविश्वासानें मी हें बोलतों आहें. गंगेच्या ओघासारखें मराठी जनतेचें जीवन आतां एक झालेलें असून तो गंगेचा ओघ बंद पाडण्याची शक्ति आज कुणांतहि नाहीं. कारण तें जनतेचें जीवन आहे. कुणाच्या मेहेरबानीनें, कुणा चार व्यापा-यांच्या कृतीनें किंवा कुणाची तरी लहर आली म्हणून चाललेलें असें हे जीवन नाहीं. येथें कांही तरी नवीन सामर्थ्य निर्माण करण्याकरितां तें प्रयत्नशील आहे. हा गंगेचा ओघ, हें गंगेचें जीवन, पुढें पुढें जाईल. तें बंद करण्याची शक्ति अशा अपवित्र गोष्टींनीं निर्माण होऊं शकणार नाहीं. ज्यांची विरोधाची भावना असेल त्यांनीं जरूर विरोध करावा. पण मला लोकशाहीचीं मूल्यें सांभाळावयाचीं आहेत, आणि ती सांभाळलीं जावींत म्हणून या गोष्टी आपल्यापुढें मांडण्याकरतां आज मी येथें आलों आहें. छोट्या छोट्या गटबाजीला घाबरून किंवा निवडणुकीमध्यें काय घडणार आहे हें पाहून काम करणारा मी माणूस नाहीं. माझा मार्ग स्पष्ट आहे. मराठी भाषेचें राज्य यशस्वी करण्यासाठीं, मराठी माणसाच्या मनांत जो ज्ञानेश्वर आहे, जो रामदास आहे, जो तुकाराम आहे, आणि त्याच्या मनांत जी मराठी माउली आहे त्या सर्वांना जागें करण्याचा, माझ्या शरिरांत रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी प्रयत्न करीन. कुणाच्या हातांतला तराजू आणि कुणाची तिजोरी माझ्या या कामाच्या आड येईल अशी भीति बाळगून मी हें काम करीत नाहीं. हें सर्व करण्यामध्यें मला मराठ्यांचें राज्य निर्माण करावयाचें आहे असें चोरटें बोललें जातें. पण पुन्हा एकदां या नागपूरच्या भूमीवरून मी सांगतों कीं ज्या दिवशीं एका जमातीचें, निव्वळ एका गटाचें राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न झाला असें सिद्ध होईल, त्या दिवशीं महाराष्ट्रांतल्या जनतेसमोर स्वतःची जाहीर

चौकशी करून जनता देईल ती शिक्षा मी पत्करीन. हें व्रत घेऊनच मीं या राज्याची जिम्मेदारी पत्करली आहे.

आपण मला येथें बोलाविलें आणि माझा सत्कार केला, माझें अभीष्टचिंतन केलें. आजच्या घटकेला, १९६१ च्या मार्च महिन्यामध्यें, जेव्हां तुम्ही माझा हा सत्कार करीत आहांत तेव्हां नवीन महाराष्ट्राचें जें राज्य चाललें आहे तें राज्य यशस्वी करण्याची जिम्मेदारी आपण घेतली आहे असाच त्याचा मी अर्थ करतों. ज्यांनीं ज्यांनीं या सत्काराला पाठिंबा दिला त्यांची ही जिम्मेदारी आहे. एका जिवाचीं, एका मनाचीं पन्नास माणसेंहि दुनियेचा इतिहास बदलूं शकतात, असा इतिहासाचा अर्थ माझ्या ध्यानामध्यें राहिलेला आहे. आणि म्हणून इतिहासानें आपल्यावर टाकलेली ही जिम्मेदारी आपण स्वीकारलेली आहे, हें स्पष्ट करण्याकरितां या गोष्टी आपल्यापुढे मांडण्याचा मीं प्रयत्न केला. मी साफ बोललों तें कुणाबद्दलच्या रागानें बोललों नाहीं. मला माझ्या सगळ्या मित्रांचा विश्वास आहे म्हणून मी बोललों. हे माझे सगळे मित्र माझे साथी आहेत. विदर्भांतले माझे मित्र कन्नमवारजी व आबासाहेब खेडकर माझे साथी आहेत आणि मराठवाड्यांतले श्री. भगवंतराव गाढे माझे साथी आहेत. त्याचप्रमाणें येथें माझे अनेक मित्र व साथी आहेत. मीं गेल्या चारपांच वर्षांत जर कांहीं मिळविलें असेल तर तें हें कीं मीं अनेक मित्र मिळवले. माझें मुख्यमंत्रीपद जाईल, पण माझी मैत्री जाणार नाहीं. भावासारखें प्रेम करणारे माझी साथी शेषराव वानखेडे आहेत, वसंतराव नाईक आहेत, काझी आहेत. किती नांवें सांगूं? माझें मंत्रिमंडळ माझें मित्रमंडळ आहे अशा पद्धतीनें वागण्याचा मी प्रयत्न करतों आहें. माझे छोटे छोटे तरुण कार्यकर्ते त्यामध्यें आहेत. एकेकाळीं प्रत्येकाचा वेगवेगळा आग्रह होता. परंतु आज आम्हीं सगळ्यांनी एकमुखानें ठरविलें आहे कीं, आमची ही सर्व शक्ति मराठी जीवन संपन्न करण्याच्या कामीं आम्ही लावूं. कन्नमवारजींनीं बंधूसारखें माझ्यावर प्रेम केलें आहे. त्यांच्या आग्रहामुळें खरें म्हणजे मी या नागपूरच्या समारंभाला आलों. माझ्यापेक्षां वयानें ते मोठे आहेत. माझा हा अठ्ठेचाळिसावा वाढदिवस. पण कन्नमवारजींनीं साठ वर्षे केव्हां संपविलीं त्याचा मला पत्ता लागूं दिला नाहीं. आणि माझा अठ्ठेचाळिसावा वाढदिवस मात्र ते समारंभानें साजरा करतात. तेव्हां मीं त्यांना म्हटलें, "भैय्या, अन्याय चालला आहे माझ्यावर हा !" पण त्यांचे जें प्रेम आहे, त्या प्रेमाचाच मी फार भुकेला आहें. एक वेळ प्रामाणिकपणानें त्यांना वाटलें कीं विदर्भाकरितां खटपट करावी, पण आज त्यांना प्रामाणिकपणानें असें वाटतें कीं महाराष्ट्राचें राज्य चाललें पाहिजे. ती भूमिका घेऊन ते कामाला लागले आहेत. सामान्य माणसांतून जनतेची सेवा करीत आज ते सत्तेच्या पदापर्यंत पोहोंचले आहेत. ते कमी बोलतात, पण त्याचा गैरफायदा घेण्याचा कांहीं माणसांनी जर प्रयत्न केला तर तें गैर ठरेल. आपल्या या प्रेमाबद्दल आणि मैत्रीबद्दल मी आपल्या सर्वांचे आभार मानतों. माझे मित्र श्री. गांवडे यांचेहि मला आभार मानले पाहिजेत. त्यांनीं प्रत्येक गोष्टीमध्यें आग्रह धरून मला या समारंभाच्या संकटांत टाकलें. शेवटीं महाराष्ट्राचें बरें करावयाचें,

जनतेचें बरें करावयाचें, भारताचें बरें करावयाचें हा एकच विचार आपल्या मनाशीं ठेवून प्रगतीची वाटचाल आपण चालू ठेवली पाहिजे.

जनतेच्या या एवढ्या मोठ्या प्रेमाच्या प्रसंगीं दूर गांवीं असणा-या माझ्या म्हाता-या आईची आज मला आठवण येते. आपल्या या सगळ्या प्रेमाला पोंचविण्याचें श्रेय माझ्या त्या अशिक्षित आईला आहे. आज दुनियेमध्यें काय चाललें आहें ह्याचें तिला फारसें ज्ञान नाहीं. मी तिचा धाकटा मुलगा आज मुख्यमंत्री आहें; पण मुख्यमंत्री म्हणजे काय हें आजहि तिला माहीत नाहीं. त्या माझ्या म्हाता-या आईची आज मला आठवण येत आहे. तिची पुण्याई, तिचा साधेपणा, तिचें प्रेम, तिनें शिकवलेले लहानपणचे चारदोन छोटे छोटे गुण हेच माझ्या जीवनामध्यें मला उपयोगी पडले आहेत. तिला नमस्कार करतों आणि माझें भाषण पुरें करतों.

## लोकशाही राज्यकारभाराची कसोटी

विदर्भ विभागांतील जिल्हाधिका-यांची परिषद भरविण्याचें मीं जेव्हां ठरविलें तेव्हां माझ्या मनांत एकदोन महत्त्वाचे विचार होते. त्यांतील एक विचार असा होता कीं, जे नवे विभाग मुंबई राज्यांत आले आहेत त्या विभागांत काम करणा-या अधिका-यांना मला एकत्र भेटतां यावें व त्यांची ओळख व्हावी. अधिकारी कसे आहेत हें मुख्यमंत्र्यांना व मुख्यमंत्री कसे आहेत हें अधिका-यांना पाहावयास मिळावें हा यामागील हेतु होता. ही उभयान्वयी परीक्षाच म्हणतां येईल. पण अशा परीक्षेची आवश्यकता आहे. तुम्हीं आणि मीं आतां जें काम सुरू केलें आहे, तें तुमचें आणि माझें सर्वांचेंच काम आहे. एका राज्याचा प्रमुख म्हणून मला जी जबाबदारी पार पाडावयाची आहे, ती मी एकटाच पार पाडूं शकणार नाहीं हें उघड आहे. हें काम करण्यासाठीं आपण जी यंत्रणा उभारली आहे, त्या यंत्रणेंतील अगदीं शेवटच्या इसमापासून तों या यंत्रणेंतील प्रमुख जागांवर असलेल्या व्यक्तींपर्यंत सर्वांच्या सहकार्यावर आणि परस्परांच्या विचारांच्या व भावनांच्या देवाणघेवाणीवर विसंबून, हें काम पार पाडावयाचें आहे. त्यासाठीं अशा प्रकारचा वैयक्तिक संबंध प्रस्थापित होण्याची आवश्यकता असल्यामुळें ही परिषद घेण्याची कल्पना माझ्या मनांत आली.

त्याचबरोबर दुसरीहि एक गोष्ट मला सांगावयाची आहे. राज्यकारभार करीत असतांना प्रश्न जसजसे उद्भवतील तसतसे ते सोडवीत जावयाचे याला कांहीं योजनाबद्ध राज्यकारभार म्हणतां येणार नाहीं. तर त्यासाठीं विचारपूर्वक अशा कांहीं पद्धति, कांहीं तत्त्वें निश्चित करून त्याप्रमाणें जर आम्ही काम करीत गेलों, तर त्याला योजनाबद्ध राज्यकारभाराचें स्वरूप प्राप्त होईल. या दृष्टीनें राज्यकारभाराच्या बाबतींत आपल्या कांहीं मूलभूत कल्पना असतील तर त्या आपण एकदां

स्पष्टपणे सांगितल्या पाहिजेत. या साध्या गोष्टी आहेत, पण त्यांची एकदां उजळणी करण्याची आवश्यकता आहे. ही परिषद बोलावण्यांत हाहि माझा एक हेतु आहे.

प्रथम मला हें सांगावयाचें आहे कीं नव्या विभागांचें व त्यांतील जनतेचें मी ज्याप्रमाणें स्वागत करतों आहें, त्याचप्रमाणें व तितक्याच आपलेपणानें मी नव्या विभागांतून आलेल्या सर्व अधिका-यांचेंहि स्वागत करीत आहें. जे येथे हजर आहेत, त्याचप्रमाणें जे येथें हजर नाहींत, असे जिल्ह्यांतील सर्व अधिकारी व अगदीं शेवटच्या पायरीपर्यंतचे सर्व नोकर, यांचें राज्याचा प्रमुख या नात्यानें, या नव्या जबाबदारीच्या कामामध्यें मी स्वागत करीत आहें.

नव्या राज्याचा कारभार हा कांहीं अंशीं गुंतागुंतीचा कारभार आहे. परंतु गुंतागुंतीचें आणि अवघड काम करण्याकरतांच शहाण्या व कर्तृत्ववान माणसांची जरुरी असते. काम साधें असेल, अगदी सहजासहजीं होण्यासारखें असेल, तर त्यासाठी कर्तृत्ववान माणसांची फारशी आवश्यकता नसते. कर्तृत्वाची खरी परीक्षा अवघड कामामध्येंच होत असते. तेव्हां एका महान् स्वरूपाच्या, नवीन पण अवघड अशा कामामध्यें आपणां सर्वांच्या कर्तृत्वाची परीक्षा होणार आहे, ही गोष्ट आपण सतत ध्यानांत ठेवली पाहिजे.

भारतामध्यें लोकशाहीचें राज्य येऊन दहा वर्षे झालीं. पण अजूनहि आपला राज्यकारभार ज्या आदर्श पद्धतीचा असावयास पाहिजे त्या पद्धतीचा किंवा त्या पद्धतींतील ज्या पातळीपर्यंत जाऊन पोहोंचावयास हवा त्या पातळीपर्यंत पोहोंचलेला नाहीं ही गोष्ट उघड आहे. आदर्श अशा पातळीवर राज्यकारभार नेण्याचें काम, ज्यांना सार्वजनिक सेवक म्हणतां येईल अशांनी करावयाचें आहे. सार्वजनिक सेवकांचे आम्ही जुन्या मुंबई राज्यांत दोन प्रकार मानीत होतों. अर्थात् ही कल्पना फक्त जुन्या मुंबई राज्यापुरतीच मर्यादित होती असें नाहीं, तर सबंध भारताच्या बाबतींतहि सार्वजनिक सेवकांचे हे दोन प्रकार करावे लागतील. प्रत्यक्ष सरकारी यंत्रणेमध्यें राहून काम करणारे आणि सरकारी यंत्रणेच्या बाहेर राहून काम करणारे असे हे सार्वजनिक सेवकांचे दोन प्रकार आहेत. सरकारी यंत्रणेमध्यें राहून काम करणारा सेवक त्या कामासंबंधीं एका विशिष्ट त-हेचें शिक्षण घेऊन काम करीत असतो. त्याला एक प्रकारची शिस्त घालून दिलेली असते आणि त्याच्यावर निश्चित अशी जबाबदारी टाकलेली असते. त्यासाठीं त्याला वेतन मिळत असतें. परंतु सरकारी यंत्रणेबाहेर काम करणारा सेवक सेवेची जबाबदारी आपल्या विचारानें पत्करीत असतो. तो वेतनानें बांधलेला नसतो, तर तो आपल्या विचारानें बांधलेला असतो. सार्वजनिक सेवकांच्या या दोन प्रकारांतील हा महत्त्वाचा फरक आहे. परंतु हा फरक असला तरी, शेवटीं दोघांच्या कामामध्यें एक साधर्म्य आहे. तें म्हणजे दोघांनाहि शेवटीं जनतेचीच सेवा करावयाची असते.

राज्यकारभार चांगला चालला आहे कीं नाहीं याची खरी कसोटी वरच्या अधिका-यानें तुमच्या कॉन्फिडेन्शियल शीटवर काय लिहिलें आहे ही नाहीं, किंवा बदली झाल्यानंतर लोकांनी सत्कार करून हार घातले, हीहि नाहीं. माझ्या मतें लोकांचें समाधान हीच चांगल्या राज्यकारभाराची खरी कसोटी आहे. कांहीं मंडळी असें म्हणतील कीं, "असें म्हणून कसें चालेल ? मी माझ्या सद्सद्विवेकबुद्धीची साक्ष ठेवून सांगतों कीं मी माझें काम चांगल्या रीतीनें करीत आहें." एवढें झालें म्हणजे आपलें काम पुरें झालें, असें समजण्याची प्रवृत्ति मला अधिका-यांमध्यें आढळून येते. पण ही प्रवृत्ति योग्य नाहीं असें मला वाटतें.

लोकशाही राज्यकारभारामध्यें, मी चांगलें काम करतों, लोकांच्या उपयोगाचें काम करतों एवढी कसोटी अपुरी आहे. काम चांगलें तर केलेंच पाहिजे, पण काम चांगल्या प्रकारें झालें आहे याची लोकांना प्रचीति आली पाहिजे, लोकांना तें जाणवलें पाहिजे. म्हणूनच मी म्हणतों कीं राज्यकारभाराची खरी कसोटी, लोकांच्या समाधानांत आहे. सरकार चांगलें असून उपयोग नाहीं, तर सरकार चांगलें आहे, राज्यकारभार चांगला चालला आहे असें लोकांना वाटलें पाहिजें, जाणवलें पाहिजे. तरच तो सरकारी कारभार चांगला म्हणतां येईल. ही मूळ कसोटी आम्हीं आमच्या मनाशीं ठरविली आहे. आणि याच दृष्टीनें राज्यकारभार यशस्वी झाला कीं नाहीं, राज्याच्या अधिका-यांचें काम चांगलें झालें कीं नाहीं, याची कसोटी लागणार आहे. मला आणि तुम्हांला काय वाटतें, यापेक्षां सर्वसामान्य लोकांना राज्यकारभारासंबंधीं काय वाटतें, लोकांना त्यापासून कितपत समाधान मिळतें, ही खरी कसोटी आहे. आम्हीं हीच अंतिम कसोटी मानली पाहिजे. आणि याच कसोटीवर यापुढील राज्यकारभाराची परीक्षा पाहिली जाणार आहे.

वैयक्तिक जीवनामध्यें जशी आपण प्रगति करतो तशीच ती सार्वजनिक जीवनांतहि करावयाची असते. राज्यकारभारामध्यें सुधारणा व प्रगति करण्याचें ठरवून तुम्ही आणि मी जरी काम करणार असलों, तरी आत्मसंशोधनाची, आत्मटीकेची आपल्याला फार जरुरी आहे. राज्यकारभार चांगला करावयाचा असेल तर तो चांगला करण्याची सतत काळजी घेतली पाहिजे. एक क्षणभर जरी आपल्या मनांत अशी कल्पना आली कीं 'नाहीं, आतां बरें चाललें आहे', आणि ह्या विचारानें आपण बेसावध राहिलों, निष्क्रिय राहिलों, तर पुढच्याच क्षणापासून वाईट होण्याची प्रक्रिया सुरू होईल, ती सुरू होण्याची भीति उत्पन्न होईल. म्हणून आपल्याला सतत जागरूक राहण्याची फार आवश्यकता आहे.

आत्मटीकेच्या दृष्टीनें पाहतां, आतांपर्यंत दहा वर्षांचा काळ गेला असूनहि राज्यकारभारासंबंधानें लोकांचें समाधान झालें आहे असें मला वाटत नाहीं. तुमच्या माझ्या सभोंवतींचीं दहा माणसें चांगलें म्हणतात ही त्याची खरी कसोटी नाहीं. कारण राज्यकारभाराची परंपरा आपण ज्या

परकीय सत्तेपासून घेतली आहे, त्या सत्तेच्या परंपरेमध्येंच असे कांहीं दोष आहेत आणि खुद्द सत्ता ही गोष्टच अशी आहे कीं, त्यामुळें आपल्या भोंवतीं नेहमीं खुषमस्क-यांचा वर्ग निर्माण होत असतो. आपण जें केलें तें बरें केलें, फार चांगलें केलें, छान केलें, असें सांगणारीं माणसें आपल्या आवतींभोंवतीं हिंडत असतात. याउलट लोकांच्या समाधानाची कसोटी लावून आपण पाहिलें तर आज राज्यकारभाराबाबत लोकांचें समाधान झालेलें नाहीं असेंच आपणांला आढळून येईल. तेव्हां ही जाणीव ठेवून आपण सर्वांनी पुढें गेलें पाहिजे. त्याकरितां काय करावयास पाहिजे याची निश्चित कल्पना आपणांस असणें जरुरीचें आहे. आणि या दृष्टीनें चार-पांच महत्त्वाच्या गोष्टी मी आज आपल्यापुढें मांडणार आहे.

पहिली महत्त्वाची गोष्ट अशी कीं, लोकांचे समाधान ही जर आपण कसोटी ठरविली तर लोकांना या बाबतींत स्वतःचें निश्चित मत व्यक्त करण्याइतका धीर आणि विश्वास वाटला पाहिजे. अधिका-यांचें चुकतें आहे, किंवा आपल्याला न्याय मिळत नाहीं हें निर्भिडपणें अधिका-यांना सांगण्याचें धैर्य लोकांच्या ठिकाणीं असलें पाहिजे. अशा प्रकारचा विश्वास व निर्भीडपणा आपण लोकांमध्यें निर्माण केला पाहिजे. ही जबाबदारी सरकारची म्हणजे सरकारी अधिका-यांची आहे. मी कांहीं तरी अमूर्त, अनिश्चित असें बोलतों आहें असे आपणांला वाटेल. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. कालच घडलेली एक गोष्ट आपणांस उदाहरण म्हणून सांगतों, म्हणजे मी काय म्हणतों याची आपल्याला नीट कल्पना येईल. काल दुपारी आपल्या विभागांतील एका जिल्ह्यांतून मी जात होतों. केवळ उदाहरण म्हणून आपल्या विभागाचा मी उल्लेख करीत आहें इतकेंच. अशा गोष्टी इतर विभागांतहि घडत असतील. सांगावयाची गोष्ट म्हणजे मी जात असतांना एका गांवांतील लोकांनी, "तहसिलीच्या कचेरीवर आम्ही जातो तेव्हां कचेरीच्या आंत आम्हांला बसूं देत नाहींत, आम्हांला हाकलून धक्के मारून बाहेर काढतात," अशी माझ्याजवळ तक्रार केली. ही तक्रार खरी कीं खोटी हें मला माहीत नाहीं. कदाचित् ती खोटीहि असेल. परंतु ही तक्रार यापूर्वी दुस-या कुणाजवळ करण्यांत आली नव्हती, हें माझ्या लक्षांत आलें. ही तक्रार त्यांनीं माझ्याजवळ येऊन केली हें एका अर्थानें चांगलें झालें. परंतु त्यांतील महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, लोकप्रतिनिधींजवळ आपण बोललें पाहिजे असा विश्वास आणि सरकारी अधिका-यांजवळ आपण बोलूं नये अशी भीति, अशी शंका अजून त्यांच्या मनांत आहे. अशा प्रकारची तक्रार वरिष्ठ सरकारी अधिका-यांजवळ करावी असा विश्वास, असा धीर अजूनहि लोकांच्या अंगीं कां येत नाहीं, याचा आपण विचार केला पाहिजे. अद्यापहि अशीच वस्तुस्थिति असेल, तर मला वाटतें, या बाबतीत आपण गंभीरपणानें विचार करणें अत्यंत जरुरीचें आहे.

आजच्या लोकशाहीच्या काळांत अजूनहि लोकांना कुणी धक्के मारीत असेल तर राज्यकारभाराच्या दृष्टीनें त्यापेक्षां अधिक तिरस्करणीय अशी दुसरी कुठली गोष्ट असूं शकेल असें मला वाटत नाहीं.

मीं हें सर्व अशासाठीं सांगितलें कीं, "मीं माझें काम चांगलें करीत आहें ना" एवढाच विचार करण्याची जी वृत्ति आहे, ती आपण सोडून दिली पाहिजे. मी जर चांगलें काम करीत असेन तर त्याचा परिणाम माझ्या आवतींभोवतीं असणा-या लोकांवर कितपत होत आहे हें पाहण्याचें काम माझें आहे. जिल्हाधिकारी व तालुकाधिकारी यांनीं आपण जें चांगलें काम करतों त्याचा परिणाम आपल्या हाताखालीं काम करणा-या माणसांच्या वर्तनावर कसा होतो हेंहि पाहिलें पाहिजे. अधिकारी आपल्या कचेरीत बसल्यानंतर त्याला आपला पट्टेवाला बाहेर कसा वागतो हें कळणें अवघड असलें तरी तें पाहण्याचें काम या अधिका-यांचें आहे, असें आपण मानलें पाहिजे.

आपण लोकांमध्यें विश्वास निर्माण करण्याचें काम केलें पाहिजे असें मी म्हणालों. पण हें काम जेव्हां सरकार आणि अधिकारी यांच्या दृष्टिकोनांमध्यें एक प्रकारची एकात्मता निर्माण होईल तेव्हांच होऊं शकेल. येथें मला एका गोष्टीचा स्पष्टपणें खुलासा करावयाचा आहे. आपण जनतेचे सेवक आहोंत याचा खरा अर्थ आपण नीट समजावून घेतला पाहिजे. सरकारी अधिकारी जनतेचे सेवक आहेत हें खरें आहे. मात्र ते जनतेला जबाबदार नसून सरकारला जबाबदार आहेत, ही गोष्ट आपण स्पष्टपणें लक्षांत घेतली पाहिजे. या बाबतींत पुष्कळ वेळां गोंधळ होण्याचा संभव असतो, म्हणून मी हें आपल्याला सांगत आहें. आपण जनतेचे सेवक आहांत, आपल्याला जनतेची सेवा करावयाची आहे, जनतेशीं एकनिष्ठ राहून ती करावयाची आहे, ही गोष्ट खरी आहे. पण हें करीत असतांना, आपली जबाबदारी सरकारवर आहे हें आपण विसरतां कामा नये. आपल्याकडे असलेलें काम पुरें करण्याची जबाबदारी सरकारनें घेतलेली आहे. सरकारी अधिकारी हा आधीं जनतेला आणि नंतर सरकारला जबाबदार आहे, अशा चुकीच्या विचारांतून गुंतागुंत निर्माण होण्याचा आणि त्यामुळें जनतेच्या सेवेचा प्रश्न बाजूला पडून दुस-याच कांहीं आपत्ति कोसळण्याचा संभव असतो. म्हणून या दोन गोष्टींतील फरक आपण स्पष्टपणें समजावून घेतला पाहिजे. आपल्याला जनतेची जी सेवा करावयाची आहे, ती अधिकारावर असलेल्या सरकारच्या कार्यक्रमामार्फत करावयाची आहे. त्यानें जो कार्यक्रम, जें धोरण, जी पद्धति स्वीकारली असेल, त्याला अनुसरूनच आपल्याला आपलें काम पार पाडावयाचें आहे. कार्यक्रम पार पाडतांना जनसेवेच्या भावनेनें तो पार पाडला पाहिजे, हीच त्यांत महत्त्वाची गोष्ट आहे. आणि याचसाठी सरकारच्या धोरणाच्या बाबतींत तुमची संपूर्ण निष्ठा असावी, अशी मी अपेक्षा करीत आहें. मी आपणांकडून या सहकार्याची अपेक्षा करतों आहें. असें सहकार्य मागणें हें माझें काम आहे आणि तें देणें हें आपलें कर्तव्य आहें. परंतु यापेक्षांहि जास्त मोठी अपेक्षा मी आपणांकडून करतों आहें. आणि ती ही कीं, सरकार जें धोरण व जो कार्यक्रम स्वीकारील त्या कार्यक्रमाच्या बाबतींत आपल्याकडून साडेनव्याण्णव टक्के नव्हे तर शंभर टक्के निष्ठेची मी अपेक्षा करतों. कारण जो कार्यक्रम व जें धोरण सरकारनें स्वीकारलें असेल त्या धोरणाच्या बाबतींत आपल्या मनांत पाव टक्कासुद्धां शंका राहतां कामा नये. याचा अर्थ असा नव्हे कीं, आपलीं कांहीं वैयक्तिक मतें असू शकणार नाहींत. ज्याला वैयक्तिक मतें नाहींत तो माणूसच

असूं शकणार नाहीं. परंतु सरकारी यंत्रणेमध्यें जेव्हां आपण जबाबदारी उचलतां तेव्हां आपलें स्वतःचें कांहींहि मत असलें, आपल्या स्वतःच्या कांहींहि भावना असल्या, तरी जें सरकारी धोरण असेल तें आपण निःपक्षपातीपणानें आणि शंभर टक्के निष्ठेनें पार पाडलें पाहिजे, हीच आपली मनोभूमिका असली पाहिजे आणि अशाच निष्ठेची मी आपणांकडून अपेक्षा करतों.

आम्ही सारखे सांगत असतों कीं, राज्यकारभार कार्यक्षम पाहिजे. कार्यक्षम राज्यकारभाराच्या माझ्या कल्पना अगदीं साध्या आहेत. कार्यक्षम कारभार याचा अर्थ जें काम असेल तें आपण तांतडीनें केलें पाहिजे, प्रामाणिकपणानें केलें पाहिजे, आणि तें करून आपण लोकांचें समाधान केलें पाहिजे. माझ्या कल्पनेप्रमाणें कार्यक्षम राज्यकारभाराच्या ह्या तीन कसोट्या आहेत. विलंब कां लागतो याची आपण वारंवार तपासणी केली पाहिजे. परंतु या बाबतींत एकच एक असा नियम कोणालाहि घालून देतां येणार नाहीं. सरकारनें, विभागीय अधिका-यांनीं किंवा जिल्हाधिका-यांनीं आपल्या खात्यामध्यें कांहीं गोष्टींत थोडाफार बदल करून हा प्रश्न सुटणार नाहीं. विलंब टाळण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे आलेलें काम एका ठराविक मुदतींत पुरें केलेंच पाहिजे अशी आपण आपल्या मनाला संवय लावून घेतली पाहिजे आणि त्याप्रमाणें ती इतरांना लावली पाहिजे. एखाद्या प्रकरणासंबंधीं अधिक माहिती मागवावयाची नसेल तर प्रश्नच नाहीं. पण अधिक माहिती मागवावयाची असेल तर त्यामुळें विलंब होतो, असा आपला अनुभव आहे. तेव्हां माहिती मागविण्याच्या बाबतींत, सदरहू माहिती एका ठराविक काळांत आलीच पाहिजे असा आपण आपल्या मनाशीं निर्णय घेतला पाहिजे. त्यासंबंधीं आपल्या मनाला सतत चिंता लागून राहिल्याशिवाय हा विलंबाचा प्रश्न सुटणार नाहीं. विलंब हा सबंध राज्यकारभाराच्या पाठीमागें लागलेला एक राक्षस आहे, असें माझें मत आहे. नित्य जागरुकता ठेवल्याशिवाय हा राक्षस पराभूत होणार नाहीं. तो एकदां पराभूत होऊन जात नाहीं. तो रोज जन्माला येतो, प्रत्येक क्षणाला जन्माला येतो आणि प्रत्येक क्षणाला त्याच्याशीं युद्ध करावें लागते. म्हणून एखाद्याच दिवशीं विलंबाचा प्रश्न दूर झाला तर त्याचा उपयोग नाहीं. दुस-या दिवशीं परत विलंब होण्याची शक्यता असते. ज्याला आपण सरकारी यंत्रणेचें काम म्हणतों, त्याला मराठींत कागदावरचे घोडे नाचविणें म्हणतात. राज्यकारभारामध्यें खरेखुरे घोडे नाचूं शकत नाहींत, ते कागदावरचेच नाचतात. तेव्हां या कागदी घोड्यांना आपण सारखें पळविलें पाहिजे, हलविलें पाहिजे, त्यांच्या संबंधीं जागरूक राहिलें पाहिजे. अधिक माहिती मागविण्याकरितां जें काम जाणार असेल त्याच्यासंबंधीं कांहीं निश्चित निर्णय घेतले पाहिजेत. जी माहिती द्यावयाची असेल तिच्याकरितां सर्वसाधारणपणें दोन दिवसांची, कांहीं बाबतींत आठ दिवसांची, कांहीं बाबतींत दहा दिवसांची, पंधरा दिवसांची ह्याप्रमाणें जास्तींत जास्त कालमर्यादा निश्चित केली पाहिजे. माहिती मागविण्याकरितां गेलेला कागद अमुक दिवसांनीं परत आलाच पाहिजे, अशी आपल्याला आणि त्याचप्रमाणें ज्याच्याकडून माहिती मागवायची असेल त्यालाहि संवय लागली पाहिजे. कारण आपल्याकडे आलेलें काम ज्या दिवशींचें

त्या दिवशी पुरें झालेंच पाहिजे अशी त्याला संवय लागली कीं, तोहि माहिती पाठविण्याचें काम कदापि लांबविणार नाहीं.

दुसरा प्रश्न लांचलुचपतसंबंधींचा आहे. राज्यकारभारांतून लांचलुचपत अजिबात नाहींशी झाली आहे असें आपण म्हणूं शकणार नाहीं. ज्याला 'करप्शन बाय एक्स्टॉर्शन' म्हणतां येईल अशी सक्तीनें पैसे वसूल करण्याची लांचलुचपतीची पद्धत पूर्वी राज्यकारभारामध्यें कांही ठिकाणी चालू होती. परंतु ही पद्धत आतां बंद होत चालली असून ती बंद करण्यांत लांचलुचपत प्रतिबंधक खात्यानें बरेंच यश मिळविलें आहे. परंतु संमतीनें लांचलुचपतीचे जे प्रकार घडतात त्यांना आळा घालण्यांत आपण कितपत यशस्वी झालों आहोंत हे मला माहीत नाहीं. या बाबतींत जिल्हाधिका-यांनीं या अनिष्ट प्रकाराला आळा घालण्याच्या दृष्टीनें विचार करून सरकारला सूचना कराव्यात अशी मी आपल्याला विनंती करतों. आपल्या सहकार्याची या बाबतींत मला अतिशय आवश्यकता आहे.

लांचलुचपतीचा एक अप्रत्यक्ष प्रकार आहे. तो म्हणजे कांहीं ठराविक पद्धतीनेंच अधिका-यांकडे गेलें तर काम होतें हा होय. या प्रकारामध्यें कांहीं दिलें जात नाहीं, घेतलें जात नाहीं, याची मला खात्री आहे. पण काम व्हावयाचें असेल तर ओळखीनें किंवा एका विशिष्ट पद्धतीनें गेलें पाहिजे, अशा त-हेची लोकांची भावना होणें याला मी लांचलुचपत म्हणतों. म्हणून ह्या दृष्टीनें राज्यकारभार व्यक्तिनिरपेक्ष होण्याची आवश्यकता आहे. कोणत्याहि पक्षाचा मनुष्य असो, अथवा त्याचें समाजांतील स्थान कोणतेंहि असो, आपलें काम योग्य व न्याय्य असल्यास अधिका-यांकडून आणि राजसत्तेकडून तें होईल असा त्याला विश्वास वाटला पाहिजे. तो गरीब आहे, त्याला आपले प्रश्न व्यवस्थितपणें मांडतां येत नाहींत, तो पुढें यावयास घाबरतो, त्याची व आपली ओळख नाहीं, असल्या अडचणी त्याच्या आड येतां कामा नयेत. तो मनुष्य कदाचित वाईटहि असेल, पण त्याचें गा-हाणें योग्य असेल तर त्याच्या बाबतींत आपल्याकडून अन्याय होतां कामा नये. इतक्या प्रमाणांत राज्यकारभार व्यक्तिनिरपेक्ष होणें आवश्यक आहे. त्यासाठीं आपण व्यक्तीपलीकडे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मात्र याचा अर्थ असा नव्हे कीं, एकदां एक नियम करावयाचा आणि तो नियम डोळे झांकून पाळावयाचा. अशा प्रकारचा व्यक्तिनिरपेक्ष राज्यकारभार फार धोक्याचा ठरेल. कारण कोणत्याहि गोष्टींत शेवटीं माणुसकीची म्हणून बाब असते. आणि तींत जो मानवी संबंध येतो तो टिकविण्यास चोवीस तास नुसतें कायद्याकडे आणि नियमाकडे बोट दाखवून चालत नाहीं. म्हणून आपल्यापुढें होण्यासारखें जें काम असेल तें आपण अडचणींतून मार्ग काढून केलें पाहिजे. अशा रीतीनें एखादा प्रश्न सोडविण्याचा जो मार्ग असतो तो आपण सोडून देतां कामा नये. या अर्थानें कारभार व्यक्तिनिरपेक्ष व्हावयास पाहिजे.

लोकांबरोबरच्या आपल्या वागणुकीचा प्रश्नहि मी महत्त्वाचा मानतों. या बाबतींत आतां पूर्वीपेक्षां

पुष्कळच सुधारणा झाली आहे. परंतु पोलीस खात्यामध्यें या दृष्टीनें अद्यापि फार व्हावयास पाहिजे असें मला वाटते. माझ्या मतें या बाबतींत सुधारणा घडवून आणण्याचा अधूनमधून तपास करणें हा एकच उपाय आहे. वर्दी देऊन केलेली तपासणी ही खरी तपासणीच नव्हे. साहेबबहादुर अमक्या दिवशीं येणार आहेत अशी बातमी देऊन झालेली तपासणी ही तपासणीच नव्हे. तें तपासणीचें नाटक होय. आपल्या खात्यांतील लोकांची वागण्याची पद्धत सुधारण्यासाठीं मधूनमधून आगाऊ वर्दी न देतां पोलीस अधिका-यांनीं अचानकपणें तपासणी केली पाहिजे असें मला वाटतें.

समोरच्या अधिका-याला त्याच्या चुकीबद्दल शासन करण्याचें टाळतां आलें तर बरें अशी जी वृत्ति आहे ती सोडून तपासणी करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. मी असें म्हणत नाहीं की, तपासणीमध्यें एखाद्याकडून कांही चूक झाल्याचें आढळून आल्यास आपण त्याला जास्तींत जास्त शिक्षा द्यावी. सारखी हातांत छडी घेऊन शिक्षा करीत हिंडणारा माणूस सुधारणा करूं शकतोच असें मी मानीत नाहीं. सुरुवातीला चुकलेल्या माणसाला आपणांला नीट समजावून सांगावें लागेल. पण अशा एकदोन प्रसंगांनंतर पुन्हा त्यानें तीच चूक केली तर मात्र शिक्षा करण्यास आपण मागेंपुढें पाहूं नये. वरच्या अधिका-यांत मीं आतांच वर्णन केलेली जी प्रवृत्ति दिसते ती कदाचित् मनुष्यस्वभावाला धरून असेल, पण राज्यकारभाराच्या दृष्टीनें ती थोडीशी धोक्याची आहे. कारण चूक वारंवार दृष्टोत्पत्तीस आल्यानंतर सुद्धां शासन न करण्याची, सांभाळून घेण्याची ही जी वृत्ति आहे, त्यामुळें हा दोष वाढण्याची शक्यता आहे. सुधारणा होत असेल किंवा सुधारणा करण्याकरितां सांभाळून घ्यावयाचें असेल तर सांभाळून घेण्यास कुठल्याहि त-हेची हरकत नाहीं. परंतु प्रसंगीं वरचा अधिकारी शासन करील ही भीति असल्याशिवाय 'सर्व्हिसेस' मधील शिस्त कधीं वाढणार नाहीं. या दृष्टीनें अत्यंत तांतडीनें सुधारणा होण्याची आवश्यकता जर कोणत्या खात्यांत असेल तर ती पोलीस आणि महसूल खात्यांमध्यें आहे. महसूल खात्यानें तालुका कचे-यांत आणि गांवच्या कचे-यांत या दृष्टीनें अधिक लक्ष घातलें पाहिजे. कारण राज्यकारभाराच्या बाबतींत लोकांचा सरकारी नोकरवर्गाशीं जो दैनंदिन संबंध येतो तो कलेक्टर, मामलेदार, फौजदार किंवा डी. एस्. पी. यांच्याशीं येत नसून एखादा हेड कॉन्स्टेबल, एखादा सर्कल ऑफिसर किंवा एखादा तलाठी यांच्याशींच येतो. म्हणून लोकांचें समाधान करण्याची कुवत राज्यकारभाराच्या ह्या सर्वांत खालच्या थरांत जोपर्यंत आपण निर्माण करूं शकत नाहीं तोपर्यंत जनतेच्या समाधानाच्या कसोटीस उतरण्याच्या बाबतींत आपणांला फारसें यश मिळणार नाहीं. तेव्हां सुधारणा करण्यासाठीं आणि जरूर पडल्यास वचक निर्माण करण्याच्या दृष्टीनेंहि हें अचानक तपासणीचें काम आपण आतां हातीं घेतलें पाहिजें. या कार्यास आपण अधिक तत्परतेनें सुरुवात कराल अशी मी अपेक्षा करतों.

आपलें सरकार हें केवळ लोकशाही सरकार आहे असें नव्हे तर लोककल्याणाची जबाबदारीहि त्यानें

स्वीकारलेली आहे. म्हणून सरकार जें धोरण ठरवील त्याची अम्मलबजावणीच केवळ आपणांस करावयाची नसून त्यानें आंखलेला लोककल्याणाचा कार्यक्रम पुरा करण्याची जबाबदारीहि आपणांवर आहे. थोडक्यांत म्हणजे कल्याणकारी राज्याची सरकारनें जी जबाबदारी स्वीकारली आहे त्यामुळें आपल्यावरील जबाबदा-या पुष्कळच वाढल्या आहेत. माझ्या कल्पनेप्रमाणें तीनचार खात्यांवरील जबाबदा-या यामुळें विशेष वाढतात. तीं खातीं म्हणजे शिक्षण, सहकार शेती व आरोग्य ही होत. परंतु जुन्या परंपरेंत आम्ही वाढलेले असल्यामुळें पोलीस व महसूल खात्यांचें वर्चस्व अजूनहि लोकांच्या आणि अधिका-यांच्या मनांतून जात नाहीं. अधिका-यांसंबंधी लोकांची जी कल्पना आहे तीच मंत्रिमंडळासंबंधीहि आहे. ज्याच्या हातीं पोलीस खात्याचा कारभार असेल त्याला कांहीं विशेष सत्ता असते असें अजूनहि लोक मानतात. हा चुकीचा दृष्टिकोन हळूहळू बदलला पाहिजे. लोककल्याणकारी राज्यामध्यें मीं आतांच सांगितलेल्या चार खात्यांना आणि त्या खात्यांतील कामाला जोंपर्यंत प्राधान्य व महत्त्व मिळत नाहीं तोंपर्यंत तें खरें लोककल्याणकारी राज्य झालें आहे असें म्हणतां येणार नाहीं. शेवटी असेंच म्हणावें लागेल कीं, या देशांतील लोकशाही व येथील राज्यकारभार यशस्वी व्हावयाचा असेल, तर या चार खात्यांचें काम यशस्वी झालें पाहिजे. या खात्यांचे लोक ज्या प्रमाणांत लोकांच्या जवळ जाऊं शकतील, त्यांच्याबद्दल लोकांच्या मनांत ज्या प्रमाणांत आपुलकी व जिव्हाळा वाढेल त्या प्रमाणांत या देशांतील लोकशाही आणि येथील राज्यकारभार यशस्वी होणार आहे. म्हणून या खात्यांकडून माझ्या अपेक्षा मोठ्या आहेत. या खात्यांनीं प्रथम नव्या परंपरा निर्माण केल्या पाहिजेत व लोकांकडे जाऊन त्यांचें समाधान करण्याचा त्यांनी अधिक मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केला पाहिजे. ह्या कामांत त्यांच्याकडून ज्या प्रमाणांत वाढ होईल त्या प्रमाणांत लोकांच्या दृष्टीनेंहि आपलें महत्त्व वाढतें आहे असें त्यांना दिसून येईल. सरकार स्वाभाविकपणें अजूनहि जिल्ह्याच्या अधिका-यांना प्रमुख स्थान देतें. यंत्रणेचें एक महत्त्वाचें अंग या दृष्टीनें त्यांना महत्त्व मिळणें साहजिक आहे. परंतु लोकांच्या मनांत ज्या प्रमाणांत मीं सांगितलेला बदल होत जाईल त्या प्रमाणांत इतरहि गोष्टी बदलत जातील. पण ही जिम्मेदारी मुख्यतः मीं सांगितलेल्या अधिका-यांची आहे. म्हणून त्यांनीं आपल्या कामांत अधिक लक्ष घालण्याचा प्रयत्न करावा अशी मी त्यांना विनंती करतों.

याशिवाय आणखी दोनतीन महत्त्वाचे प्रश्न आहेत. त्यांचा मी थोडक्यांत उल्लेख करणार आहें. त्यांतील पहिला प्रश्न दारूबंदीचा आहे.

दारूबंदी हें या राज्याचें एक अतिशय महत्त्वाचे असें धोरण आहे. या धोरणाचें पालन ज्याला धार्मिक श्रद्धा म्हणता येईल अशा भावनेनें झालें पाहिजे असा या सरकारचा कटाक्ष आहे. दारूबंदीचें धोरण यशस्वी करण्याची प्रतिज्ञा या सरकारनें केलेली आहे, हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. म्हणून दारूबंदी यशस्वी करण्यासाठी सर्व सरकारी अधिका-यांकडून मी संपूर्ण सहकार्य व

सर्वांगीण प्रयत्न यांची अपेक्षा करतों. कांहीं लोकांची अशी समजूत होती कीं, नवें राज्य आल्यानंतर या धोरणांत बदल होऊन कांहीं प्रमाणांत तें सैल होईल. परंतु आपल्यामार्फत मी लोकांना सांगूं इच्छितो कीं, दारूबंदीच्या धोरणाची अधिक कडक रीतीनें अम्मलबजावणी करण्याची आणि तिचा प्रसार करण्याची जबाबदारी ह्या सरकारनें स्वीकारली आहे.

या धोरणाच्या अम्मलबजावणीच्या बाबतींत अधिकारीवर्गाची वृत्ति संपूर्ण सहकार्याची असली पाहिजे. या बाबतींत आपली पावणेशंभर टक्केसुद्धां निष्ठा चालणार नाहीं. सरकारनें आंखलेल्या धोरणाच्या बाबतींत आपली निष्ठा पाव टक्कासुद्धां कमी असतां कामा नये. कारण हीं जीं धोरणें आहेत त्यांच्या अम्मलबजावणीच्या दृष्टीनें आवश्यक असें वातावरण निर्माण केल्याशिवाय, तीं कधींहि यशस्वी होणार नाहींत. म्हणून दारूबंदीच्या बाबतींत अधिका-यांनी संपूर्ण सहकार्याची वृत्ति ठेवून दारूबंदी यशस्वी कशी होईल हें पाहिलें पाहिजे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट विकेंद्रीकरणासंबंधीं आहे. आपल्या राज्याच्या विभागप्रमुखांना ते मागतील तेवढे अधिकार देण्याची माझी तयारी आहे. माझी इच्छा तर अशी आहे कीं, जिल्हा आणि तालुक्याच्या अधिका-यांनाहि जेवढे जास्तींत जास्त अधिकार देतां येतील तेवढे द्यावेत. माझा त्यांच्यावर विश्वास आहे. पण अधिकार हातीं आल्यानंतर एकदोन जबाबदा-याहि येतात, त्या त्यांनी टाळतां कामा नयेत. निर्णय घेण्याची जिम्मेदारी टाळावयाची नसेल तरच आलेल्या सत्तेचा किंवा अधिकाराचा वापर त्यांना करतां येईल. पण आपण दिलेला निर्णय कदाचित् वरचा अधिकारी बदलील असें जिल्हाधिका-यांना वाटलें किंवा आपण घेतलेला निर्णय सरकार बदलील असें विभाग अधिका-यांना वाटलें आणि म्हणून निर्णय घेण्याचें काम आपण सरकारवर टाकलें तर आपणांला दिलेल्या सत्तेचा वापर लोककल्याणाकरितां होणार नाहीं. त्यासाठीं निर्णय घेण्याची व त्यांतून येणा-या जबाबदा-या स्वीकारण्याची हिंमत आणि त्याकरितां लागणारी कार्यप्रवणता आपण दाखविणें अत्यंत आवश्यक आहे. त्याचबरोबर आणखी एक गोष्ट मला स्पष्ट केली पाहिजे. ती अशी कीं, आपणांला दिलेले अधिकार सरकारी धोरणाची अंमलबजावणी करण्याकरितां दिलेले असून, धोरण आंखण्याचा अधिकार त्यामुळें आपणाला प्राप्त होत नाहीं. ही महत्त्वाची गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे. कारण या अधिकारामुळें तालुक्यामध्यें, जिल्ह्यामध्यें किंवा विभागामध्यें आपल्याला निराळें धोरण स्वीकारतां येईल असा चुकीचा समज आपण करून घेतला तर यामुळें राज्य छिन्नविच्छिन्न होऊन जाईल. राज्याचा अंत ओढवेल. तें विकेंद्रीकरण होणार नाहीं. म्हणून या संकटापासून आपण दूर राहिलें पाहिजे. थोडक्यांत म्हणजे विकेंद्रीकरणाच्या धोरणामुळें आपल्याकडे जे अधिकार येतात त्यांचा वापर करण्याची हिंमत दाखवून व त्यांचा वापर करण्याच्या मर्यादा लक्षांत घेऊन आपण हें काम पुरें केलें पाहिजे. अशा रीतीनें आपण हें काम पुरें करूं शकलों, तर मला वाटतें आपलें काम यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाहीं.

तिसरी जी एक महत्त्वाची गोष्ट मला आग्रहपूर्वक सांगावयाची आहे ती ग्रामपंचायतींसंबंधींची आहे. ग्रामपंचायत ही आज जिच्याबद्दल सगळे लोक चांगलें बोलतात पण कुणीहि कांहींहि करीत नाहीं अशी एक वस्तु झाली आहे. परंतु दारूबंदीसंबंधीं जितका माझा आग्रह आहे तेवढाच आग्रह गांवांतील सहकारी संस्था आणि गांवांतील ग्रामपंचायती या दोन बाबींसंबंधानेंहि आहे. ज्या गांवांत सहकारी संस्था किंवा ग्रामपंचायत चांगली चालत नाहीं, तें गांव चांगलें नाहीं, आणि अशीं गांवें ज्या राज्यांत आहेत, तें राज्य चांगलें नाहीं, असें माझें मत आहे. ज्या जिल्ह्यामध्यें चांगल्या ग्रामपंचायती व चांगल्या सहकारी संस्था असलेलीं भरपूर गांवें आहेत त्या जिल्ह्यांतील जिल्हाधिका-यांचे काम चांगलें चाललें आहे असें मी म्हणेन. असा जिल्हाधिकारी आपल्या कामामध्यें यशस्वी झाला असें मानावयास हरकत नाहीं. ग्रामपंचायतीच्या अधिका-यांनींच तेवढें ग्रामपंचायतीचें काम पाहावें अशा त-हेची आपली दृष्टि असतां कामा नये. म्हणून राष्ट्रीय विस्तार योजना व समाज विकास योजना यांच्या क्षेत्रांत काम करणा-यांना आणि त्याचप्रमाणें राज्यकारभाराच्या निरनिराळ्या शाखांमध्यें काम करणा-यांनाहि मी आग्रहपूर्वक एक गोष्ट सांगूं इच्छितों. आपण जेव्हां खेड्यांत राष्ट्रीय विस्तार योजनेचें किंवा समाज विकास योजनेचें काम हातीं घेतां तेव्हां त्या गांवच्या ग्रामपंचायतीची या कामांत कशी मदत घेतां येईल आणि ग्रामपंचायतीच्या व आपल्या कामामध्यें एक प्रकारची जुळणी, एक प्रकारचें सहकार्य, एक प्रकारची एकात्मता कशी घडवून आणतां येईल, यासंबंधींचा जास्तींत जास्त विचार व प्रयत्न आपणांकडून झाला पाहिजे. या गोष्टीची फार आवश्यकता आहे म्हणून ती मीं आपणांपुढें मांडली आहे.

शेवटीं माझें भाषण संपण्यापूर्वी आणखी एक गोष्ट मला आपणांला सांगावयाची आहे. सरकारी अधिका-यांनीं आपल्या मागण्या मांडतांना कुठल्याहि बिनसरकारी व्यक्तींची किंवा संस्थांची मदत घेऊं नये अशी माझी इच्छा आहे. अशा प्रकारची मदत आपण त्यांच्याकडून घेतली कीं केव्हां तरी त्याची परतफेड आपणांकडून करून घेण्याचा ते प्रयत्न करतील. आणि मग आपल्या मार्गांत त्यामुळें अडचणी निर्माण होतील. म्हणून या बाबतींत सरकारी अधिका-यांनीं अत्यंत सावधगिरीनें वागलें पाहिजे.

माझ्या दृष्टीनें मला ज्या गोष्टी महत्त्वाच्या वाटल्या त्या मीं आपणांपुढे ठेवल्या आहेत. या गोष्टी बोलण्यासाठींच मी येथें आलों होतों. राज्यकारभारासंबंधीं एक महत्त्वाचा दृष्टिकोन शक्य तितका थोडक्यांत आपणांपुढें ठेवण्याचा मीं प्रयत्न केला आहे. एका प्रगत राज्याचे आपण अधिकारी आहांत या राज्याची प्रगति शेवटीं राज्याचे मंत्री राज्यकारभार कसा करतात यावर अवलंबून नाहीं, तर तलाठी-पाटलांपासून तों मुख्यमंत्र्यांपर्यंत कोण, कोणती जबाबदारी कोणकोणत्या पद्धतीनें पार पाडतो, यावर अवलंबून आहे. या सगळ्यांच्या वागण्यावर हें राज्य

प्रगतिशील आहे कीं नाहीं, कार्यक्षम आहे कीं नाहीं, यशस्वी झालें कीं नाहीं तें ठरणार आहे. हें सांघिक काम आहे. हें सगळ्यांचेंच काम आहे आणि तें आपण पार पाडलें पाहिजे.

मला आपणांला जें सांगावयाचें होतें तें मीं थोडक्यांत सांगितलें आहे. आपल्या नव्या कामांत तुम्ही आणि मी सगळे भागीदार आहोंत. हें काम पुरें होणें न होणें हें तुमच्या माझ्या सगळ्यांच्या सहकार्यावर अवलंबून आहे. तें सहकार्य, ती निष्ठा तुम्ही द्याल असा मी विश्वास व्यक्त करतों आणि माझें भाषण पुरें करतों.

## विकेंद्रीकरण - लोकशाही जीवनपद्धतीचा पाया

लोकशाही तत्त्वानुसार विकेंद्रीकरणाच्या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करून विकेंद्रीकरणाची योजना आपल्या राज्यांत कोणत्या मार्गानें उत्तम त-हेनें अंमलांत आणतां येईल याची चर्चा करण्यासाठीं आपण हा जो परिसंवाद घडवून आणला आहे त्याचें उद्घाटन करतांना मला अतिशय आनंद होत आहे. आपणां सर्वांना माहीत आहेच कीं, बलवंतराय मेहता समितीनें आपल्या अहवालांत जिल्हा, गट व खेडें या पातळीवरील लोकनियुक्त संस्थांना अधिकाधिक अधिकार देण्यासंबंधीं जोरदार शिफारस केली आहे. आपल्या राज्यांत सत्तेचें विकेंद्रीकरण थोड्याफार प्रमाणांत पूर्वीच झालेलें असून जिल्हा पातळीवर लोकल बोर्ड, जिल्हा स्कूल बोर्ड, जिल्हा ग्रामपंचायत मंडळ, जिल्हा विकास मंडळ, जिल्हा शाळा इमारत समिति, जिल्हा सहकारी मंडळ आणि जिल्हा देखरेख समिति अशा अनेक संस्था आहेत. विदर्भ विभागांत प्रत्येक तहसिलासाठीं एक जनपदसभा आहे. याशिवाय सामूहिक विकास योजनेखालीं सुरू केलेल्या गटांसाठी गट विकास समित्या आहेत. त्याचप्रमाणें तालुका पातळीवर तालुका देखरेख संघ ही संस्था काम करते. अशा रीतीनें राज्याच्या ग्रामीण विभागांतील विकास कार्यासंबंधींची आपली जबाबदारी, जिल्हा लोकल बोर्ड, जनपदसभा, जिल्हा ग्राम पंचायत मंडळें व ग्रामपंचायती यांसारख्या विधिनियुक्त संस्थांमार्फत आणि सल्लागार समित्यांच्या साहाय्यानें सरकारी यंत्रणेंद्वारा शासन पार पाडीत असतें.

बलवंतराय मेहता समितीनें केलेल्या शिफारसीनुसार, ग्रामीण विकासाबाबत सरकारवर असलेली जबाबदारी जिल्हा व त्या खालच्या पातळीवरील भागांसाठीं विधिनियुक्त संस्था स्थापन करून त्यांच्यावर सोंपवितां येईल कीं काय, याचा विचार करणें आवश्यक झालें आहे. ग्रामीण भागांतील लोकांच्या कल्याणाचा आणि ग्रामीण विकासाचा कार्यक्रम यशस्वी रीतीनें अंमलांत आणावयाचा असेल तर त्यासाठीं या भागांतील जनतेचें उत्स्फूर्त साहाय्य आणि सहकार्य मिळविणें अत्यंत महत्त्वाचें आहे ही गोष्ट आपणांला नाकारतां येणार नाहीं. म्हणून स्थानिक जनतेंत उपक्रमशीलता

आणि सहकार्य या वृत्तींची संपूर्ण वाढ होण्यासाठी निरनिराळ्या पातळींवर जनतेच्या संस्था उत्तम रीतीनें कशा संघटित करतां येतील याचा आपण विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणें त्या त्या भागांतील विकासाचा कार्यक्रम तेथील जनतेच्या गरजा आणि आकांक्षा लक्षांत घेऊनच आंखण्यांत आला पाहिजे. या स्थानिक योजना अर्थात् राज्याच्या व देशाच्या कार्यक्रमाशीं मिळत्याजुळत्या असल्या पाहिजेत हें उघडच आहे.

गेल्या कांहीं वर्षांत, सामूहिक विकास योजनेच्या कार्यामुळें ग्रामीण भागांतील जनतेंत स्वावलंबनाची वृत्ति निर्माण झाली आहे यांत शंका नाहीं. स्वतःचे श्रम व पैसा विकासाच्या कामीं लावण्यासाठीं ग्रामीण भागांतील जनता स्वयंस्फूर्तीनें पुढें येत असल्याचें दृश्य आज आपणांस दिसत आहे. जनतेच्या वृत्तींतील हा बदल म्हणजे अलीकडच्या काळांत आपण मिळविलेला एक मोठा विजयच आहे असें मी समजतों. ग्रामीण भागांतील विकासकार्य अधिक जोमाने व्हावें म्हणून ग्रामीण जनता ज्या त-हेनें आपला उत्साह प्रकट करीत आहे तों पाहतां, स्थानिक गरजांबाबत त्वरित निर्णय कसे घेतां येतील आणि आपल्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा वेग कसा वाढवतां येईल या गोष्टींचा विचार करणें आपणांस आतां आवश्यक होऊन बसलें आहे. खरें म्हणजे, लोकशाही विकेंद्रीकरणानुसार ज्या प्रमाणांत ह्या गोष्टी साध्य होत जातील त्या प्रमाणांत विकेंद्रीकरणाची आवश्यकता सिद्ध होणार आहे.

जिल्ह्यांतील ग्रामीण विकासकार्याशीं संबंधित असलेल्या ज्या विधिनियुक्त अगर इतर संस्था आहेत त्यांची राज्यांतील सद्यःपरिस्थितीशीं सुसंवादी होईल अशा रीतीनें पुनर्घटना घडवून आणण्याचा उत्तम मार्ग कोणता याचा आपण विचार केला पाहिजे. या पुनर्घटनेमुळें या संस्थांकडे सोपविण्यांत येणा-या विकासकार्यात अधिक कार्यक्षमता व गति आली पाहिजे. त्याचप्रमाणें ही जी यंत्रणा आपण उभी करणार आहोंत तिच्यामध्यें द्रुतगतीनें आणि सातत्यानें विकासाचें काम करीत राहण्याची ताकद असणेंहि अत्यावश्यक आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन या संस्थांच्या पुनर्घटनेच्या प्रश्नाचा आपण विचार करावा.

ग्रामीण विकासाचें कार्य सातत्यानें स्वावलंबनाच्या वृत्तीनें व्हावयाचे असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रामीण विभागाचा आर्थिक विकास घडवून आणणा-या योजनांकडे अधिकाधिक लक्ष पुरविलें पाहिजे. आतांपर्यंत या संस्था बहुतांशी सामाजिक सुखसोयींकडेच लक्ष पुरवीत आल्या आहेत. अर्थात् या गोष्टीची जरुरी आहेच. कारण ग्रामीण भागांत अशा प्रकारच्या सुखसोयी जवळजवळ अस्तित्वांतच नसल्याकारणानें लोकांच्या राहणीचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीनें त्या उपलब्ध करून द्यावयास पाहिजेतच. परंतु त्याचबरोबर, या लोकनियुक्त संस्थांना ग्रामीण भागांतील आर्थिक विकासाच्या योजना अंमलांत आणणें शक्य झालें तर माझ्या मतें त्या फार

मोठी भरीव कामगिरी बजावूं शकतील. सध्यां ग्रामीण भागांत शेतीच्या विकासास भरपूर वाव असून या भागांत उद्योगधंद्यांच्या वाढीला चांगलीच चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. म्हणून मला असे वाटतें कीं, ग्रामीण विभागाच्या आर्थिक विकासास पोषक असणा-या कार्यक्रमावर आपण आतां भर द्यावयास पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांचे भावी स्वरूप लक्षांत घेऊन ही गोष्ट कशी साध्य करतां येईल या प्रश्नाचा आपण विचार करावा अशी माझी आपणांस कळकळीची विनंती आहे. भारताचे व या राज्याचें जें विकासविषयक धोरण आहे, त्याच्या चौकटींत बसेल अशा त-हेचें ग्रामीण विभागांतील शेती व उद्योगधंद्यांच्या विकासाचें कार्य स्थानिक संस्थांना हातीं घेणें शक्य व्हावें, म्हणून कांही तरी मार्ग निश्चितपणें शोधून काढलाच पाहिजे. कारण माझ्या मतें ही आजची अत्यंत निकडीची गरज आहे. म्हणून आपल्यासमोर तिचा उल्लेख करण्याची ही संधि मीं साधली.

आपल्या या समितीनें विकेंद्रीकरणांतून निर्माण होणा-या विविध प्रश्नांची चर्चा करण्याच्या उद्देशानें बिनसरकारी मंडळींचा हा मेळावा भरविला ही खरोखर आनंदाची गोष्ट आहे. आपल्या चर्चेसाठीं तयार केलेली कार्यक्रमपत्रिका माझ्या समोर आहे. या कार्यक्रमपत्रिकेवरील प्रश्नांबाबत होणारी चर्चा सर्वांनाच उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो. या समितीनें आपल्या कामाबाबत जी कार्यपद्धति अवलंबिली आहे तिच्याबद्दल मला विशेष आनंद वाटतो. कारण तिच्यामुळें या प्रश्नांच्या विविध पैलूंवर प्रकाश पडेल, एवढेच नव्हे तर या प्रश्नाबाबत आस्था बाळगणा-या सर्व लोकांचे विचार समजून घेण्यास समितीला मदत होईल.

कल्याणकारी राज्य निर्माण व्हावें म्हणून शासन सर्व प्रकारें प्रयत्न करीत आहे हें आपण जाणताच. कल्याणकारी राज्यांत जनतेच्या गरजा भागविण्यासाठीं साहजिकपणें शासनाला निरनिराळ्या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर विकास कार्यक्रम हातीं घेणें आवश्यक होतें. त्यामुळें सरकारी कामाचा व्याप, विशेषतः विकास खात्यांतील कामाचा व्याप प्रतिदिन वाढतच जातो. लोकशाही पद्धतीने आणि जनतेचें संपूर्ण सहकार्य मिळवूनच हें काम पार पाडावयाचें असतें. आपल्या सरकारची हीच वैचारिक भूमिका असल्याकारणानें, ज्यांच्यामुळें विकासकार्याचा वेग वाढण्यास मदत होईल आणि देशांतील लोकशाहीचाहि पाया दृढमूल होईल अशा प्रकारच्या शासन संस्था आणि लोकशाही संस्था आपण निर्माण केल्या पाहिजेत. विकास कार्यक्रमांतील पुष्कळशीं कामें स्थानिक स्वरूपाचीं असल्यामुळें अशीं कामें त्या त्या भागातील स्थानिक संस्थाच उत्तम त-हेनें पार पाडूं शकतील. तसें झाल्यास अधिक व्यापक व महत्त्वाचे प्रश्न सरकारी पातळीवरून हाताळणें सुकर होईल.

लहानमोठ्या पातळीवरील लोकांच्या या संस्था अर्थातच लोकशाही पद्धतीनें उभारल्या गेल्या

पाहिजेत. कारण निरनिराळ्या पातळीवर लोकशाही संस्था निर्माण झाल्याशिवाय आपण लोकशाही नेतृत्व निर्माण करूं शकणार नाहीं. लहानलहान क्षेत्रांत काम करणा-या ह्या लोकशाही संस्थांतूनच भावी नेते तयार होतील. आपण स्वीकारलेली लोकशाही पद्धत दृढमूल करण्याच्या दृष्टीनें या गोष्टीला फार महत्त्व आहे. लोकशाही जीवनपद्धतीवर आपली संपूर्ण निष्ठा आहे. आणि म्हणून आपली प्रत्येक कृति, ही निष्ठा दृढतर कशी होईल या दृष्टीनें घडली पाहिजे.

आपली आर्थिक परिस्थिति लक्षांत घेतां या संस्थांनी सेवावृत्तीनें काम करणें अत्यंत जरुरीचे आहे. हें घडून येण्यासाठीं या संस्था चालविण्याची जबाबदारी ज्या माणसांवर पडेल ती माणसें वृत्तीनें सेवाभावी आणि त्यागी असलीं पाहिजेत. अशा वृत्तीच्या मंडळींची आपणांमध्यें आज उणीव आहे अगर ती यापुढें भासेल असें मला मुळीच वाटत नाहीं. मात्र अशा व्यक्तींना काम करण्याची अधिकाधिक संधि मिळाली पाहिजे. आणि म्हणून निरनिराळ्या पातळींवर लोकशाही संस्थांची उभारणी आपण अशा प्रकारें करावयास पाहिजे कीं, त्यामुळें त्यांना आपल्या विकासयोजना सुरळीतपणें पार पाडतां येतील. आर्थिक व सामाजिक क्षेत्रांतील आपलें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं या संस्थांना अविश्रांत श्रम करावे लागतील व त्याचप्रमाणें त्यांना कल्याणकारी यंत्रणेचे महत्त्वाचे घटक बनावें लागेल. या संस्थांना सुरळितपणें कार्य करतां आलें पाहिजे असें मीं म्हटलें. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, आपल्या जबाबदा-या पार पाडण्यासाठीं त्यांना जरूर ते अधिकार असले पाहिजेत आणि त्यासाठीं योग्य प्रकारची यंत्रणाहि त्यांच्याजवळ असली पाहिजे. शिवाय त्यांच्या कामासाठी लागणारा पैसाहि त्यांच्याजवळ असला पाहिजे. तसेंच, त्यांना तांत्रिक सल्ला व जरूर तें मार्गदर्शन मिळालें पाहिजे आणि विकासाच्या विविध कार्यासाठी जनतेचें सहकार्य मिळविण्याची त्यांच्यांत ताकद असली पाहिजे. थोडक्यांत म्हणजे, विकासाच्या क्षेत्रांतील स्थानिक स्वराज्यसंस्था म्हणून ख-या अर्थानें त्यांना काम करतां आलें पाहिजे. परंतु याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचें कार्य नेहमी जनहिताला पोषक होईल या भूमिकेवरूनच झालें पाहिजे. या दृष्टीनें आपल्या कार्यक्रमपत्रिकेवर असलेल्या सर्व प्रश्नांचा आपण सखोल आणि सर्वांगीण विचार करणें फार आवश्यक आहे. लोकशाही विकेन्द्रीकरणाची ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे असें माझें ठाम मत आहे. आणि म्हणून या बाबतींत आम्हांला कोणतेहि फेरबदल घाईनें करावयाचे नव्हते. विशेषतः आपल्या राज्यांत अगोदरच निरनिराळ्या प्रकारच्या लोकशाही संस्था कार्य करीत असल्यामुळें लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीनें पुढचें पाऊल टाकण्यापूर्वी तत्संबंधी सर्व प्रश्नांचा अत्यंत बारकाईनें विचार करणें आवश्यक आहे असें आम्हांला वाटलें आणि म्हणून या समितीची नेमणूक करण्यांत आली.

आपण येथें जी चर्चा करणार आहांत तिची आपल्या अंगीकृत कार्यांत आपल्याला बरीच मदत होईल या विचारानें विकेंद्रीकरण समितीनें हा परिसंवाद घडवून आणलेला आहे. येथें होणा-या

चर्चेमुळें आपल्या ज्ञानाचा आणि अनुभव समितीला जो लाभ मिळेल त्याचा तिला चांगलाच उपयोग होईल. म्हणून आपणांस मला सांगावेंसें वाटतें कीं, येथें होणारी चर्चा खुल्या आणि मोकळ्या मनानें होऊं द्या. आपल्या मनांत कोणताहि आडपडदा न ठेवतां आपले विचार खुल्या दिलानें आपण प्रदर्शित करा. आपणांस जे निरनिराळे महत्त्वाचे प्रश्न सोडवावयाचे आहेत त्यांपैकी कांहींचा उल्लेख मीं केलाच आहे. तेव्हां आपला अधिक वेळ न घेतां या परिसंवादांत आपण सर्वांनीं उत्साहानें भाग घेऊन तो यशस्वी करावा अशी मी आपणांस आग्रहाची विनंती करतों.

लोकशाही विकेंद्रीकरण समितीनें या परिसंवादाचें उद्‌घाटन करण्यास मला बोलाविलें त्याबद्दल समितीचे आभार मानून मीं हा परिसंवाद सुरू झाला असें जाहीर करतों व या परिसंवादाला सुयश चिंतितों.

## नव्या जीवनाची साधनशक्ति

आज एक अत्यंत महत्त्वाचा अहवाल या सभागृहासमोर चर्चेसाठीं ठेवतांना मला आणि माझ्या सरकारला एक प्रकारचें मानसिक समाधान वाटत आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर ज्या कांहीं प्रमुख प्रश्नांची जबाबदारी या सरकारनें स्वीकारली त्यांत लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रश्नाचा अंतर्भाव होतो. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर दोनचार आठवड्यांतच या प्रश्नांची सरकारनें चर्चा सुरू केली व या कामासाठीं एक समिति स्थापन केली. माननीय महसूलमंत्री श्री. वसंतराव नाईक या समितीचे अध्यक्ष होते. आणि ग्रामीण विकास मंत्री श्री. गाढे, शिक्षणमंत्री श्री. बाळासाहेब देसाई, सरकारच्या अर्थखात्याचे सचिव श्री. यार्दी, सरकारच्या सहकार व ग्रामीण विकास खात्याचे सचिव व डेव्हलपमेंट कमिशनर श्री. साठे, पुणें विभागाचे कमिशनर श्री. मोहिते हे सदस्य होते. डेप्युटी डेव्हलपमेंट कमिशनर श्री. पी. जी. साळवी यांनीं समितीचे सचिव म्हणून काम पाहिलें. या समितीनें या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांची गेले पाचसहा महिने फार बारकाईनें छाननी व तपासणी केली आणि या प्रश्नाशीं संबंधित असणा-या सर्व उपप्रश्नांचा सखोल अभ्यास करून अत्यंत महत्त्वाचे निष्कर्ष असतील असा हा अहवाल सरकारला सादर केला. आभार मानले पाहिजेत म्हणून औपचारिकपणें मी या समितीचे आभार मानतों आहें असें नव्हे, तर या समितीच्या सदस्यांनी ज्या व्यासंगी बुद्धीनें आणि कर्तव्यबुद्धीने या प्रश्नाचा खोल व सूक्ष्म अभ्यास करून हा अहवाल तयार केला त्याबद्दल या सभागृहाचा नेता या नात्यानें मी त्यांना धन्यवाद देतों, आणि त्यांचे मनापासून आभार मानतों.

या अहवालांत जीं मतें मांडलेली आहेत आणि ज्या योजना सुचविण्यांत आल्या आहेत

त्यांच्यासंबंधानें या सभागृहाचें काय मत आहे ते अजमाविण्याकरितांच ही चर्चा घडवून आणण्यांत येत असल्यामुळें या अहवालाच्या गुणावगुणांसंबंधानें मी आतांच बोलणें युक्त ठरणार नाहीं. या सभागृहांत आणि सभागृहाच्या बाहेरहि या महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीं चर्चा झाल्यावर, जें लोकमत व्यक्त होईल तें लक्षांत घेऊनच सरकारला त्यासंबंधीं अंतिम निर्णय घ्यावा लागणार आहे. आणि म्हणून या अहवालाच्या गुणावगुणांसंबंधानें, त्यांत व्यक्त करण्यांत आलेल्या मतांसंबंधानें आणि त्यांत मांडलेल्या योजनांसंबंधानें या सरकारनें अद्याप कांहींहि मत बनविलेलें नाहीं. अर्थात् विकेंद्रीकरणाचें मूळ तत्त्व या सरकारनें स्वीकारलेलें आहे यांत शंका नाहीं. पक्षीय दृष्टिकोनांतून या प्रश्नावर चर्चा व्हावी अशी या सरकारची इच्छा नाहीं. मी ज्या पक्षाचा नेता आहें त्या पक्षाच्या सदस्यांना या प्रश्नावर आपलें मत व्यक्त करण्याची पूर्ण मोकळीक आहे. पक्षाचें असें कोणतेंहि बंधन या चर्चेच्या वेळीं त्यांच्यावर घालण्यांत आलेलें नाहीं. विकेंद्रीकरणाचें जें मूळ तत्त्व या सरकारनें स्वीकारलेलें आहे, त्याच्या प्रकाशांत विकेंद्रीकरणाची आपली योजना कोणत्या स्वरूपाची असावी यासंबंधीं खुली चर्चा या ठिकाणीं व्हावी अशी आमची इच्छा आहे. मला अशी आशा आणि खात्री आहे कीं, या सभागृहांतील सगळ्या पक्षांचे मान्यवर नेते आणि सदस्य याच दृष्टीनें व याच भूमिकेवरून या प्रश्नाची चर्चा करतील. हा प्राथमिक खुलासा झाला.

एकदोन प्रमुख गोष्टींबद्दल मी जरूर बोलूं इच्छितों. लोकशाही विकेंद्रीकरणाचा निर्णय ज्या आमच्या पक्षानें घेतला आहे त्या पक्षातर्फे मी बोलत आहें. परंतु हा निर्णय कोणत्याहि पक्षानें घेतलेला असो, एका प्रमुख गोष्टीचा आपणांस, विचार करावयास पाहिजे. ती गोष्ट म्हणजे लोकशाही तत्त्वाबरोबर ज्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांचा आमच्या देशाच्या संविधानांत उल्लेख केलेला आहे तीं उद्दिष्टें आपण स्वीकारलीं आहेत. या  सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांचा स्वीकार केल्यानंतर, लोकशाहीचें संघटनात्मक स्वरूप कसें असावें हा एक अनुभवाचा प्रश्न आहे. परंतु लोकशाहीचा विचार आणि आचार यांचा मेळ घालण्याचा या देशांत प्रामाणिक प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. आपल्या घटनेंत लोकशाहीचें मूलभूत तत्त्व आपण स्वीकारलें असलें तरी जें नवीन समाजसूत्र आपणांला निर्माण करावयाचें आहे तें सर्वसामान्य जनतेच्या हिताचें व्हावें म्हणून त्याला लोकशाही स्वरूप कसें देतां येईल या दृष्टीनें प्रयत्न होणें अत्यावश्यक आहे.

प्रत्यक्ष राज्यकारभाराच्या दृष्टीनें, लोकशाही संघटनांचें कृतीकरण कोणत्या रूपांत करावें यासंबंधीं सर्व देशभर चर्चा चालू आहे. या गोष्टीलाच अनुलक्षून आम्हांला पंचायत राज्य निर्माण करावयाचें आहे, असें म्हटले जातें. परंतु या शब्दप्रयोगाच्या बाबतींत बरेच गैरसमज निर्माण झाले आहेत. कांहीं लोकांना असें वाटतें कीं, पंचायतींची कल्पना आपल्या देशांत फार जुनी आहे. पण मी असें सांगूं इच्छितो कीं, ग्रामपंचायतींची कल्पना आपल्या देशांत जुनी असली तरी आजच्या काळांत

तिला एक नवीन अर्थ प्राप्त झाला आहे. या शब्दप्रयोगाच्या बाबतींत माझा व्यक्तिशः जो विचार आहे तो असा कीं, आमचें जें ग्रामीण जीवन आहे तें संघटित करून आम्हांला एक नवें ग्रामीण जीवन निर्माण करावयाचें आहे. ग्रामीण जीवन व त्या जीवनाची संघटना म्हटल्याबरोबर कांहीं मंडळींच्या डोळ्यांसमोर भूतकाळाचें चित्र उभें राहतें. परंतु माझ्या नजरेपुढे केवळ भूतकाळांतीलच ग्रामीण जीवनाचें चित्र उभें राहतें असें नाही. अर्थात् भूतकाळांतील ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्यांचें जरूर आकर्षण राहणार आहे. भूतकाळांतील चांगल्या परंपरा आहेत त्यांचा विसर पडून चालणार नाहीं हे मलाहि मान्य आहे. परंतु ज्या वेळीं ग्रामीण जीवन आणि पंचायत राज्य या शब्दांचा आपण उच्चार करतों त्या वेळीं एक गोष्ट लक्षांत घ्यावयास हवी ती ही कीं, आज दुनियेमध्ये ज्या नव्या शक्ति निर्माण झाल्या आहेत आणि जें नवें सामर्थ्य निर्माण झालें आहे त्या नव्या शक्तींनी आणि त्या नव्या सामर्थ्यानें आपल्या सामाजिक जीवनांत प्रवेश केला आहे. या शक्तींच्या आणि सामर्थ्यांच्या मदतीनें घडणारें उद्याच्या नवीन ग्रामीण जीवनाचें मी एक चित्र पाहत आहें. ग्रामपंचायत म्हणजे कुठल्या तरी म्हाता-या माणसाच्या नेतृत्वाखालीं तुम्हीआम्ही चांगले या भावनेंने काम करणारी एक संस्था अशा त-हेचें ग्रामपंचायतीचें चित्र माझ्या डोळ्यापुढें नाहीं. ग्रामपंचायत म्हटली म्हणजे माझ्या डोळ्यापुढे नवीन त-हेचें शिक्षण आणि नवीन त-हेच्या शक्ति उभ्या राहतात.

खेड्यापाड्यांतून सहकारी चळवळ आज सर्वत्र पसरत असून औद्योगिक विकासासाठी विद्युत शक्ति देण्यासंबंधीचे विचारच खेड्यापाड्यांत पोहोंचत आहेत असें नव्हे, तर या विचारांच्या पाठोपाठ विद्युत शक्तीहि खेड्यापाड्यांत जाऊन पोहोंचत आहे. त्याचप्रमाणें खेड्यापाड्यांतील जीवनावर फार महत्त्वाचा परिणाम करणारें नागरिक जीवनाचें आकर्षण लोकांत निर्माण झालें आहे. ह्या ज्या सर्व शक्ति निर्माण झाल्या आहेत त्यांचा विचार नजरेसमोर ठेवून ग्रामीण जीवनांतील लोकशाही संघटना आम्हांला उभी करावयाची आहे.
लोकशाही विकेंद्रीकरणाच्या पाठीमागचा हा मूळ विचार, हा खरा विचार आहे. आपल्यासमोर जीं आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टें आहेत तीं कोणत्या पद्धतींची संघटना निर्माण केली असतां साध्य होऊं शकतील या दृष्टीनें या देशांत जो विचार झाला, त्या विचारांतूनच लोकशाही विकेंद्रीकरणाचा मार्ग निघाला. त्याचबरोबर ब्रिटिश अमदानीच्या काळांत लोकशाहीच्या ज्या प्रवृत्ति येथें निर्माण झाल्या त्यांतील कांहीं प्रवृत्ति हाताशीं धरून आपल्या देशांतील लोकशाही, सत्तेच्या विकेंद्रीकरणाने अधिक मूलगामी रीतीनें गतिमान करतां येईल असाहि एक विचार प्रसूत झाला. विकेंद्रीकरणाच्या ह्या मूळ विचाराचा विस्तार करण्यासाठीं गेल्या चार-पांच वर्षात या देशांत अनेक त-हेची चर्चा झाली. त्यानंतर वेगवेगळ्या राज्यांत ग्रामपंचायत राज्याच्या रूपानें सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा प्रयोग सुरू करण्यात आला. आतांपर्यंत राजस्थान, मद्रास आणि आंध्र या राज्यांत हा प्रयोग सुरू करण्यांत आला आहे. परंतु मला असें सांगावयाचें आहे कीं, अमक्या ठिकाणीं

अमकी गोष्ट झाली आहे म्हणून लोकशाही विकेंद्रीकरण समितीनें त्या गोष्टीचें अनुकरण केलेलें नाहीं. तशा त-हेचें अनुकरण करावें असा आग्रहहि आपण धरतां कामा नये. इतर राज्यांत त्या दृष्टीनें चाललेल्या प्रयोगाचें नुसतें अनुकरण न करतां ज्या त्या विभागांतील अनुभव, परंपरा आणि राज्यकारभाराची परिस्थिति या गोष्टींचा विचार करून समितीनें हा अहवाल तयार केला आहे. त्याचप्रमाणें हा अहवाल तयार करतांना विकेंद्रीकरणाच्या प्रश्नाबाबत समितीकडे आलेल्या सूचनांचा विचारहि समितीकडून झालेला आहे.

विकेंद्रीकरणाच्या प्रश्नासंबंधीं या राज्यांत एकदोन त-हेचे विचारप्रवाह व प्रवृत्ति आढळून येतात. त्यांतील एक विचारप्रवाह असा आहे कीं, खेड्यापाड्यांतील ग्रामपंचायतींना सत्ता देण्याची फारशी आवश्यकता नाहीं. याचें कारण असें कीं, खेड्यापाड्यांतील ग्रामपंचायती ह्या निव्वळ अडाणी माणसांच्या हातांत जाणा-या संघटना असून त्यांत थोडासा जातीयवाद व सरंजामशाही वृत्ति आहे. त्याचप्रमाणें खेड्यापाड्यांत थोडेंसे गुंडगिरीचें वातावरणहि असतें. तेव्हां विकेंद्रीकरणामुळें अशा लोकांच्या हातांत सत्ता गेल्यास, काय घडेल ते सांगण्याची आवश्यकता नाहीं, परंतु माझ्या मतें अशा प्रकारचे जे विचार व्यक्त केले जातात किंवा विचार मांडण्याची ही जी प्रवृत्ति आहे ती सामाजिक जीवनाशीं सुसंगत नाहीं. कारण या देशांत लोकशाहीची वाढ करावयाची असल्यास लोकशाही विकेंद्रीकरणाशिवाय दुसरा मार्ग नसल्यामुळें विकेंद्रीकरणासंबंधींचा निर्णय आपण थोडा ध्येयपूर्वक घेतला पाहिजे. आणि या निर्णयानुसार ग्रामपंचायतींना अधिक सत्ता देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

विकेंद्रीकरणाच्या बाबतींत मीं मागें कांहीं सूचना केल्या होत्या. त्यावेळीं मीं असें म्हटलें होतें कीं, आम्हांला सत्तेचें विकेंद्रीकरण करावयाचें आहे, सत्तेचें विसर्जन करावयाचें नाहीं. हीच गोष्ट अगदीं साध्या भाषेंत सांगावयाची झाली तर असे म्हणतां येईल कीं जिच्यामुळें खुर्दा निर्माण होईल अशा त-हेनें आम्हालां सत्तेची वांटणी करावयाची नाहीं. कारण आम्हांला ज्या जबाबदा-या वाढवावयाच्या आहेत त्यांतील राज्य चाललें पाहिजे ही मुख्य जबाबदारी आहे. या संदर्भात विकासाच्या ज्या प्रमुख जबाबदा-या आहेत त्या कशा पार पाडतां येतील हें प्रामुख्यानें पाहिलें पाहिजे. यासंबंधीं जरूर ती पाहणी करण्याचा अधिकार आणि जिम्मेदारी शासनाची आहे. तेव्हां या दृष्टीनें, ग्रामपंचायत ही शेवटची संघटना आणि राज्यसंघटना ही सर्वांत वरची संघटना या दोन संघटनांच्या मध्यें कोणत्या आणि किती संघटना असाव्यात, त्यांचे अधिकार काय असावेत, त्यांच्या मर्यादा काय असाव्यात, हा प्रश्न निर्माण होतो. या बाबतींत मतभेद होण्याची शक्यता आहे. परंतु या गोष्टी ठरवितांना दोन कसोट्या आपण समोर ठेवल्या पाहिजेत. या संघटनांना सत्ता दिली पाहिजे हें निश्चित. पण ही सत्ता सुपूर्द करतांना कोणता उद्देश आपल्यासमोर असला पाहिजे याचाहि विचार प्रामुख्यानें आपण केला पाहिजे.

सत्तेचे विकेंद्रीकरण होत असतांना राज्य सरकारांनीं स्वीकारलेलीं उदिष्टें लक्षात घेऊन या संघटना म्हणजे त्या उद्देशपूर्तीची साधनें बनलीं पाहिजेत. अत्यंत सावधपणें मी हें म्हणत आहें. ज्या पक्षाच्या हातांत राज्य सरकारच्या कारभाराचीं सूत्रें असतील त्या पक्षाच्या उद्दिष्टांच्या पूर्तीचें साधन या संघटना बनाव्यात असा माझा मुळींच हेतु नाहीं. विकासाची जबाबदारी आपल्याला या संघटनांवर टाकावयाची आहे. सुस्थिर शासनाची कल्पना या पाठीमागची आहे. शांतता राहिली, कणखरपणा राहिला तरच विकासाच्या योजना यशस्वीपणें पार पडणें शक्य आहे. या दोन कसोट्या समोर ठेवून आपल्याला लोकशाही विकेंद्रीकरणाचा विचार करावा लागेल. या दोन कसोट्यांवरच आपल्याला सर्व गोष्टींचा निर्णय घ्यावा लागणार आहे. सर्वसाधारणतः विकेंद्रीकरणाच्या पाठीमागची जी भूमिका माझ्या मनाशीं मीं कल्पिलेली आहे ती मीं या ठिकाणीं थोडक्यांत सांगितली आहे. या अहवालावरील चर्चेला सुरुवात करून देतांना यापेक्षा अधिक कांहीं सांगावें असें मला वाटत नाहीं. या अहवालाच्या रूपानें अत्यंत महत्त्वाचा मसुदा आपल्यापुढें ठेवण्यांत आलेला आहे. या अहवालावर मोकळेपणानें चर्चा होऊन त्यांतून सरकारला निश्चितपणें मार्गदर्शन होईल अशा प्रकारची अपेक्षा मीं बाळगतों. त्या दृष्टीनेंच माझे विचार मी सभागृहापुढे मांडले आहेत.

## सीमा प्रश्न

मुंबई राज्याच्या निर्मितीनंतर या राज्याच्या दक्षिण आणि कांहीं अंशीं पूर्व भागामध्यें सीमेचा प्रश्न निर्माण झाला. सीमेचा हा प्रश्न कोणत्या तत्त्वावर सोडवावा हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. या बाबतींत आपली बाजू मांडण्याच्या दृष्टीनें या सरकारनें कांहीं तत्त्वें निश्चित केलीं आहेत. त्यांपैकी पहिलें तत्त्व सलगपणा म्हणजे ज्याला इंग्रजींत आपण 'कॉंटिग्युइटी' म्हणतों तें असून दुसरें तत्त्व बहुमत व सर्वसामान्य जनमत हें आहे. आणि तिसरें तत्त्व म्हणजे भाषेच्या दृष्टीनें लोकसंख्येचा जास्तींत जास्त व्यवहार्य आणि लहानांत लहान असा घटक जो खेडेगांव आहे त्यास मान्यता द्यावी हें आहे. या तीन तत्त्वांच्या आधारावर आपली बाजू मांडण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आणि त्याप्रमाणें ती झोनल कौन्सिलपुढें मांडलीहि आहे.

सीमेचे हे प्रश्न विचारविनिमयानें, तडजोडीनें आणि सामोपचारानें सोडविण्याचा एक नवा प्रघात हिंदुस्तान सरकार पाडूं इच्छितें. आंध्र आणि मद्रास या राज्यांच्या दरम्यान या त-हेचा एक प्रयत्न यशस्वी झाल्याची आपल्याला कल्पना आहेच. "पाटसकर निवाडा" म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो तो "पाटसकर निवाडा" या राज्यांच्या सीमेच्या प्रश्नांतून तयार झाला आहे. म्हणून या

प्रश्नाची औपचारिक रीत्या चर्चा करण्यापेक्षां अनौपचारिक रीत्या चर्चा झाली तर ती अधिक फलदायी होईल अशी या प्रश्नांशीं संबंध असणा-या सर्व पक्षांची समजूत असल्यामुळें मुंबई व म्हैसूर राज्यांमधील सीमाविषयक प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें अनौपचारिक प्रयत्नांचे पहिले पाऊल नुकतेंच टाकण्यांत आलें त्यावेळीं म्हैसूरच्या मुख्य मंत्र्यांशीं माझी जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये आम्हीं या प्रश्नाच्या सर्व बाजूंचा प्राथमिक विचार केला. माझी अशी इच्छा आहे कीं, या सभागृहामध्यें या चर्चेच्या बाबतींत निर्णयात्मक असें कांही बोललें जाऊं नये. कारण ज्यांच्याशीं आपण ही चर्चा करतों त्यांच्या मनामध्यें हा प्रश्न सुटावा असा सद्भाव आहे हें गृहीत धरूनच आपल्याला काम करावें लागेल. आणि म्हणून ही चर्चा पुढें चालू ठेवण्याच्या मार्गामध्यें अडचण निर्माण होईल अशा प्रकारची कोणतीहि गोष्ट आपल्याकडून होऊं नये अशी माझी इच्छा आहे.

या प्रश्नासंबंधीं मला किती अस्वस्थता वाटते असा एक प्रश्न उपस्थित केला गेला. अर्थात् अस्वस्थता मोजण्याचें एखादें यंत्र निघालें आहे कीं काय तें मला माहीत नाहीं. परंतु या प्रश्नाची निकड या राज्य सरकारला वाटली म्हणूनच फार तांतडीने हा प्रश्न उपस्थित करण्याचें ठरविलें गेलें आणि त्याप्रमाणे या प्रश्नाकडे हिंदुस्तान सरकारचें लक्ष वेधण्याचा शक्य तो प्रयत्न केला गेला. या बाबतींत आजपर्यंत काय घडलें आहे तें मीं थोडक्यांत दिग्दर्शित केलें आहे. यापेक्षां या वेळीं अधिक हकिकत सांगण्यासारखी नाहीं म्हणून सांगत नाहीं. यामध्यें, कांही नवीन घडलें आहे आणि तें सभागृहापासून बाजूला ठेवावें किंवा तें सभागृहाला समजूं नये, असा हेतु नाहीं, परंतु कांहीं गोष्टी अकारण बोलल्या गेल्या तर त्यामुळें निष्कारण अडचणी निर्माण होतात असा माझा अनुभव आहे. परंतु मी सभागृहाला सांगूं इच्छितों कीं, आम्हांला या प्रश्नांबद्दल तीव्र तळमळ वाटते, एवढेंच नव्हे तर सीमा विभागामध्यें राहणारे जे मराठी भाषिक आहेत त्यांच्या भावना या बाबतींत तीव्र स्वरूपाच्या आहेत याचीहि आम्हांला जाणीव आहे. त्यांना या बाबतींत दैनंदिन अडचणीहि सहन कराव्या लागत असतील. या अडचणींतून त्यांची लौकरच मुक्तता व्हावी अशी आमची इच्छा आहे.

राज्यांत अकारण अल्पसंख्य निर्माण करून त्यांचे प्रश्न निर्माण करावयाचे आणि नंतर ते सोडविण्याचा प्रयत्न करावयाचा यामध्यें माझ्या मतें कुठलाहि व्यवहार्य शहाणपणा नाहीं. या दृष्टीनें कोणत्याहि राज्यांत असे जे कृत्रिम प्रश्न असतील ते कमी करण्याचा प्रयत्न करणें तेथील राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें अत्यंत योग्य आणि व्यवहार्य ठरेल. आपली मूळ बाजू या गोष्टीवरच आधारून मांडण्यांत आली आहे. मला आशा आहे कीं, हा प्रश्न समजुतीनें सुटेल आणि हा प्रश्न समजुतीनें सोडविण्याचा प्रयत्न करण्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं. कारण एकराष्ट्रीयत्वाच्या भूमिकेवरून एकमेकांचे गैरसमज दूर करून समजुतीच्या मार्गानेंच आम्हीं हे प्रश्न सोडविलें पाहिजेत.

मुंबई राज्यामध्यें जो अल्पसंख्य कानडी समाज आहे त्याच्या बाबतींत देखील याच धोरणाचा अवलंब करण्यास आम्ही तयार आहोंत. म्हैसूर राज्यांतील मराठी भाषिक या राज्यांत परत यावेत अशी जेव्हां आम्ही मागणी करतो तेव्हां या राज्यांतील कानडी भाषिक तितक्याच आनंदानें आणि मोकळ्या मनानें त्यांच्या राज्यांत परत जावेत अशीच आम्हीं त्यांच्यासंबंधीं भावना ठेवली आहे. हीच दृष्टि समोर ठेवून आम्हीं हा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

आमचा सेनापति दुस-या पक्षाला जाऊन मिळाला अशा त-हेचा उल्लेख येथें केला गेला. परंतु ज्यांनीं असा उल्लेख केला त्यांचें सेनापत्य करण्याचा प्रयत्न मीं कधीं केला नाहीं. मी त्यांचा सेनापति होऊं इच्छित नाहीं. मी सेनापति फक्त माझा आहें आणि ज्यांनी मला मानलें त्यांचा आहे. ज्यांचा मी सेनापति होऊं इच्छित नाहीं त्यांचें सेनापत्य करण्याचा प्रयत्न मी करणार नाहीं. माझ्या बुद्धीला जें पटेल आणि माझ्या भावनेला जें समजेल तें प्रामाणिकपणानें आणि मोकळेपणांनें करण्याचा व सांगण्याचा मी प्रयत्न करीन. आणि जी गोष्ट घडेल ती या सभागृहाला सांगण्यानें या प्रश्नांचे पाऊल पुढें पडणार आहे असें जेव्हां मला वाटेल, तेव्हां तशी ती सांगण्याचा, सभागृहाच्या नेतेपदाच्या जबाबदारीला अनुलक्षून मी जरूर प्रयत्न करीन. एवढीच गोष्ट मला या वेळी सांगणें शक्य आहे.

हें करीत असतांना, हा प्रश्न सुटण्यांच्या दृष्टीनें पुन्हा एकदां मी सर्वांना सबुरीचा सल्ला देऊं इच्छितों. हा एक पेशन्सचा खेळ आहे, असें आपण समजा. पेशन्सच्या खेळांत जो जास्त दम धरतो तोच बहुतेक अखेर जिंकतो. आम्ही तुरुंगांत असतांना असें म्हणत असूं कीं, जो जास्त दम खावयाला शिकतो तोच जास्त गम खाऊं शकतो. पुष्कळ वेळां कठीण समस्या सोडवितांना शांतपणें आपलें म्हणणें मांडण्याचा प्रयत्न करण्यानें प्रश्न सोडवावयाला मदत होते. अर्थात् त्यानें प्रश्न सुटतोच असें मी म्हणत नाहीं.

(विधानसभा : १५ एप्रिल १९५८)

हा महत्त्वाचा प्रश्न या सन्माननीय सभागृहापुढें ठरावरूपाने मांडण्याची जी आवश्यकता निर्माण झाली आहे त्या पाठीमागे ब-याच काळचा इतिहास आहे. त्याची हकिकत मी आज सभागृहासमोर मांडूं इच्छितों. १९५५ सालीं राज्यपुनर्रचनामंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाला आणि तेव्हांपासून आजपर्यंत, सीमेचा हा प्रश्न महाराष्ट्राच्या दृष्टीनें अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणून चर्चिला जात आहे. त्यासंबंधानें लोकसभेंत, या राज्याच्या उभय सभागृहात आणि बाहेरहि अनेक वेळां चर्चा झालेली आहे. त्याच चर्चेच्या आणि निष्कर्षित तत्त्वाच्या अनुरोधानें, राज्य-पुनर्रचनेनंतर जें राज्य

अस्तित्वांत आलें त्यानें या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वीकारला. या सीमाप्रश्नाबाबत मुंबई आणि म्हैसूर या राज्यांनीं, या दोन राज्यांसाठीं जें विभागीय मंडळ तयार करण्यांत आलें होतें त्यांत चर्चा करावी, एवढेंच नव्हे तर अशी चर्चा करून तो प्रश्न सोडविणें त्यांचें कर्तव्य आहे, असें मानलें गेलें होतें.

१९५७ च्या जूनमध्यें या प्रश्नासंबंधीं मुंबई सरकारतर्फे एक निवेदन सादर करण्यांत आलें. आज या ठरावाच्या अनुरोधानें विभागीय मंडळापुढें या सरकारनें ज्या तत्त्वाचा आविष्कार करून आपले म्हणणें मांडलें होतें तें तत्त्व आणि आपण सादर केलेलें निवेदन सभागृहासमोर ठेवण्यांत आलें आहे, सभागृहाच्या स्वाधीन करण्यांत आलें आहे. यावरून हें निश्चित होईल कीं, या प्रश्नासंबंधानें या सरकारनें आपली भूमिका सर्वसामान्य तत्त्वावर आधारलेली आहे. अशा प्रकारें आपलें म्हणणें विभागीय मंडळापुढें मांडल्यानंतर ज्या कांहीं चर्चा झाल्या त्यांचा त्रोटक वृत्तान्त मी सभागृहाला सांगूं इच्छितों.

हें निवेदन सादर केल्यानंतर त्यावेळचे म्हैसूर राज्याचे मुख्यमंत्री श्री. निजलिंगप्पा यांच्याशीं पत्रव्यवहार सुरू झाला. त्या वेळीं, या सगळ्या प्रश्नांतून कारवारचा प्रश्न सोडून द्या, बेळगांवचा प्रश्न सोडून द्या, निपाणीचा प्रश्न सोडून द्या आणि बाकीच्या प्रश्नांसंबंधी आपण ६० टक्के लोकवस्तीचें प्रमाण धरून विचार करूं, अशी श्री. निजलिंगप्पा यांनीं सूचना केली. ही गोष्ट या सरकारला स्वीकारतां येणें शक्यच नव्हतें आणि त्याप्रमाणें या संबंधांतील आपली भूमिका सुस्पष्ट शब्दांत या सरकारनें म्हैसूर सरकारला कळविली. एवढें कळविल्यानंतर स्वस्थ बसून हा प्रश्न तेथेंच सोडून देणें तर शक्य नव्हतें आणि तसा सोडून देण्यासारखा तो प्रश्नहि नव्हता. या प्रश्नाची कांहींतरी तड लावणें निकडीचें होतें, आणि म्हणून त्याचा पाठपुरावा करण्याची या सरकारला आवश्यकता वाटली.

या संबंधांत एक गोष्ट मी प्रामुख्यानें सभागृहाला सांगू इच्छितों. प्रश्न सुटण्यामध्यें मूळ अडचण अशी आहे कीं, म्हैसूर सरकारला या सीमा-प्रश्नासंबंधानें फारसा जिव्हाळा वाटत नाहीं. कारण १९५६ सालीं भारतांतील राज्यांची पुनर्रचना झाल्यानंतर म्हैसूर राज्याला न्यायानें जें मिळावयास हवें होतें त्यापेक्षां दहा टक्के जास्तच मिळालेलें आहे. म्हैसूर राज्याची मागणी केवळ शंभरच नव्हे तर एकशेंदहा टक्क्यानें पूर्ण झालेली आहे. स्वाभाविकपणें, हा जो वादग्रस्त प्रश्न आहे तो सुटला पाहिजे हें मान्य करणें म्हैसूर सरकारला हिताचें वाटलें. त्याचप्रमाणें या प्रश्नाची सोडवणूक करण्यासंबंधानें त्या सरकारला फारसा जिव्हाळा वाटला नाहीं, वाटत नाहीं ही गोष्ट खरी आहे. परंतु या सरकारची परिस्थिति तशी नाहीं. या सरकारचे हितसंबंध या प्रश्नांत गुंतलेले असल्यामुळें हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिनें सगळे प्रयत्न या सरकारला करावयाचे होते व करावयाचे आहेत.

पण हा प्रश्न समझोत्याच्या वातावरणांत, विधायक प्रयत्नांच्या साहाय्यानें सुटावा अशी या सरकारची इच्छा आहे.

परंतु कोणताहि प्रश्न समझोत्याच्या वातावरणांत, कटुतेची भावना निर्माण न होतां सुटण्यासाठीं, त्या प्रश्नांशीं संबंधित असणा-या दोन्ही बाजूंना त्या प्रश्नासंबंधाने जिव्हाळा असावा लागतो, तो प्रश्न लवकर सुटला पाहिजे अशी निकड असावी लागते. परंतु या प्रश्नांसंबंधानें दुर्दैवानें तशी परिस्थिति नाहीं. एवढेंच नव्हे तर हा प्रश्न लवकर सुटल्यास त्यामुळें एका बाजूला अडचणी वाढण्याचा संभव आहे. अशा परिस्थितींत सर्व बाजूंनीं समतोलपणें विचार करून या सरकारला मार्ग काढावयाचा होता. त्यामुळें, म्हैसूर राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. निजलिंगप्पा यांनीं मीं आत्तांच सांगितल्याप्रमाणें जेव्हां उत्तर दिलें, त्या वेळीं स्वाभिमानाची पहिली प्रतिक्रिया अशी झाली कीं, आता यापुढें चर्चा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, चर्चा करतां कामा नये. परंतु असें म्हणून भागण्यासारखें नव्हतें. प्रश्न तर सोडवावयाचा होता. म्हणून श्री. निजलिंगप्पा यांच्याशीं मुंबईत झालेल्या चर्चेतून जेव्हां कांहीं निष्पन्न झालें नाहीं तेव्हां या सरकारनें असा विचार केला कीं, दोन्ही राज्यांच्या मुख्य मंत्र्यांनी आपसांत चर्चा करण्यापेक्षां दोन्ही राज्याच्या मुख्य चिटणीसांनीं या प्रश्नासंबंधानें आपसांत चर्चा करावी. त्याप्रमाणें मुंबई राज्याचे त्यावेळचे मुख्य चिटणीस श्री. पंजाबी यांना, म्हैसूर राज्याच्या मुख्य चिटणीसांशीं चर्चा करण्याकरितां मीं बंगलोरला पाठविले. परंतु त्या चर्चेतूनहि कांहीं निष्पन्न झालें नाहीं.

ही चर्चा १९५८ च्या मे महिन्यांत झाली. त्यानंतर म्हैसूर सरकारच्या मंत्रिमंडळांत फेरबदल झाला आणि श्री. निजलिंगप्पा यांच्या जागीं श्री. जत्ती हे म्हैसूर राज्याचे मुख्यमंत्री झाले. साहजिकच या प्रश्नासंबंधीं श्री. जत्ती यांच्याशीं चर्चा करणें प्राप्त होतें. या संबंधांत प्रथम मी सभागृहाला ही गोष्ट सांगू इच्छितों की, मुंबई आणि म्हैसूर या दोन राज्यांच्या सीमेसंबंधींचा वाद हा एक गौण प्रश्न आहे, किरकोळ प्रश्न आहे अशी श्री. जत्ती यांची भूमिका आहे. श्री. जत्ती यांच्याशीं ८ जुलै १९५८ रोजीं सीमाप्रश्नासंबंधानें माझी प्रथमतः चर्चा झाली. आमची चर्चा सुरू झाल्यानंतर पहिल्या पांच मिनिटांच्या आंतच श्री. जत्ती यांनी सांगून टाकलें कीं, तुम्ही निपाणी घ्या आणि हा प्रश्न सोडवून टाका. श्री. जत्ती यांच्या पूर्वी मुख्यमंत्री असणारे श्री. निजलिंगप्पा यांची तर तेवढेंहि द्यावयाची तयारी नव्हती. परंतु श्री. जत्ती यांनीं निपाणी देतों असें म्हणण्याचा उदारपणा तरी दाखविला. अर्थात ही गोष्ट मला पटणें शक्यच नव्हतें. मीं त्यांना स्पष्ट सांगितले कीं, माझ्या सरकारतर्फे मी तुमच्याकडे कांहीं गांवांची भिक्षा मागत नाहीं. न्यायानें आणि सर्वमान्य अशा तत्त्वांना धरून जो कांहीं प्रदेश मुंबई राज्यांत समाविष्ट व्हावयाचा असेल तो घेण्यास आणि त्याच न्यायानें जो प्रदेश म्हैसूर राज्यांत जावयाचा असेल तो देण्यास मी या ठिकाणीं आलेलों आहे. तत्त्वाला आणि न्यायाला धरून जीं गांवें अथवा जो भाग म्हैसूर राज्यांत जावयास हवा

असेल तो तुम्ही घ्या. इतकें बोलणें झाल्यानंतर आमची ती चर्चा संपली.

याप्रमाणें १९५८ सालीं झालेल्या या चर्चेवरून एक गोष्ट स्पष्ट झाली कीं, हा प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत आमच्या दोघांचा दृष्टिकोन सारखा नसल्यामुळें हा प्रश्न विभागीय मंडळाकडे सोंपविला पाहिजे. मीं सुरुवातीलाच सांगितलें कीं या प्रश्नांसंबंधानें म्हैसूर सरकारला फारसा जिव्हाळा नाहीं, हा प्रश्न सुटला पाहिजे अशी निकड किंवा गरज नाहीं. कारण त्या सरकारचे हितसंबंध या प्रश्नांत गुंतलेले नाहींत अशी परिस्थिति आहे. हा प्रश्न सोडविण्याची निकड आणि गरज या सरकारला आहे. परंतु झालेल्या वाटाघाटींच्या फलनिष्पत्तीवरून या सरकारला हें कळून चुकलें कीं, या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनीं चर्चा करून हा प्रश्न सुटणार नाहीं. परिस्थिति काय होती हें, ज्यांना ज्यांना म्हणून या प्रश्नाबद्दल जिव्हाळा आहे, त्यांनीं त्यांनीं नीट समजून घेतले पाहिजे आणि म्हणूनच शक्य तितक्या विस्तारानें मीं या प्रश्नाची पूर्वपीठिका सांगितली. या प्रश्नानें काय काय वळणें घेतली त्याचा हा आजपर्यंतचा इतिहास आहें. जेव्हां श्री. जत्ती असें म्हणतात कीं हा प्रश्न गौण आहे असें समजून चर्चा करा, तेव्हां त्याचा अर्थ हाच कीं, ही मागणी मुंबई सरकारने सोडून द्यावी. या गोष्टीला मुंबई सरकार आणि मी कधींहि मान्यता देऊं शकणार नाहीं. हा प्रश्न गौण आहे हे आम्हाला मुळींच मान्य नाहीं. हा प्रश्न आम्हांला न्यायाने आणि समजुतीच्या वातावरणांत सोडवावयाचा आहे आणि तसा तो सुटेल अशी आम्हांला आशा आहे. अमुक इतक्या अवधीच्या आंत तो सुटेल अशी खात्री देण्याकरितां मी हा ठराव घेऊन आपल्यासमोर उभा राहिलेला नाहीं. हा प्रश्न सोडविण्याची आणि तो न्यायानें सोडविण्याची इच्छा मात्र प्रखर आहे. परंतु तो केव्हां सुटेल हें सांगणें मी इतिहासाच्या स्वाधीन करणार आहें. अर्थात् इतिहास हा मनुष्य आपल्या कर्तृत्वानें घडवीत असतो हें मला मान्य आहे. परंतु तें कर्तृत्व विधायक असावें लागतें एवढीच उपसूचना मी त्याला सुचवितों.

या प्रश्नाची पार्श्वभूमि मीं थोडक्यांत सभागृहासमोर ठेवली आहे. या प्रस्तावाच्या द्वारें हा प्रश्न आज या सभागृहांत उपस्थित करण्याचें कारण प्रस्तावांतच स्पष्ट करण्यांत आलेलें आहे. मुंबई राज्याची पुनर्रचना करण्याचा प्रश्न आज पुन्हा एकदां निर्माण झालेला आहे. तेव्हां या वेळेला मुंबई राज्याच्या दक्षिण सीमेवरील वादग्रस्त भागासंबंधींचा हा प्रश्न जर सुटला तर एका फार मोठ्या जनसमूहाला न्याय मिळाल्याचे समाधान लाभणार आहे. आणि म्हणून या वेळेला हा प्रश्न सुटावा अशी माझ्या मनाची अपेक्षा आहे, इच्छा आहे. या प्रश्नासंबंधानें गेल्या दीड वर्षांत जें वातावरण या राज्यांत निर्माण झालें आहे तें भारत सरकारपुढें येणे आवश्यक आहे या हेतूनें मीं हा ठराव आणलेला आहे.

माझी स्वतःची भावना अशी आहे कीं, या प्रश्नाची कोंडी-स्टेलमेट-होतां उपयोगाचें नाहीं. कोठें तरी

हा प्रश्न मोकळा ठेवला पाहिजे, त्याची सोडवणूक करण्यास वाव ठेवला पाहिजे, त्याचा सारखा पाठपुरावा केला पाहिजे अशी परिस्थिति आहे. हा प्रश्न लवादाकडे सोंपवावा अशीहि एक अनौपचारिक सूचना समोर आली होती आणि लवादापुढें प्रश्न नेण्यांतील धोका पत्करून्हि मीं लवाद नेमण्याच्या तत्त्वाला मान्यता दिली होती. अर्थात् पाटसकर निवाड्याप्रमाणेच या प्रश्नाचा उलगडा करण्यांत यावा अशीच भूमिका या सरकारतर्फे लवादापुढें मांडण्यांत आली असती. खुद्द पाटसकर निवाडा हाच एक लवादानें दिलेला निकाल आहे आणि म्हणून लवादाची सूचना मीं तत्त्वरूपाने स्वीकारली होती. परंतु दुस-या बाजूतर्फे तिला नकार देण्यांत आला.

त्यानंतर भारत सरकारनें म्हैसूर आणि मुंबई सरकारांना अशी एक सूचना केली कीं, दोन्ही बाजूचे दोन दोन सदस्य असणारी एक मध्यस्थ समिति-मीडिएशन कमिटी-निर्माण करावी व तिच्या मार्फत हा प्रश्न सोडवावा. कोणत्याहि प्रकारें कां होईना, परंतु हा प्रश्न सुटावा अशी माझी इच्छा असल्यामुळें मीं मध्यस्थांची समिति नेमण्याची सूचना स्वीकारली. या राज्यातर्फे दोन नांवें सुचवावयाचीं होतीं. मीं असा विचार केला कीं, हा प्रश्न सोडविण्याकरितां ज्या पाटसकर निवाड्याचा आधार घेतला जावा असा आमचा आग्रह आहे तो निवाडा देणा-या श्री. पाटसकर यांचेंच नांव मी मध्यस्थ म्हणून कां सुचवूं नये? तेव्हां श्री. पाटसकर यांचें नांव मीं सुचविलें. आणि ते एका राज्याचे गव्हर्नर असतांनाहि भारत सरकारच्या परवानगीनें त्यांनीं मध्यस्थाचें काम करण्याचें कबूल केलें. म्हैसूर सरकारतर्फेहि दोन नांवें सुचविण्यांत आलीं. आजपर्यंतची ही परिस्थिति आहे. आतां या समितीनें करावयाचें काय हा प्रश्न निर्माण झाला. सुरुवातीला अशी कल्पना होती कीं, त्यांनीं विभागीय मंडळापुढें अहवाल सादर करावा. परंतु म्हैसूर सरकारकडून असें सुचविण्यांत आलें कीं, या समितीच्या सभासदांनी आपापल्या सरकारच्याच मुख्य मंत्र्यांकडे अहवाल सादर करावा. माझी स्वतःची त्यालाहि तयारी होती. कारण या प्रश्नाचे स्वरूप आणि न्याय पाहण्याचा प्रयत्न केल्यानंतर जर चार शहाणीं माणसें त्याचा विचार करतील तर त्यांना न्याय टाळतां येणार नाहीं अशी माझी मूळ भावना आहे. त्यानंतर या मध्यस्थ समितीपुढें विचारार्थ बाबी काय असाव्यात याबद्दल चर्चा सुरू झाली. म्हैसूर सरकारतर्फे असा आग्रह धरण्यांत आली कीं, या समितीनें जी चर्चा करावयाची ती गौण प्रश्नांसंबंधींच करावयाची आहे असें गृहीत धरून चर्चा केली पाहिजे. म्हणजे गाडी पुन्हा मूळपदावर गेली. आणि म्हणून त्यांना आम्हांला सांगावें लागें कीं, ही भूमिका आम्ही स्वीकारूं शकत नाहीं. वाटल्यास विचारार्थ बाबी न देतां या समितीनें चर्चा करावी आणि मार्ग सुचवावा असें मीं सांगितलें. कारण हा गौण प्रश्न आहे असें जोंपर्यंत म्हैसूर सरकार म्हणत नव्हतें तोंपर्यंत वाटेल त्या गोष्टीला माझी तयारी होती. म्हैसूर सरकारचीं दोन माणसें आणि मुंबई सरकारचीं दोन माणसें अशा चौघांनी या प्रश्नांची चर्चा करून आपला अहवाल भारत सरकारला सादर केल्यानंतर भारत सरकार त्याचा विचार करणार असेल तर त्याला माझी तयारी होती. आतां ज्या विभागीय मंडळापुढें हा प्रश्न आम्ही मांडणार होतो तें

विभागीय मंडळ नवीन मुंबई राज्यविभाग विधेयकानुसार संपुष्टांत येणार आहे. त्याखेरीज मध्यंतरीं ज्या घटना घडल्या त्यामुळेंहि हा प्रश्न लोकांच्या पुढें मांडण्याची आवश्यकता निर्माण झाली आणि म्हणून हा ठराव मीं सभागृहापुढें मांडला आहे.

या एकंदर प्रश्नाच्या बाबतींत सरकारची जी भूमिका आहे ती भूमिका आणि ज्या तत्त्वांना धरून हा प्रश्न सोडविण्यांत यावा असें सरकारला वाटतें तीं तत्त्वें केंद्र सरकारकडे जो खलिता पाठविण्यांत आला आहे त्यामध्यें स्पष्ट करण्यांत आलीं आहेत. त्याचा सारांश या खलित्यांतील परिच्छेद ९ मध्यें देण्यात आला  आहे. तो असा : 'मुंबई व म्हैसूर राज्यांमधील सीमा मुख्यतः भाषिक तत्त्वावर ठरविण्यांत आली असल्यामुळें या सीमेवरील प्रदेशाच्या पुनर्रचनेसाठी (Readjustment) भाषिक एकसंधपणाचेंच तत्त्व मार्गदर्शक तत्त्व म्हणून स्वीकारलें पाहिजे. यासंबंधीं योग्य ते अधिकार ज्यांच्याकडे सुपूर्द केले असतील त्यांनीं भाषिक अल्पसंख्याकांचा प्रश्न अत्यंत मामुली स्वरूपाचा राहील याच दृष्टीनें ही सीमा निश्चित करणें हें त्यांचें स्पष्ट कर्तव्य आहे. अशा प्रकारें सीमा निश्चित करण्यासाठीं, जिल्हा, तालुका किंवा सर्कल हा आधारभूत एकात्म घटक धरतां येणार नाहीं. म्हणून आवश्यक असेल तेव्हां लोकवस्तीचा प्राथमिक घटक जें खेडें त्यावरच अवलंबून राहण्याची शेवटीं आपली तयारी असली पाहिजे. कोणत्याहि प्रकारचे बेट किंवा भूपट्टा न राहतां केवळ संलग्न असणा-या प्रदेशापुरतीच ही सीमा निश्चित होऊं शकेल हें अगदीं उघड आहे. त्या त्या भागांतील बहुसंख्य लोक जी भाषा बोलतात तीच भाषा असणा-या राज्यांत त्यांचा समावेश व्हावा अशा प्रकारचें तत्त्व जरी सीमानिश्चित करतांना आपण गृहीत धरलें असलें तरी, एखाद्या विशिष्ट ठिकाणीं कांहीं पुरेशा सबळ कारणांमुळे त्याविरुद्ध जाण्याचा प्रसंग आला तर त्यासाठीं मुभा राहावी. अशा प्रकारच्या कारणांमध्यें भौगोलिक एकता, आर्थिक साहचर्य व शासनात्मक सौकर्य यांचा समावेश होतो.' या खलित्यांत ग्रथित केलेल्या तत्त्वांचा आणि भूमिकेचा हा सारांश आहे. आणि हा जो ठराव मीं या सभागृहापुढें मांडला आहे त्याच्या द्वारें, ज्या भूमिकेवर आणि तत्त्वांवर हा खलिता आधारलेला आहे त्या भूमिकेसाठी आणि तत्त्वांसाठीं मी या सभागृहाचा पाठिंबा मागत आहें.

मागें माझ्याकडे या प्रश्नांबाबत शिष्टमंडळ आलें होतें. तेव्हा हा प्रश्न कधीं सुटेल त्याची नक्की तारीख मला सांगतां येणार नाहीं असें मीं म्हटलें होतें. कारण साक्षात्कार झालेला किंवा भविष्यवादी असा कोणी मी नसून इतिहासाचा नीट अभ्यास करणारा एक विद्यार्थी मात्र मी आहें. तेव्हां अमूक एका तारखेपर्यंत अमूक एक गोष्ट होईल असें मी कसें सांगूं ? हा प्रश्न मला सुटला नाहीं, भारत सरकारलाहि सुटला नाहीं इतका तो ज्वलंत आणि जिवंत आहे आणि म्हणूनच तो सुटल्याशिवाय राहाणार नाहीं.

हें सांगत असतांना मला एका गोष्टीची काळजी घेतली पाहिजे. ह्या भावना व्यक्त करीत असतांना कानडी जनतेच्या संबंधी आमच्या मनांत कोणत्याहि प्रकारच्या विरोधी भावना नाहींत. श्री. जत्तींचा उल्लेख येथें करण्यांत आला असला तरी तो मित्रत्वाच्या भावनेनेंच करण्यांत आलेला आहे. निदान माझे आणि त्यांचे मैत्रीचे संबंध आहेत. हा ठराव मांडल्या नंतरहि मी हें सांगूं इच्छितों कीं, मुंबई सरकार आणि म्हैसूर सरकार या दोन सरकारांच्या इभ्रतीचा हा प्रश्न नसून ह्या दोन राज्यांतील कांहीं विभागांतील जनतेच्या मागणीचा आणि न्यायाचा हा प्रश्न आहे. ह्या भावनेनेंच ह्या प्रश्नाकडे आपण पाहिलें पाहिजे. म्हैसूर सरकारनेंहि ह्या दृष्टिनेंच ह्या प्रश्नाचा विचार करावा असें मी सांगूं इच्छितों.

ज्या हेतूनें आणि भावनेनें मीं हा प्रश्न या सभागृहांपुढें मांडला आहे तो हेतु आणि ती भावना लक्षांत घेऊन उपसूचनांचा आग्रह न धरतां हा ठराव सभागृहानें एकमतानें स्वीकारला तर हा प्रश्न सोडविण्यास मदत होणार आहे. म्हणून सभागृह हा ठराव एकमतानें स्वीकारील अशी मी अपेक्षा करतो.

(विधानसभा : ११ मार्च १९६०)

दक्षिण सीमेच्या या प्रश्नाबद्दलची आपली भूमिका आपण एकमतानें ठराव पास करून अगदीं निःसंदिग्धपणें मांडली आहे. या बाबतींत आमच्या भावना किती तीव्र आहेत हेंहि आपण या प्रस्तावाच्या रूपानें व्यक्त केलें आहे. हा प्रश्न आमच्या जिव्हाळ्याचा, अगत्याचा व तांतडीचा आहे असें आम्ही मानतों. आपली ही मागणी आम्ही भारत सरकारपुढें मांडली आहे. अर्थात् हा प्रश्न जितक्या गतीनें सुटावा अशी आपली व या सरकारची इच्छा होती तितक्या गतीनें तो सुटूं शकलेला नाहीं ही वस्तुस्थिति आहे. परंतु आपण वस्तुस्थितीला धैर्यानें तोंड दिलें पाहिजे. हा प्रश्न कसा सोडवावा हा आता खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. आमच्या सन्माननीय विरोधी मित्रांपैकीं कांहीचें म्हणणें, हा प्रश्न सोडविण्यांसाठीं आपण राजिनामे दिले पाहिजेत असें आहे, तर त्यांच्यापैकींच दुस-यांचें म्हणणें असें आहे कीं, हा प्रश्न सोडविण्यासाठीं आपण राजिनामे देण्याची मुळींच जरुरीं नाहीं. अर्थात् त्यांचें नेमकें म्हणणें काय आहे तें मला माहीत नाहीं. त्यांनी तसें तें स्पष्टपणें जाहीर केलेलें नाहीं. परंतु या प्रश्नावर राजिनामे द्यावे असें त्यांचे म्हणणें नाहीं असें मी समजतों. तथापि मला असें म्हणावयाचें आहे कीं, त्यांना काय करावयाचें आहे तें त्यांनीं माझ्या करण्यावर अवलंबून ठेवूं नये. त्यांना काय करावयाचें आहे तें त्यांनीं करावें आणि मला काय करावयाचें आहे तें मी करीन.

मघाशीं मला आठवण करून देण्यांत आली कीं, आमचें राज्य भारताचें एक छोटें घटक राज्य

आहे. मलाहि सन्माननीय सभासदांना आठवण करून द्यावयाची आहे कीं, आपलें महाराष्ट्र राज्य हें एका मोठ्या देशाचें घटक राज्य आहे, एवढेंच नव्हे तर अशा दोन घटक राज्यांमधील प्रश्न सोडविण्याच्या ज्या कांहीं मर्यादा असतात त्या सांभाळून आम्हांला आमचे प्रश्न सोडवावयाचे आहेत. आतांच सांगण्यात आलें कीं, राजिनामे द्या आणि एक प्रकारचा पेंचप्रसंग निर्माण करा. मला त्यांना विचारावयाचें आहे कीं पेंचप्रसंग निर्माण करा म्हणजे काय करा ? आम्ही राजिनामे द्यावे असें जें त्यांचें म्हणणें आहे त्यामागील हेतु आम्हीं अधिकारापासून दूर हटावें असा नाहीं असें मी मानतों. समजा, आम्हीं त्यांच्या म्हणण्याप्रमाणें राजिनामे दिले म्हणजे एका शासनानें आपली जबाबदारी टाकून दिली तर काय होईल ? आम्ही असा पेचप्रसंग निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही महाराष्ट्राच्या प्रगतीच्या आड येत आहोंत असें होईल. हा प्रश्न सोडवावयाचा असेल तर महाराष्ट्रांत लोकशाही राजकारण झालें पाहिजे. आम्हाला जसा महाराष्ट्राच्या सरहद्दीचा प्रश्न सोडवावयाचा आहे त्याचप्रमाणें आम्हांला महाराष्ट्राच्या अंतर्गत प्रश्नांचीहि उकल करावयाची आहे. परंतु अशा प्रकारें जर राजिनाम्यांचा आम्हीं आश्रय घेतला तर एक प्रकारची लढ्याची भावना निर्माण करण्यासारखें होईल. लढ्याची भावना निर्माण केल्याशिवाय जनतेचा आम्हांला पाठिंबा मिळणार नाहीं असा कांहीं लोकांचा समज झालेला आहे. मला त्यांना एकच गोष्ट सांगावयाची आहे कीं या प्रश्नामागें त्यांनीं जी डावबाजी चालविली आहे ती सोडून द्यावी. मागें जें चाललें तेंच आतांहि चालविण्याचा प्रयत्न त्यांनीं करूं नये. कोणत्याहि प्रश्नामागें जो संदर्भ असतो तो लक्षांत घेऊन त्या प्रश्नासंबंधींचें धोरण ठरविण्यांत आलें पाहिजे. ही माझी भूमिका असून ती मी सभागृहापुढे मांडित आहें. मी माझ्या मार्गानें जाणार आहें आणि मला आशा आहे कीं या मार्गानेच हा प्रश्न सोडवितां येईल.

आमच्यावरच हा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी आहे असें नाहीं, तर मध्यवर्ती सरकारांत जी मंडळी आहे त्यांनाहि हा प्रश्न सोडवावयाचा आहे. त्या दृष्टीनें राज्यपाल महोदयांनीं आपल्या भाषणांत मूलभूत सिद्धांतांचा उल्लेख केला आहे. हा प्रश्न तडजोडीनें आणि सर्वांच्या समाधानानें मध्यवर्ती सरकार सोडवील अशी आम्हांला आशा आहे. समाजवादी आणि समितीमधील माझ्या मित्रांचा यापेक्षां निराळा मार्ग असेल, तर त्यांनीं आपल्या मार्गानें जावें; मला त्याबद्दल कांहीं म्हणावयाचें नाहीं. परंतु त्यांना मी सल्ला देईन कीं त्यांचा मार्ग योग्य नसून त्या मार्गानें हा प्रश्न सुटण्यास मदत होण्याऐवजी अडथळेच निर्माण होण्याचा संभव आहे.

या प्रश्नाच्या कोंडींतून मार्ग काढण्यासाठीं राज्ययंत्रणेपासून अलिप्त असणा-या चौघा सदस्यांची समिति आतां नेमण्यांत आली आहे. आमच्या मागण्या काय आहेत, त्यांच्या मागण्या काय आहेत याचा विचार करून वस्तुस्थितिनिष्ठ दृष्टिकोनांतून या प्रश्नाकडे या समितीला पाहतां येईल. चौघा सदस्यांच्या समितीची स्थापना झाल्यामुळें या प्रश्नाची जी निरगांठ झाली होती ती सुरगांठ

होण्यास सुरुवात झाली आहे, असें म्हणावयास निदान मला तरी हरकत वाटत नाहीं. कोणी कांहीं म्हणो, पण माझी स्वतःची खात्री आहे कीं हा प्रश्न सुटेल तर याच मार्गानें सुटेल. त्याकरितां इतर अन्य मार्ग नाहींत. या मार्गाला कोणी वाईट म्हणो वा चांगलें म्हणो, परंतु माझा विश्वास त्यामुळें कमी होणार नाहीं वा वाढणार नाहीं. सुरगांठ होण्याची ही सुरुवात आहे. परंतु पुढें काय होईल, कोणती स्थिति निर्माण होईल, समितीचा निर्णय काय होईल असले प्रश्न विचारणें म्हणजे भविष्य विचारण्याचाच प्रकार आहे.

माझे कांहीं विरोधी पक्षीय मित्र मला विचारतात कीं, हें सर्व संपणार कधी ? खरें म्हणजे लोकमताची सांगड घालण्याचा हा प्रश्न आहे. या राज्यांत आणि त्या राज्यांत, दोन्ही बाजूंना या प्रश्नासंबंधीं जें परस्परविरोधी लोकमत निर्माण झालेलें आहे त्या लोकमतांतील विरोध आम्हांला नाहींसा करावयाचा आहे, दोन्ही लोकमतांची सांगड घालावयाची आहे. परस्पर कटुता नष्ट करून हा प्रश्न खेळीमेळीच्या वातावरणांत सोडविण्याकरितां योग्य ती पार्श्वभूमि आम्हांला निर्माण करावयाची आहे. सीमेसंबंधींच्या प्रश्नाचें स्वरूप इतर प्रश्नांपेक्षां कांहीसें वेगळें असतें. ज्या दोन राज्यांत हा प्रश्न निर्माण होतो त्या दोन्ही राज्यांतील जनतेच्या भावना परस्परविरोधी दृष्टिकोनांत या प्रश्नावर विभागलेल्या असतात. कोणा एका पक्षाचीच ही परिस्थिति असते असें नसून सर्वच पक्षांची ही परिस्थिति असते. सीमेच्या प्रश्नासंबंधानें ज्याला "हॉरिझॉन्टल अँड व्हर्टिकल स्प्लिट" असें इंग्रजींत म्हणतां येईल असें वातावरण दोन्ही राज्यांत निर्माण झालेलें असतें. काँग्रेस पक्षाचें सरकार या राज्यांत आणि त्याच पक्षाचें सरकार म्हैसूर राज्यांत असतांनाहि दोन्ही सरकारांत मतभेद निर्माण व्हावा याबद्दल आश्चर्य व्यक्त केलें जातें. परंतु दोन्ही राज्यांत काँग्रेस पक्षाशिवाय जे इतर पक्ष आहेंत त्यांच्यांत तरी या प्रश्नावर एकमत आहे काय ? मुळीचं नाहीं. या राज्यांतील कम्युनिस्ट आणि त्या राज्यांतील कम्युनिस्ट, या राज्यांतील प्रजासमाजवादी आणि त्या राज्यांतील प्रजासमाजवादी, या राज्यांतील जनसंघीय आणि त्या राज्यांतील जनसंघीय, या राज्यांतील हिंदुमहासभावादी आणि त्या राज्यांतील हिंदुमहासभावादी, या सर्व पक्षांत या प्रश्नावर मतभेद आहेत. मीं मघाशीं सांगितल्याप्रमाणें एक प्रकारचें "हॉरिझॉन्टल अँड व्हर्टिकल स्प्लिट" या प्रश्नावर तयार होत आहे.

हें जें लोकमत तयार झालेलें आहे अथवा होत आहे त्यांत जास्त संघर्ष कसा निर्माण होईल असा प्रयत्न करण्याऐवजीं त्यांत एकवाक्यता कशी येईल यासाठीच प्रयत्न करणें फार जरुरीचें आहे. मी एक व्यवहारी मनुष्य आहें आणि याच दृष्टिकोनांतून माझ्यापुढें असणा-या प्रश्नांचा मी विचार करतों. आमच्यापुढे जे प्रश्न निर्माण झाले आहेत त्यांतून आम्हांला मार्ग काढावयाचा आहे. हा प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत या शासनानें जो मार्ग अनुसरला आहे त्याखेरीज अन्य कोणत्याहि मार्गानें जाऊन हा प्रश्न सुटणार नाहीं, सुटणार नाहीं, सुटणार नाहीं, असें मी त्रिवार म्हणतों. इतर

मार्गांनी हा प्रश्न सुटेल असें म्हणणारे स्वतःची फसवणूक करीत आहेत; आणि जनतेची फसवणूक करीत आहेत आणि सर्वांत जास्त फसवणूक सीमा भागांतील जनतेची करीत आहेत. सीमा भागांतील जनतेची परिस्थिति मी ओळखतों. जर माझा आवाज सीमा भागांतील जनतेपर्यंत पोंचणार असेल तर मी त्यांना विश्वासानें सांगूं इच्छितों कीं महाराष्ट्राचें शासन हा प्रश्न सोडविण्याकरितां जो मार्ग अनुसरीत आहे त्याच मार्गांने हा प्रश्न सुटेल. मला अर्थातच कल्पना आहे कीं, केवळ आम्हीं येथें भाषणें करण्यानें त्यांना समाधान मिळणार नाहीं. कारण त्यांना प्रत्यक्ष भोगावें लागत आहे, त्यांच्या सहनशीलतेची पराकाष्ठा झालेली आहे. परंतु नुसत्या भावनेच्या आहारीं जाऊनहि हा प्रश्न सुटणार नाहीं. तो सोडविण्याकरितां आम्हांला विचाराचा आश्रय घेतला पाहिजे. आणि म्हणूनच सर्व गोष्टी स्पष्टपणें सांगणें माझें कर्तव्य आहे. काळाच्या पुढें आम्ही कांहीं धावूं शकत नाहीं. म्हणूनच पुढें काय स्थिति येईल हें सांगणें अशक्य आहे. परंतु माझी प्रामाणिक भूमिका महाराष्ट्रांतील जनतेपुढें, सीमा भागांतील जनतेपुढें आणि या सन्माननीय सभागृहापुढें ठेवणें माझे कर्तव्य आहे. मला प्रामाणिकपणें वाटतें कीं, राजिनामे देणें अथवा सत्याग्रह करणें हे मार्ग श्रेयस्कर नाहींत त्यांना राजकीय पक्षांतील स्पर्धेचे स्वरूप येईल.

(विधानसभा : १३ जुलै १९६०)

हा प्रश्न सुटण्यांत दिरंगाई होत आहे असा विरोधी पक्षांकडून आरोप करण्यांत आला. परंतु दिरंगाई न होतां दुस-या कोणत्या मार्गानें हा प्रश्न सुटूं शकेल हें त्यांनीं सांगावयास पाहिजे होतें. ह्या बाबतींत चळवळ केली पाहिजे असें सांगण्यांत आलें. पण तो आमचा मार्ग नाहीं. मी ह्या शासनाचा प्रमुख असतांना दुस-या शासनाच्या विरुद्ध चळवळ करावी म्हणजे दोन राज्यांमध्यें लढाई करावी, हें मान्य करणें कठीण आहे. उलट असें बोललें जातें कीं परकीयांचें आक्रमण होतें तेथेंहि लढाई करूं नये. कम्युनिझम हा कधीं आक्रमक होऊं शकत नाहीं असे या लोकांचें म्हणणें आहे. मग हिंदुस्तानमध्यें हा धोका कां पत्करावा ? आम्ही सर्व एकाच देशाचे नागरिक आहोंत आणि एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून भारताच्या स्वातंत्र्यासाठीं लढलों आहोंत. त्यांच्यात आणि आमच्यांत एका प्रश्नाबद्दल मतभेद आहे. त्या बाबतींत ते विचार करण्यास प्रथम तयार नव्हते, पण आतां ते विचार करण्यास तयार झाले आहेत. तेव्हां त्यांची प्रक्रिया उत्तेजित करण्याऐवजीं दांडगाई करा किंवा लढा करा, हें म्हणणें बरोबर होणार नाहीं. मला बेळगांवहून कांहीं माणसांची आजहि रागाचीं पत्रें येतात. या बाबतींत दिरंगाई होते असें त्यांनीं म्हटलें तर मी समजूं शकतों. परंतु राजकीय नेते दिरंगाई होते असें म्हणतात तेव्हा त्यांच्यावर जिम्मेदारी येते. हा जो प्रश्न आहे तो दोन राज्यांमधील प्रश्न आहे. आपल्याला माहीत आहे कीं, दोन राज्यांमध्यें ज्या वेळीं मतभेदाचा प्रश्न निर्माण होतो त्या वेळी अंतिम शक्ती कोणती वापरावयाची हा धोरणाचा प्रश्न आहे. त्यासाठी कांही तरी तत्त्व निश्चित केलें पाहिजे. आम्हीच फक्त तत्त्वानें काम करतों

आणि तत्त्वानें वागण्याचें काम दुस-या बाजूनें होत नाहीं, असें म्हणावयाचें कांही कारण नाहीं. तत्त्वाप्रमाणें वागतांना दोन राज्यांमध्यें जे प्रश्न निर्माण होतात ते समझोत्यानें, तडजोडीनें किंवा जास्तींत जास्त न्यायालयामार्फत सोडविणें हाच मार्ग आहे.

(विधानसभा : ७ फेब्रुवारी १९६१)

सन्माननीय सभासदांनीं ज्या आग्रहानें आपले विचार मांडले तो आग्रह मी समजूं शकतों. त्यांच्या या बाबतींतील भावना मी समजूं शकतों. पण एका सन्माननीय सभासदांनी जो वाकड्या बोटाचा सिद्धांत सांगितला त्याच्याशीं मी सहमत होऊं शकत नाहीं. आम्हांला कोणाच्या बरणींत बोट घालावयाचें नाहीं, तर आम्हांला आमची बरणीच परत घ्यावयाची आहे. आम्हांला कोणाकडे वाकडे बोट करावयाचें नाहीं कीं वाकडी नजर टाकावयाची नाहीं. आम्हांला सगळें न्यायानें आणि सरळपणानें करावयाचें आहे. चळवळीची निंदा करण्यांत येते असें म्हटलें जातें. मला चळवळीची निंदा करावयाची नाहीं. परंतु हा एक विश्वासाचा प्रश्न आहे. चळवळीनें हा प्रश्न सुटणार नाहीं असा माझा विश्वास असेल तर तसें सांगण्याचा मला जरूर अधिकार आहे. आणि हा प्रश्न चळवळीनें सुटणार नाहीं असा माझा विश्वास आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची परिस्थिति वेगळी होती. हा सीमेचा जो प्रश्न आहे तो वेगळा आहे.

राजिनाम्याच्या गोष्टी करणारांनीं नीट विचार केलेला नाहीं असें मी म्हणतों. राजिनाम्याचा मार्ग आपला आहे, तो आपण जरूर स्वीकारावा. मला राजिनामा द्यावयाचा असेल त्या वेळीं मी इतरांचा सल्ला घेणार नाहीं. महाराष्ट्र राज्याचा कारभार आम्हीं अंगावर घेतला आहे तो राज्य चालविण्यासाठीं घेतला आहे, पळून जाण्यासाठीं नाहीं. बेळगांवचा एक प्रश्न सोडविण्यासाठीं बाकीचे प्रश्न सोडून देऊन चालणार नाहीं. तुम्हीं असा सल्ला दिला आणि मीं तो ऐकला तर त्यामध्यें शहाणपणा कोठेंच दिसणार नाहीं. या राजिनाम्याच्या गोष्टी महाराष्ट्रामध्यें आतां जुन्या झाल्या आहेत. या सर्वांतून तुम्ही-आम्ही चांगले तावून सुलाखून बाहेर पडलों आहोंत. आमचे जे विचार आहेत ते आम्ही प्रामाणिकपणें जनतेसमोर ठेवले पाहिजेत. जी गोष्ट सरकारला झेपणार नाहीं, जी गोष्ट करणें सरकारला शक्य नाहीं, त्या गोष्टीबद्दल खोटी आशा या सरकारनें दिलेली नाहीं. जनतेचा जो कौल येईल तो कौल स्वीकारावा अशी नम्र भूमिका या राज्य सरकारची आहे. जनतेचा येणारा निर्णय आनंदानें स्वीकारण्याची या सरकारची तयारी आहे. या बाबतींत कोणतीहि खळखळ आम्ही करणार नाहीं. परंतु आमच्या ज्या मर्यादा आहेत त्या ओळखून काय करतां येईल तें जनतेसमोर स्पष्टपणें ठेवण्याची भूमिका आहे. मी असा सेनापति नाहीं कीं आपल्या मर्यादा न ओळखतां सैन्याला भलत्या ठिकाणी घेऊन जाईन.

मी मागें युद्धाच्या काळांत एक व्यंगचित्र पाहिलें होतें. कोणाबद्दलचे होतें तें मी सांगत नाहीं. या व्यंगचित्रामध्यें जो प्रमुख आहे त्यानें सैन्याला "क्विक मार्च" म्हणून ऑर्डर केली. त्याप्रमाणें सैन्य चालूं लागलें. आणि प्रवास करीत करीत तें समोर असलेल्या एका कड्यापर्यंत पोहोचलें. एका माणसानें त्या प्रमुखाला सांगितलें, "सैन्य कड्यापर्यंत पोहोंचलें आहे, आतां पुढची ऑर्डर द्या." त्या प्रमुखानें ऑर्डर दिली, "गुड बाय." आपले सैनिक कोणत्या तरी खड्ड्यांत जाऊन पडण्यासाठीं "गुड बाय" ऑर्डर देणारा मी सेनापति नाहीं. मला जनतेचे प्रश्न सोडवावयाचे आहेत. जेथपर्यंत जाणें शक्य असेल तेवढ्याच मर्यादेपर्यंत जाण्याचा मार्ग मला स्वीकारला पाहिजे. सीमा-प्रश्नासंबंधीं माझ्या या मर्यादा ओळखून मला असें सांगावयाचें आहे कीं हा प्रश्न एकमेकांच्या विचारानेंच सुटेल. अर्थात् थोडासा वाद करावा लागेल. परंतु आम्ही श्री. हरिभाऊ पाटसकर यांच्यासारख्या अनुभवी माणसाच्या हातांत हा प्रश्न सोपविल्यानंतर आणि एका राज्याचे राज्यपाल असूनहि त्यांनी जी भूमिका पत्करली आहे ती पाहिल्यानंतर त्यांना त्यांच्या कामांत मदत मिळेल असें आपण वागलें पाहिजे, अशी माझी भावना आहे. या प्रश्नाबाबत दिरंगाई होत आहे, त्यासाठीं चळवळच केली पाहिजे, अशा प्रकारच्या घोषणा राजकीय व्यासपीठावरून किंवा सभांतून केल्या म्हणजे त्या करणारांच्या पोटींच हा प्रश्न सोडविण्याची तिडीक आहे असें म्हणतां येत नाहीं. आणि म्हणून या प्रश्नाबाबत व्यवहार्य विचार या ठिकाणीं मांडले गेले नाहींत अशी दुःखाची भावना मनांत आल्याशिवाय राहत नाहीं.
(विधानपरिषद : १६ फेब्रुवारी १९६१)

## समाजवादाचा आमचा मार्ग

आमच्या राज्याचें अधिकृत धोरण समाजवादी आहे. म्हणून समाजवाद हा शब्द आम्ही हेतुपुरस्सर वापरतों. परंतु समाजवादाबद्दल आही बोलावयास लागल्यानंतर कांहीं माणसांना अगदीं अवघडल्यासारखें वाटूं लागलें. त्यांना असें वाटूं लागलें कीं हे लोक समाजवादाबद्दल बोलावयास लागले तर आमचें सगळें संपलेंच; आम्ही मग काय बोलावयाचें ? परंतु मी त्यांना सांगूं इच्छितों कीं त्यांचा समाजवाद वेगळा आहे आणि आमचा समाजवाद वेगळा आहे. आम्ही जो समाजवाद मानतों तो त्यांच्या समाजवादासारखा नाहीं. ते म्हणतात, त्यांचा समाजवाद खरा आहे. त्यांचा समाजवाद त्यांना लखलाभ होवो.

समाजवादाची आमची जी कल्पना आहे ती मी येथें मांडतों. पहिली गोष्ट म्हणजे आम्ही लोक ग्रंथनिष्ठ नाहीं. मार्क्सनें सांगितलेलें सगळें खरें आहे असें आम्ही मानीत नाहीं. ग्रंथांत सांगितललेलें सगळेंच खरें नसतें असें स्वतः मार्क्सनेंच सांगितलें आहे. मीं मार्क्स थोडाफार

वाचला आहे. मी त्यांतील तज्ज्ञ आहें असें मी म्हणत नाहीं. पण असें एक वय असतें कीं ज्या वेळीं मनुष्य असें ग्रंथ वाचतोच. त्याप्रमाणें मी देखील मार्क्स वाचण्याचा प्रयत्न केला, समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचे कांहीं दृष्टिकोन बरोबर असून त्यांच्याकडे कोणता आधुनिक माणूस दुर्लक्ष करूं शकेल ? पण तत्त्व म्हणून त्यानें सांगितलेली समाजवादाची कल्पना सगळीच खरी आहे असें म्हणतां येणार नाहीं. मार्क्सिझमची आमची कल्पना तशा त-हेची नाहीं. समाजवादाची माझी कल्पना मार्क्सनें सांगितलेल्या तराजूवर जोखून घेणारा मी नाहीं. हिंदुस्तानांतील समाजवादाची कल्पना हिंदुस्तानांतील जनतेच्या विशिष्ट अनुभवावरच आधारावी लागेल. आर्थिक विकास आणि आर्थिक परिवर्तन यांची अत्यंत वेगवान प्रक्रिया येथें सुरू झाली असतांना, दुनियेच्या इतिहासामध्यें अशाच परिस्थितींत इतर लोकांना जे धडे शिकावे लागले त्यांची पुनरावृत्ति आम्ही येथें करूं इच्छित नाहीं.

आमच्या देशांत अर्थरचनेची, आर्थिक शक्तीची जी एक नवीन वेगवान गति सुरू झाली आहे तिला, इतर देशांना अशा परिस्थितींत शिकावा लागलेला अनुभव लक्षांत घेऊन आमच्या देशाच्या विशिष्ट परिस्थितीला अनुरूप अशा पद्धतीचें वळण आम्ही देणार आहोंत. आमच्या या सगळ्या प्रयत्नांच्या पाठीमागें, खाजगी नफ्याच्या जागीं सामाजिक नफ्याचा पाया अधिक घट्ट करण्याचा आमचा खरा उद्देश आहे. यासाठीं दोन गोष्टींची आवश्यकता आहे. पहिली गोष्ट म्हणजे भिन्न भिन्न व्यक्तींच्या आर्थिक परिस्थितीमध्यें आज जी मोठी दरी आहे ती जास्तींत जास्त कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. तो प्रयत्न कसा करावयाचा हा अर्थात् स्वतंत्र प्रश्न आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे समाजांतील सर्व वर्गांना एक प्रकारची, एकसारखी आणि समान त-हेची संधि मिळेल अशा प्रकारची, परिस्थिति निर्माण झाली पाहिजे. समाजवादी जीवनाकडे घेऊन जाणारे हे दोन मार्ग आहेत. कोठलीहि एक व्यक्ति किंवा व्यक्तींचा समूह अथवा गट अगर वर्ग दुस-याची पिळवणूक करीत नाहीं अशा प्रकारचें समाजवादाचें चित्र मी पाहत असतों. घोडेस्वारासारखा, एक दुस-याच्या पाठीवर बसला आहे, अशी परिस्थिति ज्यांत नाहीं, अशा त-हेचें आर्थिक समतेवर आधारलेलें समाजवादाचें चित्र माझ्यासमोर आहे. तें चित्र केव्हां येईल, कोणत्या परिस्थितींत येईल, कोणत्या मार्गानें येईल हा दैनंदिन प्रयत्नांचा, अनुभवांचा प्रश्न आहे. अमुकच मार्गानें तें येईल किंवा त्यांने आलें पाहिजे असा आग्रह धरणारा मी नाहीं. कारण इतिहास हा आंधळा पीर नाहीं. कोणींतरी सांगितलेल्या ठराविक मार्गानेंच तो जात नसतो. घाण्याचा बैल जसा ठराविक मार्गानेंच घाण्याभोवतीं फिरतो, तसा मार्ग इतिहासाचा नाहीं. इतिहासाची स्वतःची अशी स्वतंत्र प्रकिया असते आणि त्यानुसार त्याचा प्रवास चाललेला असतो. म्हणून मार्क्सनें सांगितला आहे तेवढाच समाजवाद आहे अशी माझी कल्पना नाहीं. आमचा समाजवाद हिंदुस्तानच्या विशिष्ट अनुभूतींतून निर्माण झालेला, ऐतिहासिक परिस्थितींतून घेतलेला आणि लोकशाही मूल्यांवर आधारलेला असा समाजवाद आहे. पण समाजवादाचा म्हणून जो उल्लेख करतों तो निवडणुकीच्या

दृष्टीनें करीत नाहीं, ही गोष्ट मी स्पष्ट करूं इच्छितों. कारण निवडणूक एवढ्याच एका गोष्टीवरून जिंकली जाणार नाहीं याची आम्हांला कल्पना आहे, विरोधी पक्षालाहि ती असावी. आम्ही काय बोलतों हें महाराष्ट्रांतील जनतेला चांगलें समजतें. महाराष्ट्रांतील जनता शहाणी आहे. आम्हांला महाराष्ट्रांतील जनतेनें कधी शिव्या दिल्या तरी आमचीं धोरणें काय आहेत हें आपल्या बुद्धीच्या कसोटीवर घासून पाहण्याइतकी ती शहाणी आहे. परिपक्व आहे. तिला फसविण्याचा प्रयत्न करण्याची आमची इच्छा नाहीं, तशी तिची फसवणूक आम्ही करूंहि शकणार नाहीं. जनतेवर आमची पूर्ण श्रद्धा असून ती योग्य तोच निकाल देईल असा आमचा पूर्ण विश्वास आहे.

मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, समाजवादाच्या दिशेनें आज आम्हीं दोन पावलें टाकलीं आहेत. परंतु अजून शें-दीडशें पावलें आम्हांला टाकावयाचीं आहेत. हिंदुस्तानांत समाजवादाची व्याख्या नव्यानें करावयास हवी, अशा अर्थाचें कुठल्या तरी लेखांतील एक वाक्य श्री. भंडारे यांनीं येथें उद्धृत केलें. मी तर असें म्हणेन कीं, प्रत्येक देशालाच आपल्या परिस्थितीनुरूप समाजवादाची अशा प्रकारें नव्यानें व्याख्या करावी लागेल. तेव्हां, हिंदुस्तानच्याच बाबतींत असें म्हणण्याचें कांही कारण नाहीं. समाजवादाचीं दोनतीन गमकें आहेत. त्यांचा उल्लेख मीं अगोदरच केला आहे. परंतु पुन्हा एकदां त्यांचा मी थोडक्यांत उल्लेख करतों. सर्वांना समान संधि मिळाली पाहिजे, उत्पन्नांत जो फार मोठा फरक आहे तो कमी झाला पाहिजे, आर्थिक विषमतेमुळें जी पिळवणूक होते ती बंद झाली पाहिजे आणि प्रत्येक व्यक्तीचें जें व्यक्तिमत्त्व असतें त्याचा विकास करण्याची संधि त्या व्यक्तीला मिळाली पाहिजे. आमची समाजवादाची व्याख्या ही अशी आहे. पण मीं हें जें सांगितलें तें देखील मोघम आहे. ही गोष्टच अशी आहे की, ती शब्दांत उभी करण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी ती अस्पष्टच राहते.

पण निश्चित अशा समाजवादाकडे जाण्याची आमची इच्छा आहे. शास्त्रशुद्ध समाजवादाचा आम्हीं पुरस्कार केला आहे असें कम्युनिस्ट पक्ष गेल्या तीसचाळीस वर्षांपासून सांगत आलेला असला, तरी दहा कम्युनिस्ट राष्ट्रांतील परिस्थिति वेगवेगळी आहे हें आपल्याला कबूल करावें लागेल. रशिया आणि चीन यांचा कांहीं गोष्टींकडे पाहण्याचा दृष्टिकोन अगदीं वेगवेगळा आहे. सांप्रदायिक निष्ठा म्हणून पूर्वी जो सिद्धांत सांगण्यांत आला आहे त्याविषयीं देखील आज वाद आहे. लेनिन, मार्क्स, एन्जल्स आज जर असते तर काय झालें असतें हें सांगतां येणें कठीण आहे. परंतु मी त्या वादांत जाऊं इच्छीत नाहीं. आम्हांला जो अनुभव येईल त्याप्रमाणे हिंदुस्तानांतील समाजवादाची रचना आम्हांला स्वतंत्रपणें करावयाची आहे. त्या दृष्टीनें कशीं पावलें टाकलीं पहिजेत एवढेंच फक्त आम्हीं सूचित केलें आहे. येत्या दहा वर्षांत समाजवाद निर्माण होईल असें आम्हीं म्हटलेलें नाहीं. चाळीस वर्षें उलटून गेल्यानंतरहि रशियांत संपूर्ण समाजवाद स्थापन झाला आहे असा दावा रशियाला आजहि करतां येत नाहीं. मी त्यांची अलीकडची सप्तवार्षिक योजना

पाहिली. तिच्या प्रारंभीं असें म्हटलें आहे कीं, आम्हांला जो समाजवाद प्रस्थापित करावयाचा आहे त्याची वाटचाल सुरू आहे. समाजवादाकडे जाण्याचा त्यांचा प्रवास अद्यापि संपलेला नसून त्यांच्याकडे जो आदर्श आहे त्याकडे जाण्याची त्यांची अजून तयारी चालू आहे. त्याचप्रमाणें आम्हांलाहि आमच्या समाजाला समाजवादी निष्ठा द्यावयाची आहे. त्या ध्येयाकडे जाण्याचा निर्धार आम्ही आतां व्यक्त करूं लागलों आहोंत, दिशा कायम करण्याचा प्रयत्न करूं लागलों आहोंत. यासंबंधींचा संपूर्ण कार्यक्रम या शासनानें मांडलेला आहे असा आमचा मुळींच दावा नाहीं. तो कार्यक्रम जनतेचीं मनें तयार करून निर्माण करावा लागेल. परंतु समाजवादाकडे जाण्याचा आमचा निर्धार आहे, तें आमचें ध्येय आहे असें आम्ही आतां सांगूं लागलों आहोंत. हा आमचा मूलभूत उद्देश आहे आणि तेवढ्याच मर्यादेंत आम्हीं आतां केलेल्या घोषणेचा विचार आपण करावयास पाहिजे.

आम्हीं आमचे धोरण जाहीर करून स्वतःच्या परीक्षेच्या कसोट्या आम्हीं जनतेच्या ताब्यांत दिल्या आहेत. आम्हांला या दिशेनें जावयाचें आहे असें आम्हीं जाहीर केलें आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कार्याची योग्य परीक्षा व योग्य मूल्यमापन जनतेला करावयाचें असेल तर तें आम्हीं जाहीर केलेल्या कसोट्यांवरून जनता करूं शकते. त्या कसोट्या आम्हीं जनतेच्या हातांत दिल्या आहेत. परंतु समाजवादाचें धोरण आम्हीं जाहीर केल्याबरोबर, कोठें आहे समाजवाद, असें ताबडतोब विचारून चालणार नाहीं. कारण लक्षावधि माणसांच्या दैनंदिन प्रयत्नांतून हळूहळू निर्माण होणारें असें तें चित्र आहे. विणकर जेव्हां महावस्त्र विणण्यासाठीं बसतो तेव्हां तें महावस्त्र ताबडतोब तयार होत नाहीं. सुरुवातीला जेव्हां तो आपल्यासमोर गुंतागुंतीचे सगळे लांब धागें टाकून बसतो तेव्हां आपल्याला सगळा गोंधळ दिसतो. एका धाग्याशीं दुसरा धागा समांतर अशा पद्धतीनें टाकलेले अनेक धागे आपल्याला दिसतात. त्यावरून यांतून हा कसलें महावस्त्र निर्माण करणार अशी आपल्याला शंका येते. परंतु तो जेव्हां त्या समांतर धाग्यांतून आडवे धागे टाकण्याचा प्रयत्न करतो तेव्हां त्यांतून हळूहळू सुंदर महावस्त्र तयार होत चालल्याचा प्रत्यय आपणांस येतो. समाजवाद आणण्यासाठी अशाच त-हेचा प्रयत्न हिंदुस्तानमध्यें करावा लागेल आणि तो सर्वांना करावा लागेल. आमची अशी इच्छा आहे कीं, तो समाजवाद लवकरांत लवकर यावा. परंतु त्याची कांहीं विशिष्ट प्रक्रिया आहे आणि त्या प्रक्रियेंतूनच आपल्याला जावें लागेल, ही गोष्ट आपण लक्षांत ठेविली पाहिजे, एवढेंच आज मला आपल्याला सांगावयाचें आहे.

## लोकशाहींतील प्रशासन

पोलिटिकल सायन्स आणि पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन या दोन असोसिएशनच्या सदस्यांपुढें एकत्र भाषण करण्याची मला ही संधि मिळाली त्याबद्दल मला आनंद होत आहे. राज्यशास्त्र व प्रशासन ह्या दोन्हींचा एकमेकांशीं फार निकटचा संबंध आहे. राज्यशास्त्राचा मी विद्यार्थी होतों व अद्यापिहि आहें. आणि प्रशासनाचा मीं कधीं अभ्यास केला नसला तरी गेल्या कांहीं वर्षांपासून प्रत्यक्ष प्रशासनाच्या क्षेत्रांत मी काम करीत आहें. लोकशाहींतील प्रशासनासंबंधीं जेव्हा आपण बोलतों, त्यावेळीं त्यासंबंधींच्या आपल्या कल्पना स्पष्ट असणें जरुरीचें आहे असें मला वाटतें. लोकशाहीची कल्पना हीच मुळीं बदलत जाणारी कल्पना असून तशी ती असणें अगदीं स्वाभाविक आहे. लोकशाही हा शब्द शेंकडो वर्षांपूर्वी ज्या मानवानें प्रथम उच्चारला त्यानें कोणत्या अर्थानें तो उच्चारला असेल हें नक्की सांगतां येणें आज अशक्यच आहे. परंतु लोकांशीं ज्याचा प्रत्यहीं संबंध येतो व जें जनमनाचें प्रतिनिधित्व करतें असें शासनाचें तंत्र म्हणजे लोकशाही, अशी लोकशाहीसंबंधीं एक कल्पना पूर्वी सर्वत्र प्रचलित होती. तथापि इतिहासाच्या ओघांत लोकांच्या विचारांत परिवर्तन झालें, त्यांच्या सभोवतींची परिस्थिति बदलली, त्यांच्यापुढील प्रश्न बदलले आणि त्यांच्यातील संबंधांत देखील बदल घडून आला. त्यामुळें त्यांच्या राजकीय कल्पनांत उत्क्रांति होऊन लोकशाहीबद्दलच्या त्यांच्या कल्पना साहजिकपणेंच बदलत गेल्या. आपण जेव्हां एखाद्या सामाजिक शास्त्राचा विचार करूं लागतों, तेव्हां आपण बदलत्या जगांत राहात आहोंत व सामाजिक जीवन परिवर्तनशील आहे हें सत्य आपल्याला लक्षांत घ्यावें लागतें. ह्या परिवर्तनाच्या बरोबरीनें त्या सामाजिक शास्त्रानें आपलीं पावलें टाकलीं पाहिजेत हें ओघानेंच आलें. राज्यशास्त्र हेंहि एक सामाजिक शास्त्र असल्यामुळें निरनिराळ्या काळी आणि निरनिराळ्या देशांत लोकशाहीची कल्पना निरनिराळी असावी यांत आश्चर्य नाहीं. आपल्या देशांत आपण ज्या संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आहे ती सुद्धां लोकशाहीची एक विशिष्ट पद्धत असून तिचेंहि स्वरूप पुढें हेंच राहील अशी खात्री मी तरी देऊं शकणार नाहीं. कारण भविष्यांतील बदलत्या परिस्थितींत तिचें स्वरूप हेंच राहिलें तर तिचें प्रातिनिधिक स्वरूप नष्ट होऊन भावी पिढ्यांच्या आशाआकांक्षाचें प्रतिबिंब तिच्यांत पडूं शकणार नाहीं.

लोकांचें, लोकांसाठीं आणि लोकांनी चालविलेलें शासन म्हणजे लोकशाही असें लोकशाहीचें वर्णन करण्यांत येतें. परंतु ही अगदीं औपचारिक स्वरूपाची व्याख्या आहे, कारण या व्याख्येवरून लोकशाही सरकारच्या कार्यपद्धतीचा नक्की बोध होत नाहीं. माझ्यापुरतें मी असें म्हणेन कीं, प्रशासनांतील लोकशाही म्हणजे एकमेकांच्या सतत विचारविनिमयानें चालणारा राज्यकारभार होय. कोणत्याहि प्रकारचा साचेबंद दृष्टिकोन न ठेवतां लोकांचे प्रतिनिधि एकत्र येऊन जिथें विचारविनिमय करतात अशा शासनाच्या पद्धतीला मी लोकशाही म्हणतों. लोकशाहींत जनतेच्या मूलभूत प्रश्नांसबंधीं एकवाक्यता व्हावी व ते सोडविले जावेत म्हणून चर्चा करून मार्ग काढण्याचा लोकप्रतिनिधि प्रयत्न करीत असतात. पण लोकशाहीच्या ह्या किंवा आतांच मीं उल्लेख केलेल्या

दुस-या व्याख्येंत, शासन आणि प्रशासन यांचाच विचार प्रामुख्यानें आहे असें आपणांस आढळून येईल. परंतु लोकशाहीचें तत्त्व ज्या वेळीं आपण मान्य करतों तेव्हां आपण शासनाचें फक्त बाह्य स्वरूपच मान्य करतों असें मला वाटत नाहीं. लोकशाहीचा अर्थ शासनाचा केवळ एक प्रकार असा होत असेल तर अशा लोकशाहीसंबंधीं मला बिलकुल आकर्षण वाटणार नाहीं.

या प्रश्नाचा अधिक खोल विचार करण्यापूर्वी शासन आणि प्रशासन या दोन निराळ्या गोष्टी आहेत हें प्रथम समजून घेणें आवश्यक आहे. एखादी व्यक्ति यशस्वी प्रशासक आहे असें म्हटलें जातें. तेव्हां शासन म्हणून जी कल्पना आहे ती डोळ्यापुढें उभी राहात नाहीं. प्रशासन म्हणजे राज्यकारभार ही शासनाची फक्त एक बाजू आहे. शासनाची दुसरी बाजू राजकीय आहे. राजकीय दृष्ट्या म्हणजे जनतेच्या दृष्टिकोनांतून आपण जेव्हां लोकशाहीसंबंधीं बोलतों आणि हुकुमशाहीपासून ती निराळी आहे असें मानतों, तेव्हां राज्यकारभाराच्या यशापयशाचें मूल्यमापन एक विशिष्ट कसोटी लावून आपण करतों. लोकांचे समाधान कशांत आहे हें शोधणें अत्यंत कठीण असतें. लोकांना आज ज्यांत समाधान आहे त्यांत कांही दिवसांनी त्यांना समाधान वाटेलच असें नाहीं. परंतु लोकशाही सरकार जें कांहीं करीत असतें त्यापासून लोकांना समाधान मिळालें पाहिजे, ही गोष्ट निःसंशय. म्हणून लोकांचे समाधान हा लोकशाही राज्यकारभाराचा एक निकष म्हणून आपण मानतों तेव्हां त्याच्या मुळाशीं कोणतें तत्त्व आहे हे आपण पाहिलें पाहिजे. लोकशाही म्हणजे शासनाची केवळ एक पद्धत असें पूर्वी समजलें जात असें. परंतु शासनाची अशी पद्धत निर्माण करणें हा राजकीय लोकशाहीचा अंतिम हेतु आहे असें आतां कोणी मानीत नाहीं. केवळ मतदानाचा औपचारिक स्वरूपाचा हक्क सर्वांना मिळणें व आपले प्रतिनिधि लोकसभेंत पाठवितां येणें म्हणजेच लोकशाही इतका मर्यादित अर्थ लोकशाहीचा असेल तर समाजाच्या दृष्टीनें यापेक्षां अधिक हानिकारक अशी दुसरी गोष्ट असूं शकणार नाहीं.

केवळ राजकीय लोकशाहीस लोकशाही म्हणता येणार नाहीं, हें आतां सर्व तत्त्वज्ञांनी देखील मान्य केलें आहे. राजकीय लोकशाहीस सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची जोड असणें आवश्यक आहे. तशी जोड ज्या वेळीं मिळेल तेव्हांच तिला ख-या लोकशाहीचें स्वरूप प्राप्त होईल. 'सामाजिक व आर्थिक लोकशाही' या शब्दप्रयोगांत कांहीं वादग्रस्त प्रश्न उद्भवतात हें मी जाणतों. राजकीय हक्कांच्या बाबतींत सर्वांना समान संधि मिळणें हा राजकीय लोकशाहीचा अर्थ असेल, तर या राजकीय हक्कांबरोबरच, सामाजिक व आर्थिक क्षेत्रांतहि प्रत्येक व्यक्तिला ज्यायोगें समान संधि मिळेल अशी आर्थिक व सामाजिक परिस्थिति निर्माण झाली पाहिजे. लोकशाहीच्या ह्या व्यापक दृष्टिकोनांतून भारताच्या राज्यकारभाराकडे आपण पाहिलें तर आपणांस अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

आणखी एक गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणूं इच्छितों. ती म्हणजे लोकशाहीच्या कल्पनेंत हा जो बदल झाला आहे त्यामुळें प्रशासनाच्या कल्पनेंत देखील बदल होणें अपरिहार्य आहे. गेल्या शतकांत पुढारलेल्या व प्रगतिशील राष्ट्रांमध्यें प्रशासनाची जी कल्पना होती ती आतां बदलली आहे. 'कार्यक्षम प्रशासन' हा शब्दप्रयोग आतां सरकार, खाजगी व्यापारी संस्था, सार्वजनिक क्षेत्रांतील उद्योगधंदे किंवा स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वांच्या बाबतींत उपयोगांत आणला जातो. कोणत्याहि संदर्भात आपण हा शब्द वापरला तरी कार्यक्षमतेसंबंधींच्या कसोट्या आतां बदलल्या आहेत हें आपणांस नाकारतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें कार्यक्षमतेविषयींच्या कल्पना व ती वाढविण्याच्या पद्धति यांत देखील बदल झाला आहे. याचें कारण सामाजिक व आर्थिक परिस्थितींतील बदल हें आहे. दुस-या शब्दांत सांगावयाचें म्हणजे लोकशाहीच्या आणि प्रशासनाच्या कल्पनेंत हा जो बदल झाला आहे तो बदललेल्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचाच एक भाग आहे. म्हणून मला स्वतःला असें वाटतें कीं, सामाजिक व आर्थिक विकासामुळें निर्माण होणारी शक्ति हीच लोकशाही व प्रशासन यांची प्रेरक शक्ति आहे. 'सामाजिक परिस्थिति' याचा अर्थ फार व्यापक असून त्यांत आर्थिक परिस्थितीबरोबरच समाजाच्या बहुतेक सर्व अंगोपांगाचा समावेश होतो हें मला स्पष्ट करावेंसें वाटतें.

प्रशासन हें लोकशाहीचें आजच्या काळांत एक अत्यंत महत्त्वाचें अंग आहे. एका राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मला रोज नाना त-हेचे प्रश्न हाताळावे लागतात. दर पांच मिनिटांनीं माझ्यापुढील विषय बदलत असतो. तुमच्यासारखा एखादा प्राध्यापक असे विषय सारखे बदलून बोलूं लागला तर त्याला विद्यार्थ्यांपुढें एक क्षणभरहि बोलूं देण्यांत येणार नाहीं. परंतु मुख्यमंत्री या क्षणीं वैद्यकासंबंधीं चर्चा करील तर दुस-याच क्षणीं तो विजेसंबंधीं बोलूं लागेल आणि त्यानंतर लगेच शिक्षणासारख्या अत्यंत महत्त्वाच्या तांत्रिक प्रश्नावर तो आपलें मत देईल आणि पुढें ताबडतोब जंगल खात्याकडे तो वळेल. आणि यांपैकीं एकाहि विषयासंबंधीं कांहींहि माहिती नसतांना तो ह्या सर्व गोष्टी करील. वैद्यक, शिक्षण, जंगल किंवा वीज या विषयांचा मी कांही तज्ज्ञ नाहीं. परंतु निरनिराळे प्रश्न सोडविण्यांसाठीं कोणतें अंतिम निकष लावावेत या बाबतींत मुख्यमंत्री तज्ज्ञ समजला जातो. एखाद्या धोरणाचे राज्यांतील लोकांवर कोणते परिणाम होतील आणि शासनाच्या निरनिराळ्या शाखांकडून लोकांच्या कोणत्या अपेक्षा आहेत यासंबंधींची जाणीव मुख्यमंत्र्याला असावी लागते. मुख्यमंत्री केवळ एवढ्याच बाबतींत तज्ज्ञ असतो. परंतु जें धोरण ठरेल त्याला व्यवस्थित आकार देऊन त्याची अंमलबजावणी करण्याचें काम इतर तज्ज्ञांचे असतें. यांनाच आपण शासनतज्ज्ञ म्हणतो. प्रत्येक मंत्र्यास अशा तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा लागतो.

धोरण ठरविणें हें अशा धंदेवाईक प्रशासकाचें काम नसून एक प्रकारें व्यक्तीनिरपेक्ष राहून ठरलेल्या धोरणाची अंमलबजावणी करणें एवढेंच त्याचें काम असतें असें पूर्वी समजलें जात असे.

परंतु प्रशासन हें आजच्याहि काळांत केवळ धोरणाची अंमलबजावणी करणारें एक व्यक्तिनिरपेक्ष माध्यम बनणार असेल तर त्या प्रमाणांत प्रशासनाचें लोकशाही स्वरूप नाहीसें होईल. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. मी असें म्हणतों याला दोन कारणे आहेत. पहिली गोष्ट अशी कीं, प्रशासक लोकशाही शासनाचा प्रतिनिधि म्हणून काम करीत असल्यामुळें ठरलेल्या धोरणाची अंमलबजावणी त्याला कुशलतेनें करावी लागते. म्हणून व्यक्तिनिरपेक्षतेनें आपण विचार करतों व सल्ला देतों असें तो म्हणूंच शकत नाहीं. आणि दुसरी गोष्ट म्हणजे लोकशाही राज्यव्यवस्थेमध्यें राजकीय पुढारीच फक्त निर्णय घेतो किंवा धोरण ठरवितो हें खरें नाहीं. आणि हें मी माझ्या व्यक्तिगत अनुभवावरून आपणांस सांगूं शकतो. स्पष्टच सांगावयाचें म्हणजे, अलीकडील राज्यांच्या दैनंदिन प्रशासनाचें गुंतागुंतीचें स्वरूप लक्षांत घेतां, सध्यांच्या काळांत मंत्री राज्य करीत नाहींत तर तज्ज्ञच राज्य करतात असें मी म्हणेन. कारण ते जो सल्ला देतात तो तांत्रिक स्वरूपाचा असल्यामुळें त्याकडे दुर्लक्ष करणें कठीण असतें. आणि म्हणून एखादें विशिष्ट धोरण ठरविण्यांत या तज्ज्ञांचा मोठा भाग असतो.

परवांच आपल्या राज्यांतील एक वरिष्ठ पोलीस अधिकारी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या सत्काराला उत्तर देतांना त्यांनीं एक उत्कृष्ट सल्ला दिला. हा सल्ला त्यांच्या वडिलांकडून त्यांना मिळाला होता. डॉक्टरनें दिलेलें सर्टिफिकेट, पोलिस अधिका-यानें केलेली चौकशी व इंजिनिअरनें तयार केलेला अंदाज या तीन गोष्टींखेरीज जगांतील इतर कोणतीहि गोष्ट तुम्ही बदलूं शकतां असें त्यांनी सांगितलें. कारण या तीन गोष्टींविरुद्ध कोठेंहि दाद मागतां येत नाहीं. यांतील विनोदाचा भाग सोडला तर तांत्रिक बाबींसंबंधीं सध्याची परिस्थिति अशाच प्रकारची आहे. जेव्हां धंदेवाईक प्रशासक सल्ला देतो तेव्हां तो नव्याण्णव टक्के धोरण ठरवीत असतो. तेव्हां प्रशासकाचें काम निव्वळ ठरलेलें धोरण अंमलांत आणण्याचे असतें असें समजणें या काळांत तरी सयुक्तिक होणार नाहीं.

धंदेवाईक राजकारणी आणि धंदेवाईक प्रशासक निरनिराळ्या पातळींवर कार्य करीत असले आणि त्यांच्या कार्याच्या पद्धती व त्यांचीं साधनें भिन्न असलीं तरी लोकशाहीमध्यें त्यांना मार्गदर्शन करणारी शक्ति व तत्त्वें एकच असतात. जो निवडून येतो तोच लोकशाहीचें प्रतिनिधित्व करतो, परंतु लोकशाही यंत्रणेचा कायम स्वरूपाचा घटक असणारा मात्र तें करीत नाहीं असें म्हणणें रास्त होणार नाहीं. अशा प्रकारच्या कल्पनांनीं लोकशाही कधींच यशस्वी होणार नाहीं. कारण त्यामुळें लोकशाहींत सतत मतभेद व अडथळे निर्माण होऊन राज्यकारभारांत लोकशाही नाममात्र देखील शिल्लक राहणार नाहीं. म्हणून लोकशाहींशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीनें, केवळ राजकीय क्षेत्रांतच नव्हे तर सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत देखील, लोकांचें समाधान हेंच आपलें अंतिम उद्दिष्ट मानलें पाहिजे. राजकारण आणि प्रशासन या दोन्ही क्षेत्रांतील लोकांचे हेंच उद्दिष्ट असलें

पाहिजे. कारण ह्या दोन्ही क्षेत्रांतील व्यक्ति शेवटीं जनतेंतूनच आलेल्या असतात आणि त्यांना जनतेचें भवितव्य घडवून आणण्याचेंच कार्य करावयाचें असतें. राज्यशास्त्र आणि लोकशाहींतील प्रशासन यांना सांधणारा दुवा हाच आहे असें मला वाटतें.

लोकशाहींतील प्रशासनांत जे जाऊं इच्छितात त्यांनीं ही गोष्ट सुरुवातीपासून नीट समजावून घ्यावी. मी म्हणतों त्याप्रमाणें त्यांनीं ही गोष्ट समजावून घेऊन आपल्या दैनंदिन कामांत सतत नजरेसमोर ठेवली तर आपले पुष्कळसे प्रश्न आपोआप सुटतील. एका ज्येष्ठ प्रशासकानें एकदां असे उद्गार काढले होते कीं, मंत्र्यांना 'नाहीं' म्हणण्याचें आणि प्रशासकांना 'होय' म्हणण्याचें शिक्षण मिळालें तर बरें होईल. यांत पुष्कळच अर्थ आहे. कारण हें घडून आलें तर लोकशाहींतील आणि लोकशाहीच्या प्रशासनांतील पुष्कळशा प्रश्नांसंबंधी चिंता करण्याचे आपणांस कारणच राहणार नाहीं.

या सर्व गोष्टी आपल्याला मी हेतुपूर्वक सांगत आहें. प्रशासनाच्या कोणत्याहि शाखेंत तुम्ही प्रवेश करा, परंतु मीं सांगितलेल्या गोष्टी कृपा करून विसरूं नका. एखाद्या खासगी संस्थेंत किंवा एखाद्या कारखान्यांत तुम्ही काम करणार असलां तरी तेथेंहि हीच कसोटी तुम्हांला दृष्टीसमोर ठेवावी लागेल. प्रशासकाकडून अखेरीस हीच अपेक्षा असते. खासगी व्यापारी संस्थेत देखील ग्राहकांचे समाधान ह्याच न्यायाचें त्याला पालन करावें लागतें. प्रयोगशाळेंत काम करणारा शास्त्रज्ञ असो किंवा रंगभूमीवर काम करणारा नट असो किंवा समाजसेवेच्या क्षेत्रांत गाजावाजा न करतां काम करणारा कार्यकर्ता असो, त्यानें एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, आपण जें कांहीं काम करतो त्याचा अंतिमतः जनतेच्या जीवनावर परिणाम होत असतो.

लोकशाही ही केवळ विधानसभेपुरतीच नसते, किंवा ती केवळ प्रशासनाचेंच कार्य करीत नाहीं. अधिक खोल अर्थानें पाहिलें तर सध्यांच्या आधुनिक समाजांत प्रत्येक व्यक्तीच्या जीवनावर लोकशाहीचीं तत्त्वें आपला प्रभाव पाडीत असतात. ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट तुम्हीं समजावून घेतली पाहिजे. लोकशाही ही केवळ राजकीय कल्पना नाहीं असें जें मी म्हणतों तें याच अर्थानें. लोकशाही आतां एक सामाजिक आणि आर्थिक कल्पनाहि बनली आहे. जो विद्यार्थ्यांचें खरें समाधान करतो तो चांगला शिक्षक. तो निवडणुकीसाठीं उभा राहात नाहीं, तरीहि त्याला मान्यता मिळते. माझ्या विद्यार्थिदशेंत एक प्राध्यापक होते. त्यांच्या कॉलेजांतील विद्यार्थीच नव्हे तर दुस-या कॉलेजांतील विद्यार्थीहि त्यांचा अतिशय मान राखीत असत. शेक्सपिअर शिकविणारें दुसरे एक  अत्यंत नामवंत प्राध्यापक होते. त्यांच्या व्याख्यानासाठीं भिन्नभिन्न विद्यापीठांचे विद्यार्थी येत. अंतिम दृष्ट्या ही लोकशाहीच नव्हे काय? पण निवडणुकीच्या दृष्टिकोनांतूनच पुष्कळ वेळां लोकशाहीकडे आपण पाहतों. निवडणूक हा लोकशाहीचा एक भाग आहे, आणि लोकशाहीमध्यें

निवडणुकीला फार महत्त्वाचें स्थानहि आहे, यांत शंका नाहीं. परंतु निवडणुकीला किंवा लोकशाहीच्या बाह्य स्वरूपाला जनतेच्या समाधानापेक्षां अधिक महत्त्व नाहीं. तुम्ही कोणत्याहि क्षेत्रांत काम करीत असा, जनतेचें समाधान हीच अंतिम कसोटी राहील. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत ह्याच मूलभूत तत्त्वाचा ठसा उमटलेला तुम्हांला दिसेल. आणि म्हणून ह्याच कसोटीवर सर्व गोष्टींबद्दलचे निर्णय तुम्हांला तावूनसुलाखून घ्यावे लागतील.

'लोकशाहींतील प्रशासन' या विषयावर आपल्यासमोर बोलावें असें मीं ठरविलें त्या वेळीं प्रशासनांतील लोकशाहीच्या या मूलभूत प्रश्नांचीच चर्चा करण्याचा माझा उद्देश होता. आपल्या दैनंदिन कामांत, मग तें प्रशासनांतील असो, राजकारणांतील असो, अगर अन्य कोणत्याहि क्षेत्रांतील असो, आपण या मार्गदर्शक तत्त्वाचा स्वीकार केला तर समाजांतील अनेक गोष्टींत द्रुतगतीनें सुधारणा होईल, आणि सरकार व जनता यांच्यांतील संबंधहि सुधारतील. एवढेंच नव्हे तर विशिष्ट परिस्थितींत आपलें कर्तव्य कोणतें हेंहि त्यामुळे तुम्हांला समजेल. अशा प्रकारें समाजांत केवळ लोकशाहीच नव्हे तर खरीखुरी स्वतंत्रता नांदूं लागेल.

लोकशाहीमुळें ज्या वेळीं समाजांतील महान् शक्ति मोकळ्या होतात आणि व्यक्तीला ख-या स्वातंत्र्यांच्या लाभ होतो त्याच वेळी लोकशाहीचें खरें स्वरूप आपणांस पाहावयास सांपडतें. हें जेव्हां घडतें तेव्हांच समाज सामर्थ्यवान बनतो. अशा समाजांत केवळ व्यक्तीच स्वतंत्र होते असें नाहीं, तर सर्व समाजच बौद्धिक दृष्ट्या व अन्य प्रकारें स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास समर्थ बनतो. राज्यशास्त्र आणि प्रशासन यांचें आज जे अध्ययन करीत आहेत ते कधीं तरी राजकारणांत आणि प्रशासनांत भाग घेतीलच. त्या वेळीं मीं आतांच सांगितलेल्या तत्त्वांची त्यांनीं आठवण ठेवली तर त्यांच्या भोंवतालच्या बदललेल्या परिस्थितींतहि ते यशस्वी होतील याबद्दल मला शंका नाहीं.

## शिवछत्रपतींचे पुण्यस्मरण

महाराष्ट्राच्या इतिहासांत आणि एका अर्थानें भारताच्याहि इतिहासांत आजचा हा दिवस सोन्याचा दिवस म्हणून गणला जाईल. आज प्रजासत्ताक दिन सबंध भारतभर साजरा केला जाईल. परंतु महाराष्ट्र राज्यांतील प्रजासत्ताक दिनाचा आजचा हा सोहळा, महाराष्ट्रांतील जनता छत्रपति शिवाजी महाराजांना प्रणिपात करून साजरा करीत आहे. छत्रपति शिवाजी महाराजांच्या ह्या मूर्तीची पश्चिम सागराच्या प्रवेशद्वारापाशीं स्थापना करून भारतनिष्ठेची आम्ही आज पुन्हा शपथ घेत आहोंत.

छत्रपति शिवाजी महाराजांची स्मृति ही भारताच्या सेवेची स्मृति आहे. छत्रपति शिवाजी महाराजांना मराठी मनानें निव्वळ महाराष्ट्राचे नेते मानले नव्हतें. छत्रपति शिवाजी महाराज हे सबंध भारताचे नेते होते. मानव्याचा एक अत्यंत उत्कृष्ट आदर्श त्यांच्या जीवनामध्यें आपल्याला पाहावयास सांपडतो. छत्रपति शिवाजी महाराज झाले नसते तर भारताचें काय झालें असतें तें सर्व जगाला माहीत आहे. पाकिस्तानची सीमा शोधण्याकरितां फार लांब जावें लागलें नसते. कदाचित् ती तुमच्यामाझ्या घरापर्यंतहि येऊन पोहोंचली असती. छत्रपति शिवाजी महाराजांनीं केलेली ही सेवा निव्वळ मराठ्यांचें राज्य निर्माण व्हावें म्हणून केलेली नव्हती. त्या वेळच्या मोंगली सत्तेशीं ते लढले, पण मुसलमानांशी त्यांचें वैर होतें असें नव्हें. सामान्य माणसांना बरोबर घेऊन एक नीतीचें नवे राज्य उभारावें अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती. त्यावेळी हिंदुस्तानांतील सगळी मनें दबलीं गेलीं होतीं. त्यांचा स्वाभिमान दुखावला गेला होता. त्याला वाचा फोडण्याचें काम कुठल्या तरी वाणीद्वारा होणें आवश्यक होतें. हें काम छत्रपति शिवाजी महाराजांच्या मुखानें सह्याद्रीला करावें लागलें. हा इतिहास आम्ही विसरूं इच्छीत नाहीं. दुर्दैवानें शिवाजी महाराजांचें नांव कांहीं प्रसंगी आम्ही चुकीच्या अर्थानें घेतों आणि त्यामुळें कांहीं लोकांच्या मनांत गैरसमज निर्माण होतो. त्यांच्यासाठी मी सांगूं इच्छितों कीं, नव्या महाराष्ट्र राज्याची निर्मिति ही छत्रपति शिवाजी राजांची पुण्याई आहे असें आम्ही मानतों. त्याचा अर्थ आम्हांला प्रांतिक भावनेची वाढ करावयाची आहे असा मात्र नाही. महाराष्ट्राबाहेरच्या विचारी माणसांना मी सांगू इच्छितों कीं; अशा त-हेची कुठलीहि भावना आमच्या मनांत नाहीं. छत्रपति शिवाजी महाराजांची ही मूर्ति त्यांची निव्वळ प्रतिमा आहे असें आम्ही मानीत नाहीं, तर भारतामध्यें जी तेजस्विता आहे, भारताची जी अस्मिता आहे, भारताचा जो स्वाभिमान आहे, त्या तेजस्वितेचें, त्या अस्मितेचें आणि त्या स्वाभिमानाचें ही मूर्ति एक प्रतीक आहे अशी आमची तिच्या पाठीमागची भावना आहे. आणि म्हणून आजचा हा दिवस निव्वळ महाराष्ट्राच्याच इतिहासांतील नव्हे तर भारताच्याहि इतिहासांतील एक सोन्याचा दिवस आहे असें मी सुरुवातीस म्हणालों.

छत्रपति शिवाजी महाराजांनी त्या काळी महाराष्ट्र राज्याची जी रचना केली तिच्यामध्यें त्यांनीं कांहीं मूलभूत गोष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ज्यांचा आदर्श भारताच्या राज्यानें आजहि स्वीकारावा अशा त्या गोष्टी आहेत. पश्चिम समुद्राकडे तोंड करून मी असा उभा असतांना महाराजांनी निर्माण केलेल्या मराठ्यांच्या आरमाराचा विचार माझ्या मनाशीं आला. आमच्या पश्चिम किना-यावरील गरीब जनतेच्या सामर्थ्यावर आरमार उभें करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. हा इतिहास मीं आज परत आपणांला सांगितला पाहिजे असें नाहीं. विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग त्याची साक्ष देत आजहि पश्चिम समुद्रामध्यें उभे आहेत. त्यांनीं जनतेचें राज्य रचण्याचे जे नवे नवे प्रकार अंमलांत आणले ते तेव्हांच्या हिंदुस्तानच्या इतिहासामध्यें नवे होते. जुन्या सरंजामी मदतीवर शिवाजी महाराजांनी आपलें राज्य उभें केलें नाही. मावळच्या खेड्यांतील लंगोटी

घालणा-या साध्या शेतक-याला त्यांनीं शूर शिपाई बनविला. मोडकीं तोडकीं भीमथडीचीं तट्टें त्यांनीं आपली विमानें बनविलीं आणि त्यांच्या बळावर आपली सेना त्यांनीं सबंध हिंदुस्तानभर विखुरली. असा हा सामान्य माणसांचा राजा होता. आणि तो नीतीचें प्रतीक होता, चारित्र्याचें प्रतीक होता. म्हणूनच महाराष्ट्रांतील लाख लाख मनें छत्रपति शिवाजी राजांच्या स्मृतीवर स्वतःची कुरवंडी करण्यास तयार झालीं. त्याच्या पाठीमागची महाराजांची भव्य शक्ति आपण लक्षांत घेतली पाहिजे.

आणि त्याच छत्रपति शिवाजी राजांची प्रतिमा आमच्या डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतरचा पहिला प्रजासत्ताक दिन आम्ही आज साजरा करतों आहोंत. तो साजरा करतांना छत्रपतींची पवित्र स्मृति ध्यानांत ठेवून आजच्या या महान् प्रसंगी महाराष्ट्र राज्यातर्फे मी जुन्या प्रतिज्ञांचा नव्यानें उच्चार करूं इच्छितों. हें मराठी राज्य समतेचें राज्य व्हावें अशी महाराष्ट्र राज्याची प्रतिज्ञा आहे. जनतेंतील साधुता वाढावी ह्या तत्त्वाशीं प्रतिज्ञाबद्ध झालेलें असें हें राज्य आहे. आणि म्हणून यापुढच्या कांही वर्षांत दारिद्र्य आणि अज्ञान यांच्याशीं झगडा करून स्वाभिमानी, साधुतेवर विश्वास ठेवणारा आणि नीतिमत्तेनें आपलें पाऊल पुढें टाकणारा असा नवा समाज महाराष्ट्राच्या भूमीवर चालतांना, बोलतांना पाहण्याचे आमचें स्वप्न आहे तें पुरें करण्याची शपथ, शिवाजी राजांच्या स्मृतीला साक्ष ठेवून आज आम्ही पुन्हा घेत आहोंत.

शिवस्मारक समितीचें मला आज अभिनंदन केलें पाहिजे. या समितीचें काम माझे मित्र श्री. बाळासाहेब देसाई ह्यांनी हातांत घेतल्यापासून, त्यांनी आणि त्यांच्या अनेक सहका-यांनीं गेले कित्येक दिवस जे श्रम केले त्या श्रमांबद्दल जाहीरपणें त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मला टाकली पहिजे. आज आपल्या सर्वांच्या वतीनें आणि माझ्यातर्फे मी त्यांचें अभिनंदन करतों आणि त्यांना धन्यवाद देतों. माझे मित्र श्री. बाबूराव अत्रे आतांच माझ्याजवळ म्हणाले कीं, बाळासाहेब देसाईंनीं कुस्ती जिंकली. मी बाबूराव अत्र्यांना सांगूं इच्छितों कीं, आम्ही पुष्कळ कुस्त्या जिंकतों, पण तुम्ही त्या पाहात नाहीं. आज संयुक्त महाराष्ट्र समितीचे प्रतिनिधि म्हणून श्री. बाबूराव अत्रे आणि महाराष्ट्र राज्याचा प्रतिनिधि म्हणून मी एका व्यासपीठावर प्रेमानें बोलत होतों, हा माझा आनंदाचा भाग आहे हें मी आपणांला सांगू इच्छितों. या आनंदाच्या क्षणीं सगळीं मराठी मनें आज जशीं एकत्र आलीं आहेत, तशींच ज्या एका कठीण प्रयत्नांतून महाराष्ट्राला न्यावयाचा आहे त्या कामामध्यें तीं एकत्र यावींत व आमची एकमेकांची शक्ति एकमेकांना उपयोगी पडावी अशी शिवाजी महाराजांच्या जवळ आज मी प्रार्थना करतों. सुखाच्या वेळीं एकत्र येणारी माणसें दुःखाच्या आणि प्रयत्नाच्या वेळींहि एकत्र येतील तर दुनियेमध्यें कधीं कुणीं न पाहिलेला असा पराक्रम करून दाखवितील असा माझा विश्वास आहे, म्हणून मीं या गोष्टीचा उल्लेख केला. मला शिवस्मारक समितीचे आभार मानावयाचे आहेत, मराठी राज्यातर्फे आणि सबंध मराठी जनतेतर्फे

तिचे आभार मानावयाचे आहेत. आज येथें अनेक व्यक्ति हजर नाहींत. त्यांचेंहि मला अभिनंदन केलें पाहिजे, त्यांचेहि मला आभार मानले पाहिजेत. माझे मित्र श्री. तिरपुडे आज येथें हजर नाहींत. पण त्यांनीं या शिवस्मारक समितीची कल्पना काढली आणि प्रयत्नाला सुरुवात केली. आज ते येथें हजर नसले तरी माझ्यातर्फे आणि श्री. बाळासाहेब देसाई यांच्यातर्फे त्यांचे मी मनापासून आभार मानतो.

मुंबई शहरांतील एक मोठें काम पुरें झालें म्हणून माझ्या मनाला आज अतिशय आनंद होत आहे. मुंबई शहरांत आज हजारों पुतळे आहेत. त्यांमध्यें छत्रपति शिवाजी राजांचा पुतळा नाहीं याचें मनाला दुःख होत होतें. पण इतिहास योग्य क्षणाची वाट पाहात असतों असेंच म्हटलें पाहिजे. शिवाजी महाराजांचा पहिला पुतळा या शहरांत उभा रहिला तो नव्या महाराष्ट्राच्या रचनेची वाट पाहत होता असेंच म्हणावें लागेल. आणि नव्या महाराष्ट्राच्या रचनेंनंतरसुद्धां, त्यांतील भारतीय संदर्भ विसरला जाऊं नये म्हणून भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या सुमुहूर्तावर तो येथें बसविला गेला. परमेश्वराला सुद्धां हेवा वाटावा अशा ठिकाणीं आज शिवाजी राजांची मूर्ति येऊन बसली आहे. परंतु एक गोष्ट अद्यापि अपुरी राहिली आहे. आज जसा येथें हा शिवाजी महाराजांचा पुतळा बसला आहे, तसाच त्यांच्या नांवानें समरांगण झालेल्या शिवाजी पार्कमध्येंहि त्यांचा पुतळा बसविण्याचें काम अपुरें राहिलेलें आहे याची आठवण आज मी आपणांस देतों. पु-या केलेल्या कामाची नोंद घेत असतांना अपु-या राहिलेल्या कामाचीहि आठवण आपण एकमेकांना करून देणें आवश्यक आहे. थोड्याच दिवसांमध्यें आपण सर्वजण मिळून तें काम पुरें करण्याचा प्रयत्न करूं. या अपु-या राहिलेल्या कामाची आठवण देऊन कोणाला हिणवावें अशा बुद्धीनें मीं त्याचा उल्लेख केलेला नाहीं. सबंध महाराष्ट्रीय जनतेची ती जबाबदारी आहे. त्यांतला माझाहि हिस्सा मी उचलावयास तयार आहें या भावनेनें मीं त्याचा उल्लेख केला आहे.

आज सबंध मुंबई शहरांतील जनता, निव्वळ महाराष्ट्रीय म्हणजे महाराष्ट्रांत राहणारी जनताच नव्हे, निव्वळ मराठी भाषिकच नव्हेत, तर हिंदी भाषिक, गुजराती भषिक आणि मुंबई शहरांत बोलल्या जाणा-या सगळ्या भाषांचे प्रतिनिधि येथें हजर असलेले मला दिसत आहेत. त्यांत ख्रिश्चन आहेत, हिंदु आहेत, मुसलमान आहेत. आज शिवाजी महाराज हे कुठल्याहि एका धर्माचें, कुठल्याहि एका जमातीचे, कुठल्याहि एका भाषेचे प्रतिनिधि नाहींत. आणि म्हणून मुंबई शहरांतील शेकडों जाति, शेकडों भाषा आणि सगळे धर्म यांचे प्रतिनिधि आज छत्रपति शिवाजी राजांना प्रणाम करण्यासाठी येथें एकत्र आले आहेत हे पाहून मला अतिशय आनंद वाटतो. धन्य शिवाजी महाराजांच्या स्मृतीची आणि धन्य महाराष्ट्र भूमीची कीं तिनें असा महापुत्र प्रसवला. मीं माझ्यातर्फे आणि आपल्या सर्वांच्या तर्फे छत्रपति शिवाजी महाराजांना पुन्हा प्रणिपात करतों आणि माझ्या नव्या शपथेचा उल्लेख करून मी आपणां सर्वांची रजा घेतों.

## मला झालेलें लोकमान्यांचें दर्शन

आजच्या या लोकमान्य टिळक पुण्यतिथीच्या निमित्तानें मी येथें येऊन बोलावें असें मला जवळजवळ एक महिन्यापूर्वी सुचविलें गेलें आणि एक प्रकारचा सन्मान म्हणून मीं हें निमंत्रण स्वीकारलें. परंतु हें निमंत्रण स्वीकारतांना जें बोलावें असें माझ्या मनामध्यें होतें तें सर्व मी बोलूं शकेन अशी आज तुमच्याप्रमाणेंच माझीहि मनःस्थिति नाहीं. कारण दरम्यानच्या काळांत पुणें शहरावर जी मोठी आपत्ति आलेली आहे त्या आपत्तीच्या मनःस्थितींत आपण सर्वजण आहांत आणि मीहि थोडाफार तशाच मनःस्थितींत आहें असें जर मीं म्हटलें, तर तें आपण स्वीकाराल अशी मला आशा आहे.

लोकमान्य टिळकांच्या जीवनावर बोलण्याचा तसा माझा अधिकार नाहीं. कारण मीं लोकमान्यांना स्वतः नजरेनें पाहिलेलें नाहीं, किंवा त्यांच्या पुण्यामध्यें मी लहानाचा मोठा झालेलों नाहीं. पण माझा तसा एक छोटासा अधिकार आहे असें मी आपल्याला सांगूं इच्छितों. ज्या गावांमध्यें मी लहानाचा मोठा झालों त्या गांवामध्यें लोकमान्यांच्या नांवानें चालणारी शाळा आहे, आणि त्या शाळेचा मी विद्यार्थी आहें. त्या शाळेंत लोकमान्य टिळकांचें होत असलेलें गुणगान लहानपणापासून मीं माझ्या कानांनी ऐकलेलें आहे आणि त्यामध्यें मी भागीदारहि झालेलों आहें. लोकमान्यांच्या जीवनाचा अभ्यास करून विद्यार्थ्यांनी कांहीं निबंध लिहावेत, कांहीं वक्तृत्व स्पर्धा कराव्यात, अशी आमच्या शाळेची जुनी प्रथा असे. त्यामध्यें भाग घेण्यासाठीं लोकमान्यांच्या वाङ्मयाचा थोडाफार अभ्यास मीं त्या वेळीं केला. आणि फार मोठी फुशारकी मारतों अशांतली गोष्ट नाहीं पण 'लोकमान्य आणि कायदेमंडळ' या विषयावर निबंध लिहून मीं पहिलें पारितोषिकहि मिळविलेलें आहे. त्या गोष्टीची आज येथें येतांना मला आठवण झाली. कायदेमंडळांसंबंधानें आणि लोकमान्यांसंबंधानें मला जेव्हां कांही फारशी माहिती नव्हती तेव्हां मीं हा निबंध लिहिला, आणि मला असें वाटतें कीं माझ्या त्या वेळच्या निरागस मनावर झालेले परिणाम आज सुद्धां कांहींहि बदललेले नाहींत. लोकमान्य टिळकांच्या मोठेपणाचें हें लक्षण आहे, हें मी आपणांला सांगूं इच्छितों.

लोकमान्यांच्या जीवनाकडे पाहतांना कोणत्या दृष्टीनें पाहावें हा ज्याच्या त्याच्या विचाराचा, ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न राहील. कांही वर्षांपूर्वी 'लोकमान्य हयात असते तर ?' असा विषय घेऊन अनेकांनी अनेक दृष्टिकोन मांडल्याचें माझ्या स्मरणांत आहे. असा प्रयत्न करावा कीं करूं नये ही वेगळी गोष्ट आहे. पण लोकमान्यांसारख्या प्रचंड विशाल व्यक्तिमत्त्व असणा-या

पुरुषाच्या जीवनाकडे निव्वळ एखाद्या वस्तुसंग्रहालयामध्यें पाहण्याकरितां ठेवलेली वस्तु म्हणून आपण पाहत नसतों, तर तें जीवन आजच्याहि क्षणीं आजचे आणि उद्याचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें काय मार्गदर्शन करील या दृष्टीनें आपण त्या जीवनाकडे पाहत असतों, त्या दृष्टीनें आपण त्याकडे पाहिलें पाहिजे.

ज्या एका विशिष्ट कालखंडांत भारतामध्यें लोकमान्यांचें व्यक्तिमत्त्व निर्माण झालें, त्या कालखंडाचें मार्गदर्शन करून व आपलें अवतारकार्य संपवून लोकमान्य निघून गेले एवढाच इतिहासाचा आणि त्यांचा संबंध आहे, असें मी मानीत नाहीं. त्यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वाच्या माणसाचें तेवढेंच काम असत नाहीं. मोठ्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची कसोटी-किंबहुना जगांतील कोणत्याहि चांगल्या वस्तूची कसोटी, ती व्यक्ति किंवा ती वस्तु ज्या ठिकाणीं असते त्या ठिकाणापासून ती दूर गेल्यानंतर आणि ज्या कालखंडांत ती व्यक्ति किंवा ती वस्तु निर्माण होते तो कालखंड संपून गेल्यानंतरच खरी दिसून येते. त्या व्यक्तीचें व्यक्तिमत्त्व किंवा त्या वस्तूचें महत्त्व जितकें जास्त टिकून राहील तितकी ती व्यक्ति मोठी किंवा ती वस्तु चांगली असें मानले जातें. कलेच्या क्षेत्रांतहि हाच नियम आहे. एखादी सुंदर कलाकृति पाहण्यासाठी कलावंतानें एखाद्या माणसाला बोलावलें आणि तो माणूस धसमुसळेपणा करून त्या कलावस्तूच्या अगदी जवळ जाऊन डोळे फाडून पाहावयास लागला, तर तो कलावंत त्याला आपल्या मनांतल्या मनांत हसेल. एखाद्या कलावस्तूचें निरीक्षण, थोडेंसें बाजूला जाऊन, एका विशिष्ट दृष्टिकोनांतून आपण केलें म्हणजे ती कलावस्तु आपणांस अधिक चांगली दिसते. थोडक्यांत म्हणजे कलावस्तु ही एका विशिष्ट पर्स्पेक्टिव्हमधूनच - दृष्टिकोनामधूनच पाहावी लागते. तीच गोष्ट कमीअधिक प्रमाणांत मोठ्या माणसांच्याहि बाबतींत खरी आहे. त्यांच्या कालखंडापासून दूर गेल्यानंतर ज्या प्रमाणांत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें विशालत्व, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मार्गदर्शनक्षमता हीं आपल्या मनाला पटत राहतील, समजत राहतील आणि भासत राहतील त्या प्रमाणांत तें व्यक्तिमत्त्व जास्त मोठें असें आपण मानलें पाहिजे. लोकमान्यांचें व्यक्तिमत्त्व हें अशा प्रकारच्या व्यक्तिमत्त्वांपैकीं आहें. कांहीं मोठी माणसें अशीं असतात कीं त्यांच्या जीवनकालामध्यें त्यांच्या मोठेपणाचें महत्त्व इतरांना समजत नाहीं. त्यांच्या मृत्यूनंतर कित्येक वर्षांनी त्यांचा मोठेपणा इतरांना समजतो. अशी माणसें जगाच्या इतिहासांत कमी नाहींत. आणि अगदीं महाराष्ट्राच्या इतिहासांतहि कमी नाहींत. लोकमान्यांच्या बरोबरच ज्यांचें नांव घेतलें जातें त्या आगरकरांच्या नांवाचा या बाबतींत आपणांला उल्लेख करतां येईल. परंतु ज्यांचें मोठेपण त्यांच्या हयातींतच इतरांना प्रतीत होतें अशा थोड्या भाग्यवान महापुरुषांपैकीं लोकमान्य हे एक होते. त्यांना आपल्या जीवनामध्यें जरी खूप हालअपेष्टा आणि संकटें सहन करावीं लागलीं, तरी लोकप्रियतेची - लोकांनी मनोभावानें त्यांच्या कामाचें चीज करण्याची - जी शक्यता होती ती शक्यता, तिचा आनंद, तिचें सुख त्यांना त्यांच्या जीवनामध्यें पाहावयास सांपडलें. आणि त्यांच्या मृत्यूनंतर आज इतक्या कालावधीनंतरहि, एवढेंच

नव्हे तर आधुनिक भारताचा इतिहास जोंपर्यंत अभिमानानें लिहिला जाईल आणि वाचला जाईल तोंपर्यंत लोकमान्यांच्या जीवनासंबंधानें या देशांतील प्रत्येक मनुष्य अभिमानाने सांगेल कीं त्यांचें जीवन हा आमचा मोठेपणा आहे. एवढें मोठें व्यक्तिमत्त्व लोकमान्यांचें आहे.

पण आपणांला हें असें कां वाटतें याचें कारण अगदीं उघड आहे. कंसवधाच्या वेळीं मथुरेंत शिरलेला कृष्ण अनेकांना अनेक त-हेचा दिसला, असें त्याचें वर्णन केलें जातें. लोकमान्यांकडे माणसें अशाच अनेक दृष्टींनीं पाहूं शकतात. संपादक लोकमान्य, गृहस्थ लोकमान्य, नेता लोकमान्य, वक्ता लोकमान्य; लेखक लोकमान्य, संशोधक लोकमान्य, विद्वान लोकमान्य, तत्त्वज्ञ लोकमान्य - अशा अनेक दृष्टींनीं त्यांचें आपणांस दर्शन होतें. या सगळ्या दृष्टींनीं त्यांच्याकडे पाहण्याचा आपण प्रयत्न केला तर या प्रत्येक क्षेत्रामध्यें लोकमान्यांचें स्वतःचें असें एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे, असें आपणांस दिसून येईल. एवढेंच नव्हे तर या प्रत्येक क्षेत्रांतील त्यांचें कार्यच असें आहे कीं त्या त्या क्षेत्रांतील मोठेपण त्यांच्याकडे चालून यावें. एवढें मोठें व्यक्तिमत्त्व लोकमान्यांचें होतें.

पण या सगळ्या गोष्टी त्या त्या क्षेत्रांतले तज्ज्ञ त्या त्या विषयासंबंधानें बोलतांना आपणांला सांगतील, मी कांहीं तसला विषय घेऊन बोलत नाही. अगदी सामान्य माणसाच्या नजरेनें या वेळच्या लोकमान्यांच्या जीवनाकडे पाहायचा मीं प्रयत्न केला आहे. आणि अनेक वेळां ही गोष्ट मी महाराष्ट्रामध्यें जाहीरपणानें बोलत असतों की लोकमान्यांचें मोठेपण तारुण्याच्या उंबरठ्यावर ते उभे असतांना त्यांनीं जो देशसेवेचा निर्णय घेतला त्यांत आहे. आणि इतक्या दिवसांच्या अवधीनंतरहि त्यांनीं घेतलेल्या त्या निर्णयाचा विचार मनाशीं आला म्हणजे आजसुद्धां मन हेलावून जातें. डेक्कन कॉलेजमध्यें विद्यार्थी असतांना अहोरात्र आपल्या सहाध्यायांशीं देशाच्या प्रश्नांची चर्चा करून शेवटीं एक महत्त्वाची पदवी-तेव्हांची, आजची बी.ए. किंवा एल्.एल्.बी. नाहीं - त्यांनीं घेतली. आणि त्यानंतर त्यांनीं आणि आगरकरांनीं स्वतःच्या जीवनासंबंधीं असा निर्णय घेतला कीं आपलें सबंध जीवन सातत्यपूर्वक देशाच्या कामाकरितां द्यावयाचें. हा निर्णय घेणारी आगरकर आणि टिळक यांची जोडी त्या वेळच्या डेक्कन कॉलेजच्या आवारामध्यें कशी हिंडली असेल, त्यांनीं तेथें काय काय वादविवाद केले असतील, याची कल्पना आजहि त्या बाजूनें गेल्यानंतर मनांत आली म्हणजे अंगावर रोमांच उभे राहतात.

त्या काळांत लोकांच्या मनांत काय कोडें होतें तें मी आपणांला सांगूं इच्छितों. त्याचें उत्कृष्ट वर्णन एका वाक्यामध्यें शिवरामपंत परांजप्यांच्या एका लेखामध्यें केलेलें मीं पाहिलें आहे. त्या काळांतील अत्यंत बुद्धिमान आणि स्वाभिमानी माणसांच्या मनापुढें, त्यांच्या विचारांपुढें आणि त्यांच्या जीवनापुढें पडलेलें कोडें एका अतिशय सुरेख वाक्यामध्यें शिवरामपंतांनीं सांगितलें आहे.

त्याकाळीं लोकांची अशी परिस्थिति होती कीं, "जें होतां येत होतें पण व्हावेसें वाटत नव्हतें आणि जें व्हावेंसे वाटत होतें तें होतां येत नव्हतें." अशी ही अडचण होती तेव्हांची. त्या काळांत अत्यंत बुद्धिमान अशा तरुणांच्यापुढें ही फार महत्त्वाची जीवनसमस्या होती. त्यांना होतां येणें - काय वाटेल तें होतां येणे शक्य होते. लोकमान्यांनीच सांगितले होतें एकदां त्यांना काय होणें आवडलें असतें तें. गणिताचा प्रोफेसर होण्याची त्यांची इच्छा होती. विज्ञानाच्या या क्षेत्रांत संशोधन करावें आणि स्वतःच्या कर्तबगारीनें आणि संशोधनानें त्या क्षेत्रामध्यें एक नवीन दालन उघडावें, अशा त-हेची त्यांची खरी इच्छा होती.

त्यांना काय व्हावेंसे वाटत होतें तें मीं आपणांला सांगितलें. पण त्यांना काय व्हावें लागलें तें सर्व आपल्यापुढें आहे. त्यांना केसरीचे संपादक व्हावें लागलें. त्या काळी संपादक होणें आजच्या इतकें सोपें झालेलें नव्हतें. ते केसरीचे संपादक झाले आणि त्या संपादकीय कामाकरितां त्यांना वारंवार तुरुंगाच्या यात्रा कराव्या लागल्या. संपादक म्हणून त्यांनी स्वतःच्या छापखान्याच्या पाट्या उचलल्या; गादीच्या वळकटीचें टेबल करून त्यावर त्यांनीं अग्रलेख लिहिले; कुठल्याहि त-हेनें कुणाचीहि पर्वा न करतां स्वाभिमानानें आलेला विचार त्यांनीं लिहिला; त्यासाठीं त्यांना अनेकदां तुरुंगामध्यें जावें लागलें. आणि हें त्यांना सर्व आयुष्यभर करावें लागलें, त्यांना काय वाटेल तें होतां येणें शक्य होतें, पण त्यांनीं त्याकडे पाठ फिरवली. त्यांच्या आख्यायिकांमध्यें कुठें तरी पूर्वी एक गोष्ट वाचल्याचें मला आठवतें. ते जेव्हां कॉलेजमध्यें जाऊं लागले तेव्हां त्यांना, त्यांच्या बहिणीनें तूं कोण होणार म्हणून विचारलें, तर त्यांनीं तिलाच उलट मीं कोण व्हावेंसें तुला वाटतें, असें विचारलें. त्याकाळच्या कोंकणामध्यें वाढलेलीं ती बहीण विशेष असें काय सांगणार ? तिनें त्यांना तूं आपल्या तालुक्याचा मामलेदार हो असें सांगितले. आणि तुम्हीं जर सहृदयतेनें तिच्या त्या सूचनेचा विचार केला तर तुम्हांला त्या सूचनेचा अर्थ कळेल. तिला माहेरपणाला दोन घोड्यांच्या बगीमध्यें घेऊन जाणारा मामलेदार भाऊ हवा होता. आणि त्या काळांतील बहिणीनें आणखी दुसरी कसली अपेक्षा करावयाची? पण यापेक्षां किती तरी पट जास्त मोठे लोकमान्यांना होतां आलें असतें. ही परिस्थिति जेव्हां होती त्या वेळीं, बुद्धीचा वकूब असणा-या या माणसानें देशासाठीं आपलें जीवन अर्पण करण्याचा निर्णय घेतला. तेव्हां सुद्धां सार्वजनिक जीवन होतें पण तें पसरलेलें नव्हतें, तेव्हां सुद्धां सार्वजनिक जीवनामध्यें काम करणारीं मोठमोठीं माणसें होतीं. तुलनेनें कोणाला कमीजास्त लेखण्याकरितां मी हें बोलत नाहीं. पण लोकमान्य टिळक आणि आगरकर या दोघांनीं घेतलेला हा निर्णय तेव्हांच्या हिंदुस्तानच्या सार्वजनिक जीवनामधला एक अपूर्व निर्णय होता, असें मला स्वतःला तरी वाटतें. आणि निदान महाराष्ट्राच्या जीवनापुरतें बोलावयाचें तर तो तसा निश्चित होता.

आणि म्हणून त्यासंबंधींची सल्लामसलत करावयास जेव्हां लोकमान्य आणि आगरकर रानड्यांकडे

गेले - तेव्हां हजर असणा-या एका गृहस्थाची प्रसिद्ध झालेली ही आठवण आहे - तेव्हां तेथें असलेल्या लोकांनीं त्यांची हेटाळणी केली. पण रानड्यांना हीं मुलें कांहीं तरी नवीन मार्गानें जाण्याचा प्रयत्न करीत आहेत हें दिसलें. म्हणून त्यांनीं त्यांना उत्तेजनच दिलें. याप्रमाणें स्वतःचें सगळें शिक्षण, स्वतःची एवढी बुद्धिमत्ता, स्वतःचें कर्तृत्व असतांना सुद्धां या सगळ्यांचा उपयोग स्वार्थत्यागानें देशसेवेकरतां करण्याचा, लोकजागृतीसाठीं करण्याचा जो निर्णय लोकमान्यांनीं त्या वेळीं घेतला आणि त्यांतील सगळीं व्रतें स्वीकारून पुढें पाऊल टाकण्याची जी हिंमत त्यांनीं दाखविली त्याला फार मोठें महत्त्व आहे. आज सगळा बगीचा फुलला आहे. स्वातंत्र्य मिळालें आहे, राज्यें मिळालीं आहेत, आणि त्या राज्यांतील एका राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मी बोलतों आहे, पण पायांतले दगड होण्याचे निर्णय ज्यांनीं घेतले त्यांचे आम्हीं लाख लाख उपकार मानले पाहिजेत. कुठल्या तरी अंधा-या रात्रीं चर्चा करतां करतां हे निर्णय या दोन तरुण माणसांनीं घेतले. या निर्णयांमध्यें हिंदुस्तानच्या आजच्या प्रगतीचीं बीजें आहेत, हें कृतज्ञतेनें आम्हीं मान्य करावयास पाहिजे.

लोकमान्यांच्या ह्या निर्णयाचा निव्वळ हिंदुस्तानपुरताच परिणाम घडलेला आहे असें नव्हें. आजहि आम्ही पाहतों. अनेक बाहेरचीं माणसें या देशांत येतात आणि आम्हांला भेटतात. त्यांतहि पूर्व आशियांतील आणि आफ्रिका खंडांतील माणसें जेव्हां आम्हांला भेटतात तेव्हां आमच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या इतिहासाचा फार सखोल अभ्यास या मंडळींनीं केला आहे असें आम्हांला आढळून येतें. अलीकडेच पूर्व नायगेरियाच्या राज्याच्या मुख्य मंत्र्यांची आणि माझी भेट झाली, त्यावेळी त्यांनी अत्यंत कृतज्ञतापूर्वक टिळक आणि गोखले यांचा माझ्याजवळ उल्लेख केला. आणि म्हणून मी म्हणतों कीं लोकमान्यांनीं त्या वेळीं घेतलेल्या निर्णयांतून निर्माण झालेले विचारप्रवाह आणि त्यांतून निर्माण झालेल्या भावना ह्या कांहीं भाषेच्या क्षेत्रांत किंवा देशाच्या सीमेंत मर्यादित होणारे विचार व भावना नव्हत्या. कुठल्याहि स्वाभिमानी मानवसमाजाला मार्गदर्शक ठरावे इतके महत्त्वाचे ते विचार आणि त्या भावना होत्या. अत्यंत थोर परंपरा असलेलें एक राष्ट्र दुस-या कुठल्या तरी राष्ट्राच्या जोखडाखालीं जें दबून पडलेलें आहे त्याला त्यांतून मुक्त करण्याचा प्रयत्न आपण केलाच पाहिजे, अशा त-हेचा मर्द विचार बोलून त्याप्रमाणें स्वतःचें जीवन आंखण्याचा प्रयत्न लोकमान्यांनीं केला. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच, हा मंत्र त्यांनीं त्या काळांत उच्चारला - आणि नुसताच उच्चारला असें नव्हे तर यशाची कांहींहि चिन्हें ज्या वेळीं दिसत नव्हतीं अशा काळांत आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षणन् क्षण त्यासाठीं त्यांनीं वेंचला. आज आम्ही म्हणतों कीं त्यांच्या कामाची दखल घेतली आहे आणि लौकिक अर्थानें त्यांचें जीवन यशस्वी झालें आहे. पण लोकांमध्यें जागृति निर्माण करण्याचें जें काम लोकमान्यांनीं केलें तें त्या अर्थानें तेव्हांहि यशस्वी झालें असें आतां आपण म्हटलें पाहिजे.

परंतु डोळ्यांपुढें जें ठेविलें तें संपूर्णपणें पदरांत पडलें आणि त्यांतलें जें काय वैयक्तिक सुख असेल तें मिळालें, अशी गोष्ट कांहीं लोकमान्यांच्या जीवनामध्यें शेवटपर्यंत घडली नाहीं. मानसिक वेदनांमध्यें त्यांच्या जीवनाचा शेवटीं अंत झाला. त्यांनीं डोळ्यापुढें ठेविलेलें स्वप्न पुरें झालेलें नव्हतें. खटपटी चालू होत्या, उद्योग चालू होते, प्रयत्न चालू होते; त्यामध्यें कधीं यश येत होतें, कधी अपयश येत होतें. आणि हे सगळे प्रयत्न करीत असतांनाच स्वतःच्या वैयक्तिक जीवनांतून त्यांना जावें लागलें. त्यांच्या सबंध जीवनाकडे वैयक्तिक दृष्टीनें जर आपण पाहिलें तर तें अत्यंत बिकट संकटांनी भरलेलें, अत्यंत खडतरपणानें चाललेलें असें जीवन होतें असेंच आपणांला आढळून येईल. त्यांची जी प्रसिद्ध झालेली पत्रें आहेत ती पाहात असतांना आजहि पुष्कळ वेळां आपलें मन अगदीं गहिंवरून येतें. त्यांचीं तीं मंडालेचीं पत्रें आपण पाहिलीं म्हणजे आपणांस याची कल्पना येईल. काळाशीं एवढ्या कठोरपणानें झगडणारा हा पुरुष कौटुंबिक बाबतींत, विशेषतः आपल्या पत्नीच्या प्रकृतीसंबंधानें, ज्या त-हेनें विव्हळ होऊन लिहितो, तें सर्व वाचीत असतांना, कोणत्याहि सहृदय मनुष्याच्या डोळ्यांत अश्रु आल्याशिवाय राहणार नाहींत. हीं वैयक्तिक संकटें, हीं दुःखें त्यांना सोसावीं लागत. "माझी प्रकृति खरोखरच बरी आहे. त्यांना बरें वाटावें म्हणून उगाच कांहीं तरी लिहितों असें नाहीं," असे आपल्या पत्नीला व मुलांना सांगावें म्हणून पत्रांतून ते निक्षून निक्षून लिहीत होते. त्यांतली त्यांची दृष्टि, त्यांतला त्यांचा विचार, आणि संकटांची सगळी परंपरा आली असतांना त्यांनीं वैयक्तिक जीवनामध्यें दाखविलेले गुण या सर्वांचा तुम्हीं-आम्हीं विचार केला पाहिजे. स्वातंत्र्याच्या संग्रामामध्यें झगडणारा एक शूर सेनापति या नात्यानें त्यांना राष्ट्रीय महत्त्व प्राप्त होत असलें, तरी वैयक्तिक जीवनामध्यें माणसानें कसें वागावें, कुठल्याहि संकटाशीं माणसानें जिद्दीनें कसें लढावें याचें, त्यांचें सर्वच जीवन एक अखंड मार्गदर्शन आहे असें मला वाटतें.

वयाच्या एकेचाळिसाव्या वर्षी त्यांना तुरुंगाची पहिली मोठी यात्रा करावी लागली. आज सकाळींच आम्हीं त्यांनीं या यात्रेची जेथें सुरुवात केली त्या जेलखान्यामध्यें गेलों होतों. आणि त्या वेळच्या तेथील प्रमुख अधिका-यांनी ते तुरुंगांत आल्यानंतर पहिल्याच दिवशीं त्यांच्यासंबंधीं घेतलेली माहिती - त्यांचें वय, त्यांची उंची, त्यांच्याजवळ असलेले पैसे, त्यांचे कपडे वगैरे माहिती - त्या तुरुंगाच्या सध्याच्या अधिका-यांनीं आम्हांला वाचून दाखविली. एकेचाळिसाव्या वर्षी याप्रमाणें जेव्हां ते जेलमध्यें गेले तेव्हां त्यांच्याजवळ फक्त एक अंगरखा, एक पगडी, एक धोतर आणि एक पैरण हे कपडे, खिशामध्यें नऊ रुपये चार आणे तीन पै इतके पैसे आणि शिवाय पंचावन्न पुस्तकें होतीं. हा सगळा हिशोब मीं त्यांच्याकडून ऐकला. पंचावन्न पुस्तकांची संपत्ति घेऊन ते त्या जेलमध्यें गेले होते. परंतु जेलमध्यें गेल्यानंतर सगळीं संकटें बाहेर ठेवावीं आणि आपल्या विद्याभ्यासामध्यें मग्न होऊन जावें ही कांहीं साधी गोष्ट नाहीं. विदेही मनुष्य कसा असावा यासंबंधीं जुन्या काळच्या थोर माणसांचें वर्णन आपण वाचतों. एका बाजूनें पायाला कोणी तरी

तूप लावीत होतें आणि दुस-या बाजूनें पाय अग्नींत पडला होता अशी विदेही जनकाची कथा आम्ही ऐकतों. पुराणांतल्या या सगळ्या कहाण्या आम्ही ऐकतों. पण दुःख व कष्ट यांनीं पेटलेलें सबंध कौटुंबिक जीवन, मंडालेच्या तुरुंगामध्यें प्रवेश केल्यानंतर टाकून देऊन, तें सगळें जिथल्या तिथें विसरून जाऊन, आपल्या तत्त्वचिंतनामध्यें मग्न होणारा माणूस आम्हीं आमच्या डोळ्यांनी पाहिलेला आहे. आणि हें सर्व तो विदेही असल्याशिवाय शक्य नाहीं. कारण सहज म्हणून असें कांहीं कोणाला होतां येणार नाहीं. मी ब-याच वेळां तुरुंगामध्यें जाऊन आलेला माणूस आहें; मीहि थोडेंफार गंभीर वाचण्याचा प्रयत्न केला आहे, नाहीं असें नाहीं. परंतु तुरुंगांत गंभीरपणानें तत्त्वज्ञाच्या वृत्तीनें आपल्या कार्यांत सदैव मग्न होणारे असे एक लोकमान्यच होते.

आणि त्यांनीं जेलमध्यें जें लिहिलें त्यासंबंधींचा त्यांचा विश्वास केवढा जबर होता. हल्ली पाश्चात्य देशांत ग्रंथ लिहिणा-यांना पुष्कळशीं संशोधन करणारीं माणसें मदतीला लागतात असें म्हणतात. उलट जेलमध्यें गेल्यानंतर मिळालेली पुस्तकें हातांत घेऊन चार किंवा पांच महिन्यांमध्यें लोकमान्यांनीं तो ग्रंथराज - गीतारहस्य - लिहून पुरा केला. त्यासंबंधी मीं एक आख्यायिका ऐकली आहे. जेव्हां लोकमान्य परत आले तेव्हां त्यांचा तो ग्रंथ कांहीं परत आला नव्हता. सरकारी रीत्या मंजूर होऊन तो अद्यापि यावयाचा होता. तेव्हां कुणीं तरी, हा ग्रंथ त्या लोकांनीं परत केलाच नाहीं तर काय करावयाचें, अशी शंका त्यांच्याजवळ प्रदर्शित केली. तेव्हां लोकमान्य म्हणाले, "सबंध ग्रंथ माझ्या डोक्यांत आहे. मी चार महिन्यांत तो परत लिहून काढीन. पुस्तकाची पानें फार तर त्यांच्याजवळ असतील. माझे विचार कांहीं कोणीं माझ्याकडून काढून घेतलेले नाहींत." असें सामर्थ्य असणारी त्यांची बुद्धि होती.

परंतु त्याचबरोबर त्यांचे जे कांहीं वैयक्तिक गुण दिसले त्या गुणांचें मोल फार मोठें आहे. आणि तुम्हां आम्हांला, महाराष्ट्राला, पुण्याला, या गुणांची जरुरी आहे असें मला वाटतें. त्यांची पुण्याला जरुरी आहे असें मी म्हणतों म्हणजे पुण्यामध्यें ते गुण नाहींत असा त्याचा अर्थ नाहीं. ते गुण पुण्यानें पुष्कळ प्रमाणामध्यें दाखविलेले आहेत. त्या गुणांचा आपल्या पंतप्रधानांनीं अलीकडेच अत्यंत गौरवपूर्ण शब्दांत उल्लेख केला आहे. परंतु संकट आल्यानंतर त्याला कसें तोंड द्यावें ही गोष्ट आज आम्हीं शिकली पाहिजे. चिरोल केस लोकमान्य हरल्यानंतर लंडनहून त्यांनीं जें पत्र लिहिलें आहे त्यांतील चारदोन वाक्यें या दृष्टीनें मला फार महत्त्वाचीं वाटलीं. चिरोल केस जिंकण्याकरितां ते लढले, पण अखेर ते ती केस हरले. त्यांच्या जीवनाच्या उत्तर काळांतील ती एक अत्यंत कठीण अशी गोष्ट होती. पण ती केस लोकमान्य हरल्यानंतर लोकमान्य या निकालामुळें मनानें खचले आहेत अशा प्रकारचा प्रचार पुण्यामध्यें चालू होता. त्याला उत्तर देण्याकरितां म्हणून लोकमान्यांनीं जें पत्र लिहिलें आहे तें त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें पूर्ण निदर्शक आहे. त्यांतलीं चार वाक्यें मी तुम्हांला वाचून दाखवितों. प्रत्येक मूळ इंग्रजी वाक्य आणि त्याचें

**भाषांतर मी तुम्हांला सांगतों. लोकमान्यांचें पहिलें वाक्य असें आहे :** "The news about my being dejected by the unexpected result of the case i.e. Chirol Case, is entirely groundless. - **या चिरोल केसच्या अनपेक्षित निकालामुळें मी मनानें खचलों आहें अशी जी बातमी आहे ती निराधार आहे.**"

**त्यांनीं पुढें म्हटलें आहे,** "I am now too old a hand to be upset even if the heavens were to fall down. - **मी आतां इतका वृद्ध झालों आहें कीं, आकाश जरी कोसळलें तरी मीं त्याची क्षिति करावी अशा मनःस्थितींत किंवा अशा परिस्थितींत मी राहिलेलों नाहीं.**"

**आणि शेवटीं ते म्हणतात,** "I would rather utilise the fall of the heavens for my purpose than be dismayed thereby. - **आकाश जरी कोसळलें तरी त्या कोसळलेल्या आकाशावर पाय रोवून त्याचा उपयोग मी करून घेईन, पण मी घाबरणार नाहीं.**"

**लोकमान्यांची अशी ही दृष्टि आहे. आजच्या पुण्यालाच नव्हे, आजच्या महाराष्ट्रालाच नव्हे, तर आजच्या हिंदुस्तानला आणि कदाचित् आजच्या मानवतेलाहि अत्यंत उपयुक्त ठरावें असें विलक्षण निर्धाराचें तें शेवटचें वाक्य आहे. कुठल्याहि देशाच्या नेत्यांनीं ध्येयवाक्य मानावें, बावरलेल्या आजच्या मानवतेला सुखाकडे नेण्याचा प्रयत्न करणा-या प्रत्येक माणसानें आपल्या हृदयावर कोरून ठेवावें, इतकें थोर तें घोषवाक्य आहे. त्याची नुसती घोषणा त्यांनीं केली असें नव्हें, तर त्याप्रमाणें जीवनाचा प्रत्येक क्षण ते जगले. कुठल्याहि सभेंत उच्चारलेलें तें वाक्य नव्हतें, तर आपल्या मित्राला त्यांनीं लिहिलेल्या एका पत्रामधलें तें वाक्य आहे. त्या वाक्यामधून व्यक्त झालेला निर्धार वयाच्या अखेरच्या वर्षांतला आहे. म्हातारपणीं लिहिलेलें तें वाक्य आहे. तरुणपणीं लोकमान्य जर हें बोलले असते तर कसें बोलले असते याची अजून मला कल्पना येत नाहीं. जीवनाची संध्याकाळ अगदीं जवळ आली असतांना, मी वृद्ध झालों असें सांगत सांगत त्यांनीं हें वाक्य लिहून जो निर्धार व्यक्त केला आहे तो निर्धार तुम्हांला आम्हांला आज, उद्यां आणि सतत मार्गदर्शन करणार आहे. तुम्हां-आम्हांला जन्मभर संदेश देणारें हें वाक्य ज्यांनीं लिहिलें त्या लोकमान्य टिळकांची पुण्यतिथि तुम्ही-आम्ही आज साजरी करीत आहोंत.**

**लोकमान्यांसारख्या थोर पुरुषाचें जीवन आपल्याला कोणत्या दृष्टीनें मार्गदर्शक झालें पाहिजे याचा विचार करण्याची आज आवश्यकता आहे. निव्वळ मी पुण्याच्या पुरापुरतें मर्यादित बोलूं इच्छीत नाहीं. लोकमान्यांच्या पुण्यांतला पूर हा एक मोठा हृदयद्रावक प्रसंग आहे; परंतु निव्वळ पुण्याच्या पुराच्या प्रसंगापुरताच संदेश घेऊन लोकमान्यांच्या जीवनाला मी पुण्याच्या पूर्व - पश्चिम सीमेमध्ये मर्यादित ठेवूं इच्छीत नाहीं. कारण फार थोर असें तें जीवन आहे. लोकमान्यांचें व्यक्तिमत्त्वच असें आहे कीं आज सर्वच पक्षांना लोकमान्य आपले आहेत असें वाटतें. घरांतल्या**

सगळ्यांत मोठा मनुष्य हा सगळ्यांचा असतो. तेव्हां लोकमान्यांनीं एका विशिष्ट त-हेच्या विचारांचें राजकारण त्या काळीं मांडलेलें असलें तरी आज लोकमान्य ही कांहीं निव्वळ व्यक्ति राहिलेली नाहीं, निव्वळ एक संस्था राहिलेली नाहीं. लोकमान्य हा अत्यंत स्फूर्तिदायी असा एक संदेश, असा एक विचार आहे आणि तो आमच्या इतिहासांतला एक ठेवा आहे. मीं कुठल्याहि पक्षीय दृष्टीनें हा विचार येथें मांडलेला नाहीं. कारण आजचें हें व्यासपीठ कांहीं तशा अर्थाचें व्यासपीठ नाहीं. आजचे हें व्यासपीठ लोकमान्यांच्या सगळ्या वंशजांचें व्यासपीठ आहे. निव्वळ जयंतरावांचें हें व्यासपीठ नाहीं आणि निव्वळ टिळक स्मारक मंदिराच्या ट्रस्टी बोर्डाचेंहि नाहीं. लोकमान्यांना आपलें म्हणणा-या, लोकमान्यांच्या स्तुतीला आपली स्तुति समजणा-या, लोकमान्यांच्या जीवनाला आपलें स्फूर्तिस्थान मानणा-या, लोकमान्यांच्या स्मृतीला वंदन करणा-या आणि भारताला आपला देश मानणा-या सर्व भारतीयांचें हें व्यासपीठ आहे. आज आम्हांला अनेक दृष्टींनीं लोकमान्यांचें जीवन स्फूर्तिदायक होणार आहे. शेवटीं, कितीहि पक्ष असले, कितीहि राजकीय विचार असले तरी या सर्वांपेक्षां मोठें असें जें लोकजीवन आहे, त्या लोकजीवनाचे प्रश्न सोडविण्यासाठीं, त्या लोकजीवनाची सेवा करण्यासाठींच त्या सर्व पक्षांचा, त्या सर्व विचारांचा जन्म झालेला असतो. हा मूळ विचार तुम्हांला आम्हांला विसरतां येणार नाहीं. आणि अशीं कित्येक क्षेत्रें आहेत, असे कित्येक विचार आहेत, अशा कित्येक बाबी आहेत कीं ज्यामध्यें लोकमान्यांचे मूलभूत विचार, लोकमान्यांची मूलभूत श्रद्धा आजहि तुम्हां-आम्हांला मार्गदर्शक होईल.

त्यांच्या या विचारांतला राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा विचार मला अत्यंत महत्त्वाचा वाटतो. हिंदुस्तान स्वतंत्र झाल्याला आज जवळजवळ चवदा-पंधरा वर्षे होत आली. तरी आजहि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न एक समस्या समजला जातो. या प्रश्नाचा उल्लेख, केवळ मेजॉरिटी-मायनॉरिटीचा प्रश्न, हिंदु-मुसलमानांचा प्रश्न एवढ्याच मर्यादित अर्थानें करून मी आज बोलत नाहीं. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न हा अजूनहि आमच्या देशामध्यें आहे याची चिंता देशांतील सर्व माणसांना आहे यांत कांहीं शंका नाहीं. राष्ट्रीय एकता आणि एकराष्ट्रीयत्व ही आपल्या देशाला नवी गोष्ट आहे हें आपण नाकारण्यांत कांहीं फारसा अर्थ नाहीं. आज जी एक जिऑग्रॅफिकल एन्टिटी - भौगोलिक एकता - आमची आहे, आणि जी पाकिस्तानच्या पूर्वीसुद्धां होती असें आपण गृहीत धरलें, तरी राष्ट्रीय एकता ही एका अर्थानें ज्याला आपण मॉडर्न कन्सेप्ट म्हणतों अशी अलीकडची एक आधुनिक कल्पना आहे. आज ती प्रत्यक्ष जीवनांत आणण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतांना यांत लाख अडचणी उभ्या राहिल्या आहेत. एक राष्ट्र म्हणून जगावें असें सांगणें व एका घटनेच्या कायद्यानें एकत्र येणें ही एक गोष्ट आहे. पण दैनंदिन जीवनामध्यें येणा-या सगळ्या संकटांना तोंड देऊन ती गोष्ट प्रत्यक्ष अंमलांत आणणें आणि ती एक शक्ति आहे असें स्वतः सिद्ध करून त्याची प्रचीती दुस-याला आणून देणें हा इतिहासाचा एक दुसरा भाग आहे. इतिहासाच्या त्या कालखंडांतून आपण

आज चाललों आहोंत. त्यांतून कांहीं अडचणी निर्माण होत असतात. अनेक आंतरराज्य स्वरूपाचे प्रश्न निर्माण होत असतात. महाराष्ट्रापुरतें बोलायचें झालें तर तूर्त तरी आमचे दोन राज्यांशीं प्रश्न आहेत. एक आंध्र आणि दुसरें म्हैसूर. पण मी यापेक्षां जास्त व्यापक त-हेच्या प्रश्नाला हात घालून बोलतों आहें. असे हे प्रश्न येणारच. थोड्याच वर्षांपूर्वी म्हैसूर विभाग आणि आंध्र विभाग हीं आपआपल्या क्षेत्रांमध्यें छोटीं राज्यें होतीं. पण आज तीं एका संघराज्यांतलीं शेजारी राज्यें म्हणून जगण्याचा प्रयत्न करीत आहेत. इतिहासकालांतला निदान मला माहीत असलेल्या परिस्थितींतला आपल्याकडील हा पहिला प्रयोग आहे.

तेव्हां दोन शेजारी याप्रमाणें एकत्र आल्यामुळें कांहीं नवे प्रश्न उत्पन्न होणारच. त्याचमुळें कित्येक नवीन त-हेच्या समस्या आज आपल्या देशांत निर्माण होत आहेत. नद्यांच्या पाण्याचा वापर करण्याचा प्रश्न नद्यांचा उगम झाल्यापासून आपण पहिल्या प्रथमच उत्पन्न करीत आहोंत. इतिहासकालीं घडणारी ही एक नवीन गोष्ट आहे. गोदावरीच्या पाण्याचा वाद आंध्र आणि महाराष्ट्र यांमध्यें गोदावरी जेव्हां जन्माला आली त्या वेळेस झाला असता तर या गोदावरीचें 'गोदावरी' असें एकच नांव राहिलें नसतें. तेव्हां एका नव्या त-हेचें एकतेचें जीवन जगण्याचा आम्ही जो प्रयत्न करीत आहोंत त्यांतून कांहीं नव्या समस्या निर्माण होणें साहजिक आहे. या नव्या समस्या सोडवून, त्यांच्यावर स्वार होऊन, आमचें हें भारतीय जीवन आहे, आमचें हें एकराष्ट्रीयत्वाचें जीवन आहे, या त-हेची प्रचीति घेणें आणि देणें हें काम या देशामध्यें जर यशस्वी करायचें असेल तर, शेवटीं लोकमान्य टिळक आणि त्यांच्याबरोबरचे जे आमचे थोर राष्ट्रीय नेते आहेत, त्यांनीं भारतासंबंधानें बोलतांना एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेसंबंधीं जी निष्ठा दाखविली त्या निष्ठेची जोपासना आम्हीं आजहि केली पाहिजे.

एकराष्ट्रीयत्वाची ही कल्पना आज जरी कांहींशी नवी असली तरी सुद्धां आमच्या परंपरेंतून आम्ही एक होतों, आमच्या संस्कृतीमुळें आम्ही एकत्र आलों होतों, या आमच्या जुन्या इतिहासानें दिलेल्या ज्या कांहीं देणग्या आहेत त्यांच्यासंबंधींची आठवण देऊन एकत्र राहण्याची त्यांनी आम्हांला जी शिकवण दिली ती शिकवण माझ्या मतानें आमचा फार मोठा वारसा आहे. एका नवीन होतकरू पण बुद्धिमान अभ्यासू माणसानें त्याच्या 'डेंजरस डिकेड्स' या पुस्तकांत हिंदुस्तानच्या सध्यांच्या जीवनाचें वर्णन करतांना त्याच्या मनाशीं आलेला विचार बोलून दाखविला आहे. तो असा आपणांला बाजूला काढतां येण्यासारखा विचार नाहीं. त्यानें असें म्हटलें आहे कीं, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर निर्माण होणारे आवेश, आनंद व उत्साह यांत आपली पहिलीं आठ-दहा वर्षे गेल्यानंतर एकराष्ट्रीयत्वाच्या जीवनांतल्या अत्यंत कठीण अशा दशकाच्या तोंडाशीं, उंबरठ्याशीं आम्ही उभे आहोंत. आणि म्हणून ज्यांनीं एकराष्ट्रीयत्वाचा विचार भारताला दिला आणि शिकविला, जे सबंध जन्मभर त्यासाठीं झगडत राहिले, त्यांचें जीवन आणि त्यांचे विचार, त्यांचा

व्यासंग आणि त्यांची निष्ठा यांच्या पूजेची हिंदुस्थानमध्यें यापूर्वी कधींहि भासली नव्हती एवढी आवश्यकता आज निर्माण झाली आहे. लोकमान्यांच्या जीवनाचा मला समजलेला हा अर्थ आहे.

लोकमान्यांच्या जीवनाकडे महाराष्ट्रांतल्या माणसानें कसें पाहावें याचाहि विचार करावयास तुम्हींआम्हीं शिकलें पाहिजे. महाराष्ट्राच्या इतिहासांत अत्यंत थोर व पूजनीय अशा ज्या व्यक्ति आहेत त्यांतलें एक अत्यंत मोठें व्यक्तिमत्त्व लोकमान्यांचे आहे. आणि आज ह्या नव्या महाराष्ट्राचें जीवन एका नवीन त-हेनें घडावें, त्यांत एक प्रकारची नवी आशा निर्माण व्हावी, त्यांत एक प्रकारचें नवें सामर्थ्य निर्माण व्हावें आणि हें महाराष्ट्र राज्य त्याचें साधन व्हावें अशी जनतेची अपेक्षा आहे. त्या परीक्षेला महाराष्ट्र राज्य किती उतरतें हें मला माहीत नाहीं. परीक्षा लोक करतील, परीक्षा होत राहील, पण मूळ गोष्ट ही आहे कीं त्यांचें साधन हें महाराष्ट्र राज्य जरूर आहे. त्याच्यासंबंधीं मीं आतांच सांगितलेल्या ज्या सगळ्या आकांक्षा आणि अपेक्षा आहेत त्या आकांक्षा आणि अपेक्षा पूर्ण करण्यासाठीं जीं दैवतें आपणांला स्वीकारलीं पाहिजेत त्यांमध्यें लोकमान्य टिळक हें फार मोठें दैवत आहे. आम्हांला आमच्या जीवनामध्यें सामाजिक एकजिनसीपणा आणला पाहिजे असें मीं अनेक वेळा सांगितलेलें आहे. त्याच शब्दप्रयोगाचा मी आज पुन्हा उच्चार करतों आहें. केवळ मुख्यमंत्री म्हणून मी हें बोलत नसून हजारों लोक जें मानतात तेंच मी बोलतों आहें. एकटेंच कुणी कांहीं बोलतें आणि करतें असें नव्हे. पण हा प्रयत्न फार चिकाटीनें, फार धीरानें, तात्पुरत्या राजकीय फायद्या-तोट्याच्या कसोटीनें न पाहता दूरवर नजर ठेवून जर तुम्हीं-आम्हीं केला तरच लोकमान्यांचे वंशज म्हणवून घेण्यास आपण पात्र ठरूं असें माझें मत आहे. महाराष्ट्रामध्यें हा प्रयत्न आपण निकरानें केला पाहिजें. या प्रकारच्या सामाजिक एकजिनसीपणासाठीं मनाची, विचारांची, भावनांची परिस्थिति निर्माण करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आणि हें काम जर आम्ही करूं शकलों, एवढें एकच काम जरी आम्ही करूं शकलों, तर मला वाटतें, बाकीचे प्रश्न आपोआप सुटत जातील.

महाराष्ट्र राज्याचें पहिलें वर्ष फार सुखानें गेलें असा त्याच्या पहिल्या वाढदिवसाच्या दिवशीं माझ्या मनामध्यें विचार आला. आतां जेव्हां महाराष्ट्र राज्याचा दुसरा वाढदिवस येईल तेव्हां तो विचार कांहीं माझ्या मनाशीं असणार नाहीं. पुण्याच्या प्रलयानंतर निर्माण झालेल्या भावना आणि दुःख, त्यांत बसलेले आर्थिक तडाखे आणि त्यांतून निर्माण झालेल्या वेदना हें सर्व आठवलें म्हणजे दुसरा वाढदिवस साजरा करतांना माझ्या मनामध्यें ती निर्भेळ भावना कशी असणार ? पण या संकटांनीं आम्ही दबणार आहोंत काय, हाच तुमच्या-माझ्यापुढें खरा प्रश्न आहे. व्यक्ति हरतील, पक्ष हरतील, राज्यें म्हणजे गव्हर्न्मेंट्स हरतील, जातील, राहतील. परंतु महाराष्ट्राचें राज्य, लोकमान्यांच्या महाराष्ट्राचें राज्य असें जेव्हां आम्ही म्हणतों तेव्हां त्याला कांहीं अर्थ आहे कीं नाहीं ? लोकमान्यांचा महाराष्ट्र म्हणजे तुम्ही-आम्ही आज जी भाषा बोलतों तीच भाषा

लोकमान्य बोलत होते म्हणून लोकमान्यांचा महाराष्ट्र एवढाच त्याचा अर्थ नाहीं. अर्थात् तोहि जरूर अभिमानाचा विषय आहे. अभिमानाचा विषय नाहीं असें नाहीं. सबंध देशांत आणि त्याच्या बाहेरहि ज्यांचा विचार व्हावा, अभ्यास व्हावा असे विचार आपल्या मराठी माउलींत लोकमान्यांनी आणले म्हणून त्याचाहि अभिमान जरूर तुमच्या आणि माझ्या मनाशीं आहे. पण मी त्यासंबंधानें बोलत नाहीं. त्यांचे जे गुण आहेत आणि संकटांशीं त्यांनी ज्या एका निर्धारानें तोंड देण्याचा प्रयत्न केला तो निर्धार आणि ते गुण जर महाराष्ट्र जीवनामध्यें तुम्हां आम्हांला निर्माण करतां आलें नाहींत तर महाराष्ट्राची नवीन रचना करण्याचें जें काम आपण अंगिकारलें आहे तें करण्यामध्यें आपण पाठीमागें पडूं. आज आपणांवर संकटें आली आहेत, आकाश कोसळलेलें आहे. पण त्या कोसळलेल्या आकाशाखालीं तुम्ही आणि मी दबणार कीं अशा त्या कोसळलेल्या आकाशाचे बगीचे बनविणार हा खरा तुमच्या-माझ्यापुढें आज प्रश्न आहे. आणखीहि संकटें येतील. संकटें म्हणजे धरण पडण्याची संकटें परत येणार नाहींत याची जरूर खात्री आहे. आणि अशीं जर वारंवार धरणें फुटूं लागलीं तर धरणें बांधणा-या सरकारला कुणी सरळ ठेवणार नाहीं याचीहि मला खात्री आहे. परंतु समाजाच्या जीवनामध्यें व्यक्तीच्या जीवनाप्रमाणेंच संकटें येतात, अडचणी येतात. आणि तशीं संकटें आणि तशा अडचणी यापुढें येणार नाहींत अशी खात्री आपण कशी देऊं शकूं ? पण त्या संकटांशीं आपण कसें लढणार आहोंत हा खरा प्रश्न आहे. आणि म्हणून या विषयासंबंधानें बोलत असतांना मीं सांगितलें होतें कीं, पानशेत झालें, पण पानशेतचें आपण पानिपत होऊं देतां कामा नये. पानिपतनंतर आम्ही पराभूत मनोवृत्तीनें वागलों. महाराष्ट्रामध्यें आतां त्याची पुनरावृत्ती होतां कामा नये. पानशेतचें आपण पाणशेत केलें पाहिजे, म्हणजे त्या पाण्याचा उपयोग परत चांगली सुजलाम् सुफलाम् शेती करण्याकरितां, वाढविण्याकरितां व्हावा म्हणून आपण प्रयत्न केला पाहिजे, अशा त-हेचें सामर्थ्य आपल्या जीवनामध्यें निर्माण करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आणि तसें तें आपण निर्माण करूं शकलों तर लोकमान्यांच्या जीवनांतला एक पाठ आम्हीं आत्मसात् केला असें मी म्हणेन.

पुरांत सांपडलेल्या बंधूंच्याकरितां मीं थोडेंफार तरी बोललें पाहिजे. पानशेतच्या इतर प्रश्नांबाबत मी आतां बोलत नाहीं, कारण त्याची आपणांला कल्पना आहे. त्यासंबंधानेंहि बोलावयास माझी कांहीं हरकत नव्हती. पण हा चौकशीचा प्रश्न असल्यामुळें त्यासंबंधीं आतां मी बोलत नाहीं. मी जरूर परत केव्हां तरी पुणेकरांच्या पुढें उभा राहून ही चौकशी संपल्यानंतर माझ्या सरकारतर्फे जी कांहीं बाजू आहे, ती जाहीरपणें मांडण्याचा प्रयत्न करीन. त्याचें कारण लोकमताविषयीं विश्वास असणारा मी माणूस आहे. लोकशाहीच्या राज्यामध्यें लोकमत जितकें ठेवील तितकेंच राहिलें पाहिजे. त्यापलीकडे राहतां येत नाहीं, राहतों म्हटलें तरी. असा मनाचा संपूर्ण कौल आणि अनुभव असणारा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून मी हें आपणांस सांगूं इच्छितों. पण मी माझ्या पूरग्रस्त बंधूंना सांगूं इच्छितों कीं, कॉम्पेन्सेशनचा प्रश्न त्यांनीं उभा करूं नये. कारण ती गोष्ट स्वीकारणें

सरकारला शक्य नाहीं. परंतु पुण्याचें जीवन जें आज कांहीं प्रमाणांत उध्वस्त झालें आहे तें उध्वस्त झालेलें जीवन पुन्हा रचण्याच्या कामाची प्रतिज्ञा महाराष्ट्र राज्याची आहे, हें मी आपणांस सांगूं इच्छितों. तें जीवन सामर्थ्यशाली करणें, स्वतःच्या शक्तीनें तें चालूं लागेल, वाढूं लागेल, असा प्रयत्न, असा आत्मविश्वास, अशी शक्ति पुण्याच्या जीवनामध्यें निर्माण करण्याच्या बाबतींत महाराष्ट्र सरकार बांधलें गेलें आहे. हा विश्वास आपण मनाशीं बाळगा, एवढीच लोकमान्यांच्या या पुण्यतिथीच्या दिवशीं मी आपणांला विनंती करतों.

लोकमान्य टिळकांच्या या पुण्यतिथीला बोलावून आपण माझा सन्मान केलात. या मोठ्या कठीण काळांतल्या पुणें शहरामध्यें येऊन लोकमान्यांच्या स्मृतीला वंदन करण्यानें तुमच्याप्रमाणेंच मीसुद्धां माझ्या मनाला थोडीफार शक्ति घेऊन येथून जाणार आहें. ही संधि आपण मला दिल्याबद्दल लोकमान्य टिळकांच्या स्मृतीला वंदन करून मी आपले आभार मानतों आणि आपली रजा घेतों.

## मानवतेचे पुजारी महाकवि रवीन्द्रनाथ टागोर

भारताचे दोन सुपुत्र रवीन्द्रनाथ टागोर आणि मोतीलाल नेहरू यांच्या जन्माला चालू सालीं शंभर वर्षे पूर्ण झालीं म्हणून काल आणि आज, सबंध भारतभर आम्ही दोन महत्त्वाच्या संवत्स-या साज-या करीत आहोंत. यांपैकीं महाकवि रवीन्द्रनाथ टागोर यांची संवत्सरी साजरी करण्यासाठीं आपण सर्वजण आज येथें जमलों आहोंत. १८५७ नंतर अवघ्या चार वर्षांनीं येणारें १८६१ हें साल, या दोन महाभागांच्या जन्मामुळें भारताच्या इतिहासांतील एक फार महत्त्वाचें साल म्हणून गणलें जाणार आहे. १८५७ सालीं या देशांत सुरू झालेली स्वातंत्र्याची प्रेरणा इतकी महत्त्वाची ठरली कीं त्यासाठीं किती तरी महापुरुषांना भारतामध्यें जन्म घ्यावा लागला. आज ज्या महाकवीची संवत्सरी आपण येथें साजरी करीत आहोंत तो कवि या महापुरुषांपैकींच एक असून त्याचें जीवन इतकें विशाल व उदात्त आहे कीं आणखी अनेक शतकें आपल्या देशामध्यें त्याची जन्मसंवत्सरी साजरी केली जाईल. आज त्या महाकवीच्या जीवनासंबंधीं मराठीच्या राजकवींनीं आपले विचार आपल्यापुढें मांडले असतांना माझ्यासारख्या राजकारणामध्यें वावरणा-या माणसानें काय सांगावें असा माझ्यापुढें प्रश्न पडला आहे. परंतु महाकवीचें जीवन इतकें थोर, इतकें उदात्त आणि सर्वस्पर्शी असतें कीं राजकारणाच्या खटाटोपांत असणा-या माणसाच्या मनालाहि स्पर्श करण्याचें सामर्थ्य त्यामध्यें असतें. माझें आजचें हें भाषण हीच त्याची उत्तम साक्ष आहे.

रवीन्द्रनाथ टागोर जन्माला आले त्यावेळीं भारतांत एक विशिष्ट परिस्थिति होती आणि

बंगालचीहि परिस्थिति, एका विशिष्ट अर्थानें, एका निराळ्या त-हेची होती. सामाजिक नवजीवनाची चळवळ भारतामध्यें बंगालनें पहिल्या प्रथम सुरू केली हें आपणांला मान्य करावें लागेल. राजा राम मोहन रॉय यांनीं सुरू केलेल्या नवजीवनाच्या चळवळीचा वारसा बंगालला लाभला होता. रवीन्द्रांचे पिताजी देवेन्द्र ह्यांनीं तीच पुरोगामी परंपरा पुढें चालू ठेवली होती. अशा या नवविचारांनीं भारलेल्या एक सुखासीन घरामध्यें रवीन्द्रांचा जन्म झाला. त्यांच्यासारख्या प्रखर बुद्धिमत्ता असलेल्या तरुणाच्या संवेदनाक्षम मनाची कसकशी वाढ होत गेली त्याचा पुरावा त्यांच्या जीवनामध्यें आपणांला पाहावयाला मिळतो. थोर कवि, थोर कादंबरीकार, थोर तत्त्वज्ञ, थोर कलोपासक म्हणून रवीन्द्रनाथांना आम्हां भारतीयांच्या जीवनांत फार महत्त्वाचें स्थान आहे.

त्यांच्या काव्यासंबंधानें बोलण्याचा अर्थात् माझा अधिकार नाहीं. त्यांच्या वाङ्मयासंबंधानें आज किती तरी थोर साहित्यसेवक बोलत आहेत, लिहीत आहेत. गेल्या कांही आठवड्यांत रवीन्द्रांच्या संबंधानें सर्व भाषांमध्यें किती तरी लिहिलें गेलें आहे. तरी सुद्धां त्यांच्या जीवनासंबंधीं अद्यापिहि किती तरी विचार करण्यासारखें, किती तरी लिहिण्यासारखें आहे हाच विचार मनांत येतो. शिवाजीमहाराजांच्या जीवनाचा संदेश बंगालीमध्यें पोंचविण्याचें काम रवीन्द्रांनी केलें. तुकारामाच्या अभंगांचेंहि त्यांनीं बंगालीमध्यें भाषांतर केलें. म्हणजे मराठी पराक्रमी पुरुषांच्या आणि मराठी संतांच्या जीवनाचा संदेश बंगालीपर्यंत पोंचविण्याचा प्रयत्न रवीन्द्रांनी केला ही गोष्ट आम्हांला कबूल केली पाहिजे. परंतु इतकें सांगितल्यानंतर सुद्धां एक गोष्ट बाकी राहते ती ही कीं, त्या रवीन्द्राच्या जीवनाचा आणि काव्याचा संदेश मराठीमध्यें ज्या प्रमाणांत यावयास पाहिजे होता तितका तो आला नाहीं. ही गोष्ट संशोधकांना व विचारवंतांना आज विचार करावयास लावते आहे.

कुठलाहि महाकवि किंवा कुठलाहि कवि निव्वळ शब्दांचा जुळारी होऊन कवि होऊं शकत नाहीं. नादमाधुर्य म्हणजेच काव्य असें आपणांला म्हणतां येणार नाहीं. आपल्या मराठी वाङ्मयामध्येंहि असा एक काळ होता कीं ज्या वेळीं शब्दलालित्य म्हणजेच साहित्य असें समजून अशा साहित्यामागें लोक धाव घेत. परंतु निव्वळ नादमाधुर्यांतूनच निर्माण होणा-या काव्यांत जनतेचें मन काबीज करण्याचें सामर्थ्य निर्माण होऊं शकत नाहीं. त्या जुळणा-या सुंदर नादमधुर शब्दांच्या पाठीमागें एक नवा सामर्थ्यवान संदेश देणारें मन आणि विचार असल्याशिवाय कवि किंवा महाकवि निर्माण होऊं शकत नाहीं. आमच्या मराठीचें भाग्य असें आहे कीं तिचा पहिलाच कवि एवढा मोठा महाकवि होऊन गेला कीं त्याच्या काव्यशक्तीला स्पर्श करणारें सामर्थ्य अजून मराठींत निर्माण झालेलें नाहीं. मी तर नेहमीं अभिमानानें सांगतों कीं मराठीचा जन्मच मुळीं, कवि यशवंतांनीं आतांच म्हटल्याप्रमाणें हनुमंतासारखा झाला. हनुमंतानें जन्मतांच जें पहिलें उड्डाण केलें ते सूर्यबिंबाला गांठण्यासाठीं. मराठींतला पहिला ग्रंथ ज्ञानेशांची ज्ञानेश्वरी; तिनेंहि पहिलेंच एवढें जबरदस्त उड्डाण केलें आहे कीं तिच्या जवळपास जाऊन पोचण्यासाठीं बाकीच्या

कवींना सारखी धावपळ करावी लागते. एवढें जबरदस्त सामर्थ्य मराठी संस्कृतींत जन्म घेणा-या त्या महाग्रंथामध्यें आहे. आणि याचें कारण त्यांत नुसते शब्द नाहींत, ज्ञानेश्वरांची शक्ति त्यांच्या काव्यांत आहे, त्यांच्या उपमा-उत्प्रेक्षात आहे, त्यांच्या दृष्टांतांमध्यें आहे; ती त्यांच्या कविगुणांमध्यें तर आहेच, परंतु त्याचबरोबर ह्या सगळ्या कल्पनाविलासाला आणि ह्या शब्दसंपत्तीला एक नवीन अर्थ देणा-या त्यांच्या अलौकिक सामर्थ्यांतहि ती आहे. रवीन्द्रनाथ महाकवि झाले, कादंबरीकार झाले, चित्रकार झाले. पण काव्य, कादंबरी, चित्र वगैरे हीं सर्व माध्यमें आहेत. एक प्रकारच्या मर्यादित राष्ट्रवादानें ज्या वेळीं सर्व लोकांना भारून टाकलें होतें त्या वेळीं रवीन्द्रनाथांच्या विचारांतून आणि कादंब-यांतून व्यक्त झालेले विचार आज वाचले म्हणजे भाषेच्या आणि तात्पुरत्या प्रश्नांच्या सीमा ओलांडून त्यांचें मन किती दूर गेलें होतें याची कल्पना येते. त्यांच्या 'घरे बाईरे'चें मराठी भाषांतर मीं वाचलेलें नाहीं. पण इंग्रजींतील 'दि होम अँड दि वर्ल्ड' हें भाषांतर ब-याच वर्षांपूर्वीं मीं वाचलें आहे. माझ्या मनावर झालेला त्याचा परिणाम आजहि मला आठवतो. वंगभंगाच्या आणि त्यापूर्वीच्या दहशतवादाच्या चळवळींत काम करणा-या तरुणांशीं झगडणारा, आणि त्यांच्यासारखीच देशभक्तीची भावना असणारा पण या सगळ्या विचारांच्या पलिकडे गेलेला एक मोठा आदर्श तरुण, त्यांनीं त्यांच्या त्या 'घरे बाईरे' कादंबरीचा नायक म्हणून दाखविलेला आहे. त्या नायकाचा विचार आजहि मनामध्यें आला कीं मन थरारून जातें. एक तत्त्वचिंतक, ध्येयवादी आणि मानवतेचा आणि त्याचबरोबर साधनशुद्धतेचा विचार करणारा असा नायक त्यांच्या विचारांतून निर्माण करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. यावरून एक कल्पना येते कीं, ज्या वेळीं रवीन्द्रनाथ बंगालीची पूजा करीत होते, बंगालची पूजा करीत होते आणि भारताची पूजा करीत होते, त्याच वेळीं मानवतेचें दर्शन घडविणा-या विचारांच्या दृष्टीनेंहि ते वाटचाल करीत होते. आणि मानवतेचा एक पुजारी हाच रवीन्द्रनाथांचा खरा मूळ संदेश होता, ही गोष्ट आज आपणांला विसरतां येणार नाहीं. आणि म्हणून त्यांच्या बंगाली भाषेंतून व्यक्त झालेल्या विचारांना जेव्हां इंग्रजीचें माध्यम मिळालें तेव्हां बाहेरच्या दुनियेंतील विचारवंत आणि तज्ज्ञ साहित्यिक यांना वाटलें कीं भारतांत एक नवीन सामर्थ्य निर्माण झालें आहें; आणि म्हणून रवीन्द्रनाथांना त्यांना नोबेल प्राइझ द्यावें लागलें. परंतु दुर्दैव असें कीं आमच्यामध्यें एक महाकवि जन्माला आला असल्याचा शोध त्यांना नोबेल प्राइझ मिळाल्यानंतर भारतामध्यें लागला. आमच्यांतील चांगला माणूस शोधण्याकरतां जेव्हां पाश्चिमात्य चष्मा आमच्या डोळ्यांवर बसतो तेव्हां आम्हांला कळतें कीं आमच्यामध्येंही फार मोठीं माणसें निर्माण झालीं आहेत. निदान हें नंतर तरी आम्हांला समजतें आणि उमजतें, ही सुद्धां चांगली गोष्ट म्हटली पाहिजे.

१९३०-३२ ची गोष्ट मला आठवते. त्या वेळीं माझ्या लहानपणीं मी जेलमध्यें असतांना आम्हीं रवीन्द्रांच्या कविता वाचीत असूं. आमच्यामध्यें त्या वेळीं जेलमध्यें खूप शहाणीं आणि विचारवंत

माणसें होतीं. त्यांच्यामुळें इंग्रजी भाषेशीं खेळ खेळण्याची मला नुकतीच संवय लागली होती. तरुण, भावनाप्रधान माणसाला गीतांजलि समजावी असें त्या वेळीं वाटे आणि म्हणून मीं गीतांजलि घेतली आणि मोडक्या-तोडक्या इंग्रजीच्या आणि डिक्शनरीच्या मदतीनें ती वाचायला मीं सुरुवात केली. पण त्यांतला तो 'दाऊ' कांही समजेना. कशासाठीं कवि हें सांगतो आहे, त्यांत त्याच्या काय भावना आहेत, त्यांत काय अर्थ आहे, कांहीं सुद्धा त्या वेळीं कळेना. पण आज हें सर्व कळतें. जीवनाचा अर्थ समजल्याशिवाय या कवितांचा अर्थ कळणार नाहीं. आणि जेव्हां पुढें त्यांचा अर्थ कळावयास लागला त्या वेळीं समजलें कीं खूप दूरची नजर ठेवणारा, मानवतेची चिंता वाहणारा, असा एक अत्यंत प्रखर बुद्धिमत्तेचा आणि थोर संवेदनाक्षम आत्मा या सर्व कवितांतून बोलत होता. आपले विचार, आपल्या भावना व्यक्त करण्याकरितां त्याला जें जें माध्यम मिळालें त्या त्या माध्यमाचा त्यानें उपयोग केला.

रवीन्द्रांसंबधी दुसरी एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं, चित्रकलेचे ते अत्यंत मोठे अभिमानी होते. पण त्यांनीं स्वतः चित्रकलेच्या क्षेत्रांत जें कार्य केलें आहे, तें ख-या अर्थानें वयाच्या साठाव्या वर्षानंतर केलें आहे. आपल्या मराठींतील एक प्रसिद्ध टीकाकार श्री. बेडेकर यांचा मी एक निबंध वाचीत होतों. त्यामध्यें बेडेकरांनीं त्याचा जो खुलासा केला आहे तो मला विचार करण्यासारखा वाटला. त्यांचा तो खुलासा खरा आहे किंवा नाहीं हें मला माहीत नाहीं. परंतु तो विचार करण्यासारखा जरूर आहे. साठाव्या वर्षी या माणसाला चित्रकलेचा अभ्यास करण्याची जरूर वाटली याचें कारण काय असावें ? त्यासंबंधीं त्यांचा खुलासा असा कीं रवीन्द्रांना इतकें काहीं सांगावयाचें होतें आणि त्यासंबंधीं त्यांची भावना इतकी तीव्र होती कीं त्यासाठीं त्यांना त्यांचे शब्द अपुरे वाटूं लागले, शब्दांचे अर्थ अपुरे वाटूं लागले, शब्दांचें माध्यम अपुरें वाटूं लागलें. ज्या शब्दांचा उपयोग त्यांनीं काव्यासाठीं केला, कादंब-यांसाठी केला, कथांसाठीं केला, नाटकांसाठीं केला, तेच शब्द शेवटीं त्यांना फार अपुरे वाटूं लागले. मला वाटतें, माणसाच्या मनामध्यें, माणसाच्या समर्थ मनामध्यें निर्माण होणा-या भावना आणि कल्पना व्यक्त करण्याचें शब्द हें अत्यंत तोकडें माध्यम आहे. म्हणून रवीन्द्रांनीं विचार केला असेल कीं आपल्या मनांतील भावना आणि कल्पना व्यक्त करण्यासाठीं आतां कुंचल्याचा आणि रंगांचा आपण आश्रय घ्यावा. तो किती यशस्वी झाला हा प्रश्न नाहीं. परंतु त्यांच्या आत्म्याची तळमळ होती कीं आपल्याला कांहीं तरी सांगावयाचें आहे, कांही तरी बोलावयाचें आहे. पण आपल्या मनांतला विचार निव्वळ भाषेंत सांगावयाचा प्रयत्न केला तर तो बंगालींतच सांगावा लागेल, त्याचें भाषांतर केलें तर निव्वळ तें इंग्रजींतच करावें लागेल. परंतु रंगांच्या आणि कुंचल्याच्या मदतीनें जर आपण आपला विचार सांगूं शकलों तर जे पाहूं शकतात त्या सगळ्या माणसांना आपला विचार कदाचित् समजूं शकेल. हीच भावना त्यांच्या या नव्या प्रयोगाच्या पाठीमागें असण्याचा संभव आहे. तें कसेंहि असो; रवीन्द्रांच्या रूपानें एक अत्यंत सुसंस्कृत, अत्यंत हळवें, अत्यंत थोर असें मन भारतामध्यें निर्माण

झालें. पण ही आमची परंपराच आहे; ऋषिमुनींची आणि महाकवींची, रवीन्द्रांची मूर्तीच या महान् परंपरेंतल्या जुन्या थोर ऋषिमुनींची आपणांला आठवण करून देते.

मी आपल्याला आतां त्यांची एक कथा सांगणार आहें. ही कथा मीं जेलमध्यें असतांना ऐकलेली असून कुठें प्रसिद्ध झालेली अशी ही कथा नाहीं. ती प्रत्यक्ष घडलेली कथा असून शांतिनिकेतनमध्यें राहिलेल्या एका गृहस्थांनींच मला ती सांगितलेली आहे. आणि जेव्हां जेव्हां मी विद्यार्थ्यांच्या पुढें गेलों आहें तेव्हां तेव्हां न कंटाळता महाराष्ट्रांतील शेकडों ठिकाणी अलिकडे ही कहाणी मीं सांगितली आहे. ही कहाणी अशी आहे :

एके दिवशीं संध्याकाळीं रवीन्द्रनाथांनीं त्यांच्या शांतिनिकेतनमधील सगळ्या विद्यार्थ्यांना बाहेर बोलावून सांगितलें कीं आज मला तुमची एक परीक्षा घ्यावयाची आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या समोर त्यांनीं भारताचा नकाशा ठेवला आणि ते म्हणाले, "असं पाहा कीं तुम्ही सगळे विचार करणारे इथले तरुण आहांत. तुमच्यामध्यें कुठंतरी थोडं काव्यमय मन जागं झालंय अशी कल्पना करा, आणि या भारताच्या नकाशाकडे पाहिल्यानंतर तुम्हांला काय कल्पना सुचते ते तुम्ही मला सांगा. तुम्हांला मदत व्हावी म्हणून आधीं मी विषय सांगतों. भारत म्हणजे जणुं कुणी तरी एखादा पुराणपुरुष आहे, महापुरुष आहे आणि तो काखेइतक्या पाण्यामध्यें उतरला आहे, अशी कल्पना करा." कवीची कल्पना आहे. आतां आपण महाकवीसंबंधानें बोलतों आहों, तेव्हां कल्पना करावयास कांहीं हरकत नाहीं. "आतां सांगा कीं हा महापुरुष काय करीत असेल तें. तुम्हांला मीं कल्पना सुचविली आहे, " रवीन्द्र म्हणाले. तेव्हां गंभीर चेहरा करून त्यांच्या शांतिनिकेतनमधला, त्यांच्या आश्रमामधला एक विद्यार्थी उठला आणि म्हणाला,"गुरुदेव, मला या बाबतींत एक कल्पना सुचतेय. कल्पना अशी आहे कीं, हा कुणीतरी धर्मनिष्ठ पुरुष आहे. पुराणकालापासून हा या समुद्रामध्यें उतरलेला आहे आणि तेव्हांपासून प्रार्थना करून सूर्याला आणि चंद्राला, दिवसा आणि रात्रीं सारखा अर्घ्य देतोय." कल्पना चांगली आहे. कुणीतरी धर्ममार्तंडाच्या घरांतला हा मुलगा असला पाहिजे असें ही कल्पना ऐकल्यानंतर वाटतें. "आणखी कोण कल्पना सुचवतंय ?" गुरुदेवांनी विचारणा केली. दुसरा एक मुलगा उभा राहिला, जरा गंभीर, चेह-यावर विस्कटलेले केस असलेला. आवेशांत येऊन त्यानें सांगितलें, "गुरुदेव, खोटी कल्पना आहे ही. कुचकामी, निरुपयोगी कल्पना आहे ही. मला नाहीं वाटत कीं, हा महापुरुष तिथे उतरून कुठल्या तरी सूर्याला आणि कशासाठी तरी अर्घ्य देऊन प्रार्थना करतोय. हा महापुरुष समुद्रामध्यें उतरलाय हें खरं आहे. पण आपल्या दैन्याला, गरिबीला, कष्टाला कंटाळून, समुद्रामध्यें आत्महत्या करण्यासाठीं तो उतरलाय असं मला वाटतंय." "तीहि कल्पना होऊं शकते. आणखी कुणाला सुचते कांहीं कल्पना ?" गुरुदेव विचारते झाले. तेव्हां एक तिसरा मुलगा उभा राहिला आणि म्हणाला, "गुरुदेव, मला नाही वाटत ह्या दोन्ही कल्पना बरोबर असतील म्हणून. हा महापुरुष प्रार्थनेकरितां उतरलेला नाहीं. आणि

आत्महत्येकरितां तर मुळींच नाहीं. हा आहे पुराणपुरुष; पण हा पुराणपुरुष उतरलाय, तो नुसत्या सागरामध्यें म्हणजे खा-या पाण्याच्या समुद्रांत नाहीं उतरलेला. या समुद्राला दुसरंहि नांव आहे, 'रत्नाकर' म्हणून. हा जो या महासागरांत उतरला आहे तो या महासागराच्या तळाशीं असलेली माणकें, मोतीं, रत्नें, हिरे, दुनियेला देण्याकरितां उतरलेला आहे."

किती भव्य आणि खरी कल्पना आहे ही. व्यास-वाल्मिकींपासून तों आजच्या रवीन्द्र-गांधी-जवाहरलालपर्यंत दुनियेला आणि मानवतेला रत्नें पुरविण्याचें काम हा महापुरुष करतो आहे. इतिहासकाळीं त्यानें हें काम केलें आहे आणि त्याहि पुढें तो तें करीत राहणार आहे. आणि हें महत्त्वाचें काम त्यानें केलें पाहिजे. रवीन्द्रांच्या जीवनाचा याच्यापेक्षां आणखी सुंदर अर्थ तुम्हांला आम्हांला समजेल असें मला वाटत नाहीं.

काल मोतीलाल नेहरूंच्या सभेंत बोलत असतांना श्री. होमी मोदींनी एक उतारा सांगितला आणि तो मला फार आवडला म्हणून त्याचा पुनरुच्चार मी येथें करतों. तो उतारा असा कीं, "दि नेशन वुइच फरगेट्स् इट्स् हिस्टरी इज कंडेम्ड टु रिपीट इट." जो देश आपला इतिहास विसरतो त्याला त्या इतिहासाची पुनरावृत्ति करण्याची शिक्षा मिळते. आम्हांला आमच्या देशाच्या इतिहासाची पुनरावृत्ति करावयाची नाहीं. आम्हांला महापुरुष निर्माण करावयाचे आहेत. शेकडों वेळां दुस-यांचे हल्ले पत्करून त्यांची आम्हांला आतां गुलामी करावयाची नाहीं; ज्ञानाला बंदिखान्यांत ठेवणारा आणि चित्तामध्यें भय निर्माण करणारा समाज यापुढें आम्हांला निर्माण करावयाचा नाहीं. मीं सबंध गीतांजलि वाचल्यानंतर गीतांजलींतील माझ्या मनावर ठसलेल्या त्या दोन ओळी मला फार महत्त्वाच्या वाटतात. त्यांत भारतासाठीं परमेश्वराला उद्देशून रवीन्द्रनाथांनीं प्रार्थना केली आहे. त्यांनी परमेश्वराला आळविलें आहे कीं, "जिथें चित्त निर्भय झालें आहे आणि जिथें ज्ञान मुक्त झालें आहे, अशा स्वातंत्र्याच्या स्वर्गात, भारताला देवा, जागृति येऊं दे." जिथें ज्ञान मुक्त झालें असेल आणि जिथें चित्त निर्भय झालें असेल अशा प्रकारची परिस्थिति ज्याच्या साहित्यांत, संस्कृतींत, विचारांत आणि समाजांत निर्माण झाली असेल असा नवा भारत आपणांला निर्माण करावयाचा आहे. ही प्रार्थना ज्या कविमनांतून निर्माण झाली तें कविमन केवळ एका तत्त्वज्ञाचेंच होतें असें नव्हे, तर एका अत्यंत थोर अशा मानवाचें तें मन होतें. तुमचें माझें भाग्य असें कीं, तें थोर मानवी मन ज्या संस्कृतींतून आणि परंपरेंतून निर्माण झालें त्या परंपरेचें आणि संस्कृतींचे तुम्ही आणि मी वारस आहोंत. आणि इतिहासाची पुनरावृत्ति करावयाची नसेल तर त्यांनीं पाहिलेलें तें स्वप्न पूर्ण करण्याचें सामर्थ्य परमेश्वरानें तुम्हांआम्हांला द्यावें अशी मी प्रार्थना करतों आणि गुरुदेव रवीन्द्रांच्या स्मृतीला लाख लाख नमस्कार करून माझें भाषण पुरें करतों.

## डॉ. आंबेडकरांच्या विचारपरंपरेचा वारसा

आजच्या या समारंभाला हजर राहतांना मला कर्तव्यपूर्तीचा आनंद होत आहे असें मी म्हटलें तर त्यांत फारशी अतिशयोक्ति होईल असें मला वाटत नाहीं. या दीक्षा मैदानाची मागणी गेल्या नागपूर अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशीं झाली होती. आणि त्याच दीक्षा मैदानावर आपल्या स्मारकाचा हा कोनशिलासमारंभ या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशीं होत आहे, हा एक योगायोगच म्हटला पाहिजे. योगायोगावर माझा फारसा विश्वास नसला तरी जुळून आलेले योगायोग नजरेंत भरतात हें सांगावयास मला कांहीं संकोच वाटत नाहीं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचें हें जें स्मारक होत आहे, त्यांत सहभागी होतांना माझ्या मनाला अकृत्रिम आनंद होत आहे. या आनंदामध्यें कुठलीहि राजकीय अगर कुठलीहि धार्मिक भावना नाहीं, हें मी पहिल्या प्रथम आपणांस सांगूं इच्छितों.

आपल्या पक्षाचे अध्यक्ष श्री. शिवराज यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर कित्येक तपें काम करण्याची संधि मिळाली होती. म्हणून बाबासाहेबांच्याबद्दल त्यांना अतिशय आदर आहे. आपल्या समाजाचे बाबासाहेब मोठे नेते व उद्धारकर्ते होते म्हणून आपणांला त्यांच्याबद्दल फार आदर आहे. त्यांच्या अनेक राजकीय शिष्यांनाहि त्यांच्याबद्दल आदर आहे. परंतु यांपैकी कुठलेंच नातें सांगण्याचा मला अधिकार नसतांनाहि त्यांच्याबद्दल मला आदर वाटतो हाच माझा विशेष अधिकार आहें, हें आपण कबूल केले पाहिजे. रिपब्लिकन पक्षाचा सदस्य होण्याचें भाग्य मला लाभलेलें नाहीं, किंवा बुद्ध म्हणवून घेण्याचेंहि भाग्य लाभलेलें नाहीं. परंतु स्वतःला हिंदु म्हणवून घेण्यांत मला जरूर अभिमान वाटतो. असे असतांनाहि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल मला आदर आहे. अगदी अकृत्रिम आदर आहे, हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आहे.

श्री. शिवराज यांनीं जे मुद्दे येथें मांडले त्यांना उत्तर देण्यासाठी ही सभा नाहीं आणि त्यासाठीं मी आलोंहि नाही. परंतु मी आपणांला सांगूं इच्छितों कीं, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही हिंदुस्तानच्या राजकारणांत अतिशय महत्त्वाची अशी व्यक्ति होऊन गेली. त्यांच्या मतांशीं सहमत नसणा-या माणसांना सुद्धां त्यांच्याबद्दल आदर बाळगावा लागला, त्यांचें सहकार्य घ्यावें लागलें, त्यांची मदत घ्यावी लागली. हा मदत देणा-यांचा जसा मोठेपणा होता, तसाच तो मदत घेणा-यांचाहि मोठेपणा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या काळांत जें काम केलें, आणि त्या वेळच्या परिस्थितींत उपस्थित झालेल्या प्रश्नांना त्यांनीं ज्या पद्धतीनें तोंड दिलें, त्या सर्व गोष्टी इतिहासप्रसिद्ध आहेत. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनांतून निर्माण होणा-या ज्या तत्त्वप्रणाली आहेत, त्यांनीं दिलेले जे आदेश आहेत, किंवा त्या वेळच्या विशिष्ट परिस्थितींत ज्या पद्धतीनें ते वागले त्यांतून निर्माण होणारे जे दृष्टिकोन आहेत त्या सर्वांची, तुमच्या माझ्यापुढें आणि देशापुढें आज जे प्रश्न

उभे आहेत, ते सोडविण्याच्या कामीं कितपत मदत व मार्गदर्शन मिळेल या दृष्टीनें त्यांच्या जीवनाकडे पाहण्याचा, त्यांच्या जीवनाचा एक विद्यार्थी म्हणून मी प्रयत्न करीत असतों.

स्वातंत्र्याच्या चळवळींत निकरानें काम करणारीं अशीं जीं अनेक पक्षांतून विखुरलेलीं माणसें होतीं त्या माणसांमधील मी एक साधा शिपाई आहें, आणि स्वातंत्र्याच्या चळवळींत आपण मेलों तरी हरकत नाहीं पण स्वीकारलेलें काम पूर्ण केलें पाहिजे असें समजणारी जी एक पिढी होती त्या पिढीचा मी एक सामान्य प्रतिनिधि आहें. पण तें काम करीत असतांना सुद्धां दलितांसंबंधीं आणि त्याचबरोबर सामाजिक एकता व सामाजिक न्याय यांसंबंधीं तिडिकीचा जो विचार बाबासाहेब मांडीत होते तो विचार, विचार करण्यासारखा आहे, त्याचा आम्हांला स्वीकार केला पाहिजे, त्याकडे आम्हांला पाठ फिरवतां येणार नाहीं, हीहि भूमिका आम्ही मान्य करीत होतों.

मी आपणांला सांगूं इच्छितों कीं, मोठ्या माणसांची तुलना करणा-यांपैकी मी नाहीं. उलट, मोठ्या माणसांची परस्परांशीं तुलना करूं नये असें मानणारा मी आहें. आणि म्हणून महात्मा गांधी मोठे होते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मोठे होते कीं बॅरिस्टर जीना मोठे होते, या वादांत मी पडूं इच्छीत नाहीं. मी महात्मा गांधींना राष्ट्रपिता मानणारा माणूस आहें. पण म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल मला कमी आदर आहे असें समजण्याचें कारण नाहीं. मी तर असें मानतों कीं, मोठ्या माणसांची तुलना करणें ही त्यांचा अपमान करण्याची उत्कृष्ट रीत आहे. माझ्या मतें हा मोठा आणि तो लहान, अशा प्रकारची दोन मोठ्या माणसांची तुलना होऊंच शकत नाहीं. कारण दोघांचें निरनिराळ्या प्रश्नांचे मूल्यमापन वेगवेगळें असतें. आणि म्हणून मी गांधीजी आणि आंबेडकर यांची तुलना करणार नाहीं. खरें म्हणजे माणसें आपापल्या परीनें मोठी असतात. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं या भूमीवर उभें राहून, त्यांचा शब्द मानणा-या त्यांच्या अनुयायी समाजाला बुद्ध धर्माची दीक्षा देण्याचें जें काम केलें तें सामाजिक परिणामाच्या दृष्टीनें, महत्त्वाचें काम झालें असें मी मानतों. बुद्धांनी दिलेला मानवतेचा महान् संदेश स्वीकारून एका नव्या सामाजिक दृष्टिकोनानें काम करण्याची स्वाभिमानी वृत्ति त्या समाजामध्यें निर्माण व्हावी हा जो त्यांतला हेतु आहे त्या हेतूचें आणि त्यांतून निर्माण होणा-या सामाजिक परिणामाचें मी स्वागत करतों. मला त्याचें महत्त्व जास्त वाटतें.

आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिंदुस्तानांत ज्याच्यासाठीं विचार करणा-या माणसांनी आपली सर्व शक्ति आणि आपलें सगळें बुद्धिकौशल्य खर्च करावें असा जर कोणता प्रश्न असेल तर तो या देशांत एक प्रकारची सामाजिक एकतानतेची, एका मनाची भूमिका निर्माण करण्याचा आहे. या गोष्टीची आज फार आवश्यकता आहे. डॉ आंबेडकर आणि महात्मा गांधी वेगळे पडले याचें कारण हिंदुस्तानच्या जुन्या इतिहासांतून निर्माण झालेल्या ज्या वेगवेगळ्या सामाजिक भावना होत्या, ज्या वेगवेगळ्या

सामाजिक परंपरा होत्या, त्या भावनांतून आणि त्या परंपरांतून ते वाढले होते हें आहे. आम्ही हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यासाठीं झगडत असतांना ही माणसें अशीं वेगवेगळें कां बोलतात, हा विचार माझ्या मनांत नेहमीं येत असे हें मी आपणांस प्रामाणिकपणें सांगूं इच्छितो. पण जातीजातीनें विभागलेल्या, दबलेल्या समाजांत स्वातंत्र्याकरितां प्रयत्न करून आम्ही पुन्हा अस्पृश्यच राहणार असलों, दलितच राहणार असलों, दबलेले राहणार असलों तर त्या स्वातंत्र्याची आम्हांला काय गरज आहे असें जर कुणाला वाटलें असेल तर तें आम्हीं समजून घेतलें पाहिजे. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वातंत्र्याचा पूर्वीचा अर्थ बदलून, त्याला सामाजिक न्यायाचा अर्थ देणें आणि त्यासाठीं आर्थिक न्यायाची भूमिका निर्माण करणें, हें महत्त्वाचें काम तुम्हांआम्हांला आज आपल्या देशामध्यें करावयाचें आहे. आणि हें काम माझ्या मतें सर्वांत महत्त्वाचें काम आहे. आणि म्हणून राजकीय भूमिका, राजकीय पक्ष आणि राजकीय कार्यक्रम अगदीं वेगळा असतांना सुद्धां मी येथें आनंदानें येत असतो. हिंदुस्तान पूर्वी एक असला तरी वेगवेगळीं सामाजिक मनें, वेगवेगळीं सामाजिक जगें यामुळें शेकडों वर्षें येथें जी परिस्थिति निर्माण झाली ती बदलण्यासाठीं, एका समाजाला दुस-या समाजापासून वेगळ्या ठेवणा-या सामाजिक विषमतेच्या ज्या भिंती आहेत त्या आपण पाडून टाकल्या पाहिजेत असें मला वाटतें. आतां आपण एक मन, एक समाज अशी भावना निर्माण केली पाहिजे, एक सामाजिक पुरुष निर्माण करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आणि अशा प्रकारचा प्रयत्न करणें हेंच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचें खरें स्मारक आहे असें मी मानतों.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं ज्या भूमीवर दीक्षा घेतली त्या ऐतिहासिक भूमीवर हें कॉलेज बांधून आपण त्यांचें स्मारक करीत आहांत. आणि या कोनशिलासमारंभाच्या यानिमित्तानें त्याला माझा जो हातभार लागत आहे त्यामुळें माझ्या जीवनाची थोडीफार फलश्रुति झाल्याचा मला आज आनंद होतो आहे. परंतु एका गोष्टीची आपण खबरदारी घेतली पाहिजे. ती म्हणजे हें जें काम आपण उभें करीत आहांत त्या कामामध्यें यापुढें हा वेगळा समाज, तो वेगळा समाज अशी भावना निर्माण होतां कामा नये. या सगळ्या समाजांची मतें वेगळी असलीं तर तीं मी समजूं शकतों. मतें जरूर वेगळीं असलीं पाहिजेत, मतभेद जरूर असले पाहिजेत. सगळ्या लोकांचें मत एकच असलें पाहिजे अशा प्रकारचा समाज कोणाला निर्माण करावयाचा असेल त्यांनीं तो करावा. पण मी तो कोंडवाडा निर्माण करणारा नाहीं. किंबहुना समाजाचा असा कोंडवाडा करणा-या तत्त्वज्ञानाला माझा विरोध आहे. माझ्या मतें प्रामाणिक मतभेद असले पाहिजेत, मतभेद बोलण्याचें सामर्थ्य असलें पाहिजे आणि त्याला तशी संधि असली पाहिजे. परंतु एकमेकांच्या समाजाबद्दलच्या भावनेमध्यें कडवटपणा असतां कामा नये. तसा तो शिल्लक असेल तर प्रयत्न करून तो आपण कमी केला पाहिजे. हें या देशांतील महत्त्वाचें काम आहे असें मी मानतों.

महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें झाल्यास नवबुद्ध समाज आणि इतर समाज यांच्यामध्यें पंधरावीस वर्षांपूर्वी जेवढी कटुतेची भावना होती तेवढी ती आज राहिलेली नाहीं. पण ती अजिबात गेली आहे असें मी म्हणणार नाहीं. तसें म्हणणें वस्तुस्थितीला सोडून होईल. अजूनहि खेड्यापाड्यांमध्यें एक प्रकारचा राग आहे. कांही लोकांच्या मनांत अजूनहि जुन्या वतनगिरीच्या कांहीं गोष्टी असतील, देशमुखीपणा असेल किंवा आणखी कांहीं रागलोभ असतील. पण मी आपणांला सांगूं इच्छितों कीं नवा विचार स्वीकारलेली जी नवी पिढी आज शिक्षणांतून उभी राहत आहे तिच्या मनांत हें पाप राहिलेलें नाहीं. सामाजिक विषमतेच्या भावनेचा आमचा जो वारसा होता तो आम्हीं टाकून दिला पाहिजे, गाडला पाहिजे. आणि एका नव्या वातावरणाचें, प्रेमाचें, सहकाराचें चित्र या देशांत उभें राहिलें पाहिजें, महाराष्ट्रांत उभें राहिलें पाहिजे. आपला रिपब्लिकन पक्ष असेल, माझा काँग्रेस पक्ष असेल; आपला धर्म वेगळा असेल, माझा धर्म कदाचित् वेगळा असेल. परंतु शेवटीं तुम्ही आणि मी भारतीय असून तुमचें आणि माझें एकमेकांशीं जवळचें नातें आहे. या प्रांतांत राहणारे नागरिक म्हणून तुमचा आणि माझा एकमेकांवर एक प्रकारचा हक्क आहे. शेकडों वर्षे या भूमींत आपण राहिलों, रगडले गेलों, दबले गेलों आणि शेवटीं येथेंच तुमची माझी सगळ्यांचीं हाडें पडणार आहेत, जळणार आहेत. परंतु कर्मभूमि म्हणून, मायभूमि म्हणून ज्या भूमीवर आपण वाढलों आहोंत आणि जगतों आहोंत, तिचें काम करण्याचें, समान हक्काचें तुमचें माझें बंधुबंधु म्हणून जें नातें आहे त्या नात्यानें, आपण एकमेकांजवळ गेलें पाहिजे, एकमेकांचीं मनें समजून घेतलीं पाहिजेत, एकमेकांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत आणि पुढें जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

माझ्या मतें हेंच खरें स्वातंत्र्याचें वातावरण आहे, हीच खरी वैचारिक स्वांतत्र्याची हवा आहे. वैचारिक स्वातंत्र्याच्या पाठीमागें एक मानसिक परिस्थिति असावी लागते. जेव्हां मनुष्य आपलें स्वतःचें म्हणणें खरें आहे यावर विश्वास ठेवतो, पण त्याचबरोबर दुस-याचेंहि खरें असण्याचा संभव आहे हीहि शक्यता मानतो, तेव्हांच खरें विचार स्वातंत्र्य संभवतें. माझेंच खरें आहे आणि दुस-याचें खरें असणें सुतराम् शक्य नाहीं, असा जेव्हां माणूस आग्रह धरतो, तेव्हां वैचारिक स्वातंत्र्याची भूमिका घेणा-या माझ्यासारख्याला तो आग्रह फार चुकीचा वाटतो. दुस-याचेंहि बरोबर असण्याची शक्यता आहे हा विचार मनामध्यें स्वीकारल्याशिवाय आणि त्याची शक्यता मानल्याशिवाय वैचारिक स्वातंत्र्य संभवत नाहीं आणि वैचारिक स्वातंत्र्याच्या भूमिकेवर आधारलेली लोकशाहीहि संभवत नाहीं.

माझे मित्र आमदार श्री. भंडारे यांनीं बुद्धधर्म आणि लोकशाही यांचा संगम झाला आहे असें जें सांगितलें तें ऐकून मला आनंद वाटला. खरोखरच ते म्हणाले तसा हा संगम झालेला आहे. भारतामध्यें ख-या अर्थानें लोकशाहीची भावना निर्माण करण्याचें काम बुद्धाच्या जन्मानें घडलेलें आहे ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. हिंदुस्तानला ज्या थोड्या गोष्टींनीं एक प्रकारचें अमरत्व

प्राप्त झालें आहे, त्यांत बुद्धांचा जन्म आणि बुद्धांनी केलेली कामगिरी या अमर गोष्टी आहेत. निव्वळ भारतानेंच नव्हे तर अखिल मानवतेनें जेव्हां मानव्याचा इतिहास लिहिला तेव्हां तिला येथें क्षणभर उभें राहावें लागलें, आणि इतक्या हजार वर्षांपूर्वी हा विचार मांडणारा जो महापुरुष होऊन गेला त्याला प्रणाम करून्च तिला पुढें जावें लागलें. म्हणून आपल्याला बुद्धांनीं दिलेली लोकशाहीची ही भावना जर टिकवावयाची असेल तर मी आपणांस एक विनंती करीन कीं, मी म्हणतों तीहि भावना आपण कृपा करून समजून घेण्याचा प्रयत्न करा. तुमचें म्हणणें बरोबर असणें शक्य आहे. परंतु दुस-याचें म्हणणेंहि आपण थोडेंफार समजावून घेतलें पाहिजे. कारण तेंहि बरोबर असण्याचा संभव आहे. म्हणून, दुस-याचें म्हणणें ऐकण्याचा प्रयत्न करूं या, अशा प्रकारची भावना आपण आपल्यांत निर्माण करा. आणि आज या कामासाठीं मला बोलावून आपण ही भावना स्वीकारली आहे असें मी मानतों. हीच देवाणघेवाण-विचारांची, बैठकीची, चर्चेची तुम्हींआम्हीं निर्माण केली पाहिजे. तरच आपण महाराष्ट्राचें आणि भारताचें कल्याण साधूं शकूं. महाराष्ट्रांतील एवढा मोठा महार समाज जागृत झाला, राजकीय दृष्ट्या त्याच्यांत एक प्रकारची आकांक्षा निर्माण झाली, आणि राज्यामध्यें माझा हक्क आहे, अशा भावनेनें तो पुढें चालूं लागला, हें पाहून मला आनंद वाटला. एक मोठा मानवसमाज या आग्रहानें तयार झाला आहे ही महाराष्ट्रांत एक चांगली गोष्ट झाली. मी इतरांना सांगत असतों कीं, तुम्ही त्यांचा राग कां करतां ? त्यांचें त्यांना द्या. तुम्हांला ज्याप्रमाणें हक्काची भावना आहे, तशीच त्यांच्यामध्येंहि ती निर्माण झाली आहे. म्हणून आम्हीं त्यांना जवळ घेतलें पाहिजे, त्यांना समजून घेतलें पाहिजे. पण मेहेरबानी म्हणून नव्हे.

हें दीक्षा मैदान सरकारनें दिलें तें मेहेरबानी म्हणून दिलें असें मीं कधीं मानलें नाहीं. महाराष्ट्र राज्याचें तें कर्तव्यच होतें. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आमच्या राज्याचे नागरिक होते त्याचा महाराष्ट्र राज्याला अभिमान आहे. त्यांचें हें जें येथें स्मारक होत आहे, त्या स्मारकांत महाराष्ट्र राज्याला अभिमान वाटतो. येथें मालकीची भावना नसून कोणी कोणावर मेहेरबानी केलेली नाहीं. मेहेरबानी करणारी राजवट इंग्रजांच्या बरोबर निघून गेली. आतां सगळ्यांचा हक्क आहे. आपलें कांहींहि मत असो, आपला या राज्यावर हक्क आहे. म्हणून मी आपणांस पुन्हा एकदां सांगूं इच्छितों की, आपणांला या देशांत नवी सामाजिक परिस्थिति निर्माण करावयाची असेल, सामाजिक एकतेची नवी भावना निर्माण करावयाची असेल तर सहनशीलतेची, आपुलकीची, समजूतदारपणाची आणि दुस-याचा विचार समजून घेण्याची प्रवृत्ति आपण आपल्या समाजामध्यें निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याशिवाय विचारस्वातंत्र्याची, त्याशिवाय लोकशाहीची खरी भूमिका निर्माण होणार नाहीं. मघाशीं श्री. शिवराज यांनीं सांगितलें तें बरोबर आहे. डॉ. आंबेडकर स्वातंत्र्यासाठीं जरा थांबा असें म्हणत होते. असा हा विचार त्यांनीं मांडला त्याचें कारण सबंध दुनियेंतील लोकशाहीचा इतिहास त्यांनी वाचला होता. तो वाचल्यानंतर त्यांना असें दिसून आलें

कीं, जेथें शिक्षण वाढलेलें आहे, जेथें विचारांचे महत्त्व समजलेलें आहे, जेथें अंधश्रद्धा नाहींशीं झालेली आहे तेथेंच लोकशाही रुजलेली आणि वाढलेली आहे. जेथें परिपक्व मनें निर्माण होतात तेथेंच लोकशाहीचें फूल चांगलें फुलतें, असाच इतिहासाचा निष्कर्ष त्यांच्या प्रतिभेला दिसला असावा. म्हणून कदाचित् त्यांना असें वाटलें असावें कीं, अशी परिस्थिति निर्माण होईपर्यंत आपण थांबू या. परंतु हें फूल आतां येथें उमललें आहे. त्याला सतत प्रफुल्लित ठेवण्याचें अत्यंत महत्त्वाचें, जबाबदारीचें आणि जोखमीचें काम आतां आपल्याला पार पाडावयाचें आहे. त्यासाठी आमच्यातर्फे सारखा प्रयत्न चालू आहे, बिनशर्त चालू आहे. महाराष्ट्रांतील मध्यम वर्ग, महाराष्ट्रांतील शेतकरी, महाराष्ट्रांतील कामगार, महाराष्ट्रांतील भूमिहीन शेतमजूर यांची आजपर्यंतच्या, निरनिराळ्या सामाजिक परंपरांमुळें वेगवेगळी घडण झाली आहे, त्यांच्या मनावर या परंपरांचा वेगवेगळा परिणाम झालेला आहे. या सर्वांना अलग ठेवणारी जी सामाजिक आणि आर्थिक परिस्थिति असेल तिला दूर हटवून एक नव्या प्रकारची परिस्थिति आपण निर्माण केली पाहिजे. आणि या नव्या परिस्थितींतून आपण एक नवी सामाजिक भावना, एक नवा विचार स्वीकारलेला माणूस या महाराष्ट्रांत निर्माण केला पाहिजे. या विचाराचे आम्ही पाईक आहोंत. आणि हा विचार स्वीकारलेले हें राज्य म्हणजे त्या विचाराकडे नेणारें एक साधन आहे, त्या विचारापर्यंत नेणारा एक मार्ग आहे अशी आमची भावना आहे. याच भावनेनें आम्ही आपल्या प्रश्नाकडे पाहात आहोंत.

आपण मला येथें बोलविलें याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. या ठिकाणीं आपण एक महाविद्यालय सुरू करणार आहांत आणि आणखीहि अनेक कामें करीत राहाल. परंतु या सर्व कामांकडे आपण एक ऐतिहासिक काम करीत आहोंत या दृष्टीनें कृपा करून पाहा. शेकडों वर्षे, हजारों वर्षे आपल्या या कामाची आठवण राहणार आहे या भावनेनें आपण या कामाकडे पाहा. आजचे प्रश्न, आजच्या आकांक्षा, आजचे मोह, आजचे मतभेद, आजचे तणाव यांचा विचार न करतां शंभर वर्षांनंतर, दोनशें वर्षांनंतर येणा-या परिस्थितीकडे लक्ष ठेवून आपण इथें निर्माण होणा-या संस्था, इथे निर्माण होणा-या परंपरा व इथें चालू होणारीं कामें यांच्याकडे पाहण्याचा प्रयत्न करा अशी मी आपणांस विनंती करीन. आपल्या कामाला माझ्या आशीर्वादाची जरुरी नाहीं. ज्या कामाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचें नांव लाभलें आहे, तें काम आपल्याच तेजानें, आपल्याच पुण्याईनें अमर होणार आहे. तुमचें माझें काम एवढेंच आहे कीं, या कामाला हातभार लावून आपले प्रणाम त्याला अर्पण करावेत. ही कोनशिला बसविण्यासाठीं मी निव्वळ याच भावनेनें येथें आलों, या कामाला माझा स्वतःचा प्रणाम करण्यासाठीं आलों. परंतु या कामांतून पुन्हा एक नवी अंधश्रद्धा निर्माण होणार नाहीं, एक वेगळा संप्रदाय निर्माण होणार नाहीं अशी मी आशा करतों. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं ज्ञानाचें, वैचारिक स्वातंत्र्याचें, आणि लोकशाही विचारांचें सामर्थ्य प्राप्त करून घेऊन आपल्याला जी विचारपरंपरा दिली त्या परंपरेला सामर्थ्य देणारा असा नवा

विचार, नवा वारसा या दीक्षाभूमींतून निव्वळ बुद्ध समाजालाच नव्हे, निव्वळ रिपब्लिकन पक्षाच्या लोकांनाच नव्हे, तर सबंध महाराष्ट्राला आणि अखिल भारताला मिळत राहावा अशी मी प्रार्थना करतो आणि माझें भाषण संपवितो.

## साहित्यिकांची जबाबदारी

या साहित्य सम्मेलनाच्या उद्घाटनाचें मला निमंत्रण देऊन आपण माझा एक प्रकारचा सन्मानच केला आहे असें मी समजतों. विदर्भ साहित्य सम्मेलनाला हजर राहण्याचा गेल्या तीन वर्षांतला हा माझा दुसरा प्रसंग आहे. त्यामुळें या सन्मानाचें महत्त्व मी अधिकच मानतों. विशेषतः आज मराठी भाषेच्या इतिहासामध्यें एक महत्त्वाची क्रांतिकारक घटना घडत असतांना आपण माझा हा सन्मान केला. राजकीय कार्यकर्त्यांनी साहित्याशीं किती संबंध ठेवावा किंवा साहित्य संमेलनामध्यें अगदीं साहित्यिक कांटेकोर भाषा बोलून किती लुडबुड करावी असा कोणीं वादाचा प्रश्न उपस्थित केला तर त्यांनीं अशी लुडबुड करूं नये याच पक्षाचा मी पुरस्कर्ता राहीन. असें असतांनाहि आपण मला जें निमंत्रण दिलें तें स्वीकारण्यांत माझा एक उद्देश होता. या संमेलनाच्या निमित्तानें विदर्भांतील साहित्यिकांसमोर आणि त्यांच्या मार्फत विदर्भांतील जनतेसमोर कांहीं महत्त्वाचे प्रश्न मीं या व्यासपीठावरून मांडले तर अधिक रेटून बोलण्याची एक संधि मिळेल असें वाटल्यामुळेंच मीं हें निमंत्रण स्वीकारलें.

या साहित्य संमेलनाचें जें वैशिष्ट्य आहे तें माझ्या मतें अधिक महत्त्वाचें आहे. खेड्यामध्यें राजकीय परिषदा भरविण्याची परंपरा फार जुनी आहे. परंतु खेड्यामध्यें साहित्यसंमेलन घेण्याची प्रथा विदर्भ साहित्य संघानें माझ्या कल्पनेप्रमाणें यापूर्वीच पाडलेली असून साहित्यिकांना लोकाभिमुख करण्याची ही नवी परंपरा प्रत्यक्षांत अंमलांत आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबद्दल विदर्भ साहित्य संघाचें मी अभिनंदन करतों, आणि इतर साहित्य संघांना अनुकरणीय असा एक नवीन पायंडा घालून दिल्याबद्दल त्याला धन्यवाद देतों.

या साहित्य सम्मेलनाचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे या सम्मेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. शेंडे यांची निवड हें होय. ते हरिजन आहेत म्हणून एक नवीन पायंडा पडला एवढ्याच अर्थानें मी हें म्हणत नाहीं. कारण हरिजन म्हणून कुणाला तरी साहित्यसंघाचे अध्यक्ष करावें अशा मताचा मी नाहीं. इतर क्षेत्रांतील महत्त्वाच्या जागा जशा गुणांच्या कसोटीवर दिल्या जातात तशाच साहित्यक्षेत्रांतील मानाच्या जागाहि साहित्यगुणांच्या निकषावरच दिल्या जाव्यात या तत्त्वावर माझा विश्वास आहे. परंतु श्री. शेंडे यांची अध्यक्षपदी निवड करून, या निकषावर पात्र ठरलेला एक हरिजन अध्यक्ष होऊं शकतो येथपर्यंत आमचें साहित्य लोकाभिमुख झालें आहे याची पावती आपण महाराष्ट्र

जनतेला दिली आहे. म्हणून मला या साहित्य सम्मेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडीचें एवढें महत्त्व वाटतें. श्री. शेंडे यांचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों आणि हा पायंडा पाडण्याची कामगिरी विदर्भ साहित्य संघानें केली त्याबद्दल विदर्भ साहित्य संघाचें आणि विदर्भांतील साहित्यिकांचेंहि अभिनंदन करतों.

मी सुरुवातीलाच म्हणालों कीं, मराठी भाषेच्या जीवनामध्यें आज एक महत्त्वाची गोष्ट घडत आहे. आणि ती म्हणजे नवीन होऊं घातलेल्या मराठी राज्याची रचना. कारण ती जशी राजकारणांतील किंवा मराठी जनतेच्या जीवनांतील महत्त्वाची गोष्ट आहे, तशीच मराठी भाषेच्या दृष्टिनेंहि ती महत्त्वाची गोष्ट आहे असें मी मानतों. भाषिक राज्याच्या मागणीच्या पाठीमागें एकभाषिक जनतेच्या सांस्कृतिक विकासाचा जसा हेतु आहे, तशीच त्या राज्याच्या भाषेला मानाच्या महत्पदीं बसविण्याचीहि कल्पना आहे. मराठी भाषिक राज्याचें माझ्या मनांत चित्र काढण्याचा जेव्हां मी प्रयत्न करतों तेव्हां मराठी जनता राज्यसिंहासनावर येऊन बसली आहे असें चित्र उभें राहण्याऐवजीं या सिंहासनावर मराठी भाषा विराजमान झाली आहे असेंच चित्र माझ्या मनांत चितारलें जातें. मराठी भाषेला हा मानाचा दर्जा प्राप्त करून दिल्यानंतर त्यांतून ज्या जबाबदा-या निर्माण होणार आहेत, ज्या परंपरा निर्माण होणार आहेत त्यांचा विचार मराठी जनता तर करीलच, पण त्यापूर्वी त्यांतून निर्माण होणा-या महत्त्वाच्या समस्यांचा विचार करण्याची जिम्मेदारी मराठी साहित्यिकांवर पडणार आहे. कारण राज्यभाषेचा दर्जा जेव्हां भाषेला प्राप्त होतो तेव्हां लोकजीवन समृद्ध करण्याचें एक महत्त्वाचें साधन म्हणून आपण त्या भाषेकडे पाहात असतों. आपण जाणतांच कीं वेगवेगळ्या साहित्य-प्रकारांनी लोकजीवन समृद्ध होत असतें. लोकजीवन समृद्ध करणें हें साहित्याचें अंग आहे कीं नाहीं, त्याचा तो उद्देश आहे कीं नाहीं, हा अर्थात् वादाचा विषय होऊं शकेल, परंतु निदान त्याचा परिणाम तसा घडत असतो असें गृहीत धरून मी या गोष्टीची चर्चा करतों आहें आणि म्हणून मराठी भाषेचें राज्य झाल्यानंतर ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांतील विचारांची संपदा तिनें मराठी जीवनांत आणली पाहिजे, ही जिम्मेदारी तिच्यावर आहे. त्याकरितां मराठी भाषा ही अधिक विचारप्रवाही, अधिक विचारवाही झाली पाहिजे.

ज्ञानाच्या आणि विज्ञानाच्या क्षेत्रांतील मूलभूत संशोधन हातीं घेण्याचा प्रयत्न ज्या भाषेंत होतो तीच भाषा ज्ञानाची भाषा होऊं शकते. आज आपल्याला आपल्या भाषेचा अभिमान असतांनाहि एक गोष्ट मान्य करावीच लागेल. निदान मीं माझ्या मनाशीं ती मान्य केली आहें. ती गोष्ट म्हणजे विज्ञानाच्या क्षेत्रांत मूलभूत संशोधनाचें काम करणा-या इंग्रजीसारख्या आज ज्या भाषा आहेत, त्यांचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. केवळ इंग्रजी भाषिकच इंग्रजी भाषा शिकतात असें नव्हे; तर अलम दुनियेंमध्यें, विज्ञानाच्या क्षेत्रामध्यें होणा-या पराक्रमांशी व प्रगतीशीं ज्यांना संबंध ठेवावयाचा असतो त्यांना त्या भाषेच्या अभ्यासाची आवश्यकता वाटते. याचें कारण या क्षेत्रांतील

मूलभूत संशोधनाचें काम या भाषेमधून होत असते. मराठी भाषेचा तुमचाआमचा अभिमान जर ख-या अर्थानें पहिल्या प्रतीचा राहणार असेल तर हें काम मराठी भाषेमध्येंहि झालें पाहिजे. तशा प्रकारची परिस्थिति आपण येथें निर्माण केली पाहिजे. मराठी भाषेला राजसिंहासनावर बसविण्याचा ऐतिहासिक प्रसंग तुमच्या-आमच्या जीवनांत कांहीं आठवड्यांच्या आंत निर्माण होणार असल्यामुळें ही जिम्मेदारी माझ्या मतानें अधिकच तीव्र होते. आणि ही तीव्रता - ह्या जाणिवेची तीव्रता - जर साहित्यिकांच्या मनापर्यंत जाऊन पोहोंचली तर, मला वाटतें, त्याचा चांगलाच परिणाम होईल, लोकजीवनाच्या दृष्टीनें अत्यंत फायद्याची अशी गोष्ट असल्यामुळें मराठी साहित्यिक तिच्याकडे सातत्यपूर्वक लक्ष देतील अशी आशा या वेळीं मी व्यक्त करतों.

दुसरा एक विचार या प्रसंगीं मला आपल्यापुढें मांडावयाचा आहे. आणि तो म्हणजे विदर्भ आणि महाराष्ट्र यांच्यामध्यें फरक आहे अशा प्रकारची भावना वाढविण्याचा प्रयत्न साहित्यिकांकडून होऊं नये. राजकीय महत्वाकांक्षा असणा-या माणसांनीं असा प्रयत्न केला तर तो मी समजूं शकतों. परंतु विदर्भांतील साहित्यिक भावनात्मक एकतेसाठीं जो प्रयत्न करीत आहेत त्याबद्दल मला त्यांना धन्यवाद द्यावयाचे आहेत. यापुढेंहि असेच अधिक प्रयत्न आपण केले पाहिजेत. एकभाषिक जनतेच्या जीवनामध्यें प्रादेशिक अंतरामुळें थोडाफार फरक होतात आणि ते तसे झालेहि पाहिजेत. हवामानामध्यें जो फरक असतो त्यामुळें जीवनपद्धतींतहि थोडाफार फरक पडतो. परंतु या नव्या जमान्यांत एकमेकांच्या जीवनामध्यें जीं साम्यस्थळें आहेत, ज्या एकजिनसी परंपरा आहेत, एकमेकांना जवळ नेणा-या ज्या गोष्टी आहेत, त्यांच्यावर भर देऊन त्यांचें महत्त्व प्रतिपादण्याची फार आवश्यकता आहे. कोंकणापासून घाटमाथा किती अलग आहे आणि घाटमाथ्यापासून मराठवाड्यांतील गोदावरीचा तीरहि किती दूर आहे. तेव्हां या तिन्ही ठिकाणीं जी मराठी भाषा बोलली जाते तिच्यांत थोडाफार फरक हा राहणारच. आणि गोदावरीच्या तीरावरील व पूर्णेच्या तीरावरील भाषेंतहि फरक असणें शक्य आहे. परंतु अशी ही विविधता जीवनामध्यें नसेल तर जीवन समृद्ध होणार नाहीं, संपन्नहि होणार नाहीं. या विविधतेंतहि एक प्रकारची एकता आहे. या एकतेवर भर देऊन तिचा प्रत्यय दैनंदिन जीवनामध्यें, नित्याच्या कामामध्यें आणण्याचें काम साहित्यिकांनीं केलें पाहिजे. हें काम कथालेखकांचें, कवींचें आणि कादंबरीकारांचें आहे. आणि अशा प्रकारचा प्रत्यय आजपर्यंतच्या मराठींतील लेखनामध्यें आलेलाहि आहे.

आपणांला माहीतच आहे, कीं खामगांवला ज्यांनीं आपली कर्मभूमि मानली त्या तात्यासाहेब कोल्हटकरांच्या स्फूर्तीतून निघालेलें गीत आज महाराष्ट्र गीत झालें आहे. विदर्भांतील कुठलेंहि उत्कृष्ट कथावाङ्मय सबंध महाराष्ट्रभर सारख्याच जिव्हाळ्यानें वाचलें जातें. मला आठवतें, माझ्या विद्यार्थीदशेमध्यें, कोल्हापूरच्या म्हणजे महाराष्ट्राच्या दक्षिण सीमेजवळ राहणा-या श्री. ना. सी. फडक्यांची 'दौलत' ही कादंबरी आणि पूर्व सीमेजवळ राहणा-या नागपूरच्या श्री. पु. य.

देशपांड्यांची 'बंधनाच्या पलीकडे' ही कादंबरी या दोन्ही कादंब-या सारख्याच जिव्हाळ्यानें मीं वाचल्या आहेत. याचें कारण त्यांच्या पाठीमागची भावना आणि महाराष्ट्रीय संस्कृति एक होती. महाराष्ट्रीय अनुभव एक होते आणि मराठी मनहि एक होतें. आणि ही जी भावनेची, संस्कृतीची आणि मनाची एकता आहे त्या एकतेची जाणीव तीव्रतेने वाढविण्याची आजच्या काळांत फार आवश्यकता आहे असें मला वाटतें. कारण आजचा काळ असा आहे कीं, त्याच्या पाठीमागच्या राजकीय प्रेरणा पुढें अलग होऊं शकतील, त्यांमध्यें बदल होऊं शकेल. पण त्यांच्या पलीकडे जें सामाजिक मन आहे तें सांस्कृतिक संबंधांनी बांधले असल्यामुळें तें सलगच राहील. या सामाजिक मनाला जागें करण्याचा प्रयत्न साहित्यानें केला पाहिजे. त्यामागील ज्या सांस्कृतिक प्रेरणा आहेत त्यांना जागें करण्याचें काम साहित्यानें केलें पाहिजे. साहित्याची खरी सेवा या क्षेत्रांत झाली पाहिजे. हें काम निव्वळ विदर्भातील साहित्यिकांनीच केलें पाहिजे असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाहीं. विदर्भ साहित्य सम्मेलनाच्या या व्यासपीठावरून महाराष्ट्रांतील सगळ्या साहित्यिकांना उद्देशून मी हें बोलतों आहें. आम्हांला हा प्रयत्न अधिक जोरदारपणें केला पाहिजे. त्याचबरोबर आमच्या वागण्याचालण्यांत जे दोष असतील ते दूर करण्याचाहि आम्हीं प्रयत्न केला पाहिजे. प्रांतीयतेमधला एक दोष असा आहे कीं, प्रांतीयतेची भावना एकदां जागृत झाली म्हणजे ती निव्वळ प्रदेशापुरतीच मर्यादित राहते असें नव्हे, तर ती वाढूं लागली म्हणजे एक गांव दुस-या गावाविरुद्ध, एक शहर दुस-या शहराविरुद्ध अशा त-हेनें ती पसरत जाते. प्रांतीयतेचा हा धोका लक्षांत घेऊन आपल्या जीवनामध्यें जीं साम्यस्थळें आहेत, जो एकजिनसीपणा आहे, त्याची वाढ करण्याचा आम्हीं प्रयत्न केला पाहिजे. मला वाटतें, महाराष्ट्रीय भाषिकांच्या दृष्टीनें ही अत्यंत महत्त्वाची अशी बाब असून मराठी भाषा आणि आपलें एकभाषिक राज्य हीं तिच्या पूर्तीचीं साधनें आहेत असेंच आपण मानले पाहिजे.

साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी असली पाहिजे असें मी मानतों. यवतमाळच्या साहित्य सम्मेलनांत बोलतांना या विषयावर मी बोललों होतो म्हणून त्याची पुनरुक्ति मी करूं इच्छीत नाहीं. रशियांतील कादंबरीकार आणि अमेरिकेंतील कादंबरीकार यांच्या कादंब-यांतील नांवें बदलतील, त्यांतील सृष्टिसौंदर्याचीं स्थळें बदलतील, त्यांतील लेखन तंत्रहि कदाचित् वेगवेगळें असेल, परंतु मानवी मनाचें त्यांत जें पृथक्करण केलेलें असतें, भावनांचा त्यांत जो प्रत्यय येतो, तो शेवटीं एकच असतो. रशियन भाषेंतील उत्कृष्ट कथा वाचून माणसाला जो आनंद व अनुभव मिळतो, तोच आनंद आणि अनुभव मराठी, तामिळ किंवा जपानी भाषेंतील उत्कृष्ट कथा वाचून मिळतो. निरनिराळ्या भाषांतील अक्षर वाङ्मय वाचल्यानंतर त्यांतील मानवी मूल्यांचा आपणांस जो प्रत्यय येतो त्यामुळें त्या वाङ्मयाचें महत्त्व आपल्या मनाला पटत राहतें. मानवी मूल्यांचा प्रत्यय हीच वाङ्मयाची आपण शेवटची कसोटी मानली तर मानवी मूल्यांची किंवा मानवी गुणांची वाढ करणें हें आम्हीं आमचें साध्य मानलें पाहिजे. आणि हें साध्य

गांठण्याचें साधन म्हणून आपण आपल्या राज्याकडे पाहिलें पाहिजे.

परंतु त्याबरोबरच तुमच्या आमच्या सर्वांच्यावर एक जबाबदारी येणार आहे. विदर्भांच्या परंपरेंत जे चांगले गुण आहेत, त्यांचा अनुभव गेल्या तीन वर्षांत मला विपुलतेनें आलेला आहे. विदर्भांच्या परंपरेंत एक प्रकारची प्रौढता आहे, एक प्रकारचें सौजन्य आहे, एक प्रकारची आतिथ्यशीलता आहे. हीं जीं विदर्भांचीं वैशिष्टें आहेत, तीं प्राचीनतेंतून आलेलीं आहेत. विदर्भ हें महाराष्ट्राचें जुनें नांव आहे असें कै. तात्यासाहेब केळकरांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. महाराष्ट्र हें नांव कदाचित् ऐतिहासिक परंपरेंतून आलें असेल. परंतु आजोळची भूमि असा त्यांनीं विदर्भाचा उल्लेख केलेला आहे. आणि एका अर्थानें विदर्भ महाराष्ट्राचें ऐतिहासिक दृष्ट्या सुद्धां आजोळ आहे.

आज मी बुलढाणा जिल्ह्यामध्यें असतांना तर या गोष्टीची मला जास्तच तीव्रतेनें जाणीव होते. शिवाजी महाराज आमच्या मराठी मनाचें प्रतीक आहेत आणि त्यांचें आजोळ विदर्भांत बुलढाणा जिल्ह्यांत आहे. आणि म्हणून मी म्हणतों कीं, विदर्भ ऐतिहासिक दृष्ट्याहि महाराष्ट्राचें आजोळ आहे. तेव्हां विदर्भाच्या प्राचीनतेंतून हे जे गुण आलेले आहेत त्यांची देवाणघेवाण तुम्हांला महाराष्ट्राच्या इतर भागांशी करावी लागेल. ती करतांना कदाचित् त्यांना थोडेसें समजावून घ्यावें लागेल आणि त्यांचे जे दोष असतील ते तुम्हांलाहि थोड्याशा रेशमी हातानें - मी पुन्हा त्या शब्दांचा उच्चार करून सांगतों - दूर करण्याचा प्रयत्न करावा लागेल. आणि हा प्रयत्न आपण केला पाहिजे. कारण आज एका मोठ्या ऐतिहासिक कालखंडांतून आपण चाललों आहोंत. दहापांच माणसांना येणारा राग हा समाजाचा राग बनतां कामा नये. आम्ही तीन कोटी मराठी भाषिक एका छत्राखालीं, एका घरामध्यें, एका छायेखालीं बंधुभावानें राहूं, वागूं, आणि वाढूं अशी मनाशीं आशा धरून आपण प्रयत्न केले पाहिजेत. समाजाची आजची ही गरज असून त्यासाठीं पुढील पावलें टाकण्याचें काम तुम्हांला आम्हांला करावयाचे आहे. एका अर्थानें गेल्या तीन वर्षांत आपण सात पावलें बरोबर टाकलेलीं आहेत. आणि तुमचा आमचा हा जो जवळचा संबंध आला आहे त्याच्या पाठीमागें कांहीं ईश्वरी संकेत आहे अशी माझी भावना आहे. हा कांहीं कुणा एका माणसाचा पराक्रम नाहीं. मी तर असें मानतों कीं महाराष्ट्राचा कायदेशीर जन्म होण्याच्या पूर्वीहि विदर्भ, मराठवाडा आणि महाराष्ट्र यांना एकत्र आणण्यामध्यें ईश्वराचा कांहीं संकेत होता. तो संकेत आज पुरा होत आहे. आम्ही मराठी भाषिक इतिहासकालामध्यें शतकानुशतकें एकमेकांपासून अलग राहिलों. पण यापुढें आम्ही बंधुभावानें एकत्र रांहू आणि हा बंधुभाव आम्ही अशा तेजानें वाढवूं कीं सबंध भारताला तो एक आदर्श व्हावा. अशा प्रकारची भावना आम्हांला आमच्या प्रयत्नांनीं निर्माण करावयाची आहे. कारण भारतांतील अनेक भाषिकांना एकत्र ठेवून भारताचें ऐक्य आम्हांला भावनात्मक ऐक्य बनवावयाचे आहे. तें बनविण्याकरितां आम्ही एकभाषिक प्रेमानें एकत्र राहूं शकतों, एकमेकांचें दोष सुधारण्याचा प्रयत्न करीत एकत्र राहूं शकतों, या आदर्शाची

जाणीव आम्हांला असली पाहिजे, आणि तो आदर्श आम्ही प्रत्यक्ष जीवनामध्यें आचरला पाहिजे. त्या आचरणाचा क्षण आतां जवळ आला असून तुमचे आमचे मराठी भाषेचे सगळे पूर्वज आशीर्वादाच्या दृष्टीनें आपल्याकडे पाहात आहेत, असें चित्र आज माझ्या मनापुढें उभें राहिलें आहे. आमच्या या वंशजांना परमेश्वरानें सद्बुद्धि द्यावी अशीच त्यांची प्रार्थना असेल, आणि आम्हां तीन कोटि मराठी भाषिकांच्या मुखांतून संचारणा-या आमच्या मराठी माउलीचीहि तीच प्रार्थना असेल. आमची ही मूळ प्रेरणा आमच्यामध्यें कायम ठेवण्याच्या व वाढविण्याच्या कामीं साहित्यिकांची लेखणी मदत करो अशी सदिच्छा मी या प्रसंगीं व्यक्त करतों.

आपण मला येथें बोलावलें त्याबद्दल मी आपला अतिशय आभारी आहें. विदर्भ साहित्य संघाचें व्यासपीठ हें मराठी भाषिकांना बंधुभावाची प्रेरणा देऊन त्यांना एकत्र आणणारें व्यासपीठ आहे असें मी मानतों. हें कार्य त्याच्याकडून यापुढेंहि असेंच सतत चालू राहो अशी प्रार्थना करून मी या अधिवेशनाचें उद्घाटन झालें असें जाहीर करतों.

## साहित्य आणि संस्कृति

आजचा हा औपचारिक समारंभ ही महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर घडणारी एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे असें मी मानतों. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वेळीं शासनाच्या धोरणासंबंधींचें मीं जें वक्तव्य केलें होतें, त्यामध्यें साहित्य आणि संस्कृति यांच्या वृद्धि व संवर्धनासाठीं एक विद्वज्जनांची यंत्रणा निर्माण करण्याचा सरकारचा हेतु प्रथमच जाहीर करून महाराष्ट्राशीं मी वचनबद्ध झालों होतों. त्याच धोरणाचा पुनरुच्चार महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री. श्री. प्रकाशजी यांनीं महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या पहिल्या अधिवेशनासमोर केलेल्या आपल्या भाषणांत केला. त्या वेळीं त्यांनीं ज्या शब्दांत या धोरणाचा उल्लेख केला होता ते शब्द आपल्यापुढें वाचून दाखविण्याचा मोह मला आवरत नाहीं. त्यांनीं आपल्या भाषणांत असें म्हटलें होतें कीं, "सरकारनें मराठी भाषेच्या विकासासाठीं आणि समृद्धीसाठीं, महाराष्ट्राची भाषा, संस्कृति आणि इतिहास यांच्यासंबंधींच्या संशोधनाकडे तांतडीनें लक्ष देण्याचें ठरविलें आहे. अशा प्रकारच्या संशोधनास उपयुक्त होईल असें साहित्य निरनिराळ्या भारतीय व पाश्चात्य भाषांत भरपूर प्रमाणांत उपलब्ध आहे. म्हणून या बाबतींतील संशोधनाचें काम हातीं घेण्यासाठीं व त्यावर देखरेख ठेवण्यासाठीं, या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व विद्वानांची एक उच्चाधिकार यंत्रणा लवकरच निर्माण करण्याचा महाराष्ट्र सरकारचा विचार आहे." या बाबतींत शासनामार्फत वेळोवेळीं ज्या घोषणा केल्या गेल्या व त्यांचा जो उच्चार व पुनरुच्चार झाला त्या सर्वांचें मूर्त स्वरूप म्हणजेच आज हें मंडळ स्थापन होत आहे. माझ्या दृष्टीनें मी मराठी जनतेला दिलेल्या वचनाची आज परिपूर्ति झाल्याबद्दलचें समाधान

माझ्या मनांत आहे.

साहित्याच्या प्रश्नांसंबंधीं बोलतांना माझ्यासारख्या माणसानें थोडेंसें जपून बोलावें याची मला जाणीव आहे. तरीहि कांही गोष्टींचा उल्लेख जर मीं येथें केला तर त्याबद्दल आपण मला क्षमा करावी. मी असें मानतों की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, आणि भाषिक राज्याच्या निर्मितीनंतर, वैचारिक व सांस्कृतिक पुनरुज्जीवन घडवून आणणारा एक शक्तिशाली नवा प्रवाह भारतीय जीवनांत निर्माण झाला असून आपण आतां एका समृद्ध अशा कालखंडांत प्रवेश करीत आहोत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकजीवन समृद्ध करण्याची जी प्रतिज्ञा आपल्या देशानें केली तिचाच हें पुनरुज्जीवन एक भाग असून भाषिक राज्यांच्या निर्मितीमुळें या पुनरुज्जीवनाच्या कार्यासाठीं आम्हांला एक नवें साधन प्राप्त झालें आहे. यापुढें आतां एक निश्चित अशी यंत्रणा आपण तयार केली पाहिजे, असें मला वाटूं लागलें आणि त्यांतूनच या मंडळाची कल्पना निर्माण झाली. साहित्य अकादमी ही अशाच प्रकारची संस्था असून ती १९५४ सालीं अस्तित्वांत आली. वेगवेगळ्या भाषेंतील दुर्मिळ ग्रंथ प्रसिद्ध करणें, इतिहासाचें, वाङ्मयाचें आणि निरनिराळ्या संस्कृतीचें संशोधन करणें यासारखें विविध स्वरूपाचें कार्य ही संस्था करीत असते. साहित्य अकादमीसारखेंच व शक्य झाल्यास त्यापेक्षांहि अधिक व्यापक स्वरूपाचें कार्य या मंडळाकडून व्हावें या उद्देशानें हें मंडळ स्थापन करण्यांत आलें आहे. या मंडळाला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारखे अध्यक्ष लाभले ही या मंडळाच्या दृष्टीनें मोठी भाग्याची गोष्ट असून त्यांच्या एका थोर ग्रंथाला केंद्रीय साहित्य अकादमीनें नुकतेंच मोठें अनुदान दिलें आहे.

या मंडळाच्या निर्मितीसंबंधी जो सरकारी आदेश प्रसिद्ध झाला आहे त्यांत या मंडळाच्या कार्याची व्याप्ति स्थूलमानानें दर्शविण्यांत आली आहे. परंतु या मंडळानें कोठल्या प्रकारचें काम करावें, यासंबंधीं कुठलेंहि बंधन, कुठल्याहि मर्यादा शासन या मंडळावर घालूं इच्छीत नाहीं. सरकारी आदेशांतील यासंबंधींचा उल्लेख केवळ नाममात्र आहे. या मंडळावर जी तज्ज्ञ आणि विद्वान मंडळी आहेत त्यांनीं या कार्याची सर्व बाजूंनीं व्याप्ति वाढावी म्हणून अधिक व्यापक व अधिक सर्वंकष असा प्रयत्न केल्यास, शासन त्याचें स्वागतच करील हें मी सुरुवातीलाच स्पष्ट करूं इच्छितों. या कार्याच्या बाबतींत या मंडळावर किंवा त्याच्या विचारावर सरकार कुठलेंहि बंधन घालूं इच्छीत नाहीं. कारण, देशांतील विचारवंत, कलावंत, लेखक, शास्त्रज्ञ व संशोधक यांच्या प्रयत्नानें निर्माण होणारें विचारधन हेंच समाजाचें फार मोठें धन आहे असें मी आणि महाराष्ट्र शासन मानतों. तें असलें तरच देश ओळखला जातो, समाज ओळखला जातो, समाजाचें जीवन प्रवाही राहतें, चिरंतन राहतें. समाज जिवंत राहतो तो त्याच्याजवळ असलेल्या भौतिक सामर्थ्यानें नव्हे, तर त्याच्याजवळ असलेल्या सांस्कृतिक मूल्यांवर आणि विचारधनावर तो जिवंत राहतो

आणि वाढतो असाच इतिहासाचा दाखला आहे.

आपल्या देशांतील परंपरा सुद्धा अशाच त-हेची असून ती सांगावयाची झाल्यास व्यास-वाल्मिकींपासून ते आजपर्यंतच्या अनेक पंडितांचीं, विचारवंतांचीं आणि विद्वानांचीं नांवें घ्यावीं लागतील. ही यादी मोठी लांबलचक व आकर्षक होईल. पण तिची कांहीं आवश्यकता नाहीं. थोड्यांच दिवसांत रवींद्रनाथ टागोर यांच्या जन्मशताब्दीचा समारोह सबंध देशभर आपण साजरा करणार आहोंत. व्यास-वाल्मीकींसारख्या महर्षींपासून रवींद्रनाथ टागोरांसारख्या ऋषितुल्य पुरुषापर्यंत फार मोठी अशी आमची सांस्कृतिक परंपरा आहे. आणि महाराष्ट्रापुरतेंच या परंपरेसंबंधीं बोलावयाचें झाल्यास ज्ञानेश्वरापासून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्यापर्यंत अनेक नावांचा उल्लेख करावा लागेल. अशा या सर्व थोर विद्वानांची, पंडितांची, त्यागी संतांची आणि पराक्रमी पुरुषांची ही आपली अखंड परंपरा आहे. तीच आमची खरी प्रेरणा आहे. त्यांचें कार्य आम्हीं पुढें चालविलें पाहिजे. म्हणूनच शासनामार्फत आज या साहित्यिक आणि सांस्कृतिक मंडळाची निर्मिती होत आहे.

आजच्या ज्या विशिष्ट परिस्थितींत आपण या मंडळाची स्थापना करीत आहोंत त्याला कांहीं विशेष अर्थ आहे असें मी मानतों. मराठी भाषा, राज्यभाषा म्हणून स्वीकारण्याची तयारी करण्यासाठीं खरोखरी आजचा हा मंगल प्रसंग आहे. मराठी भाषा ही राज्यभाषा करण्याचें तत्त्व आम्हीं स्वीकारलें आहे. त्यामुळें आम्हीं कांहीं जबाबदा-या स्वीकारल्या आहेत. मराठी भाषेवर लोकशाहीचा कारभार करण्याची आतां जबाबदारी आलेली असून तो तिनें अशा रीतीनें केला पाहिजे कीं, लोकांचें जीवन संपन्न होण्यास, समृद्ध होण्यास तिचें साहाय्य होईल. त्यासाठीं भौतिक दृष्ट्या जगांत जें जें शास्त्र उंचावलेले आहे त्या त्या शास्त्रांतील ज्ञान आपल्यांत उतरविण्याचें सामर्थ्य मराठी भाषेला प्राप्त झालें पाहिजे. साहित्याचा आणि संस्कृतीचा, विचारवंतांचा आणि लेखकांचा जन्म खरोखरी कशासाठीं होत असतो ? मी तर असें मानतों कीं, मानवी मनांत अनेक मूक आशाआकांक्षा असतात, कल्पना असतात आणि त्या प्रकटीकरणासाठीं, व्यक्तिमत्त्वासाठीं, एक प्रकारें हांका मारीत असतात. शब्दांसाठी त्या भुकेलेल्या असतात, तहानलेल्या असतात. त्यांच्या हांकेला ओ देऊन लेखक, विचारवंत, संशोधक व शास्त्रज्ञ त्यांना लेखनद्वारा शब्दरूप देत असतात. मराठी भाषिक जनतेच्याहि अशा कांहीं आशा-आकांक्षा, इच्छा असून त्या विविधप्रवाही आहेत. त्यांना आपण लेखनद्वारा शब्दरूप केलें पाहिजे. त्याचप्रमाणें ज्ञानाच्या सरोवराचें पाट आपण लोकांच्या जीवनापर्यंत पोहोंचविले पाहिजेत. ही ज्ञानगंगा लोकांच्या जीवनापर्यंत पोहोंचविण्यासाठी या मंडळाची आम्हांस मदत होईल. तें या मंडळाचें काम आहे.

मराठ्यांचा इतिहास हाहि आपला एक मोठा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. इंग्रजांनीं त्यांचा जो इतिहास

निर्माण केला आहे तो बखरींतून त्यांना सोईस्कर असे ठोकळ स्वरूपाचे उतारे घेऊन निर्माण केला आहे. परंतु मराठ्यांच्या इतिहासाचें पुनरुज्जीवन करण्याची आज आवश्यकता निर्माण झाली आहे. त्याचें नव्यानें संशोधन होऊन हा इतिहास पुन्हा लिहिला गेला पाहिजे. भारताच्या इतिहासांतील मराठ्यांच्या इतिहासाचें पुनरुज्जीवन करण्याचें काम या साहित्य मंडळाचे आहे.

या बाबतींत विचार करतांना अनेक मार्गांनी हा प्रयत्न व्हावयास पाहिजे असें मला वाटतें. मराठ्यांच्या इतिहासलेखनासाठीं लागणारीं अनेक साधनें ठिकठिकाणी सर्वत्र विखुरलेलीं आहेत. तीं पश्चिम महाराष्ट्रांत आहेत, विदर्भात आहेत आणि मराठवाड्यांतहि आहेत. परवांच या बाबतींत विद्वान मित्रांशीं चर्चा करीत असतांना आपल्या विदर्भाचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. माडखोलकर म्हणाले कीं, विदर्भ आणि मराठवाडा या आदिभूमीशीं महाराष्ट्राचा तुटलेला दुवा जोडावयाचा असल्यास, त्यासाठीं विदर्भाच्या आणि मराठवाड्याच्या खेड्याखेड्यांतून अनेक साधनें आहेत. परंतु या प्रश्नाला हात घालून कुणींतरी ही साधनसामुग्री एकत्र केल्याशिवाय, इतिहासाच्या पुनरुज्जीवनाचें हें काम पुरें होण्याची शक्यता नाहीं. या बाबतींत अनेक कल्पना, अनेक विचार मनांत येऊन जातात. त्यांतील मुख्य विचार असा कीं, हें काम स्थिरपणानें कुठल्या तरी संघटनेनें केलें पाहिजे. या मंडळानेंच हें काम करावें असा मात्र याचा अर्थ नाहीं. त्याचप्रमाणें या संस्थेच्या अध्यक्षांनीं आणि सदस्यांनीं हें काम करावें असाहि याचा अर्थ नाहीं. या मंडळाचे अध्यक्ष माझे मित्र तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आहेत आणि आपल्याकडचे श्री. मिराशी त्यांत आहेत. त्यांनी हें सर्व काम करावें असें जर आपण म्हणालों तर तो त्यांच्यावर अन्याय होईल. परंतु हें काम, आपण जी ही यंत्रणा उभी केली आहे तिनें, महाराष्ट्रांत ज्या निरनिराळ्या संस्था आहेत त्यांच्याकडून करवून घेतलें पाहिजे, महाराष्ट्रांत जी विद्वान मंडळी आहेत त्यांच्याकडून करवून घेतलें पाहिजे. या मंडळानें त्यांच्या विचारांचा, त्यांच्या शक्तीचा, साधनांचा उपयोग करून घेतला पाहिजे, त्यांना कार्यक्षम केलें पाहिजे, क्रियाशील केलें पाहिजे. आपले संबंध व आपल्या कामाचें स्वरूप लक्षांत घेऊन आणि या मंडळींच्या ज्ञानाचा, साहित्याचा, विचारांचा उपयोग करून, काम करण्याची एक प्रवाही योजना या मंडळांनें करावी अशी या मंडळाकडून माझी अपेक्षा आहे.

परंतु या मंडळाचा जन्म निव्वळ इतिहासाचें संशोधन करण्यासाठीं झाला आहे असा मात्र याचा अर्थ नव्हे. या बाबतींत परवांच कांहीं मित्रांशीं, विचारवंतांशीं माझी चर्चा झाली. त्याचप्रमाणें यासंबंधीं महाराष्ट्रांतील विद्वानांची झालेली चर्चा वृत्तपत्रांतून मीं काळजीपूर्वक वाचली, अभ्यासली. मी जेव्हां या मंडळानें इतिहासाचें संशोधन केलें पाहिजे असें म्हणतों तेव्हां भूतकालाचें उत्खनन करून जेवढी माहिती मिळेल तेवढी त्यानें जमा करावी एवढीच त्याची जबाबदारी आहे असा त्याचा अर्थ नसून या संशोधनाबरोबरच त्यानें वर्तमानकाळाकडे लक्ष दिलें पाहिजे व

वर्तमानकाळाकडे बघतांना भविष्यकाळाकडे नजर ठेवून त्यानें आम्हांस मदत केली पाहिजे. मी जेव्हां साहित्य म्हणतों तेव्हां ललित साहित्य म्हणतों असें नव्हे, किंवा ललित साहित्य हेंच तेवढें साहित्य असाहि त्याचा अर्थ नाहीं. ललित शब्द म्हणजे साहित्य अशी माझी कल्पना नाहीं. साहित्य म्हणजे सामान्य जनतेचें हित करण्याचें साहित्य अशी साधीसुधी व्याख्या मी करतों. ह्या व्याख्येंत शास्त्रांचाहि अभ्यास गृहीत धरावा लागतो. आज ही गोष्ट कोणीहि नाकारूं शकणार नाहीं कीं, मराठी भाषेमध्यें अमृताशीं समान अक्षर लिहिणा-या महान पंडितांना आम्ही शिरोधार्य मानतो असे आम्हीं कितीहि म्हटलें, तरी संशोधनासाठीं इंग्रजी भाषेचा पाठपुरावा करणें आम्हांला आवश्यक होतें. तेव्हां इतर भाषांमध्यें जें ज्ञानभांडार असेल, जे विचार असतील ते मराठी भाषेंत खेचून आणण्याचा आम्हांला प्रयत्न करावा लागणार आहे. परवांच माझ्या एका संपादक मित्रानें ह्या मंडळाला उद्देशून एक सूचना केली कीं, विद्‌वान मंडळीकडून तयार होणारे ज्ञानकोश, शब्दकोश हे निव्वळ त्यांच्या ग्रंथालयांची शोभा वाढविणारे ग्रंथ न होतां, ते जनतेला उपलब्ध होतील अशा स्वरूपाचे झाले पाहिजेत. एवढेंच नव्हे तर यासाठीं त्यांनी वेगवेगळ्या संस्कृतींचें आणि शास्त्रांचें संशोधन करून लोकांना उपयुक्त होईल असें मार्गदर्शन केलें पाहिजे. परंतु हें मंडळ वेगवेगळ्या भाषांतील ग्रंथांचें प्रकाशन करणारें प्रकाशन खातें व्हावें असा याचा अर्थ नव्हे. तर एक प्रकारचें सर्जनशील आणि विचार करणारें हें मंडळ एकप्रकारचें पॉवर हाऊस बनावें, विद्‌युतगृह बनावें, अशी माझी या मंडळासंबंधी अपेक्षा आहे. तें कुठें तरी क्षितिजापलीकडे राहणारी दुनिया बनतां कामा नये. त्यानें वाढतीं क्षितिजें निर्माण केलीं पाहिजेत. एवढेंच नव्हे तर हें मंडळ महाराष्ट्राचें जीवन व्यापक, विस्तृत व क्रियाशील करणारें माध्यम बनावें अशी माझी त्याबद्दलची कल्पना आहे. या उद्देशानेंच अनेक मित्रांशी, विचारवंतांशीं, विद्‌वानांशीं, चर्चा करीत करीत या मंडळाचा जन्म झाला आहे. अशा प्रकारच्या साधनाची, माध्यमाची आवश्यकता होती. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपूर्वी अनेक दिवस अशा त-हेचा विचार, अशा त-हेची कल्पना माझ्या मनांत घोळत होती. आतां ती कल्पना साकार होत आहे.

या मंडळाचें अध्यक्षस्थान माझे मित्र आणि ज्येष्ठ विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं स्वीकारलें याबद्दल मला अतिशय आनंद होत आहे. तो व्यक्त करण्यास माझ्याजवळचे शब्द अपुरे पडतात. ते अशा पदापासून दूर राहणारे आहेत. त्यांच्या माझ्या केवळ घरोब्याच्या आणि प्रेमाच्या संबंधामुळें मीं त्यांना येथें पकडून आणण्याचा प्रयत्न केला आणि त्यांनीं ही जबाबदारी स्वीकारण्याचें कबूल केलें. त्याबद्दल त्यांचे प्रथम मला आभार मानले पाहिजेत. त्यांच्यावर अनेक महत्त्वाच्या जबाबदा-या आहेत. असें असूनहि त्यांनीं ही नवीन जबाबदारी स्वीकारली. त्यांच्या वाई येथील प्राज्ञपाठशाळेंत धर्मकोश तयार करण्याची जबाबदारी त्यांनीं गुरुप्रेमासाठीं स्वीकारली. मी त्यांना असें म्हणेन कीं, या गुरुप्रेमाच्या स्वरूपाचेंच, मराठी भाषेचें, मराठी जनतेचें हें जें ऋण आहे, तें परतफेडीचें ऋण आहे. हें कार्य ते करतील अशी माझी खात्री आहे. सरतेशेवटीं, ही नवी

संस्था सारखी वाढती राहो, आणि साहित्यिकांच्या या महान यात्रेंत, संस्कृतीचा आणि स्वाधीन साहित्याचा जरीपटका खांद्यावर घेऊन ही संस्था यशःश्रीच्या सतत आघाडीवर राहो अशी सदिच्छा व्यक्त करून मी या मंडळाचें उद्घाटन झालें असें जाहीर करतों.

## राष्ट्रभाषा हिंदी

आज या दीक्षांत भाषणाच्या रूपानें माझे विचार आपल्यासमोर मांडण्याची आपण मला जी संधि प्राप्त करून दिलीत त्याबद्दल मी आपला आभारी आहें. पहिल्या प्रथम हिंदी परीक्षांमध्यें यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचें मी हार्दिक अभिनंदन करतों. कोणतीहि परीक्षा असो, ती एक प्रकारची कसोटीच असते. आपलें मर्यादित ज्ञान या कसोटीवर पारखून घेण्यांत जे यशस्वी होतात त्यांना एक प्रकारची आपल्या गौरवाची व आत्मविश्वासाची प्रचीति येते. आपलें जीवन योग्य प्रकारें व्यतीत करतां यावें, आणि त्याचबरोबर आपलें कुटुंब, समाज, राष्ट्र आणि मानवता यांसंबंधींचीं आपणांवर पडणारीं कर्तव्यें चांगल्या प्रकारें पार पाडतां यावींत म्हणून आधुनिक काळांत आपणांला अनेक परीक्षा देऊन आवश्यक तें ज्ञान मिळवावें लागतें. जीवन हीच मुळीं एक मोठी परीक्षा असून ती चांगल्या रीतीनें उत्तीर्ण होण्यासाठीं अतिशय परिश्रम करावे लागतात. आपली जीवननौका योग्य मार्गावर ठेवण्यासाठी सतत जागरूक राहून आपल्या शक्तीचा आपण कार्यक्षम रीत्या पुरेपूर उपयोग केला नाहीं तर ती प्रवाहामध्यें वाहून जाते आणि आपण प्रवाहपतित बनतों. परिस्थितीवर ज्याला विजय मिळवतां येत नाहीं तो तिचा गुलाम बनतो आणि आपल्या दुर्भाग्याला दोष देत राहतो. म्हणून परीक्षेंत यशस्वी होणें अतिशय महत्त्वाचें असतें याबद्दल शंकाच नाहीं. तथापि याचा अर्थ असा मात्र नाहीं कीं, परीक्षेंत उत्तीर्ण होणारेच लायक असतात व तींत नापास होणारे निरुपयोगी ठरतात. परीक्षेंत नापास झालेल्या विद्यार्थ्यांमध्यें कांहीं असेहि विद्यार्थी असण्याची शक्यता असते कीं, ज्यांचें ज्ञान उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपेक्षां अधिक असूं शकेल, पण केवळ कमनशिबामुळें त्यांना परीक्षेंत यश मिळालें नसेल. घोड्यावर स्वार होणाराहि कधीं कधीं खालीं पडतो, पण पडल्यानंतर ज्याला उठतां येत नाहीं त्याला स्वतःचें संरक्षण करणें कठीण जातें. जीवनाच्या कितीतरी परीक्षांमध्यें आपल्याला अपयश येतें. पण केवळ अपयश आलें म्हणून आपण धीर सोडतां कामा नये. हिंमत धरून आणि आपल्या अपयशाचीं कारणें समजावून घेऊन योग्य दिशेनें आत्मविश्वास व जोमानें आपण प्रयत्न केले तर आपलें ईप्सित साध्य होण्याच्या मार्गांत कोणतेच अडथळे येणार नाहींत. ज्ञानसंपादनाची आपली आवड व यशाची ईर्षा आपण कायम राखली तर अपयशामुळेंसुद्धां आपण अधिक कार्यक्षम व कार्यप्रवण बनूं शकतों असाच आपल्याला अनुभव येईल.

परीक्षांमध्यें उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना आनंद वाटणें स्वाभाविक आहे. परंतु त्यामुळें त्यांनीं आत्मसंतुष्ट किंवा अल्पसंतुष्ट राहतां कामा नये. परीक्षेंतील यशप्राप्तीमुळें अधिकाधिक ज्ञानार्जनाची आवड आपल्यामध्यें निर्माण व्हावयास पाहिजे. केवळ परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठींच जर आपण शिकलों आणि नंतर तें सर्व विसरून गेलों तर असें शिकणें व न शिकणें सारखेंच होईल. म्हणून आपण जें वाचतों किंवा शिकतों, त्यांतील महत्त्वाचा भाग ध्यानांत ठेवण्याचा आपण नेहमीं प्रयत्न केला पाहिजे. आपण आपलें ज्ञान वाढविलें पाहिजे एवढेंच नव्हे तर त्यांत आपण सखोलताहि आणली पाहिजे. केवळ याच मार्गानें साहित्यसेवेसाठीं आपणांस अधिक पात्रता मिळवतां येईल. एका परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यानंतर तिच्यापेक्षांहि मोठ्या परीक्षेंत यश मिळविण्यासाठीं अभ्यास चालू ठेवण्याचा विद्यार्थीवर्गानें निश्चय केला तर उच्च शिक्षण घेणा-यांची संख्या वाढूं लागेल. साधारण शिक्षण घेतलेल्या लोकांपेक्षां उच्च शिक्षण घेतलेले लोक, हिंदी साहित्य आणि देश यांची चांगल्या प्रकारें सेवा करूं शकतील यांत शंका नाहीं. म्हणून अधिकाधिक उच्च शिक्षण घेण्यासाठीं प्रयत्न करण्याचा प्रत्येक विद्यार्थ्यानें निश्चय केला पाहिजे.

अशा प्रकारें आपली पात्रता अधिकाधिक वाढविण्याचा प्रयत्न करीत असतांना, आपला समाज आणि राष्ट्र यांच्या सेवेसाठी आपणांला अधिक उपयुक्त कसें बनतां येईल याचाहि विचार विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. त्यासाठीं प्रथम त्यांनीं आपल्या समाजाची व देशाची आज खरी परिस्थिति काय आहे हें जाणून घेतलें पाहिजे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या सर्वांगीण विकासासाठी फार मोठ्या प्रमाणावर कार्य चालू आहे. देशांतील गरिबी नाहींशी करून त्याला आर्थिक समृद्धि प्राप्त करून देण्यासाठीं पंचवार्षिक योजना अंमलांत येत आहेत. आणखी थोड्याच महिन्यांत दुसरी पंचवार्षिक योजना पूर्ण होऊन तिस-या योजनेस सुरुवात होईल. या योजनांच्या द्वारें, देशामध्ये शेतीसुधारणा व औद्योगिक प्रगति यांबाबत फार मोठें कार्य होत आहे. शिक्षण प्रसार व सार्वजनिक आरोग्य यांमध्यें सुधारणा घडवून आणण्यासाठीं हरत-हेचे प्रयत्न होत आहेत, आणि देशाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनें सरकार आणि जनता सर्व प्रकारें प्रयत्नशील आहे. या सर्व गोष्टींची विद्यार्थ्यांना माहिती असली पाहिजे आणि या सर्व घटनांचें त्यांनीं अभ्यासपूर्वक निरीक्षण केलें पाहिजे. कारण हें सर्व त्यांच्या हितासाठींच चाललेलें आहे. आपलें भवितव्य उज्ज्वल व्हावें म्हणून सरकार आणि सर्वसाधारण जनता कशा त-हेनें परिश्रम करीत आहे, हें जेव्हां डोळें उघडून ते पाहतील तेव्हां आपणहून या महान् कार्यांत सहभागी होण्याकरिता ते पुढें येतील असा माझा विश्वास आहे.

सध्यां हिंदी भाषा एका मोठ्या संक्रमणावस्थेंतून जात आहे. यापूर्वी हिंदी साहित्याच्या इतिहासांत

अशा प्रकारच्या संक्रमणावस्थेचा काळ कधीं आला नसेल. दुस-या प्रांतिक भाषांशी तुलना करतां हिंदी भाषा बोलणारे लोक देशाच्या निरनिराळ्या भागांत अधिक प्रमाणांत असल्यामुळें या भाषेला राष्ट्रभाषा बनण्याचा बहुमान प्राप्त झाला आहे. तथापि या थोर मानाची जिम्मेदारी चांगल्या प्रकारें पार पाडण्याचें काम विशेषतः हिंदी साहित्यिकांचें आहे. आज देशाच्या कानाकोप-यांतून हिंदी भाषेचा प्रसार करण्याची आवश्यकता तर आहेच; परंतु त्याहिपेक्षा हिंदी भाषेंतील शब्दसंपत्ति आज अशा प्रकारें वाढविली पाहिजे कीं, ज्यामुळें आधुनिक विचारप्रवाह, शास्त्रीय व तांत्रिक विषय, आणि त्याचप्रमाणें राज्यकारभार यांची संपूर्ण गरज ती चांगल्या प्रकारें भागवूं शकेल. या दिशेनें केंद्रीय सरकारतर्फे उच्च पातळीवर बरेंच कार्य चालू आहे. तथापि हें महान् कार्य त्वरित पूर्ण होण्यासाठीं सर्वच हिंदी साहित्यिकांच्या हार्दिक सहकार्याची विशेष आवश्यकता आहे.

इतर प्रांतिक भाषांशी हिंदी भाषेचें अधिक प्रमाणात साहचर्य व्हावयास पाहिजे. तसें झाल्यास सगळ्या प्रांतिक भाषांबरोबरच हिंदीचीहि ख-या अर्थानें प्रगति होऊं शकेल. प्रांतिक भाषांतील चांगल्या व मौलिक साहित्याचा हिंदी भाषेंत अनुवाद व्हावयास पाहिजे, आणि त्याचप्रमाणें हिंदी भाषेंतील मौलिक साहित्याचाहि प्रांतिक भाषांतून अनुवाद झाला पाहिजे. साहित्याच्या या देवाणघेवाणीबरोबरच शब्दसंपत्तीचीहि देवाणघेवाण झाल्यास परस्परांमधील जिव्हाळा वाढविण्याच्या दृष्टीनें बरीच मदत होईल. जितक्या अधिक प्रमाणांत प्रांतिक भाषांतील शब्द हिंदी भाषेंत रूढ होतील तितकी हिंदी भाषा त्या त्या प्रांतातून अधिक सहजगत्या समजूं शकेल. त्याचप्रमाणें हिंदींतील शब्द व वाक्प्रचार यांचा इतर प्रांतिक भाषांतून अधिक प्रमाणांत समावेश झाल्यास त्या त्या भागांतील लोकांना हिंदी शिकणें अधिक सोपें जाईल. संस्कृत भाषेचा फार मोठा प्रभाव हिंदीसहित सर्व प्रांतिक भाषांवर पडला आहे. त्यामुळें चांगल्या संस्कृत कलाकृतींचा हिंदी अनुवाद देशांत सर्वत्र लोकप्रिय होऊं शकेल. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन वगैरे प्रमुख परदेशी भाषांमध्यें फार मोठें ज्ञानभंडार भरलेलें असून त्या भाषांतील निवडक ग्रंथांचा संक्षिप्त रूपानें हिंदींत अनुवाद झाल्यास हिंदी साहित्य अधिक संपन्न होऊं शकेल. अशा प्रकारच्या अनुवादित साहित्याबरोबरच नवीन विचारप्रवाहास स्फूर्ति देणा-या मौलिक साहित्याचीहि हिंदी भाषेंत निर्मिति होणें आवश्यक आहे. अशा नवीन साहित्यांत पौर्वात्य संस्कृतीचें चांगलें दर्शन तर घडलें पाहिजेच, पण त्याचबरोबर पाश्चिमात्य जीवनांतील चांगल्या गोष्टींसंबंधींचेंहि ज्ञान त्यांत असलें पाहिजे. विज्ञानाच्या प्रगतीबरोबरच जीवनमूल्यांतहि आश्चर्यकारक असे बदल होत असून त्यांचें यथोचित मूल्यमापन नव्या हिंदी साहित्यांत होणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें नवीन हिंदी साहित्यिकांना योग्यतेनुसार प्रोत्साहन मिळालें पाहिजे आणि त्यांच्या कलाकृति सुलभ रीत्या प्रकाशित होण्याच्या दृष्टीनें त्यांना आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

सामान्य लोकांना हिंदी भाषा समजण्यास अडचण पडूं नये म्हणून ही भाषा शक्य तितकी सरळ व सोपी ठेवण्याचे जाणूनबुजून प्रयत्न झाले पाहिजेत. साहित्यिक हिंदीमध्यें संस्कृत आणि इतर शब्दप्रयोगांचा वापर होणें कांहीं अंशी अपरिहार्य असलें, तरी हा वापर शक्य तो मर्यादित ठेवणें हिंदी भाषेच्या भावी प्रगतीच्या दृष्टीनें उचित होईल. खडी बोलीसारख्या हिंदीच्या बोलभाषेंतून सर्वसाधारण लोकांस समजण्यास कठीण अशा संस्कृत शब्दांचा उपयोग अजिबात टाळतां येणें शक्य आहे.

भारतामध्यें भौगोलिक विविधता असून सुद्धां अनादि काळापासून आश्चर्यकारक सांस्कृतिक ऐक्य अस्तित्वांत आहे. परंतु पारतंत्र्याच्या काळांत आपापसांतील मतभेद वाढले आणि धर्म, जाति, भाषा, प्रान्तीयता वगैरे निरनिराळ्या कारणांमुळें आमच्यांत असलेली फूट वाढवून परकीय सत्तेनें आम्हांला गुलामगिरीच्या शृंखलांत जखडून ठेवलें. परंतु स्वातंत्र्याच्या आंदोलनांतून आमच्या राष्ट्रीय ऐक्याचें खरें स्वरूप प्रखरपणें प्रकट झालें. तथापि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कांहीं ठिकाणीं संकुचित स्वार्थामुळें मतभेद तीव्र होत गेले. ब-याच कालावधीनंतर आपल्या देशास संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें आहे. पण राष्ट्रीय ऐक्य कायम टिकविण्यांत आपण अयशस्वी झालों तर आपलें स्वातंत्र्य धोक्यांत आल्याशिवाय राहणार नाहीं. इतिहासांत प्रथमच आपला संपूर्ण देश जनतेनें चालविलेल्या शासनाखालीं प्रजासत्ताक बनला आहे. तेव्हां त्याचा गौरव वाढावा म्हणून देशांतील निरनिराळ्या लोकामध्यें संपूर्ण ऐक्याची भावना असणें अत्यंत आवश्यक आहे. आपले मतभेद समजुतीनें मिटवून अभेद्य अशा एकजुटीच्या भावनेनें आपण राष्ट्रीय विकास कार्याला वाहून घेतलें पाहिजे. हिंदी भाषा ही राष्ट्रीय ऐक्याची वाढ करणारी एक फार मोठी शक्ति आहे. आणि म्हणून हिंदीच्या प्रगतीबरोबरच देशाच्या एकतेंतहि वाढ होत जाईल.

महाराष्ट्र सरकारकडून हिंदी भाषेच्या अध्ययनास व अध्यापनास योग्य ते प्रोत्साहन दिलें जातें. महाराष्ट्र शासनाच्या नोकरवर्गाला हिंदीचा चांगल्या प्रकारें परिचय व्हावा म्हणून हिंदीच्या कांहीं परीक्षा उत्तीर्ण होणें त्यांच्या बाबतींत आवश्यक करण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें कांहीं हिंदी परीक्षांना इतर शैक्षणिक परीक्षांच्या बरोबरीची मान्यताहि देण्यांत आली आहे. शाळांतून हिंदी शिक्षणाची योग्य ती व्यवस्था करण्यांत आली आहे. अशा प्रकारें महाराष्ट्र राज्यांत हिंदीचा प्रसार वाढविण्यासाठीं आवश्यक तें कार्य करण्यांत येत आहे.

मुंबई प्रांतिक राष्ट्रभाषा प्रचार सभा हिंदीच्या प्रसारासाठी प्रशंसनीय कार्य करीत असून गेली पंचवीस वर्षे हिंदीची सेवा करीत असलेल्या वर्ध्याच्या राष्ट्रभाषा प्रचार समितीशीं ती निगडित

आहे. या समितीच्या परीक्षांना भारत सरकार, मुंबई सरकार आणि इतर राज्य सरकारांनीं व विद्यापीठांनीं मान्यता देऊन तिचा सन्मान केला आहे. वर्ध्याच्या राष्ट्रभाषा प्रचार समितीचें कार्यक्षेत्र या देशांत तसेंच परदेशांत सुद्धां फैलावलेलें आहे. या समितीच्या अंतर्गत सुसंघटित अशा बारा समित्या कार्य करीत आहेत. मुंबई प्रांतिक राष्ट्रभाषा प्रचार सभेचें कार्यक्षेत्र मुंबई शहर व उपनगर यांपुरतेंच मर्यादित असलें तरी ह्या संस्थेकडून आतां बरीच प्रगति होत आहे. या संस्थेच्या प्रेरणेनें दरवर्षी हिंदी परीक्षांना बसणा-यांची संख्या आज सत्तावीस हजारांपेक्षां अधिक झाली असून या संस्थेमार्फत चालविण्यांत येणा-या शिक्षणकेंद्रांची संख्या आतां दोनशें पंधरापर्यंत वाढली आहे. जवळ जवळ एक हजार निःस्वार्थी कार्यकर्ते राष्ट्रभाषेचे प्रचारक बनून या शिक्षणकेंद्रांतून सेवावृत्तीनें हिंदीच्या अध्यापनाचें कार्य करीत आहेत ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. या कार्यकर्त्यांच्या अविश्रांत प्रयत्नानेंच या बहुभाषी मुंबईत हिंदीच्या प्रसाराचें कार्य दिवसेंदिवस वाढत जाईल यांत शंका नाहीं.

आमच्यासमोर प्रत्यक्ष लोकमान्य टिळक व विनोबाजी भावे यांचे आदर्श आहेत. लोकमान्यांना सुरुवातीस हिंदी येत नव्हतें. परंतु आपल्या देशभक्तीमुळें आणि आपल्या स्वदेशाभिमानामुळें राष्ट्रभाषा हिंदीचें त्यांनीं ज्ञान करून घेतलें आणि पूर्ण विचारांती हिंदी हीच सबंध देशाची भाषा होऊं शकेल या निर्णयाप्रत ते आले. त्यानंतर त्यांनीं हिंदीच्या प्रसारकार्यामध्यें लक्ष घालण्यास सुरुवात केली. राष्ट्रांचे संघटन व ऐक्य साधण्यासाठीं सगळ्या ठिकाणीं समजली जाईल अशा भाषेची फार आवश्यकता असून हिंदी हीच अशा प्रकारची भाषा आहे असें ते नेहमीं म्हणत असत. महात्मा गांधींच्या विचारानुसार हिंदीला त्यांनीं राष्ट्रभाषा म्हणून मानली होती. हिंदी भाषेच्या प्रसारकार्यामागें याप्रमाणें महात्मा गांधी व लोकमान्य टिळक यांच्या विचारांची प्रेरणा आहे. महाराष्ट्रांत हिंदीचा प्रचार सुव्यवस्थित रीत्या चालू असून येथें या भाषेचा जो व्यापक स्वरूपांत प्रसार झालेला आहे त्या प्रसाराची पार्श्वभूमि या प्रांतांतील या महान् नेत्यांनींच तयार केली आहे, ही आमच्या दृष्टीनें अतिशय अभिमानास्पद अशी बाब आहे. सर्वश्री बाबुराव विष्णु पराडकर, माधवराव सप्रे, लक्ष्मण नारायण गर्दे, दुगवेकर आणि काका कालेलकर या मराठी विद्वानांनीं तर हिंदी भाषेची अविस्मरणीय अशी सेवा केली आहे. अशा त-हेची, हिंदी सेवा करण्याची महाराष्ट्रांत एक परंपरा निर्माण झाली आहे. ही परंपरा कायम राखणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे.

महाराष्ट्रांत हिंदीच्या प्रचारासाठीं अतिशय अनुकूल असें वातावरण आहे. विदर्भ आणि मराठवाड्यांतील बहुसंख्य लोकांना हिंदी चांगलें येतें. पश्चिम महाराष्ट्रांतील मोठ्या शहरांतून हिंदीच्या प्रसाराकडे योग्य त-हेनें लक्ष देण्यांत येत आहे. तथापि महाराष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला कांही ठराविक कालावधींत हिंदीचा चांगला परिचय होईल अशा दृष्टीनें या राज्यांत हिंदीच्या

प्रसारचें योजनाबद्ध कार्य जोमदारपणें होण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रांत मराठी व इतर दुस-या भाषा यांच्या प्रगतीबरोबरच हिंदीचीहि द्रुतगतीनें प्रगति होईल याबद्दल मला बिलकुल संदेह वाटत नाहीं.

## माझा विरंगुळा

"माझा विरंगुळा" या विषयावर बोलतांना माझ्या आयुष्यांतील अनेक आठवणींची साखळी आज माझ्या नजरेसमोर येत आहे. योगायोगानें म्हणा अगर स्वतःच्या आवडीनिवडीप्रमाणें प्रयत्नानें म्हणा, प्रत्येक माणूस स्वतःचें कार्यक्षेत्र निवडीत असतो. परंतु त्यांतहि त्याला स्वतःचा असा एक विरंगुळा म्हणून असतोच. कारण जीवनाच्या रोजच्या धकाधकींतून त्याला जे कांहीं विसाव्याचे क्षण मिळतात त्या वेळीं हा विरंगुळा त्याला जीवनांतील उच्च प्रतीचा आनंद मिळवून देत असतो. अर्थात् विरंगुळा माणसाला अनेक प्रकारें मिळूं शकतो. किंबहुना त्याला लाभणारा विरंगुळा हा त्याच्या आवडीनिवडीवर व व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असतो. कारण तसें नसतें तर माणसाला ज्यामुळें विरंगुळा मिळतो त्यावरून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे निरनिराळे पैलू आपणांस दिसतेच ना. माझा विरंगुळा कशांत आहे ? माझ्या दृष्टीनें मोठा कठीण प्रश्न आहे हा. माझ्यासारख्या राजकारणांत प्रत्यक्ष जबाबदारीचें काम करणा-या माणसाला हा शोध घेणें कसें जमणार ? शिवाय ति-हाइताच्या दृष्टीनें स्वतःकडे पाहतां येणें ही सुद्धां मोठी अवघड गोष्ट आहे. हें जरी सर्व खरें असलें तरी सुद्धां ही गंमतीदार कसरत करण्याचा प्रयोग मी आज करणार आहें. इंग्रजीत ज्याला लाउड थिंकिंग म्हणतात तशाच प्रकारचें हें माझें चिंतन आहे.

मी जेव्हां माझ्या जीवनाकडे दृष्टिक्षेप टाकतों त्या वेळीं प्रथम माझ्या मनासमोर जर कोणतें चित्र उभें राहात असेल तर मी ज्या ठिकाणीं वाढलों, खेळलों आणि ज्या ठिकाणीं माझें व्यक्तिमत्त्व घडलें त्या माझ्या क-हाड गावाचें. माझ्या पाठीमागच्या सर्व व्यापांतून सवड काढून क-हाडच्या प्रीतिसंगमावर मीं कांहीं काळ निवांतपणें घालवावा अशी इच्छा वारंवार माझ्या मनांत येते. सुदैवानें नुकतीच मला तशी संधि मिळाली आणि क-हाडच्या प्रीतिसंगमावर मी थोडा वेळ जाऊन आलों. त्या वेळीं भूतकाळांतील हृद्य आठवणींनीं माझे मन भरून आलें. माझ्या गतजीवनाचा चित्रपट झराझर माझ्या डोळ्यासमोर येऊन गेला. माझी आई, माझे बंधु व इतर कुटुंबीय मंडळी या सर्वांच्या प्रेमळ सहवासांत घालविलेले दिवस मला आठवले व त्यांच्या सहवासांत मिळालेल्या अपूर्व आनंदाच्या गोड स्मृति माझ्या हृदयाला स्पर्श करून गेल्या. मी कितीहि थकलेला असलों तरी घरांतील आणि कुटुंबांतील प्रेमळ व निर्मळ वातावरणानें माझें मन उल्हासित होतें. देवघरांतील नंदादीपाच्या मंद प्रकाशामध्यें भाविकांच्या मनांत ज्या सुखद लहरी उठतात त्याचें

वर्णन नुसत्या शब्दांने कसें करतां येणार ? भावनेची भाषा भावनेलाच समजते. कुटुंबांतील मंडळीमध्यें बसून हास्यविनोद करीत, गप्पागोष्टी करीत, वेळ घालविण्यांत केवढा आनंद असतो ! माझ्या कुटुंबातील मंडळींबरोबर अशा प्रकारें कांहीं वेळ घालविणें हा माझा एक आवडता विरंगुळा आहे.

लहानपणीं शाळेंत असतांना किंवा तरुणपणीं राजकीय चळवळींत रमलों असतांना मला कधीं कधीं काव्यकल्पना सुचत आणि मी त्या वेळीं कागदावर देखील उतरीत असें. कॉलेजांत असल्यापासून काव्य आणि साहित्य यांचें मला फार मोठें आकर्षण वाटत असे आणि अद्यापिहि तें वाटतें. म्हणून आज देखील वेळांत वेळ काढून साहित्याची गोडी मी चाखतो आणि त्यामुळें मला मनमुराद आनंद मिळतो. मराठींतील कादंबरीकारांपैकीं श्री. खांडेकर यांच्या भावनाप्रधान कादंब-या आणि श्री. फडके यांच्या प्रणयप्रधान कथा मीं अनेक वेळां अतिशय उत्सुकतेनें वाचल्या आहेत आणि त्यांचा आनंद लुटला आहे. संत ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयांतील गोडवाहि मीं अतिशय भाविक मनानें चाखला आहे. ज्ञानेश्वरांचें काव्य हा मराठी भाषेचा महान् ठेवा आहे. साहित्यिकांच्या शब्दांतील अफाट सामर्थ्य पाहून कित्येक वेळां आपलें मन थक्क होतें. मॅक्झिम गॉर्की यांची "आई" ही कादंबरी मीं ज्या वेळीं प्रथम वाचली त्यावेळी माझ्या हृदयांत अतिशय कालवाकालव झाली. असें कांहीं अक्षर वाङ्मय वाचलें कीं, आपण आपलें स्वत्व क्षणभर विसरून जातों, आणि सुखाच्या निवांत क्षणांत रममाण होतों.

वेरूळ येथील कैलास लेणीं ज्या वेळीं मीं प्रथम पाहिलीं त्या वेळच्या माझ्या भावना आजहि आठवतात. तीं कैलास लेणीं पाहून माझें मन भारावून गेलें. आजूबाजूचें जे लोक मला त्यांच्यासंबंधीं माहिती देत होते त्यांचे अस्तित्व देखील मी क्षणभर विसरून गेलों. माझें मी-पण मी विसरलों, आणि किंचित् काल एका स्वर्गीय अशा आनंदांत रममाण झालों. मला वाटतें, आजकालच्या धकाधकीच्या जीवनांत, व्यक्तीच्या आयुष्यांत असा क्षण येणें हाच त्याला लाभणारा खरा विरंगुळा होय. असा विरंगुळा प्रत्येकाच्या जीवनामध्यें जितका जास्त येईल तितकें त्याचें जीवन अधिक सुखी बनेल. श्रेष्ठ कलाकृतीमध्यें जीवन फुलविण्याची अशी अमर्याद शक्ति असते.

साहित्याची गोडी आपण एकांतांत चाखतों. पण समाजांत प्रत्यक्ष लोकांमध्यें बसून नाटक पाहणें, लोकनाट्याची मौज लुटणें, कुस्त्यांची रणधुमाळी अवलोकणें किंवा क्रिकेटची टेस्ट मॅच पाहण्यांत दंग होणें यांतील मौज कांहीं औरच आहे. एखाद्या जुन्या नाटकांतील पडदा वर जाऊन पेटीचे सुमधुर स्वर वातावरणांत घुमूं लागले किंवा सारंगीचे मृदु सूर कानीं पडले कीं, एका निराळ्याच जगांत आपण प्रवेश करतों. त्यावेळीं आपल्या भावना कशा दोलायमान होतात त्याचें वर्णन

शब्दांनीं करतां येणार नाहीं. बालगंधर्वांचीं ती जुनीं गाणीं आठवलीं किंवा त्या काळांतील नटश्रेष्ठांच्या अभिनयकौशल्याची नुसती आठवणी आली कीं गोड स्मृति चाळविल्या जातात. केशवराव दाते यांच्यासारख्या कसलेल्या नटांच्या भूमिका आणि जुन्या काळांतील तीं भरदार नाटकें, यांच्या आठवणी देखील किती सुखद वाटतात. रसिक समुदायामध्यें बसून नाटकांची गोडी चाखणें किंवा तमाशांच्या फडांची मौज लुटणें अशा जीवनांतल्या किती तरी गोष्टी आहेत कीं, ज्यांपासून मीं अक्षरशः मनसोक्त आनंद लुटला आहे. बडे गुलामअल्लीखां, भीमसेन जोशी, हिराबाई बडोदेकर ह्यांच्यासारख्या सुप्रसिद्ध कलाकारांचें गायन म्हणजे जीवनांतील आनंदाचा उच्चांक होय.

साहित्य, संगीत, नाटक, चित्रकला ह्यासारख्या कलांनीं माणसाच्या जीवनाला समृद्धि आणलेली आहे. मानवाला सुसंस्कृत बनविलें आहे. परंतु एखादा माणूस साक्षर असून देखील सुसंस्कृत नसतो. कारण जीवनांतील आनंद कसा लुटावा हें त्याला ठाऊक नसतें. कलेचें रहस्य जाणण्याची दृष्टि त्याला प्राप्त झालेली नसते. त्यामुळें जीवनांत त्याचें मन कोठेंच रमत नाहीं. त्याला कशापासून देखील विरंगुळा मिळत नाहीं. अशा प्रवृत्तीपासून आपण दूर राहिलें पाहिजे. माझ्या जीवनाकडे मी जेव्हां दृष्टिक्षेप टाकतों त्या वेळीं सुदैवानें मला जीवन आनंदमय वाटतें व नव्या क्षितिजांच्या ओढीनें माझें मान अद्यापहि भारावून जातें.

मीं क्षणभर विचार केला तरी मला असें वाटतें कीं, किती तरी गोष्टी अद्यापि करावयाच्या राहून गेल्या आहेत. मला पोहोण्याची खूप हौस आहे. पण वेळ मिळतो कुठें ? गायन किंवा नाट्य यांची देखील मला कमी गोडी नाहीं. एखादें चांगलें नाटक पाहावें म्हणून ठरवतों, पण ऐन वेळीं दुसराच कार्यक्रम उपस्थित होतो. एखादी संध्याकाळ मित्रांबरोबर सुखसंवाद करण्यांत घालवावी म्हणून बेत आंखतों. पण मध्येंच दुसरें कांही काम निघतें. त्यामुळें सुखाचे जे क्षण योजलेले असतात ते दूर जातात. थोडासा विरंगुळा वाटावा म्हणून कांहीं गोष्टी करावयाच्या ठरविलेल्या असतात. पण त्या तशाच राहतात आणि विश्रांतीचे क्षण दैनंदिन कामांतच विलीन होऊन जातात.

कांही विषयांचा तपशीलवार अभ्यास करावा म्हणून त्या विषयांवरील महत्त्वाची पुस्तकें मी जमा करीत असतो. अशा पुस्तकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ही सर्व पुस्तकें आवडीनें मीं माझ्या झोपण्याच्या खोलींत ठेवलीं आहेत. कित्येक महिने झाले या पुस्तकांना माझा हातच लागत नाही, वेळच मिळत नाही. आणि थोडा वेळ मिळालाच तर त्या पुस्तकांच्या छोट्या कपाटापुढें बसून त्यांची पानें चाळीत तीं कोणत्या क्रमाने वाचावींत याचा कार्यक्रम मनाशी योजणें एवढाच विरंगुळा हल्ली मला राहिला आहे.

तथापि, माणसाने आपल्या जीवनांतील वास्तवता लक्षांत घ्यावयास हवीच. निव्वळ स्वप्नसृष्टींत कांही आपण वावरू शकत नाही. ध्येयवादी वृत्तीने कार्य करीत असतांना स्वप्नाळू श्रद्धा उपयोगी पडत नाहीं. जीवनांतील कटु सत्यावर प्रकाश टाकणा-या व वास्तवतेची झळ कमी करणा-या हास्यरसाची जोड त्याला हवीच. गंभीर गोष्टींकडे सुद्धां कांहींशा स्मित वदनानें पाहतां येण्याएवढा सोशीकपणा अंगीं असावयास हवा. रोजच्या व्यवहारांत अशा वृत्तींने जर आपण काम करूं शकलों तर क्षणाक्षणाला जीवनाचा आनंद आपल्याला लुटतां येईल. विख्यात लेखक लिन युतांग ह्यानें मानवी रहस्य सांगितले आहे. तो म्हणतो, "जीवनांतील वास्तवता ध्यानांत घेऊन ध्येयवादी प्रवृत्तीनें कार्य करणारा व येणा-या अडचणींना हसत हसत तोंड देणारा गृहस्थच खरा ज्ञानी होय." वास्तवता, स्वप्नसृष्टि व हास्यरस ह्या तीन गोष्टींचे एकत्र मिश्रण म्हणजेच ज्ञान होय, असें त्यानें जीवनाचें गणित मांडले आहे. हें गणित संपूर्ण बरोबर आहे की नाही तें मी सांगूं शकणार नाही. पण मला वाटतें, त्यांत पुष्कळसा अर्थ आहे.

कांही तरी नवें शोधावें व जें सांपडले त्यांत रस घ्यावा अशा प्रवृत्तीने आपण जीवन जगलों तरच त्याला जगणें म्हणतां येईल. ह्यांत काय आहे? त्यांत काय आहे? अशा तुसड्या वृत्तीने आपण जर प्रत्येक क्षण वाया घालविला तर जीवनाचा लपंडाव आपण हरलोंच असें समजावयाला हरकत नाहीं. जीवनांत जे सुखाचे क्षण येतात ते सूर्याच्या कोंवळ्या किरणांसारखे सोनेरी व सतेज असतात. ते क्षणभर राहतात आणि नंतर कडक होतात. परंतु ज्या वेळी हे किरण कोंवळे दिसतात त्या वेळी त्यांचे तें तेज, तें रम्य स्वरूप पाहून मनाला आल्हाद वाटतो, गंमत वाटते. नदीच्या खोल डोहांत दगड टाकला कीं, पाण्यावर तरंग उठतात, एकांतून एक अशी वर्तुळे उठतात, आणि पाहणा-याला मोठी मजा वाटते. जंगलाच्या वाटेनें जात असतांना उन्हाच्या वेळी एखादा झरा दिसला कीं, त्याचें पाणी पितांना केवढा आनंद होतो. एवढेंच कशाला, ओढ्याच्या काठी भरगच्च जांभळांनीं भरलेल्या झाडाचीं चार जांभळें तोंडांत टाकलीं की तीं किती गोड लागतात. बाजारांतून विकत आणलेल्या जांभळांना त्या गोडीची सर थोडीच येणार! जीवनामधील आनंदाचे क्षण हे असे असतात.

जुन्यापासून बोध आणि नव्याचा शोध घेत घेत जाणारा हा मानवी जीवनप्रवाह आहे. ह्या प्रवाहांत प्रवाहपतित न बनतां सुजाणपणे मार्ग आक्रमीत जाणें व जगण्याचा आनंद लुटणें हा एक छोटासा आदर्श माझ्यापुढें आहे. हाच माझा खरा विरंगुळा आहे.

## प्रगतीचें पहिलें पाऊल

महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या वाढदिवसाच्या आजच्या या मंगल प्रसंगी तुमच्यासमोर बोलतांना मला अतिशय आनंद होत आहे. एका अर्थी महाराष्ट्र राज्य आज अवघे एक वर्षाचें आहे, तर दुस-या आणि अधिक खोल व व्यापक अर्थानें महाराष्ट्र हा भारताचा हजारों वर्षांपूर्वीपासूनचा एक भाग आहे. भारताचा एक अविभाज्य भाग म्हणून महाराष्ट्राच्या कांही थोर परंपरा आहेत, कांही अधिकार आहेत, पण त्याचबरोबर त्याच्या कांही जबाबदा-याहि आहेत. आपणां सर्वांची मायभूमि असलेल्या भारताचा महाराष्ट्र हा बलशाली व सामर्थ्यवान घटक बनविण्याची आजच्या या शुभप्रसंगी आपण प्रतिज्ञा करूं या.

एक वर्षापूर्वी महाराष्ट्र राज्याच्या उद्घाटन प्रसंगी सरकारच्या वतीनें मी कांही अभिवचनें दिली होती. आपल्याला पुढें ज्या भूमिकेवरून कार्य करावयाचें आहे त्याचीं कांही तत्त्वें व धोरणें मीं त्या वेळीं सांगितली होतीं. त्या प्रसंगीं मी दिलेली आश्वासनें व अभिवचनें नुसतीं आश्वासनें व अभिवचनेंच नव्हती. त्यांच्या पूर्ततेच्या दिशेने महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या वर्षांत कसोशीचे प्रयत्न करण्यांत आले आहेत. आजच्या प्रसंगी, केलेल्या प्रगतीचा आढावा घेणें व पुढें करावयाच्या कामाची पुन्हा एकदां उजळणी करणें उचित ठरेल. आपणां सर्वांना माहीतच आहे कीं, महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली ती कांही भारतापासून महाराष्ट्राचें वेगळें अस्तित्व सिद्ध करण्यासाठी नव्हे, तर राज्यांतील लोकांना आपल्या राज्यकारभारांत अधिक सुलभ रीतीने भाग घेतां यावा यासाठींच होय, अशा रीतीनें त्यांना केवळ आपल्या राज्याच्याच नव्हे तर सर्व देशाच्या प्रगतीस अधिक परिणामकारक रीतीनें हातभार लावतां येईल. महाराष्ट्र जेवढा अधिक सामर्थ्यवान व समृद्ध होईल तेवढा भारतहि अधिक सामर्थ्यवान व समृद्ध होईल. एकभाषी राज्याच्या कल्पनेमागील प्रेरक शक्ति हीच आहे असें मी मानतों.

लोकांची भाषा ही राज्यकारभाराची भाषा व्हावी ही अगदीं स्वाभाविक अपेक्षा आहे. तसें झालें तरच लोकांना आपले नित्य व्यवसाय व कामें आपल्या मातृभाषेंतून करतां येतील, आपल्या अडचणी व प्रश्न सरकारपुढें बिनदिक्कत मांडतां येतील आणि साहित्य, कला, इत्यादींतून आपला सांस्कृतिक विकास घडवून आणतां येईल. या विचारानेंच सरकारनें डायरेक्टोरेट ऑफ लँग्वेज म्हणजे भाषा मंडळाची स्थापना केली आणि इंग्रजींतून चालणारा राज्यकारभार मराठींतून चालविण्याकरितां आवश्यक ती भूमिका तयार करण्याचें काम त्याच्याकडे सोंपविले. राज्य सरकारचें माध्यम म्हणून मराठीला स्थान देण्याची पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने शब्दकोश व इतर मार्गदर्शक ग्रंथ तयार

करण्याकरितां एक भाषा सल्लागार मंडळ स्थापण्यांत आलें आहे. तसेंच, महाराष्ट्रातील साहित्य, इतिहास व संस्कृति यासंबंधीं संशोधन करण्याकरितां एक वेगळ्या  मंडळाची स्थापना करण्यांत आली आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनें ज्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनास चालना मिळाली त्याला आपल्याकडून सर्वतोपरी साहाय्य करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. तथापि राज्यांत इतर भाषा बोलणारे जे मोठे व महत्त्वाचे गट आहेत त्यांची यामुळें कोणत्याहि प्रकारें कुचंबणा होणार नाही असें आश्वासन सरकार त्यांना देऊं इच्छितें, तेव्हां महाराष्ट्र राज्याच्या या महान मंदिरांत भाषा, वंश, धर्म वा जात असा कोणत्याहि प्रकारचा भेदाभेद न होतां सर्वांना समान स्थान राहील.

खुद्द महाराष्ट्रांत ऐक्याच्या भावनेची आज किती आवश्यकता आहे हें मी वेगळें सांगण्याची गरज नाहीं.. निरनिराळ्या शासनांखाली राहिल्यामुळें व निरनिराळ्या ऐतिहासिक घटनांमधून गेल्यामुळें मराठी भाषिकांची अनेक शतकें ताटातूट झाली. या अनेक शतकांच्या ताटातुटीनंतर ते एकत्र आले तो दिवस त्यांच्या जीवनांतील सोनियाचा दिवस होता. असा हा सुवर्णकाल सुरू झाल्यानंतर आपली शक्ति व साधनसामुग्री क्षुद्र गोष्टींवर फुकट दवडणें केवळ मूर्खपणाचेंच ठरेल - मग अशा क्षुद्र गोष्टी वरपांगी कितीहि महत्त्वाच्या वाटोत. सबंध भारताप्रमाणेंच सबंध महाराष्ट्र हा एक आहे आणि कोणत्याहि एका भागाची प्रगति व भरभराट ही दुस-या एखाद्या भागास तोशीस लावून होऊं शकणार नाही अशी महाराष्ट्र सरकारची धारणा आहे. निरनिराळ्या विभागांच्या गरजा, साधनसामुग्री व सुप्त शक्ति यांचा बरोबर अंदाज बांधून सबंध राज्याच्या हिताच्या दृष्टीने प्रादेशिक विषमता काढून टाकणें ही खरी आजची गरज आहे. महाराष्ट्र राज्याचे जे निरनिराळे भाग आहेत त्यांची पूर्वपीठिका, तेथील सामाजिक संस्था व विकासाची अवस्था एका अर्थानें भिन्नभिन्न आहेत ही गोष्ट सुपरिचितच आहे. ऐतिहासिक व इतर कांही कारणांमुळे हें घडलें आहे. एकमेकांचीं वैशिष्ट्यें एकमेकांना पूर्णपणें समजून येण्यास कांही कालावधि जावा लागेल. याकरितांच जे भाग तुलनात्मक दृष्ट्या कांहीसें अविकसित व मागासलेले आहेत त्यांचा विकास करण्याकडे सरकार कटाक्षानें लक्ष पुरवीत आहे. मराठवाडा, कोंकण व विदर्भ हे असे विभाग असून महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळीं या विभागांना खास आश्वासने देण्यांत आली होतीं. या अविकसित भागांच्या उन्नतीकडे खास लक्ष पुरविणें हें आपलें कर्तव्य असून आर्थिक व सामाजिक न्यायावरील आपल्या श्रद्धेची कसोटी त्यावर लागणार आहे. उदाहरणार्थ, विदर्भांतील ज्या विणकर समाजाची पूर्वी उपेक्षा झाली त्याची स्थिती सुधारावी म्हणून सरकार आज जे प्रयत्न करीत आहे त्यामागील मनोभूमिका हीच आहे. यासाठीं सरकारने जी समिती नेमली होती तिनें नागपूर येथें पन्नास लाख रुपये खर्च करून विणकरांची सूतकताईची एक सहकारी गिरणी काढावी अशी शिफारस केली आहे. अशी गिरणी निघाल्यास ती या विणकर समाजाच्या इतिहासांत व त्याचबरोबर महाराष्ट्राच्या इतिहासांत एक महत्त्वाची घटना ठरेल. तसेंच या विणकर

समाजामधील शैक्षणिक मागासलेपणा दूर करण्याचा सरकारचा मनोदय आहे. यापैकीं कांही संस्थांत सूतकताई, विणकाम, रंगकाम इत्यादि कामांच्या खास शिक्षणाची सोय करण्यांत येईल.

मी परवांच कोंकणच्या दौ-यावरून परत आलों. आपल्या राज्यांतील या निसर्गरम्य अशा भागाचें व तेथील लोकांच्या जीवनांचे प्रत्यक्ष निरीक्षण करावें, त्यांच्या गरजांचा अभ्यास करावा व इतर माहिती मिळवावी या हेंतूने मीं हा दौरा काढला होता, आणि हा दौरा मला खरोखरी स्फूर्तिप्रद असाच वाटला. रत्नागिरी, जयगड, दाभोळ, मालवण, वेंगुर्ले, राजापूर वगैरे अनेक बंदरें मीं पाहिलीं. कोंकणच्या किना-यावर या बंदरांची एक सांखळीच आहे. आपल्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देणारे शिवाजी महाराजांचे किल्ले याच भागांत आहेत. कोंकणच्या विकासाच्या दृष्टीने या बंदरांचा विकास होणें फार निकडीचें आहे ही गोष्ट मला या वेळी अतिशय तीव्रतेनें जाणवली. खनिज संपत्ति, मनुष्यबळ व नैसर्गिक साधनसामुग्री या तीन बाबतींत कोंकण खरोखरीच अतिशय समृद्ध आहे. राज्याचा हा असा एक भाग आहे की, ज्याच्या विकासाकरितां आपण शक्य ते सर्व प्रयत्न केले पाहिजेत. केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर सबंध भारताला ज्यांची शिकवण मार्गदर्शक ठरली अशी संतांची भूमि असलेला जो मराठवाडा त्याचीहि स्थिती अशीच आहे. शिक्षण, दळणवळण, पाणीपुरवठा इत्यादि बाबतींत मराठवाड्याच्या ज्या खास गरजा आहेत त्यांची सरकारला पूर्ण जाणीव आहे व त्या दृष्टीने कांही खास योजना सुरू करण्यांत आल्या आहेत. राज्याचें हें दुसरें वर्ष संपण्यापूर्वीच पश्चिम महाराष्ट्रात कोयनेची वीज खेडोपाडी खेळू लागेल आणि त्यामुळे तेथील विकासाची गति वाढेल अशी आशा आपण करूं या.

स्वातंत्र्याच्या जबाबदा-या आणि दहा वर्षांचा नियोजनाचा अनुभव यांनी आपल्या गुणांबरोबर आपले दोषहि स्पष्ट केले आहेत. नियोजनाची जसजशी प्रगति होत आहे तसतसा त्याच्या अनुभवाचा फायदा घेऊन पुढचें नियोजन आपण अधिक सुज्ञपणानें केलें पाहिजे. नियोजनासंबंधींची दृष्टि आणि आर्थिक व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याची गरज या बाबतींत सर्व लोकांत व पक्षोपपक्षांत एकवाक्यता आहे ही खरोखर अतिशय आनंदाची गोष्ट आहे. ही एकवाक्यता म्हणजे आपली महान् शक्ति आहे असें मी समजतों. विकासाच्या कार्याची गति व दर्जा वाढविण्यासाठीं संघटित प्रयत्न झाला पाहिजे आणि आपण जें चांगले काम करीत आहोंत तें अधिक चांगलें कसें होईल यावर आपला कटाक्ष असला पाहिजे. दीर्घ मुदतीच्या नियोजनाच्या दिशेनें आपण यापूर्वीच पावले टाकलीं आहेत. इरिगेशन कमिशनची नियुक्ति हें असेंच एक पाऊल असून आपल्या राज्यांतील जलसंपत्तीचा अंदाज घेऊन राज्याची दीर्घकालीन भरभराट करण्याच्या दृष्टीनें तिचा उपयोग योग्य प्रकारें कसा करून घेतां येईल यासंबंधीचा विचार करणें हें या कमिशनचें काम होय. तसेंच सरकारला एकूण सर्व नियोजनासंबंधी व त्याचप्रमाणे तिस-या

पंचवार्षिक योजनेसंबंधी मार्गदर्शन करण्याकरिता एक राज्य नियोजन सल्लागार समिति स्थापन करण्यांत आली आहे. शिवाय एक औद्योगिक मंडळहि स्थापण्यांत आलें असून कालांतराने त्याचें कॉर्पोरेशनमध्ये रूपांतर होईल. प्रादेशिक व इतर विषमता दूर करून राज्याची अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभी करण्याचें हें कार्य प्रचंड स्वरूपाचें आहे. त्यासाठी औद्योगीकरण व जमीनसुधारणा या दोन्ही क्षेत्रांत धोरणाची सुसूत्र अशी आखणी व्हावयास पाहिजे. म्हणजे उत्पादनाच्या कार्यास जोराची गति मिळेल आणि त्याचबरोबर सर्वांना न्यायहि मिळेल. शहरी व ग्रामीण भाग, शेती व उद्योगधंदे, आणि राज्याचे निरनिराळे विभाग यांत समतोलपणा आणला पाहिजे. राज्यांत औद्योगिक विकासास पोषक असें वातावरण निर्माण केलें पाहिजे. त्यासाठी सरकारच्या उद्योग विभागाची केवळ पुनर्रचनाच करण्यांत येत आहे असें नव्हे, तर शहरी व ग्रामीण भागांतील नियोजनाची या विभागाला व्यवस्थित सांगड घालता येईल अशा प्रकारे त्याच्या दृष्टिकोनांतहि बदल घडवून आणण्यांत येत आहे. शेतीच्या क्षेत्रांत जी क्रांति आपण घडवून आणूं इच्छितो ती घडवून आणण्यांत शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या सहकारी उद्योगधंद्यांना फार महत्त्वाची कामगिरी बजावतां येईल.

दरम्यान आपल्या राज्यांत मालक व कामगार यांचे संबंध सलोख्याचे आहेत हें नमूद करतांना मला फार आनंद होत आहेत. त्यामुळें उद्योगधंद्यांच्या वाढीचा आपला कार्यक्रम धडाडीने अंमलांत आणण्याकरिता अनुकूल असें वातावरण निर्माण करण्यास मोठीच मदत झाली आहे. त्याबद्दल उद्योगधंद्यांचे मालक आणि कामगार या दोघांनाहि मी धन्यवाद देतो.

आर्थिक व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा महाराष्ट्र राज्यानें विडा उचलला आहे आणि त्या दिशेनें या वर्षांत कांही क्रांतिकारक अशी पावले टाकण्यांत आली आहेत. जमीनधारणेवर कमाल मर्यादा घालण्यासंबंधीचें विधेयक हें असेंच एक क्रांतिकारक पाऊल आहे. या विधेयकान्वयें वैयक्तिक धारणक्षेत्रावर कमाल मर्यादा घालण्यांत आली असून त्यामुळे जी जमीन उपलब्ध होईल ती ज्यांना जमिनीची अत्यंत गरज आहे अशा लोकांना देण्यांत येईल. या वर्षात भूमिहीनांच्या कुटुंबांना चार लाख एकर सरकारी पडिक जमीन वांटण्यांत आली आणि त्याचबरोबर ही जमीन ताबडतोब लागवडीखाली आणतां यावी म्हणून जरूर ती आर्थिक व इतर मदत करण्यांत आली. हेहि त्या दिशेनें टाकलेलें एक महत्त्वाचें पाऊल आहे.

लोकशाही विकेंद्रीकरणाच्या योजनेचा राज्याच्या कारभारावर फार दूरगामी परिणाम होणार आहे. या योजनेमुळे सुस्थिर अशी लोकशाही जीवनपद्धत निर्माण करण्यात मदत होईल व त्याचप्रमाणे

खेड्यांतील स्थानिक नेतृत्व, उपक्रमशीलता व सहकार्याची भावना जागृत होऊन ग्रामीण विकासाची गति वाढेल.

महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या वर्षाबरोबरच भारतांतील नियोजनाचें पहिलें शतक संपत आहे. आतां आपल्या दुस-या वर्षाबरोबर आपण नियोजनाच्या दुस-या दशकाचा मुहूर्त करीत आहोंत. राष्ट्ररचनेच्या कार्यात राज्यांतील सर्व क्षेत्रांतील लोकांचा आपल्याला सक्रिय पाठिंबा मिळत आहे हें पाहून माझें मन आनंदानें भरून येते. राज्यांतील नागरिक, मग तो व्यापारी असो अगर कामगार असो, शेतकरी असो अगर कारखानदार असो, सामान्य माणूस असो अगर बुद्धिमान माणूस असो, या सर्वांचा या कार्याला संपूर्ण पाठिंबा मिळेल याविषयी मला खात्री वाटते. आजपर्यंत आपल्याला जो अनुभव मिळाला व आपण जे धडे शिकलो ते लक्षांत घेतां पुढील वर्षांत आपण अधिक मोठें यश मिळवू अशी अपेक्षा करण्यात कांही हरकत नाहीं. म्हणून राष्ट्राच्या आणि आपल्या राज्याच्या हितासाठी नेटानें, जोमाने व निष्ठेने कार्य करू अशी प्रतिज्ञा या पवित्र दिवशी आपण करू यां.

## राष्ट्रीय प्रगतीचे तीन आधारस्तंभ

आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या पंधराव्या वर्षाचा प्रारंभ आजच्या दिवसानें होतो. ऑगस्ट १५ ला आपल्या देशाच्या इतिहासांत जें वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे त्यामुळे हा दिवस नेहमींच आपल्या आठवणींत राहील. नि:शस्त्र असतांना सुद्धां आपण एका अत्यंत बलाढ्य व अभिमानी अशा साम्राज्याशी टक्कर दिली आणि त्या साम्राज्याकडून आपलें स्वातंत्र्य प्राप्त करून घेतले. ध्येयातील आपली निष्ठा, तत्त्वांवरील अविचल श्रद्धा, कधींहि न ढळणारें धैर्य आणि लढ्याचें अहिंसात्मक व शांततामय तंत्र यांमुळेंच आपण आपलें ध्येय गांठू शकलो.

अशा प्रकारें, आपल्या लढ्यामध्ये अत्यंत चिकाटीने ज्या गुणांचा आपण परिपोष केला त्या गुणांनी आपल्याला आपल्या अडचणींच्या काळांत एखाद्या मार्गदर्शक ता-याप्रमाणे सदैव मार्गदर्शन केलें आहे. विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळांतील अडचणींच्या प्रसंगी हे गुण आपल्या अतिशय कामी आले ही गोष्ट त्या काळांतील घटनांवरून पूर्णपणें सिद्ध झाली आहे.

यामागील घटनांचा आपण जेव्हां विचार करतों तेव्हा आपण एका महान् राष्ट्रांचे घटक आहोंत, आणि विशेषत: राष्ट्र या शब्दांत जो नैतिक व आध्यात्मिक अर्थ आहे त्या अर्थानें आपलें राष्ट्र अतिशय महान आहे ही गोष्ट आपल्यासमोर स्पष्ट उभी राहते. आपल्या या उज्ज्वल परंपरेला

आपणांस पात्र ठरावयाचें असल्यास आपण आपलें मन विशाल केलें पाहिजे, अंत:करण खंबीर केले पाहिजे व या गुणांची सतत जोपासना केली पाहिजे. आपला देश भौतिक व आर्थिक अशा दोन्ही अर्थांनी सामर्थ्यवान बनविण्याचें जे प्रचंड कार्य आज आपण हाती घेतलें आहे त्यांत त्याचा आपल्याला फार उपयोग होणार आहे.

आपल्या राष्ट्रीय प्रगतीची भव्य इमारत आपल्याला लोकशाही, नियोजन व समाजवाद या तीन स्तंभांवर उभारावयाची आहे, याची आजच्या दिवशीं आपण आठवण ठेवणें समयोचित ठरेल. आपल्या देशासाठी आपण ज्या संसदीय लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे, त्या लोकशाहीसाठी कर्तव्यनिष्ठा, सहकार्य व शिस्त या गुणांची फार मोठ्या प्रमाणांत आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे दुसरी आवश्यक गोष्ट म्हणजे आपल्या राष्ट्रीय जीवनाच्या सातत्यांत कोणत्याहि प्रकारचा खंड न पडू देतां त्यामध्ये क्रमाक्रमानें परिवर्तन घडवून आणणें ही होय. दुस-या शब्दांत सांगावयाचे म्हणजे आपल्याला जे सामाजिक बदल घडवून आणावयाचे आहेत ते आपल्या उज्ज्वल भूतकाळाशी सुसंबद्ध असे असले पाहिजेत. सातत्याखेरीज कोणत्याहि प्रकारचा बदल घडून आला तर तो राष्ट्राच्या उलथापालथीला व विनाशाला कारणीभूत होतो. उलटपक्षीं कोणताहि बदल न होता चालूं राहणारें सातत्य हे गतिरहित स्थितीला कारणीभूत होतें. अशा प्रकारच्या गतिरहित स्थितीपासून राष्ट्र या नात्याने आपण आपलें संरक्षण केलें पाहिजे. बदल व सातत्य या प्रक्रियांमध्ये समतोल राखण्यासाठी आपण जी उपाययोजना करू त्यावरून आपल्या देशाची एकता, सामर्थ्य व स्थैर्य यांची आपल्याला प्रचीति येणार आहे. शांततामय पद्धतीचा स्वीकार हें सुद्धा लोकशाही पद्धतीचें आणखी एक आवश्यक असें वैशिष्ट्य असून आपल्या प्रत्येक कृतीमध्ये व हालचालीमध्ये हें वैशिष्ट्य प्रतिबिंबित झालें तरच आपण लोकशाही राष्ट्र या संज्ञेला पात्र आहोंत असे सिद्ध होईल.

लोकशाहीचा जो एक महान प्रयोग आपण सुरू केला आहे त्याबरोबर दुसरीहि एक गोष्ट ओघानेंच येते. आणि ती म्हणजे आपलें राष्ट्रीय नियोजन सुद्धां लोकशाही तत्त्वांशी सुसंगत असें असलें पाहिजे. या तत्त्वानुसार आपण आपल्या पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांची आंखणी केली आणि नुकतीच आपण आता आपली तिसरी पंचवार्षिक योजनाहि तयार केली आहे. नियोजनाचें हें काम अतिशय रोमहर्षक असून आपल्या मातृभूमीचे भवितव्य घडवून आणण्याच्या एका महान कार्यास नियोजनाद्वारे आपण प्रारंभ केलेला आहे. आपल्या अर्थव्यवस्थेच्या स्वरूपामध्यें अशा रीतीने आपण वैशिष्ट्यपूर्ण बदल घडवून आणीत असून त्यामुळे जनतेच्या जीवनमानामध्ये वाढ झाल्याशिवाय राहणार नाही. आपल्या मातृभूमीचा एक अविभाज्य घटक या नात्याने महाराष्ट्र राज्य आपली योजना पूर्णतया यशस्वी करण्याचा आटोकाट प्रयत्न करील आणि त्या बाबतींतील

आपलें कर्तव्य चोख बजावील. आपल्या लोकशाही योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी व पुढील पिढ्यांच्या हितासाठीं सध्यांच्या पिढीला कांही प्रमाणांत त्याग करावा लागेल यांत शंकाच नाही. परंतु हा त्याग ती मोठ्या आनंदानें करील याबद्दल मला खात्री आहे.

आपल्या योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे आपल्या उत्पादनाच्या पातळींत वाढ होणार असून, या वाढत्या संपत्तीच्या वांटणीमध्ये आपण वेळींच लक्ष घातलें नाहीं तर समाजांत आणखी विषमता निर्माण होईल. ती टाळण्यासाठी जी उपाययोजना करावयाची ती करतांना आपणांस निव्वळ तात्त्विक भूमिका घेऊन चालणार नाही. स्थूल अर्थानें समाजवाद हें आपलें ध्येय आहे आणि ते गांठण्यासाठी आपण आपलीं सर्व धोरणें त्याला पोषक होतील अशाच प्रकारें आखली पाहिजेत. त्यासाठी आपण जे उपाय योजूं ते आपली परिस्थिती व परंपरा यांना अनुरूप असे असले पाहिजेत. ते तसे नसले तर ती आपल्याकडून फार मोठी चूक होईल. ज्याप्रमाणे नियोजनाशिवाय आपला आर्थिक विकास आपण पद्धतशीरपणें करू शकणार नाहीं, त्याचप्रमाणे लोकशाही उपाययोजनांद्वारे सामाजिक विषमता आपणांस दूर करता आली नाहीं तर आपलें राष्ट्र महान आपत्तींत सांपडेल. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे लोकशाही, नियोजन आणि समाजवाद ही लोककल्याणाच्या एकाच समस्येचीं तीन वेगवेगळी अंगे आहेत. आणि म्हणून एक तर ते तीनहि आधार कायम टिकतील अथवा कोसळले तर ते एकदम कोसळतील.

गेल्या महिन्यात पुणें शहरांत आलेल्या भयानक महापुरामुळे त्या ऐतिहासिक शहरावर जी आपत्ति ओढवली तिचा उल्लेख न करतां मीं माझें भाषण संपविले तर मी माझ्या कर्तव्यांत चुकलों असें होईल. या संकटामुळें जी हानि झाली ती अतिशय प्रचंड असून ती कदाचित् कोट्यवधि रुपयांच्या घरांत जाईल. आपल्या पंतप्रधानांनी अलीकडेच या शहराच्या उध्वस्त भागाला भेट दिली आणि तेथील लोकांनी ज्या पराकाष्ठेच्या हालअपेष्टा सहन केल्या त्या त्यांनी आपल्या स्वत:च्या डोळ्यांनी पाहिल्या. विशेषत: अभूतपूर्व अशा या संकटामध्ये लोकांनी जी समतोल व शांत वृत्ति दाखविली त्यानें ते अतिशय प्रभावित झाले. सैन्य, मुलकी अधिकारी आणि खाजगी कार्यकर्ते व संस्था यांनी या शहराचे जीवन पूर्ववत् सुरू करण्याच्या कामीं पराकोटीचें सहकार्य केलें आहे. त्याचप्रमाणे या अतिकठीण प्रसंगी, या शहरांतील लोकांनी जें धैर्य व मनोबल दाखविले त्याचा फायदा या शहराची पुनर्रचना करतांना त्यांना मिळाल्याशिवाय राहणार नाही. पुणें शहराला पूर्वीपेक्षांहि अधिक चांगल्या स्थितींत आणण्याच्या कामीं सर्व त-हेनें कसोशीचे प्रयत्न करण्यांत येतील. मग त्यासाठी आम्हांला भगीरथ प्रयत्न करावे लागले तरी ते करण्याच्या कामी आम्ही कसूर करणार नाही, असें या पवित्र स्वातंत्र्यदिनी मी पुण्याच्या नागरिकांना आश्वासन देतों.